समता नगर वसाहतीच्या पुनर्विकासामध्ये 296 अत्यल्प उत्पन्न गटाच्या, 1488 अल्प उत्पन्न गटाच्या, 700 मध्यम उत्पन्न गटाच्या व 240 उच्च उत्पन्न गटाच्या अशा एकूण 2,724 सदनिकांपैकी अत्यल्प उत्पन्न गटाच्या 296, अल्प उत्पन्न गटाच्या 1488 व मध्यम उत्पन्न गटाच्या 40 अशा एकूण 1824 पुनर्वसन सदनिकांकरिता भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. तसेच 1152 निवासी व 77 अनिवासी विक्री सदनिकांकरीता भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-06-2026
16:49:09

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,

निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

कक्ष क्रमांक 407,तिसरा मजला,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई 51

जा.क्र. नि.का.अ./ मु.मं./ / 2026

दिनांक :-

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-400032.

विषय **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.9177.**
:-

- समता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ (कांदिवली) व एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. 8 HIG सोसायटींचा पुनर्विकास करित असल्याबाबत...

श्री. श्रीकांत भारतीय, मा.वि.प.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विपता-2026 / प्र.क्र.139/गृनिप, दि.05.06.2026.

महोदय,

श्री. श्रीकांत भारतीय, मा.वि.प.स. यांनी उपरोक्त विषयांकित **विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.9177 "** समता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ (कांदिवली) व एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. 8 HIG सोसायटींचा पुनर्विकास करित असल्याबाबत " करिता तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे.

त्या अनुषंगाने सदरहू तारांकित प्रश्नाची उत्तरे व पुरक टिप्पणी माहितीस्तव सादर करण्यात येत आहे. (मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासु,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-06-2026
15:42:24
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.9177.

- समता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ (कांदिवली) व एस.डी. कॉर्पोरेशन प्रा.लि. 8 HIG सोसायटींचा पुनर्विकास करित असल्याबाबत...

- श्री. श्रीकांत भारतीय, मा.वि.प.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विपता-2026 / प्र.क्र.139/गृनिप, दि.05.06.2026.

अ.क्र	प्रश्न	उत्तर
1.	म्हाडाने समतानगर येथील 8 HIG (इमारती 23, 25, 27, 28, 29, 31, 32 व 34) सोसायटींच्या इमारती व आसपासच्या क्षेत्रासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) मंजूर केला असून 200.75 कोटी रूपये स्विकारून 153886.50 चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्राची परवानगी दिली असल्याची बाब माहे एप्रिल, 2026 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,	हे खरे नाही.
2.	असल्यास, या सर्व 8 HIG संस्थांकडे स्वतंत्र नोंदणीकृत अभिहस्तांतरण पत्र (conveyance deed) व 99 वर्षांची भाडेपट्टा करार (Lease Deed) असून म्हाडा सोबतच्या विक्री करारनुसार (Sale Deed) सर्व समता नगर संस्थानी युनियन / फेडरेशनला फक्त देखभाल व सामान्य सेवा व्यवस्थापनासाठीचे अधिकार दिले असून संस्थांच्या AGM मध्ये संस्थेच्या पुनर्विकासाकरीता कोणत्याही पुनर्विकासक (Redeveloper) किंवा युनियनची नेमणूक केलेली नसतानाही व कोणत्याही करारनाम्या शिवाय परस्पर एस. डी. कॉर्पोरेशन प्रा. लि. ला पुनर्विकासाचे अधिकार दिले आहेत, हे ही खरे आहे काय,	समतानगर सह. गृह. संस्था युनियनने दि.07.01.2007 रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विकासक मे. एस.डी.कार्पोरेशन प्रा. लि. यांना नियुक्त केले व त्यांचेसोबत दि.19.02.2007 रोजी विकास करारनामा केला. शासनाने दि.06.11.2007 रोजीच्या पत्रान्वये समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहतीच्या एकत्रित पुनर्विकासास परवानगी दिलेली आहे. तसेच शासनाने दि.10.02.2017 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, शासनाचे दि.06.11.2007 चे आदेश मुळात एकत्रित पुनर्विकासासाठी असल्याने अभिन्यासातील म्हाडाच्या सर्व लिज धारकांना एकत्रित पुनर्विकासात नियमानुसार सामावुन घेण्यात यावे. मा. मंत्री, सहकार यांच्या दि.12.11.2013 रोजीच्या अदेशामध्ये, दि.07.01.2007 रोजीच्या समतानगर सह. गृह. संस्था युनियनच्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव सभासद संस्थांवर बंधनकारक असल्याबाबतचा भाग अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे असे नमूद आहे. High Power Committee यांनी अर्ज क्र.05/2018 च्या अनुषंगाने दि.14.09.2018 रोजी जारी केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे नमूद केले आहे. *"In view of the aforesaid facts of the case and the judgements as*
3.	असल्यास, विकासकास या 8 HIG संस्थांच्या पुनर्विकासाची परवानगी रद्द करून इमारतींचा पुनर्विकास संस्थेने निवडलेल्या विकासकाद्वारे करण्याबाबत तसेच वाढीव FSI या 8 HIG संस्थांकडेच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	

		enumerated herein above this Committee does not find any infirmity in the permission granted by MHADA for integrated Re-development of entire Samta Nagar layout including Economic Weaker Section (EWS), Lower Income Group (LIG), Middle Income Group (MIG), Higher Income Group (HIG) and Open Spaces, Various Reservations and etc. duly sanctioned by State Government."
4.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-06-2026
15:47:28

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय :- विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.9177.

- समता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था संघ (कांदिवली) व एस. डी. कॉरपोरेशन प्रा.लि. 8 HIG सोसायटींचा पुनर्विकास करीत असल्याबाबत
- **श्री. श्रीकांत भारतीय, मा.वि.प.स.**

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विपता-2026 / प्र.क्र.139/गृनिप, दि.05.06.2026.

सी.टी.एस. क्र. 837 ते 840 कांदिवली (पूर्व) मुंबई येथील 2,22,823.50 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर म्हाडाची समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहत असून या वसाहतीमधील 160 इमारतींमध्ये 296 अत्यल्प उत्पन्न गटाच्या, 1488 अल्प उत्पन्न गटाच्या, 700 मध्यम उत्पन्न गटाच्या व 240 उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका आहेत. अभिन्यासामधील संस्थांनी एकत्रित पुनर्विकासाच्या अनुषंगाने 1996 पासून प्रक्रिया सुरु केली होती.

वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासाकरिता अभिन्यासातील काही संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या समतानगर सह. गृह. संस्था युनियनने विकासक मे. ट्रुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा. लि. यांचेबरोबर दि.31.01.1998 रोजी पुनर्विकासाकरिता विकास करारनामा केलेला होता.

त्यानुषंगाने विकासकामार्फत सदर वसाहतीतील पुनर्विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु मुंबई मंडळ / म्हाडाने समतानगर सह. गृह. संस्था युनियनला पुनर्विकासासाठी जारी केलेल्या ना हरकत प्रमाणपत्रापेक्षा अधिक क्षेत्रफळाचे बांधकाम विकासकाने प्रत्यक्ष जागेवर केल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरचे बांधकाम थांबविण्याचे आदेश देण्यात आले होते. विकासकाने ना हरकत प्रमाणपत्रामध्ये मंजुर केलेल्या बांधकामापेक्षा अधिकचे अनधिकृत बांधकाम केल्यामुळे समतानगर सह. गृह. संस्था युनियनने दि.07.01.2007 रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मे. ट्रुली क्रिएटिव्ह डेव्हलपर प्रा. लि. यांची नियुक्ती रद्द करून दुसरे विकासक मे. एस.डी.कार्पोरेशन प्रा. लि. यांना नियुक्त केले व त्यांचेसोबत दि.19.02.2007 रोजी विकास करारनामा केला.

मुंबई महानगरपालिकेने दिनांक 28.04.2005 रोजी समतानगर वसाहतीचा अभिन्यास मंजूर केला आहे. मंजूर करतेवेळी असे नमूद केले आहे की, समतानगर वसाहतीचा एकत्रित पुनर्विकास करणे योग्य राहील, जेणेकरुन खुल्या जागा, आरक्षणे, रस्ते, पाणी, मल:निस्सारण सेवा यांचे एकत्रित स्वरुपात नियोजन करणे शक्य होईल. यानंतर शासनाने दि.06.11.2007 च्या पत्रान्वये समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहतीच्या एकत्रित पुनर्विकासास परवानगी दिलेली आहे. तसेच अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी पत्र दि.10.02.2017 अन्वये कळविले आहे की, शासनाचे दि.06.11.2007 चे आदेश मुळात एकत्रित पुनर्विकासासाठी असल्याने अभिन्यासातील म्हाडाच्या सर्व लिज धारकांना एकत्रित पुनर्विकासात नियमानुसार सामावुन घेण्यात यावे.

समतानगर, कांदिवली (पूर्व) या वसाहतीमधील उच्च उत्पन्न गटाच्या इमारत क्र. 23 ते 34 या 12 इमारती असून त्यापैकी इमारत क्र.24 ही स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया व इमारत क्र.26, 30 व 33 या इंडियन एअरलाईन्स च्या मालकीच्या असून उर्वरीत 8 इमारती या सहकारी गृह. संस्थांच्या आहेत. या 8 इमारतींपैकी इमारत क्र.23, 25, 27, 28, 29 व 34 या 6 इमारती दि.19.02.2007 रोजीच्या विकास करारनाम्यामध्ये समतानगर सह. गृह. संस्था युनियनच्या सभासद संस्था आहेत.

मे. एस.डी.कार्पोरेशन प्रा. लि. यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा वसमतानगर सहकारी गृहनिर्माण संस्था युनियन यांचेविरुद्ध मा. मंत्री, सहकार यांचेसमोर सादर केलेल्या पुनर्निरिक्षण अर्जाच्या अनुषंगाने जारी केलेल्या दि.12.11.2013 रोजीच्या आदेशामध्ये मुख्यत्वे खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहेत;

" सर्व वस्तुस्थितीचा विचार करता असे दिसून येते कि, प्रतिवादी क्र. २ शिखर संस्थेच्या सभासदांपैकी ५४ संस्थांनी विविध मार्गाने जसे कि दि. ०७/०१/२००७ च्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव, संस्था ठराव, मा. उच्च न्यायालयामार्फत किंवा कराराद्वारे प्रतिवादी क्र. २ संस्था व अर्जदार मे. एस. डी. कार्पोरेशन यांना पुनर्विकासाबाबत संमती दिली आहे व बिगर सभासदांपैकी ९ संस्थांचे ठराव किंवा करारनामे करुन संमती दिली आहे. अर्जदार यांनी निदर्शनास आणल्यानुसार प्रतिवादी क्र. २ च्या ६० सभासद संस्थांपैकी ५४ म्हणजे ८० टक्क्यांपेक्षा जास्त सभासद संस्था व बिगर सभासद संस्था मिळून देखील जवळ जवळ ८० टक्क्यांपेक्षा जास्त संस्थांनी अर्जदार मे. एस. डी. कार्पोरेशन व प्रतिवादी क्र. २ समता नगर युनियन ही शिखर संस्था यांच्या मार्फत पुनर्विकासास संमती दिली असल्याचे दिसून येत आहे."

तसेच, मा. मंत्री, सहकार यांच्या दि.12.11.2013 रोजीच्या आदेशामधील मुद्दा क्र. 2 व 3 मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे;

"२) प्रतिवादी क्र. १ उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांच्या दि. २०/०६/२०१३ रोजीच्या अहवालामधील महाराष्ट्र शासनाचे दि. ०३/०१/२००९ रोजीचे पुनर्विकासाबाबत निर्देश प्रस्तुत पुनर्विकास योजनेस लागु करण्याबाबतचे निष्कर्ष रद्द करण्यात येत आहेत. तसेच दि.०७/०१/२००७ रोजीच्या प्रतिवादी क्र. २ संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव सर्व सभासद संस्थांवर बंधनकारक असल्याबाबतचा भाग अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

३) प्रतिवादी क्र. १ उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालात अर्जदार मे. एस. डी. कार्पोरेशन यांच्या नेमणुकीस संस्थांची मान्यता असल्याबाबतच्या त्यांच्या निष्कर्षामध्ये पुढील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे. युनियनच्या सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था ४१ ऐवजी ५४ सभासद संस्थांची मान्यता, युनियनच्या सभासद नसलेल्या ६ सहकारी गृहनिर्माण संस्थाऐवजी ७ संस्था व निमशासकीय संस्था २ संस्था अशा एकुण ९ मिळून ६३ संस्थांची अर्जदार मे. एस. डी. कार्पोरेशन यांच्या नेमणुकीस संमती असल्याची वस्तुस्थिती कायम करण्यात येत आहे."

High Power Committee यांनी अर्ज क्र.05/2018 च्या अनुषंगाने दि.14.09.2018 रोजी जारी केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"In view of the aforesaid facts of the case and the judgements as enumerated herein above this Committee does not find any infirmity in the permission granted by MHADA for integrated Re-development of entire Samta Nagar layout including Economic Weaker Section (EWS), Lower Income Group (LIG), Middle Income Group (MIG), Higher Income Group (HIG) and Open Spaces, Various Reservations and etc. duly sanctioned by State Government."

समतानगर युनियन यांनी अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाकरिता अधिमुल्यापोटी म्हाडाकडे अंदाजे रु.293.00 कोटी इतक्या रकमेचा भरणा केला आहे. त्यानुसार समतानगर वसाहतीतील अत्यल्प उत्पन्न गटाच्या, अल्प उत्पन्न गटाच्या व मध्यम उत्पन्न गटाच्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता मंडळाने 3,00,411.88 चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाकरीता ना हरकत प्रमाणपत्र जारी केले आहे. त्यानुसार अत्यल्प उत्पन्न गटाच्या 296, अल्प उत्पन्न गटाच्या 1488 व मध्यम उत्पन्न गटाच्या 40 पुनर्वसन सदनिका असलेली पुनर्वसन इमारत क्र.1 विंग ए, बी, सी, डी, ई, एफ व जी चे बांधकाम पूर्ण झाले असून त्यास भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-06-2026
15:44:47

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.९६८०
मुंबईतील सायन प्रतीक्षानगर मधील इमारती, आणि ट्रान्झिट कॅम्पच्या पुनर्विकासाबाबत.
श्री. प्रविण दरेकर मा.वि.प.स. व इतर मा.वि.प.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपता – २०२६/ प्र.क्र.१५२ / गृनिप, दि.- १५/०६/२०२६.

महोदय,

श्री. प्रविण दरेकर मा. वि.प.स. व इतर मा. वि.प.स. यांनी उपस्थित केलेला, विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.९६८०, कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अनुषंगाने, विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.९६८० चे प्रश्ननिहाय उत्तर व पुरक टिप्पणीसोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 25-06-2026
12:11:16

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NLS/MHADA, MHADA, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 25/06/2026 12:20 PM

पूरक टिप्पणी :

विषयः विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.९६८०

मुंबईतील सायन प्रतीक्षानगर मधील इमारती, आणि ट्रान्झिट कॅम्पच्या पुनर्विकासाबाबत.

श्री. प्रविण दरेकर मा.वि.प.स. व इतर मा.वि.प.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपता – २०२६/प्र.क्र.१५२ / गृनिप, दि.- १५/०६/२०२६.

टिप्पणी:

म्हाडाने मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींमधील रहिवाशांना तातडीने स्थलांतरीत करण्यासाठी मुंबई मंडळाच्या मोकळ्या भूखंडावर बैठी संक्रमण शिबीरे बांधली होती. सदर संक्रमण शिबीरे ही जुनी तसेच मुंबईतील जमिन घर बांधणीसाठी कमी पडू लागल्याने म्हाडाने सन १९९७ मध्ये सदर संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करून बहुमजली संक्रमण शिबीरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने प्रतिक्षानगर सायन येथील बैठ्या संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास सन १९९७ मध्ये टप्याटप्याने सुरू करण्यात आला. आजमितीपर्यंत ४ टप्यात करण्यात आलेल्या प्रतीक्षानगर पुनर्विकासामध्ये अंदाजे ४९% जमीन हि संक्रमण शिबीर इमारतींसाठी वापरण्यात आली असून उर्वरित ५१% जमीन हि विक्री घटकांतील इमारतींसाठी वापरण्यात आलेली आहे.

सन - १९९७ पासून आजपर्यंत म्हाडाने ४ टप्प्यांत एकूण २०९ इमारतींमध्ये ९,९५५ सदनिका व ३०४ दुकाने बांधली आहेत.सदर २०९ इमारतींपैकी ९८ संक्रमण शिबीर इमारती असून, यामध्ये ६,३८७ सदनिका व १२३ दुकाने बांधण्यात आली आहेत. सदर ९८ इमारतींपैकी २ इमारती (१२८ सदनिका) पोलीस विभागास हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे म्हाडाकडे ९६ संक्रमण शिबीर इमारतींमध्ये ६,२५९ सदनिका व १२३ दुकाने आहेत. उर्वरित योजनानिहाय (अल्प, मध्यम, उच्च उत्पन्न गट) १११ इमारती असून, यामध्ये ३,५६८ सदनिका व १८१ दुकाने बांधून, सोडतीद्वारे अथवा थेट पद्धतीने वितरीत करण्यात आली आहेत.

सद्यस्थितीत, टप्पा क्रमांक ५ मध्ये अत्यल्प उत्पन्न गटाची १ इमारत (८४ सदनिका) पूर्ण झाली असून, सोडतीद्वारे सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत. १ अत्यल्प उत्पन्न गट/ संक्रमण शिबीर पुनर्वसन इमारत(३४४ सदनिका + ४ दुकाने) प्रस्तावित आहे. तसेच मध्यम उत्पन्न गटाच्या ४ इमारतींचे (३५२ सदनिका) बांधकाम प्रगतीपथावर आहे. आजमितीपर्यंत बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबीर सदनिकांचा टप्पानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NLS/MHADA MHADP, EXECUTIVE ENGINEER, MHADA, on 25/06/2026 12:20 PM

संक्रमण शिबीर सदनिका

अ.क्र.	टप्पा क्र.	सदनिकांचा प्रकार	चटई क्षेत्रफळ(चौ.फू.)	मजले	इमारती	सदनिका	दुकाने
१.	१.	संक्रमण शिबीर सदनिका	२२५	तळ + ७	५	४००	८
		संक्रमण शिबीर सदनिका	२२५	तळ + ७	२४	२१०४	
२.	२.	संक्रमण शिबीर सदनिका	१८०	तळ + ४	२६	११५७	५८
		पोलीस विभाग सदनिका	२२५	तळ + ७	२	१२८	
३.	३.	संक्रमण शिबीर सदनिका	१८०	तळ + ४	१९	१२१३	४२
४.	४.	संक्रमण शिबीर सदनिका	१८०	तळ + ४	२२	१३८५	१५
एकूण संक्रमण शिबीर सदनिका (टप्पा क्र. १ ते ४)					९८	६,३८७	१२३

सन - २०२१ पासून प्रतिक्षानगर, येथील इमारती सभोवतालच्या जमिनीतून तसेच इमारतीमध्ये हादरे बसत असल्याच्या तसेच काही इमारतीच्या भिंतींना व इमारती सभोवतालच्या कॉंक्रिटला तडे जात असल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवासी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून म्हाडास प्राप्त होत आहेत. सदर अनुषंगाने, या इमारतींची म्हाडामार्फत वेळोवेळी पाहणी करून आवश्यक असेल तेथे संरचनात्मक दुरुस्ती करण्यात येत आहे.

सदर विषयाचा तांत्रिकदृष्टया सखोल अभ्यास करण्यासाठी व मूळ कारण शोधण्यासाठी म्हाडाने या विषयाबाबत नामांकित असलेली आय.आय.टी. मद्रास या संस्थेची नेमणूक करणेबाबत, मुख्य अभियंता-२/प्राधिकरण यांनी पत्र क्र.१८३०, दि.०३.०५.२०२३ अन्वये, मे. बी.जी.शिर्के सी.टी.पी.एल. यांना निर्देशित केले. आय.आय.टी. मद्रास यांनी सखोल अभ्यास व त्यामागच्या कारणांचा तपास करून दि.२४.०९.२०२४ रोजी आपला अहवाल म्हाडास सादर केला आहे.

सदर अहवालात आय.आय.टी. मद्रास यांनी, प्रामुख्याने येणाऱ्या काळात जमीन खचण्यापासून वाचण्यासाठी तीन पर्याय सुचविले आहेत. परंतु या अहवालात त्यांनी असेही नमुद केले आहे की, सद्यस्थिती मध्ये असलेले अरूंद रस्ते, सततची वाहनांची / रहिवाश्यांची वर्दळ व जवळ जवळ असलेल्या इमारती या सर्व बाबी विचारात घेता, तसेच शिफारस केलेल्या तीन पर्यायांचा येणारा खर्च विचारात घेता, सुचविलेले तीनही पर्यायांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे व्यवहार्य नाही. आय.आय.टी मद्रास यांनी इमारतींच्या संरचनेचे Repair & Restoration संबंधीही भाष्य केले आहे. ज्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, इमारतींच्या संरचनेचे Repair & Restoration करणे हे खूप खर्चीक आहे आणि असे काम करण्यापूर्वी जमीन खचणे थांबवणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद सर्व बाबी विचारात घेता आय.आय.टी. मद्रास यांनी या सर्व इमारतींचा समूह पुनर्विकास करणे संयुक्तिक व व्यवहार्य राहील आणि समूह पुनर्विकास करताना या इमारतींचे डिझाईन हे अद्यावत मानकानुसार करण्यात यावे, अशी शिफारस केली आहे.

सदर दरम्यान, अभिन्यासातील संक्रमण शिबीर इमारत क्र. टी३६, टी३७, टी५३ व टी५४ बाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्यामुळे, आय.आय.टी. बॉम्बे यांच्यामार्फत संबंधित इमारतींचे सर्वेक्षण करून घेण्यात आले. सदर सर्वेक्षण अहवाल दि.२१.०२.२०२५ रोजीचा असून अहवालामध्ये सदर इमारती धोकादायक असल्यामुळे इमारतींचा पुनर्विकास करण्यात यावा, असे नमूद आहे.

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NE/MHADA MHADA, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 25/06/2026 12:20 PM

सदर बाबत दि.०५/१२/२०२५ रोजी मा. आमदार प्रावण दरेकर, अध्यक्ष स्वय समुह पुनावेकास प्राधिकरण यांच्या दालनात बैठक झाली. सदर बैठकीस मा. आमदार प्रसाद लाड, म्हाडाचे वरिष्ठ अधिकारी व स्थानिक रहिवासी हजर होते. सदर बैठकीमध्ये स्थानिकांनी संक्रमण शिबीर इमारत क्र. टी३६, टी३७, टी५३ व टी५४ मधील रहीवाश्यांची पर्यायी व्यवस्था त्याच भू-अभिन्यासात देण्याची मागणी केली व तेथील सर्व इमारतींच्या पुनर्विकासाबाबत चर्चा झाली.

दि.०८/१२/२०२५ रोजी मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्या दालनात सदरबाबत बैठक झाली. सदर बैठकीदरम्यान सध्या चालू असलेल्या टप्पा क्र.५ मधील, विक्री घटकाची मध्यम उत्पन्न गट इमारत क्र.७७(A व B) च्या ऐवजी, सदर ठिकाणी संक्रमण शिबीर इमारत बांधण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून संक्रमण शिबीर इमारत क्र. टी ३६, टी३७, टी५३ व टी५४ मधील रहिवाशांचे प्रतिक्षानगर सायन येथील अभिन्यासात पुनर्वसन होईल. तसेच बैठकीत संपूर्ण संक्रमण शिबीर इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने अवलोकन करून, त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

उपरोक्त बाबी व गेल्या ३/४ वर्षांपासून प्राप्त होत असलेल्या स्थानिक रहिवासी व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी विचारात घेता, प्रतीक्षानगर, सायन येथील बांधलेल्या तळ+४/७ मजली संक्रमण इमारतींचा पुनर्विकास आय.आय.टी. मद्रासच्या भू-तांत्रिक अभियांत्रिकी विभागाच्या मार्गदर्शक प्रणालीनुसार पायाचे बांधकाम करून बहुमजली इमारती बांधण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त अनुषंगाने, सी.एस. ४, ५(भाग), सॉल्ट पॅन डिव्हिजन, प्रतिक्षानगर, सायन येथील म्हाडा अभिन्यासामधील संक्रमण शिबीर इमारतींचा प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्प प्रस्ताव शासन मान्यतेकरीता पाठविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 25-06-2026
12:11:57

मुख्य अधिकारी,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,

म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NI S/MHADA, MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 25/06/2026 12:20 PM

प्रश्न उत्तरे :

विषयः विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.९६८०
मुंबईतील सायन प्रतीक्षानगर मधील इमारती, आणि ट्रान्झिट कॅम्पच्या पुनर्विकासाबाबत.
श्री. प्रविण दरेकर मा.वि.प.स. व इतर मा.वि.प.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपता – २०२६/ प्र.क्र.१५२ / गृनिप, दि.- १५/०६/२०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबई येथील सायन-प्रतीक्षा नगरमधील ३० वर्षांहून अधिक जुन्या झालेल्या ८८ धोकादायक ट्रान्झिट कॅम्प इमारतींमधील सुमारे ८,२०० पेक्षा जास्त रहिवाशांच्या पुनर्विकास अभ्युदयनगर व काळाचौकीच्या धर्तीवर (क्लस्टर डेव्हलपमेंट) करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा. मुख्यमंत्री महोदयांनी सहकार भवनाच्या उद्घाटन कार्यक्रमात म्हाडा उपाध्यक्षाना दिल्या असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,	होय हे खरे आहे.
२.	असल्यास, म्हाडाने प्रकल्प अहवाल तयार केला आहे काय, असल्यास, किती वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे म्हाडाचे नियोजन आहे, असल्यास, प्रकल्प अहवालाला मान्यता देण्यापूर्वी लोकप्रतिनिधी आणि स्थानिक रहिवाश्यांच्या संघटना यांना त्याचे सादरीकरण करण्यात येईल काय, त्यांच्याकडून सूचना मागवल्या जातील काय,	प्रतीक्षानागर, सायन येथील म्हाडा अभिन्यासातील संक्रमण शिबीर इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प प्रस्ताव शासन मान्यतेकरिता पाठविणे प्रस्तावित असून, सदरबाबत म्हाडामार्फत कार्यवाही चालू आहे. सदर प्रकल्पास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
३.	असल्यास, धोकादायक इमारतींची पाहणी करून म्हाडाच्या माध्यमातून पुनर्विकास प्रक्रिया गतिमान करुन भाडेकरूंना धोकादायक ट्रान्झिट कॅम्पमधून कायमस्वरूपी आणि सुरक्षित घरांमध्ये स्थलांतरित करता येण्याकरिता उक्त प्रस्तावास मान्यता मिळून सदर प्रकल्प अहवाल म्हाडाने तातडीने सादर	वरीलप्रमाणे.

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NLS/MHADA, MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 25/06/2026 12:28 PM

	करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,	
४.	नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	लागू नाही.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 25-06-2026
12:12:25

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2550/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3282719)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NI&SMHADA MUMBR, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 25/06/2026 12:20 PM

कोकण मंडळ

जा.क्र./ मु.अ./को.मं/ 6344 /२०२६
दिनांक:- 29 JUN 2026

प्रति,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय मुख्य इमारत ३ रा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-
४०० ०३२

विषय:- विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९६७४
"म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत." मा. श्री. प्रविण दरेकर व इतर मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:- विपता-२०२६/प्र.क्र.१४७/गृनिधो-२, दिनांक १० जून २०२६.

उपरोक्त विषयावरिल संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

संदर्भाधिन पत्रास अनुसरुन उपस्थित केलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९६७४ बाबतचे भागश: उत्तर पुरक टिप्पणीसह सोबत सादर करण्यात येत आहे.

(डॉ. विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:- विधान परिषद तारांकित प्रश्न क्र. ९६७४

"म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत."
मा. श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:-विपता-२०२६/ प्र.क्र.१४७/गृनिधो-२, दिनांक १० जून २०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	म्हाडाच्या कोकण मंडळांतर्गत चार महानगरपालिका (ठाणे, विरार, नवी मुंबई व कल्याण-डोंबिवली) क्षेत्रात चार हजार चौरस मीटरच्या भूखंडावर उभ्या राहणाऱ्या घरांपैकी २०टक्के घरे सर्व सामान्यांकरिता म्हाडा हाऊसिंग स्टॉकच्या माध्यमातून देणे बंधनकारक असताना विकासकाने सदर नियमाचे उल्लंघन केले असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,	हे खरे नाही.
२	असल्यास, महारेरा प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार, सदरमहानगरपालिका क्षेत्रात ८०२ गृहनिर्माण प्रकल्प सुरु असल्याचे व त्यापैकी केवळ आठ जणांनी (विकासक) म्हाडाला घरे देण्याचा प्रस्ताव दिला असून केवळ८० घरे उपलब्ध होत आहेत उर्वरित विकासकांनी त्याबाबत अद्याप काहीच कळविले नसल्याचे दि. १४मार्च, २०२६रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,	हे खरे नाही.
३	असल्यास, म्हाडाला घरे मिळाल्याशिवाय महानगरपालिकांनी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला रोखून धरण्याची कारवाई केली नसून शासन या संपूर्ण घोटाळ्याची चौकशी करावी आणि विकासक तसेच अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि. २८/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,	संबंधित महानगरपालिका व शासनाशी संबंधित बाब आहे.
४	असल्यास, सदर नियमांचे उल्लंघन केलेल्या विकासकाविरुध्द युडीसीपीआर मधील कायद्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे, म्हाडाकडून प्रत्यक्ष प्रकल्पाचे ठिकाणी जाऊन तपासणी करण्याच्या दृष्टीने महारेरा प्राधिकरणाची याबाबतची भूमिका काय आहे व त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	शासनाशी संबंधित बाब आहे.
५	नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(डॉ.विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:- विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९६७४
" म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत." मा. श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:-विपता-२०२६/प्र.क्र.१४७/गृनिधो-२, दिनांक १० जून २०२६.

मा. श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी टिप्पणी.

पूरक टिप्पणी

सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), मधील नियम ३.८.२ व ३.८.२ मधील तरतुदीनुसार १० लक्ष अथवा त्यावरील लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकाक्षेत्रामधील ४००० चौ. मी. किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडास संबंधित नियोजन प्राधिकरणामार्फत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) प्राप्त झाल्यानंतर संबंधित मालक/ विकासक यांचे मार्फत २० टक्के अंतर्गत निर्माण होणाऱ्या परवडणाऱ्या सदनिकांची संख्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास तात्काळ कळविणे आवश्यक आहे. मालक/ विकासक यांचेमार्फत सदनिकांची यादी प्राप्त झाल्यानंतर म्हाडामार्फत/ मंडळामार्फत सोडतीद्वारे लाभार्थ्यांची यादी निश्चित केली जाते. सदर लाभार्थ्यांची यादी संबंधित विकासकास पाठविण्यात येते. सदनिकेच्या वितरण यादी प्राप्त झाल्यानंतर मालक/ विकासकांमार्फत लाभार्थ्यांना प्रचलित वर्षिक दर तक्त्यानुसार बांधकाम खर्च + २५% अतिरिक्त मुल्य या दराने विक्री किंमत निर्धारित करुन सदनिकेचे वितरण करण्यात येते (Construction cost mentioned in ASR applicable of the year of disposal plus २५% additional cost).

ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, वसई-विरार महानगरपालिका व कल्याण-डोंबीवली महानगरपालिका या क्षेत्रातील ४००० चौ. मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावरील ज्या प्रकल्पास परवडणारे घरे २०% योजनेतंर्गत बांधकाम प्रमाणपत्र जारी केले आहे. त्या विकासकांनी उक्त विनिमयामधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्याबाबत तसेच केवळ आठ विकासकांनी म्हाडाला ८० घरे उपलब्ध करुन दिल्याबाबत कुठलीही माहिती अथवा तक्रार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे अथवा कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

२०% सर्वसमावेशक योजनेतंर्गत मालक/ विकासक यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित महानगर पालिकेकडून प्रकल्पास बांधकाम प्रमाणपत्र जारी करण्यात येते. एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील नियम ३.८.२(ब)(iii) मधील तरतुदीनुसार मालक / विकासक यांनी २०% योजनेतंर्गत संबंधित महानगर पालिकेकडून बांधकाम प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध होणा-या सदनिकांची यादी तात्काळ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना कळविणे बंधनकारक आहे. तथापि, मालक/ विकासकामार्फत सदनिकांची यादी विहित मुदतीत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कोंकण मंडळामार्फत संबंधित महानगर पालिका तसेच मालक/ विकासक यांचेकडे २०% योजनेमध्ये सदनिकांची यादी सादर

करणेबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.संबंधित महानगरपालिका मार्फत२०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत प्रकल्पास मंजुरी देऊन व बांधकाम प्रमाणपत्र जारी करण्यात येऊन सुदधा मालक/ विकासकामार्फत प्रकल्प व प्रकल्पात उपलब्ध सदनिकांची यादीकोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास विहीत मुदतीत प्राप्त होत नसल्यामुळे संबंधित महानगर पालिकेमार्फत मंजूर प्रस्ताव व सदनिकांची संख्या तसेच कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्षरित्या प्राप्त प्रस्ताव व सदनिकांची संख्या यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास येत आहे.

एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनिमय ३.८.२ मधील तरतुदींनुसार २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ठाणे, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिके मार्फत ज्या प्रस्तावांना मंजूरी दिली आहे, त्या प्रस्तावांची संख्या व सदनिकांची संख्या तसेच २०%सर्वसमावेशक योजनेअंतर्गत मालक/ विकासक यांचेमार्फत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्ष प्राप्त प्रस्तावांची संख्या व सदनिकांची संख्या याचा तपशिल खालील तक्त्यात नमूद केला आहे.

अ. क्र.	महानगर पालिका	एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन विनिमय, २०२०, मधील विनिमय ३.८.२ तरतुदींनुसार २०% सर्वसमावेशक योजनेतील मंजूर प्रस्ताव	२०% सर्वसमावेशक योजनेतील सदनिकांची संख्या	२०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त प्रस्तावांची संख्या	२०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त सदनिकांची संख्या
१	२	३	४	५	६
१	नवी मुंबई महानगर पालिका	१८	५५२	१२	३७४
२	कल्याण-डोंबिवली महानगर पालिका	६२	२८४२	२६	९९०
३	वसई विरार महानगर पालिका	३४	१७३९	२४	८०५
४	ठाणे महानगर पालिका	८०	४८९८	६७	२८४७
	एकूण	१९४	१००३१	१२९	५०१६

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासप्राप्त झालेल्या ५०१६ सदनिकांपैकी ४१९९ सदनिकांची २०२१ ते २०२५ या कालावधीत संगणकीय प्रणालीमार्फत सोडत काढण्यात आली आहे. सदर सदनिकांचे वितरण हे ऑनलाईन सोडतीव्दारे मानवी हस्तक्षेप विरहीत व पारदर्शक पणे करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सोडत व सोडतीपश्चात करण्यात येणारी प्रक्रिया ही INTEGRATED

HOUSING LOTTERY MANAGEMENT SYSTEM २.० आणि BOOK MY HOME PORTAL या संगणकीय प्रणालीव्दारे करण्यात येते. सदर प्रक्रिया हि कालबद्ध व वापरकर्त्यास हाताळण्यास सुलभआहे.

संबंधित महानगरपालिका मार्फत मंजूर प्रस्ताव व सदनिकांची संख्या तसेच कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्ष प्राप्त प्रस्ताव सदनिकांच्या संख्येतील तफावतीच्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिका यांचेकडून प्रकल्पांबाबत अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्यात येत आहे व प्रकल्पाशी संबंधित मालक/ विकासक यांच्याकडून २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत मंजूर प्रस्तावातील सदनिका प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने विकासकाच्या विक्री घटकातील सदनिकांस भोगवटा प्रमाणपत्र न देण्याबाबत संबंधित महानगरपालिकेस कळविणे, तसेच महारेरा कडे संबंधित प्रकरणी तक्रार दाखल करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात संबंधित महानगरपालिके समवेत योग्य तो समन्वय ठेवण्यात येईल, जेणेकरुन २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत सदनिका मंडळास प्राप्त होतील व सदर सदनिका सोडतीव्दारे अत्यल्प, अल्प उत्पन्न गटातील अर्जदारांना वितरीत करण्यात येतील.

(डॉ.विशाल राठोड)
मुख्यअधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

नाशिक मंडळ

म्हाडा MHADA

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन,गडकरी चौक,नाशिक
फोनक्र. ०२५३-२२२९२०३ ते २२२९२३१

जा. क्र. मुअ/नामं/भूसं/ईटी- /२०२६
दिनांक: / /२०२६

प्रति,
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग,
मुख्य इमारत, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
mhpmustate@gmail.com

विषय : विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९००९.
नाशिक शहरातील गृहनिर्माण योजनेकरिताच्या भुखंडाची बांधकाम व्यावसायीकांची फसवणूक केल्याबाबत.- ॲड. अनिल परब, मा.वि.प.स.

संदर्भ : आपले कार्यालयीन पत्र जा.क्र. जा.क्र.विपता-२०२६/प्र.क्र.१४४/गनिधो-२, दि.०८/०६/२०२६ आणि त्यासोबतचे सचिव-३ महाराष्ट्र विधानपरिषद, सचिवालय यांचे पत्र क्र./ई-१,दि.०४/०६/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरुन ॲड. अनिल परब, मा.वि.स.स. यांनी विचारलेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र.९००९ मधील प्रश्नांची भागश: उत्तरे पूरक टिप्पणी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

आपला विश्वासु,

Digitally signed by
Shivkumar Manohar Awalkanthe
Date: 02-07-2026 16:10:11

(शिवकुमार आवळकंठे)
मुख्य अधिकारी,
नाशिकगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक

पुरक टिप्पणी :

विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९००९.

नाशिक शहरातील गृहनिर्माण योजनेकरिताच्या भुखंडाची बांधकाम व्यावसायीकांची फसवणूक केल्याबाबत.-ॲड. अनिल परब, मा.वि.प.स.

पुरक टिप्पणी :

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते कि, नाशिक महानगरपालिका हद्दीत भुअभिन्यास/बांधकाम प्रकल्पांना सर्वसमावेशक गृहनिर्माण योजना लागू न होण्याकरिता शहरातील काही जमिनमालक/विकासक यांनी नियमबाह्य पद्धतीने भुखंडांचे ४००० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रामध्ये विभाजन केले आहे. सदर बाबत सखोल चौकशी होणेकरिता मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून मा. अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आलेली होती, ही बाब आपणास ज्ञात आहे.

सदर चौकशी समितीमध्ये तपासणी करण्यात आलेल्या १०८ प्रकरणांव्यतिरिक्त देखील अशी प्रकरणे असण्याची शक्यता असल्याने मा.मंत्री, महसूल व वनविभाग, महाराष्ट्र राज्य यांनी मा. विधानभवनात दिलेल्या निर्देशानुसार मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय विशेष चौकशीची समिती गठीत करण्यात आलेली आहे.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या विशेष चौकशी समितीच्या दि.१२/०५/२०२६ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीत मा.अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गठित समितीच्या अहवालामध्ये उपअधिक्षक, भुमि अभिलेख, नाशिक व नगर भुमापन अधिकारी, नाशिक यांचेकडून समितीकडे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या प्रकरणांबाबत या कार्यालयास खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"त्याचप्रमाणे ज्या प्रकरणांमध्ये आणखी त्रयस्थ व्यक्तिचा हितसंबंध तयार होवू नये म्हणून म्हाडाने मुद्रांक नियंत्रक व नोंदणी महानिरीक्षक यांना पत्र द्यावे आणि त्यानुसार नोंदणी महानिरिक्षकांनी नियमानुसार negative list तयार करुन त्यांची खरेदी-विक्री प्रक्रिया थांबवाव्यात असे सर्वानुमते ठरले"

उपरोक्त निर्देशान्वये या कार्यालयाचे पत्र क्र. २२९४६९३, दि.२९/०५/२०२६ व पत्र क्र. २३१९५९७, दि.१५/०६/२०२६अन्वये प्रथमदर्शनी नियमबाह्य विभाजन करण्यात आलेल्या प्रकरणांची खरेदी विक्री व्यवहार थांबविण्याबाबत मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच नगररचना विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक व सहाय्यक जिल्हाधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांचे द्वारे कारवाई प्रस्तावीत करण्यात आलेली आहे.

मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

सोबत :- वरीलप्रमाणे.

Digitally signed by
Shivkumar Manohar Awalkanthe
Date: 02-07-2026 16:10:40

(शिवकुमार आवळकंठे)
मुख्य अधिकारी,
नाशिकगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक

विषय : : विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ९००९.

नाशिक शहरातील गृहनिर्माण योजनेकरिताच्या भुखंडाची बांधकाम व्यावसायीकांची फसवणूक केल्याबाबत.

ॲड. अनिल परब, मा.वि.प.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	नाशिक शहरातील चार हजार चौरस मीटरपेक्षा कमी भुखंडांची कृत्रिमरित्या विभागणी करून गृहनिर्माण योजनेसाठी आवश्यक असलेली २० टक्के जमीन म्हाडाला न देता अनेक बांधकाम व्यावसायिकांनी महसुल व भूमी अभिलेख विभागाची पर्यायाने शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,	होय.
२	असल्यास, सदर प्रकरणात आडगाव, म्हसरुळ, दसक, देवळाली, विहितगांव, नांदुर, गंगापुर आणि चेहडी या भागासाठी सुमारे १०८ प्रकरणात तलाठी आणि विभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील नोंदीच्या प्राथमिक तपासणीत १५ बांधकाम व्यावसायिकांनी नियमांचे उल्लंघन केल्याचेही निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,	अंशत: खरे आहे. १०८ प्रकरणी नियमांचे उल्लंघन झालेबद्दल अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तथापि, विभागीय कार्यालयाद्वारे विशेष चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे १५ बांधकाम प्रकल्पांबाबत माहिती अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
३	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक शहरातील गरिब नागरिकांसाठी राखीव असलेली जमीन व्यवसायिकांकडुन म्हाडास परत देण्याबाबत तसेच म्हाडाच्या घरांवर अतिक्रमण करणाऱ्या दोषी विकासकांवर	सदर बाबत मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय विशेष चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर विशेष चौकशी समितीच्या दि.१२/०५/२०२६ रोजी झालेल्या सहाव्या बैठकीत प्रथमदर्शनी

	कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,	नियमबाह्य विभाजन करण्यात आलेल्या प्रकरणांची खरेदी विक्री व्यवहार थांबविण्याबाबत समिती अध्यक्ष यांनी या कार्यालयास निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशान्वये या कार्यालयाचे पत्र क्र. २२९४६९३, दि.२९/०५/२०२६ व २३१९५९७, दि.१५/०६/२०२६ अन्वये मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संदिग्ध प्रकरणांची खरेदी-विक्री थांबविण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. अशाच प्रकारे नगररचना विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक व सहाय्यक जिल्हाधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांचे द्वारे कारवाई प्रस्तावीत करण्यात आलेली आहे.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.	अशी बाब नाही.

मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

Digitally signed by
Shivkumar Manohar Awalkanthe
Date: 02-07-2026 16:11:20

(शिवकुमार आवळकंठे)
मुख्य अधिकारी,
नाशिकगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नाशिक

विधानसभा

तारांकित

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

[म्हाडाचा घटक]
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
कक्ष क्र.३४१, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पुर्व], मुंबई -५१.

म्हाडा MHADA

जा.क्र. का.अ./उ.वि.-३/कु.वि./मुं.मं./ /२०२६.
दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३८९८.
मुंबईतील कन्नमवार नगर व टागोर नगर येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास सुरु असून येथील रहिवाशांना गाडया पार्कींगसाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत.
श्री. सुनिल राऊत [विक्रोळी] व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी / महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसता-२०२६ / प्र.क्र.१५६ / गृनिप / दि.१७.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३८९८ च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:0(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३८९८.

मुंबईतील कन्नमवार नगर व टागोर नगर येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास सुरु असून येथील रहिवाशांना गाडया पार्कींगसाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत.

श्री. सुनिल राऊत [विक्रोळी] व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी / महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसता-२०२६ / प्र.क्र.१५६ / गृनिप / दि.१७.०६.२०२६.

अ.क्र.	प्रश्न	अभिप्राय
१	मुंबईतील कन्नमवार नगर व टागोर नगर येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास सुरु असून येथील रहिवाशांना गाडया पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून पार्किंगचा प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?	होय अंशत: खरे आहे. विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार खाजगी विकासकांमार्फत वसाहतीमधील इमारतींचा पुनर्विकास होत आहे. पुनर्विकासावेळी विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील तरतूद क्र.४४ नुसार इमारतीतील सदनिकांच्या क्षेत्रफळ व संख्या यांच्या प्रमाणात वाहनतळ [पार्किंग] तयार करणे बंधनकारक आहे.
२	असल्यास सदर ठिकाणचा पार्किंगचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कन्नमवार नगर येथील कामगार कल्याण मंडळाच्या शेजारी असलेल्या म्हाडाच्या मालकीच्या न.भू.क्र.३५४ हा भुखंड पार्किंगसाठी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधीनी वारंवार म्हाडाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,	होय हे खरे आहे. मा. विधानसभा सदस्य श्री. सुनिल राऊत यांचे दि.०३/११/२०२२ रोजीचे पत्र व दि.२९/०१/२०२५ रोजीचे पत्र प्राप्त झाले होते.
३	असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने सदरहू रहिवाशांच्या पार्किंग संदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	प्रस्तुत प्रश्नी वाहनतळ निर्माण करणेबाबत सादर करण्यात येते की, मा. विधानसभा सदस्य श्री. सुनिल राऊत यांनी दि.०३/११/२०२२ व दि.२९/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कन्नमवार नगर, विक्रोळी येथील कामगार कल्याण मंडळाशेजारील जलतरण तलावासाठी आरक्षित भुखंडावर वाहनतळ निर्माण करण्याबाबत विनंती केलेली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांच्या दालनात बैठक आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीत मा. उपाध्यक्ष/ प्रा.

		यांनी सदर भुखंडांच्या आरक्षणाबाबत चाचपणी करण्याचे निर्देश दिलेले होते. मात्र कामगार कल्याण मंडळाशेजारील भुखंड - जलतरण तलाव व क्लब हाऊस [क्लब हाऊस /व्यायामशाळा / जलतरण तलाव] इ. असे आरक्षण असून सदर भूखंड विकसीत करण्यासाठी नियोजन करण्यात येत होते. त्यानुसार सदर भूखंडाचा ई-लिलाव विविक्षित प्रयोजनाकरिता करण्याची प्रक्रिया मंडळामार्फत सुरु आहे. त्यामुळे तेथे वाहनतळ तयार करणे शक्य नाही. तरी, सदर भुखंडावरील सुविधा वसाहतीतील रहिवाशांसाठीच उपलब्ध होणार आहे.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागू होत नाही.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:01:36

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३८९८.

मुंबईतील कन्नमवार नगर व टागोर नगर येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास सुरु असून येथील रहिवाशांना गाडया पार्कींगसाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत.

श्री. सुनिल राऊत [विक्रोळी] व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी / महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसता-२०२६ / प्र.क्र.१५६ / गृनिप / दि.१७.०६.२०२६.

सन १९७० ते १९८० दरम्यान म्हाडा मार्फत मुंबई उपनगरातील विक्रोळी येथे कन्नमवार नगर व टागोर नगर या वसाहती स्थापन करण्यात आलेल्या होत्या. सदर वसाहतींमध्ये म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबवून सदर गृहनिर्माण योजनांमध्ये प्राप्त सदनिकांची सोडत पध्दतीने वितरण करण्यात येत होते. तद्नंतर इमारतींमधील सदनिकाधारक मिळून इमारतीची गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येते. म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार म्हाडा प्राधिकरणामार्फत सदर इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांबरोबर जमिनीचा भाडेपट्टा करारनामा करण्यात येतो. सदर इमारती सुमारे ५० ते ६० वर्षांपुर्वी बांधण्यात आलेल्या असल्याने अत्यंत जीर्ण व मोडकळीस आलेल्या आहेत. विकास नियंत्रण नियमावली ३३(५) नुसार म्हाडा अभिन्यासास ३ इतका चटई क्षेत्र उपलब्ध झाल्याने व सदर इमारती ३० वर्षांहुन अधिक वयोमानाच्या झाल्याने बहुतांश गृहनिर्माण संस्था त्यांचे स्तरावर विकासक नेमणूक करुन वि.नि.नि. ३३(५) अन्वये सदर इमारतींचा पुनर्विकास करतात.

सदर पुनर्विकासावेळी विकास आराखडा २०३४ च्या विविध तरतुदींनुसार इमारत परवानगी कक्ष /म्हाडा प्राधिकरण यांचेकडून आवश्यक परवानगी घेऊन विकासकामार्फत वसाहतीतील इमारतींचा पुनर्विकास केला जातो. पुनर्विकासावेळी विकासकांमार्फत विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदींनुसार इमारतीतील सदनिकांच्या प्रमाणात वाहनतळे निर्माण केली जातात. विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील तरतुद क्र. ४४ नुसार खालीलप्रमाणे इमारतींमध्ये वाहनतळे निर्माण केली जातात.

अ.क्र.	वापर	आवश्यक वाहनतळे
१	निवासी	वि.नि.नि. ३३(५), ३३(६)] ३३(७), ३३(७)(अे), ३३(९) इत्यादींकरिता १ वाहनतळ प्रती अ) ४५.०० चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ०८ सदनिकांकरिता ब) ४५.०० चौ.मी. ते ६०.०० चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ०४ सदनिकांकरिता क) ६०.०० चौ.मी. ते ९०.०० चौ.मी. चटई क्षेत्रफळाच्या ०२ सदनिकांकरिता ड) ९०.०० चौ.मी. पेक्षा अधिक चटई क्षेत्रफळाच्या ०१ सदनिकेकरिता अभ्यागत वाहनतळांकरिता उक्त नमूद केलेल्या वाहनतळांच्या १०% वाहनतळे

		निर्माण करणे (किमान ०१ वाहनतळ)

मात्र वाढत्या वाहनसंख्येमुळे उक्त नमुद तरतुदीनुसार तयार करण्यात येणारी वाहनतळे पुरेशी नसल्याने वसाहतीतील रहिवाशांची पार्किंगकरिता गैरसोय होते. सदर समस्येबाबत तसेच कन्नमवार नगर व टागोर नगर, विक्रोळी येथील विविध समस्यांच्या अनुषंगाने मा. आमदार श्री. सुनिल राऊत यांनी दि.२०.०९.२०२३ व दि.२९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वसाहतीतील विविध मुद्दयांबाबत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना सदर मुद्दयांवर उपाययोजना करण्याबाबत व त्या संदर्भात बैठक आयोजित करण्याबाबत विनंती केलेली होती. त्यानुसार वेळोवेळी मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या दालनात बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी वाहनतळासाठी भुखंड तपासण्याबाबत निर्देश दिलेले होते. मात्र कन्नमवार नगर, विक्रोळी येथील कामगार कल्याण मंडळाशेजारी असलेला भूखंड जलतरण तलाव व क्लब हाऊस (क्लब हाऊस / व्यायामशाळा / जलतरण तलाव) या प्रयोजनासाठी राखीव असून सदर भूखंड विकसीत करण्यासाठी नियोजन करण्यात येत होते. त्यानुसार सदर भूखंडाचा ई-लिलाव विविक्षित प्रयोजनाकरिता करण्याची प्रक्रिया मंडळामार्फत सुरु आहे. त्यामुळे तेथे वाहनतळ तयार करणे शक्य नाही. तरी, सदर भुखंडावरील सुविधा वसाहतीतील रहिवाशांसाठीच उपलब्ध होणार आहे.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:02:18

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई -४०००३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३२३७७
- मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील मोतीलाल नगर पुनर्विकास आराखड्याबाबत
श्री. हारून खान, व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी/ महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसता-२०२६/प्र.क्र १५८/गृनिप दि.१७/०६/ २०२६.

महोदय,

श्री. हारून खान, व इतर मा. वि.स.स. यांनी विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३२३७७ अन्वये मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील मोतीलाल नगर पुनर्विकास आराखड्याबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत.

त्या अनुषंगाने सदर तारांकित प्रश्नांची उत्तरे व पूरक टिप्पणी शासनास सादर करण्यात येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 11-09-2026
11:11:51
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३२३७७

- मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील मोतीलाल नगर पुनर्विकास आराखड्याबाबत

श्री. हारून खान, व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी/ महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसता-२०२६/प्र.क्र १५८/गृनिप दि. १७/०६/ २०२६.

पूरक टिप्पणी:

मोतीलाल नगर १,२ व ३ गोरेगाव पश्चिम येथील म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाला मा. मंत्रीमंडळाची मंजुरी प्राप्त झाली आहे. त्यानुसार शासनामार्फत दि ०६.१०.२०२१ रोजी संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये रहिवाश्यांचे अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रफळ (BUA) हे निवासी वापराकरिता प्रति गाळा १६०० चौ फुट याप्रमाणे व अनिवासी वापराकरिता प्रति गाळा ९८७ चौ फुट याप्रमाणे विशेष बाब म्हणून शासनामार्फत मंजूर करण्यात आले आहे.

सदर प्रमाणे रहिवाश्यांना प्रदान करावयाचे बांधकाम क्षेत्रफळ हे निविदेत नमूद करण्यात आले होते. त्यानुसार रहिवाश्यांना सदर क्षेत्रफळाच्या सदनिका विनामूल्य प्रदान करून उर्वरित बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास सर्वाधिक बांधकाम क्षेत्रफळ प्रस्तावित करणाऱ्या विकासकाची नेमणूक करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार सदर निविदा प्रक्रीयेअंती उच्चतम निविदाकार मे. अदानी प्रॉपर्टीस प्रा. लि. यांची निविदा स्वीकृत करण्यात आली असून शासन मान्यतेनुसार सदर विकासकास स्वीकृती पत्र प्रदान करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पाकरिता म्हाडा, नियुक्त विकासक, नियुक्त विकासक यांचेमार्फत स्थापन केलेली SPV यांच्यामध्ये Construction cum Development Agreement अंमलात आले आहे. सदर प्रकल्पांतर्गत उच्चतम निविदाकार मे. अदानी प्रॉपर्टीस प्रा. लि. यांचे मार्फत म्हाडास विनामूल्य ३,९७,१०० चौ मी बांधकाम क्षेत्रफळ प्राप्त होणार आहे.

सदर प्रकल्पातील रहिवाश्यांनी शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या १६०० चौ फुट BUA याप्रमाणे पुनर्विकसित क्षेत्रफळाविरोधात मागील एका वर्षात विविध आंदोलने, मोर्चे केलेले आहेत. त्यामुळे C&DA मार्फत प्रत्यक्ष प्रकल्पस्थळी प्रकल्पाचे प्राथमिक कामकाज सुरु केले असता त्यास देखील विरोध दर्शविला आहे. तसेच सदर क्षेत्रफळ वाढवून मिळावे अशी मागणी केली आहे. त्याबद्दल म्हाडास्तरावर विविध निवेदने सादर केलेली

आहेत. परंतु, सदर १६०० चौ फुट BUA याप्रमाणे पुनर्विकसित क्षेत्रफळ हे शासन स्तरावरून मान्य झालेले असल्यामुळे याविषयी म्हाडास्तरावर निर्णय घेणे शक्य झाले नव्हते.

दरम्यान सदर विषयी मोतीलाल नगर जनकल्याणकारी समिती, मोतीलाल नगर रहिवाशी विकास संघ, मोतीलाल नगर पुनर्विकास समन्वय समिती यांचे मा. मुख्यमंत्री महोदय यांना उद्देशून लिहिलेले दि. १०.०४.२०२६ रोजीचे पत्र म्हाडास प्राप्त झाले. सदर पत्रामध्ये सदर समित्यांमार्फत असे नमूद करण्यात आले की, त्यांचा मोतीलाल नगर समूह पुनर्विकासाला विरोध नसून तो खाजगी विकासकामार्फत करायला देखील विरोध नाही, परंतु, शासन निर्णयाद्वारे त्यांना देऊ केलेले १६०० चौ फुट BUA क्षेत्रफळ हे त्यांना मंजूर नसून आजच्या परिस्थितीत कुटुंबाची रचना, वाढती पिढी आणि पुढील पिढ्यांच्या गरजा इ. बाबी लक्षात घेऊन प्रस्तावित BUA क्षेत्रफळ हे Carpet Area च्या स्वरूपात मिळावे अशी प्रमुख मागणी केली होती.

सदर पत्रावर मा. मुख्यमंत्री महोदय यांनी म्हाडास उपरोक्त प्रमाणे **Carpet Area** देण्याबाबत कार्यवाही करावी असे नमूद केले होते. त्यानुसार आवश्यक प्रस्ताव म्हाडामार्फत दि १६.०४.२०२६ रोजी शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

सदर विषयी रहिवाश्यांच्या मागणीनुसार मोतीलाल नगर येथील रहिवाश्यांना पुनर्विकासाबद्दल विश्वासात घेण्याच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाकरीता तयार करण्यात आलेला मास्टर प्लान, विविध प्रस्तावित सोयीसुविधा, लेआऊट प्लान, यूनिट प्लान, Connectivity, Infrastructure, प्रकल्पाचे स्वरूप व उपरोक्त नमूद केल्यानुसार १६०० चौ फुट रेरा कार्पेट एरिया मंजुरीबद्दल शासनास सादर केलेला प्रस्ताव याविषयी रहिवाश्यांना विस्तृत माहिती मिळावी याकरीता दि. १७.०४.२०२६ रोजी गणेश मैदान, मोतीलाल नगर, गोरेगाव येथे म्हाडामार्फत सादरीकरण करण्यात आले.

सदर सदारीकरणादरम्यान काही रहिवाश्यांनी २४०० चौ फुट कार्पेट एरियाची मागणी करत सादरीकरणात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. तरी देखील मा. उपाध्यक्ष यांनी सादरीकरण पूर्ण करून प्रकल्पाबाबत विस्तृत अशी माहीती रहिवाश्यांना दिलेली आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 11-09-2026
11:14:33

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३२३७७

- मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील मोतीलाल नगर पुनर्विकास आराखड्याबाबत

श्री. हारून खान, व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी/ महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसता-२०२६/प्र.क्र १५८/गृनिप दि.१७/०६/ २०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबईतील गोरेगाव पश्चिमेकडील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पांतर्गत ३ हजार ७०२ कुटुंबाला १६०० चौ फूट बिल्टअप क्षेत्राचे घर देण्याचा राज्य शासनाचा निर्णय म्हाडा उपाध्यक्षांनी दि १७ एप्रिल, २०२६ रोजी मोतीलाल नगर येथील गणेश मैदानात झालेल्या जनसभेत आराखड्याचे सादरीकरण करतांना जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,	मोतीलाल नगर जनकल्याणकारी समिती, मोतीलाल नगर रहिवाशी विकास संघ, मोतीलाल नगर पुनर्विकास समन्वय समिती यांनी दि १०.०४.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री महोदयांना मोतीलाल नगर प्रकल्पाकरीता दि ०६.१०.२०२१ रोजीच्या शासन निर्णयात नमूद प्रमाणे १६०० चौ फूट हे बिल्टअप क्षेत्राच्या सवरूपात न देता रेरा कारपेट एरिया च्या स्वरूपात देण्यात यावे अशी विनंती केली होती. सदर विनंतीस अनुसरून मा. मुख्यमंत्री महोदयांनी म्हाडास सदर प्रमाणे कार्पेट एरिया देण्याबद्दल आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत असे मा. उपाध्यक्ष / प्रा. यांनी दि १७ एप्रिल, २०२६ रोजी मोतीलाल नगर येथील गणेश मैदानात झालेल्या जनसभेत आराखड्याचे सादरीकरण करतांना जाहीर केले होते.
२.	असल्यास,सदरहू रहिवाशी कुटुंबांनी ४५ चौ मीटर अतिरिक्त क्षेत्र विकत घेतल्याच्या रहिवाश्यांकडे असलेल्या पुरावयानुसार व नियमांनुसार २४०० चौरस फूट क्षेत्रफळाचे घर मिळावे आही न्याय्य मागणी रहिवाश्यांनी केली असता उपाध्यक्षांनी रहिवाश्यांना धमकावल्या प्रकरणी सदरहू पुनर्विकास प्रकल्पावरून म्हाडा उपाध्यक्षांविरूद्ध निदर्शने करून त्याची हकालपट्टी करण्याची मागणी दि २० एप्रिल २०२६ रोजी व त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,	सदर पत्र या कार्यालयाच्या अभिलेखात आढळून येत नाही.
३.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने मोतीलाल नगरमधील रहिवाशी कुटुंबांना त्यांनी मागणी केलेले २४०० चौरस फूट क्षेत्रफळ देणेबाबत तसेच रहिवाश्यांना धमकावणाऱ्या म्हाडा उपाध्यक्षांना प्रकल्पावरून काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,	लागू नाही.
४	नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.	लागू नाही.

मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ. / प्रा यांच्या मान्यतेने.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 11-09-2026
11:12:46

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई -४०००३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३७६१५
- काळाचौकी, मुंबई येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत.
श्री. अनंत (बाळा) नर, मा.वि.स.स.

महोदय,

श्री. अनंत (बाळा) नर, मा.वि.स.स. यांनी विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३७६१५ अन्वये काळाचौकी, मुंबई येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत.

त्या अनुषंगाने सदर तारांकित प्रश्नांची उत्तरे व पूरक टिप्पणी शासनास सादर करण्यात येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासु,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
13:49:05
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३७६१५

- काळाचौकी, मुंबई येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत.

श्री. अनंत (बाळा) नर, मा.वि.स.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	काळाचौकी मुंबई येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे कंत्राट तीन कंपन्यांना दि. ०८ मे, २०२६ वा त्या सुमारास दिली आहेत, हे खरे आहे काय?	सदर विषयी नमूद करण्यात येते की, ३ निविदाकारांमार्फत सदर प्रकल्पाची निविदा सादर करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व शासन मान्यतेउपरांत मे. Consortium of *मे. एम जी एन अग्रो प्रोपर्टीज प्रा लि, मे. एन एन पी बिल्डकोन प्रा लि, मे. ओनेस्ट शेलटर्स प्रा लि.* यांना दि.०७.०५.२०२६ रोजी स्वीकृती पत्र प्रदान करण्यात आले आहे.
२.	असल्यास, सदर कंत्राटदारमध्ये कोणकोणत्या अटी व शर्ती ठरविण्यात आल्या आहेत?	नियुक्त निविदाकाराने प्रकल्पाकरिता SPV (Special Purpose Vehicle) स्थापन करून म्हाडासोबत सी&डीए करारनामा अंमत आणणे आवश्यक आहे. विकासकास रहिवाश्यांना त्यांच्या २०८ चौफुट चटई क्षेत्रफळाच्या मोबदल्यात प्रत्येकी ६४१ चौफुट पुनर्विकसित सदनिका, घरभाडे, कोर्पस फंड, प्रकल्प बांधकाम, प्रकल्प मंजुर्‍या, या सर्व बाबी स्वखर्चाने राबवायच्या आहेत.
३.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने सदर वसाहतीच्या पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?	लागू नाही.
४.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.	लागू नाही.

मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ. / प्रा यांच्या मान्यतेने.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
13:49:48

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक- ३७६१५

- काळाचौकी, मुंबई येथील अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत.

श्री. अनंत (बाळा) नर, मा.वि.स.स.

पूरक टिप्पणी:

मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये परवडणारी घरे निर्माण करण्याकरीता शासनाने म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट सन १९५० ते १९६० च्या दरम्यान ५६ वसाहतींची निर्मिती करण्यात आली होती. त्यापैकी अभ्युदयनगर, काळाचौकी येथील सर्व्हे क्र. ६/१४८ येथील म्हाडा वसाहतीत सुमारे १,३३,५९३ चौ.मी.(३३ एकर) जागेवर तळ +४/३ मजल्यांच्या एकूण ४८ इमारतींमध्ये सुमारे ३४१० गाळे आहेत.

सदर वसाहतीतील पायाभूत सुविधांचा विकास व क्षेत्राचे समुचित नियोजन करणे शक्य व्हावे तसेच म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करताना जागतिक दर्जाच्या इमारती व सोयीसुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने संपूर्ण अभिन्यासाचा एकत्रित पुनर्विकास होण्याची गरज लक्षात घेता वसाहतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याच्या दृष्टीने विनियम ३३(५) अंतर्गत तसेच सी ॲन्ड डी ए (Construction & Development Agency) ची नेमणूक करून राबविण्याच्या अनुषंगाने म्हाडामार्फत शासनास दि. १०/०१/२०२३ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला तसेच सुधारित प्रस्ताव दि. ३१/०५/२०२३ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास दि २७.०२.२०२४ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली व दि. ०६/०३/२०२४ रोजी गृहनिर्माण विभागामार्फत शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

पुनर्विकासाची सद्यस्थिती :

सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने सी&डीए च्या नेमणुकीकरिता म्हाडामार्फत राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेअंती सदर प्रकल्पाच्या शासन निर्णयात नमूद प्रमाणे Construction & Development Agency (C&DA) ची निविदा अंतिम करण्याचे अधिकार मा. अपर

मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीस आहेत. त्यानुसार निविदाकार Consortium of मे. एम जी एन अग्रो प्रोपर्टीज प्रा. लि., मे. एन एन पी बिल्डकोन प्रा. लि., मे. ओनेस्ट शेलटर्स प्रा. लि. यांची एकूण "अस्तित्वात असलेल्या 210 चौ फुट चटई क्षेत्रफळाच्या सदनिकांच्या मोबदल्यात प्रत्येकी पुनर्विकसित सदनिकेकरिता 641 चौ फुट प्रस्तावित चटई क्षेत्रफळ" प्रमाणे निविदा स्वीकृती करण्यास उच्चाधिकार समितीची दि. १९.११.२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली.

त्या अनुषंगाने उपरोक्त नमूद निविदाकाराच्या निविदा स्वीकृतीस शासन मान्यता प्राप्त करणेकरिता प्रस्ताव दि.२८.११.२०२५ रोजी शासनास सादर करण्यात आला होता व सदर निविदा स्वीकृती प्रस्तावास शासनाची दि.३०.०४.२०२६ रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त नमूद निविदाकारास दि.०७.०५.२०२६ रोजी स्वीकृती पत्र प्रदान करण्यात आले आहे.

निविदेतील महत्त्वाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:

१. अस्तित्वात असलेल्या 210 चौ फुट चटई क्षेत्रफळाच्या सदनिकांच्या मोबदल्यात प्रत्येकी पुनर्विकसित सदनिकेकरिता 641 चौ फुट चटई क्षेत्रफळाच्या सदनिका प्रदान करणे.

२. नियुक्त Construction & Development Agency (C&DA) मार्फत प्रत्येकी रहिवासी सदनिकेकरिता मासिक घरभाडे रु. २५००० (प्रती वर्ष १०% वाढीसह) प्रमाणे घरभाडे अदा करणे आवश्यक असेल. तसेच रहिवासी व अनिवासी घटकाकरिता रु.५०००० **Shifting Charges** अदा करणे आवश्यक असेल.

३. नियुक्त Construction & Development Agency (C&DA) यांचेमार्फत प्रत्येकी रहिवासी व अनिवासी सदनिकेमागे रु. ५ लक्ष इतका कोर्पस फंड अदा करणे आवश्यक असेल.

४. सदर प्रकल्पाचा Master Plan तयार करून त्यास म्हाडामार्फत मंजूरी प्राप्त करून घेण्याची जबाबदारी ही नियुक्त Construction & Development Agency (C&DA) यांची असेल.

५. सदर प्रकल्पातील पुनर्वसन घटकाचे, म्हाडा हिसस्याच्या घटक व विक्री घटकाचे बांधकाम स्वखर्चाने करण्याची जबाबदारी नियुक्त Construction & Development Agency (C&DA) यांची असेल.

६. सदर प्रकल्पास आवश्यक असलेल्या विविध मान्यता ह्या MOEF, CFO, AAI, MHADA, MCGM, इत्यादि संस्थांकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी ही नियुक्त Construction & Development Agency (C&DA) यांची असेल.

७. नियुक्त Construction & Development Agency (C&DA) मार्फत वि. नि. व प्रो. नि. मधील विनियम ३३(५) नुसार म्हाडास म्हाडा हिस्स्याचा गृहसाठा ४९,५४७ चौ मी हस्तांतरित करणे आवश्यक राहील.

८. नियुक्त Construction & Development Agency (C&DA) ला कुठल्याही प्रकारे जमीन गहाण (Mortgage) ठेवता येणार नाही.

नियुक्त विकासकास प्रदान करण्यात आलेल्या स्वीकृतीपत्रानुसार विकासकामार्फत सद्यस्थितीत रहिवाश्यांचे संमतीपत्रे प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
13:50:20
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता गोरेगाव विभाग यांचे कार्यालय, कक्ष क्र. ३३८, २ रा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५२७७ इ मेल:- goregaonee@gmail.com

जा.क्र.का.अ./गो.वि./उपवि-१/मुं.मं./ /२०२६
दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.

विषय : **विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३२९७१**
"गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील बांधकामाचा दर्जा, भाडेवाढ व इतर प्रलंबित मागण्यांबाबत."
श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रह्मपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबा देवी), श्री. विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री. रामदास मसराम (आरमोरी), श्री. संजय मेश्राम (उमरेड), श्री. विकास ठाकरे (नागपूर पश्चिम).

संदर्भ : सचिव-१, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई/नागपूर यांचे पत्र क्रमांक -___/ ब-१ दिनांक:२५-०६-२०२६.

महोदय,

संदर्भिय पत्रान्वये प्राप्त विधानसभा तारांकित प्रश्न क्र.**३२९७१** च्या अनुषंगाने गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील बांधकामाचा दर्जा, भाडेवाढ व इतर प्रलंबित मागण्यांबाबत विचारलेल्या प्रश्नांचीउत्तरेआपल्या अवलोकनार्थ सोबत सादर करण्यात येतआहे.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

सोबत : वरील प्रमाणे

आपला विश्वास,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:33:32
(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

विषय : <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३२९७१</u>

"गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील बांधकामाचा दर्जा, भाडेवाढ व इतर प्रलंबित मागण्यांबाबत."

श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रह्मपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबा देवी), श्री. विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री. रामदास मसराम (आरमोरी), श्री. संजय मेश्राम (उमरेड), श्री. विकास ठाकरे (नागपूर पश्चिम).

संदर्भ : सचिव-१, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई/नागपूर यांचे पत्र क्रमांक -___/ ब-१ दिनांक:२५-०६-२०२६.

अ.क्र.	प्रश्ने	उत्तरे
1	गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसित सदनिकांच्या बांधकामाच्या दर्जाबाबत रहिवाशांकडून तक्रारी प्राप्त झाल्या असून अनेक सदनिका राहण्यायोग्य स्थितीत नसल्याचे माहेमे, २०२६मध्ये निदर्शनास आले आहे, हेखरेआहे काय?	हे खरे नाही. खाजगी विकासकाने अर्धवट सोडलेल्या गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत शासन निर्णय दिनांक ०९.०७.२०२१ अन्वये प्राप्त दिशा निर्देशानुसार म्हाडाने स्वतः विकासक म्हणून या संपूर्ण प्रकल्पाचे काम करण्याबाबत तसेच मूळ ६७२ गाळेधारकांच्या पुनर्वसन इमारतींचे बांधकाम हाती घेतले आहे. हे करीत असताना पुनर्वसन इमारतींचे रखडलेल्या बांधकामास गती देऊन इमारतींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या प्रकल्पातील इमारतींना दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी सदनिकांच्या वितरणासाठी यशस्वीरित्या सोडत काढण्यात आली. इमारतींच्या बांधकामाच्या दर्जाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर म्हाडाने 'वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था' या नामांकित संस्थेची तांत्रिक तपासणीसाठी नेमणूक केली होती. 'वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था' ने पुनर्वसन प्रकल्पातील सर्व ८ इमारतींचा (१६ विंग) 'अंतिम अहवाल'
2	असल्यास, सदर सदनिकांची व इमारतींची तातडीने दुरुस्ती करून रहिवाशांना सुरक्षित व राहण्यायोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत म्हाडा प्रशासन विचाराधीन आहेकाय?	

		म्हाडाला सादर केला आहे. या अहवालानुसार, या सर्व इमारतींमधील काँक्रीटची गुणवत्ता योग्य असून, सर्व इमारती रचनात्मकदृष्ट्या सुस्थितीत, मजबूत आणि राहण्यासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. या तपासणी अहवालानुसार दुरुस्तीची कामे करण्याबाबत सुचविले आहे. रहिवाशांना सदनिकांचा ताबा देण्याबाबत, मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ६५१/२०२५ मधील दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ च्या आदेशानुसार म्हाडाने दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी एक अधिकृत प्रसिद्धीपत्रक काढले आहे. त्यानुसार, ज्या पात्र सभासदांना सदनिकांचे वितरण पत्र मिळाले आहे आणि जे रहिवासी ताबा घेण्यास इच्छुक आहेत, त्यांना आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही म्हाडा कार्यालयामार्फत सुरू करण्यात आली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १७.०४.२०२६ रोजीच्या आदेशानुसार संस्थेच्या सभासदांना दिनांक ३०.०४.२०२६ पर्यंत ताबा घेण्यासाठी निर्देशित केले होते. या अनुषंगाने वितरणपत्रे जारी करण्यात येऊन ताबा देण्याची प्रक्रिया सुरु असून आजतागायत ६३१ सभासदांना सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे. तसेच दिनांक १७.०४.२०२६ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये प्लास्टरिंगच्या समस्येबाबत दुरुस्ती करून देण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत. रहिवाशांकडून प्राप्त तक्रारींच्या तसेच मा.उच्च न्यायालयाच्या दि. १०/०९/२०२५ रोजीच्या आदेशान्वये दि.३०/०९/२०२५ ते १७/१०/२०२५ रोजीपर्यंत सदनिकांची तपासणी सदनिकाधारक, संस्थेचे प्रतिनिधी, कंत्राटदार व म्हाडा अधिकारी यांचे सोबत करण्यात आली. तपासणीच्या अनुषंगाने इमारतींमधील किरकोळ स्थापत्य तसेच विद्युत कामे करण्यात आली आहेत.तसेच वीर माता

		जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेने (VJTI) केलेल्या संरचनात्मक परीक्षण अहवालात सुचविलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने इमारतीच्या बाह्य भागातील प्लास्टरची तपासणी करून दुरुस्ती करून घेण्यात येत आहे.
3	असल्यास, पुनर्विकास प्रकल्पातील संस्थेच्या सभासदांना देण्यात येणाऱ्या मासिक भाडेरकमेतील वाढीची मागणी रहिवाशांकडून करण्यात आली असून वाढत्या महागाईचा विचार करता सध्याच्या रु.२५,०००/- भाडेरक्कमेवर १० टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यातआलाआहे, हे हि खरेआहे काय?	हो, हे खरे आहे. गोरेगाव सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पाबाबत मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २९.०४.२०२६ रोजी पार पडलेल्या आढावा बैठक इतिवृत्तातील निर्देशानुसार मूळभाड्यात १०% वाढकरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्देशानुसार दर तीन वर्षांच्या स्लॅबनुसार १०% वाढीच्या प्रस्तावास मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने मार्च २०२६ पर्यंत प्रति सदस्य एकूण रु. २,२५,०००/- थकबाकी निश्चित करून म्हाडास्तरावर मंजुरी देण्यात आली आहे. सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला आहे.
4	असल्यास, सदरभाडेवाढीसमान्यतादेण्याबाबतशासनाने कोणतानिर्णयघेतलाआहे?	
5	असल्यास, पुनर्विकास प्रकल्पाच्या ठिकाणी रहिवाशांनी मंदिर उभारण्याची मागणी करण्यात आली आहे, हे हि खरेआहे काय?	हो ,हे खरेआहे. सदर मागणी मान्य करण्यात आली असून नियोजन व अंदाजपत्रक तयार झाल्या नंतर प्रशासकीय मान्यता घेऊन म्हाडातर्फे प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होईल.
6	असल्यास, संस्थेचे सभासद व म्हाडा प्रशासनयांच्या मध्ये समन्वयाच्या अभावाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यासाठी नोडल अधिकारी व रहिवासी संस्थेच्या प्रतिनिधींची समन्वयक म्हणून नियुक्तीची मागणीही करण्यात आली आहे, हे ही खरेआहे काय?	हो,हेखरेआहे. म्हाडाने दि. ०२.०६.२०२६ रोजी आदेश काढून म्हाडाचे १ नोडल अधिकारी, (उप अभियंता, गोरेगाव विभाग) आणि संस्थेचे २ प्रतिनिधी (श्री. समीर माळगावकर व श्री. परेश चव्हाण) यांची ३ सदस्यीय' समन्वय समिती' स्थापन केली आहे. समिती मार्फत रहिवाशांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यात येत आहे.
7	असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने म्हाडाचा एक नोडल अधिकारी व	

	गृहनिर्माण संस्थेचे दोन प्रतिनिधीयांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे?	
8	तसेच, पुनर्विकास प्रकल्पांतर्गत भाडेपट्टा करणे व संस्थेचे अभिहस्तांतरण (Conveyance Deed) याबाबत मा. उच्चन्यायालयात प्रलंबित असलेल्या मुद्द्यांसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत?	सुधारित विकास करार व भाडेपट्टा नोंदणीची प्रशासकीय तयारी म्हाडाने पूर्ण केली असून करार मसुदा संस्थेस दिला आहे.संस्थेने त्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये या कराराच्या मसुद्याला मंजुरी घेऊन तसा ठराव म्हाडाकडे सादर करताच भाडेपट्टा करणे व संस्थेचे अभिहस्तांतरण याबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:34:42
(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

विषय : <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३२९७१</u>
"गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील बांधकामाचा दर्जा, भाडेवाढ व इतर प्रलंबित मागण्यांबाबत."
श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रह्मपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबा देवी), श्री. विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री. रामदास मसराम (आरमोरी), श्री. संजय मेश्राम (उमरेड), श्री. विकास ठाकरे (नागपूर पश्चिम).

संदर्भ : सचिव-१, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई/नागपूर यांचे पत्र क्रमांक -___/ ब-१ दिनांक:२५-०६-२०२६.

<u>पूरक टिप्पणी :</u>

खाजगी विकासकाने अर्धवट सोडलेल्या गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत शासन निर्णय दिनांक ०९.०७.२०२१ अन्वये प्राप्त दिशा निर्देशानुसार म्हाडाने स्वतः विकासक म्हणून या संपूर्ण प्रकल्पाचे काम करण्याबाबत तसेच मूळ ६७२ गाळेधारकांच्या पुनर्वसन इमारतींचे बांधकाम हाती घेतले आहे. हे करीत असताना पुनर्वसन इमारतींचे रखडलेल्या बांधकामास गती देऊन इमारतींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या प्रकल्पातील इमारतींना दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी सदनिकांच्या वितरणासाठी यशस्वीरित्या सोडत काढण्यात आली.

इमारतींच्या बांधकामाच्या दर्जाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर म्हाडाने 'वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था' या नामांकित संस्थेची तांत्रिक तपासणीसाठी नेमणूक केली होती. 'वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था' ने पुनर्वसन प्रकल्पातील सर्व ८ इमारतींचा (१६ विंग) 'अंतिम अहवाल' म्हाडाला सादर केला आहे. या अहवालानुसार, या सर्व इमारतींमधील काँक्रीटची गुणवत्ता योग्य असून, सर्व इमारती रचनात्मकदृष्ट्या सुस्थितीत, मजबूत आणि राहण्यासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. या तपासणी अहवालानुसार दुरुस्तीची कामे करण्याबाबत सुचविले आहे.

रहिवाशांना सदनिकांचा ताबा देण्याबाबत, मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ६५१/२०२५ मधील दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ च्या आदेशानुसार म्हाडाने दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी एक अधिकृत प्रसिद्धीपत्रक काढले आहे. त्यानुसार, ज्या पात्र सभासदांना सदनिकांचे वितरण पत्र मिळाले आहे आणि जे रहिवासी ताबा घेण्यास इच्छुक आहेत, त्यांना आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही म्हाडा कार्यालयामार्फत सुरू करण्यात आली आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक १७.०४.२०२६ रोजीच्या आदेशानुसार संस्थेच्या सभासदांना दिनांक ३०.०४.२०२६ पर्यंत ताबा घेण्यासाठी निर्देशित केले होते. या अनुषंगाने वितरणपत्रे जारी करण्यात येऊन ताबा देण्याची प्रक्रिया सुरु असून आजतागायत ६३१ सभासदांना सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे. तसेच दिनांक १७.०४.२०२६

रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये प्लास्टरिंगच्या समस्येबाबत दुरुस्ती करून देण्याबाबत निर्देश प्राप्त आहेत.

गोरेगाव येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पाबाबत मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार, म्हाडाने वीर माता जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेच्या (VJTI) ऑडिट अहवालावर आधारित इमारतींची दुरुस्तीकामे वेगाने सुरू केली आहेत. मुंबईतील पावसाळ्यातील परिस्थितीमुळे बाह्य प्लास्टरचे काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराने सप्टेंबर २०२६ पर्यंतचे सुधारित वेळापत्रक दिले आहे, तथापि पावसाळ्यात रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी कंत्राटदाराला १००% सुरक्षेच्या जाळ्या व बॅरिकेडिंग तातडीने पूर्णकरण्याचे कडक निर्देश देण्यात आले असून, रहिवाशांच्या तक्रारींनुसार इमारतींमधील किरकोळ स्थापत्य व विद्युत कामे पूर्ण करून सदनिका राहण्यायोग्य व सुरक्षित करण्यात आल्याआहेत.

बैठक इतिवृत्तातील निर्देशानुसार, मूळ मासिक भाड्यात १०% वाढ करण्याच्या म्हाडाच्या धोरणास माननीय उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली आहे, ज्यानुसार दर तीनवर्षांच्या स्लॅबनुसार १०% वाढीचे सूत्र निश्चित करून मार्च २०२६ पर्यंत प्रतिसदस्य एकूण रु. २,२५,०००/- थकबाकी मंजूर करण्यात आली आहे. परंतु, गृहनिर्माण संस्थेने प्रतिवर्ष १०% चक्रवाढ भाडेवाढ' मिळण्याची नवीन मागणी लावून धरली आहे.

रहिवाशांच्या इतर सामाजिक व कायदेशीर मागण्यांच्या अनुषंगाने, संस्थेने सादर केलेल्या अंबा माता मंदिराच्या डिझाईनचे म्हाडाचे वास्तुशास्त्रज्ञ मे. स्पेसमोल्डर्स यांच्याकडून तांत्रिक परीक्षण पूर्ण झाले असून पुढील १० दिवसांत अंतिम अंदाजपत्रक प्राप्त होताच प्रशासकीय मान्यता घेऊन म्हाडातर्फे प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल. तसेच, म्हाडा आणि सभासदांमधील समन्वय वाढवण्यासाठी म्हाडातर्फे दिनांक २ जून २०२६ रोजी आदेश काढून १ म्हाडा नोडल अधिकारी आणि संस्थेचे २ प्रतिनिधी यांची ३-सदस्यीय 'समन्वय समिती' स्थापन करण्यात आलीअसून, दैनंदिन तक्रारींच्या निवारणासाठी एक स्वतंत्र व्हॉट्सॲप ग्रुप ही कार्यान्वित करण्यात आला आहे. सुधारित विकास करार व भाडेपट्टा नोंदणीची प्रशासकीय तयारी म्हाडाने पूर्ण केली असून करारमसुदा संस्थेस दिला आहे. संस्थेने त्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये या कराराच्या मसुद्याला मंजुरी घेऊन तसा ठराव म्हाडाकडे सादर करताच भाडेपट्टा करणे व संस्थेचे अभिहस्तांतरण याबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:34:08

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई -400032

विषय : **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.** 35542

मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील बिंबीसार नगर प्रकरणात म्हाडा व संबंधित अधिका-यांकडून झालेल्या अनधिकृत कारवायाबाबत.

श्री तुकाराम काते, मा.वि.स.स.

संदर्भ: कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. विसता-2026/ प्र.क्र.170/गृनिप दि. 25/06/2006.

महोदय,

श्री तुकाराम काते, मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेला, विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 35542, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई / नागपूर यांचेकडून उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अनुषंगाने, विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 35542 चे प्रश्ननिहाय उत्तर, पुरक टिपण्णीसोबत सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमणे.

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:30:07
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांचे मान्यतेने)

प्रश्न उत्तरे :

विषय : विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 35542

मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील बिंबीसार नगर
प्रकरणात म्हाडा व संबंधित अधिका-यांकडून झालेल्या अनधिकृत कारवायाबाबत.

श्री तुकाराम काते, मा.वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. विसता-2026/प्र.क्र.170/ गृनिप दि. 25/06/2006.

अ. क्र.	प्रश्न	उत्तर
1.	म्हाडा अधिनियम, 1976 तसेच त्या अंतर्गत असलेल्या नियम व शासन निर्देशनाचे उल्लंघन करून, बिंबीसार नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील सार्वजनीक हेतूसाठी राखीव असलेल्या जमीनीवरील दुकाने कांही लाभार्थी /व्यवसायीकांच्या संगनमताने नियमित करण्याचे, भाडेपट्टा नुतनीकरणाचे, कन्व्हेयन्स डीड करण्याचे तसेच न्यायालयीन आदेश व खटल्यांमध्ये विरोधाभासी भूमिका घेण्याचे प्रकार संबंधित अधिकारी व कर्मचा-यांकडून झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,	हे खरे नाही. बिंबीसार नगर, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील दुकानी गाळ्यांचे वाटप, मुंबई मंडळातर्फे दि. 22/02/1983 रोजी टेंडर पध्दतीने प्रसिध्द करून निविदा प्रक्रीयेद्वारे करण्यात आलेले आहे. मुद्रांक कार्यालयाकडे योग्य त्या मुद्रांक शुल्काचा भरणा करून अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने विलंबशुल्कासहित म्हाडाची थकबाकी भरल्यानंतर, नियमितीकरण शुल्क वसूल करून उपरोक्त 8 पैकी 5 दुकानी गाळ्यांचे (गाळा क्र. 02 ते 06) नियमितीकरण करण्यात आलेले आहे. परंतू सदर गाळ्यांच्या नियमितीकरणा बाबत तक्रार प्राप्त झालेली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त गाळ्यांच्या नियमितीकरणासाठी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणाची शहानिशा करण्याची प्रक्रीया या कार्यालयामार्फत सुरू आहे. तसेच सदर दुकानी गाळ्यांचे भाडेपट्टा करारनामा व कन्व्हेयन्स डीड करण्यात आलेले आहे. भाडेपट्टा करारनामा संपुष्टात आलेला नसल्यामुळे भाडेपट्टा नुतनीकरणाचा प्रश्न उद्भवत नाही.

2.	असल्यास, सन 2006 मध्ये दिंडोशी येथील सिटी सिव्हील कोर्टात दाखल सूट क्र. 1129 मध्ये सुरवातीस म्हाडाच्या वतीने ठोस हरकती दाखल करण्यात आल्या असताना, त्यानंतर संबंधीत इस्टेट मॅनेजर,कायदेशीर अधिकारी व पॅनल ॲडव्होकेट यांनी परस्परविरोधी अहवाल व भुमिका सादर केल्यामुळे म्हाडाच्या हितास बाधा पोहोचली आहे, हे खरे आहे काय,	हे खरे नाही. सदर दिंडोशी येथील सिटी सिव्हील कोर्टात दाखल सूट क्र. 1129/2006 चा दावा मा. न्यायालयाने खारीज करून म्हाडाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा असे आदेश मा. न्यायालयाकडून पारित करण्यात आलेले आहेत.
3.	असल्यास, न्यायालयील सुनावणी न घेता,नोंदणीकृत कागदपत्रे व वैध टायटल नसताना, नोंदणीकृत नसलेल्या भागीदारी करारावर आधारीत तथाकथीत लिजडीड व कन्व्हेयन्स डीड करण्यात आले, तसेच भाडेपट्याची मुदत 2013 मध्ये संपलेली असतानाही शासनाची मंजूरी न घेता 30 वर्षाचा भाडेपट्टा लागू केल्याची बाब उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,	हे खरे नाही. मा. दिन्डोशी मुंबई दिवाणी व सत्र न्यायालयाने दि. 03/02/2011 रोजी पारित केलेल्या आदेशानुसार, सदर अर्जदारांनी मुद्रांक कार्यालयाकडे योग्य मुद्रांक शुल्काचा भरणा करून सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने विलंबशुल्का सहित म्हाडाची थकबाकी भरल्यानंतर, नियमितीकरण शुल्क वसूल करून नियमितीकरणाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. . नियमितीकरणा बाबत तक्रार प्राप्त झालेली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर नियमितीकरणासाठी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणाची शहानिशा करण्याची प्रक्रीया या कार्यालयामार्फत सुरू आहे.
4.	असल्यास, या सर्व प्रकरणाबाबत संबंधित इस्टेट मॅनेजर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी कार्यकारी अभियंता, बिल्डींग प्रपोजल सेल मधील अधिकारी, कायदे अधिकारी व पॅनल ॲडव्होकेट यांच्याविरूध्द व संबंधित अधिका-यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.	मुद्दा क्र. 3 नुसार लागू नाही.

5.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने बिंबीसार नगर, गोरेगाव (पूर्व) येथील जमीन व दुकाने यासंबंधी सर्व परवानग्या, कन्व्हेयन्स व भाडेपट्टे रद्द / पुनर्विचार करून म्हाडा व शासनाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	लागू नाही
6.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागू नाही

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:31:32

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

पूरक टिपण्णी :

विषय : विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 35542

मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील बिंबीसार नगर प्रकरणात म्हाडा व संबंधित अधिका-यांकडून झालेल्या अनधिकृत कारवायाबाबत.

श्री तुकाराम काते, मा.वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. विसता-2026/प्र.क्र.170/गृनिप दि. 25/06/2006.

टिपण्णी :

मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील बिंबीसार नगर येथे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मालकी असलेल्या जमिनीवरील 8 विविध व्यवसायाच्या दुकानी गाळ्यासांठी मुंबई मंडळाकडून दिनांक 22/02/1983 रोजी टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या. तद्नंतर त्यापैकी 07 निविदाधारकांना दुकानी गाळ्यांची विक्री किमंत वसुल केल्यानंतर, एकूण 08 दुकानी गाळ्यांपैकी गाळा क्र. 01 ते 07 या दुकानी गाळ्यांचे वितरण मिळकत व्यवस्थापक /सं.गा. / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेमार्फत करण्यात आलेले आहे व दुकानी गाळा क्र. 8 हा मंडळाच्या ताब्यात आहे.

सदर 07 गाळेधारकांकडून सूट क्र. 1129/2006 अन्वये सदर गाळा क्र. 01 ते 07 चा भाडेपट्टा करारनामा करणे, दुकानी गाळ्यांचे डिमार्केशन करणे, कंपाउंड वॉल करणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे तसेच पुनर्विकासाची परवानगी देणे तसेच दुकानी गाळा क्र. 02 ते 07 चे नियमितीकरण इ. बाबत मा. दिन्डोशी मुंबई दिवाणी व सत्र न्यायालयात दावा दाखल करण्यांत आला.

सदर दाव्यासंदर्भात मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मा. सहमुख्य अधिकारी /दु. व पु. मंडळ यांनी जा.क्र.उपमुअ/संगा/779/2011 दि. 20/04/2011 अन्वये उपरोक्त दुकानी गाळा क्र. 02 ते 07 या सहा गाळेधारकांना सदर गाळ्यांच्या नियमितीकरणांसाठी नियमितीकरण अर्ज, नोंदणीकृत दस्तावेज, विहित पुरावे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सदर दुकानी गाळा क्र. 02 ते 07 मुळ गाळेधारकांकडून खरेदी केलेल्या गाळेधारकांनी सादर केलेल्या नियमितीकरण अर्जांच्या अनुषंगाने सदर गाळेधारकांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच त्यांनी केलेल्या खरेदी व्यवहारावर मुद्रांक कार्यालयात मुद्रांक शुल्काचा भरणा केलेला असल्यामुळे तसेच त्यांनी म्हाडाच्या संपूर्ण थकीत रकमेचा

विलंब शुल्कासहित केलेला असल्याने भरणा केलेला असल्याने त्यांच्याकडून नियमितीकरण शुल्काचा भरणा करून घेऊन सदर दुकानी गाळ्यांचे नियमितीकरण एप्रील 2021 मध्ये या कार्यालयाकडून करण्यात आले.

तद्नंतर उपरोक्त दुकानी गाळ्यांची बिंबीसार नगर प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि. या नावाने दि. 24/05/2021 रोजी नोंदणीकृत संस्था स्थापन करण्यात आली असुन जुन 2022 रोजी भाडेपटटा करारणामा करण्यात आलेला आहे. तसेच संस्थेच्या दि. 02/08/2022 रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या पुनर्विकासाचा ठराव संमत करून विकासक म्हणून मे. भव्य पार्श्व रिएलिटी एल एल पी यांची विकासक म्हणून नेमणूक करण्यात आली व दि. 21/10/2022 रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थेकडून पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाला सादर करण्यात आला. सदर पुनर्विकासाबाबत सादर केलेल्या प्रस्तावास दि. 23/03/2023 रोजी मा. उपाध्यक्ष / प्रा. यांनी मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सध्यस्थितीत बिंबीसार नगर प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि. या संस्थेच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच उपरोक्त बिंबीसार नगर प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि. या संस्थेतील दुकानी गाळा क्र. 02 ते 06 या गाळ्यांच्या नियमितीकरणा बाबत तक्रार प्राप्त झालेली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. 9263833 दि. 25/06/2026 अन्वये संस्थेला गाळा क्र. 02 ते 06 या गाळ्यांच्या देकार पत्र, वितरण व ताबा पत्र, भाडेपावत्या, खरेदी-विक्री व्यवहार इ. बाबतची मुळ कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त बिंबीसार नगर प्रिमायसेस को-ऑप. सोसायटी लि. या संस्थेतील दुकानी गाळा क्र. 02 ते 06 या गाळ्यांच्या गाळेधारकांकडून नियमितीकरणांबाबतची मुळ कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर सदर नियमितीकरण प्रकरणांची शहानिशा करून त्याबाबचा अहवाल एक महिन्याच्या कालावधीत वरिष्ठांकडे सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:30:56

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

कक्ष क्र. ३४१, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व] मुंबई -५१.

म्हाडा MHADA

जा.क्र. का.अ./कु.वि./मुं.मं./ /2026.

दिनांक :

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरुचौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - 400032.

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक 33900
विक्रोळी (पूर्व) विधानसभा मतदार संघातील टागोरनगर येथे नवीन वीज उपकेंद्र उभारण्याबाबत.
श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ताप्र 2026/ प्र.क्र.____
गृनिप,दि.___/06/2026

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन विधानसभा तारांकित प्रश्न क्र. 33900 च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:04:24

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

विषय:-विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक 33900

विक्रोळी (पूर्व) विधानसभा मतदार संघातील टागोरनगर येथे नवीन वीज उपकेंद्र उभारण्याबाबत.

श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ताप्र 2026/ प्र.क्र.___ गृनिप, दि.__ _/06/2026

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	विक्रोळी (पूर्व) विधानसभा मतदार संघातील टागोरनगर येथे असलेली बैठी घरे व एक मजली घरांचा पुनर्विकास करण्यात येत असून त्याठिकाणी 22 मजली टॉवर उभारण्यात येत असल्याने या भागातील विजेची मागणी वाढली असल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय	होय, हे अंशतः खरे आहे. टागोरनगर, विक्रोळी (पूर्व) येथील म्हाडा वसाहतींमधील जुन्या बैठ्या व एक मजली घरांचा पुनर्विकास म्हाडाच्या नियमावलीनुसार व लागू नियमांनुसार गृहनिर्माण सोसायट्यांच्या वतीने विकासकांमार्फत केला जात आहे. नव्याने बांधण्यात येत असलेल्या उच्च मजली इमारतींमुळे या परिसराची घनता वाढून विजेची मागणी वाढली असणे, ही वस्तुस्थिती आहे.
2	असल्यास, टागोरनगर येथील इमारत क्र. 25,26,27 आणि 37,38,39 या भागात पूर्वी अस्तित्वात असलेले वीज वितरण जाळे जुने झाले असून त्यावर अतिरिक्त भार (Overload) होत असल्याने वारंवार या भागातील वीज पूरवठा खंडीत होत आहे, हे खरे आहे काय,	**सदर बाब म्हाडाच्या अखत्यारीत येत नाही.** सदर परिसरातील वीज वितरण जाळे आणि अतिरिक्त भार या बाबी संबंधित वीज वितरण कंपनीच्या (मे. अदानी इलेक्ट्रिसिटी) अखत्यारीत येतात.
3	असल्यास, या भागातील वीज वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण करणे आवश्यक असून या भागातील वाढती वीजेची मागणी लक्षात घेता नवीन वीज उपकेंद्र उभारण्यासाठी म्हाडाने या परिसरात संबंधित विभागाला जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक मा. लोकप्रतिनिधी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडे दि.27 एप्रिल, 2026 रोजी वा तद्पूर्वी अनेक वेळा लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,	**होय, हे खरे आहे.** टागोरनगर परिसरातील विजेची वाढती मागणी लक्षात घेता, नवीन वीज उपकेंद्र उभारण्यासाठी म्हाडाने योग्य जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीचे माननीय लोकप्रतिनिधींचे पत्र दि. 27 एप्रिल, 2026 रोजी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या कार्यालयाला प्राप्त झाले आहे.
4	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने या भागातील वाढती विजेची मागणी	माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने टागोरनगर भू-अभिन्यासाची (Layout) पडताळणी

	लक्षात घेता नवीन वीज उपकेंद्र उभारण्यासाठी म्हाडाने या परिसरात जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	करण्यात आली असता खालील वस्तुस्थिती निदर्शनास येते: 1) बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR 2034) नुसार सदर भू-अभिन्यासात 'EPU 5.2' (Electric Transmission & Distribution Facilities) अंतर्गत सुमारे 1920.04 चौ.मी. क्षेत्रफळाचा एक सुविधा भूखंड आरक्षित असून, तो सद्यस्थितीत मे. अदानी इलेक्ट्रिसिटी यांच्या ताब्यात आहे व त्यावर त्यांची तत्सम वीज यंत्रणा कार्यरत आहे. 2) सदर अधिकृत भू-अभिन्यासात सद्यस्थितीत अन्य कोणताही अतिरिक्त भूखंड वीज उपकेंद्रासाठी आरक्षित नसल्याने, तुर्तास स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे शक्य नाही. 3) तथापि, DCPR 2034 मधील नियम क्र. 28(A) मधील तरतुदींनुसार, पुनर्विकसित होणाऱ्या प्रत्येक इमारतीच्या भूखंड क्षेत्रफळानुसार स्वतंत्र सबस्टेशन देण्याची तरतूद आहे. या तरतुदीच्या अधीन राहून प्रस्तावित इमारतींमधील सदनिकांची विजेची वाढीव मागणी संबंधित वीज पुरवठा यंत्रणेमार्फत (अदानी इलेक्ट्रिसिटी) पूर्ण करणे उचित होईल.
5	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?.	प्रश्न उद्भवत नाही.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:05:04

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक 33900

बिक्रोळी (पूर्व) विधानसभा मतदार संघातील टागोरनगर येथे नवीन वीज उपकेंद्र उभारण्याबाबत.

श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. ताप्र 2026/ प्र.क्र.__ गृनिप,दि.___/ 06/ 2026

विक्रोळी (पूर्व) येथील टागोरनगर म्हाडा वसाहतीमधील जुन्या बैठ्या व एक मजली घरांचा पुनर्विकास गृहनिर्माण सोसायट्यांतर्फे विविध विकासकांमार्फत प्रगतीपथावर आहे. या भागात सद्यस्थितीत बहुमजली इमारत इमारती उभारण्यात येत असल्याने लोकसंख्येची घनता वाढली असून, पर्यायाने विजेच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर झालेल्या वाढीच्या अनुषंगाने स्थानिक माननीय लोकप्रतिनिधी यांनी म्हाडा प्रशासनाकडे दि. 27 एप्रिल 2026 रोजी लेखी निवेदन सादर करून नवीन वीज उपकेंद्र (Sub-station) उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने टागोरनगर भू-अभिन्यासाची तपासणी व अभिलेखांच्या आधारे सदर प्रकरणी वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे:

- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR 2034) नुसार टागोरनगर भू-अभिन्यासात 'EPU 5.2' (Electric Transmission & Distribution Facilities) या उपयोगासाठी सुमारे 1920.04 चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षित आहे.
- सदर 1920.04 चौ.मी. क्षेत्रफळाचा सुविधा भूखंड सद्यस्थितीत मे. अदानी इलेक्ट्रिसिटी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असून, त्यावर त्यांची वीज वितरण यंत्रणा/उपकेंद्र आधीच कार्यान्वित आहे.
- सदर अधिकृत मंजूर भू-अभिन्यासात सद्यस्थितीत अन्य कोणताही अतिरिक्त भूखंड वीज उपकेंद्रासाठी आरक्षित अथवा मोकळा उपलब्ध नाही. त्यामुळे सद्यस्थितीत नवीन स्वतंत्र जागा उपलब्ध करून देणे म्हाडाला शक्य नाही.
- DCPR 2034 च्या नियम क्र. 28(A) मधील तरतुदीनुसार, पुनर्विकसित होणाऱ्या इमारतीच्या भूखंडाच्या क्षेत्रफळानुसार, विकासकावर स्वतःच्या भूखंडावरच सबस्टेशन/ट्रान्सफॉर्मरसाठी जागा देणे बंधनकारक आहे.या तरतुदीचा आधार घेऊन संबंधित वीज पुरवठा यंत्रणेला (मे. अदानी इलेक्ट्रिसिटी) नवीन इमारतींमधील सदनिकांची विजेची वाढीव मागणी पूर्ण करण्. शक्य आहे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
11:07:31

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

जा. क्रं. का.अ./शहर/मुं.मं./ /२०२६
दिनांक:-

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्रं. ११५३३
मुंबईतील काळाचौकी येथील बहुचर्चित टेक्सटाईल म्युझियम अर्थात वस्त्रोदयोग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र प्रलंबित असल्याबाबत.
श्री संजय उपाध्याय, विधानसभा सदस्य.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन याचं पत्र क्रमांक विसता-२०२५/प्र.क्रं.११२/गृनिधो-२ दि. १३/०६/२०२५

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये विषयांकित विधानसभा तारांकित प्रश्न क्रं. ११५३३ या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडून विधानसभा तारांकित प्रश्न क्रं. ११५३३ ची उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरीता सादर.

सोबत:- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 25-05-2026
20:09:39
मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ
म्हाडा, मुंबई

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रं. ११५३३

मुंबईतील काळाचौकी येथील बहुचर्चित टेक्स्टाईल म्युझियम अर्थात वस्त्रोदयोग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र प्रलंबित असल्याबाबत.

श्री संजय उपाध्याय, विधानसभा सदस्य

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक विसअता-२०२५/प्र.क्रं.२०७/गृनिधो-२ दि. २८/०४/२०२६.

अ. क्रं.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबईतील काळाचौकी येथील बहुचर्चित टेक्स्टाईल म्युझियम अर्थात वस्त्रोदयोग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र गेल्या सात वर्षापासून प्रलंबित असल्याने हे पर्यटन संग्रहालय मुंबईकर व अन्य पर्यटकांसाठी अदयाप खुले झाले नसल्याची बाब माहे एप्रिल २०२५ च्या तिस-या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	सदर विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अहवाल देणे शक्य नाही.
२.	असल्यास, परळ, लालबाग, भायखळा, काळाचौकी, दादर, नायगाव व अन्य भागाची गिरणगाव म्हणून आजही ओळख असताना आता गिरण्यांच्या जागेवर मोठमोठया व्यवसायिग इमारती उभारल्या जात असल्याने राज्य शासन, मुंबई महापालिका आणि राष्ट्रीय वस्त्रोदयोग मंडळाच्या पुढाकाराने मुंबईतील मध्यवर्ती भागात असलेल्या काळाचौकी येथील इंडीया युनायटेड मिलच्या भूखंडावर वस्त्रोदयोग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र उभारण्यासाठी पहिल्या टप्प्याच्या कामाला २०१८ मध्ये स्थायी समितीत मंजुरी देण्यात आली असतानाही अदयापपर्यंत कामास सुरुवात करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,	सदर विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अहवाल देणे शक्य नाही.
३.	असल्यास, उक्त टेक्स्टाईल म्युझियम पार्क तातडीने नियोजित वेळेत खुले करण्यासाठी शासनाने काही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	सदर विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अहवाल देणे शक्य नाही.
४.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	लागू नाही

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने

Digitally signed by Milind Nilkanth Borikar
Date: 25-05-2026 20:10:43
मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ
म्हाडा, मुंबई

पुरक टिप्पणी:-

विषय:- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्रं. ११५३३**
मुंबईतील काळाचौकी येथील बहुचर्चित टेक्स्टाईल म्युझियम अर्थात वस्त्रोदयोग संग्रहालय व सांस्कृतिक केंद्र प्रलंबित असल्याबाबत.
श्री संजय उपाध्याय, विधानसभा सदस्य

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन याचं पत्र क्रमांक विसअता-२०२५/प्र.क्रं.२०७/गृनिधो-२ दि. २८/०४/२०२६.

संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त मा. श्री संजय उपाध्याय, विधानसभा सदस्य यांनी विचारलेल्या विधानसभा अतारांकित प्रश्न क्रं. ११५३३ मध्ये विचारणा केलेले प्रश्नातील विषय या कार्यालयाशी संबंधित नसल्याने सदर बाबतचा या कार्यालयाचा अहवाल निरंक समजण्यात यावा.

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 25-05-2026
20:11:53
मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ
म्हाडा, मुंबई

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, कक्ष क्रमांक 407, तिसरा मजला,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई 51

म्हाडा MHADA

जा.क्र. नि.का.अ./ मुं.मं./ / 2026
दिनांक :-

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-400032.

विषय :- **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.33879.**

• मुंबईतील 11 म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास म्हाडा करणार असल्याबाबत..
श्री. योगेश सागर, मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विसता-2026 /प्र.क्र.157/गृनिप, दि.17.06.2026.

महोदय,

श्री. योगेश सागर, मा.वि.स.स. यांनी उपरोक्त विषयांकित **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.33879 "** मुंबईतील 11 म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास म्हाडा करणार असल्याबाबत" करिता तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे.

त्या अनुषंगाने सदरहू तारांकित प्रश्नाची उत्तरे व पुरक टिप्पणी माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.
(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासु,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-07-2026
18:44:48
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- विधानसभा तारांकित प्रश्न क्र.**33879.**

- मुंबईतील 11 म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास म्हाडा करणार असल्याबाबत..
श्री. योगेश सागर, मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विसता-2026 /प्र.क्र.157/गृनिप, दि.17.06.2026.

अ.क्र	प्रश्न	उत्तर
1.	मुंबईतील 11 म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास म्हाडा करणार असून यात चारकोप मधील 200 एकरवरील म्हाडा वसाहतींचा समावेश असल्याचे दि.17 एप्रिल, 2026 रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	चारकोप, कांदिवली (पश्चिम) या अभिन्यासाचा समूह पुनर्विकास C & D Agency ची नियुक्ती करून म्हाडामार्फत करण्याचे विचाराधीन आहे.
2.	असल्यास, चारकोपमध्ये काही सोसायट्या एकत्र येवून स्वयंपुनर्विकास करण्याचा ठराव घेतला असून एखादा क्लस्टर डेव्हलपमेंट समूह पुनर्विकास खासगी विकासकाच्या माध्यमातून करावयाचा झाल्यास त्यांना म्हाडा परवानगी देणार आहे काय,	चारकोप, कांदिवली (पश्चिम) या अभिन्यासाचा समूह पुनर्विकास C & D Agency ची नियुक्ती करून म्हाडामार्फत करण्याचे विचाराधीन असल्यामुळे सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यापूर्वी, म्हाडास प्राप्त स्वयंपुनर्विकास / पुनर्विकास / समूह पुनर्विकास प्रस्तावांबाबत निर्णय घेण्यात येईल.
3.	असल्यास, याबाबत शासन कोणते धोरण राबविणार आहे,	शासनाशी संबंधित

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-07-2026
18:45:48

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय :- **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.33879.**

- मुंबईतील 11 म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास म्हाडा करणार असल्याबाबत..

श्री. योगेश सागर, मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.विसता-2026 /प्र.क्र.157/गृनिप, दि.17.06.2026.

मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये परवडणारी घरे निर्माण करण्याकरीता शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मुंबई मंडळामार्फत मध्यम उत्पन्न गट (MIG) व अल्प उत्पन्न गट (LIG) या गटांकरीता 56 वसाहतींची निर्मिती करण्यात आलेली होती. या वसाहतींमध्ये अंदाजे 5,000 सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत.

अभिन्यासाचा समुह पुनर्विकास केल्यास सुयोग्य नियोजनासह मुलभूत / आधुनिक सोईसुविधा (जसे की, खेळाचे मैदान, करमणुकीचे मैदान, जिम्नॅशियम, स्विमिंगपूल, क्लबहाऊस, संस्था कार्यालय, व थेटर्स इ.) उपलब्ध होतील व अभिन्यासाचा सर्वांगीण विकास होणे शक्य होईल. या वसाहतींमधील काही इमारती जीर्ण व मोडकळीस आल्यामुळे म्हाडा अभिन्यासाचा समुह पुनर्विकास C & D Agency ची नियुक्ती करून म्हाडामार्फत करून त्याद्वारे रहिवाशांना अधिक चटई क्षेत्रफळाची घरे प्राप्त होऊन रहिवाश्यांना आधुनिक सोईसुविधांचा लाभ घेता येईल.

चारकोप, कांदिवली (पश्चिम) या अभिन्यासाचा समूह पुनर्विकासC & D Agency ची नियुक्ती करून म्हाडामार्फत करण्याचे विचाराधीन आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव शासनास सादर करण्यापूर्वी, म्हाडास प्राप्त स्वयंपुनर्विकास / पुनर्विकास / समूह पुनर्विकास प्रस्तावांबाबत निर्णय घेण्यात येईल.
(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 15-07-2026
18:46:41

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

उपमुख्य अधिकारी / संक्रमण गाळे विभाग
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
कक्ष क्र. ३२७, गृहनिर्माणभवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१



जा. क्र.उपमुअ / संगा / ग. लि. – ०४ /924542 /२०२६
दिनांक - 23/06/2026

प्रति,
कक्ष अधिकारी,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

विषय – <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४५६६,</u>
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची विकासकाकडून १२१ कोटीची रक्कम देण्याबाबत..
श्रीमती सना मलिक, वि. स. स.

संदर्भ – आपले पत्र क्र. विसता – २०२६ / प्र. क्र. ४० / दु व पु – २, दि. १७.०६.२०२६

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त विषयांकित मा. श्रीमती सना मलिक, वि. स. स. यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने **<u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४५६६</u>** ची भागश: उत्तरे या सोबत पाठविण्यात येत आहे.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
मुंबई

प्रत माहितीसाठी रवाना –
१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण
२. सचिव / प्राधिकरण
३. सहमुख्य अधिकारी / दु व पु मंडळ

उपस्थित मुद्दा	अभिप्राय
१. सन १९९६ ते २०२१ या कालावधीत काही विकासकांना, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण शिबीरे भाडेतत्वावर दिली असून विकासकांनी सुरुवातीला काही रकमेचे भाडे भरण्यात येणे, त्यानंतर करारनाम्यातील अटी व शर्तींचे उल्लंधन करुन त्यांनी दिर्घकाळभाडे भरले नसल्याने सदर रक्कम ही १२१ कोटी असल्याचे दि. १२ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	होय, हे अंशत : खरे आहे.
२. असल्यास, याबाबत म्हाडाचे उपमुख्य अधिकारी यांनी, खेरवाडी पोलिस ठाण्यात तक्रार केली असून त्यानुसार मे. नाईन एम. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मे. नाखवा अॅंड जसोल, म. प्रदीप गोरा गांधी, मे. जे. के. बिल्डर्स, मे. अल हम्द, मे. वर्धमान, मे. उदिती, संघवी प्रिमायसेस प्रा. लि., आर. आर. बिल्डर्स, मे. हरे कृष्णा चापसी यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून हा तपास आर्थिक गुन्हे शाखा (मुंबई) यांचेकडून करण्यात येत असल्याचेही निर्देशनास आले आहे, हे हि खरे आहे काय,	होय, हे खरे आहे. उपमुख्य अधिकारी / संक्रमण गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या कार्यालयामार्फत दिनांक १०.०३.२०२६ रोजी १० विकासकांविरुध्द आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे प्रथम खबरी अहवाल FIR नोंदविण्यात आला असून इतर १६ विकासकांविरुध्द पुरवणी जबाब नोंदविण्यात आलेला आहे. सदर २६ विकासकांचे नावे पुढील प्रमाणे – १. मे. ९ एम. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. २. मे. नाख्वा अॅन्ड जसोल ३. मे. प्रदिप गोरा गांधी ४. मे. जे. के. बिल्डर्स ५. मे. अलहम्द ६. मे. वर्धमान ७. मे. उदिती ८. मे. संघवी प्रिमायसेस प्रा. लि. ९. मे. आर. आर. बिल्डिर्स १०. मे. हरे कृष्णा चापसी बिल्डिंग ११. मे. एक्सेल आर्किट १२. मे. खंबाटी डेव्हलपर्स

	१३. मे. के. एस. ए. ॲन्ड असोसिएशन १४. मे. डी. जे. डेव्हलपर्स १५. मे. जैनम कन्स्ट्रक्शन १६. मे. पॅराडाईस असोसिएटस १७. मे. एम. बी. कन्स्ट्रक्शन १८. मे. अरिहंत बिल्डर्स १९. मे. मयुर डेव्हलपर्स २०. मे. महालक्ष्मी डेव्हलपर्स २१. मे. एस. डी. कॉरपोरेशन २२. मे. के. रास २३. मे. प्रोग्रेसिव्ह कॉपोरेशन २४. मे. के. के. एस. डेव्हलपर्स २५. मे. तुषार सोनी २६. मे. काथावाला डेव्हलपर्स इत्यादी.
३. असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,	प्रश्नच उध्दभवत नाही एप्रिल – २०१६ ते जून – २०२६ पर्यंत संबंधित विकासकांकडून सुमारे ३२५.१९ कोटी एवढया रक्कमेची वसुली करण्यात आलेली आहे. उपरोक्त मुद्दा क्र. ०२ च्या अभिप्रायानुसार सद्यस्थितीत बाकी असलेल्या थकबाकीसाठी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई या कार्यालयामार्फत कारवाई सुरु आहे.
४. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्नच उध्दभवत नाही. उपमुख्य अधिकारी / संक्रमण गाळे, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ या कार्यालयामार्फत थकबाकी विकासकांना वेळोवेळी भाडेभरणा करण्यासाठी नोटीस देण्यात आल्या आहेत तसेच भाडेभरणा न केलेल्या विकासकांना Work Stop Notice देण्यात आल्या आहेत.

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
Email ID :deskrr2.housing-mh@mah.gov.in

क्रमांक:- विसता-२०२६/प्र.क्र.४५/दुवपु-२ दिनांक: १७ जून, २०२६

प्रति,

मुख्य अधिकारी,
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू)
मुंबई-४०००५१.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४५६६
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची विकासकाकडून १२१ कोटीची रक्कम देण्याबाबत... श्रीमती. सना मलिक, वि.स.स.

महोदय,

उपरोक्त विषयी श्रीमती. सना मलिक, वि.स.स.यांनी उपस्थित केलेला विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४५६६ पुढीलप्रमाणे आहे:-

(१) सन १९९६ ते २०२१ या कालावधीत काही विकासकांना, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण शिबीरे भाडेतत्वावर दिली असून विकासकांनी सुरुवातीला काही रकमेचे भाडे भरण्यात येणे, त्यानंतर करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन करुन त्यांनी दिर्घकाळ भाडे भरले नसल्याने सदर रक्कम ही १२१ कोटी असल्याचे दि.१२ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत म्हाडाचे उपमुख्य अधिकारी यांनी, खेरवाडी पोलिस ठाण्यात तक्रार केली असून त्यानुसार मे.नाईन एम.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,मे.नाखवा अँड जसोल, म.प्रदीप गोरा गांधी, मे.जे.के.बिल्डर्स, मे.अल हम्द, मे.वर्धमान, मे.उदिती, संघवी प्रिमायसेस प्रा.लि., आर.आर.बिल्डर्स, मे.हरे कृष्णा चापसी यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून हा तपास आर्थिक गुन्हे शाखा (मुंबई) यांचेकडून करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

२. तरी, प्रस्तुत तारांकित प्रश्नाच्या प्रश्नोत्तराची माहिती व पूरक टिप्पणी आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास तातडीने सादर करावी, ही विनंती.

आपला,

(प्र. ना. ढवळे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत:
निवडनस्ती (दुवपु-२)कार्यासन, गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३३६५.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पाव.अधि/ विधानसभा अता.प्र.३३३६५/ /दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, 4258
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 23 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३३६५.
मुंबईतील कामाठीपुरातील 943 जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा रखलेल्या पुनर्विकासासाठी राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने विकासक नेमणूकीबाबतच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मंजूरी दिली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, 2026 मध्ये उघडकीय आले असलेबाबत...
- **मा.श्री. मनोज जामसूतकर (भायखळा), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी)**

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.६०/दुवपु-१, दि.१८.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३३६५ ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३३६५.</u>

मुंबईतील कामाठीपुरातील ९४३ जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा रखलेल्या पुनर्विकासासाठी राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने विकासक नेमणूकीबाबतच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मंजूरी दिली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२६ मध्ये उघडकीय आले असलेबाबत...

मा.श्री. मनोज जामसूतकर (भायखळा), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), विधानसभा सदस्य

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
1.	मुंबईतील कामाठीपुरातील ९४३ जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या रखडलेल्या पुनर्विकासासाठी राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने विकासक नेमणूकीबाबतच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	होय, हे खरे आहे. शासनाने दि.०६.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये निविदा स्वीकृत करून संबंधित विकासकांना विकासक म्हणून नियुक्ती व देकारपत्र देण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने म्हाडामार्फत मे. भगीरथी हाउसिंग प्रा. लि. व माथी डेव्हलपर्स प्रा. लि. यांना दि.०८.०४.२०२६ रोजी देकारपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.
2.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रखडलेल्या प्रकल्पाच्या पुनर्विकासाच्या कामासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	प्रश्न उद्भवत नाही.
3.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३३३६५.</u>
मुंबईतील कामाठीपुरातील ९४३ जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा रखलेल्या पुनर्विकासासाठी राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने विकासक नेमणूकीबाबतच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मंजूरी दिली असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२६ मध्ये उघडकीय आले असलेबाबत...
मा.श्री. मनोज जामसूतकर (भायखळा), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), विधानसभा सदस्य

पुरक टिप्पणी:

➢ **दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा गल्ली क्र.१ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समुह पुनर्विकास करणे:**

- दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा गल्ली क्र.१ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समुह पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मधील तरतुदीनुसार म्हाडातर्फे करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्रमांक बैठक-२०२१/प्र.क्र.१५४/दुवपु-१, दि.१२.०१.२०२३ अन्वये मान्यता दिली आहे.
- सदर शासन निर्णयान्वये शासनाने सदर समुह पुनर्विकासाकरिता मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प व्यवहार्यता समिती (Project Feasibility Committee), मा.अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती (High Power Committee) व मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प संनियंत्रण समिती (Project Monitoriting Committee) गठीत करण्यात आली आहे.
- कामाठीपुरा भागातील इमारती या ८० ते १०० वर्षे जुन्या आहेत व अनेक इमारती जीर्ण व मोडकळीस आलेल्या असून, काही इमारती तळ मजल्यापर्यंत तोडण्यात आलेल्या आहेत.
- सदर समुह पुनर्विकास प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी मंडळाने एकूण १५ वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक केली असून, त्यांच्यातर्फे इमारतीमध्ये राहणाऱ्या भाडेकरु / रहिवाश्यांची पात्रता निश्चित करण्याकरिता प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर सर्वेक्षणानुसार, ४७५ उपकरप्राप्त इमारती , १६३ बिगर उपकरप्राप्त इमारती, १५ पुनर्रचित आणि पीएमजीपी इमारती, १५ धार्मिक स्थळे, ०२ शाळा, ०४ शासकीय इमारती, ०८ इतर इमारती व ५२ पाडण्यात आलेल्या इमारती असे एकूण ७३४ इमारती आहेत.
- कामाठीपुरा उच्चाधिकार समितीची बैठक दि.१४.०९.२०२३ रोजी मा.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मंडळाने कामाठीपुरा प्रकल्पाच्या व्यवहार्यता अहवालाचे सादरीकरण केले.
- तसेच कामाठीपुरा उच्चाधिकार समितीच्या उपरोक्त बैठकीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नेमणूक करण्याकरिता निविदा काढण्याची प्रक्रीया सुरू करण्यास सर्वानुमते मान्यता दिली. त्याअनुषंगाने तपशिलवार प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) ची नेमणुक करण्याकरीता निविदा काढण्यास दि.०५.१२.२०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली व मेसर्स माहिमतुरा कन्सलटंन्ट यांची नियुक्ती करण्यात आली.
- मेसर्स माहिमतुरा कन्सलटंन्ट प्रा.लि., प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) यानी सादर केलेला तपशीलवार प्रकल्प अहवाल मंडळाने शासन गृहनिर्माण विभागास दि.०८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला. त्यास शासनाने नेमलेल्या कामाठीपुरा मा.उच्च अधिकार समितीने दि.१८.०७.२०२४ रोजी मंजूरी प्रदान केली व निविदा मागवून विकासकांची नेमणूक करण्याचे निर्देश दिले आहेत.
- सदर भुखंडाचे निव्वळ क्षेत्रफळ ७३,१४४.८४ चौ.मी., असून, निवासी ६६२५ व अनिवासी १३७६ असे एकूण ८००१ भाडेकरु /रहिवाशी यांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे.
- कामाठीपुरा येथील पुनर्वसनासाठी लागणारे निवासी भाडेकरु/रहिवाशी यांचे अंदाजे क्षेत्रफळ ३,५८,९३७.०८ चौ.मी. आहे व अनिवासी भाडेकरु / रहिवाशी यांचे अंदाजे क्षेत्रफळ ३६,९४५.१० चौ.मी. असून एकूण पुनर्वसन लागणारे क्षेत्रफळ फजिबल वगळुन ३,९३,८६१.८७ चौ.मी. आहे व फजिबलसह ४,१३,९३०.९९ चौ.मी. आहे.
- कामाठीपुरातील भुखंड मालकांनी मागणी केलेल्या प्रस्तावानुसार अंदाजे १७६३ सदनिका वितरीत कराव्या लागू शकतील व त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ ९८,१०४.७९ चौ.मी. आहे.
- भाडेकरु /रहिवाशी यांचे पुनर्वसन व जमिन मालक यांना सदनिका दिल्यानंतर फजिबलसह ५,२२,१८८.१५ चौ.मी. क्षेत्रफळ विक्रीकरिता उपलब्ध होईल.

- शासन गृहनिर्माण विभागाच्या दि.१२.०१.२०२३ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद १.३ नुसार, कामाठीपुरा क्षेत्रातील समुह पुनर्विकास योजना विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३(९) अंतर्गत जलद गतीने राबविण्यासाठी तसेच आराखडे व नकाशांना मंजूरी देण्यासाठी म्हाडास सुकाणु अभिकरण (Nodel Agency) व विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या अनुषंगाने म्हाडास विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नेमण्याबाबतची अधिसुचना शासन नगर विकास विभागाकडून दि.०९.०७.२०२५ अन्वये निर्गमित झाली आहे.

- शासन निर्णय दि.०२.०७.२०२४ अन्वये कामाठीपुरा क्षेत्रतील जमिन मालकांस खालीलप्रमाणे मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अ.क्र.	जमिन मालकांचे क्षेत्रफळ	जमिन मालकांस दयावायाचा मोबदला
१.	५० चौ.मी क्षेत्रफळाच्या भुखंडाकरिता	५०० चौ.फुट क्षेत्रफळाची ०१ सदनिका
२.	५१ चौ.मी. ते १०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडाकरिता	५०० चौ.फुट क्षेत्रफळाची ०२ सदनिका
३.	१०१ चौ.मी. ते १५० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडाकरिता	५०० चौ.फुट क्षेत्रफळाची ०३ सदनिका
४.	१५१ चौ.मी. ते २०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडाकरिता	५०० चौ.फुट क्षेत्रफळाची ०४ सदनिका
५.	२०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडाच्या पुढील प्रत्येक ५० चौ.मी. भुखंड क्षेत्रफळाकरिता ५०० चौ.फुट क्षेत्रफळाची १ अतिरीक्त सदनिका	

- मंडळामार्फत शासनास दि.१५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कामाठीपुरा क्षेत्राकरिता नगर विकास विभागामार्फत विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करण्याची अधिसुचना निर्गमित होण्याच्या अधिन राहून, विकासक नेमणूकीची निविदा प्रसध्दि करण्याची विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने शासनाने दि.२२.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कामाठीपुरा उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पुर्ण करुन त्यास उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन विकासकाची नियुक्ती करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

- त्याअनुषंगाने सद्य:स्थितीत दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा क्षेत्रातील गल्ली क्रमांक १ ते १५ या भागातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींचा व भूखंडाचा समूह पुनर्विकास, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, विनियम ३३(९) अंतर्गत म्हाडामार्फत करण्याकरिता विकासकाची नेमणूक करण्याची निविदा दि.१२.०६.२०२५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- तद्नंतर सदर निविदेच्या वेळापत्रकानुसार दि.०१.१०.२०२५ रोजी तांत्रिक लिफाफे व दि.२०.१०.२०२५ रोजी आर्थिक बोली उघडण्यात आली.

- मा.उच्चाधिकार समितीने दि.१४.११.२०२५ रोजीच्या बैठकीत मेसर्स भागीरथी हाऊसिंग प्रा.लि., व माथी डेव्हलपर्स प्रा.लि. यांची विक्री घटकाच्या ८.२५% एवढे म्हाडा क्षेत्रफळ प्रमाणे निविदा स्विकृत करुन त्यांची सदर प्रकल्प राबविण्याकरिता C&DA म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे.

- मा.उच्चाधिकार समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे, मेसर्स भागीरथी हाऊसिंग प्रा.लि., व माथी डेव्हलपर्स प्रा.लि., यांची सदर प्रकल्प राबविण्याकरिता विकासक म्हणून शासन मान्यता देण्याकरिता तसेच तद्नंतर विकासकास देकारपत्र देण्याकरिता मान्यता देण्यास शासनास दि.२१.११.२०२५ अन्वये सादर करण्यात आलेले आहे.

- शासनाने दि.०६.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये "विक्री घटकांच्या ८.२५ टक्के एवढे म्हाडा क्षेत्रफळ" देण्याच्या अटीवर निविदा स्वीकृत करून संबंधित विकासकांना विकासक म्हणून नियुक्ती व देकारपत्र देण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने मंडळामार्फत मे. भगीरथी हाउसिंग प्रा. लि. व माथी डेव्हलपर्स प्रा. लि. यांना दि.०८.०४.२०२६ रोजी अटी व शर्तींच्या अधीन राहून देकारपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३४२७९.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पाव.अधि/ विधानसभा ता.प्र.३४२७९/4286 /दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 23 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३४२७९.
दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या डोंगरी, पायुधनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत.
- **सर्वश्री. अमिन पटेल व इतर वि.स.स.**

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.६२/दुवपु-१, दि.१८.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३४२७९ ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३४२७९.</u>
दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या डोंगरी, पायुधनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत.
- सर्वश्री. अमिन पटेल व इतर वि.स.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	होय, हे अंशत: खरे आहे. मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२,५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात असुन त्यापैकी डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरातील काही उपकरप्राप्त इमारती या जीर्ण अवस्थेत आहेत. मंडळातर्फे जीर्ण अवस्थेत आढळुन आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची आवश्यकतेनुसार संरचनात्मक दुरुस्ती वेळोवेळी करण्यात येते.
२.	असल्यास, या इमारतींचा पुनर्विकास, समूह पद्धतीने (क्लस्टर) होणेकरीता शासनाने काही धोरण आखले आहे काय,	जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास होणे आवश्यक आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहिवाश्यांनी दुरुस्तीसाठी अर्ज केले आहेत, त्याच्या इमारतीची दुरुस्ती ही मंडळातर्फे आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते. शासन नगर विकास विभागाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या व म्हाडाने पीएमजीपी अंतर्गत बांधलेल्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये तरतुद केलेली आहे. तसेच उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या समुह पुनर्विकास योजनांसाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मध्ये तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी ३३(२४) अंतर्गत तरतुद केलेली आहे.
३.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने या धोरणाच्या अवलंबनाबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,	वर नमुद केल्याप्रमाणे, शासन नगर विकास विभागाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुदी केल्या आहेत. तसेच इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व व्यवहार्य होण्याकरिता वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा केल्या आहेत.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३४२७९.</u>

दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या डोंगरी, पायुधनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाबाबत.

- सर्वश्री. अमिन पटेल व इतर वि.स.स.

पुरक टिप्पणी:

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्विकास ही बाब दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारीत येते.

शासनाने मुंबई शहर बेटावरील सुमारे १९६४२ इमारतींच्या दुरूस्ती / पुनर्बांधणीची जबाबदारी स्विकारून, मुंबई घर दुरूस्ती व पुनर्रचना कायदा १९६९ मंजूर करून त्या अन्वये या मंडळाची स्थापना होऊन मंडळ १९७१ मध्ये कार्यरत झाले, तद्नुसार सुमारे १९६४२ इमारतींना सदर कायद्यानुसार उपकर लावण्यात आला. तद्नंतर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सदर उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती व पुर्नबांधणी करण्याचे काम सुरु केले. सन १९७०-७१ ते माहे जुलै २०२२ पर्यंत मंडळाने एकूण ९४१ जुन्या व दुरुस्तीपलिकडे घोषित केलेल्या उपकरप्राप्त इमारती तोडून त्याठिकाणी नविन पुनर्रचित इमारती बांधल्या आहेत व त्यामध्ये २६९६१ निवासी + २०१५ अनिवासी असे एकूण २९००३ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन केले आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतींना दुरुस्तीची आवश्यकता आहे, अशा इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती मंडळाने वेळोवेळी निधीच्या उपलब्धतेनुसार केली आहे व करीत आहे. दुरुस्ती मंडळ स्थापन झाल्यापासून उपकरप्राप्त इमारतीच्या धोकादायक भागाची किंवा आवश्यक ती दुरूस्ती मुंबई इमारत दुरूस्ती मंडळातर्फे करण्यात येते. त्यामुळे बऱ्याच इमारतींच्या विविध भागांची दुरूस्ती टप्प्या टप्प्याने झाली आहे. सन १९७०-७१ पासुन ते दि.३१.०३.२०२५ पर्यंत मंडळाने उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची टप्प्या टप्प्याने ३८७१२ कामे पुर्ण केली आहेत. तसेच ८२३ दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहे. सन २०२५-२६ मध्ये १०२१ इमारतींच्या दुरुस्तीची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रत्यक्षात सध्या अस्तित्वात असलेल्या सुमारे १२,५५२ उपकर प्राप्त इमारतींपैकी बहुतांश इमारतींची आर्युमर्यादा संपुष्टात आली असून व त्यापैकी काही इमारती दुरूस्तीपलिकडे गेल्या आहेत. तशातच, या इमारतीतील दाट लोकवस्ती, अवजड सामान, निवासी गाळयांचा अनिवासी स्वरूपात होणारा वापर, त्यातून ठेवण्यात आलेली यंत्रसामुग्री, रहिवाशांनी केलेली पोटमाळयाची बांधकामे, इतर स्वरूपातील अनधिकृत बांधकामे, इमारतीच्या देखभालीकडे मालक/रहिवाशांनी केलेले दुर्लक्ष, इमारतीच्या आजूबाजूस साचणारे सांडपाणी इत्यादी कारणांमुळे इमारती संरचनात्मक दृष्टया क्षीण झाल्याने अंततः इमारती कोसळतात असे मागील काही घटनांवरून निदर्शनास आले आहे. या घटनांचे प्रमाण मुख्यत्वे पावसाळयात अधिक असल्याने नियमित करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणाव्यतिरिक्त प्रतिवर्षी फेब्रुवारी ते मे महिन्याच्या दरम्यान मंडळाचे अभियंते उपकरप्राप्त इमारतींची पाहणी दृष्य स्वरूपात करतात व पाहणीतून त्यांना धोकादायक आढळलेल्या इमारतींची धोकादायक स्थिती विचारात घेवून इमारतीचा धोकादायक भाग पाडणे, धोकादायक भागास व आवश्यकतेनुसार इतर भागास टेकू लोवणे, धोकादायक भागातील व इतर दुरूस्ती करावयाच्या भागातील रहिवाश्यांना संक्रमण शिबिरात हलविणे अश्या स्वरूपाची कार्यवाही करून अशा इमारतीच्या दुरूस्तीबाबतची पुढील अनुषंगिक कार्यवाही तातडीने करण्यात येते. पावसाळापुर्व सर्वेक्षणात तसेच सतत चाललेल्या सर्व्हेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी प्रतिवर्षी विविध भाषिक वृत्तपत्रांतुन रहिवाशांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात येते. तसेच रहिवाशांनी योग्य ती खबरदारी घ्यावी यादृष्टीने काही मौलिक सूचना देखील वृत्तपत्रांतुन प्रसिध्द करण्यात येतात. धोकादायक ठरविलेल्या इमारतींवर तो इमारत धोकादायक असल्याचा फलक लावण्यांत येतो. इमारतीच्या धोक्याची लक्षणे तथा इमारत कोसळल्याचे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता मंडळाने इमारत क्रमांक ८९-९५, रजनीमहल, ताडदेव, मुंबई येथे अहोरात्र चालणारा नियंत्रण कक्ष कार्यरत असून त्याचा दूरध्वनी क्र.२३५१७४२३ व २३५३६९४५ असा आहे. या नियंत्रण कक्षात उपअभियंता अथवा कनिष्ठ अभियंता दर्जाचे अधिकारी २४ तास उपस्थित असतात. संदेश प्राप्त होताच ते प्रत्यक्ष जागेवर जाऊन इमारतीची पाहणी करून आवश्यक ती अनुषंगिक कार्यवाही करतात.

इमारतींच्या सर्वेक्षणाच्यावेळी सर्वसाधारणपणे इमारतीच्या संरचनात्मक दृष्टया महत्वाच्या असलेल्या दृष्यमान भागाचे परिक्षण करण्यात येते. इमारतीच्या न दिसणाऱ्या भागाची पाहणी करता येत नाही. दक्षिण मुंबईतील इमारती हया दाटीवाटीने वसलेल्या असल्याने दोन इमारतीमधील अरूंद गल्लीबोळ, त्यात साचलेला घनकचरा, घाणीने तुंबलेली गटारे यामुळे इमारतीच्या संपूर्ण बाहयभागाचे निरिक्षण करता येत नाही. तसेच इमारतीच्या काही खोल्यामध्ये आतून फॉल्स सिलिंग सारख्या सजावट कामामुळे छताचे परिक्षण करता येत नाही. काही खोल्या बंद असणे, भाडेकरूंनी केलेला विरोध यामुळे इमारतीची पूर्ण पाहणी करणे अशक्य होते. त्यामुळे अशा इमारतींच्या संरचनात्मक स्थैर्याबाबत निश्चित असा अंदाज बांधता येत नाही.

तथापि इमारतींचे नियमीतपणे सर्वेक्षण मंडळाच्या अभियंत्यांमार्फत करण्यांत येऊन पुढील कार्यवाही जसे धोकादायक भाग पाडून टाकणे, इमारतीस टेकू लावणे, धोकादायक भागातील भाडेकरूंची संक्रमण शिबीरात पर्यायी व्यवस्था करून धोकादायक भाग दुरूस्तीस घेणे इ. कार्यवाही करण्यात येते.

विकास योजना आराखडयामधील आरक्षणे, विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदी, रेल्वे हददीनजिक ३० मीटर जागा मोकळी सोडणे यांसारख्या कारणांमुळे बऱ्याच इमारतींची पुनर्रचना होऊ शकली नाही. बऱ्याच ठिकाणी मालक/रहिवाशी यांचेमार्फत भूसंपादन कार्यवाहीस होणारा विरोध, न्यायालयीन स्थगिती आणणे, भाडेकरूंनी संक्रमण शिबीरात पर्यायी जागा न स्विकारणे, इमारत पाडण्यास विरोध करणे वगैरे कारणांमुळे पुनर्बांधणीच्या कार्यवाहीस बराच विलंब होतो.

➢ **मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी व त्यामधील राहणाऱ्या भाडेकरु / रहिवाश्यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे सादर:-**

बृहन्मुंबईतील भाडेतत्वारील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचनेसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभागाने दि.१३.०६.१९९६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे श्री सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमला होता. सदर अभ्यास गटाच्या असे निदर्शनास आले की, मुंबई शहरातील मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींची वारंवार दुरूस्ती करूनसुद्धा मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जिवित व वित्तहानी होते. त्यामुळे या इमारतींचा पुनर्विकास करण्यावाचुन गत्यंतर नाही. शासनाने जुन्या उपकरप्राप्त इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचना करण्याची जबाबदारी हि म्हाड अधिनियमानुसार म्हाडावर सोपविली आहे, परंतु मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचना करणे हे म्हाडास शक्य होणार नाही व त्याकरीता उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना प्रोत्सहनात्मक चटईक्षेत्र निर्देशांक दिल्यास मालक स्वत:हुन त्यांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास पुढे येतील. श्री सुकथनकर यांच्या अभ्यास गटाने शासन गृहनिर्माण विभागास माहे जुलै १९९७ मध्ये अहवाल सादर केला होता. महाराष्ट्र शासनाने सदर अहवालातील सुचविलेल्या शिफारसी स्विकृत करून विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये सुधारणा केल्या व शासन नगर विकास विभागाने दि.२५.०१.१९९९ रोजीच्या अधिसुचनेद्वारे उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना पुनर्विकासास प्रोत्साहित करण्यासाठी ज्यादा/प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा निर्णय घेतला. तद्नंतर विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) मध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

<u>विकास नियंत्रण नियमावली ३३(७):-</u>

शासनाने नगर विकास विभागाने दि.२५.०१.१९९९ व दि.२१.०५.२०११ च्या अधिसूचनेद्वारे मुंबई शहर जिल्ह्यातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(७) जारी केली. उपकरप्राप्त इमारतीतील किमान ७०% (सध्या ५१%) भाडेकरू/ रहिवाश्यांची संमत्ती व मालकाची संमत्ती असल्यास सदर इमारतीचा पुनर्विकास या नियमावली अंतर्गत करण्याची तरतूद होती.

तसेच शासनाने दि.१६.०८.२०१० रोजी शासन निर्णय काढून भाडेकरू रहिवाश्यांची पात्रता निश्चितीमध्ये येणा-या अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

नगर विकास विभागाच्या दि.२१.०९.२०१८ व दि.१२.११.२०१८ रोजीच्या अधिसुचनेतील विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत सुधारणा.

१) एका भुखंडाचा पुनर्विकास केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + ५% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
२) २ ते ५ भुखंडाचा पुनर्विकास सामुहिकपणे केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + ८% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
३) ५ पेक्षा अधिक भुखंडाचा पुनर्विकास सामुहिकपणे केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + १५% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
४) कमाल पुनर्वसन चटई क्षेत्र ७० चौ.मी. वरुन १२० चौ.मी. पर्यंत वाढविण्यात आलेले आहे.
५) पुनर्विकासासाठी ७० टक्के ऐवजी ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांची संमती असणे आवश्यक आहे.

नगर विकास विभागाचे क्रमांक टिपीबी-४३२०/१०७/प्र.क्र.७२/२०२०(भाग-१)/नावि-११, दि.०८.०७.२०२१ रोजीची अधिसुचनेव्दारे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये मंजूर केलेल्या सुधारणा:

<u>विकास नियंत्रण नियमाली ३३(७)</u>

१) पुनर्वसन बांधकाम क्षेत्रफळावर प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक ५०% वरुन ७५ ते १००% इतके देण्याची तरतुद केली आहे.
२) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या ६६ इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

३) उपकरप्राप्त इमारतीच्या भुखंडावर, बिगर उपकरप्राप्त इमारतींचा समावेश असल्यास, बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या खालील भुखंडाच्या क्षेत्रफळाच्या ४५% इतके क्षेत्र नवीन नियमानुसार ३.०० चटई क्षेत्र निर्देशांकाकरिता पात्र ठरविण्यात आले आहे व त्यावरील वि. नि. नि. अधिनियम ३० च्या तरतूदीस अधीन राहून क्षेत्रफळ अनुज्ञेय ठरविले आहे.

४) वाढीव प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक जे प्रकल्प प्रगतीपथावर आहे त्यांनासुध्दा देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

५) एकापेक्षा दोन किंवा अनेक पुनर्विकास योजना संयुक्तपणे राबविण्याची तरतुद करण्यात आली आहे. जसे की, एखादा भूखंड छोटा आकाराचा असला व भाडेकरुची संख्या ही जास्त असल्यास अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक पुर्णपणे वापरता येणे शक्य नसल्यास, १० किलोमीटर अंतराच्या आत त्याच मालक / विकासकाचा दुसरा प्रकल्प सुरु असल्यास, अश्या दोन्ही प्रकल्प संयुक्तपणे राबविण्याची तरतुद नव्याने करण्यात येते.

➢ **शासनाने दि.०५.०३.२०२१ रोजी च्या शासन निर्णयाव्दारे पुनर्विकास प्रस्तावास मान्यता देण्याबाबतच्या नविन मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून, त्या सुचनांनुसार मालक / विकासकाचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.**

- विकासकाकडून पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यांनी पुर्वी केलेल्या कामांचा तपशील तपासुन विकासकांची पात्रता निश्चित करणे.
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास योजनेमध्ये विकासकांकडुन भाडेकरू / रहिवाशी यांच्या भाड्यापोटी रक्कम आगाऊ स्वरूपात जमा करण्यासाठी एस्क्रो खाते (Escrow Account) उघडणे
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समितीची स्थापन करणे
- म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम-१०३ब अन्वये भुसंपादित केलेल्या मालमत्तेचा पुनर्विकासास चालना देण्यासाठी मार्गदर्शक सुचना
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा

<u>विकास नियंत्रण नियमावली ३३(९):-</u>

शासनाने दि.०२.०३.२००९ च्या अधिसूचनेद्वारे सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (९) जारी केली आहे. सदर नियमावली अंतर्गत उपकरप्राप्त इमारतींबरोबर बिगर उपकरप्राप्त इमारती, शासकीय इमारती व काही प्रमाणांत झोपडपट्टी असलेल्या क्षेत्राचा समुह पध्दतीने पुर्नविकास करण्याची तरतुद आहे. तद्नंतर मूळ अधिसुचनेमध्ये सुधारणा करून शासनाने दि.०९.०९.२०१४ च्या अधिसुचना जारी केली आहे व डीसीपीआर २०३४ नुसार विकास नियंत्रण नियमावली क्र.३३(९) दि.१२.११.२०१८ पासुन अंमलात आणलेली आहे. तसेच अधिसुचना ०८.०७.२०२१ अन्वये विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मध्ये मंजूर केलेल्या आहेत.

मंडळातर्फे जुन्या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी खाजगी विकासकांना २६७६ ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले असून त्यामध्ये एकूण ४७२२ उपकरप्राप्त इमारतीचा समावेश असून ८९९६० भाडेकरू / रहिवाश्यांचा समावेश आहे. आतापर्यंत १०३३ योजनांचे काम पूर्ण झाले असून १७३१ जुन्या उपकरप्राप्त इमारतीमधील २९४०५ भाडेकरू / रहिवाश्यांचे पुनर्वसन झालेले आहे.

विकासकामार्फत पुनर्विकासास प्रतिसादातील अडचणी:-

- मालकांचा, मालक म्हणून हिस्सा निश्चित नाही. अल्प मोबदला हे कारण असू शकेल.
- मालकांचे / वारसदारांचे आपसातील वाद. (न्यायालयीन प्रकरणे).
- एकाच भुखंडावर उपकरप्राप्त / बिगर उपकरप्राप्त इमारती असताना बिगर उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाश्यांना संरक्षण / क्षेत्र निश्चिती यात तफावत.
- म्हाड कायदा, १०३(B) अंतर्गत झालेल्या सहकारी संस्थासाठीच्या भु-संपादनानंतरही पुनर्विकास रखडला.
- भु-संपादनास लागणारा अवाजवी कालावधी - न्यायालयीन लढाया इ.

रखडलेल्या प्रकल्पांची कारणे:-

- विकासकांची अकार्यक्षमता / दिवाळखोरी / प्रकल्पांची व्यवहार्यता संपुष्टात-नवीन विकासक नेमण्याची तरतूद नाही.
- Non Developable Plot Size - ६ मी मार्जिनची आवश्यकता.
- मालक / विकासक / भाडेकरू यांचे वाद.
- नविन तरतुदीनुसार ५१% सहमतीनंतरही ४९% लोकांचा जागा रिकामा करण्यास विरोध - न्यायालयात धाव घेणे.

सुरू प्रकल्पातील तक्रारी:-

१. प्रकल्प वेळेवर न होणे.
२. बंद पडलेले प्रकल्प ही जास्त धोकादायक समस्या.
३. क्षेत्रफळांचे वाद - मिळणारे क्षेत्रफळ / मूळ क्षेत्रफळ / फंजिबल.
४. भाडे आणि कॉर्पसचे वाद - पैसे अदा न होणे.

५. करारनामे वेळेवर न होणे.
६. Non-consented भाडेकरूंना मिळणारी बागणूक.

➢ **मंडळाने पुनर्रचित केलेल्या व ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारतींचा पुन्हा पुनर्विकास करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये प्रस्तावित सुधारणा [विकास नियंत्रण नियमावली ३३(२४)]**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबई शहरातील जुन्या व उपकरप्राप्त इमारती तोडून, त्या जागी सन १९७३ ते २०१७ या कालावधीमध्ये एकूण ३८८ पुनर्रचित इमारती बांधल्या आहेत. यामध्ये एकूण ३६३८६ रहिवाशी राहत आहेत. यापैकी बहुतांश इमारतींना ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने, कमकुवत अवस्थेत असून, अशा इमारतींचा पुनर्विकास व्हावा, यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये नव्याने तरतुद करण्याच्या अधिन राहून नगर विकास विभागाने क्रमांक टीपीबी-४३२१/ ५४३/प्र.क्र.१८६/२०२१/नावि-१, दि.२८.०२.२०२२ रोजीच्या सुचनेनुसार बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावली २०३४ मध्ये नविन कलम ३३(२४) अंतर्गत सुधारणा करण्याचे प्रस्तावित फेरबदलाबाबत सुचना प्रसिध्द करुन, त्यावर हरकती / सुचना मागविण्यात आल्या होत्या. म्हाडा/मंडळाने दि.२४.०३.२०२२ व दि.०३.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपसंचालक, नगर रचना विभाग, यांना सविस्तर सुचना सादर केल्या आहेत.

शासन नगर विकास विभागाने दि.१९.१२.२०२२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे म्हाडाने / मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये मान्यता दिली आहे. यानुसार आता मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींचा ज्यांना ३० वर्षे कालावधी पुर्ण झाला आहे किंवा अतिधोकादायक झाले असल्यास त्यांचा पुनर्विकास करता येणे शक्य आहे. परंतू सदर अधिसुचनेमध्ये प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक हे ४५% ते ५०% इतके असल्याने पुनर्विकास योजना व्यहारीक दृष्टया परवडत नसल्याने, काही विधानसभा सदस्यांनी अशी मागणी केली की, ज्याप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) नुसार प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात येतो त्याच धर्तीवर ३३(२४) मध्ये सुध्दा देण्यात यावा. या मुद्दयांबाबत पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये चर्चा झाली असता, मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन दिले की, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) नुसार ३३(२४) मध्ये सुध्दा प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून देण्यात येईल. त्यानुसार शासन नगर विकास विभागाने दि.०३.११.२०२३ रोजीच्या अधिसुचनेव्दारे ३३(२४) मध्ये फेरबदल करुन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम १५४(१) अन्वये सुचना निर्गमित केल्या होत्या. सद्य:स्थितीत शासन नगर विकास विभागाने अंतिम अधिसुचना दि.०८.१०.२०२४ रोजी निर्गमित केल्या असून, विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मधील तरतुदी अंतिम केल्या आहेत परंतू त्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांना भुखंडाच्या संख्येनुसार ५%, ८%, १५% अधिक चटई क्षेत्रफळाचा लाभ देण्याबाबतची तरतुद अंतर्भुत नाही.

तद्नंतर ३८८ पुनर्रचित इमारतीचा पुनर्विकास करताना,विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये विकास नियंत्रण नियमावली ३३(७) प्रमाणे भाडेकरु / रहिवाश्यांना किमान पुनर्वसन क्षेत्रावर ५%, ८%, १५% अधिक चटई क्षेत्र देण्याबाबतची सुचना शासन नगर विकास विभागाने दि.१८.०७.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ इमारती व पीएमजीपी अंतर्गत पुनर्रचित केलेल्या ६६ इमारतींचा पुनर्विकास करताना, प्रकल्प व्यवहार्य होण्याकरिता, जमिन मालक म्हणून, प्रचलित ASR नुसार जमिनीच्या किंमतीच्या २५% दराने होणाऱ्या किंमती इतके बांधकाम क्षेत्रफळाच्या निवासी सदनिका म्हाडाने घेण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरणाने दि.१८.०९.२०२५ रोजीच्या प्राधिकरणाच्या ३०१ बैठकीत ठराव क्रमांक ७१३८ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

"प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ इमारतीं व पीएमजीपी अंतर्गत पुनर्रचित केलेल्या ६६ इमारतींचा पुनर्विकास करताना, चटई क्षेत्र निर्देशांक ३.०० पेक्षा अधिक अनुज्ञेय असलेल्या प्रकल्पांना, प्रकल्प व्यवहार्य होण्याकरिता, जमिन मालकीच्या मोबदल्यात प्रचलित ASR नुसार जमिनीच्या किंमतीच्या २५% दराने होणाऱ्या किंमती इतके बांधकाम क्षेत्रफळाच्या निवासी सदनिका विकासकाने म्हाडास हस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) व ३३(७) मधील तरतुदीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करताना, सदर अट अंतर्भुत करण्यात यावी."

➢ **मालक / विकासकांनी उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प सुरु करुन अर्धवट अवस्थे सोडले आहेत, असे प्रकल्प म्हाडाने पुर्ण करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.**

शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजी मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर आमदाराच्या समितीची दि.१९.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी मुंबई बेटावरील रखडलेल्या / बंद पडलेल्या / अर्धवट सोडलेल्या योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत उपाय योजना सुचविलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मंडळाने दि.१३.१०.२०१७, दि.२६.१०.२०१७, दि.०९.१०.२०१८ व दि.१२.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ७७ व ९१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविलेल्या आहे.

शासनाने म्हाड अधिनियमात कलम ७७, ७९ व ९१ मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांना पावसाळी अधिवेशन २०२० मध्ये मान्यता दिली होती. (L.A.Bill No.XLI of २०२०). त्यानुसार सदर विधेयकास मा.महामहिम राष्ट्रपती महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, शासनाने सदर विधेयक दि.०२.१२.२०२२ रोजी प्रसिध्द केले आहे. त्याप्रमाणे सुधारित कलम ७९(अ) व कलम ९१(अ) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे.

➢ <u>नविन कलम ७९(अ)</u>

ज्या उपकर प्राप्त इमारतींना महानगरपालिकेने एमएमसी ॲक्ट मधील कलम ३५४ अन्वये नोटीस बजावुन किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने इमारत धोकादायक घोषित केली आहे. अश्या इमारतींच्या मालकास ०६ महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय संमतीपत्र प्राप्त करुन, पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. मालकाने तसे न केल्यास, भाडेकरु/ रहिवाश्यांच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेस पुढील ६ महिन्याच्या आत ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय संमतीपत्र प्राप्त करुन पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. जर या दोघांनीही प्रस्ताव सादर न केल्यास, म्हाडाने सदर इमारत व त्याखालील भुखंड भुसंपादित करुन पुनर्विकास हाती घेण्याची तरतुद केली आहे.

शासनाने दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. मंडळाने एका प्रकरणामध्ये कलम ७९अ अंतर्गत मालकांस बजाविण्यात आलेल्या नोटीसींच्या अनुषंगाने इमारत मालकांने मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक ३७४३/२०२३ दाखल करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत आव्हान दिले होते. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.०२.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेली कलम ७९अ अंतर्गत नोटीस खारीज करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत म्हाडाने संबंधित इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांशी बैठक घेऊन, इमारतींच्या संरचनात्मक स्थितीची शहानिशा करण्याचे निर्देश दिले. या निर्देशांच्या अनुषंगाने, मंडळाने दि.१९.०३.२०२४ व दि.०५.१२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत खातरजमा करण्याच्या अनुषंगाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना (Standard Operating Procedure) निर्गमित केलेल्या आहेत.

सुधारित कलम ७९अ च्या तरतुदी या डिसेंबर २०२२ पासुन अंमलात आलेल्या आहेत. या तरतुदीनुसार, सुरुवातीला इमारत मालकांना ०३ महिन्याची नोटीस देऊन इमारत धोकादायक असल्याबाबत कळवावयाचे आहे. या कालावधीत इमारत मालकांने इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काहीच कार्यवाही केली नाही तर, कलम ७९अ नुसार इमारत मालकांस नोटीस बजावून ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या ०६ महिन्यांच्या कालावधीत इमारत मालकांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले नाही तर, संबंधित क्षेत्रिय उपमुख्य अभियता यांनी मालक व भाडेकरु / रहिवाशी यांची संयुक्त सुनावणी घेऊन, आदेश पारित करणे आवश्यक आहे. तद्नंतर कलम ७९अ(१ब) नुसार इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांना ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची नोटीस जारी केली जाते. या सर्व प्रक्रियेला सुमारे १५ महिन्यांच्या कालावधी लागतो. कलम ७९अ(१अ) व ७९अ(१ब) या तरतुदी म्हाड अधिनियमात नव्यानेच अंतर्भुत केल्या असल्याने, त्यामध्ये उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व कायदेशीर बाबी विचारात घेता, मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सुधारित म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ अंतर्गत तरतुदीनुसार, शासन गृहनिर्माण विभागाने व मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आतापर्यंत कलम ७९अ अंतर्गत जीर्ण झालेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना मंडळाने बजाविलेल्या नोटीसची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

❖ **७९अ(१अ)**

- कलम ७९अ अंतर्गत बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ८५४
- इमारत मालकांनी सादर केलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : ६७
- इमारत मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या प्रकल्पांची संख्या : ३०
- मंडळातर्फे छाननी सुरु असलेले उर्वरित पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : ३७
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१अ) नोटीसची मुदत संपल्यानंतर, संबंधित उपमुख्य अभियंता, दुवपु मंडळ यांनी इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेतलेल्या प्रकरणांची संख्या : ६२२
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : ५९६

❖ **७९अ(१ब)**

- कलम ७९अ(१ब) अंतर्गत तरतुदीनुसार भाडेकरु / रहिवाश्यांच्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेस बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ३४०
- भाडेकरु / रहिवाश्यांनी कलम ७९अ(१ब) तरतुदीनुसार पुनर्विकास प्रस्ताव सादर केलेले एकूण प्रकरण : ३८
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१ब) नोटीसची मुदत संपल्यानंतर, इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या : १५९
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : १३२
- ७९अ(१ब) अंतर्गत भाडेकरु / रहिवाश्यांना पुनर्विकासाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यापुर्वी सदर मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता, दुवपु मंडळ : १५

यांनी भुसंपादन करण्याकरिता सादर केलेल्या एकूण प्रस्तावाची संख्या

- शासन गृहनिर्माण विभागास भुसपांदनासाठी सादर केलेले प्रस्ताव : १२

उपरोक्त बाबतीत असे सादर करण्यात येते की, मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ कलम ३५३(ब) मधील तरतुदीनुसार ज्या इमारतींना ३० वर्षे पुर्ण झाली आहे, अशा इमारतींच्या मालकांना त्यांचे इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट बंधनकारक आहे. तसेच सदर मालकांना नोटीस बजाविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे. परंतू अशा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट हे मालक करुन घेत नाही, हि वस्तुस्थिती आहे. याकारणास्तव म्हाडाने / मंडळाने सद्य:स्थितीत मुंबई शहरात अस्तिवात असलेल्या सर्व अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार परिमंडळनिहाय निविदा मागवून एजन्सी नेमण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाअंतर्गत ०४ उपमुख्य अभियंता यांनी त्यांच्या विभागातील उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता माहे मार्च महिन्यात निविदा मागविल्या असून, एजन्सी नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. एकूण अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता अपेक्षित खर्च हा अंदाजे रुपये ५० ते ६० कोटी इतका आहे.

इमारतींच्या मालकांना नविन कलम ७९अ मधील तरतुदीनुसार नोटीस बजावून, पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्यास कळविले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३४७७१/२०२४ मधील दि. २८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नविन कलम ७९अ नुसार पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे इमारत धोकादायक घोषित करण्यासाठी सक्षम प्राधिकरण नाही. याकारणास्तव मंडळातर्फे अतिधोकादायक इमारतींबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही.

म्हाडातर्फे उपरोक्त आदेशाविरुध्द स्थगिती मिळविण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्यात आली आहे. परंतू सदर एसएलपी अद्यापपर्यंत चर्चेसाठी घेण्यात आली नसल्यामुळे, मंडळातर्फे नविन कलम ७९अ नुसार पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य होत नाही.

➢ <u>नविन कलम ९१-अ:</u>

विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर व महानगरपालिकेने आयओडी/नकाशे मंजूर केल्यानंतर, ज्या विकासकांनी तीन वर्षाच्या आत काम सुरु केले नाहीत किंवा महानगरपालिकेने सी.सी.(बांधकाम आरंभ करण्याचे प्रमाणपत्र) दिल्यानंतर दोन वर्षापर्यंत काम सुरु केले नाही किंवा ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने अटी व शर्तींचा भंग केला असल्यास अथवा भाडेकरु / रहिवाश्यांचे भाडे देणे बंद केले असल्यास, मंडळाने शासनाच्या परवानगीने म्हाड अधिनियमातील कलम ९२ ते ९३ मधील तरतुदीनुसार मालमत्ता भुसंपादित करुन, उर्वरित पुनर्विकासाचे काम पुर्ण करणे.

ज्या जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासासाठी मंडळाने मालक / विकासकास ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे व मालक / विकासकांनी पुनर्विकास प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहे व भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागेपोटी भाडे देणे सुध्दा बंद केले आहे, अशा एकूण ९१ प्रकरणांमध्ये म्हाड कायद्यातील समाविष्ट नविन कलम ९१अ मधील तरतुदीनुसार मालक / विकासकांना नोटीस बजावून रखडलेल्या प्रकल्पाचे काम १५ दिवसांच्या आत सुरु करावे तसेच भाडेकरु / रहिवाश्यांचे थकीत भाडे १५ दिवसांच्या आत अदा करण्यासाठी कळविण्यात आले होते.

मंडळाने ज्या ९१ प्रकरणांमध्ये मालक / विकासकांना नविन कलम ९१अ अंतर्गत नोटीस बजाविल्या होत्या. त्यामध्ये कोणती कारवाई झाली याबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे सादर.

अ.क्र.	तपशील	प्रकरणांचा संख्या
१.	१. ना -हरकत प्रमाणपत्र रद्द केलेली प्रकरणे अ) शासनाने भुसंपानास मान्यता दिलेली प्रकल्पे ब) शासनाकडे भुसंपादनाची मंजूरी प्राप्त होणेसाठी पाठविलेली प्रकल्पे क) भुसंपादनासाठी शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्तावित प्रकरणे ड) जुन्या इमारती जागेवर उभ्या (७९-ए नोटिस / दुरुस्ती काम प्रगतीपथावर)	१० ०७ ०७ ०५ एकूण २९
२.	९१अ नोटीस रद्द / ६ महिने स्थगिती / काम सुरु झालेली प्रकरणे	५१
३.	सुनावणीसाठी प्रस्तावित	०८
४.	न्यायलयीन प्रकरणे	०३
	एकूण	९१

ज्या प्रकरणांमध्ये शासन गृहनिर्माण विभागाने भुसंपादन करण्यासाठी मान्यता दिली आहे, अशा १० प्रकरणांमध्ये विशेष भुसंपादन अधिकारी, म्हाडा यांच्यातर्फे भुसंपादनाची कार्यवाही सुरु असून, ०५ प्रकरणांमध्ये भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून, मालकास दयावयाचा मोबदला निश्चित करुन भुखंडाचा ताबा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शासन गृहनिर्माण विभागाने म्हाड अधिनियमात सुधारणा करुन कलम ९१अ अंतर्भुत केला आहे. या नविन कलमान्वये अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प भुसंपादित करुन म्हाडातर्फे पुर्ण करण्याची तरतुद केली आहे. त्यानुसार म्हाडातर्फे ज्या मालक / विकासकांनी प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहेत, त्यांना वर नमुद केल्याप्रमाणे नविन कलम ९१अ अंतर्गत नोटीस बजावून, भूसंपादनाची कार्यवाही सुरु केली आहे. अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प भुसंपादित केल्यानंतर, म्हाडातर्फे पुर्ण करण्यात येतील. शासन गृहनिर्माण विभागाने दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे कलम ९१अ अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार दोषी मालक / विकासकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांची फसवणुक केल्याबद्दल संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रकरणनिहाय गुणवत्ता तपासुन रितसर गुन्हा नॉदविण्याची तरतुद आहे.तसेच दोषी मालक / विकासकांना काळया यादीत टाकून त्यांना मंडळातर्फे अन्य कोणत्याही पुनर्विकास योजनेकरीता परवानगी न देण्याची तरतुद आहे. मंडळातर्फे प्रकरणनिहाय गुणवत्ता तपासुन दोषी मालक / विकासकांविरुध्द कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबई शहर तसेच उपनगरामधील भाडेतत्वावरील इमारतींच्या / चाळींच्या पुनर्विकासासाठी शासन नगर विकास विभागाने उपाययोजना केली असून, मालक व भाडेकरु / रहिवाश्यांच्या सहकार्याने पुनर्विकास योजना राबविण्याचे काम सुरु आहे. शासन नगर विकास विभागाने विकास नियंत्रण नियमावली ३३(७), ३३(९) व ३३(२४) मध्ये वेळोवेळी सुधारणा करुन वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

वर नमुद वस्तुस्थिती पाहता, मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे अपघात टाळण्यासाठी व त्यांचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी उपाययोजना केल्या आहेत व करीत आहेत.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०४५८.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पावसाळी.अधि/ विधानसभा ता.प्र.४०४५८/4347/दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 25 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०४५८
म्हाडासाठी सन २००५ पासून अध्यक्ष आणि दुरुस्ती मंडळासाठी सन २००९ पासून परिपूर्ण मंडळच नसल्याबाबत...
- **श्री. नारायण कुचे (बदनापूर)**

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.६१/दुवपु-१, दि.१८.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०४५८ ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वास,

(प्रविलिद शभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०४५८</u>
म्हाडासाठी सन २००५ पासून अध्यक्ष आणि दुरुस्ती मंडळासाठी सन २००९ पासून परिपूर्ण मंडळच नसल्याबाबत...
- श्री. नारायण कुचे (बदनापूर)

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	गृहनिर्माणच्या बाबतीत कायद्याप्रमाणे म्हाडाही संपूर्ण राज्यासाठी आहे आणि मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मुंबई शहरासाठी आहे, हे खरे आहे काय.	होय हे खरे आहे. म्हाड अधिनियम १९७६, प्रकरण ८ मधील तरतुदींनुसार मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरूस्ती व पुनर्रचना करणे हि बाब मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत येते.
२.	असल्यास म्हाडासाठी सन २००५ पासून अध्यक्षच नाही आणि दुरुस्ती मंडळासाठी सन २००९ पासून परिपूर्ण मंडळच नसल्याची बाब उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाशाच्या सुरक्षिततेसाठी नेमलेल्या समितीने काढलेल्या निष्कर्षामधून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.	हे अंशत: खरे आहे. सन २००५ पासुन, फक्त दि.१२.०९.२०१८ ते दि.३१.०१.२०२० हा काळ वगळता, अध्यक्षांचे पद हे रिक्त आहे. तसेच सन २००९ पासुन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी परिपूर्ण मंडळ शासनातर्फे स्थापन करण्यात आलेले नाही.
३.	असल्यास, उक्त नियुक्त्या लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे का,	म्हाडा अधिनियम १९७६, प्रकरण २ मधील तरतुदीनुसार म्हाडासाठी अध्यक्ष नेमणे तसेच इतर मंडळांसाठी सभापती व सदस्य नेमणे हि बाब शासन गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारीत येते.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	सदर बाब हि मंडळाच्या अखत्यारीत येत नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

13/c

विषय: <u>विधानसभा तारांकित प्रश्न क्र.४०४५८</u>
म्हाडासाठी सन २००५ पासून अध्यक्ष आणि दुरुस्ती मंडळासाठी सन २००९ पासून परिपूर्ण मंडळच नसल्याबाबत...
- श्री. नारायण कुचे (बदनापूर)

पुरक टिप्पणी:

म्हाड अधिनियम १९७६, प्रकरण ८ मधील तरतुदींनुसार मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरूस्ती व पुनर्रचना करणे हि बाब मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत येते.

सन २००५ पासुन, फक्त दि.१२.०९.२०१८ ते दि.३१.०१.२०२० हा काळ वगळता, अध्यक्षांचे पद हे रिक्त आहे. तसेच सन २००९ पासुन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासाठी परिपूर्ण मंडळ शासनातर्फे स्थापन करण्यात आलेले नाही.

म्हाडा अधिनियम १९७६, प्रकरण २ मधील तरतुदीनुसार म्हाडासाठी अध्यक्ष नेमणे तसेच इतर मंडळांसाठी सभापती व सदस्य नेमणे हि बाब शासन गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारीत येते.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा तारांकित प्रश्न क्र.~~३३३६५~~ ३२८९५

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पाव.अधि/ विधानसभा अता.प्र.३३३६५/ /दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, 4343
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 25 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३२८९५.
मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) जुन्या व धोकादायक इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत...
- **मा.सर्वश्री. जितेंद्र आव्हाड व इतर विधानसभा सदस्य.**

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.६३/दुवपु-१, दि.१८.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३२८९५** चे भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वास,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३२८९५.

मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) जुन्या व धोकादायक इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत...

- मा.सर्वश्री. जितेंद्र आव्हाड व इतर विधानसभा सदस्य.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) जुन्या व धोकादायक पागडी इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दि. २४ एप्रिल, २०२६ रोजी वा दरम्यान केलेली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	होय.
२	असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींध्ये वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसंदर्भात उपाययोजना करण्यासाठी आतापर्यंत कोणता पाठपुरवठा केला वा करण्यात येत आहे.	• सदयस्थितीत अंदाजे १२५५२ उपकर प्राप्त इमारती अस्तित्वात असून, त्यापैकी बहुतांश इमारतींची आयुमर्यादा संपुष्टात आली असून, काही इमारती दुरुस्तीपलिकडे आहे. मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारती या खाजगी मालकींच्या असून, सन १९४० पूर्वीपासुन ते सन १९६९ दरम्यान बांधलेल्या असून, त्यापैकी काही उपकरप्राप्त इमारती वयोमानाने जीर्ण झालेल्या आहेत. • म्हाड अधिनियम १९७६ अंतर्गत तरतुदीनुसार या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्रचनेची जबाबदारी शासनाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर सोपविलेली आहे. • मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी दरवर्षी सरासरी खालीलप्रमाणे निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. अ) रहिवाश्यांकडून वसूली केला जाणारा उपकर - रूपये ४०.०० कोटी. ब) राज्य शासनाचे अंशदान(वसूली झालेल्याउपकराइतकेच -रूपये ४०.००कोटी. क) मुंबई महानगरपालिकेचे अंशदान - रूपये १०.०० कोटी. ड) प्राधिकरणाचे अंशदान - रूपये १०.०० कोटी. --- एकूण - रूपये १००.०० कोटी. • दुरुस्ती उपकराची वसुली ही दि.१४.०५.१९९८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या रुपये ७५०/- प्रति चौ.मी. दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेनुसार करण्यात येते. रुपये ४०००/- प्रति चौ.मी. मर्यादेनुसार दुरुस्ती उपकरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. दुरुस्ती उपकरात वाढ करण्याबाबत शासनास पत्र क्र. मुअ/निकाअ/न.क्र. GEN/१८३९ /दुव पु-२०२६ दिनांक १२/०३/२०२६ अन्वये कळविण्यांत आले आहे. दुरुस्ती उपकरापोटी कोणताही अतिरीक्त निधी मंडळास प्राप्त होत नाही. दुरुस्ती उपकराची वसुली ही रुपये ४०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे केल्यास दुरुस्ती उपकरापोटी होणाऱ्या वसुली मध्ये वाढ होऊन राज्य शासनाच्या अनुदानातही वाढ होईल व पर्यायाने मंडळास अतिरीक्त निधी उपलब्ध होऊ शकतो. • मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचनेकरीता दयावयाच्या अनुदानात रु. १०० कोटी वरून रु. २०० कोटी इतकी वाढ करणेबाबत शासनास पत्र क्र. मुलेअ/दु व पु/१७१/२०२६ दिनांक ०६/०३/२०२६ अन्वये विनंती करण्यांत आली आहे. • शासन दरवर्षी उपकर वसुलीच्या अनुषंगाने अंदाजे रु. ३८.०० कोटी उपकर व रु. ३८.०० कोटी अंशदान अशी एकूण रु. ७६.०० कोटी रकमेची खर्चासाठी तरतूद करते. परंतु उपकरप्राप्त इमारती जुन्या व जीर्ण

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
		अवस्थेत असल्याने, वित्तहानी व जिवतहानी टाळण्याच्या दृष्टीने प्राधान्यक्रम ठरवून संरचनात्मक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतात. त्यामुळे दुरुस्ती खर्चात वाढ होवून वर्षापोटी रु. २०० ते ३०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद म्हाडा प्राधिकरणाकडून मंजूर करण्यात येते. परिणामी, प्राप्त निधी व खर्च यात तफावत असल्याने, उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्तीची देयके वर्षानुवर्ष प्रलंबित राहत आहेत. • वास्तव निधीची कमतरता भागविण्यासाठी प्राधिकरण तराव क्र. ७००० दिनांक २६/०८/२०२१ पारित करण्यात आला आहे. उपरोक्त ठरावान्वये म्हाडा कायदा १९७६ मधील कलम ९७(३) अंतर्गत प्राधिकरणाने स्वनिधीतुन रुपये १०० कोटी दुरुस्तीसाठी उपलब्ध करुन दयावा, तसेच उर्वरित खर्चाकरीता महाराष्ट्र निवारा निधीतुन निधी वितरीत व्हावा या बाबत शासनास पत्र क्र. मुलेअ/दु व पु/८४४/२०२३ दिनांक २७/०३/२०२३ नुसार विनंती करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे. • मा.लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार, मंजुर बांधकाम तरतुदी व्यतिरीक्त उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी लागणारा अतिरीक्त निधी रुपये २६५० कोटी, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी रुपये १५० कोटी, पुनर्रचित इमारतींच्या दुरुस्तीसाठी रुपये १५० कोटी व संक्रमण शिबीराच्या दुरुस्तीसाठी रुपये ५० कोटी याप्रमाणे एकूण रुपये ३००० कोटी निधी मंडळास लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास मंडळाने पत्र क्र. ´Öã†/×®ÖÜúÖ†/®Ö.Ü׿.GEN/९१३३/¤ãü व पु-२०२३ दिनांक २०/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावातील मागणीनुसार रु. १५० कोटी निधी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/अनौ.सं.क्र.३४/प्र.क्र.१२२/गनिधो-२ दि. २९/०८/२०२४ अन्वये पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीकरीता उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर इमारतींची दुरुस्ती सध्या चालू आहे. • उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक असणा-या निधीची कमतरता भागविण्यासाठी महाराष्ट्र निवारा निधीतून रु. १२५ कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव शासनास पत्र क्र. मुलेअ/ दु व पु/ निधी/१५२१ /२०२४ दिनांक २०/०८/२०२४ अन्वये पाठविण्यात आला आहे. • म्हाडा प्राधिकरणाकडून दरवर्षी अग्रिम उचल घेवून काही अंशी प्रलंबित देयकांची अदायगी करण्यात येते. प्राधिकरणाकडून उचल घेतलेल्या अग्रिम रक्कम रु. १५७.४३ कोटी रकमेची प्रतिपूर्ती महाराष्ट्र निवारा निधीतून करण्याबाबत प्रस्ताव पत्र क्र. मुलेअ/दुवपु/निधी/१९२/२०२६ दिनांक १७/०३/२०२६ अन्वये शासनास मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. • उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्तीची प्रचलित प्रमाणित मर्यादा रु. ४०००/- प्रती चौ मी वरुन रु. ५०००/- प्रती चौ मी पर्यंत वाढविण्यात यावी असा प्रस्ताव पत्र क्र. मुअ/निकाअ/न.क्र. GEN/१८३९ /दुव पु-२०२६ दिनांक १२/०३/२०२६ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.
३	नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	प्रश्न उदभवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्र.३२८९५.

मुंबईतील उपकरप्राप्त (सेस) जुन्या व धोकादायक इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत...

- **मा.सर्वश्री. डॉ. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. मनोज जामसुतकर (भायखळा), श्री. सुनील राउत (विक्रोळी), श्री. आदित्य ठाकरे (वरळी) विधानसभा सदस्य.**

पुरक टिप्पणी:

- सदयस्थितीत अंदाजे १२५५२ उपकर प्राप्त इमारती अस्तित्वात असून, त्यापैकी बहुतांश इमारतींची आयुमर्यादा संपुष्टात आली असून, काही इमारती दुरुस्तीपलिकडे आहे. मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारती या खाजगी मालकीच्या असून, सन १९४० पूर्वीपासुन ते सन १९६९ दरम्यान बांधलेल्या असून, त्यापैकी काही उपकरप्राप्त इमारती बयोमानाने जीर्ण झालेल्या आहेत.

- म्हाड अधिनियम १९७६ अंतर्गत तरतुदीनुसार या इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्रचनेची जबाबदारी शासनाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर सोपविलेली आहे.

- मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी दरवर्षी सरासरी खालीलप्रमाणे निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे.

अ) रहिवाश्यांकडून वसूली केला जाणारा उपकर	-	रूपये ४०.०० कोटी.
ब) राज्य शासनाचे अंशदान(वसूली झालेल्याउपकराइतकेच	-	रूपये ४०.००कोटी.
क) मुंबई महानगरपालिकेचे अंशदान	-	रूपये १०.०० कोटी.
ड) प्राधिकरणाचे अंशदान	-	रूपये १०.०० कोटी.
एकूण	-	रूपये १००.०० कोटी.

- दुरुस्ती उपकराची वसुली ही दि.१४.०५.१९९८ पर्यंत अस्तित्वात असलेल्या रुपये ७५०/- प्रति चौ.मी. दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेनुसार करण्यात येते. रुपये ४०००/- प्रति चौ.मी. मर्यादेनुसार दुरुस्ती उपकरामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. दुरुस्ती उपकरात वाढ करण्याबाबत शासनास पत्र क्र. मुअ/निकाअ/न.क्र. GEN/१८३९ /दुव पु-२०२६ दिनांक १२/०३/२०२६ अन्वये कळविण्यांत आले आहे. दुरुस्ती उपकरापोटी कोणताही अतिरीक्त निधी मंडळास प्राप्त होत नाही. दुरुस्ती उपकराची वसुली ही रुपये ४०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे केल्यास दुरुस्ती उपकरापोटी होणाऱ्या वसुली मध्ये वाढ होऊन राज्य शासनाच्या अनुदानातही वाढ होईल व पर्यायाने मंडळास अतिरीक्त निधी उपलब्ध होऊ शकतो.

- मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचनेकरीता दयावयाच्या अनुदानात रु. १०० कोटी वरून रु. २०० कोटी इतकी वाढ करणेबाबत शासनास पत्र क्र. मुलेअ/दु व पु/१७१/२०२६ दिनांक ०६/०३/२०२६ अन्वये विनंती करण्यांत आली आहे.

3.4 Preference under the Scheme will be given to Widows, single women, Persons with Disabilities, Senior Citizens, Transgenders, persons belonging to Scheduled Castes/ Scheduled Tribes, Minorities and other weaker and vulnerable sections of the society. Special focus will be given to Safai Karmi, Street Vendors identified under PMSVANidhi Scheme and different artisans under Pradhan Mantri-Vishwakarma Scheme, Anganwadi workers, building and other construction workers, residents of slums/chawls and other groups identified during operation of PMAY-U 2.0.

3.5 It would also be ensured that if a pucca house has been provided to the parents of any eligible beneficiary under the previous housing schemes then, he/she will be considered only after other eligible families/beneficiaries whose parents have not availed any benefit under the previous housing schemes are included in the list of beneficiaries.

3.6 The houses sanctioned under PMAY-U which got curtailed by Central Sanctioning and Monitoring Committee (CSMC) after 31.12.2023 due to any reason on the recommendation of States/UTs, shall not be sanctioned in PMAY-U 2.0 to those beneficiaries.

3.7 The beneficiaries may avail benefit in PMAY-G or PMAY-U 2.0 as per their jurisdiction. The MIS linkage between Department of Rural Development for PMAY-G and MoHUA for PMAY-U 2.0 would be done to avoid duplication of beneficiaries. The final list of beneficiaries may be checked and verified by States/UTs/ULBs before sending to the CSMC for sanctioning.

3.8 All eligible beneficiaries (including family members) should have an Aadhaar/ Aadhaar Virtual ID integrated with the details of beneficiaries. In case, any eligible beneficiary does not have an Aadhaar card/Aadhaar Virtual ID, States/UTs should ensure that Aadhaar/ Aadhaar Virtual ID enrolment of such beneficiary is done on priority.

"सर्वांसाठी घरे" संकल्पनेवर आधारित "प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) २.० राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांक: प्रआयो-२०२४/प्र. क्र.८७/ गृनिधो-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

वाचा:-

१) केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने दिनांक १७.०९.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० च्या मार्गदर्शक सूचना
२) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना. दिनांक११/०६/२०१८
३) शासन शुध्दीपत्रक क्रमांकः प्रआयो/२०१७/प्र.क्र.१२/गृनिधो-२/शिकाना, दिनांक २६/११/२०१८

प्रस्तावना:-

माननीय पंतप्रधान महोदयांच्या "सर्वांसाठी घरे" या संकल्पनेच्या अंतर्गत केंद्र पुरस्कृत "प्रधानमंत्री आवास योजना" सुरु करण्यात आली आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी माहे डिसेंबर, २०१५ पासून करण्यात आली आहे. सदर योजनेची मुदत दिनांक ३१.१२.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे.

मात्र, अजूनही देशात परवडणाऱ्या घरांची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनाने दिनांक ०१.०९.२०२४ पासून "प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०" ची देशात अंमलबजावणी करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. ज्याअंतर्गत एक कोटी शहरी गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच, भाडे तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यात येणार आहे. केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या "प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०" च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजना राज्यात राबविण्याचे प्रस्तावित होते.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० च्या मार्गदर्शक सूचनेनुसार, सदर योजना दिनांक १.०९.२०२४ पासून ५ वर्षाकरिता राज्यात राबविण्यात येणार आहे. तसेच, सदर मार्गदर्शक सूचनेनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांचे प्राथमिक सर्वेक्षण करून त्यांची स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय यादी अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांच्यामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचेनानुसार व

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० संपूर्ण राज्यभरात लागू करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्य शासनाने विवक्षितपणे नमूद केलेली बाब वगळता, केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची या आदेशाच्या दिनांकापासून राज्यात अंमलबजावणी करण्यास यान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० या योजने अंतर्गत केंद्र शासनाने दिनांक १७.०९.२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचना pmay-urban.gov.in ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असून अंमलबजावणी यंत्रणांनी त्याचे पालन करुन, तसेच, या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर योजना त्यांच्या कार्यक्षेत्रात राबवावी.

२. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत:-

१) "सर्वांसाठी घरे" ह्या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी सदर योजनेंतर्गत सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान अनुज्ञेय राहील.

२) सदर योजनेंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी (EWS) शौचालय व अन्य पायाभूत नागरी सुविधांसह ३० चौ.मी ते ४५ चौ.मी. पर्यंतची घरे बांधण्यात येतील.

३) सदर योजना खालील चार घटकांद्वारे कार्यान्वित केली जाईल:

१. वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधकाम (Beneficiary Led Construction) (BLC)
२. भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (Affordable Housing in Partnership) (AHP)
३. भाडे तत्वावर परवडणारी घरे (Affordable Rental Housing) (ARH)
४. व्याज अनुदान योजना (Interest Subsidy Scheme) (ISS)

४) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची अंमलबजावणी कार्यरत असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.० प्रमाणेच केंद्रीय पुरस्कृत योजना (Centrally Sponsored Scheme) म्हणून केली जाईल, ज्यामधील व्याज अनुदान योजना (Interest Subsidy Scheme) हा घटक राज्य शासनाशी संबंधित नसून केंद्र शासन व बँकांशी संबंधित राहील.

५) AHP प्रकल्पांतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील (EWS) लाभार्थ्यांसाठी किमान २५% घरकुले असतील. तसेच, AHP प्रकल्पामध्ये अत्यल्प उत्पन्न गटांच्या घरकुलांची किमान संख्या १०० इतकी राहील.

पृष्ठ २३ पैकी २

६) या योजनेतंर्गत प्रकल्पांमध्ये पाणी, स्वच्छता, सांडपाणी, रस्ते, वीज इत्यादी मूलभूत नागरी पायाभूत सुविधा असाव्यात. BLC आणि ISS घटकांतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांकरिता आवश्यक मुलभूत नागरी सुविधा राहतील, याची शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी योग्य ती खातरजमा करावी.

७) AHP आणि ARH प्रकल्पांच्या तपशीलवार प्रकल्प अहवालात (डीपीआर) खालील गोष्टींचा समावेश अत्यावश्यक आहे:

- अपंग व्यक्ती (दिव्यांगजन) साठी अपंग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ नुसार, प्रवेशयोग्यता सुनिश्चित करण्यासाठी रॅम्प आणि इतर सुविधांची आवश्यक तरतूद करणे.
- AHP प्रकल्पांच्या जागेवर आवश्यक तेथे आंगणवाड्या बांधणे.
- पावसाचे पाणी साठवण्याची (Rain Water Harvesting System) तरतूद करणे.
- सौर ऊर्जा प्रणालीची तरतूद करणे.
- प्रकल्पाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करणे.

८) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) १.० अंतर्गत मंजूर केलेल्या घरकुलांमध्ये, राज्य शासनाच्या शिफारशीनुसार केंद्रीय मंजुरी आणि देखरेख समितीने (CSMC) दिनांक ३१.१२.२०२३ नंतर कोणत्याही कारणास्तव कपात (Curtailed) केली असल्यास, सदर घरकुलांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत मान्यता दिली जाणार नाही.

३. पात्र लाभार्थी:-

१) लाभार्थी कुटुंबामध्ये, पती-पत्नी व अविवाहित मुले/ मुली (Children) (वय वर्षे १८ खालील मुले/ मुली) यांचा समावेश असेल.

२) या योजनेंतर्गत अनुदान/ सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता शहरी भागात राहणाऱ्या EWS/LIG/MIG कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या नावावर देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर (All Weather House) नसावे.

३) लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

४) योजनेंतर्गत बांधण्यात येणारी घरे ही कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या सयुंक्त नावावर असतील आणि ज्या कुटुंबात कर्ती महिला सदस्य नसेल त्या कुटुंबात कर्त्या पुरुषांच्या नावे घर राहील

पृष्ठ २३ पैकी ३

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा MHADA

विधानसभा तारांकित प्रश्न
प्राधान्य

जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.

दिनांक. /०७/२०२६.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३८०५

श्री. विकास ठाकरे व इतर मा. विधानसभा सदस्य
नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मुलभूत सुविधांच्या अभावाबाबत.

संदर्भ- १) कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र जा.क्र. विपता-२०२६/ प्र.क. १६१/ गृनिधो-२ दिनांक २२/०६/२०२६.

२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.एमएच/मुअ-२/काअ-२/प्रआयो/प्रा/E-९२९३७०६/२६ दिनांक ०१/०७/२०२६

३) कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र जा.क्र. विसता-२०२६/ प्र.क. १६१/ गृनिधो-२ दिनांक ०८/०७/२०२६

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने संदर्भ पत्र १ बाबत या कार्यालयाचे संदर्भ पत्र २ नुसार आवश्यक माहिती सादर करण्यात आली होती.

आता संदर्भ पत्र क्र. ३ सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रानुसार PMAY dashboard वर उपलब्ध असलेली माहिती जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. तथा अभियान संचालक /प्र.आ.यो. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

मुख्य अभियंता-२/प्रा. तथा
राज्य स्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: **मुख्य अभियंता-१/प्राधिकरण** यांना माहितीकरीता व पुढील योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत: **कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२**, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांना माहितीसाठी.

विवरणपत्र -प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

अ.क्र.	घरकुलांची माहिती	मंजूर घरकुले	पूर्ण झालेली घरकुले	सुरु झालेली घरकुले	अद्याप सुरु न झालेली घरकुले	संलग्न लाभार्थी	वितरीत निधी (रुपये लाख)							
							पहिला हप्ता		दुसरा हप्ता		तिसरा हप्ता		एकूण	
							केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
1	2	3	4	5	6 = 3-5	7	8	9	10	11	12	13	14	15
1	राज्य	AHP - 183753	96345	178231	5522	115506	106979.06	70945.85	63764.82	42509.52	13999.44	9332.75	184743.32	122788.12
		BLC - 232856	158680	191628	41028	229761	-						281051	205599
		ISSR - 1215	0	231	984	426	0	0	0	0	0	0	0	0
		Total - 417824	**255025**	**370290**	**47534**	**345693**	-						**465794.32**	**328387.12**
2	नागपूर जिल्हा	AHP - 16185	7550	15863	322	9467	11752.8	7835	5134.06	3422.68	603.44	402.272	17490.3	11659.952
		BLC - 23851	17170	20199	3652	23764	-						29056.55	22312.7
		Total - 40036	**24720**	**36062**	**3974**	**33231**	-						**46546.85**	**33972.652**
3	कामठी नगर परिषद	AHP - 4535 BLC - 15495 **Total - 20030**	AHP - 4535 BLC - 11455 **Total - 15990**	AHP - 4535 BLC - 13667 **Total - 18202**	AHP - 0 BLC - 1828 **Total - 1828**	AHP - 4008 BLC - 15482 **Total - 19490**	AHP - 2607 BLC - 8134.2 **Total - 10741.2**	AHP - 1738 BLC - 5972.4 **Total - 7710.4**	AHP - 2279.14 BLC - 7504.8 **Total - 9783.94**	AHP - 1519.43 BLC - 5915.2 **Total - 7434.63**	AHP - 46.368 BLC - 3010.5 **Total - 3056.868**	AHP - 30.912 BLC - 2909 **Total - 2939.912**	AHP - 4932.51 BLC - 18649.5 **Total - 23582.01**	AHP - 3288.34 BLC - 14796.6 **Total - 18084.94**
4	वाठोडा	264	264	264	0	251	158.4	105.6	158.4	105.6	0.894	0.596	317.694	211.796
5	तयोडी (खुर्द) खसरा क्र.63	2374	2374	2374	0	2243	1424.4	949.6	1189.674	793.116	0	0	2614.074	1742.716
6	तयोडी (खुर्द) खसरा क्र.62	942	942	942	0	857	565.2	376.8	472.0674	314.7116	0	0	1037.2674	691.5116
7	पांजरी	765	765	765	0	547	459	306	459	306	45.474	30.316	963.474	642.316
8	शिलनास	190	190	190	0	110	0	0	0	0	0	0	0	0

Note: PMAY(U) प्रकल्पांची प्रत्यक्ष स्थिती केंद्रीय डॅशबोर्डनुसार आहे, तर BLC प्रकल्पांची स्थिती केंद्रीय डॅशबोर्डवरील जिओ-टॅगिंगनुसार आहे.

नागपूर जिल्हातील BLC प्रकल्पांची आर्थिक स्थिती ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (ULBs) गुगल-शीटमध्ये प्राप्त झालेल्या माहितीनुसार आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा

विधानसभा तारांकित प्रश्न
प्राधान्य

जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.
दिनांक. /०६/२०२६.

प्रति,

मा. आयुक्त,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नागपूर

मा. आयुक्त,
नागपूर महानगरपालिका,
नागपूर

विषय- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३८०५
श्री. विकास ठाकरे व इतर मा. विधानसभा सदस्य
नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मुलभूत सुविधांच्या अभावाबाबत.

संदर्भ- सचिव, महाराष्ट्र विधानसभा यांचे पत्र दिनांक २२/०६/२०२६.

महोदय,

विषयांकित विधानसभा तारांकित प्रश्न क्र ३३५०८ मध्ये उल्लेखीत करण्यात आलेला विषय आपल्या कार्यालयाशी संबंधित असल्याने पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

तरी, याबाबत आपल्या स्तरावरुन शासनास आवश्यक माहिती तात्काळ सादर करण्याची विनंती आहे. व तसे या कार्यालयास कळविण्यात यावे.

सोबत: वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

For उपमुख्य अभियंता/प्रा.
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांना माहितीकरीता अग्रेषित.
प्रत: कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२ यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीसाठी.

क्रमांक : ५.१
महाराष्ट्र विधानमंडल सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक : २२.०८.२०२५

प्रति,
सचिव
गृहनिर्माण विभाग
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

माननीय अध्यक्षांनी खाली उद्धृत केलेला विधानसभा तारांकित प्रश्न स्वीकृत केला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर ऑनलाईन पध्दतीनेच या सचिवालयास पाठविण्याचा माहिती पुढीलप्रमाणे आहे –

प्रश्नाचा गट क्रमांक : ५

प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक : १०-०७-२०२५

प्रश्नाचे उत्तर केवळ ऑनलाईन पध्दतीनेच या सचिवालयास पाठविण्याचा अंतिम दिनांक : ०६-०७-२०२५

विभागाकडून प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा अंतिम दिनांक : २५-०६-२०२५

उत्तर माहितीसाठी सादर अग्रेषित –

(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय उप मुख्यमंत्री
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला,

सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा

नागपूर, वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत –

*३३८५ श्री. विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री. अमित पंटल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री. विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री. संजय मेश्राम (चंद्रपूर), श्री. रामदास मसराम (आरमोरी)

सन्माननीय उप मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर, वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत उभारण्यात आलेल्या वसाहतीत सुमारे ३२०० कुटुंबांचे वास्तव्य असतानाही तेथे रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य केंद्र व मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीत योजनेचा लाभ घेणाऱ्या नागरिकांना अपुऱ्या प्रमाणात पिण्याचे पाणी, शौचालय सुविधा, रस्ते, पथदिवे इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव, नाल्यांची दुरवस्था व सांडपाणी व्यवस्थेतील गंभीर त्रुटी यामुळे गंभीर आजारांचा प्रादुर्भाव होत असून अनेक नागरिकांचे बळी गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसाहतीत योजनेचे लाभार्थी निवडताना बोगस कागदपत्रे, खोटे उत्पन्न दाखले व अपात्र व्यक्तींना लाभ दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा गंभीर प्रकरणांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, अहवालातील शिफारशी काय आहेत व त्यानुसार शासनाने आजपर्यंत काय कार्यवाही केली आहे, तपशीलवार माहिती द्यावी,

(५) वसाहतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तसेच बोगस लाभार्थी निवडीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तपशीलवार माहिती द्यावी,

(६) वसाहतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तसेच बोगस लाभार्थी निवडीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तपशीलवार माहिती द्यावी,

(७) वसाहतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तसेच बोगस लाभार्थी निवडीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तपशीलवार माहिती द्यावी,

(८) वसाहतीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तसेच बोगस लाभार्थी निवडीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, तसेच संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे, तपशीलवार माहिती द्यावी,

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा

विधानसभा तारांकित प्रश्न जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.

प्राधान्य दिनांक. /०६/२०२६.

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३८०५

श्री. विकास ठाकरे व इतर मा. विधानसभा सदस्य
नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मुलभूत सुविधांच्या अभावाबाबत.

संदर्भ: १) कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र जा.क्र. विपता-२०२६/ प्र.क. १६१/गृनिधो-२ दिनांक २२/०६/२०२६.

२) सह आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे पत्र जा.क्र. प्रकल्प विभाग/ (नामप्रविप्रा)/१३६४ दिनांक २५/०६/२०२६.

महोदय,

सदर प्रश्नात उपस्थित केलेल्या बाबी या नागपूर महानगर पदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्याशी संबंधित असल्याने संदर्भ क्र. २ नुसार त्याबाबत आवश्यक माहिती शासनास सादर करण्यात आली आहे. त्यासंदर्भात सुकाणू अभिकरण (म्हाडा) यांचे अभिप्राय व पुरक टिप्पणी सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. तथा अभियान संचालक /प्र.आ.यो. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

मुख्य अभियंता-२/प्रा. तथा
राज्य स्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: **मुख्य अभियंता-१/प्राधिकरण** यांना माहितीकरीता व पुढील योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत: **कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२**, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांना माहितीसाठी.

विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३८०५

श्री. विकास ठाकरे व इतर मा. विधानसभा सदस्य

नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मुलभूत सुविधांच्या अभावाबाबत.

अ. क्र.	प्रश्नाचा तपशील	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे उत्तर	सुकाणू अभिकरण (म्हाडा) चे अभिप्राय
१.	नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत उभारण्यात आलेल्या वसाहतीत सुमारे २३०० कुटुंबाचे वास्तव्य असूनही तेथे रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, आरोग्य केंद्र व मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	हे खरे नाही. • मौजा तरोडी ख.क्र. ६२ व ६३ येथील जागेवर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे एकूण ९४२ + २३७४ = ३३१६ गाळे प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम दिनांक १३.११.२०२१ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे. • सदर योजने मध्ये मंजुर विकास आराखडा नुसार सर्व मुलभुत सोई सुविधा जसे कंपाउंड वॉल, योगा सेंटर, नित्योपयोगी वस्तुंचे दुकाने (Convenience shopping) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्ते पावसाळी पाणी वाहीका, रेन वॉटर हारवेस्टींग, पार्कींग, मिटर रुम, बाहय विद्युतीकरण, सोलर रुफ टॉप, STP, सौर उर्जेवर चालणारी पथ दिवे, इत्यादी बाबींचा समावेश आहे. सर्व मुलभुत सुविधा गाळे धारकांना उक्त योजनेमध्ये उपलब्ध आहे. • सदर मुलभुत सुविधा देखभाल व दुरुस्ती करीता सक्षम प्राधिकरण बिउगाव नगर पंचायतीला दिनांक २४.०९.२०२४ रोजी हस्तांतरीत करण्यात आले आहेत. • सध्यास्थितीत खसरा क्र. ६२ व खसरा क्र. ६३ मौजा	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी सादर केलेले उत्तर ग्राह्य धरण्यात यावे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे AHP घटकात त्यांच्याद्वारे राबविण्यात येणा-या खालील प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त असुन अद्ययावत माहिती खालीलप्रमाणे आहे- १) <u>खसरा क्र. ४३, ४४/२ वाठोडा, नागपूर –</u> या प्रकल्प अहवालातील मुळ ३०८ EWS घरकुलांना मंजूरी आहे. तद्नंतर या प्रकल्प अहवालातील घरकुलांची संख्या २६४ झाली. सर्व २६४ घरकुले पुर्ण झाली असुन सर्व घरकुलांचे Geo-tagging झाले आहे. २६४ घरकुलांपैकी २५१ लाभार्थी संलग्नता देखील झाली आहे. २) <u>६३, तरोडी, वाठोडा, नागपूर</u> या प्रकल्प अहवालातील मुळ मंजूर २३७४ घरकुलांपैकी सर्वच्या सर्व म्हणजेच २३७४ घरकुले पुर्ण असुन सर्व घरकुलांचे Geo-tagging झाले आहे. त्यापैकी २२३९ लाभार्थी संलग्नता देखील झाली आहे.

		तरोडी (खुर्द) येथे गाळे धारकांनी पंजीकृत सोसायटी/ संस्था स्थापन करण्यात आली आहे व दिनांक २६.०५.२०२६ रोजी The Maharashtra Cooperative Society Act १९५० अनुसार योजनेतील देखभाल दुरुस्तीची कामे व विषय सोसायटी मार्फत करण्यासाठी नामप्रविप्रा तर्फे कळविण्यात आलेले असुन देखभाल दुरुस्ती करीता जमा रक्कम संस्थेच्या खात्यात जमा केलेली आहे.	
२.	असल्यास, सदर बाबतीत मोबाईल नेटवर्कचा अभाव, नाल्यांची दुरावस्था व सांडपाणी व्यवसथेतील गंभीर त्रुटी यामुळे नागरीकांना मोठया प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,	• सदर विषय नामप्रविप्राशी संबंधीत नाही. • विषय भारतीय दुरसंचार विभागाशी संबंधीत आहे. • सदर क्षेत्राकरीता नगर पंचायत बिडगाव सक्षम प्राधिकरण आहे.	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी सादर केलेले उत्तर ग्राह्य धरण्यांत यावे.
३.	असल्यास, वसाहत परिसरात अवैध धंद्यांचे प्रमाण वाढले असून अंमली पदार्थ विक्री व असामाजिक घटकांचा वापर वाढल्यामुळे महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,	• सदर विषय नामप्रविप्राशी संबंधीत नाही. • कायदा व सुव्यवस्था विषय पोलीस विभागाशी संबंधीत आहे.	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी सादर केलेले उत्तर ग्राह्य धरण्यात यावे.
४.	असल्यास, संबंधित वसाहतीचे बांधकाम करताना कंत्राटदार व संबंधित यंत्रणांकडून निकृष्ठ दर्जाचे काम झाल्यामुळे इतारतीमध्ये सिपेझ, भेगा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,	• हे खरे नाही. • सदर कामे मानकाप्रमाणे व निविदा मधील सर्व अटी शर्ती प्रमाणे करण्यात आलेली आहे. तसेच सदर कामाचे व्यवस्थापन तांत्रिक निरीक्षण VNIT, Nagpur तर्फे करण्यात आलेले आहे. उक्त VNIT, Nagpur च्या तांत्रिक निरीक्षण अहवालानुसार सर्व कामे गुणवत्तेनुसार व नियमाप्रमाणे झाल्याचे प्रमाणीत करण्यात आलेले आहे.	नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी सादर केलेले उत्तर ग्राह्य धरण्यात यावे.

५.	असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या त्रुटी व भ्रष्टाचाराच्या आरोपांची शासनाने चौकशी केली आहे काय,	लागु नाही	लागु नाही
६.	असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसाहतीतील नागरीकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी व दोषी अधिकारी/ कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	लागु नाही	लागु नाही

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना(शहरी)

पुरक टिप्पणी

विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३८०५

श्री. विकास ठाकरे व इतर मा. विधानसभा सदस्य

नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीतील मुलभूत सुविधांच्या अभावाबाबत.

या प्रश्नाबाबत सह आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्याद्वारे त्यांच्या कार्यालयाचे पत्र जा.क्र. प्रकल्प विभाग/ (नामप्रविप्रा)/१३६४ दिनांक २५/०६/२०२६ रोजी कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्याकडे आवश्यक माहिती सादर करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे AHP घटकात त्यांच्याद्वारे राबविण्यात येणा-या खालील प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त असुन अद्ययावत माहिती खालीलप्रमाणे आहे-

१) **खसरा क्र. ४३, ४४/२ वाठोडा, नागपूर** –
या प्रकल्प अहवालातील मुळ ३०८ EWS घरकुलांना मंजूरी आहे. तद्नंतर या प्रकल्प अहवालातील घरकुलांची संख्या २६४ झाली. सर्व २६४ घरकुले पुर्ण झाली असुन सर्व घरकुलांचे Geo-tagging झाले आहे. २६४ घरकुलांपैकी २५१ लाभार्थी संलग्नता देखील झाली आहे.

२) **६३, तरोडी, वाठोडा, नागपूर**
या प्रकल्प अहवालातील मुळ मंजूर २३७४ घरकुलांपैकी सर्वच्या सर्व म्हणजेच २३७४ घरकुले पुर्ण असुन सर्व घरकुलांचे Geo-tagging झाले आहे. त्यापैकी २२३९ लाभार्थी संलग्नता देखील झाली आहे.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे AHP घटकात त्यांच्याद्वारे राबविण्यात आलेल्या योजनेच्या ठिकाणी मुलभूत सविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेची आहे.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

उपमुख्य कार्यकारी अधिकारी

विधानसभा
पावसाळी अधिवेशन

जा.क्र.उमुकाअ/प्रा./विसताप्र-३३५९३/ /२०२६
दिनांक –

प्रति,
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन,गृहनिर्माण विभाग,
मुख्य इमारत, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.

विषय : विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३५९३.
म्हाडाच्या भाडेतत्वावरील घरांचे धोरण ठरविण्याबाबत.
मा.श्री. राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव)

संदर्भ : नितीन फिरंगे, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक विसता-२०२६ /प्र.क्र.१५४/गृनिधो-२, दिनांक १७ जून २०२६ चे पत्र त्यासोबतचे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे पत्र क्रमांक- /ब-१, दिनांक १७/०६/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरुन विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३५९३ मधील प्रश्नांची भागश: उत्तरे पूरक टिप्पणीसह सोबत पाठविण्यात येत आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

सहपत्र - वरिलप्रमाणे.

01/VII

(अनिल वानखडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण , मुंबई.

विषय : विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३५९३.
म्हाडाच्या भाडेतत्वावरील घरांचे धोरण ठरविण्याबाबत.
मा.श्री. राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव)

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	मुंबईत व ग्रामीण भागात विविध क्षेत्रात काम व व्यवसायानिमित्त येणाऱ्या नागरिकांना म्हाडाच्या माध्यमातून खाजगी घरें भाडेतत्त्वावर घेता यावीत यासाठी नोडल एजन्सी म्हणून म्हाडा पोर्टल तयार करून काम पाहणार असल्याचे दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?	होय, हे खरे आहे. अवर सचिव, गृहनिर्माण विभाग,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.प्रआयो-२०२६/प्र.क्र.२०/गृनिधो-२ दिनांक ३०.०३.२०२६ अन्वये दि.०१.०४.२०२६ रोजी मंत्रालयात विषयांकित प्रकरणी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये भाडेकरार धोरणासंदर्भात म्हाडातर्फे सादरीकरण करण्यात आले.
२	असल्यास , याबाबत शासनाने धोरण तयार करण्याची जबाबदारी म्हाडावर सोपवली असून त्यानुसार म्हाडाने भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणाचा मसुदा तयार करून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ मध्ये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला असून यात त्रुटी असल्यास शासनाने फेरबदल करून निर्णय घेणे अपेक्षित असताना धोरणावर तीन महिने झाले असूनही अद्याप निर्णय घेतला जात नाही असे संबंधितांकडून (म्हाडा) सांगण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?	हे खरे नाही.

३	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	शासनाशी संबंधित असल्याने भाष्य नाही.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागू नाही.

मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

03/VII

(अनिल वानखडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण , मुंबई.

विषय : विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३३५९३.
म्हाडाच्या भाडेतत्वावरील घरांचे धोरण ठरविण्याबाबत.
मा.श्री. राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव)

पुरक टिप्पणी :-

भाडेतत्वावरील घरासंबंधित म्हाडाने सर्व समावेशक अशी भाडेतत्वावरील घरांचे धोरण तयार केले असून सदर धोरण (Rental Housing Policy) हे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, महिला, पर्यटक, आपत्तीग्रस्त व प्रकल्पग्रस्त ,जेष्ठ नागरिक ,उच्च,मध्यम व अल्प उत्पन्न गटातील लोक तसेच वैद्यकीय कारणास्तव इ. लोकांसाठी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी भाडेकरारवर तात्पुरत्या निवासासाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यावर केंद्रित आहे. सदरचे मसुदा धोरण शासनाच्या मान्यतेसाठी दि. ३१/१२/२०२५ रोजी सादर करण्यात आले आहे. सदरच्या धोरणासंबंधी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच महापालिका आयुक्त यांना त्यांच्या अभिप्रायासाठी विनंती केली आहे. सदर धोरणाबाबत सर्व संबंधित विभागांचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. भाडेतत्वावरील घरांच्या धोरणाची अंमलबजावणीकरिता ऑनलाईन पोर्टल तयार करण्यासाठी निविदेद्वारे खासगी संस्थेची नेमणूक ही अंतिम टप्प्यात असून या संदर्भात लवकरच सर्व समावेशक अशी ऑनलाईन प्रणाली तयार करण्यात येईल.

भाडेतत्वावरील घरांचे सर्व कामकाज हे मानवविरहित व सर्वसमावेशक अशा ऑनलाईन प्रणालीद्वारे होणार असून सदर प्रणाली सोबत इतर शासकीय विभाग जसे की, IGR, Police, महापालिका व इतर शासकीय संस्था इत्यादींना जोडण्यात येत असून नागरिकांना सदरची सुविधा घेण्यासाठी केवळ या प्रणालीद्वारे सर्व सेवा पुरविण्यात येतील.

मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

सहपत्र - वरिलप्रमाणे.

(अनिल वानखडे) 03/07
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

कोकण मंडळ

I/23862487/2026

जा.क्र./मु.अ./को.मं/ /२०२६
दिनांक:- 24.07.2026

प्रति,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग, मुख्य इमारत ३ रा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४८८९
"म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत." मा. श्री. जयंत पाटील व इतर,विधानसभा सदस्य

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:- विपता-२०२६/प्र.क्र.१५१/गृनिधो-२, दिनांक १६ जून २०२६.

उपरोक्त विषयावरिल संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

संदर्भाधिन पत्रास अनुसरुन उपस्थित केलेल्या विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४८८९ बाबतचे भागश: उत्तर पुरक टिप्पणीसह सोबत सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/
प्राधिकरण/म्हाडा यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Vishal Prabhakar Rathod
Date: 24-07-2026
08:30:48

(डॉ. विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४८८९
"म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत." मा. श्री. जयंत पाटील व इतर,विधानसभा सदस्य

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:- विपता-२०२६/ प्र.क्र.१५१/गृनिधो-२, दिनांक १६ जून २०२६.

मा.श्री.जयंत पाटील व इतर,विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी टिप्पणी.

पूरक टिप्पणी

सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR), मधील नियम ३.८.२ व ३.८.२ मधील तरतुदीनुसार १० लक्ष अथवा त्यावरील लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकाक्षेत्रामधील ४००० चौ. मी. किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडास संबंधित नियोजन प्राधिकरणामार्फत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र (Commencement Certificate) प्राप्त झाल्यानंतर संबंधित मालक/ विकासक यांचे मार्फत २० टक्के अंतर्गत निर्माण होणा-या परवडणाऱ्या सदनिकांची संख्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास तात्काळ कळविणे आवश्यक आहे. मालक/ विकासक यांचेमार्फत सदनिकांची यादी प्राप्त झाल्यानंतर म्हाडामार्फत/ मंडळामार्फत सोडतीद्वारे लाभार्थ्यांची यादी निश्चित केली जाते. सदर लाभार्थ्यांची यादी संबंधित विकासकास पाठविण्यात येते. सदनिकेच्या वितरण यादी प्राप्त झाल्यानंतर मालक/ विकासकांमार्फत लाभार्थ्यांना प्रचलित वर्षिक दर तक्त्यानुसार बांधकाम खर्च + २५% अतिरिक्त मुल्य या दराने विक्री किंमत निर्धारित करुन सदनिकेचे वितरण करण्यात येते (Construction cost mentioned in ASR applicable of the year of disposal plus २५% additional cost).
ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, वसई-विरार महानगरपालिका व कल्याण-डोंबीवली महानगरपालिका या क्षेत्रातील ४००० चौ. मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावरील ज्या प्रकल्पास परवडणारे घरे २०% योजनेतंर्गत बांधकाम प्रमाणपत्र जारी केले आहे. त्या विकासकांनी उक्त विनिमयामधील तरतुदीचे उल्लंघन केले असल्याबाबत तसेच केवळ आठ विकासकांनी म्हाडाला ८० घरे उपलब्ध करुन दिल्याबाबत कुठलीही माहिती अथवा तक्रार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे अथवा कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

२०% सर्वसमावेशक योजनेतंर्गत मालक/ विकासक यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित महानगर पालिकेकडून प्रकल्पास बांधकाम प्रमाणपत्र जारी करण्यात येते. एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील नियम ३.८.२(ब)(iii) मधील तरतुदीनुसार मालक / विकासक यांनी २०% योजनेतंर्गत संबंधित महानगर पालिकेकडून बांधकाम प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध होणा-या सदनिकांची यादी तात्काळ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना कळविणे बंधनकारक आहे. तथापि, मालक/ विकासकामार्फत सदनिकांची यादी विहित मुदतीत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कोंकण मंडळामार्फत संबंधित महानगर पालिका तसेच मालक/ विकासक यांचेकडे २०% योजनेमध्ये सदनिकांची यादी सादर

करणेबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.संबंधित महानगरपालिका मार्फत २०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत प्रकल्पास मंजुरी देऊन व बांधकाम प्रमाणपत्र जारी करण्यात येऊन सुदधा मालक/ विकासकामार्फत प्रकल्प व प्रकल्पात उपलब्ध सदनिकांची यादीकोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास विहीत मुदतीत प्राप्त होत नसल्यामुळे संबंधित महानगर पालिकेमार्फत मंजूर प्रस्ताव व सदनिकांची संख्या तसेच कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्षरित्या प्राप्त प्रस्ताव व सदनिकांची संख्या यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास येत आहे.

एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील विनिमय ३.८.२ मधील तरतुदींनुसार २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ठाणे, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली महानगरपालिके मार्फत ज्या प्रस्तावांना मंजूरी दिली आहे, त्या प्रस्तावांची संख्या व सदनिकांची संख्या तसेच २०%सर्वसमावेशक योजनेअंतर्गत मालक/ विकासक यांचेमार्फत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्ष प्राप्त प्रस्तावांची संख्या व सदनिकांची संख्या याचा तपशिल खालील तक्त्यात नमूद केला आहे.

अ. क्र.	महानगर पालिका	महानगरपालिकेमार्फत प्राप्त माहितीनुसार एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन विनिमय, २०२०, मधील विनिमय ३.८.२ तरतुदींनुसार २०% सर्वसमावेशक योजनेतील मंजूर प्रस्ताव	महानगरपालिके मार्फत प्राप्त माहितीनुसार २०% सर्वसमावेशक योजनेतील सदनिकांची संख्या	२०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त प्रस्तावांची संख्या	२०% सर्वसमावेशक योजनेंतर्गत कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त सदनिकांची संख्या
१	२	३	४	५	६
१	नवी मुंबई महानगर पालिका	१८	५५२	१२	३७४
२	कल्याण-डोंबिवली महानगर पालिका	६२	२८४२	२६	९९०
३	वसई विरार महानगर पालिका	३४	१७३९	२४	८०५
४	ठाणे महानगर पालिका	८०	४८९८	६७	२८४७
एकूण		१९४	१००३१	१२९	५०१६

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतंर्गत मजूंर झालेल्या प्रस्तावाची यादी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास उपलब्ध करुन देणेबाबत महापालिका आयुक्त यांना ३१/१०/२०२४ व जा.क्र. ०२८३ दि. ०९/१२/२०२५ अन्वये कळविण्यात

आले आहे. तथापि अद्यापपर्यंत सदर महानगरपालिकेमार्फत कुठलाही शासन स्तरावर प्रतिसाद प्राप्त झाला नाही. सदर प्रकरणी शासन स्तरावर नगररचना विभागाकडे पाठपुरावा केल्यास २०% सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतंर्गत अतिरिक्त घरे प्राप्त होऊन सोडतीद्वारे सर्वसामान्यांना वितरीत करता येतील.

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासप्राप्त झालेल्या ५०१६ सदनिकांपैकी ४१९९ सदनिकांची २०२१ ते २०२५ या कालावधीत संगणकीय प्रणालीमार्फत सोडत काढण्यात आली आहे. सदर सदनिकांचे वितरण हे ऑनलाईन सोडतीव्दारे मानवी हस्तक्षेप विरहीत व पारदर्शक पणे करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सोडत व सोडतीपश्चात करण्यात येणारी प्रक्रिया ही INTEGRATED HOUSING LOTTERY MANAGEMENT SYSTEM २.० आणि BOOK MY HOME PORTAL या संगणकीय प्रणालीव्दारे करण्यात येते. सदर प्रक्रिया हि कालबद्ध व वापरकर्त्यास हाताळण्यास सुलभआहे.

संबंधित महानगरपालिका मार्फत मंजूर प्रस्ताव व सदनिकांची संख्या तसेच कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्रत्यक्ष प्राप्त प्रस्ताव सदनिकांच्या संख्येतील तफावतीच्या अनुषंगाने संबंधित महानगरपालिका यांचेकडून प्रकल्पांबाबत अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्यात येत आहे व प्रकल्पाशी संबंधित मालक/ विकासक यांच्याकडून २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत मंजूर प्रस्तावातील सदनिका प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने विकासकाच्या विक्री घटकातील सदनिकांस भोगवटा प्रमाणपत्र न देण्याबाबत संबंधित महानगरपालिकेस कळविणे, तसेच महारेरा कडे संबंधित प्रकरणी तक्रार दाखल करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात संबंधित महानगरपालिके समवेत योग्य तो समन्वय ठेवण्यात येईल, जेणेकरुन २०% सर्वसमावेशक योजनेअंतर्गत सदनिका मंडळास प्राप्त होतील व सदर सदनिका सोडतीव्दारे अत्यल्प, अल्प उत्पन्न गटातील अर्जदारांना वितरीत करण्यात येतील.

Digitally signed by
Vishal Prabhakar Rathod
Date: 15-07-2026
14:42:59

(डॉ.विशाल राठोड)
मुख्यअधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय:- विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ३४८८९
"म्हाडाला नियमानुसार घरे देण्यास विकासकांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत."
मा. श्री. जयंत पाटील व इतर,विधानसभा सदस्य

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्रमांक:-विपता-२०२६/ प्र.क्र.१५१/गृनिधो-२, दिनांक १६ जून २०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	शासनाच्या निर्देशनुसार म्हाडाच्या कोकण मंडळांतर्गत चार महानगरपालिका (ठाणे, विरार, नवी मुंबई व कल्याण-डोंबिवली) क्षेत्रात चार हजार चौरस मीटरच्या भूखंडावर उभ्या राहणाऱ्या घरांपैकी २० टक्के घरे सर्व सामान्यांकरिता म्हाडा हाऊसिंग स्टॉकच्या माध्यमातून देणे बंधनकारक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	हे अंशत: खरे आहे.
२	असल्यास, महारेरा प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार, सदर महापालिका क्षेत्रात ८०२ गृहनिर्माण प्रकल्प सुरु असल्याचे व त्यापैकी केवळ आठ जणांनी (विकासक) म्हाडाला घरे देण्याचा प्रस्ताव दिला असल्याचे व उर्वरित विकासकांनी त्याबाबत अद्याप काहीच कळविले नसल्याचे दि. १४ मार्च, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,	हे अंशत: खरे आहे.
३	असल्यास, ज्या विकासकांनी नियम पायदळी तुडवून घरे देणे टाळले असतील तर त्यांचेविरुध्द युडीसीपीआर मधील कायद्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे, तसेच महारेरा प्राधिकरणाची याबाबतची भूमिका काय आहे.	संबंधित महानगरपालिका व शासनाशी संबंधित बाब आहे.
४	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने म्हाडाकडून प्रत्यक्ष प्रकल्पाचे ठिकाणी जाऊन तपासणी करुन याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	शासनाशी संबंधित बाब आहे.
५	नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

Digitally signed by Vishal Pradnyan Rathod
Date: 24-07-2026 08:28:39

(डॉ.विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

छत्रपती संभाजीनगर मंडळ

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा विभागीय घटक)

Chhatrapati Sambhajinagar Housing and Area Development Board

पत्ता : गृहनिर्माण भवन, महावीर स्तंभाजवळ, सी.बी.एस. मार्ग, छत्रपती संभाजीनगर -431001

फोन - 0240-2335061, ई-मेल

जा.क्र.मु.अ./छ.सं.मं./ता.प्र./ /२०२६ दिनांक : २९/०६/२०२६.

प्रति,

मा. नितीन फिरंगे,

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन,

गृहनिर्माण विभाग,मुख्य इमारत,३ रा मजला,

मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२

विषय :- विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र.३६५४२

मराठवाड्यातील विकास कामांची सुमारे ४ हजार कोटींची थकबाकी प्रलंबित असल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे ठप्प असल्याबाबत.

संदर्भ :- श्री.नितीन फिरंगे, कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र : विसता-२०२६/प्र.क्र.१६३/गृनिधो-२, दिनांक २३ जून, २०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने श्री. अमित देशमुख व श्री. रोहित पवार, मा. वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या विधानपरिषद तारांकित प्रश्नांची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर / तपशील
०१.	राज्यातील लहान-मोठ्या कंत्राटदारांनी केलेल्या विकासकामांची अब्जावधी रुपयांची थकबाकी प्रलंबित असून, त्यापैकी केवळ मराठवाड्याची सुमारे ४ हजार कोटी रुपयांची थकबाकी अद्याप मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	१. सदर तारांकित प्रश्न महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे मराठवाडा विभागात राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या संबंधित नाही. २. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे मराठवाडा विभागात राबविण्यात येत असलेल्या गृहनिर्माण योजनेतील पायाभूत सुविधांच्या कामाचे कोणतेही देयक निधी अभावी प्रलंबित नाही.
०२.	असल्यास, महाराष्ट्रातील शासकीय कंत्राटदारांनी राज्य शासनाकडे सुमारे ९६ हजार कोटींची प्रलंबित देयके असल्याच्या व थकीत निधी मिळत नसल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र कंत्राटदार महासंघाच्या नेतृत्वाखाली कंत्राटदारांनी दिनांक ७ एप्रिल, २०२६ पासून 'बेमुदत काम बंद आंदोलन करुनही मंत्र्यांसोबत झालेल्या	विभागाशी संबंधित नाही.

	चर्चेनंतरही कोणतीही ठोस रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,	
०३.	असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची तब्बल ११०० कोटी रुपयांची थकबाकी असताना, मागील आर्थिक वर्षात शासनाने फक्त ५० कोटी रुपये देऊन विभागाची बोळवण केली, ज्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यांची व इमारतींची कामे अर्धवट अवस्थेत आहेत, हे ही खरे काय,	विभागाशी संबंधित नाही.
०४.	असल्यास, शासनाने गेल्या १७ महिन्यांत सादर केलेल्या दोन बजेटमध्ये कंत्राटदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या जुन्या बिलांचा निपटारा करण्यासाठी कोणतीही ठोस आर्थिक तरतूद केलेली नाही, हे ही खरी आहे काय,	विभागाशी संबंधित नाही.
०५.	असल्यास, राज्यातील ३ लाख कंत्राटदारांकडे काम करणाऱ्या लाखो अभियंते, तंत्रज्ञ आणि बांधकाम मजुरांचे उपजीविकेचे साधन हिरावले गेले आहे, या मजुरांची बिकट परिस्थिती पाहता, शासन थकीत बिलांसाठी विशेष पॅकेज किंवा पुरवणी मागण्या मंजूर करणार आहे, हे ही खरे आहे काय,	विभागाशी संबंधित नाही.
०६.	असल्यास, कंत्राटदार संघटना २९ हजार कोटी तर सरकार १८ हजार कोटी रुपयांची थकबाकी सांगत आहे, या आकडेवारीतील विसंगती दूर करण्यासाठी आणि बिलांचे ऑडिट करण्यासाठी कोणतीही उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली आहे काय,	विभागाशी संबंधित नाही.
०७.	असल्यास, बांधकाम विभागाकडील अंतर्गत चौकशा, टेंडरमधील	

	अनागोंदी आणि डीपीसीच्या (DPC) कामांमधील गैरप्रकार यांमुळे विभागाची डागाळलेली प्रतिमा सुधारण्यासाठी आणि नवीन कामांना मंजुरी देण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,	विभागाशी संबंधित नाही.
०८.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने प्रलंबित ४ हजार कोटींपैकी किमान ५० टक्के रक्कम चालू अधिवेशनातच मराठवाड्यासाठी तातडीने वर्ग करण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	विभागाशी संबंधित नाही.

करिता, माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

Digitally signed by
Vaibhav Popatrao Kedare
Date: 29-06-2026
16:36:23

(वैभव केदारे)
मुख्य अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
छत्रपती संभाजीनगर

प्रत : मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

विधानपरिषद

अतारांकित

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

[म्हाडाचा घटक]
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
कक्ष क्र.३४१, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पुर्व], मुंबई -५१.

जा.क्र. का.अ./उ.वि.-३/कु.वि./मुं.मं./ /२०२६
दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषय : विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक २७२२९ मुंबईतील मौजे घाटकोपर, किरोळ येथील भूखंडावर सम्राट गृहनिर्माण संस्था यांची योजना राबविण्याकरीता प्लॉटचे वितरण करण्याबाबत.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६प्र.क्र.१२०/गृनिप, दि.२०.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २७२२९ च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:58:41

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

विषय : विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक २७२२९

मुंबईतील मौजे घाटकोपर, किरोळ येथील भूखंडावर सम्राट गृहनिर्माण संस्था यांची योजना राबविण्याकरीता प्लॉटचे वितरण करण्याबाबत.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६प्र.क्र.१२०/गृनिप, दि.२०.०५.२०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१	मुंबईतील मौजे घाटकोपर, किरोळ येथील प्लॉट नं. २३५, सि.टी.एस. क्र. ५७४० चे निवासी कारणाकरिता आरक्षित भूखंडावर सम्राट गृहनिर्माण संस्था यांची योजना राबविण्याकरिता प्लॉटचे वितरण करण्याबाबत प्रस्ताव गृहनिर्माण संस्था यांच्याकडे मागील १२ वर्षांपूर्वीच सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय?	हो, हे खरे आहे. पंतनगर, घाटकोपर (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील भुखंड क्र.२३५, नगर भुमापन क्र.५७४० हा निवासी वापरासाठीच्या भुखंडाची मागणी सम्राट गृहनिर्माण संस्था यांनी २००९ साली केली होती. तथापी सदर भुखंडावर त्यावेळी मंडळामार्फत गृहनिर्माण योजना विचाराधीन होती. सदर बाब मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी दि.२६/८/२००९ च्या पत्राद्वारे कक्ष अधिकारी/गृहनिर्माण विभाग यांच्या पत्र दि.२२/७/२००९ च्या उत्तरादाखल शासनास कळविण्यात आली होती. मुंबई मंडळाने नियोजित केल्यानुसार सन २०१० साली सदर टर्न की योजनेसाठी ठेकेदार मे. मोतीराम बुधरमल यांना स्विकृती पत्र जारी केले होते व मुंबई महापालिकेस प्रस्तावित इमारतीचे आराखडे मंजुरीकरीता सादर केले होते. दरम्यानच्या काळात सम्राट गृहनिर्माण संस्था यांच्या मागणीबाबत तत्कालीन विरोधी पक्षनेते व आमदार श्री. एकनाथ खडसे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांना उददेशुन त्यांच्या दि.४/३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली होती. मंडळाने प्रस्तावित केलेल्या योजनेबाबत अवगत करुन मागणी केलेला भुखंड देता येणे शक्य नसल्याचे मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी पत्र क्र.३६९५ दि.३०/७/२०१४ दवारे गृहनिर्माण विभागास कळविण्यात आले होते. मात्र सदर कार्यादेश देऊन ५ वर्षांनंतरही इमारतीचे आराखडयांस मनपाकडुन मंजुरी प्राप्त करण्यात अपयशी ठरल्याने व कामात समाधानकारक प्रगती न केल्यामुळे दि.२० जानेवारी २०१५ रोजी ठेकेदार मे. मोतीराम बुधरमल यांना देण्यात आलेले काम रदद करण्यात आले. तसेच सदर भुखंडाच्या लगतच्या इमारत क्र.१३९, उषाकिरण या पुनर्विकासाधीन संस्थेने सदर भुखंडाची मागणी केल्याने सदर प्रस्तावास २०१४ अखेर मान्यता देण्यात आली होती. सदर मंजुरीनुसार सदर भुखंडापोटी देय चटई क्षेत्र निर्देशांकानुसार देय बांधकाम क्षेत्रापैकी म्हाडास ६०% क्षेत्र व लगतच्या संस्थेस ४०% बांधकाम क्षेत्रफळ प्राप्त होणार होते व त्यानुसार देकारपत्र दि.९/१/२०१५ नुसार देण्यात आले होते. सदर

		न.भू.क्र.५७४० भुखंड क्र.आर-२ भुखंड हा शेजारील इ.क्र.१३९ उषाकिरण सह.गृह. संस्थेस वितरीत करण्यात आला असून संस्था, विकासक व म्हाडामध्ये अदमासे १८२०.०० चौ.मी. क्षेत्रफळाचे १८ सदनिकांकरीता रोजी त्रिपक्षीय करारनामा नोंदणीकृत करण्यात आला आहे.
२	असल्यास, या प्रस्तावास तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांनी सकारात्मक निर्णय घेऊन प्लॉट वितरणाचे आदेश देऊनही अद्याप उचित कार्यवाही करण्यात न आल्याचे माहे जानेवारी, २०२६ रोजी त्या सुमारास निर्दशनास आले आहे हे खरे आहे काय,	हे खरे नाही. सदर भुखंड सम्राट गृहनिर्माण संस्थेस वितरीत करणेबाबत कोणतेही आदेश या कार्यालयाच्या अभिलेखामध्ये आढळून येत नाही.
३	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	सदर भूखंड सम्राट गृहनिर्माण संस्थेस वितरीत करणेबाबत कोणताही आदेश पारित केला नसल्याने उक्त प्रकरणी कोणतीही चौकशी अथवा कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
४	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:00:00

[मिलिंद बोरीकर]
मुख्य अधिकारी
मुंबई मंडळ.

पुरक टिप्पणी :-

विषय : विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक २७२२९ मुंबईतील मौजे घाटकोपर, किरोळ येथील भूखंडावर सम्राट गृहनिर्माण संस्था यांची योजना राबविण्याकरीता प्लॉटचे वितरण करण्याबाबत.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६प्र.क्र.१२०/गृनिप, दि.२०.०५.२०२६.

पंतनगर, घाटकोपर (पूर्व) या म्हाडा वसाहतीतील भुखंड क्र.२३५, नगर भुमापन क्र.५७४० हा निवासी वापरासाठीच्या भुखंडाची मागणी सम्राट गृहनिर्माण संस्था यांनी २००९ साली केली होती. सदर भुखंडावर त्यावेळी मंडळामार्फत गृहनिर्माण योजना विचाराधीन होती. सदर बाब मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी दि.२६/८/२००९ च्या पत्राद्वारे कक्ष अधिकारी/गृहनिर्माण विभाग यांच्या पत्र दि.२२/७/२००९ च्या उत्तरादाखल शासनास कळविली होती. मुंबई मंडळाने नियोजित केल्यानुसार सन २०१० साली सदर टर्न की योजनेसाठी ठेकेदार मे. मोतीराम बुधरमल यांना स्विकृती पत्र जारी केले होते व मुंबई महापालिकेस प्रस्तावित इमारतीचे आराखडे मंजुरीकरीता सादर केले होते.

दरम्यानच्या काळात सम्राट गृहनिर्माण संस्था यांच्या मागणीबाबत तत्कालीन विरोधी पक्षनेते व आमदार श्री. एकनाथ खडसे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांना उददेशुन त्यांच्या दि.४/३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली होती. मंडळाने प्रस्तावित केलेल्या योजनेबाबत अवगत करुन मागणी केलेला भुखंड देता येणे शक्य नसल्याचे मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी पत्र क्र.३६९५ दि.३०/७/२०१४ दवारे गृहनिर्माण विभागास कळविण्यात आले होते. मात्र सदर कार्यादेश देऊन ५ वर्षांनंतरही इमारतीचे आराखडयांस मनपाकडुन मंजुरी प्राप्त करण्यात अपयशी ठरल्याने व कामात समाधानकारक प्रगती न केल्यामुळे दि.२० जानेवारी २०१५ रोजी ठेकेदार मे. मोतीराम बुधरमल यांना देण्यात आलेले काम रदद करण्यात आले.

तसेच सदर भुखंडाच्या लगतच्या इमारत क्र.१३९, उषाकिरण या पुनर्विकासाधीन संस्थेने सदर भुखंडाची मागणी केल्याने सदर प्रस्तावास २०१४ अखेर मान्यता देण्यात आली होती. सदर मंजुरीनुसार सदर भुखंडापोटी देय चटई क्षेत्र निर्देशांकानुसार देय बांधकाम क्षेत्रापैकी म्हाडास ६०% क्षेत्र व लगतच्या संस्थेस ४०% बांधकाम क्षेत्रफळ प्राप्त होणार आहे व त्यानुसार देकारपत्र दि.९/१/२०१५ नुसार देण्यात आले होते. सदर न.भू.क्र.५७४० भुखंड क्र.आर-२ भुखंड हा शेजारील इ.क्र.१३९ उषाकिरण सह.गृह. संस्थेस वितरीत करण्यात आला असून संस्था, विकासक व म्हाडामध्ये दि.१४/०२/२०१९ रोजी त्रिपक्षीय करारनामा नोंदणीकृत करण्यात आला आहे. सदर करारनाम्यानुसार मुंबई मंडळास हिस्सेदारी तत्वावर ४० गाळे प्राप्त होणेबाबत नमूद होते. मंडळास प्राप्त होणाऱ्या ४० सदनिकांची मागणी सम्राट गृहनिर्माण संस्थेने केलेली होती. तथापी सदर सदनिका थेट सम्राट सहकारी गृहनिर्माण संस्थेस थेट वितरीत करण्याबाबत प्राधिकरणाचे धोरण नसल्याने प्राधिकरणामार्फत दि.०९/०९/२०२५ रोजी शासनास अहवाल सादर केला असून सदर अहवालामध्ये कोणत्याही संस्थांना भुखंडाचे थेट वितरण करण्याचे प्राधिकरणाचे धोरण नसून सदर विषयाबाबत शासन स्तरावर निर्णय होणे अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

वरील त्रिपक्षीय करारनाम्यानुसारच मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या दि.०९/०९/२०२५ रोजीच्या अहवालामध्ये ४० [अंदाजित प्रति सदनिका क्षेत्रफळ ४५.१७ चौ.मी.] गाळयांचा उल्लेख केलेला आहे. परंतू कार्यकारी अभियंता / इ. प. कक्ष यांचे द्वारा दि. २९/१२/२०२१ रोजीच्या मंजूर नकाशामध्ये म्हाडास ४० ऐवजी १८ [मोठया आकाराच्या अंदाजित प्रती सदनिका क्षेत्रफळ १०१.१४ चौ.मी.] सदनिका दर्शविण्यात आल्या असून म्हाडास प्राप्त होणारे बांधीव क्षेत्रफळ म्हणजेच अदमासे १८२०.०० चौ.मी. क्षेत्रफळामध्ये मात्र कोणताही बदल झालेला नाही. सदर १८ सदनिकांकरीता संस्था, विकासक व म्हाडा यांच्यात संयुक्त त्रिपक्षिय करारनामा दि. २७/०२/२०२६ रोजी नोंदणीकृत करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर इमारतीमधील म्हाडाच्या हिस्स्याचे १८ सदनिका सोडती मार्फत विक्री करण्याकरीता दि. ३०.०३.२०२६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे. तसेच सदर इमारतीस दि. १७.०४.२०२६ रोजी इमारत परवानगी कक्ष यांचेमार्फत पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र देखील प्राप्त झालेले आहे.

तसेच, सदर विषयाबाबत मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या दालनात दि.०७/१०/२०२५ रोजी सम्राट गृहनिर्माण संस्था, मुंबई महापालिकेचे अधिकारी व म्हाडा अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत उपमुख्य अभियंता [पू] / मुं.मं. यांनी सदर प्रकरणाची वस्तुस्थिती विषद केली होती. सदर बैठकीत सम्राट सह.गृह.संस्थेच्या विनंतीनुसार मंडळास प्राप्त होणारे गाळे संस्थेस वितरीत करणेबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुर्नविचार करण्याचा प्रस्ताव सादर करणेबाबत मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार सदर विषयाबाबतचा अहवाल दि. ११.०५.२०२६ रोजी शासनास पाठविण्यात आलेला आहे (प्रत संलग्न).

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:59:27
[मिलिंद बोरीकर]
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र. ४६५२

राज्य सरकारने गिरणी कामगारांच्या प्रश्नावर बैठक बोलवून कामगारांना मुंबईतील घरे देण्याची मागणी कामगार व विविध कामगार संघटनांनी केली असल्याबाबत.
श्रीमती उमा खापरे, मा.वि.प.स.

संदर्भः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.४६५२

महोदय,

श्रीमती उमा खापरे, मा.वि.प.स. यांनी उपस्थित केलेला अतारांकित प्रश्न क्र. ४६५२, या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.४६५२ चे प्रश्ननिहाय उत्तर व पुरक टिप्पणीसोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:30:24
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2444/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3267076)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/(N.E)MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:24 PM

पूरक टिप्पणी :

विषयः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र. ४६५२
राज्य सरकारने गिरणी कामगारांच्या प्रश्नावर बैठक बोलवून कामगारांना मुंबईतील घरे देण्याची मागणी कामगार व विविध कामगार संघटनांनी केली असल्याबाबत.
श्रीमती उमा खापरे, मा.वि.प.स.

संदर्भः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.४६५२

टिप्पणी :

अ) मुंबईस्थित, म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिका.

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५११६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांपैकी, ३७ गिरण्यांच्या पुनर्विकासास मंजुरी प्राप्त आहे. ११ गिरण्यांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त नसल्यामुळे जमिनीमधील म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही व १० गिरण्यांमध्ये नविन डी. सी. आर. नुसार म्हाडाचा वाटा निरंक आहे.

म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांपैकी ३३ गिरण्यांच्या १३.७८ हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा म्हाडास प्राप्त आहे. ४ गिरण्यांच्या जमिनीचा म्हाडास प्रत्यक्ष ताबा प्राप्त झालेला नाही. ३३ गिरण्यांपैकी २६ गिरण्यांच्या जमिनीवर म्हाडाकडून ३ टप्प्यात १३,४५३ गिरणी कामगार सदनिकांचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या १३,४५३ सदनिका तसेच, एम.एम.आर.डी.ए. च्या कोनगाव येथील २,४१७ रेंटल हौसिंग सदनिका, अशाप्रकारे एकूण १५,८७० सदनिकांची सोडत प्रक्रिया म्हाडामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत दि.३१.०५.२०२६ पर्यंत, १४,४३४ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरीत करण्यात आल्या असून, १,४३६ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे.

गिरणी विभाग/मुंबई मंडळातर्फे आजमितीपर्यंत काढण्यात आलेल्या गिरणी कामगार सदनिका सोडतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सोडत क्र.	सोडत दिनांक	सदनिका संख्या	शेरा
सोडत क्र. १	दि.२८/०६/२०१२	६९२५	म्हाडा (१८ गिरणी)
सोडत क्र. २	दि०९/०५/२०१६	२६३४	म्हाडा (०६ गिरणी)
सोडत क्र. ३	दि.०२/१२/२०१६	२४१७	एम.एम.आर.डी.ए. (कोनगाव रेंटल हौसिंग)
सोडत क्र. ३	दि.०१/०३/२०२०	३८९४	म्हाडा (०२ गिरणी)
नोंद : एकूण २६ गिरण्यांच्या जमिनीवर १३,४५३ गिरणी सदनिका व एम.एम.आर.डी.ए. च्या कोनगाव येथील २४१७ रेंटल हौसिंग सदनिका असे एकूण १५,८७० सदनिकांची सोडत काढण्यात आलेली आहे. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत १४,४३४ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरीत करण्यात आल्या असून, १,४३६ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत, न्यु ग्रेट इस्टर्न मिल, भायखळा येथील अंदाजीत ९६ गिरणी कामगार व बॉम्बे डाईंग मिल, नायगाव – दादर येथील १६० गिरणी कामगार सदनिका असे एकूण सदनिकांची सोडत काढणे प्रस्तावित आहे.			

File No. MHADA-MHAD012/2444/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3267076)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NLS/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/03/2026 12:36 PM

ब) गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करून देण्याबाबत.

मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दिनांक १५/०३/२०२४ पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयानुसार, मुंबईमधील बंद पडलेल्या गिरण्यांमधील ज्या गिरणी कामगारांची / त्याच्या वारसाची पात्रता निश्चित झाली आहे, अशा गिरणी कामगारांना/ त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये खालील ३ प्रतिकृतीद्वारे घरे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रतिकृती क्र.१) : गिरणी कामगारांच्या घरांसाठी ठाणे जिल्हयात शासकीय जमीन उपलब्ध करुन त्यावर घरकुले बांधणे.

प्रतिकृती क्र.२) : प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये खाजगी जमीनीवरील मंजूर अभिन्यासांना जमीन मालकासोबत संयुक्त भागीदारी (Joint Venture) द्वारे घरांची निर्मिती करणे.

प्रतिकृती क्र.३) : प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकांकडील मंजूर अभिन्यासवर घरबांधणी.

प्रतिकृती क्र.१ च्या अनुषंगाने,

ठाणे जिल्हा :

1. मौजे उत्तरशिव सर्वे नं. ७५ येथील क्षेत्र १०-९५-०० हे.आर. व मौजे हेदुटणे ता. कल्याण येथील सर्वे नं. २१९ क्षेत्र ०९-१२-०० हे.आर. असे एकूण २०-०७-०० हे.आर. जमिनी पैकी ११.७६ हेक्टर इतके क्षेत्र म्हाडाकडे हस्तांतरीत करण्याबाबत, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे शासन निर्णय क्रं.गिकाघ/२०२३/प्र क्रं.१२८/गृनिधो-२, दि.१५/०३/२०२४ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे.
2. मौजे हेदुटणे, ता. कल्याण सर्व्हे क्र.-२१९ [क्षेत्र ०९-१२-०० हे.आर.] येथील, जमिनीची दि.१३.०५.२०२६ रोजी म्हाडा, महसूल विभाग व भूमी अभिलेख विभाग यांचेमार्फत संयुक्त मोजणी करण्यात आली असून सदर जमीन म्हाडाच्या ताब्यात कागदोपत्री मिळणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
3. मौजे उत्तरशिव, ता. ठाणे, सर्व्हे क्र.-७५ [क्षेत्र १०-९५-०० हे.आर.] येथील, जमिनीची संयुक्त मोजणी करणेकरिता दि.०५.०८.२०२४ व दि.२०.०५.२०२६ रोजी म्हाडा, महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग तसेच पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्षस्थळी उपस्थित होते. तथापि, सदर ठिकाणी स्थानिक नागरिकांनी, जमीन मोजणीस विरोध केल्याने, सदर जमिनीची संयुक्त मोजणी करून, जमीन म्हाडाचे ताब्यात देण्याबाबतची कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली.
4. सदर जमिनी जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून सदर जमिन म्हाडाकडे, हस्तांतरीत करण्याकरीता पाठपुरावा सुरु आहे.

रायगड जिल्हा :

महाराष्ट्र शासन, महसूल विभागाकडून रायगड जिल्ह्यातील १३ गावांमधील एकूण २९ गट क्रमांकाखालील ११९-६६-४० हे.आर. क्षेत्राचे सर्वेक्षण करणेबाबत म्हाडास कळविले असता त्यापैकी, ७१-९३-६० हे.आर. जमिन गिरणी कामगारांच्या गृहप्रकल्पासाठी उपयुक्त आहेत, असे म्हाडाकडून गृहनिर्माण विभागास दि.०२.२०२.२०२४ रोजीच्या पत्र क्र. ४९२/२०२४ अन्वये सादर करण्यात आले

File No. MHADA-MHAD012/2444/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3267076)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NLS/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:24 PM

आहे.

प्रतिकृती क्र.३ च्या अनुषंगाने, गिरणी कामगारांना सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी, कर्मयोगी एव्हीपी रिअलटर्स एलएलपी यांना ३७७० सदनिका व छड्डा डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स यांना ८०५२ सदनिका बांधण्याकरिता गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागामार्फत दि.१५.०५.२०२६ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:31:04

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

File No. MHADA-MHAD012/2444/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3267076)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR(NLE)MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 02/07/2026 12:34 PM

प्रश्न उत्तरे

विषयः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र. ४६५२

राज्य सरकारने गिरणी कामगारांच्या प्रश्नावर बैठक बोलवून कामगारांना मुंबईतील घरे देण्याची मागणी कामगार व विविध कामगार संघटनांनी केली असल्याबाबत.

श्रीमती उमा खापरे, मा.वि.प.स.

संदर्भः विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.४६५२

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	राज्य शासनाने गिरणी कामगारांच्या प्रश्नावर बैठक बोलवून कामगारांना मुंबईतील घरे देण्याची मागणी कामगार व विविध कामगार संघटनांनी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,	सदर बाब राज्य शासनाशी निगडीत आहे.
२.	असल्यास, मिठागराची जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी गिरणी कामगारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,	प्रश्न उद्भवत नाही.
३.	असल्यास, या अनुषंगाने गिरणी कामगारांच्या घरासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,	प्रश्न उद्भवत नाही.
४.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	लागू नाही.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
14:32:05

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2444/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3267076)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, SY ENGR(N)S\MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:34 PM

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)



म्हाडा
MHADA

विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.६५६९.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/अर्थ.अधि/ विधानपरिषद अता.प्र.६५६९/ /दुवपु-२०२६

3953

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 10 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.६५६९.
मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी, तसेच पागडी इमारतींचा सुयोग्य व न्याय पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबत...
(श्री. सुनिल शिंदे, मा.वि.प.स.)

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विपअताप्र-२०२६/प्र.क्र.३६/२०२६/ दुवपु-१, दि.२७.०३.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.६५६९** ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शेभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.६५६९.</u>
मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी, तसेच पागडी इमारतींचा सुयोग्य व न्याय पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबत...
(श्री. सुनिल शिंदे, मा.वि.प.स.)

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	मुंबई शहरातील भाडेकरु तसेच घरमालकांचा हक्क अबाधित ठेवून मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी, तसेच पागडी इमारतींचा सुयोग्य व न्याय पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार असल्याची घोषणा मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी दि.११ डिसेंबर २०२५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय ?	होय, हे खरे आहे.
२.	असल्यास, सदरहू घोषणेच्या अनुषंगाने राज्य शासनाने याबाबतची नियमावली तयार केली आहे काय, प्रस्तावित नियमावलीचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदरहू नियमावलीची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?	मुंबई शहरातील हॉटेल व निवासगृह हे भाड्याने देण्यात आलेल्या जागांसाठी / घरासाठी भाडे व त्यांच्या दुरुस्त्या आणि जागेतून काढून टाकण्याची प्रकरणे यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने सन १९४७ मध्ये मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम-१९४७ सालीं प्रसिध्द करण्यात आली. तदूनंतर महाराष्ट्र शासनाने सदर कायद्यामध्ये सुधारणा करुन दि.१०.०३.२००० रोजी सुधारित महाराष्ट्र भाडे नियंत्रण १९९९ प्रसिध्द करण्यात आले. उपरोक्त सुधारित अधिनियम हे मुख्यत: विवक्षित जागांचे भाडे व त्यांच्या दुरुस्त्या आणि जागेतून काढून टाकण्याची प्रकरणे यांवरील नियंत्रणाशी संबंधित कायद्यामध्ये एकरुपता आणणे, त्यांचे एकत्रिकरण करणे व त्यामध्ये सुधारणा करणे यांसाठी व घरमालकांकडून करण्यात येणाऱ्या गुंतवणुकीवर त्यांना रास्त प्राप्तीची हमी देऊन, नवीन घरे बांधण्यास उत्तेजन देण्यासाठी आणि पुर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींकरिता तरतुद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेले आहे. मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात असून, यापैकी बहुतांश इमारती या भाडेतत्वावर / पागडी पध्दतीने घरमालकांनी भाडेकरु / रहिवाश्यांना वास्तव्यासाठी दिले आहे. सदर भाडेतत्वावरील उपकरप्राप्त इमारतींना महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ लागू आहेत. त्यामुळे घर विक्री व हस्तांतरण या बाबी सदर अधिनियमाच्या अंतर्गत येतात. मुंबई शहरातील भाडेतत्वावरील उपकरप्राप्त इमारती या पागडी मुक्त करण्यासाठी तसेच घरमालक हे घर हस्तांतरणास परवानगी देत नसल्यास किंवा अवाजवी पागडी रक्कम मागत असल्यास त्यावर उपाययोजना करावयाची ठरल्यास, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम 1999 मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सदर अधिनियमात सुधारणा करणे ही बाब मंडळाच्या अखत्यारित येत नाही, तरी याबाबत शासन स्तरावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन योग्य तो निर्णय घेणे अपेक्षित आहे.
३.	असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भाडेकरु व घरमालकांचा हक्क अबाधित ठेवून पागडी इमारतींचा सुयोग्य आणि न्याय पुनर्विकासासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याच्या प्रक्रियेची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?	मुंबई शहरातील भाडेतत्वावरील उपकरप्राप्त इमारती या पागडी मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम 1999 मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सदर अधिनियमात सुधारणा करणे ही बाब मंडळाच्या अखत्यारित येत नाही, तरी याबाबत शासन स्तरावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन योग्य तो निर्णय घेणे अपेक्षित आहे.
४.	नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: <u>विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.६५६९.</u>
मुंबई शहराला पागडीमुक्त करण्यासाठी, तसेच पागडी इमारतींचा सुयोग्य व न्याय पुनर्विकास करण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबत...
(श्री. सुनिल शिंदे, मा.वि.प.स.)

पुरक टिप्पणी:

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या व घरमालकांनी भाडेतत्वावर / पागडी पध्दतीने भाडेकरु / रहिवाश्यांना वास्तव्यास दिलेल्या उपकरप्राप्त इमारतींबाबत:

पार्श्वभुमी:

- **मुंबई शहर बेटावरील इमारती:**

मुंबई शहरात अंदाजे १५० वर्षांपूर्वी औद्योगिकीकरणाची मुहुर्तमेढ रोवली गेली व नागरीकरणाच्या प्रक्रियेला जसजसा वेग येत गेला तसतसे खाजगी जमिन मालकांतर्फे दाटीवाटीने एकमेकांलगत असलेल्या इमारती बांधल्या गेल्या. त्यात शेकडो मध्यमवर्गीय कुटुंबे व कामगारवर्ग राहू लागले.मुंबई शहराचा दक्षिण भाग म्हणजे मुंबई महापालिकेच्या अ ते ग विभागात प्रथम लोकवस्ती झाली व कालांतराने उपनगरे निर्माण झाली. सुमारे १००/१२५ वर्षांपूर्वी ४-५ मजले उंचीच्या इमारती बांधण्यात आल्या. या इमारती तत्कालीन बांधकाम क्षेत्रातील ज्ञान व बांधकामपद्धतीनुसार भारवाहक भिंती किंवा लाकडी खांब, तुळया यांची संरचना व छतासाठी लोखंडी वा लाकडी तुळया किंवा बासे व त्यावर कोबा किंवा फरशीचे आच्छादन अशा पारंपारिक पद्धतीप्रमाणे बांधल्या गेल्या. साधारणत: सन १९४० नंतर बांधलेल्या इमारतींमध्ये सलोह कॉंक्रिटचा वापर मोठ्या प्रमाणात आढळतो. सदर इमारतींच्या नियोजनात देखील वायुविजन, प्रकाश इ. बाबींचा अभाव आढळून येतो, ज्यामुळे सामाविक भिंत असलेल्या मात्र बहुमजली, अतिशय छोटे पोहोचरस्ते, घरगल्ल्या अशा सदोश इमारतींची निर्मीती झाल्याचे दिसून येते.

- **मुंबई घरदुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना:**
- ***मुंबई घरदुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना :-***

सन १९४० साली शासनाने मंजूर केलेल्या भाडे नियंत्रण कायद्याच्या प्रभावामुळे गाळयांचे भाडे सन १९४० च्या पातळीवर गोठली गेली. परिणामत: अशा इमारतींच्या मालकांना योग्य ती अर्थप्राप्ती होत नसल्याने त्यांच्या इमारतीचे परिरक्षण व दुरूस्ती करण्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. त्याचप्रमाणे परिरक्षण व दुरूस्ती ही केवळ मालकाचीच जबाबदारी असल्याच्या समजामुळे तथा आर्थिक दुर्बलतेमुळे इमारतीमधील भाडेकरूंचेही त्याकडे दुर्लक्ष होऊन दिवसेंदिवस वाढणारे आयुर्मान, पावसाचे जादा प्रमाण,मुंबईचे खारे हवामान यांचा एकत्रित परिणाम होऊन मोठया प्रमाणावर इमारती मोडकळीस येऊन कोसळू लागल्या.त्यामुळे आर्थिक हानीबरोबरच प्राणहानीही मोठया प्रमाणावर होऊ लागली.या प्रश्नावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने सन १९६८ मध्ये नेमलेल्या बेडेकर समितीच्या अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार शासनाने मुंबई शहर बेटावरील सुमारे १९६४२ इमारतींच्या दुरूस्ती/पुनर्बांधणीची जबाबदारी स्विकारली व ती पार पाडण्याकरिता मुंबई घरदुरूस्ती व पुनर्रचना कायदा १९६९ मंजूर करून त्याअन्वये मुंबई घरदुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना होऊन हे मंडळ सन १९७१ मध्ये कार्यरत झाले.

- **उपकरप्राप्त इमारतींचे वर्गीकरण :-**

मुंबई शहरातील १९,६४२ इमारतींना उपकर लागू करण्यात येऊन म्हाड अधिनियम १९७६ च्या कलम ८४(१) अनुसार खालीलप्रमाणे इमारतींचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

इमारत उभारण्याचा कालावधी	उपकर वर्ग	मुळ उपकरप्राप्त इमारतींची संख्या
दिनांक १ सप्टेंबर,१९४० पूर्वी	अ	१६,५०२
दिनांक १सप्टेंबर,१९४० ते दिनांक ३१ डिसेंबर, १९५०	ब	१,४८९
दिनांक १ जानेवारी,१९५१ ते दिनांक ३० सप्टेंबर,१९६९	क	१,६५१
एकूण		**१९,६४२**

- **प्राधिकरणाची व मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना :-**

सन १९७६ साली महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायदा मंजूर झाला. त्यानंतर त्या कायद्याच्या कलम १८ नुसार डिसेंबर १९७७ मध्ये मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ हे म्हाडाचा घटक म्हणून अस्तित्वात आले व त्यामार्फत सदर कायद्याच्या प्रकरण 8 व 8अ मधील तरतुदीनुसार इमारतीच्या दुरूस्ती व पुनर्रचनेचा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्यात आला. पुढे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे विविध प्रकारची कार्यक्षेत्र असल्यामुळे त्याचे तीन मंडळामध्ये विभाजन करण्यात येऊन जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरूस्ती व पुनर्रचना करण्याचे काम नोव्हेंबर 1992 मध्ये नव्याने स्थापन

केलेल्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सोपविण्यात आले.या मंडळामार्फत उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्ती व पुनर्बांधणीच्या योजना राबविण्यात येतात.

म्हाड अधिनियम १९७६ च्या प्रकरण ८ च्या उपबंधांना अधीन राहून उपकरप्राप्त इमारतींची अवस्था, त्यांच्या संरचनात्मक दुरूस्तीची आवश्यकता वा पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, प्राधान्य किंवा निकड याकरिता उपलब्ध होणारा निधी व उपलब्ध यंत्रणा इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रत्येक आर्थिक वर्षासाठी ठराविक भौतिक व आर्थिक उद्दिष्टे ठेऊन दुरूस्ती व पुनर्बांधणीच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते.

जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी आवश्यक असणारा प्रचंड निधी विचारात घेता या इमारतींची संरचनात्मक दुरूस्ती करून त्या सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न मंडळातर्फे करण्यात येतो.

उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरूस्ती करण्यामुळे उपकरप्राप्त इमारतींमधील भोगवटादारांना त्यांच्या मूळ इमारतीत सुरक्षितपणे व किमान भाडयात राहता येते व इतरत्र विस्थापित होण्याची आवश्यकता उरत नसल्याने त्यांच्या कौटुंबिक व दैनंदिन जीवनावर फरक पडत नाही. शिवाय, इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्ती कामावर होणारा खर्च त्या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या खर्चाच्या तुलनेने कमी असल्याने असा अल्प खर्च करून भोगवटादारांचे विस्थापनाचा तथा पुनर्वसनाचा प्रश्न काही काळ दूर ठेवता येतो व शासनावर मोठी आर्थिक जबाबदारी येत नाही.उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्त्या वेळोवेळी करण्यात येत असल्यामुळे त्यांचे आयुर्मान वाढले असून कोसळण्याच्या अपघातांची संख्या नियंत्रित करण्यात मंडळास पर्यायाने शासनास यश आले आहे.

- **मुंबई भाडे नियत्रंण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम-१९४७ व सुधारित महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९:**

मुंबई शहरातील हॉटेल व निवासगृह हे भाड्याने देण्यात आलेल्या जागांसाठी / घरासाठी भाडे व त्यांच्या दुरुस्त्या आणि जागेतुन काढून टाकण्याची प्रकरणे यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने सन १९४७ मध्ये मुंबई भाडे नियत्रंण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम-१९४७ साली प्रसिध्द करण्यात आली. तदनंतर महाराष्ट्र शासनाने सदर कायद्यामध्ये सुधारणा करुन दि.१०.०३.२००० रोजी सुधारित महाराष्ट्र भाडे नियंत्रण १९९९ प्रसिध्द करण्यात आले.

उपरोक्त सुधारित अधिनियम हे मुख्यत: विवक्षित जागांचे भाडे व त्यांच्या दुरुस्त्या आणि जागेतून काढून टाकण्याची प्रकरणे यांवरील नियंत्रणाशी संबंधित कायद्यामध्ये एकरुपता आणणे, त्यांचे एकत्रिकरण करणे व त्यामध्ये सुधारणा करणे यांसाठी व घरमालकांकडून करण्यात येणाऱ्या गुंतवणुकींवर त्यांना रास्त प्राप्तीची हमी देऊन, नवीन घरे बांधण्यास उत्तेजन देण्यासाठी आणि पुर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींकरिता तरतुद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेले आहे.

मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात असून, यापैकी बहुतांश इमारती या भाडेतत्वावर / पागडी पध्दतीने घरमालकांनी भाडेकरु / रहिवाश्यांना वास्तव्यासाठी दिले आहे. सदर भाडेतत्वावरील उपकरप्राप्त इमारतींना महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ लागू आहेत. त्यामुळे घर विक्री व हस्तांतरण या बाबी सदर अधिनियमाच्या अंतर्गत येतात.

महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, प्रकरण ९, कलम ५६ मधील तरतुदी या कायदेशीर शुल्क मिळण्याचा भाडेकरु व घरमालक यांना अधिकार याबाबत असून, त्या खालीलप्रमाणे आहेत.

५६. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी

(एक) भाडेकरू किंवा भाडेकरूच्या वतीने कार्य करणारी किंवा तसे करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही व्यक्ती, यांना कोणत्याही जागेची भाडेदारी सोडून देणे, हस्तांतरित करणे किंवा अभिहस्तांरित करणे याची शर्त म्हणून कोणतीही रक्कम किंवा कोणताही मोबदला मिळणे.

(दोन) घरमालक किंवा घरमालकाच्या वतीने, घरमालकाप्रमाणे कार्य करणारी किंवा तसे करण्याचे अभिप्रेत असणारी कोणतीही व्यक्ती, यांना कोणतीही जागा भाड्याने किंवा जागेच्या भाडेपट्ट्याच्या नूतनीकरण करण्याच्या संबंधात किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीकडे भाडेपट्ट्याचे हस्तांतरण करण्यास आपली संमती देण्यासाठी कोणताही द्रव्यदंड (फाईन), अधिमूल्य किंवा इतर तत्सम रक्कम किंवा ठेव किंवा कोणताही मोबदला मिळणे,

उपरोक्त तरतुदीप्रमाणे जागेची भाडेदारी हस्तांतरण करण्यासाठी किंवा भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणासाठी घरमालकांना मोबदला मिळण्यासाठी अधिनियमात तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु किती मोबदला घरमालकांनी घ्यावा याबाबत स्पष्ट तरतुद नमुद करण्यात आलेली नाही.

मुंबई शहरातील भाडेतत्वावरील उपकरप्राप्त इमारती या पागडी मुक्त करण्यासाठी तसेच घरमालक हे घर हस्तांतरणास परवानगी देत नसल्यास किंवा अवाजवी पागडी रक्कम मागत असल्यास त्यावर उपाययोजना करावयाची ठरल्यास, महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सदर अधिनियमात सुधारणा करणे ही बाब मंडळाच्या अखत्यारित येत नाही. तरी याबाबत शासन स्तरावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन योग्य तो निर्णय घेणे अपेक्षित आहे.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.

विधानपरिषद/अतितात्काळ
पावसाळी अधिवेशन

जा.क्र.उमुकाअ/प्रा./विपअताप्र-९८३०/२०२६
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) , मुंबई - ४०० ०५१
दिनांक - 08/10/2026

प्रति,
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग,
मुख्य इमारत, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.

विषय - **विधानपरिषद अतारांकीत प्रश्न क्रमांक ९८३०.**
ठाणे, मुंबई, पुणे यासारख्या महानगरात सर्व सामान्यांना स्वत:चे घर खरेदी करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या म्हाडाच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत. - श्री किशोर दराडे, मा.वि.प.स.

संदर्भ - १.अमोल राऊत, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र जा.क्र.विसअताप्र - २०२६/प्र.क्र.१२१/गृनिभू, दिनांक - ३१/०७/२०२६ या पत्रासोबतचे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे दिनांक - १०/०७/२०२६ रोजीचे पत्र.
२. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांचे विसअताप्र-९८३० च्या अनुषंगाने दिनांक - १४/०८/२०२६ रोजीचे प्राप्त उत्तर.
३. मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांचे विसअताप्र-९८३० च्या अनुषंगाने दिनांक - २४/०८/२०२६ रोजीचे प्राप्त उत्तर.
४. मुख्य अधिकारी / कोकण मंडळ यांचे विपअताप्र-९८३०च्या अनुषंगाने शासनास पाठविलेले उत्तर जा.क्र.का.अ.-३/को.मं./९६५३७८४/२०२६, दिनांक - २४/०८/२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरुन **विधानपरिषद अतारांकीत प्रश्न क्रमांक ९८३०** मधील प्रश्नांची भागश: उत्तरे पूरक टिप्पणीसह सोबत पाठविण्यात येत आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

[अनिल वानखडे]
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

29/09/2026

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण , मुंबई.

विषय - **विधानपरिषद अतारांकीत प्रश्न क्रमांक ९८३०.**
ठाणे, मुंबई, पुणे यासारख्या महानगरात सर्व सामान्यांना स्वत:चे घर खरेदी करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या म्हाडाच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत.
- श्री किशोर दराडे, मा.वि.प.स.

अ. क्र.	प्रश्न	उत्तर
१	म्हाडाकडून लॉटरीमध्ये स्वत: बांधलेल्या घरांबरोबरच विकासकांकडून प्रीमियमच्या रूपाने मिळालेल्या घरांची विक्री केली जात असून विकासकांकडून मिळालेल्या घरांच्या किंमती रेडीरेकनर दराच्या ११०% एवढ्या निश्चित केल्या जातात, हे खरे आहे काय ?	हे अंशत: खरे आहे. म्हाडा अंतर्गत विविध मंडळे यांचेकडून विविध योजनेतून घरांची विक्री किंमत निश्चित करताना ते वापरत असलेली कार्यपध्दती पूरक टिपणीत सविस्तर नमूद केली आहे.
२	असल्यास, स्वत: उभारलेल्या घरांच्या किंमती ठरवताना जागेची किंमत, त्यावर झालेल्या वेगवेगळ्या प्रकारचे खर्च, बांधकाम खर्च बरोबरच पाच टक्के आकस्मिक खर्च, काम सुरू असताना होणाऱ्या दरवाढीच्या अनुषंगाने पाच टक्के वाढ आणि १० टक्के नफा गृहीत धरून किंमत काढली जाते, हे ही खरे आहे काय ?	हे भागश: खरे आहे. १. म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार गृहनिर्माण प्रकल्पाच्या भूसंपादनाचा खर्च, सदनिकांच्या बांधकामावर व बाह्य सुविधांवर प्रत्यक्ष झालेला खर्च तसेच बँकेच्या प्राईम लँडिंग रेटनुसार व्याजाचे भांडवलीकरण इत्यादीसह सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यात येते. २. प्राधिकरण ठराव क्रमांक ६७१२ दिनांक १५/१२/२०१५ अन्वये निश्चित केलेले Overheads सदनिकांची विक्री किंमत परिगणित करत असताना गृहीत धरण्यात येतात. योजनेतील अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांवर कोणत्याही प्रकारचा नफा आकारण्यात येत नाही. फक्त मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांसाठी ५% व उच्च उत्पन्न गटातील सदनिकांसाठी १०% एवढा नफा आकारण्यात येतो.

३	असल्यास, मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या महानगरात बांधण्यात येणारी म्हाडाची घरे सर्वसामान्य अर्जदारांच्या आवाक्याबाहेर असल्याची तक्रार होत आहे, हे खरे आहे काय ?	हे खरे नाही.
४	असल्यास, महानगरात सर्वसामान्यांची हक्काची घरे व्हावीत यासाठी घरे बांधताना होणाऱ्या अतिरिक्त वाढीव खर्चात जसे प्रशासकीय खर्च, आकस्मिक खर्च, इमारत उभारतानाचा जिने, पार्किंग, गार्ड साठीचा खर्च कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,	म्हाडामार्फत अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गटातील सर्वसामान्य जनतेसाठी परवडणारी घरे बांधण्याकरिता सदनिकांच्या किंमती कमी करण्यासाठी पूरक टिप्पणीमध्ये सुचविल्यानुसार शासनाकडून उपाययोजना होणे अपेक्षित आहे.
५	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागू नाही.

(अनिल वानखडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

स्वाक्षरीत
29/09/2026

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण , मुंबई.

विषय - **विधानपरिषद अतारांकीत प्रश्न क्रमांक ९८३०.**
ठाणे, मुंबई, पुणे यासारख्या महानगरात सर्व सामान्यांना स्वत:चे घर खरेदी करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या म्हाडाच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत.
- श्री किशोर दराडे, मा.वि.प.स.

संदर्भ - अमोल राऊत, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र जा.क्र. विसअताप्र - २०२६/प्र.क्र.१२१/गृनिभू, दिनांक - ३१/०७/२०२६ या पत्रासोबतचे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे दिनांक - १०/०७/२०२६ रोजीचे पत्र.

पुरक टिप्पणी-

मुंबई मंडळ

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विविध विनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या सदनिकांचे दर प्रचलित शीघ्र गणकातील बांधकाम क्षेत्रफळाच्या दराच्या ११०% ने आकारणी करणेबाबत म्हाडा प्राधिकरणामार्फत ठराव क्र.७०६५ दिनांक ११/०३/२०२२ पारित करण्यात आला आहे. परंतु सन २०२४ व २०२६ च्या सोडतीमध्ये म्हाडास विविध पुनर्विकास योजनांमधून गृहसाठ्यापोटी प्राप्त होणाऱ्या अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटाच्या रहिवाशी सदनिकांकरिता विक्री किंमतीमध्ये अनुक्रमे २५%, २०%, १५% व १०% सूट देण्यात येऊन रेडीरेकनर दराच्या अनुक्रमे ८२.५०%, ८८%, ९३.५०% व ९९% दराने सदनिकांची विक्री किंमत निश्चित करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत मुंबई मंडळाकडे उपलब्ध असलेल्या रिक्त भूखंडावर गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून उपलब्ध झालेल्या रहिवाशी सदनिका या सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेकरिता वितरित करण्यात येत आहेत. या सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यासाठी म्हाडाच्या धोरणानुसार प्रपत्र क्र. १ ते ९ अन्वये विक्री किंमत अंतिम करण्यात येते. या प्रपत्र क्र. १ ते ९ पैकी प्रपत्र क्र. १ ते ३ नुसार अंदाजपत्रकानुसार, प्रपत्र क्र.४ ते ६ नुसार योजनेचे काम सुरू झाल्यानंतर व प्रपत्र क्र.७ ते ९ नुसार काम पूर्ण झाल्यानंतर जमिनीची प्रत्यक्ष किंमत व जमीन विकास खर्च, योजनेचा बांधकाम खर्च या सर्वांचा खर्च एकत्रीकरण करून प्रती सदनिका विक्री किंमत अंतिम करण्यात येते. सदर सदनिकांच्या अंतिम विक्री किंमतीमध्ये अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी कोणताही नफा आकारण्यात येत नाही. सदर विक्री किंमतीमध्ये अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी ५% व मध्यम व उच्च उत्पन्न गटाकरिता १०% आस्थापना खर्च, ५% आकस्मिक खर्च, ०.५% अनपेक्षित बाबी व ०.५% व्यवस्थापकीय खर्च इत्यादींचा अंतर्भाव केला जातो. तसेच अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांकरिता कोणताही नफा आकारण्यात येत नाही. तथापि, मध्यम व उच्च उत्पन्न गटाकरिता अनुक्रमे ५% व १०% नफा आकारण्यात येतो.

यानुसार परिगणित केलेली सदनिकांची विक्री किंमत ही नेहमीच शीघ्रगणकापेक्षा कमी असते. त्यामुळे म्हाडामार्फत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांच्या किंमती, रेडीरेकनर दरापेक्षा कमी दरात सर्वसामान्य जनतेकरिता उपलब्ध होतात.

पुणे मंडळ

१. दिनांक २७/०२/२०१८ रोजीच्या शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार म्हाडामार्फत दिनांक १३/११/२०१८ रोजी निर्गमित केलेल्या प्राधिकरण परिपत्रकांन्वये सदनिकांची विक्री किंमत विकासकाकडून प्रस्ताव प्राप्त झालेल्या वर्षाच्या ASR मधील बांधकाम दर अधिक २०% प्रमाणे निश्चित करावे. सदर विक्री किंमतीतील अधिकच्या २०% रकमेपैकी १०% रक्कम प्रकल्प धारकास व १०% रक्कम म्हाडाचा प्रशासकीय शुल्क अशी विभागणी करावी असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार सदनिकांची विक्री किंमत निश्चित करण्यात येत होती.

२. तद्नंतर, एकात्मिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) दिनांक ०२/१२/२०२० मधील नियम क्रमांक ३.८.२ नुसार प्राधिकरण परिपत्रक दिनांक १९/०५/ २०२१ अन्वये म्हाडामार्फत आजतागायत, "प्रकल्पाच्या CC दिनांकाच्या रेडीरेकनर दराप्रमाणे त्या प्रकल्पाची किंमत वर्गवारीनिहाय नमूद करावी. परंतु सदर प्रकल्पाच्या भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या वर्षाचा ASR + २५% दराच्या फरकाची किंमत लाभार्थ्याने विकासकास/मालकास द्यावी. तसेच यादी विकासकास देण्यापूर्वी म्हाडाचे १% प्रमाणे प्रशासकीय शुल्क वसूल करावे, असे निर्देश निर्गमित केले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत सदनिकांच्या विक्री किंमती निश्चित करण्यात येतात.

३. म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार गृहनिर्माण व बाह्य सुविधांवर प्रत्यक्ष झालेला खर्च (योजनेच्या प्रकल्पाच्या भूसंपादनाचा खर्च, सदनिकांच्या बांधकामावर बहुमजली इमारतींमध्ये लिफ्ट, फायर फायटिंग व्यवस्था, रिप-युज प-लोअर, सिव्हेज ट्रिटमेंट प्लान्ट, वीज जोडणीचा अतिरिक्त खर्च, पार्किंग व्यवस्था, सेंद्रिय कचरा व्यवस्थापन इत्यादी) तसेच बँकेच्या प्राईम लँडिंग रेटनुसार व्याजाचे भांडवलीकरण इत्यादीसह सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यात येते.

४. प्राधिकरण ठराव क्रमांक ६७१२ दिनांक १५/१२/२०१५ अन्वये सदनिकांची विक्री किंमत परिगणित करत असताना विक्री किंमतीच्या परिपत्रकात खालीलप्रमाणे घटक गृहीत धरण्यात येतात.

अ. क्र.	विक्री किंमतीच्या प्रपत्रातील घटक	अल्प उत्पन्न गट	अत्यल्प उत्पन्न गट	मध्यम उत्पन्न गट	उच्च उत्पन्न गट
१	आस्थापना खर्च	३%	३%	४%	४%
२	अनपेक्षित बाबी	०.५%	०.५%	०.५%	०.५%
३	आकस्मिक खर्च	२%	२%	२%	२%
४	व्यवस्थापकीय खर्च	०.२५%	०.२५%	०.२५%	०.२५%
५	नफा	०%	०%	५%	१०%

योजनेतील अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांवर कोणत्याही प्रकारचा नफा आकारण्यात येत नाही. मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांसाठी ५% व उच्च उत्पन्न गटातील सदनिकांसाठी १०% एवढा नफा आकारण्यात येतो.

कोकण मंडळ

प्राधिकरण ठराव क्रमांक ६७१२ दिनांक १५/१२/२०१५ अन्वये सदनिकांची विक्री किंमत परिगणित करत असताना विक्री किंमतीच्या परिपत्रकात पुढीलप्रमाणे घटक गृहीत धरण्यात येतात.

अ. क्र.	विक्री किंमतीच्या प्रपत्रातील घटक	ठराव क्र. ६६६७ दि. २२/०७/२०१४ नुसार	सुधारीत दर	
			मुंबईसाठी	मुंबईबाहेरील मंडळांसाठी

१	व्याजाचा भांडवलीकरणाचा दर	म्हाडाला मिळणारे व्याज + १ टक्के	म्हाडाला वित्तीय वर्षात बँक ठेवीवर मिळालेला महत्तम व्याजाचा दर	गत वित्तीय वर्षात बँक ठेवीवर मिळालेला महत्तम व्याजाचा दर
२	आस्थापना खर्च	आ.दृ.दु. गट व अल्प उत्पन्न गटाकरिता ५% , मध्यम उ.गट ५ ते ६%, उच्च उ. गट ६ ते १०%	अत्यल्प उत्पन्न गट / अल्प उत्पन्न गट यांचेसाठी ५% व मध्यम उ.गट/ उच्च उ. गट १०%	अत्यल्प उत्पन्न गट / अल्प उत्पन्न गट ३%, मध्यम उ.गट/ उच्च उ. गट ४%
३	अनपेक्षित बाबी	१%	०.५%	०.५%
४	आकस्मिक खर्च	५%	५%	२%
५	व्यवस्थापकीय खर्च	०.५%	०.५%	०.२५%
६	नफा मध्यम उ. गट	५ ते १५%	A	५%
७	नफा उच्च उ. गट	१५ ते ३५%	B	१०%

A - Ready Recknor Rate + ५ % = Cost of Construction

B - Ready Recknor Rate + १० % = Cost of Construction

प्रशासकीय खर्च व आकस्मिक खर्च हा ठराव क्रमांक ६७१२ मध्ये नमूद प्रमाणे घेण्यात येतो. तसेच पार्किंग आणि इमारतीतील जिने याकरिता एकूण बांधकाम क्षेत्रफळानुसार देण्यात येतो. तसेच सुरक्षारक्षक किंवा गार्ड या बाबींकरिता म्हाडामार्फत अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत नाही.

सद्यस्थितीत कोकण मंडळाकडे उपलब्ध असलेल्या भूखंडावर कोकण मंडळामध्ये गृहनिर्माण प्रकल्पांची योजना राबविण्यात येत असून बांधण्यात आलेल्या रहिवाशी सदनिका या सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेकरीता वितरित करण्यात येत आहे. या सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यासाठी म्हाडाच्या धोरणानुसार प्रपत्र १ ते ९ अन्वये विक्री किंमत निश्चित करण्यात येते, या प्रपत्र क्र. १ ते ९ पैकी, प्रपत्र क्र. १ ते ३ मध्ये अंदाजपत्रकानुसार प्रपत्र क्र. ४ ते ६ मध्ये योजनेचे काम सुरू झाल्यानंतर व प्रपत्र क्र. ७ ते ९ मध्ये काम पूर्ण झाल्यानंतर जमिनीची प्रत्यक्ष किंमत व जमीन विकास खर्च, योजनेचा बांधकाम खर्च या सर्वांचा खर्च एकत्रिकरण करून प्रती सदनिका विक्री किंमत अंतिम करण्यात येते. त्यामुळे रेडी रेकनर दरामध्ये वाढ जरी झाली, तरी कोकण मंडळामार्फत बांधण्यात येणा-या सदनिकांच्या किंमतीवर याचा परिणाम होत नाही.

सद्यस्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टील, विटा, वाळू इत्यादींच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच GST १८%, Labour Cess, Royalties, Insurance गृहनिर्माण योजना राबवताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी स्थानिक महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क, MoEF च्या अटी जसे की प्रकल्पामध्ये Solar Panel, Miyawaki Garden यांची उपलब्धता इत्यादीमध्ये झालेल्या वाढीमुळे देखील कोकण मंडळातील ठाणे व इतर शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

कोकण मंडळ म्हाडामार्फत अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गटातील सर्वसामान्य जनतेसाठी परवडणारी घरी बांधली जातात. सदर सदनिकांच्या किंमती कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करता येतील.

* गृहनिर्माण योजना राबवताना लागणाऱ्या विविध पर्व परवानग्यांसाठी स्थानिक महानगरपालिका त्यांना करावयाचे शुल्का मध्ये सवलत देण्यात यावी.
* बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की सिमेंट स्टील विटा वाळू इत्यादींवर असणाऱ्या जीएसटी 18 टक्के करिता शासनाकडून सवलत देण्यात यावी.
* बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की सिमेंट स्टील विटा वाळू इत्यादीवर आकारण्यात येणाऱ्या रॉयल्टीकलचा शासनाकडून सवलत देण्यात यावी.
* गृहनिर्माण प्रकल्पांसाठी जल जोडणीसाठी द्यावयाचे शुल्क माफक दरामध्ये आकारण्यात यावे.
* गृहनिर्माण प्रकल्पांसाठी वीज जोडणीसाठी द्यावयाचे शुल्क माफक दरामध्ये आकारण्यात यावे.
* MOEF च्या अटींमध्ये समाविष्ट असलेले सौर ऊर्जा पॅनल बसविण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात यावे. तसेच Miyawaki Garden करिता लागणारी झाडे शासनाच्या वनविभागामार्फत मोफत उपलब्ध करून देण्यात यावी.

म्हाडामार्फत विविध प्रवर्गांकरिता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन सोडतीमार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरिता माफक दरात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. वरील उपाययोजना केल्यास म्हाडाकडे आजमितीस उपलब्ध असलेल्या भूखंडावर नवीन गृहनिर्माण योजना प्रस्तावित करून अधिकाधिक परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करून देता येतील, याकरिता म्हाडा प्रयत्नशील आहे. तसेच अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील गरजू लोकांना जास्तीत जास्त घरे देण्याकरिता म्हाडाचा भर असतो. सदर घरांकरिता आकारण्यात येणाऱ्या किंमतीमध्ये कुठलाही नफा म्हाडाकडून घेतला जात नाही.

मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांच्या मान्यतेने.

(अनिल वानखडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
प्राधिकरण.

कोंकण मंडळ

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
KONKAN HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

जा.क्र.मु.अ./का.अ.-३/ कों.मं./ १७२ /२०२६
दि. ११/०८/२०२६

प्रति,
श्री. अमोल राऊत
कक्ष अधिकारी,
गृहनिर्माण विभाग ,
मंत्रालय मुंबई

विषय :- **विधानपरिषद अतारांकित प्रश्न १०१२३**

महाड जि. रायगड येथील तळीये येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेला पाच वर्ष उलटूनही बाधितांचे पुनर्वसन करण्यात आले नसल्याबाबत.
श्री. मिलींद नार्वेकर व इतर, मा.वि.प.स.

संदर्भ : कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसअताप्र-२०२६/ प्र.क्र.११९/ गृनिभू दि. ३१/०७/२०२६.

महोदय,

विषयांकित अतारांकित प्रश्नाचे अनुषंगाने कोकण मंडळाशी संबधित योजनांबाबत उपरोक्त विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र. १०१२३ ची भागनिहाये उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत :- वरीलप्रमाणे

आपला विश्वास,

(डॉ.विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
मुंबई

पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९१५०२ • फॅक्स : ०२२ - २६५९१५०२
ई-मेल : konkanmhada2008@gmail.com

Mezzanine Floor, Grihnirman Bhavan, Bandra (E), Mumbai - 51.
Contact : 022-26591502 Fax : 022-26591502
E-mail : konkanmhada2008@gmail.com

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- **विधानपरिषद अतारांकित प्रश्न १०१२३**

महाड जि. रायगड येथील तळीये येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेला पाच वर्ष उलटूनही बाधितांचे पुनर्वसन करण्यात आले नसल्याबाबत.

श्री. मिलींद नार्वेकर व इतर, मा.वि.प.स.

अ. क्र.	प्रश्न	उत्तरे
१	महाड (जि. रायगड) येथील तळीये येथे दि.२२ जुलै २०२१ रोजी दरड कोसळून ८७ जणांचा मृत्यूच्या दुर्घटनेनंतर म्हाडा प्रशासनामार्फत २७१ घरांच्या बांधकामाला शासनाकडून मंजूरी देण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,	हे खरे आहे.
२	असल्यास, सन २०२१ मध्ये उध्वस्थ झालेल्या कुटुंबांना पाच वर्षानंतरही शासनाकडून घरे देण्यात आली नसल्याने तसेच विशेषतः पुनर्वसन करण्यात आले नसल्याने मा. उपमुख्यमंत्री, मा. ग्रामविकास विभाग व प्रशासनाकडे समर्थन संस्थेने दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,	हे खरे नाही.
३	असल्यास, म्हाडा अधिकाऱ्यांच्या संगमताने दरड ग्रस्तांसाठी उभारण्यात येणारी बांधकामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,	हे खरे नाही.
४	असल्यास, संबंधित ठेकेदारांवर कारवाई करून घरांची बांधकामे दर्जेदार करण्यासाठीकरून बांधितांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.	प्रश्नच उद्भवत नाही.
५	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	सविस्तर कारणमीमांसा सोबत सादर करण्यात येत आहे.

(डॉ.विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

पूरक टिप्पणी :-

विषय :- **विधानपरिषद अतारांकित प्रश्न १०१२३**

महाड जि. रायगड येथील तळीये येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेला पाच वर्ष उलटूनही बाधितांचे पुनवर्सन करण्यात आले नसल्याबाबत.
श्री. मिलींद नार्वेकर व इतर, मा.वि.प.स.

मुद्दा क्र. १ :- महाड (जि. रायगड) येथील तळीये येथे दि.२२ जुलै २०२१ रोजी दरड कोसळून ८७ जणांचा मृत्यूच्या दुर्घटनेनंतर म्हाडा प्रशासनामार्फत २७१ घरांच्या बांधकामाला शासनाकडून मंजूरी देण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

पुरक उत्तर :- ------- हे खरे आहे.

मौजे-तळिये, ता.महाड, जि. रायगड येथे दि. २२ व २३ जुलै २०२१ रोजी अतिवृष्टीने बाधित झालेल्या वाडीतील २६३ घरकुलांचे पुनर्वसन म्हाडा कोकण मंडळामार्फत ई-निविदेद्वारे नियुक्त केलेल्या मे. ट्रॉन्सकॉन डेव्हलपर्स प्रा.लि. यांचेमार्फत सुरु करण्याबाबत महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभागाने यांचे पत्र क्र. बैठक २०२१/प्र.क्र.१२८/गृनिभू दि. २६/०४/२०२२ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. कार्यकारी अभियंता - ३/को.मं. यांचेमार्फत दि. ०३/०६/२०२२ रोजी पत्र क्र. ७७८ अन्वये २६३ सदनिका बांधणेबाबत मे. ट्रॉन्सकॉन डेव्हलपर्स प्रा.लि. यांना कार्यादेश देण्यात आले आहेत. शासन मंजुरीनुसार ठेकेदार मे. ट्रॉन्सकॉन डेव्हलपर्स प्रा.लि.यांनी आय.आय.टी, पवई, मुंबई येथे दि. २५/०५/२०२२ रोजी सादर केलेल्या सदनिकाच्या स्ट्रक्चरल डिझाईन यांस आय.आय.टी, पवई, मुंबई यांनी आपले पत्र क्र. DRD/CE/RSJ-४४/२२-२३ दि. ०७/०६/२०२२ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

मा.मुख्य अधिकारी / को.मं. यांचे पत्र क्र. १५१ दि. ०३/०६/२०२२ अन्वये सादर केलेल्या भू-अभिन्यास व नकाशा मंजुरी प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग यांनी त्यांचे पत्र क्र. ७८३९ दि. ०१/०९/२०२२ अन्वये भू-अभिन्यासास मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर भू-अभिन्यास मंजुरीनंतरच ठेकेदाराने सदर सदनिका बांधकामाचे काम सुरु करण्यात आले असता, अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे तसेच गणेशोत्सव व इतर सण यामुळे प्रत्यक्षात माहे नोव्हेंबर-२०२२ मध्ये काम सुरु झाले आहे.

प्रथम टप्प्यामध्ये बाधित दरडग्रस्त कोंडाळकर वाडी व बौध्दवाडीचे ६६ सदनिकांचे काम हाती घेण्यात आलेले आहे. त्यानुसार कामाची आखणी करण्यात आलेली आहे. सदर भूअभिन्यासानुसार सदर सदनिकांचे बांधकाम प्रत्यक्ष क्षेत्रीय ठिकाणी सुरु केले असता, सदर बांधकाम करण्यात येणाऱ्या जमिनी या उंच-सखल असून त्यानुसार सदनिकांचे बांधकाम करणे क्रमप्राप्त आहे. सदर अभिन्यासानुसार काही सदनिका या टेकडीवर बांधण्यात येणार आहेत. काही सदनिका या सखल जमिनीवर बांधण्यात येणार आहेत. काही सदनिकांना संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदर सदनिकांचे बांधकाम अभिन्यासानुसार काही ठिकाणी उंचावर व काही ठिकाणी सखल जमिनीमध्ये बांधण्यात येत आहेत. सदर पुनर्वसन क्षेत्र हे उंचावर असल्यामुळे व घाटरस्ता असल्यामुळे बांधकाम साहित्य, पाणी, इ. सोय करणे जिकिरीचे व कठीण आहे. घराकरीता कारखान्यातून येणारे साहित्य उतरवुन परत चढवणे लागत आहे. त्यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे. सदर

सदनिकाचे जोत्याची उंची कमी अधिक असून भौगोलिक क्षेत्रीय रचनेनसार व नॅशनल जिओलॉजिकल सर्व्हेनुसार कमी उंची ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार ०.६० मी. जोत्याची उंची प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे सदनिकांचा चार कोना (कोपरा) पैकी एक कोन (कोपरा) जर ०.६० मी. ठेवले असता इतर कोन (कोपरे) हे जमिन उंच सखल असल्यामुळे जास्तीत जास्त ३.०० ते ३.२० मी. उंच मिळत आहेत. त्यानुषंगाने सदर ठिकाणी नोव्हेंबर-२०२२ पासून सदनिकांचे बांधकाम करण्यात आले असून पहिल्या ९ महिन्यात ६६ घरांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयीन पत्र क्र. मशा एल.एन.ए./अ-१(अ)/भोगवटा दाखला/ O.C. No. १५/२०२३ दि. २०/१२/२०२३ अन्वये प्रथम टप्प्यातील ६६ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. दुसऱ्या टप्प्यातील २६ सदनिकांना दि. ०२/०५/२०२४ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तिसऱ्या टप्प्यातील ४३ सदनिकांचे भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याचा प्रस्ताव सदनिकांशी संबंधित सर्व ना-हरकत प्रमाणपत्रांसह मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे. चौथ्या टप्प्यातील २२ सदनिकांचा भोगवटा प्रमाणपत्राचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयाकडे सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

मुद्दा क्र. २ :- असल्यास, सन २०२१ मध्ये उध्वस्थ झालेल्या कुटुंबांना पाच वर्षानंतरही शासनाकडून घरे देण्यात आली नसल्याने तसेच विशेषतः पुनर्वसन करण्यात आले नसल्याने मा. उपमुख्यमंत्री, मा. ग्रामविकास विभाग व प्रशासनाकडे समर्थन संस्थेने दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

पुरक उत्तर :- ------- हे खरे नाही.

प्रथम टप्प्यातील ६६ सदनिकांचे दि. ०५/०१/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाच्या मौजे-लोणेरे, ता.मानगांव, जि. रायगड येथे "शासन आपल्या दारी अभियान २०२३" अंतर्गत प्रातिनिधीक स्वरुपात ५ सदनिका धारकांना सदनिकांची चावी व म्हाडा स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

५७ सदनिकाधारकांना प्रकल्पाच्या ठिकाणी मौजे-तळिये ता.महाड, जि.रायगड येथे स्थानिक आमदार श्री.भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते मा.मुख्य अभियंता-२/प्राधिकरण, कार्यकारी अभियंता-३/को.मं., उप अभियंता, क्षेत्रीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी/ महाड, तहसिलदार/महाड व त्यांच्या अधिनस्त अधिकारी वर्गामार्फत सदनिकाधारकांना सदनिकांची चावी, म्हाडा स्मृतिचिन्ह व महसूल विभागाचे ताबापत्र प्रदान करण्यात आले.

उर्वरित ४ सदनिकाधारकांना चावी व म्हाडा स्मृतिचिन्ह या कार्यालयाच्या दि.०८/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, महाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे.दुसऱ्या टप्प्यातील २६ सदनिकांना दि. ०२/०५/२०२४ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून सदर सदनिकांचा ताबा तहसिलदार, महाड यांचेकडे देण्यात आलेला आहे.

मुद्दा क्र.३ :- असल्यास, म्हाडा अधिकाऱ्यांच्या संगमताने दरड ग्रस्तांसाठी उभारण्यात येणारी बांधकामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

पुरक उत्तर :- ------- हे खरे नाही.

प्रथम टप्प्यातील ७२ सदनिकांचे VJTI मार्फत Inspection करून Structural Stability अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे (प्रत संलग्न). उर्वरीत सदनिकांचे Inspection करून Structural stability अहवाल

कार्यालयास सादर करणेबाबत कंत्राटदारास / ठेकेदारास या कार्यालयाचे पत्र क्र. ८९४२१४३ दि.०८/०५/२०२६ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करून उर्वरीत सदनिकांचा Structural stability अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

मुद्दा क्र.४ :- असल्यास, संबंधित ठेकेदारांवर कारवाई करून घरांची बांधकामे दर्जेदार करण्यासाठीकरून बाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
पुरक उत्तर :- ------- प्रश्नच उद्भवत नाही.

मुद्दा क्र. ५ :- नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
पुरक उत्तर :- ------- सविस्तर कारणमीमांसा सोबत सादर करण्यात येत आहे.

सदर भू-अभिन्यास मंजुरीनंतरच ठेकेदाराचे सदर सदनिका बांधकामाचे काम सुरु करण्यात आले आहे. सदरचे बांधकाम करताना म्हाडाद्वारे स्थानिक अडचणीवर मात करत काम करण्यात येत आहे

- सदर पुनर्वसन क्षेत्र हे उंचावर असल्यामुळे व घाटरस्ता असल्यामुळे बांधकाम साहित्य, पाणी, इ. सोय करणे जिकिरीचे व कठीण आहे. घराकरीता कारखान्यातून येणारे साहित्य उतरवुन परत चढवणे लागत आहे. त्यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे.
- अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे तसेच गणेशोत्सव व इतर सण यामुळे मनुष्यबळाची पुरेशी उपलब्धता नसल्यामुळे प्रत्यक्षात माहे नोव्हेंबर ते मे या कालावधीतच काम करणे शक्य असते.
- उन्हाळयात (मार्च ते जून माहिन्यापर्यंत) मौजे तळिये येथील उष्णतेमुळे सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत लोखंडी स्वरुपाचे काम जसे की, M.S. Structure, Roof etc. करणे शक्य होत नाही.
- वरील सर्व समस्यांचा विचार करता, तळीये पुनर्वसन प्रकल्पामधील एकूण ५० (२०७-१५७ अतिरीक्त घरकुले) काम उर्वरीत काम डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

मौजे-तळिये येथे शासनाद्वारे उपलब्ध करण्यात आलेल्या जागेवर प्रत्यक्ष जमिनीचा उंच सखल भागासह जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया च्या अहवालाप्रमाणे २२७ सदनिकांचे बांधकाम करणेस जमिन उपलब्ध आहे. त्यापैकी दरडग्रस्त रहिवाश्यांचे कंटनेरखाली साधारणता २० सदनिकांची जागा येत असल्यामुळे प्रत्यक्षात २०७ सदनिकांचे कामास जागा उपलब्ध आहे. उपलब्ध जागेवर सद्यस्थितीत २०७ सदनिकांचे काम प्रगतीपथावर असून त्यापैकी १५७ सदनिकांचे काम परिपूर्ण झालेले आहे. उर्वरीत (२०७-१५७ = ५०) सदनिकांचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. म्हाडामार्फत फक्त सदनिका बांधण्याचेच काम असून सदर प्रकल्पामधील / योजनेमधील बाह्य सुविधांची कामे जसे की, रस्ते, सांडपाणी, पिण्याचे पाणीपुरवठा, संरक्षक भिंत Retaining wall,रस्त्यालगत व उतरावरील भूखंडासाठी स्टोन पिचींग, बाह्य विद्युत पुरवठा, दिवाबत्ती इत्यादी कामे ही जिल्हा परिषद, रायगड अलिबाग, महावितरण इ. संस्थांद्वारे करण्यात येत आहे. कंटेनरखालची जागा उपलब्ध झाल्यानंतर (२२७ - २०७=२०) सदनिकांची कामे पूर्ण करण्याकरीता ४ ते ५ महिन्यांचा कालावधी लागेल. तसेच २७१ (२६३+उर्वरीत८) सदनिकापैकी २२७ सदनिकांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. (२७१-२२७ = ४४) उर्वरीत ४४ सदनिकांसाठी शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्याचे मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे प्रस्तावित / प्रलंबित आहे. सदर ४४ सदनिकांसाठी जागा उपलब्ध करून दिल्यानंतर व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियोजनात्मक मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत ४४ सदनिकांचे बांधकाम म्हाडामार्फत हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.सदर ४४ सदनिकांचे प्लॅनिंग व बांधकाम करणेकरीता साधारणतः ९ ते १० महिने कालावधी लागणार

आहे. सदर ठिकाणी म्हाडामार्फत फक्त सदनिकांचेच काम केले जात असून सोईसुविधाबाबत इतर विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(डॉ.विशाल राठोड)
मुख्य अधिकारी
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विधानसभा

अतारांकित

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २४२५२**
गिरणी कामगारांसाठी मुंबईमध्ये असलेली घरे सोडतीविना पडून असल्याबाबत.
श्री. शिवाजी पाटील मा. विसस व इतर मा. विसस.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसअता – २०२६/ प्र.क्र.१२२ / गृनिधो – २, दि.- २२/०५/२०२६.

मा.महोदय,

श्री. शिवाजी पाटील, मा. विधानसभा सदस्य व इतर मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेला अतारांकित प्रश्न क्र. २४२५२, कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अनुषंगाने, विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २४२५२ चे प्रश्ननिहाय उत्तर व पुरक टिप्पणीसोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:06:36
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

पूरक टिप्पणी :

विषयः विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २४२५२
गिरणी कामगारांसाठी मुंबईमध्ये असलेली घरे सोडतीविना पडून असल्याबाबत.
श्री. शिवाजी पाटील मा. विसस व इतर मा. विसस.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसअता – २०२६/ प्र.क्र.१२२ / गृनिधो – २, दि.- २२/०५/२०२६.

टिप्पणी :

अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून गिरणी कामगारांकरिता प्राप्त होणाऱ्या सदनिका

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून गिरणी कामगारांकरिता प्राप्त होणाऱ्या घरांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	प्रस्तावित सदनिकांचे ठिकाण व तपशील	प्रस्तावित सदनिकांची संख्या
१.	टाटा हौसिंग लिमिटेड, रांजनोळी, रायचूर, जि.ठाणे	१२४४
२.	विनय अगरवाल, शिलोटर, रायचूर, जि.ठाणे	१०१९
३.	मे. सान्वो व्हिलेज, कोल्हे, ता. पनवेल, जि. रायगड	२५८
	एकूण	२,५२१

सदर घरे बंद असून नादुरुस्त, खराब अवस्थेत असल्याने, घरे दुरुस्त केल्यानंतरच सोडत काढण्यात यावी, अशी मागणी गिरणी कामगार कृती संघटनेने केलेली आहे.

एम.एम.आर.डी.ए. कडून गिरणी कामगारांकरीता उपलब्ध होणाऱ्या, टाटा हौ. को. लि., रांजनोळी, रायचूर जि. ठाणे येथील इमारतींची व परिसराची दिनांक १६/०५/२०२५ रोजी म्हाडा व एम.एम.आर.डी.ए. चे संबंधीत अधिकारी यांच्यासमवेत संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली आहे.

यापूर्वी, कोन पनवेल येथील रेंटल हौसिंग प्रकल्पात दुरुस्ती करताना अनेक अडचणीं उद्भवल्या जसे की, दुरुस्ती विषयक बाबी, विद्युत देयके थकबाकी, पाणीपुरवठा, देखभाल व त्यासंबंधीत खर्च, एमआयडीसी सोबत पाणीपुरवठ्याकरीता एम.एम.आर.डी.ए. चा करारनामा, STP जुना व नादुरुस्त, मुख्य जलवाहिनी गंजलेल्या अवस्थेत, टेरेसवरील लूप लाईन, व्हॉल खराब / नादुरुस्त, सुरक्षाविषयक बाबी, कोविड काळातील महानगरपालिकेचे साहित्याची विल्हेवाट व इतर तत्सम कामांचा अनावश्यक आर्थिक भार म्हाडावर पडलेला आहे. या प्रकल्पातही तशाच अडचणी येऊ शकतात.

सदर अनुषंगाने, टाटा हौ. को. लि., रांजनोळी, रायचूर जि. ठाणे येथील सदनिकांची, इमारतींची व सुविधांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

File No MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

1. बाह्य पायाभूत सुविधा (External Infrastructure): रस्ते, ड्रेनेज सिस्टम, आणि वीज वाहिनी यासारख्या मूलभूत सुविधांची कामे पूर्णपणे केलेली नसल्याचे तसेच ड्रेनेज सिस्टम, आणि वीज वाहिनी वापरात नसल्यामुळे कार्यरत नसल्याचे आढळून आले आहे.
2. मलनिस्सारण प्रकल्प (STP) : Sewage Treatment Plant (STP) जुना व नादुरुस्त असून तो पाण्याने भरल्याचे निदर्शनास आले, त्यामुळे तो संपूर्णपणे नव्याने कार्यान्वित करणे आवश्यक आहे.
3. पाणीपुरवठा आणि उद्वाहक व्यवस्था : सदयस्थितीत पाणीपुरवठा नियमितपणे सुरु नसून, सुरळीत पाणीपुरवठयाकरिता करारनामा अथवा इतर तत्सम कार्यवाही एम.एम.आर.डी.ए. स्तरावर प्रलंबित आहे. दोन्ही इमारतींसाठी एकूण ८ उद्वाहक असून, ८ पैकी फक्त २ उद्वाहक कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे.
4. कोविड- १९ सामग्रीची समस्या : सदर सदनिका ह्या कोविड रुग्णांसाठी वापण्यात आल्यामुळे इमारतीमध्ये व परिसरात कोविड- १९ संबंधित साहित्य (जसे की बेड, वैद्यकीय उपकरणे इ.) अजूनही पडून असल्याने या सामग्रीची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.
5. जनरेटर व्यवस्था : एम.एम.आर.डी.ए.च्या प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीनुसार दोन्ही इमारतीसाठी २ जनरेटर आहेत, परंतु, त्यापैकी कोणताही जनरेटर कार्यरत नसल्याचे दिसून आले. तरी सदर ठिकाणी नवीन जनरेटर बसविणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी वीज पुरवठा बंद पडल्यास पर्यायी उर्जा स्रोत उपलब्ध नाही.
6. पाणी पंपिंग स्टेशन आणि पाणीपुरवठा : इमारतीमध्ये ब-याचश्या कालावधीपासून कोणी वास्तव्यास नसल्यामुळे पाणीपुरवठा प्रणाली बंद आहे. तसेच सदर पाणी पुरवठा वाहिनी बांधकामाचा कालावधी सुमारे ७ ते ८ वर्षे आधीचा असल्यामुळे पाणी पुरवठ्याकरिता नवीन पंप बसविणे आवश्यक असून पाणीपुरवठा वाहिनीची पूर्ण पाण्याच्या दाबानुसार चाचणी होणे आवश्यक आहे.
7. इतर किरकोळ दुरुस्ती : इमारतीच्या बाहेरील बाजूस भेगा / चिरा दिसून येत असून, त्याची दुरुस्ती व इमारतीस बाहेरुन रंगकाम, सदनिका किरकोळ दुरुस्त्या करून राहण्यायोग्य करणे आवश्यक आहेत.
8. ना हरकत प्रमाणपत्र / नो ड्यूज सर्टिफिकेट्सची आवश्यकता : पाणी बिल आणि वैयक्तिक विद्युत मीटर जोडणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र तसेच नो ड्यूज सर्टिफिकेट्स, पूर्वीची विद्युत देयके भरणे आवश्यक आहे.

दि.१३.०३.२०२६ रोजी मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगारांच्या विविध संघटनांची बैठक विधानमंडळात पार पडली असून बैठकीमध्ये, सदर घरांची दुरुस्ती म्हाडाने करायची की एमएमआरडीएने वर याबाबत चर्चा झाली. व चर्चेच्या अनुषंगाने मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी खालीलप्रमाणे आदेश निर्देशित केले आहेत.

"MMRDA मार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारी ठाणे व रायगड जिल्ह्यातील २५२१ घरे दुरुस्ती करण्याबाबतची कार्यवाही MMRDA ने त्वरीत करावी. दरम्यानच्या कालावधीत म्हाडा प्राधिकरणाने सदर घरांची सोडत काढावी."

ब) मुंबईस्थित, म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिका.

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५१६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांपैकी, ३७ गिरण्यांच्या पुनर्विकासास मंजुरी प्राप्त आहे. ११ गिरण्यांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त नसल्यामुळे जमिनीमधील म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही व १० गिरण्यांमध्ये नविन डी. सी. आर. नुसार म्हाडाचा

File No. MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

वाटा निरक आहे.

म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांपैकी ३३ गिरण्यांच्या १३.७८ हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा म्हाडास प्राप्त आहे. ४ गिरण्यांच्या जमिनीचा म्हाडास प्रत्यक्ष ताबा प्राप्त झालेला नाही. ३३ गिरण्यांपैकी २६ गिरण्यांच्या जमिनीवर म्हाडाकडून ३ टप्प्यात १३,४५३ गिरणी कामगार सदनिकांचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या १३,४५३ सदनिका तसेच, एम.एम.आर.डी.ए. च्या कोनगाव येथील २,४१७ रेंटल हौसिंग सदनिका, अशाप्रकारे एकूण १५,८७० सदनिकांची सोडत प्रक्रिया म्हाडामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत दि.३१.०५.२०२६ पर्यंत, १४,४३४ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरीत करण्यात आल्या असून, १,४३६ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे.

गिरणी विभाग/मुंबई मंडळातर्फे आजमितीपर्यंत काढण्यात आलेल्या गिरणी कामगार सदनिका सोडतीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सोडत क्र.	सोडत दिनांक	सदनिका संख्या	शेरा
सोडत क्र. १	दि.२८/०६/२०१२	६९२५	म्हाडा (१८ गिरणी)
सोडत क्र. २	दि०९/०५/२०१६	२६३४	म्हाडा (०६ गिरणी)
सोडत क्र. ३	दि.०२/१२/२०१६	२४१७	एम.एम.आर.डी.ए. (कोनगाव रेंटल हौसिंग)
सोडत क्र. ३	दि.०१/०३/२०२०	३८९४	म्हाडा (०२ गिरणी)
नोंद : एकूण २६ गिरण्यांच्या जमिनीवर १३,४५३ गिरणी सदनिका व एम.एम.आर.डी.ए. च्या कोनगाव येथील २४१७ रेंटल हौसिंग सदनिका असे एकूण १५,८७० सदनिकांची सोडत काढण्यात आलेली आहे. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत १४,४३४ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरीत करण्यात आल्या असून, १,४३६ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत, न्यु ग्रेट इस्टर्न मिल, भायखळा येथील अंदाजीत ९६ गिरणी कामगार व बॉम्बे डाईंग मिल, नायगाव – दादर येथील १६० गिरणी कामगार सदनिका असे एकूण सदनिकांची सोडत काढणे प्रस्तावित आहे.			

क) गिरणी कामगार / वारस यांच्या अर्जांचा तपशील

एकूण १,५०,४८४ गिरणी कामगार / वारसांनी घरांकरिता अर्ज दाखल केले आहेत. सदर प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने, मा. मुख्य सचिव यांच्या आदेशान्वये गिरणी कामगारांची पात्रता निश्चिती करणेबाबत विशेष मोहिमेअंतर्गत ऑनलाईन व ऑफलाईन प्रक्रीया राबविण्यात येत आहे. त्याबाबतचा, दि.३१.०५.२०२६ पर्यंतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

File No. MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

पात्रतेकरिता एकूण प्राप्त अर्ज	पात्र गिरणी कामगार संख्या	अंतिम अपात्र गिरणी कामगार संख्या	कामगार अधिकारी यांचेमार्फत कार्यवाही सुरु असलेले अर्ज	विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्याने अपात्र ठरलेले गिरणी कामगार
१,०९,४६४	१,००,९०४	१,०१२	५९७	६,९५१

अदयाप घरांकरिता अर्ज दाखल न केलेल्या कामगारांच्या अनुषंगाने, मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.०२/०२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नवीन अर्ज न स्वीकारणे बाबत निर्णय झालेला आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:07:07

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

प्रश्न उत्तरे

विषयः विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २४२५२
गिरणी कामगारांसाठी मुंबईमध्ये असलेली घरे सोडतीविना पडून असल्याबाबत.
श्री. शिवाजी पाटील मा. विसस व इतर मा. विसस.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसअता – २०२६/ प्र.क्र.१२२ / गृनिधो – २, दि.- २२/०५/२०२६.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) गिरणी कामगारांसाठी राखून ठेवलेली २,५२१ घरे गेल्या अनेक वर्षांपासून सोडतीविना बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,	होय, हे खरे आहे.
२.	असल्यास, रांजणोली (ठाणे) येथील १,२४४, शिलोत्तर (रायगड) येथील १,०१९ आणि कोल्हे (पनवेल) येथील २५८ घरे अत्यंत नादुरुस्त आणि राहण्यायोग्य नसलेल्या स्थितीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,	होय, हे खरे आहे.
३.	असल्यास, कोरोना काळात या घरांचा वापर 'विलगीकरण केंद्रांसाठी' केल्यामुळे झालेल्या पडझडीची दुरुस्ती म्हाडाने करायची की एमएमआरडीएने, या वादात घरांचे वाटप करण्याचे प्रलंबित असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,	सदरबाब एमएमआरडीए प्राधिकरणाशी संबंधित आहे.
४.	असल्यास, आतापर्यंत किती गिरणी कामगारांना हक्काची घरे देण्यात आली असून किती गिरणी कामगार घरापासून वंचित आहेत, किती कामगारांच्या वारसांनी अर्ज दाखल केले आहेत तसेच प्रलंबित असलेल्या, अदयाप घरांकरिता अर्ज दाखल न केलेल्या कामगारांच्या वारसांकरिता कधीपर्यंत अर्ज भरुन घेण्यात येणार आहे.	1. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत आजमितीपर्यंत १५,८७० सदनिकांची सोडत काढण्यात आली असून, त्यापैकी १४,४३४ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरीत करण्यात आल्या असून, १,४३६ गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे. 2. मुंबई मंडळाच्या गिरणी विभागाकडे, एकूण १,५०,४८४ गिरणी कामगार / वारसांनी

File No. MHADA-MHAD012/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

		घराकारंता अजे सादर केले आहेत. मा. मुख्य सचिव यांच्या आदेशानुसार, पात्रता निश्चिती विशेष मोहिम राबविण्यात आली असता, ऑफलाईन / ऑनलाईन प्रक्रियेद्वारे दि.३१.०५.२०२६ पर्यंत एकूण १,०९,४६४ अर्ज गिरणी कामगार / वारस यांच्याकडून गिरणी विभागाकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १,००,९०४ अर्ज पात्र झाले असून, ६,९५१ अर्ज विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्याने अपात्र, १,०१२ अर्ज अंतिम अपात्र ठरले आहेत व ५९७ अर्जांवर कामगार अधिकारी यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. 3. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि. ०२/०२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नवीन अर्ज न स्वीकारणे बाबत निर्णय झालेला आहे.
५.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पडझड झालेली घरे दुरुस्त करून त्यांचा ताबा म्हाडाकडे देऊन पात्र गिरणी कामगारांना या घरांची सोडत जाहीर करण्यासाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?	दि.१३.०३.२०२६ रोजी मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगारांच्या विविध संघटनांची बैठक विधानमंडळात पार पडली असून, सदर अनुषंगाने मुद्दा क्र.५ वर याबाबत चर्चा झाली. त्याबाबतचे आदेश पुढीलप्रमाणे निर्गमित आहेत. "MMRDA मार्फत उपलब्ध करुन देण्यात येणारी ठाणे व रायगड जिल्ह्यातील २५२१ घरे दुरुस्ती करण्याबाबतची कार्यवाही MMRDA ने त्वरीत करावी. दरम्यानच्या कालावधीत म्हाडा प्राधिकरणाने सदर घरांची सोडत काढावी."

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:07:41

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHADO12/2241/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3242819)

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

[म्हाडाचा घटक]

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

कक्ष क्र.341, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पुर्व], मुंबई -51.

म्हाडा MHADA

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - 400032.

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. 24901
विक्रोळीतील कन्नमवार नगर -2 येथील गाळेधारकांना गाळे निवासी दराप्रमाणे देण्याबाबत.

श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ: कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र- 2026/ प्र.क्र.118 गृनिप,दि.20/05/2026

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. 24901 च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:03:28

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. 24901

विक्रोळीतील कन्नमवार नगर -2 येथील गाळेधारकांना गाळे निवासी दराप्रमाणे देण्याबाबत.

श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ: कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र- 2026/ प्र.क्र.118 गृनिप,दि.20/05/2026

शाखा : कार्यकारी अभियंता / कुर्ला.वि./मुं.मं.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	कन्नमवार नगर [विक्रोळी)-२ येथील गाळेधारक गेली ५० ते ६० वर्षापासून व्यवसाय करत असून त्यांनी निवासीगाळे मिळण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप कोणतीच दखल घेण्यात आलेली नाही, हेखरे आहे काय,	नाही, हे खरे नाही कन्नमवार नगर येथील म्हाडाच्या संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्पात अडथळा ठरणारे अनधिकृत गाळे हे मूळ पुनर्वसन इमारतीचा भाग नसले, तरी त्यांच्या उदरनिर्वाहाचा विचार करून म्हाडा प्रशासनाकडून त्यांच्या पुनर्वसनाबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे
2	असल्यास , यासंदर्भात ३ मार्च, २०२५ व दि. १३ जून, २०२५ रोजी दोन बैठका होऊनही सदर बैठकांमध्ये प्राधिकरण ठराव दि. २९/०२/२०२४ नुसार निवासी दराप्रमाणे गाळेधारकांना गाळेविक्री किंमत आकारणी करून ठरलेले असताना अद्यापी गाळेधारकांना वाणिज्य दर रु . १९०००/- प्रती चौरस फुट प्रमाणे गाळे देणार आहेत , हे ही खरे आहे काय,	हे अंशत: खरे आहे कन्नमवार नगर , विक्रोळी येथील म्हाडाच्या संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्पात रस्त्यालगत असलेली अनधिकृत बांधकामे (गाळे) मुख्य अडथळा ठरत आहेत . हे गाळेधारक मूळ इमारतीचा भाग नसून , त्यांच्यामुळे प्रकल्पातील बहुमजली इमारतींची तळमजल्यावरील नियोजित कामे , पोडीयम पार्कींग, भूमिगत पिण्याच्या पाण्याच्या टाक्या , पाणीपुरवठा /मलनि:स्सारण / विद्युत व्यवस्था . बहुमजली पार्कींग टॉवर , इमारतीच्या अनुषंगीक बाह्य सेवासुविधांची सर्व कामे संरक्षण भिंती, विकास आरखड्यानुसार भुखंड विकसीत करणे इ . कामे रखडली आहेत. म्हाडा कायदा कलम ९५ अ (३) अन्वये, सर्वेक्षणा अंती आढळलेल्या सुमारे १७९ अनधिकृत गाळेधारकांना १८ सप्टेंबर २०२३ रोजी निष्कासनाची सुचना (नोटीस) बजावण्यात आली होती. मात्र, विविध लोकप्रतिनिधीं मार्फत त्यांच्या उ दरनिर्वाहाचा विचार करून पुनर्वसनाची मागणी करण्यात आली होती. म्हाडाचा विक्री विनियमानुसार अनिवासी गाळ्यांचे वाटप लिलावाद्वारे होणे बंधनकारक असते . परंतु, प्रकल्पातील अडथळा दूर करण्यासाठी म्हाडाने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष ठराव ,ठराव क्र. ७०९२ (दि. २९.०२.२०२४) करून या गाळेधारकांना निवासी शीघ्रगणक दराच्या २.५ पट दराने थेट गाळे देण्याचे निश्चित केले होते.

		प्रस्तुत प्रश्नात नमूद केलेल्या बैठका मा . उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली , लोकप्रतिनिधी आणि प्रकल्पबाधित अनधिकृत गाळेधारकांच्या प्रतिनिधीसोबत संप न झाल्या . या बैठकीमध्ये लोकप्रतिनिधी व गाळेधारकांच्या प्रतिनिधींनी ठराव क्र. ७०९२ (दि. २९/०२/२०२४) नुसार कन्नमवार नगर येथील म्हाडा प्रकल्पातील पूर्ण झालेल्या /प्रगतीपथावरील इमारतींमधील तळमजल्यावरील गाळे वितरणासाठी निश्चित केलेला चालू रेडी रेकनर दराच्या २.५ पट दर भरण्यास असमर्थता दर्शविली होती आणि प्रत्यक्ष दर कमी होईपर्यंत तात्पुरत्या स्थलांतरणास विरोध केला होता. सदर प्रकल्पातील बहुमजली इमारतींमधील तळमजल्यावरील दुकानी गाळे केवळ बांधकाम खर्चात वितरित करण्याचे म्हाडाचे धोरण नसल्याने , तसेच दराबाबतचा मूळ निर्णय प्राधिकरण स्तरावर झाला असल्याने , तो कमी करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव प्राधिकरणासमोर मांडण्याचे निर्देश माननीय उपाध्यक्षांनी दिले होते. तद्नुसार, प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत हा प्रस्ताव मांडण्यात आला असून, ठराव क्र. ७१२७ (दि. १८/०९/२०२५) अन्वये प्रकल्पबाधि त गाळेधारकांना म्हाडा प्रकल्पातील पूर्ण झालेल्या/प्रगतीपथावरील इमारतीमधील तळमजल्यावरील अनिवासी गाळे , चालू शीघ्रगणकातील (Ready Reckoner) व्यावसायिक दराने वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कन्नमवार नगर विक्रोळी येथील अनिवासी गाळ्यांचा जागेचा तळमजल्यावरील दुकानी गाळ्यांचा चालू शिघ्रगणक दर रु . 1,88,770/- प्रती चौ .मी. म्हणजेच रु . 17,537.32/-प्रती चौ . फुट आहे
3	असल्यास, सदर दर परवडणारा नसत्याने याबाबत फेरविचार करुन निवासी दराने शासन गाळेधारकांना गाळे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.	उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन , म्हाडा प्राधिकरणाने खालीलप्रमाणे सुधारित कार्यवाही केली आहे, प्राधिकरणाच्या दि . १८/०९/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ७१२७ नुसार, गाळेधारकांना आता निवासी दराच्या अडीच पट ऐवजी 'तळ मजल्यावरील दुकानी गाळ्यांच्या शीघ्रगणक (Ready Reckoner) दराने' गाळे देण्याचे निश्चित झाले असून, इतर सर्व तांत्रिक कार्यप्रणाली पूर्वीच्या ठराव ७०९२ नुसार कायम ठेवण्यात आली आहे. या निर्णयानुसार गाळेधारकांना दि. १५.०५.२०२६ रोजी सुधारित तात्पुरते देकारपत्रे वितरित करण्यात आली असून, त्यातील रक्कमेचा भरणा केल्यानंतरच

		नवीन गाळ्यांचा ताबा दिला जाईल . दरम्यान, या प्रकल्पातील बहुमजली इमारतीतील निवासी सदनिकांची अधिकृत जाहिरातही प्रसिद्ध करण्यात आली असून इमारतीचे बांधकाम वेगाने सुरू असतानाच आता आगामी पावसाळा तोंडावर आला आहे . पावसाळ्यात वादळी वारा आणि पावसामुळे उंचीवरून बांधकाम साहित्य पडून किंवा अन्य कोणतीही मोठी दुर्घटना होऊन गंभीर जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता होती . त्यामुळे मानवी सुरक्षेचा अत्यंत तातडीचा उपाय म्हणून , म्हाडामार्फत दि . २५.०५.२०२६ ते २७.०५.२०२६ या कालावधीत पोलीस बंदोबस्तात सदर गाळे सुरक्षित पणे निष्कासित करण्यात आले आहेत.
4	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उदभवत नाही

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:04:49

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. 24901

विक्रोळीतील कन्नमवार नगर -2 येथील गाळेधारकांना गाळे निवासी दराप्रमाणे देण्याबाबत.

श्री.सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ: कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र- 2026/ प्र.क्र.118 गृनिप,दि.20/05/2026

म्हाडा मार्फत कन्नमवार नगर , विक्रोळी येथील म्हाडाच्या जुन्या धोकादायक संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे. कन्नमवार नगर, विक्रोळी येथील म्हाडाच्या संक्रमण शिबी राचा पुनर्वसन प्रकल्पात रस्त्यालगत असलेली अनधिकृत बांधकामे (गाळे) मुख्य अडथळा ठरत होती .हे गाळेधारक मूळ इमारतीचा भाग नसून , त्यांच्यामुळे प्रकल्पातील बहुमजली इमारतींची तळमजल्यावरील नियोजित कामे , पोडीयम पार्कींग भुमिगत पिण्याच्या पाण्याच्या टाक्या , पाणीपुरवठा /मलनि:स्सारण / विद्युत व्यवस्था, बहुमजली पार्कींग टॉवर, इमारतीच्या अनुषंगीक बाह्य सेवासुविधांची सर्व कामे , संरक्षण भिंती, विकास आराखड्यानुसार भुखंड विकसीत करणे इ. कामे रखडली आहेत.

म्हाडा कायदा कलम ९५ अ (३) अन्वये, सर्वेक्षणा नुसार आढळलेल्या सुमारे १७९ अनधिकृत गाळेधारकांना १८ सप्टेंबर २०२३ रोजी निष्कासनाची सुचना (नोटीस) बजावण्यात आली होती . मात्र, विविध लोकप्रतिनिधीं मार्फत त्यांच्या उदरनिर्वाहाचा विचार करून पुनर्वसनाची मागणी करण्यात आली होती.

म्हाडाचा विक्री विनियमानुसार अनिवासी गाळ्यांचे वाटप लिलावाद्वारे होणे बंधनकारक असते . परंतु, प्रकल्पातील अडथळा दूर करण्यासाठी म्हाडाने २९ फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष ठराव ठराव क्र . ७०९२ (दि. २९.०२.२०२४) करून या गाळेधारकांना निवासी शीघ्रगणक दराच्या २.५ पट दराने थेट गाळे देण्याचे निश्चित केले होते.

तथापि मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली , लोकप्रतिनिधी आणि प्रकल्पबाधित अनधिकृत गाळेधारकांच्या प्रतिनिधींसोबत ३ मार्च २०२५ च्या बैठकीमध्ये लोकप्रतिनिधी व गाळेधारकांच्या प्रतिनिधींनी ठराव क्र. ७०९२ (दि. २९/०२/२०२४) नुसार कन्नमवार नगर येथील म्हाडा प्रकल्पातील पूर्ण झालेल्या /प्रगतीपथावरील इमारतीमधील तळमजल्यावरील गाळे वितरणासाठी निश्चित केलेला चालू शीघ्रगणक दराच्या २.५ पट दर भरण्यास असमर्थता दर्शविली होती आणि प्रत्यक्ष दर कमी होईपर्यंत तात्पुरत्या स्थलांतरणास विरोध केला होता.

गाळेधारकांनी २.५ पट दर भरण्यास आणि तात्पुरत्या शेडमध्ये जाण्यास असमर्थता दर्शविली होती . म्हाडा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की , प्रकल्पातील प्रगतीपथावर / पूर्ण झालेल्या इमारतीत तळमजल्यावर असलेल्या दुका नी गाळे हे 'अनिवासी' असल्याने ते केवळ बांधकाम खर्चात देता येणार नाहीत . तथापि, गाळेधारकांच्या मागणीनुसार दर कमी करण्याबाबत पुनर्विचार करण्याचे निर्देश माननीय उपाध्यक्ष यांनी दिले होते.

दि. १३ जून २०२५ रोजी झालेल्या मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली, लोकप्रतिनिधी आणि प्रकल्पबाधित अनधिकृत गाळेधारकांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत माननीय उपाध्यक्षांनी अवगत केले की , ३ मार्चच्या चर्चेनुसार सदर किंमती बाबत प्राधिकरण स्तरावर निर्णय झाला असल्याने प्राधिकरण स्तरावरच दर कमी करणे संयुक्तिक आ हे. तद्नुसार दर कमी करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे . आता २.५ पट निवासी दराऐवजी, अनिवासी रेडी रेकनर दर आकारण्याचा सुधारित ठराव प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत मांडला गेला

सदर गाळेधारकांना अनिवासी गाळे वितरित होणार असल्याने , अनिवासी दरापेक्षा कमी दर आकारणे संयुक्तिक ठरणार नाही; ही बाब विचारात घेऊन प्राधिकरणाने तळमजल्यावरील अनिवासी दराने आकारणी करण्यास प्राधिकरणाच्या दि . १८/०९/२०२५ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ७१२७ मंजूर करण्यात आला आहे.

या निर्णयानुसार, गाळेधारकांना आता निवासी दराच्या अडीच पट ऐवजी 'तळ मजल्यावरील दुकानी गाळ्यांच्या शीघ्रगणक (Ready Reckoner) दराने' गाळे देण्याचे निश्चित करण्यात आले आहे . यामुळे गाळेधारकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. तसेच दराव्यतिरिक्त इतर सर्व तांत्रिक कार्यप्रणाली (ठराव ७०९२ नुसार) कायम ठेवण्यात आली आहे.

प्राधिकरणाच्या दि. १८/०९/२०२५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र . ७१२७ नुसार, गाळेधारकांना आता निवासी दराच्या अडीच पट ऐवजी 'तळ मजल्यावरील दुकानी गाळ्यांच्या शीघ्रगणक (Ready Reckoner) दराने' गाळे देण्याचे निश्चित झाले असून, इतर सर्व तांत्रिक कार्यप्रणाली पूर्वीच्या ठराव ७०९२ नुसार कायम ठेवण्यात आली आहे. या निर्णयानुसार गाळेधारकांना दि. १५.०५.२०२६ रोजी सुधारित तात्पुरते देकारपत्रे वितरित करण्यात आली असून , त्यातील रक्कमेचा भरणा केल्यानंतरच नवीन गाळ्यांचा ताबा दिला जाईल . दरम्यान, या प्रकल्पातील बहुमजली इमारतील निवासी सदनिकांची अधिकृत जाहिरातही प्रसिद्ध करण्यात आली असून इमारतीचे बांधकाम वेगाने सुरू असतानाच आता आगामी पावसाळा तोंडावर आला आहे . पावसाळ्यात वादळी वारा आणि पावसामुळे उंचीवरून बांधकाम साहित्य पडून किंवा अन्य कोणतीही मोठी दुर्घटना होऊन गंभीर जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता होती . त्यामुळे मानवी सुरक्षेचा अत्यंत तातडीचा उपाय म्हणून , म्हाडामार्फत दि . २५.०५.२०२६ ते २७.०५.२०२६ या कालावधीत पोलीस बंदोबस्तात सदर गाळे सुरक्षितपणे निष्कासित करण्यात आले आहेत

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
19:05:49

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

[म्हाडाचा घटक]

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

कक्ष क्र.341, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पुर्व], मुंबई -51.

म्हाडा MHADA

जा.क्र. का.अ./कु.वि./मुं.मं./ /2026.

दिनांक :

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरुचौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - 400032.

विषय:- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.25826**
टागोर नगर म्हाडा वसाहत येथील ग्रुप क्र.1 ते 8 बी चाळी क्र.55 ते 408 येथील ना दुरुस्त गटारे तात्काळ दुरुस्त करणेबाबत.
श्री. सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अताप्र 2026/ प्र.क्र.122 गृनिप,दि. 20/05/2026

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. 25826 च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिप्पणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:44:25
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.25826

टागोर नगर म्हाडा वसाहत येथील ग्रुप क्र.1 ते 8 बीचाळी क्र.55 ते 408 येथील ना दुरुस्त गटारे तात्काळ दुरुस्त करणेबाबत.

श्री. सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अताप्र 2026/ प्र.क्र.122 गृनिप,दि. 20/05/2026

अ. क्र.	प्रश्न	उत्तर
1	टागोर नगर येथील म्हाडा वसाहत ग्रुप 1 ते 8, चाळी क्र.55 ते 408 येथे 2900 असून या वसाहतीचे 1962 मध्ये बांधकाम झाल्यापासून आजतागायत वसाहतीतील गटारांची दुरुस्ती व नुतनीकरण करण्यात आले नसल्याचे माहे जाने 2026 मध्ये उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,	नाही , हे खरे नाही.
2	असल्यास, सद्यस्थितीत वसाहतीतील गटारांची अवस्था अत्यंत दयनीय व धोकादायक झालेली आहे हे ही खरे आहे काय,	नाही ,हेखरे नाही. टागोर नगर ,म्हाडा वसाहतीतील मलनिस:स्सारण व्यवस्था म्हाडाने दि. 10.01.2024 रोजी बृहन्मुंबई महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्यापुर्वी सदर गटारांची देखभाल व दुरुस्ती म्हाडा मार्फत करण्यात येत होती व ते सुस्थितीत होते.
3	तसेच गटारांची बरेच दिवस साफसफाई न झाल्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरलेली असून आजुबाजुच्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,	नाही , हे खरे नाही. गटारांची साफसफाई करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची आहे.
4	असल्यास, उक्त प्रकरणी	सन 2018 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात म्हाडाच्या 56

	शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सदर गटारांची तात्काळ दुरुस्ती व नुतनीकरण करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	वसाहतीमधील मलनिस्सारण वाहिनी व इतर सोयी सुविधांची कामे म्हाडाने करावी की, बृहन्मुंबई महानगरपलिकेने करावी याबाबत प्रश्न उपस्थित झाला होता. सन 2018 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील आश्वासन क्र. 158 च्या उत्तरादाखल म्हाड प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले होते की, शासनाच्या दि. 23/05/2018 च्या अधिसुचनेद्वारे म्हाडा प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील केवळ प्रकरण-4 मधील तरतुदींनुसार नियोजन / प्राधिकरण शक्ती प्रदान करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुंबई शहर व उपनगरासाठी,प्रनियो/प्राधिकरण म्हणून मुंबई महानगरपालिका कार्यरत आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील प्रकरण 4 वगळता इतर सर्व प्रकरणातील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे. तसेच, म्हाडा वसाहतींतील इमारतींचे विविध प्रकारचे शुल्क (जसे की, Off-site Infrastructure charges, Development Charges, Fungible FSI Charges) म्हाडाकडून मुंबई म.न.पा. स वर्ग करण्यात येत असल्याने मुंबई म.न.पा. ने आवश्यक विकास काम करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. 18.01.2021 रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभागाच्या मान्यतेने मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका यांना म्हाडाच्या 56 वसाहतीमधील मलनि:स्सारण वाहिनी व इतर सोई सुविधा विषयक कामे मुंबई महानगरपालिकेने करणे आवश्यक असल्याचे कळविले होते. त्याअनुषंगाने सन 2018 च्या आधिवेशनात उपस्थित झालेल्या प्रश्नास उपरोक्त नमूद दि 18.01.2021 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा. आयुक्त मुंबई महानगरपालिका यांनी सदर बाबत शासनाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका धोरण तयार करुन धोरणानुसार इतर विशेष प्राधिकरणाच्या वसाहतीत जल अभियंता विभाग व मल:निस्सारण विभागाद्वारे आवश्यक सोईसुविधांची कामे करतील असे उत्तर दि.26/02/2021 च्या पत्राद्वारे आधिवेशनात सादर केले. मुंबई महापालिकेतर्फे देण्यात आलेल्या सदर उत्तराच्या अनुषंगाने मुख्य अभियंता [वि.आ. (DP)] बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. 17.08.2021 च्या पत्रान्वये म्हाडा वसाहतीमधील मुलभूत सुविधाचे उन्नतीकरण व दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव हाती घेण्यास्तव अर्थसंकल्पिय तरतूद करण्याबाबतचे मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेच्या विविध विभागांना दिलेल्या आहेत.

		तसेच म्हाडामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस जून 2018 ते मार्च 2023 पर्यंत सुमारे 1806.35 कोटी एफएसआय प्रिमियम, इंफ्रास्ट्रक्चरल चार्जेस व विकास खर्चापोटी जमा केलेले आहेत व सदर बाब मुंबई महापालिकेस दि. 05/01/2024 च्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले असुन उन्नतीकरणाबाबत शासनाकडून जे निर्देश प्राप्त होतील ते म्हाडा व मनपा या दोन्हीस लागु होतील या अटीवर मलनि:स्सारण वाहिन्यांची देखभाल, दुरुस्ती व उन्नतीकरणाची कार्यवाही त्वरीत हाती घेण्यात यावी अशी विनंती केली होती. यास अनुसरुन बृहन्मुंबई महानगर पालिकेकडुन एस विभागातील कन्नमवार नगर व टागोरनगर म्हाडा वसाहतीतील मलनिस:स्सारण व्यवस्था दि. 10.01.2024 रोजी हस्तांतरीत करुन घेण्यात आल्या आहेत . हस्तांतरण झाल्यामुळे या व्यवस्थेची देखभाल -दुरुस्ती व पावसाळ्यापूर्वीची साफसफाई करण्याची जबाबदारी सद्यस्थिती त पूर्णतः महानगरपालिकेची आहे. मा.आयुक्त, बृहन्मुबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.MGC/F/8618 दि. २४.११.२०२५ व दि. २७.०३.२०२६ रोजीचे पत्रात नमूद के ल्याप्रमाणे ,कन्नमवार नगर येथील मलनि:सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणापोटी १८०.८१ व टागोर नगर करिता ८५.८० कोटी खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे व त्या पैकी १३३.३० कोटी बृहन्मुबई मनपास अदा करण्याचे कळविले आहे व सदर रक्कम प्राप्त होताच निविदा मागविण्याचे देखील कळविले आहे तथापि, म्हाडाने जून २०१८ पासून म्हाडा वसाहतींतील इमारतींचे विविध प्रकारचे शुल्क (Off-site Infrastructure charges, Development Charges, etc.) म्हाडाकडून मुंबई म.न.पा. स जमा करण्यात येत आहेत. म्हाडाने नियोजन प्राधिकरण म्हणून वसुली केलेल्या र कमेतील मोठा हिस्सा पालिकेला दिला जात असताना , पुन्हा मलनि:सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणापोटी स्वतंत्रपणे निधीची मागणी करणे म्हाडावर अन्यायकारक आहे . बृहन्मुंबई महानगरपालिकेने MGC/F/8618 दि. २७.०३.२०२६ रोजी मागणी केलेल्या १३३.३० कोटी रकमेच्या पुष्टतेसाठी अ द्याप कोणतेही सविस्तर अंदाजपत्रक किंवा नकाशे म्हाडाला सादर केलेले नाहीत. शासन स्तरावर जो निर्णय होईल तो म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका या दोन्ही संस्थांना लागू राहील , या अटीवर म्हाडाने यापूर्वीच उन्नतीकरणाची कार्यवाही त्वरित हाती घेण्याची विनं ती

		महानगरपालिकेला केली आहे . सदर वसाहतींमधील मलनिस्सारण व्यवस्था दि . १०.०१.२०२४ रोजीच महानगरपालिकेकडे रितसर हस्तांतरित करण्यात आलेली असल्याने, जनहित आणि आरोग्याचा प्रश्न विचारात घेऊन , महानगरपालिकेने निधीच्या तांत्रिक बाबी किंवा पत्रव्यवहार प्रलंबित न ठेवता , संबंधित मलनिस्सारण वाहिन्यांची देखभाल, दुरुस्ती व उन्नतीकरणाचे काम तातडीने सुरू करणे अपेक्षित आहे.
5	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?.	निरंक

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:46:13

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

पुरक टिप्पणी :-

विषय:- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.25826
टागोर नगर म्हाडा वसाहत येथील ग्रुप क्र.1 ते 8 बी चाळी क्र.55 ते 408 येथील ना दुरुस्त गटारे तात्काळ दुरुस्त करणेबाबत.
श्री. सुनिल राऊत , मा.वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र 2026/ प्र.क्र.122 गृनिप,दि.20/05/2026

टागोरनगर, विक्रोळी येथील न. भू. क्र. 123 ते 141,147,149 ते 180,242,282,287,288, 291,ते 355 येथे 67.86 हेक्टर जमिनीवर म्हाडा वसाहत सन 1960 च्या दरम्यान बांधलेली आहे. या वसाहतीत गलिच्छ वस्ती निर्मुलन योजने अंतर्गत मुलत: भाडे तत्वावर असलेले 2966 बैठ्या स्वरुपातील गाळे असुन सदर गाळ्यापैकी काहीगाळे महानगरपालिका, शासन ,व इतर सार्वजनिक संस्था यांना देखील वितरीत केलेले आहेत. सद्यस्थितीत या बैठीगाळ्याचे गृप क्र 1 ते 8 असे भौगोलीक विभाजन आहे. तसेच याच वसाहतीत 65 इमारती आहेत. सदर बहुतांश बैठ्याचाळीतील सदनिकांच्या जोत्याची उंचीही वसाहतीतील नव्याने झालेल्या रस्ते व पर्जन्य जलवाहिन्यां पेक्षा कमी असल्याने तसेच वसाहतीतील बहुतांश गाळेधारक घरगुती कचरा इ. सदर गटारे तथा मलनि:सारण वाहिन्यांमध्ये टाकत असल्याने गटारे तुंबली जातात.

सन 2018 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात म्हाडाच्या 56 वसाहतीमधील मल:निस्सारण वाहिनी व इतर सोयी सुविधाची कामे म्हाडाने करावी की, बृहन्मुंबई महानगरपलिकेने करावी याबाबत प्रश्न उपस्थित झाला होता.

सन 2018 च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील आश्वासन क्र. 158 च्या उत्तरादाखल म्हाड प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले होते की, शासनाच्या दि. 23/05/2018 च्या अधिसुचनेद्वारे म्हाडा प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील केवळ प्रकरण-4 मधील तरतुदींनुसार नियोजन / प्राधिकरण शक्ती प्रदान करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुंबई शहर व उपनगरासाठी,प्रनियो/प्राधिकरण म्हणून मुंबई महानगरपालिका कार्यरत आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील प्रकरण 4 वगळता इतर सर्व प्रकरणातील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे. तसेच, म्हाडा वसाहतींतील इमारतींचे विविध प्रकारचे शुल्क (जसे की, Off-site Infrastructure charges, Development Charges, Fungible FSI Charges) म्हाडाकडून मुंबई म.न.पा. स वर्ग करण्यात येत असल्याने मुंबई म.न.पा. ने आवश्यक विकास काम करणे क्रमप्राप्त आहे.

त्यानुसार गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. 18.01.2021 रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभागाच्या मान्यतेने मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका यांना म्हाडाच्या 56 वसाहतीमधील मलनि:स्सारण वाहिनी व इतर सोई सुविधा विषयक कामे मुंबई महानगरपालिकेने करणे आवश्यक असल्याचे कळविले होते.
त्याअनुषंगाने सन 2018 च्या आधिवेशनात उपस्थित झालेल्या प्रश्नास उपरोक्त नमूद दि 18.01.2021 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा. आयुक्त मुंबई महानगरपालिका यांनी सदर बाबत शासनाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका धोरण तयार करुन धोरणानुसार इतर विशेष प्राधिकरणाच्या वसाहतीत जल अभियंता विभाग व

मल:निस्सारण विभागाद्वारे आवश्यक सोईसुविधांची कामे करतील असे उत्तर दि.26/02/2021 च्या पत्राद्वारे आधिवेशनात सादर केले. मुंबई महापालिकेतर्फे देण्यात आलेल्या सदर उत्तराच्या अनुषंगाने मुख्य अभियंता [वि.आ. (DP)] बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. 17.08.2021 च्या पत्रान्वये म्हाडा वसाहतीमधील मुलभूत सुविधाचे उन्नतीकरण व दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव हाती घेण्यास्तव अर्थसंकल्पिय तरतूद करण्याबाबतचे मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेच्या विविध विभागांना दिलेल्या आहेत.

तसेच म्हाडामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस जून 2018 ते मार्च 2023 पर्यंत सुमारे 1806.35 कोटी एफएसआय प्रिमियम, इंफ्रास्ट्रक्चरल चार्जेस व विकास खर्चापोटी जमा केलेले आहेत व सदर बाब मुंबई महापालिकेस दि. 05/01/2024 च्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले असुन उन्नतीकरणाबाबत शासनाकडून जे निर्देश प्राप्त होतील ते म्हाडा व मनपा या दोन्हीस लागु होतील या अटीवर मलनि:स्सारण वाहिन्यांची देखभाल, दुरुस्ती व उन्नतीकरणाची कार्यवाही त्वरीत हाती घेण्यात यावी अशी विनंती केली होती.

यास अनुसरुन बृहन्मुंबई महानगर पालिकेकडुन एस विभागातील कन्नमवार नगर व टागोरनगर म्हाडा वसाहतीतील मलनिस:स्सारण व्यवस्था दि. 10.01.2024 रोजी हस्तांतरीत करुन घेण्यात आल्या आहेत . हस्तांतरण झाल्यामुळे या व्यवस्थेची देखभाल -दुरुस्ती व पावसाळ्यापूर्वीची साफसफाई करण्याची जबाबदारी सद्यस्थिती त पूर्णतः महानगरपालिकेची आहे.

मा.आयुक्त, बृहन्मुबई महानगरपालिका यांचे पत्र क्र .MGC/F/8618 दि. २४.११.२०२५ व दि. २७.०३.२०२६ रोजीचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे ,कन्नमवार नगर येथील मलनि:सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणापोटी १८०.८१ व टागोर नगर करिता ८५.८० कोटी खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे व त्या पैकी १३३.३० कोटी बृहन्मुबई मनपास अदा करण्याचे कळविले आहे व सदर रक्कम प्रा प्त होताच निविदा मागविण्याचे देखील कळविले आहे

तथापि, म्हाडाने जून २०१८ पासून म्हाडा वसाहतींतील इमारतींचे विविध प्रकारचे शुल्क (Off-site Infrastructure charges, Development Charges, etc.) म्हाडाकडून मुंबई म.न.पा. स जमा करण्यात येत आहेत. म्हाडाने नियोज न प्राधिकरण म्हणून वसुली केलेल्या रकमेतील मोठा हिस्सा पालिकेला दिला जात असताना, पुन्हा मलनि:सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणापोटी स्वतंत्रपणे निधीची मागणी करणे म्हाडावर अन्यायकारक आहे .

बृहन्मुंबई महानगरपालिकेने MGC/F/8618 दि. २७.०३.२०२६ रोजी मागणी केलेल्या १३३.३० कोटी रकमेच्या पुष्टतेसाठी अद्याप कोणतेही सविस्तर अंदाजपत्रक किंवा नकाशे म्हाडाला सादर केलेले नाहीत.
शासन स्तरावर जो निर्णय होईल तो म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका या दोन्ही संस्थांना लागू राहील , या अटीवर म्हाडाने यापूर्वीच उन्नतीकरणाची कार्यवाही त्वरित हाती घेण्याची विनंती महानगरपालिकेला केली आहे . सदर वसाहतींमधील मलनिस्सारण व्यवस्था दि . १०.०१.२०२४ रोजीच महानगरपालिकेकडे रितसर हस्तांतरित करण्यात आलेली असल्याने , जनहित आणि आरोग्याचा प्रश्न विचारात घेऊन , महानगरपालिकेने निधीच्या तांत्रिक बाबी किंवा पत्र व्यवहार प्रलंबित न ठेवता , संबंधित मलनिस्सारण वाहिन्यांची देखभाल , दुरुस्ती व उन्नतीकरणाचे काम तातडीने सुरू करणे अपेक्षित आहे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:47:43

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
कक्ष क्र.407, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पूर्व), मुंबई-51
म्हाडा
MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मत्रालय, मुंबई400032-.

विषय :- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-27550**
"मुंबईतील वर्सोवा अंधेरी येथील आशिर्वाद को.ऑ. हौसिंग सोसायटी लि., संकल्प को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.व शिवदर्श सोसायटी लि. या म्हाडाच्या गृहनिर्माण सस्थांना एकत्रित पुनर्विकास करण्यास मान्यता देण्याबाबत ."
श्री. नानाभाऊ पटोले,श्री.विजय वडेट्टीवार व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.116/गृनिप दि.20.05.2026

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-27550 अन्वये " मुंबईतील वर्सोवा अंधेरी येथील आशिर्वाद को.ऑ. हौसिंग सोसायटी लि., संकल्प को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.व शिवदर्श सोसायटी लि. या म्हाडाच्या गृहनिर्माण सस्थांना एकत्रित पुनर्विकास करण्यास मान्यता देण्याबाबत." बाबत श्री. नानाभाऊ पटोले,श्री.विजय वडेट्टीवार व इतर मा. वि.स.स.यांनी उपस्थित केलेला आहे.

या अनुषंगाने सदरहू अतारांकित प्रश्नाची उत्तरे व पुरक टिपणी आपल्या माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांचे मान्यतेने)

आपला विश्वासु,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:36:17
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-27550**
"मुंबईतील वर्सोवा अंधेरी येथील आशिर्वाद को.ऑ. हौसिंग सोसायटी लि., संकल्प को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.व शिवदर्श सोसायटी लि. या म्हाडाच्या गृहनिर्माण सस्थांना एकत्रित पुनर्विकास करण्यास मान्यता देण्याबाबत ."
श्री. नानाभाऊ पटोले,श्री.विजय वडेट्टीवार व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.116/गृनिप दि.20.05.2026

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1.	मुबइतील वर्सोवा-अधेरी येथील आशिर्वाद को. ऑ. हौसिंग सोसायटी लि., संकल्प को. ऑ. हौसिंग सोसायटी लि. व शिवदर्शन सोसायटी लि. या म्हाडाच्या 3 गृहनिर्माण संस्थांनी एकत्रित पुनर्विकास करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी मागणी सदरच्या संस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळ, बांद्रा (पूर्व), मा. मुख्यमत्री, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री व अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक व 10 डिसेंबर, 2025 रोजी वा सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,	होय,
2.	असल्यास, सदरच्या तिन्ही गृहनिर्माण संस्था अतिशय जीर्ण झाल्या असून मोडकळीस आल्या असल्याने संस्थेतील रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन रहात आहेत, हे खरे आहे काय,	तिनही गृहनिर्माण सस्थेतील सभासदानी नमुना नकाशानुसार (Type Design) बांधलेल्या सदनिकांच्या मुळ बांधकामामध्ये बदल करुन अधिकचे / वाढीव अनधिकृत मजल्यांचे बांधकाम केले आहे.
3.	असल्यास, त्याअनुषगाने शासनाने पुनर्विकास प्रस्तावास मान्यता देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	शासनाने दि.06.10.2025 रोजीच्या पत्रान्वये एस.व्ही.पी. नगर, वर्सोवा या अभिन्यासाच्या संयुक्त पुनर्विकासाकरीता मान्यता प्रदान केली आहे. तसेच शासनाच्या मान्यतेस अनुसरून म्हाडामार्फत एस.व्ही. पी. नगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या प्रकल्पासाठी निविदा दि.18.05.2026 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.20.05.2026 रोजी उघडण्यात आले असुन कागदपत्रांच्या पडताळणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
4.	नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?	लागु नाही

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:36:55

मुख्य अधिकारी
मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
मुंबई

विषय :- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-27550**
"मुंबईतील वर्सोवा अंधेरी येथील आशिर्वाद को.ऑ. हौसिंग सोसायटी लि., संकल्प को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.व शिवदर्श सोसायटी लि. या म्हाडाच्या गृहनिर्माण सस्थांना एकत्रित पुनर्विकास करण्यास मान्यता देण्याबाबत ."
श्री. नानाभाऊ पटोले,श्री.विजय वडेट्टीवार व इतर मा. वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.116/गृनिप दि.20.05.2026

<u>पुरक टिपणी :-</u>

सरदार वल्लभाई पटेल नगर, वसाहतीमधील प्लॉट नं.सी.डी.68, शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थेसोबत 1314.51 चौ.मी. भूखंडाकरीता दि.01.12.1993 रोजी भाडेपट्टा करारनामा अंमलात आला आहे, प्लॉट नं. सी.डी.67, संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था लि. यासंस्थेसोबत 1314.51 चौ.मी. भूखंडाकरीता दि.10.05.1993 रोजी भाडेपट्टा करारनामा अंमलात आला आहे. तसेच प्लॉट नं. सी.डी.66, आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. यासंस्थेसोबत 1314.51 चौ.मी. भूखंडाकरीता दि. 21.07.1993 रोजी भाडेपट्टा करारनामा अंमलात आला आहे. सदर तिन्ही संस्थांमध्ये प्रत्येकी 30.05 चौ.मी. चे 7 पिचेस, 30.55 चौ.मी. चे 18 पिचेस आणि 40.09 चौ.मी. 6 पिचेस असे एकूण 93 पिचेस रहिवाशांना सन -1990 च्या दरम्यान वितरीत करण्यात आले होते. सदर पिचेसवर म्हाडाच्या नमुना नकाशानुसार (Type Design) बांधकाम करण्यात आले होते. सदर नमुना नकाशानुसार (Type Design) 0.85 च.क्षे. नि. अनुज्ञेय असुन 4.50 मी. उंचीचे तळ + पोट माळा बांधण्याची परवानगी होती. तथापि, संस्थेच्या ब- याच सभासदांनी नमुना नकाशानुसार (Type Design) बांधलेल्या सदनिकांच्या मुळ बांधकामामध्ये बदल करुन अधिकचे / वाढीव अनधिकृत मजल्यांचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे.

प्लॉट नं.सी.डी.68, शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.,प्लॉट नं.सी.डी.67, संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था लि. व प्लॉट नं.सी.डी.66, आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या संस्थांनी मे. बी.जी. शिर्के रिडेव्हलमेंट ॲन्ड गॅस प्रा.लि. यांचे विकासक म्हणुन नेमणुक करुन एकत्रित पुनर्विकासाचा प्रस्ताव दि.11.10.2024 रोजी म्हाडास सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये या तीन संस्थांपैकी संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था लि.संस्थेच्या 31 सभासदांपैकी 26 सभासदांनी व आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. संस्थेच्या 31 सभासदांपैकी 29 सभासदांनी पुनर्विकासाकरीता संमतीपत्रे सादर केलेली आहेत. तथापि, शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि.,या संस्थेच्या सभासदांची संमतीपत्रे सादर केलेली नाहीत.

सरदार वल्लभभाई पटेल वसाहतीमधील रहिवाशांचे राहणीमान उंचविण्याकरीता, अधिक चटई क्षेत्रफळाची घरे प्राप्त होण्याकरीता तसेच मुलभूत / आधुनिक सोई सुविधा (जसे की, खेळाचे मैदान, करमणुकीचे मैदान, जिम्न्याशियम, स्विमिंग पुल, क्लब हॉऊस, संस्था कार्यालय इत्यादी) उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर वसाहतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याची बाब विचाराधिन होती. त्यामुळे प्राप्त संस्थांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

सरदार वल्लभभाई पटेल नगर (एस.व्ही.पी.नगर) , सर्व्हे क्र. 120, वर्सोवा, अंधेरी (प) या वसाहतीमधील 122 संस्था व 307 वैयक्तिक भूखंडधारकांपैकी केवळ 13 संस्थांच्या व 2 भूखंडांच्या विकास / पुनर्विकासास यापूर्वी परवानगी दिलेली असल्याने सरदार वल्लभभाई नगर (एस. व्ही. पी. नगर)या वसाहतीचा एकत्रित पुनर्विकास सी अॅन्ड डी ए (Construction & Development Agency) ची

नेमणूक करून करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.02.07.2025 रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास दि.23.09.2025 रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असुन दि.06.10.2025 रोजी गृहनिर्माण विभागामार्फत शासन निर्णय जारी करण्यात आलेला आहे. सदर एकत्रित पुनर्विकास प्रस्तावामध्ये शिवदर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लि, संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था लि. व आशीर्वाद सहकारी गृहनिर्माण संस्था लि. या तिनही संस्थांचा समावेश आहे.

शासनाच्या मान्यतेस अनुसरून म्हाडामार्फत एस.व्ही. पी. नगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या प्रकल्पासाठी निविदा दि.18.05.2026 पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.20.05.2026 रोजी उघडण्यात आले असुन कागदपत्रांच्या पडताळणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 12-06-2026
18:41:39

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई

मुंबई गृहनिर्माणव क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता गोरेगाव विभाग यांचे कार्यालय, कक्ष क्र. ३३८, २ रा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५२७७ इमेल-: goregaonee@gmail.com

जा.क्र.का.अ./गो.वि./उपवि-४/मुं.मं./ /२०२६
दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई ४०००००३२.

विषय : <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २६५३८</u>
"मुंबईतील मालाड पश्चिमेच्या डी.जी. नगर सार्वजनिक मैदानाचे खासगीकरण केल्याबाबत."
श्री. अतुल भातखळकर, श्री. पराग शाह व इतर मा.वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र. क्र.११३/ गृनिप दिनांक २०.०५.२०२६.

महोदय,

संदर्भिय पत्रान्वये प्राप्त विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २६५३८ च्या अनुषंगाने मुंबईतील मालाड पश्चिमेच्या डी.जी. नगर सार्वजनिक मैदानाचे खासगीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आपल्या अवलोकनार्थ सोबत सादर करण्यात येत आहे.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

सोबत : वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:18:40

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

विषय : <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २६५३८</u>
"मुंबईतील मालाड पश्चिमेच्या डी.जी. नगर सार्वजनिक मैदानाचे खासगीकरण केल्याबाबत."
श्री. अतुल भातखळकर, श्री. पराग शाह व इतर मा.वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र. क्र.११३/ गृनिप दिनांक २०.०५.२०२६.

अ.क्र.	प्रश्ने	उत्तरे
१	मुंबईतील मालाड पश्चिमेच्या डी.जी.नगर येथील सार्वजनिक मैदानात स्थानिक मुलांना व युवकांना प्रवेश नाकारत खेळाडूंना खेळण्यापासून रोखले जात आहे, हे खरे आहे काय,	नाही, हे खरे नाही.
२	असल्यास, सदरचे सार्वजनिक मैदान हे महाराष्ट्र पोलीस फेडरेशनने मॅजिक क्रिकेट या खासगी संस्थेला देऊन त्यांचे खासगीकरण केल्यास माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,	नाही, हे खरे नाही. म्हाडाच्या मालकीची दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड येथील ५७.५ एकर (२,३०,००० चौ. मी.) जमीन 'महाराष्ट्र पोलीस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड' या संस्थेला दिनांक १४ मे १९९९ च्या करारानुसार भाडेपट्ट्याने (Lease) गृहनिर्माण पुनर्विकास योजनेसाठी देण्यात आली आहे. सदर अभिन्यासामध्ये विषयांकित भूखंड हा मनोरंजन मैदान (R.G. Area) म्हणून आरक्षित असून व त्यानुसार सदर भूखंडाचा वापर होत आहे. इतर कोणता वापर करण्यात आलेला नाही. तसेच सदर भूखंडावर कोणतेही खासगीकरण करण्यात आलेले नाही.
३	असल्यास, या खासगीकरणाच्या निषेधार्थ स्थानिक नागरिक, खेळाडू,	प्रश्न क्रमांक (1) च्या उत्तरात स्पष्ट केल्याप्रमाणे मैदानाचे कोणतेही

	विद्यार्थी, शिक्षक व पालकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे म्हाडा मुख्य अधिकारी, पोलीस प्रशासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,	खासगीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे मैदानाचे खासगीकरण झाल्याच्या बातम्या आणि त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारी वस्तुस्थितीला धरून नाहीत.
४	असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून डी.जी. नगर येथील एकमेव असलेले सार्वजनिक मैदानाचे खासगीकरण करणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,	सदर अभिन्यासाचा पुनर्विकास पूर्ण झाल्यानंतर हे आरक्षित मनोरंजन मैदान (R.G. Plot) म्हाडाला (MHADA) हस्तांतरित करणे महाराष्ट्र पोलीस फेडरेशनवर बंधनकारक आहे. या मैदानाचे खासगीकरण झालेले नसून, सदर मैदान सर्वांसाठी खुले आहे.
५	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:19:13

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

विषय : <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २६५३८</u>
"मुंबईतील मालाड पश्चिमेच्या डी.जी. नगर सार्वजनिक मैदानाचे खासगीकरण केल्याबाबत."
श्री. अतुल भातखळकर, श्री. पराग शाह व इतर मा.वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र. क्र.११३/ गृनिप दिनांक २०.०५.२०२६.

<u>पूरक टिप्पणी :</u>

म्हाडाच्या मालकीची मालवणी अभिन्यासामधील, मालवणी, मालाड (पश्चिम) सर्वे क्र. २६३ (भाग) न.भू.क्र. ३५२५ (भाग) दादासाहेब गायकवाड नगर गेट नं.८, मालवणी मालाड येथील २३ हेक्टर (५७.५ एकर) म्हणजेच २,३०,००० चौ.मी. क्षेत्रफळ भूखंड गृहनिर्माण पुनर्विकास योजना राबविण्याच्या हेतूने "महाराष्ट्र पोलीस को.ऑप.हौसिंग फेडरेशन लिमिटेड" या संस्थेबरोबर दिनांक १४.०५.१९९९ रोजी भाडेपट्टा करारनामा करण्यात आला आहे. सदर वितरीत केलेल्या एकूण भूखंडापैकी विषयांकित भूखंड हा "डी" ब्लॉक मोकळे मैदान हा विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार करमणुकीचे मैदान (Recreation Ground) म्हणून आरक्षित आहे व सदर विषयांकित भूखंड हा सद्यस्थितीला करमणुकीचे मैदान म्हणून वापरण्यात येत असून त्याचे कोणतेही खाजगीकरण करण्यात आलेले नाही.

सदर अभिन्यासाचा पुनर्विकास पूर्ण झाल्यानंतर हे आरक्षित करमणुकीचे मैदान (R.G. Plot) म्हाडाला (MHADA) हस्तांतरित करणे महाराष्ट्र पोलीस फेडरेशनवर बंधनकारक आहे. या मैदानाचे खासगीकरण झालेले नसून, सदर मैदान सर्वांसाठी खुले आहे.

(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:20:53

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

प्रती,

मा. अपर मुख्य सचिव ,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
३रा मजला , मादाम कामा मार्ग हुत्मामा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई, -४०००३२

विषय : विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २३७४७
स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडातर्फे मुंबईत तयार घरे उपलब्ध करुन देण्याबाबत.
(श्री. राजकुमार बडोले, मा.वि.स.स.)

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र.क्र.१२१/गृनिप दि. २०.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून मा. श्री. राजकुमार बडोले यांनी विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २३७४७ अन्वये स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडातर्फे मुंबईत तयार घरे उपलब्ध करुन देण्याबाबत अतारांकित प्रश्न उपस्थित केला आहे.

याअनुषंगाने सदरहु प्रश्नाचे उपप्रश्ननिहाय प्रश्नोत्तरे व सविस्तर माहितीची पुरक टिपणी सादर करण्यात येत आहे.

सोबत- वरिल प्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांचे मान्यतेने)

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:15:51
(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,मुंबई

गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४०५०००/२६५९२८७७ / २६५९२८८१
फॅक्स नं. : ०२२-२६५९२०५८

Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra (East), Mumbai-400
Phone : 66405000 / 26592877 / 26592881
Fax No. : 022-26592058

विषय : विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २३७४७

स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडातर्फे मुंबईत तयार घरे उपलब्ध करुन देण्याबाबत.

(श्री. राजकुमार बडोले, मा.वि.स.स.)

संदर्भ - कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र.क्र.१२१/गृनिप दि. २०.०५.२०२६

अ. क्र.	प्रश्नाचा तपशिल	उत्तर
01	स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडा, मुंबई मंडळातर्फे तयार घरे (सदनिका) मिळण्यासाठी दिनांक ४ सप्टेंबर २००३ रोजी अर्ज केला असूनही अद्याप सदनिका देण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय.	होय
02	असल्यास, स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडातर्फे मुंबईत तयार घरे उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १० सप्टेंबर २०२५ लेखी निवेदन दिले आहे, हेही खरे आहे काय.	होय. लोकप्रतिनिधी यांचे मा. मुख्यमंत्री यांना दि.१७/०९/२०२५ रोजी दिलेले लेखी निवेदनाची प्रत शासनाचे दिनांक २९/१२/२०२५ रोजीचे पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झाली आहे.
03	असल्यास, नियोजित को.ऑप.हौसिंग सोसायटीने याबाबत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी केलेल्या तक्रारीनुसार दि.२९/०१/२०२५ रोजी घेतलेल्या सुनावणीनुसार संस्थेस दि.०८/०२/२००७ च्या दराप्रमाणे ५० सदनिका देण्याबाबत निर्देश दिले आहे, हेही खरे आहे काय.	होय.
04	असल्यास या निर्देशाची अंमलबजावणी अद्यापही झाली नसल्यामुळे ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.	प्रस्तुत प्रकरणी शासनास दिनांक ०६/०५/२०२५ रोजीचे पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आलेला आहे. (प्रत सोबत संलग्न). तथापि, तद्नंतर शासनाचे दिनांक २९/१२/२०२५ रोजीचे पत्रान्वये, म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार थेट वितरणासाठी उपलब्ध असणा-या अल्प, मध्यम, व उच्च उत्पन्न गटातील मुंबई येथील सदनिकांची माहिती किंमतीसह शासनास उपलब्ध करुन

		देण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु, म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार सदनिका थेट वितरीत करणेबाबत अशी कोणतीही तरतूद उपलब्ध नाही. त्यामुळे थेट वितरणासाठी अशा कोणत्याही सदनिका उपलब्ध नसल्याने तसेच त्या वेळी सोडतीतील रिक्त राहिलेल्या सदनिका नियमानुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS) या तत्वावर वितरीत करणेबाबत प्रस्तावित होते. त्यानुसार अशा एकूण ११८ सदनिकांकरीता दि.०३/०२/२०२६ रोजी प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर सदनिकांपैकी ६० सदनिकांना अदयाप प्रतिसाद प्राप्त् झालेला नसल्याने, सदरहू रिक्त असलेल्या सदनिकांबाबतची किंमतीसह माहिती पुरक टिप्पणीसोबत जोडलेल्या तक्तयात पाठविण्यात येत आहे.
05	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	प्रस्तुत संस्थेस सदनिका वाटपाबाबतची विनंती यापूर्वी शासन स्तरावरुन अमान्य करण्यात आलेली असल्याने या प्रकरणी मंडळ स्तरावर विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:16:26

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई

पुरक टिपणी :

विषय : विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २३७४७
स्वयंभू कोकण बॅकवर्ड क्लास को.ऑप.हौसिंग सोसायटी (नियोजित) यांना म्हाडातर्फे मुंबईत तयार घरे उपलब्ध करुन देण्याबाबत.
(श्री. राजकुमार बडोले, मा.वि.स.स.)

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र-२०२६/ प्र.क्र.१२१/ गृनिप दि. २०.०५.२०२६.

विषयांकित प्रकरणी कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे क्र.लवेसू-2018/प्र.क्र.368/गृनिप दिनांक 18/03/2025 चे पत्रासोबत मा.अध्यक्ष, (मंत्री दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांच्याकडे दि.29/01/2025 रोजी झालेल्या सुनावणीचे इतिवृत्ताची प्रत या कार्यालयास प्राप्त झाली होती. सदर इतिवृत्तात असे नमूद करण्यात आलेले होते की, दि.30/11/2024 रोजीच्या 'लोकमत' या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार मुंबई मंडळाच्या सोडतीमधील 440 विजेत्यांकडून घरे परत केली असल्याचे अर्जदार यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यानुसार 440 सदनिका वितरीत करण्याकरीता उपलब्ध असल्याचे दिसून येते. त्यानुसार वेगवेगळया उत्पन्न गटाच्या अल्प, मध्यम व उच्च अशा एकूण किमान 50 सदनिका सदर संस्थेस देण्यात याव्यात असे नमूद आहे. तसेच यासंदर्भात दिनांक 28/04/2025 रोजी उप सचिव (गहनिर्माण) यांच्या दालनांत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे अनुषंगाने तसेच मा.अध्यक्ष, (मंत्री दर्जा), महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी शासनास पुढीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

"स्वयंभू कोकण मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच अन्य (महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची

अदलाबदल) विनियम 1981 च्या 13 (2) अन्वये) विशिष्ट गटासाठी म्हाडाकडून गृहनिर्माण योजना तयार करुन त्याला शासनाची मान्यता घेऊन सदर योजना राबविण्याची तरतुद आहे. गृहनिर्माण विभागाच्या दि. 8 फेब्रुवारी, 2007 च्या शासन निर्णयान्वये विशिष्ट गटांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून त्याकरिता खाली नमूद पाच गट ठरविण्यात आले आहेत.

1. मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व इतर कनिष्ठ न्यायालयात कार्यरत असलेले न्यायाधीश.
2. आजी / माजी विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभा सदस्य.
3. पत्रकार
4. कायम अस्थापनेवर असलेले राज्य व केंद्र शासनाचे अधिकारी / कर्मचारी
5. राज्य शासनास योग्य वाटेल असा इतर कोणताही विशेष प्रवर्ग.

सदर शासन निर्णयामध्ये एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांबाबत द्यावयाच्या जाहिरातीची आवश्यकता विहीत करण्याबाबतचे हक्क शासन राखून ठेवत आहे अशी तरतुद करण्यात आली आहे. काही संस्थांकरिता विनियम 13 (2) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्याबाबतचे म्हाडाचे सन 2004 ते 2006 या कालावधीतील ठराव / प्रस्ताव शासनास म्हाडाकडून प्राप्त झाले होते. त्यामध्ये प्रतिक्षानगर, सायन येथील सदनिकांसाठी, टाटा मेमोरियल सेंटर, पत्रकार व विशिष्ट गट, स्वंयभू कोकण मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था, अप्पर विक्रीकर आयुक्त यांच्या कार्यालयातील कर्मचारी, जजेसची नियोजित संस्था, ब्रीच कँडी मधील नर्सेस, पोलीस कर्मचारी, विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांची गृहनिर्माण संस्था यांचा समावेश होता. स्वयंभू कोकण गृहनिर्माण सहकारी संस्थेने 84 सदनिकांची मागणी

केली होती. या अनुषंगाने प्रतिक्षानगर येथे विनियम 13 (2) अंतर्गत विविध गटासाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत शासन आदेशार्थ प्रस्ताव सादर केला असता, शासनाने प्रतिक्षानगर, सायन येथे पोलीस सेवा निवासस्थानासाठी 300 सदनिका, मुंबई प्रेस क्लबच्या माध्यमातून पत्रकारांकरिता 230 सदनिका व विधीमंडळ कर्मचा-यांकरिता 28 सदनिका अशा एकूण 558 सदनिका विनियम 13 (2) अंतर्गत वितरित करण्याचा निर्णय सन 2009 मध्ये घेतला होता.

शासनाच्या दिनांक 8 फेब्रु. 2007 च्या शासन निर्णयामध्ये निश्चित करण्यात आलेल्या गटांमध्ये मागासवर्गीयांसाठी कोणताही विशिष्ट गट ठेवण्यात आलेला नाही. गट क्रमांक 5 राज्य शासनास योग्य वाटेल असा कोणताही विशिष्ट प्रवर्ग असा नमूद केलेला आहे. त्यामूळे म्हाडाने प्रस्तावित केलेल्या सर्वच गट/ संस्थांसाठी विनियम 13 (2) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्यास शासनाने परवानगी देणे अपेक्षित नाही.

तद्नंतर सन 2009 मधील हिवाळी अधिवेशानामध्ये मा. श्री. अरविंद सावंत, तत्कालीन विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये चर्चेच्या वेळी तत्कालीन मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी "भविष्य काळात 13 (2) अन्वये कशा प्रकारे वाटप व्हावयास पाहिजे याबाबत ठराव शासनाच्या विचाराधिन आहे. तसेच शासनाचे आधीच काही निकष अशा वेगवेगळया गोष्टींसाठी ठरविले आहे, आणि हे लवकरात लवकर करण्याचे काम करु. फार तर दोन महिने लागतील" असे सांगितले होते. सबब, तत्कालीन मा. राज्यमंत्री महोदयांनी सन 2009 मध्ये दिलेले आश्वासन विनियम 13 (2) संदर्भात सुधारीत धोरण आणण्याबाबतचे होते. त्यानुसार, शासनाचे विनियम 13 (2) अंतर्गत गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी विहित धोरणामध्ये दिनांक 25 एप्रिल, 2011 च्या शासन निर्णयामध्ये काही सुधारणा केल्या असून त्यानुसार या योजनेअंतर्गत निश्चित

करावयाचे लाभार्थी व त्यांना करावयाच्या गाळयांचे वितरण हे महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम 1981 मधील भाग-3 अंतर्गत असलेल्या विनियम, 5 अ ते 21 येथील तरतुदीनुसार करण्यात यावे अशी सुधारणा केलेली आहे. तसेच शासनाच्या दिनांक 8 फेबु. 2007, च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद 3 मधील एखाद्या विशिष्ट प्रवर्गासाठी वेळोवेळी राबविण्यात येणा-या गृहनिर्माण योजनेबाबत द्यावयाच्या जाहिरातीची आवश्यकता विहित करण्यासंदर्भात हक्क शासन राखुन ठेवीत आहे ही तरतुद सुध्दा वगळली आहे. म्हणजेच दि. 25 एप्रिल 2011 च्या शासन निर्णयातील सुधारीत धोरणानुसार विशिष्ट गटासाठी गृहनिर्माण योजना राबवितांना जाहिरात देणे, अर्ज मागविणे व सोडत काढणे ही प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे व याबाबतच्या जाहिराती न देण्याबाबतचा शासनाचा स्वेच्छाधिकार संपुष्टात आलेला आहे. या परिस्थितीत सद्यस्थितीत कोणत्याही विशिष्ट गटासाठी वरिल पध्दत न पाळता विनियम 13 (2) अंतर्गत सदनिकांचे थेट वितरण करणे नियमानुसार होणार नाही.

स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था ही संस्था वरील नमूद गटांपैकी पहिल्या 4 गटांमध्ये अंतर्भुत होत नाही. तसेच मागासवर्गीय अथवा कोणत्याही प्रवर्गातील विशिष्ट गृहनिर्माण संस्थेस वरिल प्रयोजनार्थ विशिष्ट प्रवर्ग समजणे उचित होणार नाही. त्याचप्रमाणे आधीच सदस्य निश्चित केलेल्या कोणत्याही संस्थेस विनियम 13 (2) अंतर्गतचे शासनाचे प्रचलित धोरण / नियम डावलून थेट सदनिका वितरीत करण्याची तरतुद नाही. या दरम्यान स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागासवर्गीय सहकारी संस्था यांचेकडून मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये क्र 1480/2015 अन्वये याचिका दाखल करण्यात आली होती. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. 13.07.2015 अन्वये खालीलप्रमाणे आदेश देऊन याचिका खारीज केली.

The grievance of the Petitioner is that though they have applied for grant of residential units/tenements as per Resolution dated 13th July, 2004 passed by Respondent No. 2 under Regulation 13 (2) of Maharashtra Housing Area and Development Regulation, 1981 no action has been taken so for by them.

Since this is only the grievance of the Petitioner, the Petition can be conveniently disposed of by directing Respondent No. 1 to 3 to give a decision on merits and in accordance with law on the proposal given by the Petitioner as per Resolution of 13th July, 2004 bearing no 6028 passed by Respondent No. 2.

This direction is to be complied as expeditiously as possible and within a period of three months from today. The Petition is accordingly disposed of Liberty is granted to the Petitioner to apply for aremedy to file Civil Application in the dispoded Petition, if he so desires.

सन-2017 च्या हिवाळी अधिवेशनात मा. श्री. किरण पावसकर, विधानपरिषद सदस्य यांनी स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या संदर्भात औचित्याचा मुद्या उपस्थित केला होता. त्या अनुषंगाने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. 13.03.2018 रोजी विधानभवन मुंबई येथे मा.मंत्री, गृहनिर्माण व संबंधित अधिकारी यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तानुसार, मा. मंत्री, गृहनिर्माण यांनी सदर संस्थेने विनियम 16 अंतर्गत भूखंड/जागेची मागणी प्राधिकरणाकडे करावी असे सुचित केले व उचित प्रक्रिया करुन

तद्नंतर मंत्रीमंडळ उपसमितीसमोर प्रस्ताव आल्यास निर्णय घेण्यात येईल असे मा. मंत्री गृहनिर्माण यांनी सुचविले. सदरहू बैठकित भूखंडा ऐवजी म्हाडाच्या तयार व अनेक वर्ष जाहीरातीतुन वगळण्यात आलेल्या सदनिका वितरित करण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. मात्र, मा. श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी मा. सभापती महोदयांकडे झालेल्या दि. 13.03.2018 रोजीच्या बैठकीनंतर दि. 15.03.2018 रोजी स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था (नियोजित) प्रस्तावासंदर्भात मा. मंत्री (गृहनिर्माण) यांना पत्र देऊन सदरहू संस्थेस म्हाडा विनियम 16 च्या अंतर्गत जमिन देण्याऐवजी विनियम13 (2) अन्वये मुंबई शहरात पवई / वर्सोवा / सायन / कुर्ला येथे उपलब्ध असणा-या सदनिका देण्यात याव्यात, जेणेकरुन संस्थेच्या लोकांना बँक कर्ज घेऊन घरांची गरज पुर्ण करता येईल अशी विनंती केली आहे. त्याचप्रमाणे सदर संस्थेने सुध्दा तशाच प्रकारची विनंती (तयार सदनिका देण्याची) दि. 21.03.2018 च्या पत्रांन्वये केली आहे. तथापि, शासनाच्या सद्या अस्तित्वात असलेल्या नियमानुसार / शासन निर्णयानुसार कोणत्याही प्रवर्ग / गटातील आधीच सदस्य (Prefixed Member)निश्चित केलेल्या संस्थेस म्हाडाच्या तयार सदनिका थेट वितरीत करण्याची तरतुद नाही, असे लक्षवेधीच्या उत्तराद्वारे शासनाने स्पष्ट कळविले आहे. दि. 25.01.2019 रोजी सभापतींकडे पुन्हा झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार शासन स्तरावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता यांचे अभिप्राय घेण्यात आले. मा.महाधिवक्ता यांनी या प्रकरणी अभिप्राय देतांना खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.-

"Thus the legal position that emerges from the aforesaid Judgments of the Hon'ble Supreme Court is that, the law which will apply to a pending application is the law, which holds the field 'as on the date of decision' of such an application. In instant case, the State Government took decision on the application filed by the Society in the year 2015, when the policy dated 25th

April 2011 was in force and therefore, in my opinion, the Housing Department was completely correct/ right in applying the said policy spelt out by the aforesaid G.R. dated 25th April 2011 while deciding the application of the Society".

त्यानुसार विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन शासनाने मा. मुख्यमंत्री यांचे मान्यतेने दिनांक 07/01/21 रोजी स्वयंभु कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था यांना विनियम 13(2) अन्वये म्हाडाच्या सदनिका वाटप करणे शक्य नाही असे कळविलेले आहे.

तसेच तद्नंतर महाराष्ट्र विधान सभा उपाध्यक्ष, मा.श्री.नरहरी झिरवळ यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 31/03/2021 रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे अनुषंगाने मा.मंत्री गृहनिर्माण, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र.लवेसू2018/प्र.क्र./368/गृनिभू दिनांक 29/09/2021 अन्वये महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष मा.श्री नरहरी झिरवळ यांना खालीलप्रमाणे कळविण्यात आलेले आहे.

``मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.882/2011 मध्ये दि.20.03.2014 रोजी पारित केलेल्या आदेशातील परिच्छेद क्र.5 येथे नमूद केलेले निष्कर्ष, दि.25.04.2011 शासन निर्णयातील तरतूदी, मा.महाधिवक्ता यांनी शासन निर्णय दि.25.04.2011 मधील तरतूदी विचारांत घेऊन दिलेले सविस्तर अभिप्राय यांचा एकत्रित विचार करता, म्हाडा ठराव क्र.6028 दि.13.07.2004 नुसार स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या पूर्व निश्चित केलेल्या उच्च उत्पन्न गटातील 84 सदस्यांना आता दि.08.02.2007 च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे सदनिका वितरीत करण्याची कार्यवाही करता येणार नाही``.

तसेच शासनाचे पत्र क्रमांक : लवेसू-2018/प्र.क्र.368/ गृनिप दिनांक 03/10/2024 अन्वये श्री प्रल्हाद रामभाऊ खंदारे, मुख्य प्रवर्तक, स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागासवर्गीय सहकारी संस्था (नियोजित) यांना कळविण्यात आलेले आहे की, रिट याचिका

क्र.1480/2015 या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.13/07/2015 रोजी दिलेल्या आदेशानुसारच प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून गुणवत्तेनुसार व कायदयानुसार निर्णय घेण्यात आला आहे. तसेच याबाबत संस्थेने दोनवेळा दाखल केलेल्या रिट याचिका मा.उच्च न्यायालयाने निकाली काढल्या आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी संस्थेच्या मागणीबाबत शासन स्तरावर पुन: विचार करणे न्यायोचित होणार नाही. त्यांच्या संस्थेकडून याच विषयावर सातत्याने पत्रव्यवहार होत असल्याने, यापुढे याच विषयावरील त्यांची निवेदने शासन स्तरावर विचारात घेतली जाणार नाहीत, असे श्री प्रल्हाद खंदारे, मुख्य प्रवर्तक यांना अवगत करण्यात आलेले आहे.

तसेच विनियम 13(2) अंतर्गत इतर संस्थांना वाटप करण्यात आलेल्या सदनिकांबाबत शासन निर्णय क्र.वाटप 1105/प्र.क्र.180/भाग-1/गृनिभू, मंत्रालय, मुंबई, दिनांक 08/02/2007 तसेच शासन निर्णय, क्र.वाटप-1105/प्र.क्र.180/भाग-1/गृनिभू,मंत्रालय, मुंबई, दिनांक 25/04/2011 रोजीचे शासन निर्णयान्वये वाटप करण्यात आलेले आहेत.

तसेच, दि.30/11/2024 च्या लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार मुंबई मंडळाच्या लॉटरीमधील 440 विजेत्यांकडून घरे परत केली असल्याबाबत तसेच सदरहू 440 सदनिका वितरीत करण्याकरीता उपलब्ध असल्याबाबतच्या बातमीचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, मुंबई मंडळाच्या सन 2024 च्या लॉटरीमध्ये ब-याच मोठया प्रमाणात अर्जदार एक पेक्षा अधिक सदनिकांकरीता यशस्वी ठरले होते. नियमानुसार त्यांना एकच सदनिका घेता येते, याकरीता अशा अर्जदारांनी एक सदनिका स्विकारुन अन्य सदनिका नियमानुसार मंडळास परत केल्या. तसेच काही अर्जदारांनी लॉटरी पश्चात त्यांना मिळालेली सदनिकेची पाहणी केली असता, त्यांनी सदनिका नापसंत करुन मंडळास परत केल्याचे दिसून येते. परंतु, मंडळास परत केलेल्या सदरहू सदनिकांकरीता प्रतिक्षायादीवरील अर्जदारांना संधी देण्यात येते. तसेच प्रतिक्षायादीवरील अर्जदारांना संधी दिल्यानंतरही काही

कारणास्तव लॉटरीमधील सदनिका रिक्त राहिल्यास, अशा रिक्त सदनिका ज्या प्रवर्गातील आहेत, त्याच प्रवर्गात घेवून सदर सदनिकांचा पुढील लॉटरीत समावेश करण्यात येतो. तसेच सन २००९ च्या वस्तुस्थिती बदलानुसार मंडळाच्या गाळे विक्रीस मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याने प्रथमदर्शनी गाळे शिल्लक आहेत, असे दिसत नाही".

असे या कार्यालयाचे दिनांक ०६/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

तथापि, तद्नंतर शासनाचे क्र:लवेसू-२०१८/प्र.क्र.३६८/गृनिप दिनांक २९/१२/२०२५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते की, स्वयंभू कोकण मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेने मुंबई येथील सदनिकांची मागणी केली असल्याने, म्हाडा, मुंबई मंडळांतर्गत प्रतिसादाअभावी पडून असलेल्या, unclaimed, पात्र लाभार्थी न मिळाल्यामुळे अवितरीत सदनिका इत्यादी स्वरुपाच्या व म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार थेट वितरणासाठी उपलब्ध असणा-या अल्प, मध्यम, व उच्च उत्पन्न गटातील मुंबई येथील सदनिकांची माहिती किंमतीसह शासनास उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

परंतु, वर नमूद केल्याप्रमाणे सोडतीतील प्रतिक्षायादीवरील अर्जदारांना संधी दिल्यानंतरही काही कारणास्तव सोडतीमधील सदनिका रिक्त राहिल्यास, अशा रिक्त सदनिका ज्या प्रवर्गातील आहेत, त्याच प्रवर्गात घेवून सदर सदनिकांचा पुढील सोडतीत समावेश करण्यात येतो. त्यानुसार अशा सदनिकांचा सन 2026 च्या सोडतीत समावेश करण्यात आलेला आहे. तसेच म्हाडाच्या प्रचलित नियमानुसार सदनिका थेट वितरीत करणेबाबत अशी कोणतीही तरतूद नियमात उपलब्ध नाही. त्यामुळे थेट वितरणासाठी अशा कोणत्याही सदनिका उपलब्ध नसल्याने तसेच यापूर्वी वारंवार जाहिरात देवूनही प्रतिसादाअभावी रिक्त राहिलेल्या सदनिका नियमानुसार प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य

(FCFS) या तत्वावर वितरीत करणेबाबत प्रस्तावित होते. त्यानुसार अशा एकूण ११८ सदनिकांकरीता दि.०३/०२/२०२६ रोजी प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर सदनिकांपैकी ६० सदनिकांना अदयाप प्रतिसाद प्राप्त् झालेला नसल्याने, सदरहू प्रतिसादाअभावी रिक्त असलेल्या सदनिकांबाबतची किंमतीसह माहिती सोबत जोडलेल्या तक्तयात सादर करण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे.
(रिक्त सदनिकांची माहितीबाबतचा तक्ता)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:17:33

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई

म्हाडा MHADA

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
मिळकत व्यवस्थापक /मुलुंड यांचे कार्यालय
कक्ष क्र. २२९, पहिला मजला गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व मुंबई -४०००५१.

जा. क्र. /मि. व्य./मुलुंड/मुं.मं. /ई. ऑ. / /२६
दिनांक :- /०६/२०२६

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
तिसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक २४९२३
विक्रोळी मुंबई येथील टागोर नगर इमारत क्र. ४०९ ते ४१५ गाळेधारकांना कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, यांनी वाढीव सेवा आकारल्याबाबत.
श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र २०२६/प्र.क्र.११९ गृनिप, २०/०५/२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. **२४९२३** च्या अनुषंगाने प्रश्न, उत्तरे व पुरक टिपणी सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:14:47

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक 24923

विक्रोळी, मुंबई येथील टागोर नगर इमारत क्र.409 ते 415 गाळेधारकांना कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, यांनी वाढीव सेवा आकारल्याबाबत.

श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र 2026/ प्र.क्र.119 गृनिप, दिनांक 20/05/2026

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	विक्रोळी (मुंबई) येथील टागोर नगर इमारत क्र. 409 ते 415 या सात इमारतीमध्ये केवळ 124 चौ.फुटाचे 672 मालकी हक्काचे गाळे 1982 मध्ये वितरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,	होय हे खरे आहे. इमारत क्र. 409 ते 415, टागोर नगर या सात इमारतीमध्ये अंदाजे 125 चौ.फुटाचे प्रत्येक इमारतीत 96 गाळे असे एकुण 672 मालकी हक्काचे गाळे सन 1981-1982 या वर्षात मुंबई मंडळातर्फे वितरीत करण्यात आले होते.
2	असल्यास, सदर गाळयांकरीता प्राधिकरणाने ठराव क्र.5892 दि.27/08/1992 अन्वये दि.01/07/2003 पासून उक्त इमारतींना भुईभाडे रु.07.00, व्यवस्थापन कर रु.10.00, अकृषी कर रु.07.00, मलनिस्सारण आकार रु.07.00 एकूण रु. 31.00 एवढे आकारले जात आहे हे खरे आहे काय,	अंशत: खरे आहे. टागोर नगर वसाहतीवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने सन 2003 साली सेवाशुल्काची आकारणी निश्चित करण्यात आलेली होती. तदनुसार सन 2003-04 साली मासिक सेवाशुल्क रु. 61.73/- प्रतिगाळा प्रति माह आकारण्यात आलेले आहे. सदर शुल्कात रु.7/- भुईभाडे, रु.7/- अकृषी कर, रु.10/- प्रशासकीय आकार व रु.7/- विमा कर असे दर्शविण्यात आले असुन उर्वरीत रक्कम ही बाहय देखभाल व विदयुत विभागामार्फत खर्चापोटी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे दर्शविण्यात आली होती. मात्र ठराव क्र.5892 दि.20/2/2003 दवारे मुंबई महापालिकेला पाणी व मालमत्ता करापोटी अदा करावी लागणारी पाणीपटटी व मालमत्ता कर तसेच बी. एस. ई. एस. ला वीज पुरवठयापोटी दयावे लागणारे वीज देयक वगळता मुंबईतील म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांस म्हाडा मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा उदा पंप घरातील दिवाबत्ती, पंप घराची देखभाल,

		पंपचालकाचा पगार, जलवाहिन्यांची तातडीची दुरुस्ती, साफसफाई कामगारांचे पगार, साफसफाईसाठी लागणारे सामान इत्यादी यावरील शुल्काचा दर 50 टक्क्यांनी कमी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली होती.
3	असल्यास, कार्यकारी अभियंता, कुर्ला विभागाने सेवा करात सन 2019-2020 मध्ये रु.1638.47, सन 2020 ते 2021 रु.1092.9 अशी लक्षणीय वाढ करुन इमारत क्र.409 ते 415 रहिवाशांना 75,000/- रुपयांची नोटीस बजावण्यात आलेली आहे हे ही खरे आहे काय,	अंशत: खरे आहे. मुंबई मंडळातर्फे टागोर नगर येथील बहुमजली इमारतींसाठी सेवाआकार निश्चित करुन सन 2019-2020 मध्ये रु.1638.47, सन 2020 ते 2021 रु.1092.9 प्रति सदनिका प्रतिमाह या दराने आकारणी करण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रकरणांत कोणत्याही गाळेधारकांस थकबाकीपोटी नोटीसा बजावण्यात आल्या नसुन, एप्रिल 2021 पासुन सुधारीत सेवाआकाराच्या अनुषंगाने गाळेधारकांना फरकाची रक्कम म्हाडाच्या ऑनलाईन ई-बिलींग देयका अन्वये कळविण्यात आलेली आहे. ज्या गाळेधारकांनी नियमित सेवाआकाराचा भरणा केलेला आहे त्यांची थकबाकी रु. 75,000/- पेक्षा कमी आहे व ज्या गाळेधारकांनी सन 2021 पासून सेवा आकाराचा नियमित भरणा केलेला नाही केवळ अशाच गाळे धारकांची सेवा आकाराची थकबाकी रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा जास्त देखील आहे. मात्र सरसकट रु.75,000/- रक्कमेच्या नोटीशी बजावण्यात आलेल्या नसुन ऑनलाईन ई बिलींग प्रणालीत दिसणारी थकबाकी केवळ थकबाकीदार गाळेधारकांच्या बाबतीत अधिक आहे.
4	असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हेही खरे आहे काय,	होय. हें खरे आहे. मा. आमदार श्री. सुनिल राऊत, वि. स. स. यांचे पत्र दि.3/11/2025 रोजीचे पत्र मुंबई मंडळास प्राप्त झाले असुन इमारत क्र. 409 ते 415, टागोर नगर या सात इमारतीमधील रहिवाश्यांना रु.75,000/- इतक्या रक्कमेच्या बजावलेल्या नोटीशी मागे घेण्याची विनंती सदर पत्रात केलेली आहे.

5	असलयास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले. तद्नुसार कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	क्र. 3 प्रमाणे सदर सात इमारतीतील रहिवाश्यांना कोणत्याही नोटीशी बजावण्यात आलेल्या नसुन केवळ थकबाकीदार गाळेधारकांच्या ऑनलाईन ई बिलिंग प्रणालीत अधिक रक्कमेची थकबाकी दिसुन येत असुन नियमित सेवा आकार अदा करणाऱ्या गाळेधारकांची थकबाकी अधिक रक्कमेची आढळत नाही.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:13:43

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

पुरक टिपणी :-

विषय:- <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक</u> 24923
विक्रोळी मुंबई येथील टागोर नगर इमारत क्र.409 ते 415 गाळेधारकांना कार्यकारी अभियंता, कुर्ला विभाग, यांनी वाढीव सेवा आकारल्याबाबत.
श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) मा.वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताप्र 2026/ प्र.क्र.119 गृनिप,दि.20/05/2026

म्हाडाच्या टागोर नगर अभिन्यासात असलेल्या इमारत क्र. 409 ते 415, टागोर नगर या सात बहुमजली इमारतींमध्ये अदमासे 125 चौ.फुटाचे प्रत्येक इमारतीत 96 गाळे असे एकुण 672 मालकी हक्काचे गाळे सन 1981-1982 या वर्षात मुंबई मंडळातर्फे वितरीत करण्यात आले होते. सदर गाळयांचे क्षेत्रफळ अंदाजे 125 चौ.फुट आहे. सदर अभिन्यासात मंडळातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवेपोटी व इतर विहीत शुल्कापोटी नियमित प्रतिमाह आकारणी करण्यात येत असते.

सन 2003 साली टागोर नगर वसाहतीवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने सेवाशुल्काची आकारणी निश्चित करण्यात आलेली होती. तदनुसार सन 2003-04 साली मासिक सेवाशुल्क रु. 61.73/- प्रतिगाळा प्रति माह आकारण्यात आलेले आहे. सदर शुल्कात रु.7/- भुईभाडे, रु.7/- अकृषी कर, रु.10/- प्रशासकीय आकार व रु.7/- विमा कर असे दर्शविण्यात आले असुन उर्वरीत रक्कम ही बाहय देखभाल व विदयुत विभागामार्फत खर्चापोटी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे दर्शविण्यात आली होती. मात्र ठराव क्र.5892 दि.20/2/2003 दवारे मुंबई महापालिकेला पाणी व मालमत्ता करापोटी अदा करावी लागणारी पाणीपटटी व मालमत्ता कर तसेच बी. एस. ई. एस. ला वीज पुरवठयापोटी दयावे लागणारे वीज देयक वगळता मुंबईतील म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांना म्हाडा मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा उदा पंप घरातील दिवाबत्ती, पंप घराची देखभाल, पंपचालकाचा पगार, जलवाहिन्यांची तातडीची दुरुस्ती, साफसफाई कामगारांचे पगार, साफसफाईसाठी लागणारे सामान इत्यादी यावरील शुल्काचा दर 50 टक्क्यांनी कमी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली होती.

तदनंतर 2024 रोजी सेवा आकार निश्चित करतेवेळी मुंबई मंडळातर्फे टागोर नगर येथील बहुमजली इमारतींसाठी सेवाआकार निश्चित करुन सन 2019-2020 मध्ये रु.1638.47, सन 2020 ते 2021 रु.1092.9 प्रति सदनिका प्रतिमाह या दराने आकारणी करण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रकरणांत कोणत्याही गाळेधारकांस स्वतंत्ररित्या थकबाकीपोटी नोटीसा बजावण्यात आल्या नसुन,

एप्रिल 2021 पासुन सुधारीत सेवाआकाराच्या अनुषंगाने गाळेधारकांना नियमित देयकासह फरकाची रक्कम म्हाडाच्या ऑनलाईन ई-बिलींग देयका अन्वये कळविण्यात आलेली आहे. ज्या गाळेधारकांनी नियमित सेवाआकाराचा भरणा केलेला आहे त्यांची थकबाकी रु. 75,000/- पेक्षा कमी आहे व ज्या गाळेधारकांनी सन 2021 पासून सेवा आकाराचा नियमित भरणा केलेला नाही केवळ अशाच गाळे धारकांची सेवा आकाराची थकबाकी रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा जास्त देखील आहे. मात्र सरसकट रु.75,000/- रक्कमेच्या नोटीसेस बजावण्यात आलेल्या नसुन ऑनलाईन ई बिलींग प्रणालीत दिसणारी थकबाकी केवळ थकबाकीदार गाळेधारकांच्या बाबतीत अधिक आहे.

याबाबत मा. आमदार श्री. सुनिल राऊत, वि. स. स. यांचे पत्र दि.3/11/2025 रोजीचे पत्र मुंबई मंडळास प्राप्त झाले असुन इमारत क्र. 409 ते 415, टागोर नगर या सात इमारतीमधील रहिवाश्यांना रु.75,000/- इतकया रक्कमेच्या बजावलेल्या नाटीसी मागे घेण्याची विनंती केलेली आहे. मात्र उपरोक्त नमुद सात इमारतीतील रहिवाश्यांना कोणत्याही नोटीसेस स्वतंत्ररित्या बजावण्यात आलेल्या नसुन केवळ थकबाकीदार गाळेधारकांच्या ऑनलाईन ई बिलिंग प्रणालीत अधिक रक्कमेची थकबाकी दिसुन येत असुन नियमित सेवा आकार अदा करणाऱ्या गाळेधारकांची थकबाकी अधिक रक्कमेची आढळत नाही. बहुतांश सदनिकाधारक हे नियमित सेवाशुल्काचा भरणा करीत आहेत.

(मा.उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:14:16

मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
कक्ष क्र.407, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई-51
म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई400032-.

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-24681
'मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील भारत नगर, पुनर्विकास हा म्हाडाच्या 33 /5 योजनेंतर्गतकरण्याबाबत'.
श्री. वरुण सरदेसाई, मा.वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.114/गृनिप, दि.20.05.2026.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-24681अन्वये " मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील भारत नगर, पुनर्विकास हा म्हाडाच्या 33 /5 योजनेंतर्गत करण्याबाबत" बाबत श्री. वरुण सरदेसाई, मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेला आहे.

या अनुषंगाने सदरहू अतारांकित प्रश्नाचे उत्तर व पुरक टिपणी आपल्या माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांचे मान्यतेने)

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:10:14
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-24681
'मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील भारत नगर, पुनर्विकास हा म्हाडाच्या 33 /5 योजनेंतर्गत करण्याबाबत'.
श्री. वरुण सरदेसाई, मा.वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.114/गृनिप, दि20.05.2026.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1.	मुबईतील वांद्रे (पूर्व) येथील भारतनगरचा पुनर्विकास हा म्हाडाच्या 33/5 योजनेंतर्गत करण्याचा प्रस्ताव मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि.08 ऑगस्ट 2025 रोजी सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,	होय
2.	असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, 2025 मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,	होय
3.	असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?	शासनाशी संबंधित
4.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	शासनाशी संबंधित

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:11:54

मुख्य अधिकारी
मुंबई गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
मुंबई

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्रमांक-24681

'मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील भारत नगर, पुनर्विकास हा म्हाडाच्या 33 /5 योजनेंतर्गत करण्याबाबत'.

श्री. वरुण सरदेसाई, मा.वि.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.अताप्र-2026/प्र.क्र.114/गृनिप, दि 20.05.2026.

<u>पुरक टिपणी :-</u>

भारतनगर, बि.के.सी., सी.टी.एस. क्र. 7643 (पार्ट), वांद्रे (पूर्व), मुंबईयेथील म्हाडाच्या अभिन्यासाचे क्षेत्र सुमारे 1,78,112.00 चौ.मी. आहे. त्यापैकी सुमारे 1,13,122.80 चौ.मी. भूखंडावर 64 बैठ्या चाळी व 1 2 भूखंड निर्माण करुन, त्यावर पश्चिम द्रुतगती महामार्गामुळे बाधीत झालेल्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन एकूण 1000 गाळे व 1915 पिचेस (मोकळे भूखंड) मध्ये करण्यात आले. सदर पिचेस धारकांनी स्वत: वैयक्तिक बांधकाम केलेले आहे.

उपरोक्त नमूद 64 चाळीपैंकी, चाळ क्र. 53 ते 64 अशा 12 बैठ्या चाळींच्या रहिवांश्यानी स्थापन केलेली भारत एकतासह.गृह.संस्था आणि 12 भूखंडांपैकी भूखंड क्र.नं. 7, 8, 9,व 12 या 4 भूखंडांवरील पिचेसधारकांनी स्थापन केलेली बसेरा सह.गृह.संस्था या दोन्ही संस्थांना विनियम 33(10) अंतर्गत पुनर्विकासाकरिता म्हाडामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहेत. तसेच पत्थर नगर एकता सह.गृह.संस्था या झोपडपट्टी वसाहतीकरिता विनियम 33(10) अंतर्गत दि. 16.11.2005 रोजी म्हाडा मार्फत ना-हरकतप्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत भारतनगर, अभिन्यासातील भूखंड क्र.1,2,3,4,11 व 12, तसेच चाळ क्र. 1 ते 52 येथे स्वच्छता, पाणी पुरवठा गटार दुरुस्ती, शौचालय दुरुस्ती इत्यादी सर्व सोयी-सुविधा पुरविण्याचे काम म्हाडा मार्फत केले जात आहे.

भारतनगर, वांद्रे (पुर्व) वसाहतीच्या अभिन्यासास 3.00 चटई क्षेत्र निर्देशांकानुसार दि.03.09.2024 रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरअभिन्यासातील ना-हरकत प्रमाणपत्र जारी केलेल्या भुखंडांचा पुनर्विकास वगळता उर्वरित 55,500.70 चौ.मी. भूखंड क्षेत्रावर, भूखंड क्र.1 ते 4, 11 व 12ए आणि चाळ क्र.1 ते 52 वसलेल्या आहेत. या 55,500.70 चौ.मी. भूखंडावर, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली 2034 मधील विनियम 33 (5) अंतर्गत अनुज्ञेय 4.00 चटई क्षेत्र निर्देशांकांनुसार उपलब्ध होणा-या बांधकाम क्षेत्रफळाकरीता गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर एकत्रित पुनर्विकास C & D Agency ची नियुक्ती करुन करणेबाबतच्या प्रस्तावास मा. मंत्री मंडळाची मंजुरी घेण्याकरीताचा प्रस्ताव शासनास दि.08.08.2025 रोजी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावामध्ये विनियम 33 (5) अंतर्गत 4.00 चटई क्षेत्र निर्देशांकानुसार गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर प्राप्त होणारे 1,01,816.55 चौ.मी. (फंजिबलसह) बांधकाम क्षेत्रफळ गृहसाठा हे किमान आधारभूत ग्राह्य धरुन म्हाडास उच्चत्तम गृहसाठा देणा-या व निविदेची आर्थिक व भौतिक अटींची पुर्तता करणा-या निविदाकारास पुनर्विकासाची परवानगी देण्यात यावी, असे प्रस्तावित करण्यात आले आहे.

दरम्यान, प्लॉट क्र.11 वरील पॅराडाईज सह. गृह. संस्था [मर्या.] संस्थेने Writ Petition No. 2047/2016, Writ Petition No.675/2018 व Interim Application (L) No. 28705 /2021 अन्वये मा. उच्च न्यायालयामध्ये त्यांच्या संस्थेचा पुनर्विकास विनियम 33 (10) ऐवजी विनियम 33 (5) अंतर्गत करण्यात यावा, अशी मागणी केली होती. म्हाडाने विनियम 33 (5) अंतर्गत समुह पुनर्विकास करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केल्यामुळे याचिकाकर्त्यांनी दावे मागे घेण्याकरीता केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मा उच्च न्यायालयाने दि.17.01.2026 रोजीच्या आदेशान्वये वरील सर्व दावे निकाली काढले आहेत.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 23-06-2026
12:11:09

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHOHRITY

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१७२६६.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./पा.अधि/विधानसभा अता.प्र.१७२६६/ /दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, 4014
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 11 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१७२६६.
दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी येथील डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक इमारती जुन्या व जीर्ण असल्याबाबत.
- **मा.श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) व इतर मा. विधानसभा सदस्य.**

संदर्भ: कक्ष अधिकारी, गृहनिर्मान विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र.विसअताप्र-२०२६/ प्र.क्र.४२/ दुवपु-१, दि.२४.०४.२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१७२६६** ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(प्रविण शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता - ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१७२६६.

दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी येथील डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक इमारती जुन्या व जीर्ण असल्याबाबत.

- मा.श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) व इतर मा. विधानसभा सदस्य.

अ. क्र.	प्रश्न	उत्तर
१.	दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी येथील डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात १६ हजार जुन्या व जीर्ण उपकरप्राप्त इमारती असून त्या मोडकळी आल्या असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,	होय, हे अंशत: खरे आहे. मुंबई शहरात माहे २०२५ अखेरीस सुमारे एकूण १२५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात होत्या व त्यापैकी काही इमारती या जीर्ण अवस्थेत आहे.
२.	असल्यास, अश्या इमारतींमध्ये वारंवार अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी होण्याच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,	होय, हे अंशत: खरे आहे. मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची मंडळातर्फे आवश्यकतेनुसार संरचनात्मक दुरुस्ती करण्यात येते. त्यामुळे अश्या इमारतीमध्ये अपघात होण्याच्या घटना घडण्याचे प्रकार कमी झाले आहेत.
३.	असल्यास, या विभागात असणाऱ्या इमारतींचा पुनर्विकास होणे गरजेचे असून, या इमारतींची दुरुस्ती अथवा पुनर्विकास करण्यासाठी रहिवाश्यांची मागणी केली आहे. हे ही खरे आहे काय,	होय. हे अंशत: खरे आहे. जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचा पुनर्विकास होणे आवश्यक आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहिवाश्यांनी दुरुस्तीसाठी अर्ज केले आहेत. त्याच्या इमारतीची दुरुस्ती ही मंडळातर्फे आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.
४.	असल्यास, या इमारतींच्या पाहणीसाठी अथवा इतर कामांसाठी म्हाडाकडे कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,	होय. हे अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत मंडळाच्या संबंधित विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता असली तरी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याकडून इमारतीची पाहणी व संरचनात्मक दुरुस्तीची कामे करण्यात येतात.
५.	असल्यास या इमारतींचा पुनर्विकास समुह पध्दतीने (क्लस्टर) होणेकरिता शासनाने काही धोरण केले आहे काय,	शासन नगर विकास विभागाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या व म्हाडाने पीएमजीपी अंतर्गत बांधलेल्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या समुह पुनर्विकास योजनांसाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी ३३(२४) अंतर्गत तरतुद करण्यात आलेली आहे.
६.	असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	वर नमुद केल्याप्रमाणे, शासन नगर विकास विभागाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतुदी केल्या आहेत. तसेच इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने व व्यवहार्य होण्याकरिता वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा केल्या आहेत. वास्तव विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१७२६६.
दक्षिण मुंबई मधील मुंबादेवी येथील डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरात अनेक इमारती जुन्या व जीर्ण असल्याबाबत.
- मा.श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) व इतर मा. विधानसभा सदस्य.

पुरक टिप्पणी:

मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती व पुनर्विकास ही बाब दुरुस्ती मंडळाच्या अखत्यारीत येते.

शासनाने मुंबई शहर बेटावरील सुमारे १९६४२ इमारतींच्या दुरूस्ती / पुनर्बांधणीची जबाबदारी स्विकारून, मुंबई घर दुरूस्ती व पुनर्रचना कायदा १९६९ मंजूर करून त्या अन्वये या मंडळाची स्थापना होऊन मंडळ १९७१ मध्ये कार्यरत झाले. तद्नुसार सुमारे १९६४२ इमारतींना सदर कायद्यानुसार उपकर लावण्यात आला. तद्नंतर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सदर उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती व पुर्नबांधणी करण्याचे काम सुरु केले. सन १९७०-७१ ते माहे जुलै २०२२ पर्यंत मंडळाने एकूण ९४१ जुन्या व दुरुस्तीपलिकडे घोषित केलेल्या उपकरप्राप्त इमारती तोडून त्याठिकाणी नविन पुनर्रचित इमारती बांधल्या आहेत व त्यामध्ये २६९६१ निवासी + २०१५ अनिवासी असे एकूण २९००३ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन केले आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतींना दुरुस्तीची आवश्यकता आहे, अशा इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती मंडळाने वेळोवेळी निधीच्या उपलब्धतेनुसार केली आहे व करीत आहे. दुरुस्ती मंडळ स्थापन झाल्यापासून उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागाची किंवा आवश्यक ती दुरूस्ती मुंबई इमारत दुरूस्ती मंडळातर्फे करण्यात येते. त्यामुळे बऱ्याच इमारतींच्या विविध भागांची दुरूस्ती टप्प्या टप्प्याने झाली आहे. सन १९७०-७१ पासून ते दि.३१.०३.२०२४ पर्यंत मंडळाने उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची टप्प्या टप्प्याने ३७७६१ कामे पुर्ण केली आहेत. तसेच ९५१ दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहे. सन २०२४-२५ मध्ये ७१४ इमारतींच्या दुरुस्तीची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रत्यक्षात सध्या अस्तित्वात असलेल्या सुमारे १२५५२ उपकर प्राप्त इमारतींपैकी बहुतांश इमारतींची आयुर्मर्यादा संपुष्टात आली असून व त्यापैकी काही इमारती दुरूस्तीपलिकडे गेल्या आहेत. तशातच, या इमारतींतील दाट लोकवस्ती, अवजड सामान, निवासी गाळयांचा अनिवासी स्वरूपात होणारा वापर, त्यातून ठेवण्यात आलेली यंत्रसामुग्री, रहिवाशांनी केलेली पोटमाळयाची बांधकामे, इतर स्वरूपातील अनधिकृत बांधकामे, इमारतीच्या देखभालीकडे मालक/रहिवाशांनी केलेले दुर्लक्ष, इमारतीच्या आजूबाजूस साचणारे सांडपाणी इत्यादी कारणांमुळे इमारती संरचनात्मक दृष्टया क्षीण झाल्याने अंतत: इमारती कोसळतात असे मागील काही घटनांवरून निदर्शनास आले आहे. या घटनांचे प्रमाण मुख्यत्वे पावसाळयात अधिक असल्याने नियमित करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणाव्यतिरिक्त प्रतिवर्षी फेब्रुवारी ते मे महिन्याच्या दरम्यान मंडळाचे अभियंते उपकरप्राप्त इमारतींची पाहणी दृष्य स्वरूपात करतात व पाहणीतून त्यांना धोकादायक आढळलेल्या इमारतींची धोकादायक स्थिती विचारात घेवून इमारतीचा धोकादायक भाग पाडणे, धोकादायक भागास व आवश्यकतेनुसार इतर भागास टेकू लोवणे, धोकादायक भागातील व इतर दुरूस्ती करावयाच्या भागातील रहिवाश्यांना संक्रमण शिबिरात हलविणे अश्या स्वरूपाची कार्यवाही करून अशा इमारतींच्या दुरूस्तीबाबतची पुढील अनुषंगिक कार्यवाही तातडीने करण्यात येते. पावसाळापुर्व सर्वेक्षणात तसेच सतत चाललेल्या सर्वेक्षणात आढळलेल्या धोकादायक इमारतींची यादी प्रतिवर्षी विविध भाषिक वृत्तपत्रांतुन रहिवाशांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात येते. तसेच रहिवाशांनी योग्य ती खबरदारी घ्यावी यादृष्टीने काही मौलिक सूचना देखील वृत्तपत्रांतुन प्रसिध्द करण्यात येतात. धोकादायक ठरविलेल्या इमारतींवर ती इमारत धोकादायक असल्याचा फलक लावण्यांत येतो. इमारतीच्या धोक्याची लक्षणे तथा इमारत कोसळल्याचे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता मंडळाने इमारत क्रमांक ८९-९५, रजनीमहल, ताडदेव, मुंबई येथे अहोरात्र चालणारा नियंत्रण कक्ष कार्यरत असून त्याचा दूरध्वनी क्र.२३५१७४२३ व २३५३६९४५ असा आहे. या नियंत्रण कक्षात उपअभियंता अथवा कनिष्ठ अभियंता दर्जाचे अधिकारी २४ तास उपस्थित असतात. संदेश प्राप्त होताच ते प्रत्यक्ष जागेवर जाऊन इमारतींची पाहणी करून आवश्यक ती अनुषंगिक कार्यवाही करतात.

इमारतींच्या सर्वेक्षणाच्यावेळी सर्वसाधारणपणे इमारतीच्या संरचनात्मक दृष्टया महत्वाच्या असलेल्या दृष्यमान भागाचे परिक्षण करण्यात येते. इमारतीच्या न दिसणाऱ्या भागाची पाहणी करता येत नाही. दक्षिण मुंबईतील इमारती हया दाटीवाटीने वसलेल्या असल्याने दोन इमारतीमधील अरूंद गल्लीबोळ, त्यात साचलेला घनकचरा, घाणीने तुंबलेली गटारे यामुळे इमारतीच्या संपूर्ण बाहयभागाचे निरिक्षण करता येत नाही. तसेच इमारतीच्या काही खोल्यामध्ये आतून फॉल्स सिलिंग सारख्या सजावट कामामुळे छताचे परिक्षण करता येत नाही. काही खोल्या बंद असणे, भाडेकरूंनी केलेला विरोध यामुळे इमारतीची पूर्ण पाहणी करणे अशक्य होते. त्यामुळे अशा इमारतींच्या संरचनात्मक स्थैर्याबाबत निश्चित असा अंदाज बांधता येत नाही.

तथापि इमारतींचे नियमीतपणे सर्वेक्षण मंडळाच्या अभियंत्यांमार्फत करण्यांत येऊन पुढील कार्यवाही जसे धोकादायक भाग पाडून टाकणे, इमारतीस टेकू लावणे, धोकादायक भागातील भाडेकरूंची संक्रमण शिबीरात पर्यायी व्यवस्था करून धोकादायक भाग दुरूस्तीस घेणे इ. कार्यवाही करण्यात येते.

विकास योजना आराखडयामधील आरक्षणे, विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदी, रेल्वे हददीनजिक ३० मीटर जागा मोकळी सोडणे यांसारख्या कारणांमुळे बऱ्याच इमारतींची पुनर्रचना होऊ शकली नाही. बऱ्याच ठिकाणी मालक/रहिवाशी यांचेमार्फत भूसंपादन कार्यवाहीस होणारा विरोध. न्यायालयीन स्थगिती आणणे. भाडेकरूंनी संक्रमण शिबीरात पर्यायी जागा न स्विकारणे. इमारत पाडण्यास विरोध करणे वगैरे कारणांमुळे पुनर्वांधणीच्या कार्यवाहीस बराच विलंब होतो.

➢ **मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी व त्यामधील राहणाऱ्या भाडेकरु / रहिवाश्यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या उपाययोजनाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे सादर:**

बृहन्मुंबईतील भाडेतत्वारील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचनेसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभागाने दि.१३.०६.१९९६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे श्री सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमला होता. सदर अभ्यास गटाच्या असे निदर्शनास आले की, मुंबई शहरातील मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींची वारंवार दुरूस्ती करूनसुद्धा मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जिवित व वित्तहानी होते. त्यामुळे या इमारतींचा पुनर्विकास करण्यावाचुन गत्यंतर नाही. शासनाने जुन्या उपकरप्राप्त इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचना करण्याची जबाबदारी हि म्हाड अधिनियमानुसार म्हाडावर सोपविली आहे. परंतु मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असलेल्या जुन्या उपकरप्राप्त इमारतींची दुरूस्ती व पुनर्रचना करणे हे म्हाडास शक्य होणार नाही व त्याकरीता उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना प्रोत्सहनात्मक चटईक्षेत्र निर्देशांक दिल्यास मालक स्वत:हुन त्यांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास पुढे येतील. श्री सुकथनकर यांच्या अभ्यास गटाने शासन गृहनिर्माण विभागास माहे जुलै १९९७ मध्ये अहवाल सादर केला होता. महाराष्ट्र शासनाने सदर अहवालातील सुचविलेल्या शिफारसी स्विकृत करून विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये सुधारणा केल्या व शासन नगर विकास विभागाने दि.२५.०१.१९९९ रोजीच्या अधिसुचनेद्वारे उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना पुनर्विकासास प्रोत्साहित करण्यासाठी ज्यादा/प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचा निर्णय घेतला. तद्नंतर विकास नियंत्रण नियमावली ३३(७) व ३३(९) मध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

विकास नियंत्रण नियमावली ३३(७):-

शासनाने नगर विकास विभागाने दि.२५.०१.१९९९ व दि.२१.०५.२०११ च्या अधिसूचनेद्वारे मुंबई शहर जिल्ह्यातील उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(७) जारी केली. उपकरप्राप्त इमारतीतील किमान ७०% (सध्या ५१%) भाडेकरू/ रहिवाश्यांची संमत्ती व मालकाची संमत्ती असल्यास सदर इमारतीचा पुनर्विकास या नियमावली अंतर्गत करण्याची तरतूद होती.

तसेच शासनाने दि.१६.०८.२०१० रोजी शासन निर्णय काढून भाडेकरू रहिवाश्यांची पात्रता निश्चितीमध्ये येणा-या अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

नगर विकास विभागाच्या दि.२१.०९.२०१८ व दि.१२.११.२०१८ रोजीच्या अधिसुचनेतील विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत सुधारणा.

१) एका भुखंडाचा पुनर्विकास केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + ५% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
२) २ ते ५ भुखंडाचा पुनर्विकास सामुहिकपणे केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + ८% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
३) ५ पेक्षा अधिक भुखंडाचा पुनर्विकास सामुहिकपणे केल्यास, भाडेकरु / रहिवाश्यांना किमान ३०० चौ.फुट चटई क्षेत्र + १५% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र उपलब्ध होईल.
४) कमाल पुनर्वसन चटई क्षेत्र ७० चौ.मी. वरुन १२० चौ.मी. पर्यंत वाढविण्यात आलेले आहे.
५) पुनर्विकासासाठी ७० टक्के ऐवजी ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांची संमती असणे आवश्यक आहे.

नगर विकास विभागाचे क्रमांक टिपीबी-४३२०/१०७/प्र.क्र.७२/२०२०(भाग-१)/नावि-११, दि.०८.०७.२०२१ रोजीची अधिसुचनेव्दारे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये मंजूर केलेल्या सुधारणा:

विकास नियंत्रण नियमाली ३३(७)

१) पुनर्वसन बांधकाम क्षेत्रफळावर प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक ५०% वरुन ७५ ते १००% इतके देण्याची तरतुद केली आहे.
२) पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या ६६ इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.
३) उपकरप्राप्त इमारतींच्या भुखंडावर, विगर उपकरप्राप्त इमारतींचा समावेश असल्यास, विगर उपकरप्राप्त इमारतींच्या खालील भुखंडाच्या क्षेत्रफळाच्या ४५% इतके क्षेत्र नवीन नियमानुसार ३.०० चटई क्षेत्र

निर्देशांकाकरिता पात्र ठरविण्यात आले आहे व त्यावरील वि. नि. नि. अधिनियम ३० च्या तरतूदीस अधीन राहून क्षेत्रफळ अनुज्ञेय ठरविले आहे.

४) वाढीव प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक जे प्रकल्प प्रगतीपथावर आहे त्यांनासुध्दा देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

५) एकापेक्षा दोन किंवा अनेक पुनर्विकास योजना संयुक्तपणे राबविण्याची तरतुद करण्यात आली आहे. जसे की. एखादा भूखंड छोटा आकाराचा असला व भाडेकरुची संख्या ही जास्त असल्यास अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक पुर्णपणे वापरता येणे शक्य नसल्यास, १० किलोमीटर अंतराच्या आत त्याच मालक / विकासकाचा दुसरा प्रकल्प सुरु असल्यास. अश्या दोन्ही प्रकल्प संयुक्तपणे राबविण्याची तरतुद नव्याने करण्यात येते.

➢ **शासनाने दि.०५.०३.२०२१ रोजी च्या शासन निर्णयाव्दारे पुनर्विकास प्रस्तावास मान्यता देण्याबाबतच्या नविन मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून, त्या सुचनांनुसार मालक / विकासकाचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे निश्चित केले आहे.**

- विकासकाकडून पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यांनी पुर्वी केलेल्या कामांचा तपशील तपासुन विकासकांची पात्रता निश्चित करणे.
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकास योजनेमध्ये विकासकांकडुन भाडेकरू / रहिवाशी यांच्या भाड्यापोटी रक्कम आगाऊ स्वरूपात जमा करण्यासाठी एस्क्रो खाते (Escrow Account) उघडणे
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समितीची स्थापन करणे
- म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम-१०३ब अन्वये भुसंपादित केलेल्या मालमत्तेचा पुनर्विकासास चालना देण्यासाठी मार्गदर्शक सुचना
- उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा

विकास नियंत्रण नियमावली ३३(९):-

शासनाने दि.०२.०३.२००९ च्या अधिसूचनेद्वारे सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील कलम ३३ (९) जारी केली आहे. सदर नियमावली अंतर्गत उपकरप्राप्त इमारतींबरोबर बिगर उपकरप्राप्त इमारती, शासकीय इमारती व काही प्रमाणांत झोपडपट्टी असलेल्या क्षेत्राचा समुह पध्दतीने पुर्नविकास करण्याची तरतुद आहे. तद्नंतर मूळ अधिसुचनेमध्ये सुधारणा करून शासनाने दि.०९.०९.२०१४ च्या अधिसुचना जारी केली आहे व डीसीपीआर २०३४ नुसार विकास नियंत्रण नियमावली क्र.३३(९) दि.१२.११.२०१८ पासुन अंमलात आणलेली आहे. तसेच अधिसुचना ०८.०७.२०२१ अन्वये विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मध्ये मंजूर केलेल्या आहेत.

मंडळातर्फे जुन्या उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासासाठी खाजगी विकासकांना २५८१ ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले असून त्यामध्ये एकूण ४५४४ उपकरप्राप्त इमारतीचा समावेश असून ८६१४३ भाडेकरू / रहिवाश्यांचा समावेश आहे. आतापर्यंत १०११ योजनांचे काम पूर्ण झाले असून १६९९ जुन्या उपकरप्राप्त इमारतीमधील २८७९३ भाडेकरू / रहिवाश्यांचे पुनर्वसन झालेले आहे.

विकासकामार्फत पुनर्विकासास प्रतिसादातील अडचणी:-

- मालकांचा, मालक म्हणून हिस्सा निश्चित नाही. अल्प मोबदला हे कारण असू शकेल.
- मालकांचे / वारसदारांचे आपसातील वाद. (न्यायालयीन प्रकरणे).
- एकाच भुखंडावर उपकरप्राप्त / बिगर उपकरप्राप्त इमारती असताना बिगर उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाश्यांना संरक्षण / क्षेत्र निश्चिती यात तफावत.
- म्हाड कायदा, १०३(B) अंतर्गत झालेल्या सहकारी संस्थासाठीच्या भु-संपादनानंतरही पुनर्विकास रखडला.
- भु-संपादनास लागणारा अवाजवी कालावधी - न्यायालयीन लढाया इ.

रखडलेल्या प्रकल्पांची कारणे:-

- विकासकांची अकार्यक्षमता / दिवाळखोरी / प्रकल्पांची व्यवहार्यता संपुष्टात-नवीन विकासक नेमण्याची तरतूद नाही.
- Non Developable Plot Size - ६ मी मार्जिनची आवश्यकता.
- मालक / विकासक / भाडेकरू यांचे वाद.
- नविन तरतुदीनुसार ५१% सहमतीनंतरही ४९% लोकांचा जागा रिकामा करण्यास विरोध - न्यायालयात धाव घेणे.

सुरू प्रकल्पातील तक्रारी:-

१. प्रकल्प वेळेवर न होणे.
२. बंद पडलेले प्रकल्प ही जास्त धोकादायक समस्या.
३. क्षेत्रफळांचे वाद - मिळणारे क्षेत्रफळ / मूळ क्षेत्रफळ / फंजिबल.
४. भाडे आणि कॉर्पसचे वाद - पैसे अदा न होणे.
५. करारनामे वेळेवर न होणे.
६. Non-consented भाडेकरूंना मिळणारी वागणूक.

➢ **मंडळाने पुनर्रचित केलेल्या व ३० वर्षे पूर्ण झालेल्या इमारतींचा पुन्हा पुनर्विकास करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये प्रस्तावित सुधारणा [विकास नियंत्रण नियमावली ३३(२४)]**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने मुंबई शहरातील जुन्या व उपकरप्राप्त इमारती तोडून, त्या जागी सन १९७३ ते २०१७ या कालावधीमध्ये एकूण ३८८ पुनर्रचित इमारती बांधल्या आहेत, यामध्ये एकूण ३६३८६ रहिवाशी राहत आहेत. यापैकी बहुतांश इमारतींना ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने, कमकुवत अवस्थेत असून, अशा इमारतींचा पुनर्विकास व्हावा, यासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये नव्याने तरतुद करण्याच्या अधिन राहून नगर विकास विभागाने क्रमांक टीपीबी-४३२१/ ५४३/प्र.क्र.१८६/२०२१/नावि-१, दि.२८.०२.२०२२ रोजीच्या सुचनेनुसार वृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामावली २०३४ मध्ये नविन कलम ३३(२४) अंतर्गत सुधारणा करण्याचे प्रस्तावित फेरबदलाबाबत सुचना प्रसिध्द करुन, त्यावर हरकती / सुचना मागविण्यात आल्या होत्या. म्हाडा/मंडळाने दि.२४.०३.२०२२ व दि.०३.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये उपसंचालक, नगर रचना विभाग, यांना सविस्तर सुचना सादर केल्या आहेत.

शासन नगर विकास विभागाने दि.१९.१२.२०२२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे म्हाडाने / मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये मान्यता दिली आहे. यानुसार आता मंडळाने पुनर्रचित केलेल्या इमारतींचा ज्यांना ३० वर्षे कालावधी पुर्ण झाला आहे किंवा अतिधोकादायक झाले असल्यास त्यांचा पुनर्विकास करता येणे शक्य आहे. परंतू सदर अधिसुचनेमध्ये प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक हे ४५% ते ५०% इतके असल्याने पुनर्विकास योजना व्यहारीक दृष्टया परवडत नसल्याने, काही विधानसभा सदस्यांनी अशी मागणी केली की, ज्याप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) नुसार प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात येतो त्याच धर्तीवर ३३(२४) मध्ये सुध्दा देण्यात यावा. या मुद्दयांबाबत पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये चर्चा झाली असता, मा.मुख्यमंत्री महोदय यांनी आश्वासन दिले की, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) नुसार ३३(२४) मध्ये सुध्दा प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून देण्यात येईल. त्यानुसार शासन नगर विकास विभागाने दि.०३.११.२०२३ रोजीच्या अधिसुचनेव्दारे ३३(२४) मध्ये फेरबदल करुन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम १५४(१) अन्वये सुचना निर्गमित केल्या होत्या. सद्य:स्थितीत शासन नगर विकास विभागाने अंतिम अधिसुचना दि.०८.१०.२०२४ रोजी निर्गमित केल्या असून, विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मधील तरतुदी अंतिम केल्या आहेत परंतू त्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांना भुखंडाच्या संख्येनुसार ५%, ८%, १५% अधिक चटई क्षेत्रफळाचा लाभ देण्याबाबतची तरतुद अंतर्भुत नाही.

तद्नंतर ३८८ पुनर्रचित इमारतीचा पुनर्विकास करताना विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) मध्ये विकास नियंत्रण नियमावली ३३(७) प्रमाणे भाडेकरु / रहिवाश्यांना किमान पुनर्वसन क्षेत्रावर ५%, ८%, १५% अधिक चटई क्षेत्र देण्याबाबतची सुचना शासन नगर विकास विभागाने दि.१८.०७.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ इमारतीं व पीएमजीपी अंतर्गत पुनर्रचित केलेल्या ६६ इमारतींचा पुनर्विकास करताना, प्रकल्प व्यवहार्य होण्याकरिता, जमिन मालक म्हणून, प्रचलित ASR नुसार जमिनीच्या किंमतीच्या २५% दराने होणाऱ्या किंमती इतके बांधकाम क्षेत्रफळाच्या निवासी सदनिका म्हाडाने घेण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरणाने दि.१८.०९.२०२५ रोजीच्या प्राधिकरणाच्या ३०१ बैठकीत ठराव क्रमांक ७१३८ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे.

"प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ इमारतीं व पीएमजीपी अंतर्गत पुनर्रचित केलेल्या ६६ इमारतींचा पुनर्विकास करताना, चटई क्षेत्र निर्देशांक ३.०० पेक्षा अधिक अनुज्ञेय असलेल्या प्रकल्पांना, प्रकल्प व्यवहार्य होण्याकरिता, जमिन मालकीच्या मोबदल्यात प्रचलित ASR नुसार जमिनीच्या किंमतीच्या २५% दराने होणाऱ्या किंमती इतके बांधकाम क्षेत्रफळाच्या निवासी सदनिका विकासकाने म्हाडास हस्तांतरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. म्हाडा / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) व ३३(७) मधील तरतुदीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करताना, सदर अट अंतर्भुत करण्यात यावी."

➢ **मालक / विकासकांनी उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रकल्प सुरु करुन अर्धवट अवस्थे सोडले आहेत, असे प्रकल्प म्हाडाने पुर्ण करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.**

शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजी मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर आमदाराच्या समितीची दि.१९.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी मुंबई बेटावरील रखडलेल्या / बंद पडलेल्या / अर्धवट सोडलेल्या योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत उपाय योजना सुचविलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मंडळाने दि.१३.१०.२०१७, दि.२६.१०.२०१७, दि.०९.१०.२०१८ व दि.१२.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ७७ व ९१ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविलेल्या आहे.

शासनाने म्हाड अधिनियमात कलम ७७, ७९ व ९१ मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांना पावसाळी अधिवेशन २०२० मध्ये मान्यता दिली होती. (L.A.Bill No.XLI of २०२०). त्यानुसार सदर विधेयकास मा.महामहिम राष्ट्रपती

महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, शासनाने सदर विधेयक दि.०२.१२.२०२२ रोजी प्रसिध्द केले आहे. त्याप्रमाणे सुधारित कलम ७९(अ) व कलम ९१(अ) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे.

➢ नविन कलम ७९(अ)

ज्या उपकर प्राप्त इमारतींना महानगरपालिकेने एमएमसी अॅक्ट मधील कलम ३५४ अन्वये नोटीस बजावुन किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने इमारत धोकादायक घोषित केली आहे. अश्या इमारतींच्या मालकास ०६ महिन्यांच्या आत ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय संमतीपत्र प्राप्त करुन, पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. मालकाने तसे न केल्यास, भाडेकरु/ रहिवाश्यांच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेस पुढील ६ महिन्याच्या आत ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे अपरिवर्तनीय संमतीपत्र प्राप्त करुन पुनर्विकासाचा प्रस्ताव मंडळास सादर करावयाचा आहे. जर या दोघांनीही प्रस्ताव सादर न केल्यास, म्हाडाने सदर इमारत व त्याखालील भुखंड भुसंपादित करुन पुनर्विकास हाती घेण्याची तरतुद केली आहे.

शासनाने दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. मंडळाने एका प्रकरणामध्ये कलम ७९अ अंतर्गत मालकांस बजाविण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने इमारत मालकांने मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक ३७४३/२०२३ दाखल करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत आव्हान दिले होते. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.०२.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेली कलम ७९अ अंतर्गत नोटीस खारीज करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत म्हाडाने संबंधित इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांशी बैठक घेऊन, इमारतींच्या संरचनात्मक स्थितीची शहानिशा करण्याचे निर्देश दिले. या निर्देशांच्या अनुषंगाने, मंडळाने दि.१९.०३.२०२४ व दि.०५.१२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत खातरजमा करण्याच्या अनुषंगाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना (Standard Operating Procedure) निर्गमित केलेल्या आहेत.

सुधारित कलम ७९अ च्या तरतुदी या डिसेंबर २०२२ पासुन अंमलात आलेल्या आहेत. या तरतुदीनुसार, सुरुवातीला इमारत मालकांना ०३ महिन्याची नोटीस देऊन इमारत धोकादायक असल्याबाबत कळवावयाचे आहे. या कालावधीत इमारत मालकांने इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काहीच कार्यवाही केली नाही तर, कलम ७९अ नुसार इमारत मालकांस नोटीस बजावून ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या ०६ महिन्यांच्या कालावधीत इमारत मालकांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले नाही तर, संबंधित क्षेत्रिय उपमुख्य अभियता यांनी मालक व भाडेकरु / रहिवाशी यांची संयुक्त सुनावणी घेऊन, आदेश पारित करणे आवश्यक आहे. तद्नंतर कलम ७९अ(१ब) नुसार इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांना ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची नोटीस जारी केली जाते. या सर्व प्रक्रियेला सुमारे १५ महिन्यांच्या कालावधी लागतो. कलम ७९अ(१अ) व ७९अ(१ब) या तरतुदी म्हाड अधिनियमात नव्यानेच अंतर्भुत केल्या असल्याने, त्यामध्ये उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व कायदेशीर बाबी विचारात घेता, मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सुधारित म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ अंतर्गत तरतुदीनुसार, शासन गृहनिर्माण विभागाने व मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आतापर्यंत कलम ७९अ अंतर्गत जीर्ण झालेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना मंडळाने बजाविलेल्या नोटीसची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

❖ ७९अ(१अ)

- कलम ७९अ अंतर्गत बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ८५४
- इमारत मालकांनी सादर केलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : ६७
- इमारत मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या प्रकल्पांची संख्या : ३०
- मंडळातर्फे छाननी सुरु असलेले उर्वरित पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : ३७
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१अ) नोटीसची मुदत संपल्यानंतर, संबंधित उपमुख्य अभियंता, दुवपु मंडळ यांनी इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेतलेल्या प्रकरणांची संख्या : ६२२
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : ५९६

❖ ७९अ(१ब)

- कलम ७९अ(१ब) अंतर्गत तरतुदीनुसार भाडेकरु / रहिवाश्यांच्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेस बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ३४०
- भाडेकरु / रहिवाश्यांनी कलम ७९अ(१ब) तरतुदीनुसार पुनर्विकास प्रस्ताव सादर केलेले एकूण प्रकरण : ३८
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१ब) नोटीसची मुदत संपल्यानंतर, इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या : १५९
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : १३२
- ७९अ(१ब) अंतर्गत भाडेकरु / रहिवाश्यांना पुनर्विकासाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यापुर्वी सदर मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता, दुवपु मंडळ यांनी भुसंपादन करण्याकरिता सादर केलेल्या एकूण प्रस्तावाची संख्या : १५
- शासन गृहनिर्माण विभागास भुसपांदनासाठी सादर केलेले प्रस्ताव : १२

उपरोक्त प्रकरणांव्यतिरीक्त मंडळाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) करण्याकरिता मंडळाने एकूण ६४ वास्तुशास्त्रज्ञ / वास्तुविशारद यांची नेमणूक केली असून, त्यांना एकूण ५४० उपकरप्राप्त इमारतींची संरचनात्मक परीक्षण करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

ज्या प्रकरणांमध्ये संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) पुर्ण करण्यात आलेले आहे व मंडळास अहवाल प्राप्त झालेला आहे, अशा प्रकरणांमध्ये ज्या उपकरप्राप्त इमारती "सी-१" वर्गवारी मध्ये आढळून आल्या आहेत, अशा इमारतींच्या मालकांना सुधारित कलम ७९अ(१अ) अंतर्गत प्रथम ०३ महिन्याची नोटीस बजाविण्याचे निर्देश दिले आहे.

इमारतींच्या मालकांना नविन कलम ७९अ मधील तरतुदीनुसार नोटीस बजावून, पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्यास कळविले आहे. परंतु सद्यस्थितीत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३४७७१/२०२४ मधील दि. २८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नविन कलम ७९अ नुसार पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे इमारत धोकादायक घोषित करण्यासाठी सक्षम प्राधिकरण नाही. याकारणास्तव मंडळातर्फे अतिधोकादायक इमारतींबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही.

म्हाडातर्फे उपरोक्त आदेशाविरुध्द स्थगिती मिळविण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल करण्यात आली आहे. परंतू सदर एसएलपी अद्यापपर्यंत चर्चेसाठी घेण्यात आली नसल्यामुळे, मंडळातर्फे नविन कलम ७९अ नुसार पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य होत नाही.

➢ **नविन कलम ९१-अ:**

विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केल्यानंतर व महानगरपालिकेने आयओडी/नकाशे मंजूर केल्यानंतर, ज्या विकासकांनी तीन वर्षाच्या आत काम सुरु केले नाहीत किंवा महानगरपालिकेने सी.सी.(बांधकाम आरंभ करण्याचे प्रमाणपत्र) दिल्यानंतर दोन वर्षापर्यंत काम सुरु केले नाही किंवा ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने अटी व शर्तींचा भंग केला असल्यास अथवा भाडेकरु / रहिवाश्यांचे भाडे देणे बंद केले असल्यास, मंडळाने शासनाच्या परवानगीने म्हाड अधिनियमातील कलम ९२ ते ९३ मधील तरतुदीनुसार मालमत्ता भुसंपादित करुन, उर्वरित पुनर्विकासाचे काम पुर्ण करणे.

ज्या जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासासाठी मंडळाने मालक / विकासकास ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे व मालक / विकासकांनी पुनर्विकास प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहे व भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागेपोटी भाडे देणे सुध्दा बंद केले आहे. अशा एकूण ९१ प्रकरणांमध्ये म्हाड कायद्यातील समाविष्ट नविन कलम ९१अ मधील तरतुदीनुसार मालक / विकासकांना नोटीस बजावून रखडलेल्या प्रकल्पाचे काम १५ दिवसांच्या आत सुरु करावे तसेच भाडेकरु / रहिवाश्यांचे थकीत भाडे १५ दिवसांच्या आत अदा करण्यासाठी कळविण्यात आले होते.

मंडळाने ज्या ९१ प्रकरणांमध्ये मालक / विकासकांना नविन कलम ९१अ अंतर्गत नोटीस बजाविल्या होत्या, त्यामध्ये कोणती कारवाई झाली याबाबतचा गोषवारा खालीलप्रमाणे सादर.

अ.क्र.	तपशील	प्रकरणांचा संख्या
१.	१. ना -हरकत प्रमाणपत्र रद्द केलेली प्रकरणे	
	अ) शासनाने भुसंपानास मान्यता दिलेली प्रकल्पे	१०
	ब) शासनाकडे भुसंपादनाची मंजूरी प्राप्त होणेसाठी पाठविलेली प्रकल्पे	०७
	क) भुसंपादनासाठी शासनाकडे पाठविण्यासाठी प्रस्तावित प्रकरणे	०७
	ड) जुन्या इमारती जागेवर उभ्या (७९-ए नोटिस / दुरुस्ती काम प्रगतीपथावर)	०५
		एकूण २९
२.	९१अ नोटीस रद्द / ६ महिने स्थगिती / काम सुरु झालेली प्रकरणे	५१
३.	सुनावणीसाठी प्रस्तावित	०८
४.	न्यायलयीन प्रकरणे	०३
	एकूण	९१

ज्या प्रकरणांमध्ये शासन गृहनिर्माण विभागाने भुसंपादन करण्यासाठी मान्यता दिली आहे, अशा १० प्रकरणांमध्ये विशेष भुसंपादन अधिकारी, म्हाडा यांच्यातर्फे भुसंपादनाची कार्यवाही सुरु असून, ०५ प्रकरणांमध्ये भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून, मालकास दयावयाचा मोबदला निश्चित करुन भुखंडाचा ताबा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

शासन गृहनिर्माण विभागाने म्हाड अधिनियमात सुधारणा करुन कलम ९१अ अंतर्भुत केला आहे. या नविन कलमान्वये अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प भुसंपादित करुन म्हाडातर्फे पुर्ण करण्याची तरतुद केली आहे. त्यानुसार म्हाडातर्फे ज्या मालक / विकासकांनी प्रकल्प अर्धवट अवस्थेत सोडले आहेत. त्यांना वर नमुद केल्याप्रमाणे नविन कलम ९१अ अंतर्गत नोटीस बजावून, भूसंपादनाची कार्यवाही सुरु केली आहे. अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प भुसंपादित केल्यानंतर, म्हाडातर्फे पुर्ण करण्यात येतील. शासन गृहनिर्माण विभागाने दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे कलम ९१अ अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार दोषी मालक / विकासकांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांची फसवणुक केल्याबद्दल संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रकरणनिहाय गुणवत्ता तपासुन रितसर गुन्हा नोंदविण्याची तरतुद आहे.तसेच दोषी मालक / विकासकांना काळया यादीत टाकून त्यांना मंडळातर्फे अन्य कोणत्याही पुनर्विकास योजनेकरीता परवानगी न देण्याची तरतुद आहे. मंडळातर्फे प्रकरणनिहाय गुणवत्ता तपासुन दोषी मालक / विकासकांविरुध्द कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबई शहर तसेच उपनगरामधील भाडेतत्वावरील इमारतींच्या / चाळींच्या पुनर्विकासासाठी शासन नगर विकास विभागाने उपाययोजना केली असून, मालक व भाडेकरु / रहिवाश्यांच्या सहकार्याने पुनर्विकास योजना राबविण्याचे काम सुरु आहे. शासन नगर विकास विभागाने विकास नियंत्रण नियमावली ३३(७), ३३(९) व ३३(२४) मध्ये वेळोवेळी सुधारणा करुन वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

वर नमुद वस्तुस्थिती पाहता, मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे अपघात टाळण्यासाठी व त्यांचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी उपाययोजना केल्या आहेत व करीत आहेत.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY
म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१५६९७.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पा.अधि/विधानसभा अता.प्र.१५६९७/ /दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ. 3945
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.
दिनांक: 10 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१५६९७.
मुंबईतील प्रलंबित उमरखाडी पुनर्विकास प्रकल्पास मान्यता देणेबाबत.
- श्री. सुनिल प्रभु (दिंडोशी), मा.विधानसभा सदस्य.

संदर्भ: कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र.विसअताप्र-२०२६/ प्र.क्र.४३/ दुवपु-१, दि.२४.०४.२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानसभा अतारांकित** प्रश्न क्र.१५६९७ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वास,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता - ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१५६९७.
मुंबईतील प्रलंबित उमरखाडी पुनर्विकास प्रकल्पास मान्यता देणेबाबत.
- श्री. सुनिल प्रभु (दिंडोशी), मा.विधानसभा सदस्य.

अ. क्र.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबईतील मॅण्डहर्स्ट रोड, डोंगरी येथील ८१ उपकर प्राप्त जुन्या इमारतींचा २५०० रहिवाशी कुटुंबे राहत असलेल्या उमरखाडी पुनर्विकासाच्या प्रकल्पासंबधी दि.०७ जुलै, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.	होय हे अंशत: खरे आहे. पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मा.श्री.विजय देशमुख (सोलापुर शहर उत्तर) विधानसभा सदस्य यांनी उमरखाडी येथील ८१ इमारतीच्या समूह पुनर्विकास प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रश्नावर दि.०७.०७.२०२५ रोजी सभागृहात चर्चा करण्यात आली होती. चर्चेदरम्यान मा.मंत्री महोदय श्री.शंभुराजे देसाई यांनी ८१ इमारतींच्या समूह पुनर्विकासाची तांत्रिक व आर्थिक दृष्टया व्यवहार्यता तपासून, म्हाडामार्फत अहवाल प्राप्त झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी, समिती व म्हाडा अधिकारी यांच्या समवेत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे सांगितले.
२.	असल्यास, प्रकल्पाच्या व्यवहार्यता तपासण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेऊन 81 पुनर्विकास प्रकल्पांचे काम जलदगतीने पुर्ण करण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय.	मा.मंत्री महोदय श्री.शंभुराजे देसाई यांनी दिलेल्या आश्वासनानुसार ८१ इमारतींपैकी मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार, प्रथम टप्प्यात वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांनी दि.२३.०२.२०२६ व दि.२६.०५.२०२६ रोजी ३६ इमारतींचा समूह पुनर्विकासाचा व्यवहार्यता अहवाल सादर केला असून, त्यांची छाननी करण्याचे काम मंडळामार्फत सुरु आहे.
३.	असल्यास, राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था व इमारतींच्या स्वयंपुनर्विकासास प्रोत्साहन व सहाय्य करण्यासाठी अभ्यासगट समितीने माहे जुलै, 2025 मध्ये राज्य शासनास सादर केलेल्या अहवालानुसार शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने स्वयंपुनर्विकासासाठी स्वयंम समूह पुनर्विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा दि. 30 ऑक्टोबर, 2025 रोजी वा त्यासुमारास आदेश जारी करुन निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय.	हे खरे आहे.
४.	असल्यास, दरेकर समितीच्या अभ्यासगटाने राज्य शासनास सादर केलेल्या अहवालातील मुद्यांचे संक्षिप्त स्वरुप काय आहे व त्यानुसान किती शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे काय.	सदर विषय मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखतयारित येत नाही.
५.	असल्यास मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या व पुनर्विकासाच्या प्रतिक्षेत असलेल्या १३ हजार ५०० उपकर प्राप्त इमारतींचा स्वयंपुनर्विकास योजनेमध्ये समावेश करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे काय,	हे खरे नाही.
६.	असल्यास, उक्त प्रकल्पासंबंधी शासनास अहवाल सादर करुन प्रकल्पाचे काम तातडीने मार्गी लावण्याच्या दृष्टीने शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.१५६९७.
मुंबईतील प्रलंबित उमरखाडी पुनर्विकास प्रकल्पास मान्यता देणेबाबत.
- श्री. सुनिल प्रभु (दिंडोशी), मा.विधानसभा सदस्य.

पुरक टिप्पणी:

- उमरखाडी येथील पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत म्हाडातर्फे बांधण्यात आलेल्या ०९ इमारतींच्या सोबत ०५ पुनर्रचित इमारती, १९ म्हाडाने भूसंपादित केलेल्या मालमत्ता, ०४ जमिनदोस्त करण्यात आलेल्या इमारती, ३० खाजगी उपकरप्राप्त इमारती, ०५ खाजगी बिगर उपकरप्राप्त इमारती, ०५ आरक्षित भुखंडावरील इमारती व मंडळातर्फे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या ०५ इमारती अश्या एकूण ८१ इमारतींचा प्रस्ताव दि.०३.१२.२०२४ रोजी उमरखाडी पुनर्वसन समितीने सादर केला आहे.

- उमरखाडी येथील एकूण ८१ इमारतींचा समुह पुनर्विकास प्रस्तावाची कार्यकारी अभियंता/बी-२ विभाग व उपमुख्य अभियंता(परिमंडळ-३), दुबपु मंडळ यांनी छाननी करुन दि.२०.१.२०२५ रोजीच्या अहवालानुसार नमुद करण्यात आलेल्या खालील मुद्दयांबाबत स्पष्टता नसल्याने तसेच ते धोरणात्मक असल्याने त्यावर विचार विनिमय करुन प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.
  - पुनर्वसन गाळयांची विभागणी,
  - जमिन मालकांस द्यावयाचा मोबदला
  - भाडेकरु / रहिवाशी यांनी १८० चौ.फुटावरील विकत घेतलेले क्षेत्रफळाबाबत पुनर्वसन निकष
  - २२५ चौ.फुटावरील अनिवासी गाळयांचे पुनर्वसन
  - खाजगी मालमत्तांचे म्हाड अधिनियम मधील कलम ४१ अन्वये भूसंपादन
  - विकास नियंत्रण नियमावली ३३(९)(२०) अंतर्गत मालक म्हणून प्रकल्प बाधितग्रस्तासाठी अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध करुन घेऊन, त्यामधुन या योजनेअंतर्गत पात्र भाडेकरु / रहिवाश्यांना अधिकचे क्षेत्रफळ प्रस्तावित करण्यात आले आहे,
  - विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अंतर्गत तरतुदीनुसार किमान ७०% जमिनीची मालकी म्हाडाकडे नाही, त्यामुळे सदर योजना कार्यान्वित करणे शक्य नाही.

- दरम्यान दि.०८.०५.२०२५ रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांच्या दालनात मा.आमदार श्री.अमिन पटेल् यांच्या समवेत म्हाडाने मुळत: प्रस्तावित केलेल्या उमरखाडी येथील २० इमारतींचा समुह पुनर्विकास प्रकलपांबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान वास्तुशास्त्रज्ञ श्री.रेडेकर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदरचा प्रकल्प व्यवहार्य नसल्याने, प्रस्तावाची व्यवहार्यता फेरतपासणी करणे आवश्यक असल्याने सदर प्रकल्पाची फेर तपासणी करणेकामी वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

- तसेच पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मा.श्री.विजय देशमुख (सोलापुर शहर उत्तर) विधानसभा सदस्य यांनी उमरखाडी येथील ८१ इमारतींच्या समुह पुनर्विकास प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रश्नावर दि.०७.०७.२०२५ रोजी सभागृहात चर्चा करण्यात आली होती. चर्चेदरम्यान मा.मंत्री महोदय श्री.शंभुराजे देसाई यांनी ८१ इमारतीच्या समुह पुनर्विकासाची तांत्रिक व आर्थिक दृष्टया व्यवहार्यता तपासुन, म्हाडामार्फत अहवाल प्राप्त झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधी, समिती व म्हाडा अधिकारी यांच्या समवेत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे सांगितले.

- उमरखाडी येथील ८१ इमारतींचा प्रकल्पाबाबत दि.२५.११.२०२५ रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या दालनात बैठक झाली.

- तद्नंतर वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स सुरेश बाबु यांनी दि.०६.१०.२०२५ रोजी उमरखाडी येथील २० इमारतींचा समुह पुनर्विकास प्रकलपांबाबत व्यवहार्यता अहवाल सादर केला आहे.

- सदर अहवालाबाबत दि.०८.१२.२०२५ रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अधिकारी, दुबपु मंडळ, उपमुख्य अभियंता(परिमंडळ-३), दुबपु मंडळ, निवासी कार्यकारी अभियंता, दुबपु मंडळ, कार्यकारी अभियंता/बी-२ विभाग, दुबपु मंडळ, संबंधित वास्तुशास्त्रज्ञ यांच्यासमवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांनी सादर केलेल्या उमरखाडी येथील २० इमारतींच्या प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा झाली.

- सविस्तर चर्चेअंती मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी सदर अहवालात काही बदल सुचविले व त्यानुसार वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांना सुधारित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

- त्यानुसार वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांनी सादर केलेल्या सुधारित अहवालावर दि.१७.०२.२०२६ रोजी मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या दालनात बैठक संपन्न झाली.

- सदर बैठकीत वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांनी सादर केलेल्या उमरखाडी येथील २० इमारतींच्या प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा झाली.

- सविस्तर चर्चेअंती मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी सदर अहवालात काही बदल सुचविले व त्यानुसार वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांना सुधारित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

- त्यानअुषंगाने दि.२३.०२.२०२६ व दि.२६.०५.२०२६ रोजी वास्तुशास्त्रज्ञ श्री.सुरेश बाबु यांनी ३६ इमारतींचा समुह पुनर्विकासाचा व्यवहार्यता अहवाल सादर केला असून. त्यांची छाननी करण्याचे काम मंडळामार्फत सुरु आहे.सुधारित प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND
RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)



म्हाडा
MHADA



विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२३४३८.

जा.क्र.उपमूकाअ/मु.अ./निकाअ/अर्थ.अधि/ विधानसभा अता.प्र.२३४३८/५२३२/दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक:
22 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२३४३८.
मुंबई शहरातील इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एजन्सींबाबत...
मा.श्री. मनोज जामसुतकर (भायखळा), विधानपरिषद सदस्य

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.४६/२०२६/ दुवपु-१, दि.१२.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२३४३८** ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वास्,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२३४३८.

मुंबई शहरातील इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एजन्सींबाबत...

मा.श्री. मनोज जामसुतकर (भायखळा), विधानपरिषद सदस्य

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
१.	मुंबई शहरातील सुमारे १२ हजार ५०० उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून विभागनिहाय चार एजन्सींची नेमणूक करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय ?	होय, हे खरे आहे. मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारित ०४ उपमुख्य अभियंता व १५ कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. प्रत्येक उपमुख्य अभियंता यांच्या अखत्यारित असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची माहिती खालीलप्रमाणे आहे. उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) – ३७०९ उपकरप्राप्त इमारती उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२) – ३१५० उपकरप्राप्त इमारती उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) – ३१४३ उपकरप्राप्त इमारती उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) – २५५० उपकरप्राप्त इमारत एकूण – १२५५२ उपकरप्राप्त इमारती उपरोक्त बाबतीत असे सादर करण्यात येते की, मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ कलम ३५३(ब) मधील तरतुदीनुसार ज्या इमारतींना ३० वर्षे पूर्ण झाली आहे, अशा इमारतींच्या मालकांना त्यांचे इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट बंधनकारक आहे. तसेच सदर मालकांना नोटीस बजाविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे. परंतु अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट हे मालक करुन घेत नाही. ही वस्तुस्थिती आहे. याकारणास्तव म्हाडाने / मंडळाने सद्य:स्थितीत मुंबई शहरात अस्तित्वात असलेल्या सर्व अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार परिमंडळनिहाय निविदा मागवून एजन्सी नेमण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे.
२.	असल्यास, उक्त इमारतींच्या संरचनात्मक लेखापरिक्षणासाठी किती कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे व यासंदर्भातील निविदा काढण्यात आल्या आहेत काय ?	मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाअंतर्गत ०४ उपमुख्य अभियंता यांनी त्यांच्या विभागातील उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता माहे मार्च महिन्यात निविदा मागविल्या असून, एजन्सी नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. एकूण अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता अपेक्षित खर्च हा अंदाजे रुपये ५० ते ६० कोटी इतका आहे.
३.	असल्यास, उपकरप्राप्त इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी कोण-कोणत्या एजन्सींची नेमणूक करण्यात आली असून काम किती दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे ?	सद्य:स्थितीत एजन्सी नेमण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, सर्व उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट हे साधारणत: एक वर्षाच्या आत पूर्ण करावयाचे आहे.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२३४३८.

मुंबई शहरातील इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एजन्सींबाबत...

मा.श्री. मनोज जामसुतकर (भायखळा), विधानपरिषद सदस्य

पुरक टिप्पणी:

मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात आहेत. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारित ०४ उपमुख्य अभियंता व १५ कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. प्रत्येक उपमुख्य अभियंता यांच्या अखत्यारित असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची माहिती खालीलप्रमाणे आहे.

उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१)	३७०९ उपकरप्राप्त इमारती
उपमुख्य अभियंता (परिमंडळ-२)	३१५० उपकरप्राप्त इमारती
उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३)	३१४३ उपकरप्राप्त इमारती
उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४)	२५५० उपकरप्राप्त इमारत
एकूण	१२५५२ उपकरप्राप्त इमारती

उपरोक्त बाबतीत असे सादर करण्यात येते की, मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ कलम ३५३(ब) मधील तरतुदीनुसार ज्या इमारतींना ३० वर्षे पूर्ण झाली आहे, अशा इमारतींच्या मालकांना त्यांचे इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट बंधनकारक आहे. तसेच सदर मालकांना नोटीस बजाविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहे. परंतु अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट हे मालक करुन घेत नाही, हि वस्तुस्थिती आहे. याकारणास्तव म्हाडाने / मंडळाने सद्य:स्थितीत मुंबई शहरात अस्तित्वात असलेल्या सर्व अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचा निर्णय घेतलेला आहे, त्यानुसार परिमंडळनिहाय निविदा मागवून एजन्सी नेमण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाअंतर्गत ०४ उपमुख्य अभियंता यांनी त्यांच्या विभागातील उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता माहे मार्च महिन्यात निविदा मागविल्या असून, एजन्सी नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. एकूण अंदाजे १२५५२ उपकरप्राप्त इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडीट करण्याकरिता अपेक्षित खर्च हा अंदाजे रुपये ५० ते ६० कोटी इतका आहे.

सद्य:स्थितीत एजन्सी नेमण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, सर्व उपकरप्राप्त इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट हे साधारणत: एक वर्षाच्या आत पुर्ण करावयाचे आहे.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद भंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६२.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पाव.अधि/ विधानसभा अता.प्र.२४२६२/४२३७/दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 22 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा इतारांकित प्रश्न क्र.२४२६२.
"प्रभादेवी, नागू सयाजी वाडी, येथील सूर्योदय सोसायटीचे सन २०१६ मध्ये बांधकाम पुर्ण होऊनही विकासकाकडून हस्तांतरण करण्यात आले नसल्याबाबत"
मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.४७/दुवपु-१, दि.१२.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६२ ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६२.</u>

"प्रभादेवी, नागू सयाजी वाडी, येथील सूर्योदय सोसायटीचे सन २०१६ मध्ये बांधकाम पुर्ण होऊनही विकासकाकडून हस्तांतरण करण्यात आले नसल्याबाबत"

मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	प्रभादेवी मुंबई येथील नागू सयाजी वाडी, सूर्योदय सोसायटी ही उपकरप्राप्त इमारत असून सदर इमारतीचे बांधकाम मे. सुमेर बिल्डर्स यांच्यामार्फत सन २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आलेले असतानाही आजतागायत सोसायटीचे अधिकृत हस्तांतरण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय ?	होय, हे खरे आहे. सद्य:स्थितीत विकासकाने पुनर्वसन इमारतीचे काम पुर्ण करुन, सर्व भाडेकरु /रहिवाश्यांचे पुनर्वसन केले आहे. परंतू अद्यापपर्यंत सदर मालमत्तेवरील पुनर्विकास योजना ही पुर्ण झालेली नसून, अर्धवट अवस्थेत आहे. मंडळाने दि.२२.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारतीकरिता भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे व त्यामधील अट क्र.१ नुसार विकासकाने महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर, ०३ महिन्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन, पंजिकृत करणे बंधनकारक आहे.
२.	असल्यास, या सोसायटीमध्ये एकूण १८६ सभासद असून गत ९ वर्षांपासून विकासक व सभासद यांच्यामध्ये कोणताही प्रभावी संवाद झाला नसल्याने सभासदांच्या विविध तक्रारी प्रलंबित राहिल्या असून विकासकाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय ?	या कार्यालयाची मुळ नस्ती तपासली असता, सुर्योदय सोसायटीच्या मुळ सभासदांची तक्रार आढळून येत नाही.
३.	असल्यास, सूर्योदय सोसायटीच्या मूळ सभासदांकडून विकासक मे.सुमेर बिल्डर्स (श्री. राहुल शाह) यांच्या विरोधात तक्रारी करुन सुध्दा प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय ?	या कार्यालयाची मुळ नस्ती तपासली असता, सुर्योदय सोसायटीच्या मुळ सभासदांची तक्रार आढळून येत नाही.
४.	असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोसायटीचे अधिकृत हस्तांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?	उपरोक्त बाबतीत शहानिशा करुन विकासक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येईल.
५.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६२.</u>

"प्रभादेवी, नागू सयाजी वाडी, येथील सूर्योदय सोसायटीचे सन २०१६ मध्ये बांधकाम पुर्ण होऊनही विकासकाकडून हस्तांतरण करण्यात आले नसल्याबाबत"

मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

पुरक टिप्पणी:

- अंतिम भुखंड क्र.१०५३ आणि १०५६ टीपीएस IV माहिम विभाग ही मालमत्ता मेसर्स सुमेर बिल्डर्स यांच्या मालकीची आहे.
- सदर मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ १४४८३.४० चौरस मीटर आहे.
- सदर मालमत्तेवर एकूण १७ इमारती अस्तित्वात होत्या. त्यापैकी ०६ इमारती या उपकरप्राप्त "अ" वर्गातील, ०२ इमारती या "ब" वर्ग व ०३ इमारती "क" वर्गवारीच्या असून उर्वरित ०६ इमारती या बिगर-उपकरप्राप्त आहेत.
- सदर मालमत्तेचे मालक मेसर्स सुमेर बिल्डर्स असून, सदर ११ उपकरप्राप्त इमारतीमध्ये १५२ निवासी + २३ अनिवासी असे एकूण १७५ भाडेकरु / रहिवाशी आहेत. त्यापैकी मुळ १४ भाडेकरु / रहिवाश्यांनी त्याचे भाडेदारी हक्क मालक / विकासकास हस्तांतरीत केले आहे.
- मेसर्स सुमेर बिल्डर्स यांनी १७५ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी १२६ भाडेकरु / रहिवाश्यांचे (७२%) अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर करुन, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता.
- त्याअनुषंगाने मंडळाने दि.१९.०८.२००४ रोजीच्या पत्रान्वये विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक २.५० प्रमाणे मेसर्स सुमेर बिल्डर्स यांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे.
- विकासकाने सदर मालमत्तेवर 4 नविन इमारती बांधण्याचे प्रस्तावित केले होते. यापैकी इमारत क्र. 1,2 व 3 या विक्री करीता व इमारत क्र. 4 (अे, बी, सी, डी विंग) ही पुनर्वसनाकरीता बांधण्याचे प्रस्तावित होते. नविन पुनर्वसन इमारत क्र. 4 मधील अे, बी व डी विंग चे काम विकासकाने पुर्ण केले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या दि. 28.06.2010 च्या पत्रान्वये इमारत क्र. 4 अे विंग (भाग) तळ + 9 मजले (32 भाडेकरु/रहिवाशी) व बी विंग स्टिल्ट + 8 मजले (64 भाडेकरू रहिवाशी) करीता, मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेता, भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे.
- विकासक मेसर्स सुमेर बिल्डर्स यांनी दि.०५.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारतींमधील सदनिकेकरिता महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता विनंती केली होती. त्याअनुषंगाने मंडळाने दि.२२.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारत क्र.४ अ, बी व डी या इमारतीमध्ये एकूण १६१ भाडेकरु / रहिवाश्यांच्या पुनर्वसनाकरिता व विक्रियुक्त इमारत क्र.१ व २ याकरिता महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले. तद्नंतर महानगरपालिकेने दि.०७.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारत क्र.४ भागश: भोगवटा प्रमाणपत्र निवासी + अनिवासी विंग अ मध्ये तळ मजल्यावरील अनिवासी गाळे वगळता १० व्या मजल्यापर्यंत तसेच विंग डी तळ +७ मजल्यापर्यंत देण्यात आली आहे. तसेच विक्रीयुक्त इमारत क्र.१ व २ याकरिता महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र दिले असल्याचे या कार्यालयाच्या अभिलेखानुसार दिसुन येत नाही, तरी याबाबतची माहिती महानगरपालिकेकडून उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्तावित आहे.
- विकासकातर्फे सर्व १६१ भाडेकरु / रहिवाश्यांचे नविन पुनर्विकसीत इमारतीत पुनर्वसन करण्यात आले आहे.
- तद्नंतर विकासकाच्या विनंतीनुसार, विकासकास विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली २०३४ नुसार मंडळाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक ३.०० प्रमाणे दि.३१.०७.२०१९ अन्वये प्रदान करण्यात आले आहे.
- विकासकास दि.३१.०७.२०१९ रोजी प्रदान करण्यात आलेले सुधारित ना-हरकत प्रमाणपत्रानुसार, मंडळास २१७१.९२ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द करावयाचे आहे. त्याकरिता विकासकाने दि.१८.०७.२०१९ रोजी मंडळासोबत पंजिकृत करारनामा केला आहे.
- तद्नंतर विकासकाने विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील सुधारित तरतुदी दि.०८.०७.२०२१ रोजीच्या अधिसुचनेनुसार सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची दि.१४.१२.२०२१ रोजी विनंती केली. त्याअनुषंगाने मंडळातर्फे विकासकास दि.२२.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

- विकासकास दि.२२.१२.२०२१ रोजी प्रदान करण्यात आलेल्या सुधारित ना-हरकत प्रमाणपत्रानुसार २६५४.९२चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास सुपूर्द करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने विकासकाने मंडळासोबत दि.१२.०४.२०२२ रोजी सुधारित करारनामा पंजिकृत केला आहे.

- तद्नंतर विकासकाने दि.२१.०६.२०२२ रोजी २६५४.९२ चौ.मी. म्हाडास सुपूर्द करण्याकरिता Rectification Supplementary Agreement नोंदणीकृत करुन या कार्यालयास सादर केले आहे. सदर पंजिकृत करारनाम्यानुसार, विकासकाने इमारत क्र.४, विंग सी मधील ३९ सदनिका (२६५४.९३चौ.मी.)म्हाडास हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित केले आहे. याव्यतिरीक्त इमारत क्र.३ मधील ०८ सदनिका (१४०८.३८चौ.मी.) पंजिकृत करारनाम्यामध्ये मंडळाकडे तारण म्हणून ठेवण्यात आलेले आहे.

- सद्य:स्थितीत इमारत क्र.४, विंग सी च्या पायाचे बांधकाम (foundation work) काम अर्धवट झालेले असून सद्यस्थितीत काम बंद आहे. तसेच विक्रीयुक्त इमारत क्र.३ या इमारतीचे काम सुध्दा अर्धवट अवस्थेत आहे. या कारणास्तव मंडळाने विकासकास म्हाड अधिनियमातील नविन कलम ९१(अ) अंतर्गत दि.२४.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजाविली आहे.

- सदर नोटीस बजाविल्यानंतर, विकासकाने त्यांच्या दि.०१.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला होता. त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले होते की, त्यांनी सर्व भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन केलेले आहे व म्हाडास देय असलेल्या अतिक्त बांधकाम क्षेत्रफळ इमारत क्र.४ विंग सी मध्ये देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच विक्रीयुक्त इमारत क्र.३ चे बांधकाम पुर्ण करण्यात येईल असे नमुद केले आहे. याकारणास्तव विकासकाने मंडळास अशी विनंती केली आहे की,ना-हरकत प्रमाणपत्रास मुदतवाढ देण्यात यावी व मंडळाने बजाविलेली नोटीस मागे घेण्यात यावी.

- विकासकाने केलेल्या विनंतीनुसार, दि.१३.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली, सदर सुनावणीस विकासकातर्फे श्री.अश्विनी परमार हे उपस्थित होते. सदर सुनावणी दरम्यान विकासकाने असे सांगितले की, सर्व भाडेकरु /रहिवाश्यांची पुनर्वसन केले असून, महानगरपालिकेने पुनर्वसन इमारतीकरिता भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे. तसेच म्हाडास देय असलेल्या अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळाकरिता मंडळासोबत पंजिकृत करारनामा केला असून, इमारत क्र.४ विंग सी मध्ये अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द करण्याचे प्रस्तावित आहे.

- अद्यापपर्यंत मंडळातर्फे नविन कलम ९१अ अंतर्गत बजाविण्यात आलेली नोटीस मागे घेण्यात आलेली नाही.

- मा.आमदार श्री.महेश सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयामध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, उपरोक्त मालमत्तेवरील पुनर्वसन इमारतीचे बांधकाम सन २०१६ मध्ये पुर्ण झाले आहे परंतू आजतगायत सुर्योदय सोसायटीच्या मुळ सभासदांकडून विकासक मेसर्स सुमेर बिल्डर्स (श्री.राहुल शहा) यांच्याविरोधात तक्रारी करुन सुध्दा सोसायटीचे अधिकृत हस्तांतरण करण्यात आलेले नाही.

- उपरोक्त मुद्दयांबाबत असे सादर करण्यात येते की, या कार्यालयाची मुळ नस्ती तपासली असता, सुर्योदय सोसायटीच्या मुळ सभासदांची तक्रार आढळून येत नाही. सद्य:स्थितीत विकासकाने पुनर्वसन इमारतीचे काम पुर्ण करुन, सर्व भाडेकरु /रहिवाश्यांचे पुनर्वसन केले आहे. परंतू अद्यापपर्यंत सदर पुनर्विकास योजना ही पुर्ण झालेली नसून, अर्धवट अवस्थेत आहे. मंडळाने दि.२२.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारतीकरिता भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे व त्यामधील अट क्र.१ नुसार विकासकाने महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतर, ०३ महिन्यामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन, पंजिकृत करणे बंधनकारक आहे. तरी सुध्दा याबाबत शहानिशा करुन प्रश्न मार्गी लावण्याकरिता, विकासक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त बैठक दि.२५.०६.२०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६८.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/अर्थ.अधि/ विधानसभा अता.प्र.२४२६८/423/दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ.
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 22 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६८.
"शिव सिद्धि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात क्रीपटन डेव्हलपर्सकडुन झालेल्या कथित फसवणुकीबाबत मुंबईतील माहिम मतदारसंघातील अनेक जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या सर्व इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण करण्याबाबत"
मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.४५/दुवपु-१, दि.११.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६८** ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १. २. ३ / प्राधिकरण.

प्रत. पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६८.</u>

"शिव सिद्धि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात क्रीपटन डेव्हलपर्सकडुन झालेल्या कथित फसवणुकीबाबत मुंबईतील माहिम मतदारसंघातील अनेक जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या सर्व इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण करण्याबाबत"

मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

अ. क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	सायनी रोड, प्रभादेवी मुंबई येथील सी. एस. नं. १५७६, अंतिम भूखंड क्र. १०२९ वरील जुन्या इमारतीचा पुनर्विकास क्रीपटन डेव्हलपर्स यांनी सन २०११ मध्ये कलम ३३(७) अंतर्गत केला असून मूळ रहिवाश्यांना कायमस्वरुपी सदनिका देताना स्टॅम्प ड्यूटी व नोंदणी केलेल्या करारनाम्यांच्या मूळ प्रती रहिवाश्यांना न देता विकासकाने स्वत:कडे ठेवल्या आहेत, हे खरे आहे काय ?	होय, हे अंशत खरे आहे. मंडळाने दि.१६.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये भूखंडाचे मालक मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपर्स यांना विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक २.५० नुसार ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे. महानगरपालिकेने दि.१३.०७.२००७ रोजी आयओडी / नकाशांना मंजूरी दिलेली आहे व तदनंतर दि.१६.०६.२०१० रोजी सुधारित नकाशे मंजूर केले आहे. सदर भूखंडावर एकूण ०४ उपकरप्राप्त इमारती होत्या व विकासकाने सदर इमारती या सन २००७ मध्ये पाडल्या होत्या. तदनंतर महानगरपालिकेने दि.१०.०९.२००७ रोजी प्रत्यक्ष नविन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यास परवानगी दिली होती. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशांनुसार विकासकाने पुनर्वसन इमारत "अ" व "बी" विंग चे बांधकाम सन २००९-१० साली पुर्ण केले आहे व सर्व १५९ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन नविन पुनर्विकसित इमारतीमध्ये देण्यात आले (१३९ नि + २० अनि). तसेच महानगरपालिकेने दि.१८.०४.२००९ व दि.१२.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारत "ए" व "बी" विंग साठी भागश: भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे. तसेच महानगरपालिकेकडने दि. २०.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये विंग "बी" व विंग "सी" करिता भागश: भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तदनंतर विकासकाने त्यांच्या दि.२५.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर इमारतीसाठी भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करण्यासाठी मंडळातर्फे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विनंती केली होती. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण विभाग, दुवपु मंडळ यांनी दि.०३.०९.२०२१ रोजी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन भाडेकरु / रहिवाश्यांच्या तावा पावत्या तपासुन त्यांचे पुनर्वसन झाले असल्याबाबतची खात्री केली व दि.२०.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला होता. सदर अहवालानुसार, बहुतांश भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन विकासकाने सन २००९ मध्ये केले असल्याचे कळविले आहे. तसेच सदर अहवालानुसार १६ भाडेकरु / रहिवाश्यांचे कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा करावयाचा असून, उर्वरित भाडेकरु / रहिवाश्यांनी कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा करण्यासाठी सहमती दर्शविली होती. सदर प्रकरणामध्ये उर्वरित भाडेकरु / रहिवाश्यांनी करारनामे केले नसल्यामुळे, मंडळाने दि.०८.१०.२०२१ रोजी भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित केली होती. सदर बैठकी दरम्यान भाडेकरु / रहिवाशी यांचे प्रतिनिधी व विकासक उपस्थित होते व त्यांनी असे कबुल केले की, त्यांच्यामधील असलेले मतभेद सोडवून उर्वरित सर्व भाडेकरु / रहिवाश्यांचे कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा करण्यासाठी सहकार्य करतील. तदनंतर मंडळाने दि.०१.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विकासकास महानगरपालिकेकडून पुर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे व त्यामध्ये

अ. क्र.	प्रश्न	उत्तरे
		विकासकाने उर्वरित सर्व भाडेकरु / रहिवाश्यांचे करारनामे पंजिकृत करुन त्यांच्या प्रती मंडळास सादर करण्याची अट घालण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिकेने दि.२६.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे. सद्य:स्थितीत विकासकाने कळविल्यानुसार, एकूण १५९ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ९० भाडेकरु / रहिवाश्यांचे करारनामे पंजिकृत करण्यात आले असून, ७० भाडेकरु /रहिवाश्यांना त्यांच्या प्रती देण्यात आल्या आहेत व उर्वरित २० भाडेकरु / रहिवाशी हे त्यांच्या प्रती घेण्यासाठी पुढे आले नाही. तसेच उर्वरित ६९ भाडेकरु / रहिवाश्यांबाबत विकासकाने असे कळविले आहे की, भाडेकरु / रहिवाश्यांच्या वारसदारांमध्ये वाद असल्याने त्यांचे करारनामे होऊ शकले नाही. विकासकाने असेही कळविले आहे की, सदर भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांचे कागदपत्रे सादर केल्यास व मंडळाने त्याच्या नावास मान्यता दिल्यानंतर, त्यांच्यासोबत करारनामे करण्यात येतील. सदर बाबतीत असे सादर करण्यात येते की, भाडेकरु / रहिवाश्यांनी वारसदारांचे नाव प्रमाणित करण्याकरिता मंडळाकडे अर्ज अथवा पुरावे सादर केल्याचे आढळून येत नाही.
२.	असल्यास, प्रकल्पात आजतागायत भूखंडाचा Conveyance सोसायटीच्या नावे करण्यात आलेला नसून प्रॉपर्टी कार्डही सोसायटीच्या नावावर न झाल्यामुळे कायदेशीर मालकी हक्क प्रलंबित असून 'A' व 'B' विंगचे सोसायटीकडे हस्तांतरण अद्याप करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय ?	होय, हे खरे आहे. विकासक मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपर्स यांनी त्यांच्या दि.०९.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाश्यानुसार, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी भाडेकरु / रहिवाश्यांना आवश्यक कागदपत्रे स्वाक्षरीसाठी देण्यात आलेले आहेत, तसेच भाडेकरु / रहिवाश्यांनी कागदपत्रे स्वाक्षरीसह सादर केल्यानंतर, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येईल व तदनंतर भुखंडाचे अभिहस्तांतरण गृहनिर्माण संस्थेस करण्यात येईल.
३.	तसेच, जानेवारी २०२० मध्ये विकासकाने 'A' व 'B' विंगसाठी REHAB म्हणून मान्यता घेतलेली असताना रहिवाश्यांना मान्य केलेला कॉर्पस फंड व इतर सेवा-सुविधा देण्यात आलेल्या नाहीत ,हे ही खरे आहे काय ?	विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार विकासकाने पुनर्वसन इमारत पूर्ण झाल्यानंतर, किमान १० वर्ष पर्यंत देखभाल खर्च भागविण्यासाठी भाडेकरु / रहिवाश्यांना कॉर्पस फंड देणे बंधनकारक आहे. विकासक मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपर्स यांनी असे कळविले आहे की, भाडेकरु / रहिवाश्यांना सर्व सुविधा पुर्विण्यात आलेल्या आहेत, तसेच सन २००९ -२०१० ते २०२१ पर्यंत पुनर्वसन इमारतीचे देखभाल व व्यवस्थापन त्यांच्यातर्फे करण्यात आलेले आहे.
४.	असल्यास, सदर प्रकरणात विकासकाविरुद्ध कायदेशीर व दंडात्मक कारवाई करुन सोसायटीचे तात्काळ हस्तांतरण, कॉर्पस फंड व उर्वरीत सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे ?	विकासकाने दि.१०.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, विकासकाने सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकरिता आवश्यक दस्तांएवज भाडेकरु / रहिवाश्यांना दिले आहेत व भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांच्या वकीलामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकरण्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे दि.१७.०५.२०२६ रोजी अर्ज केला आहे.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६८.</u>

"शिव सिद्धि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात क्रीपटन डेव्हलपर्सकडुन झालेल्या कथित फसवणुकीबाबत मुंबईतील माहिम मतदारसंघातील अनेक जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या सर्व इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण करण्याबाबत"

मा. श्री. महेश सावंत (माहिम) विधानसभा सदस्य

पुरक टिप्पणी:

विषयांकित मालमत्तेबाबत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचा अभिप्राय खालीलप्रमाणे

- अंतिम भूखंड क्र.१०२९ टीपीएस - IV माहिम विभाग हा मालमत्ता मेसर्स क्रिप्टन कन्सट्रक्शन अॅण्ड डेव्हलपर्स यांच्या मालकीची आहे.
- सदर मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ १९९२.३८ चौरस मीटर आहे.
- सदर मालमत्तेवर एकूण ०४ इमारती अस्तित्वात होत्या. त्यापैकी ०२ इमारती या उपकरप्राप्त "अ" वर्गातील, ०२ इमारती या "ब" वर्गवारीच्या आहेत.
- सदर मालमत्तेचे मालक मेसर्स क्रिप्टन कन्सट्रक्शन अॅण्ड डेव्हलपर्स असून, सदर ०४ उपकरप्राप्त इमारतींमध्ये १३९ निवासी + २० अनिवासी असे एकूण १५९ भाडेकरु / रहिवाशी आहेत.
- मेसर्स क्रिप्टन कन्सट्रक्शन अॅण्ड डेव्हलपर्स यांनी १५९ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी १५६ भाडेकरु / रहिवाश्यांचे (९८%) अपरिवर्तनीय संमतीपत्रे सादर करुन, विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता.
- त्याअनुषंगाने अंतिम भूखंड क्र.१०२९ टीपीएस - IV माहिम विभाग, उपकर क्र.ग/दक्षिण-३४२२(१.२५३), (४), (४बी), (४बीबी), इमारत क्र.१-१ए, ४१ए-४१बी, ४३-४३बी, ४२-४३ए, ४५-४७सी, ४७डी-४९-४९डी-५३-५३बी-५५, ५१-५१बी, ५५ए, ४५ए, ४५बी, ४५एए, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी चटई क्षेत्र निर्देशांक २.५० नुसार मंडळाने मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अॅण्ड डेव्हलपर्स यांना दि.१६.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आले.
- विषयांकित मालमत्तेमध्ये एकूण १३९ निवासी + २० अनिवासी असे एकूण १५९ भाडेकरु / रहिवाश्यांना प्रमाणित करण्यात आले होते.
- सदर मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या कामांसाठी महानगरपालिकेने दि.१३.०७.२००७ रोजी आयओडी / नकाशांना मंजूरी दिलेली आहे व तदनंतर दि.१६.०६.२०१० रोजी सुधारित नकाशे मंजूर केले आहे.
- सदर भूखंडावर एकूण ०४ उपकरप्राप्त इमारती होत्या व विकासकाने सदर इमारती या सन २००७ मध्ये पाडल्या होत्या.
- तदनंतर महानगरपालिकेने दि.१०.०९.२००७ रोजी प्रत्यक्ष नविन इमारतीचे बांधकाम सुरु करण्यास परवानगी दिली होती. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या नकाशांनुसार विकासकाने पुनर्वसन इमारत "अ" व "बी" विंग चे बांधकाम सन २००९-१० साली पुर्ण केले आहे व सर्व १५९ भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन नविन पुनर्विकसित इमारतीमध्ये देण्यात आले (१३९ नि + २० अनि).
- तसेच महानगरपालिकेने दि.१८.०४.२००९ व दि.१२.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये पुनर्वसन इमारत "ए" व "बी" विंग साठी भागशः भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे. तसेच महानगरपालिकेकडने दि. २०.०१.२०२० रोजीच्या पत्रान्वये विंग "बी" व विंग "सी" करिता भागशः भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.
- तदनंतर विकासकाने त्यांच्या दि.२५.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व इमारतीसाठी भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडुन प्राप्त करण्यासाठी मंडळातर्फे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत विनंती केली होती.
- सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता/ग-दक्षिण विभाग, दुरुस्ती मंडळ यांनी दि.०३.०९.२०२१ रोजी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन भाडेकरु / रहिवाश्यांच्या नावा पावत्या तपासुन त्यांचे पुनर्वसन झाले असल्याबाबतची खात्री केली व दि.२०.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुविस्तर अहवाल सादर केला होता.

- सदर अहवालानुसार, बहुतांश भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन विकासकाने सन २००९ मध्ये केले असल्याचे कळविले आहे. तसेच सदर अहवालानुसार १६ भाडेकरु / रहिवाश्यांचे कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा केलेला असून, उर्वरित भाडेकरु / रहिवाश्यांनी कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा करण्यासाठी सहमती दर्शविली होती.

- सदर प्रकरणामध्ये उर्वरित भाडेकरु / रहिवाश्यांनी करारनामे केले नसल्यामुळे, मंडळाने दि.०८.१०.२०२१ रोजी भाडेकरु / रहिवाशी व विकासक यांच्यासोबत संयुक्त बैठक आयोजित केली होती. सदर बैठकी दरम्यान भाडेकरु / रहिवाशी यांचे प्रतिनिधी व विकासक उपस्थित होते व त्यांनी असे कबुल केले की, त्यांच्यामधील असलेले मतभेद सोडवून उर्वरित सर्व भाडेकरु / रहिवाश्यांचे कायमस्वरुपी पर्यायी निवासाचा करारनामा करण्यासाठी सहकार्य करतील.
- तदनंतर मंडळाने पुनर्वसन + विक्रीयुक्त गाळ्यांकरिता महानगरपालिकेकडून पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी दि.०१.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे
- मंडळाने महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये खालीलप्रमाणे अटी नमुद करण्यात आल्या आहेत.

  1) That a Co.Op.Hsg. Society along with all the old occupiers shall be formed and a certified true copy of certificate of registration of Co. Op. Housing Society to this effect shall be furnished to this office within 3 months of receiving full Occupation Certificate from MCGM.

  9) It is binding on yourself to deposit necessary Corpus fund with the society at the time of actual possession after obtaining Occupation Certificate from MCGM.

  10)The NOC holder shall execute the agreements of Permanent Alternate Accommodation with balance tenants / occupants by end of November 2021 and submit the copies of same to this office before 15th Dec. 2021, without fail.

- तदनंतर महानगरपालिकेने दि.२६.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

- तदनंतर कार्यकारी अभियंता / म-दक्षिण विभाग, दुवपु मंडळ यांनी दि.२८.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विकासकास उपरोक्त अट क्रमांक १ व १० चे अनुपालन करण्याकरिता स्मरणपत्र पाठविले.

- तसेच शिवसंध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी दि.२६.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विकासकाने पुनर्वसन इमारतीमध्ये सेवासुविधाचे काम केले नसून व सोसायटीला मालमत्तापत्रक हस्तांतरीत न केल्याबाबत तक्रार केली.

- विकासकाकडून सदर तक्रारीबाबत या कार्यालयाचे दि.२९.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे.

- सद्य:स्थितीत विकासकाने कळविल्यानुसार, एकूण १५९ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ९० भाडेकरु / रहिवाश्यांचे करारनामे पंजिकृत करण्यात आले असून, ७० भाडेकरु /रहिवाश्यांना त्यांच्या प्रती देण्यात आल्या आहेत व उर्वरित २० भाडेकरु / रहिवाशी हे त्यांच्या प्रती घेण्यासाठी पुढे आले नाही.

- तसेच उर्वरित ६९ भाडेकरु / रहिवाश्यांबाबत विकासकाने असे कळविले आहे की, भाडेकरु / रहिवाश्यांच्या वारसदारांमध्ये वाद असल्याने त्यांचे करारनामे होऊ शकले नाही. विकासकाने असेही कळविले आहे की, सदर भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांचे कागदपत्रे सादर केल्यास व मंडळाने त्याच्या नावास मान्यता दिल्यानंतर, त्यांच्यासोबत करारनामे करण्यात येतील. सदर बाबतीत असे सादर करण्यात येते की, भाडेकरु / रहिवाश्यांनी वारसदारांचे नाव प्रमाणित करण्याकरिता मंडळाकडे अर्ज अथवा पुरावे सादर केल्याचे आढळून येत नाही.

- विकासक मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपर्स यांनी त्यांच्या दि.०९.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या खुलाश्यानुसार, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासाठी भाडेकरु / रहिवाश्यांना आवश्यक कागदपत्र स्वाक्षरीसाठी देण्यात आलेले आहेत. तसेच भाडेकरु / रहिवाश्यांनी कागदपत्रे स्वाक्षरीसह सादर केल्यानंतर, गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येईल व तदनंतर भूखंडाचे अभिहस्तांतरण गृहनिर्माण संस्थेस करण्यात येईल.

- विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार विकासकाने पुनर्वसन इमारत पूर्ण झाल्यानंतर, किमान १० वर्षे पर्यंत देखभाल खर्च भागविण्यासाठी भाडेकरु / रहिवाश्यांना कॉर्पस फंड देणे बंधनकारक आहे.

- विकासक मेसर्स क्रिप्टन कन्स्ट्रक्शन अँण्ड डेव्हलपर्स यांनी असे कळविले आहे की, भाडेकरु / रहिवाश्यांना सर्व सुविधा पुर्विण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २००९ -२०१० ते २०२१ पर्यंत पुर्नवसन इमारतीचे देखभाल व व्यवस्थापन त्यांच्यातर्फे करण्यात आलेले आहे.

- विकासकाने दि.१०.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, विकासकाने सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकरिता आवश्यक दस्तावेज भाडेकरु / रहिवाश्यांना दिले आहेत व भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांच्या वकीलामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणीकरण्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे दि.१०.०५.२०२६ रोजी अर्ज केला आहे.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६६.

जा.क्र.उपमुकाअ/मु.अ./निकाअ/पाव.अधि/ विधानसभा अता.प्र.२४२६६/५२२ ९/दुवपु-२०२६
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण विभाग, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक: 22 JUN 2026

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६६.
"हतीसकर मार्ग, प्रभादेवी मुंबई, येथील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत."
मा. श्री. महेश सावंत (माहिम), मा. विधानसभा सदस्य

संदर्भ: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसअताप्र-२०२६/प्र.क्र.५०/दुवपु-१, दि.१२.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६६ ची भागश: उत्तरे पुरक टिप्पणीसोबत पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-
१. मुख्य अभियंता -१/ ३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-
१. उपमुख्य अभियंता / परिमंडळ-१/२/३/४/मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.
२. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६६.</u>

"हतीसकर मार्ग, प्रभादेवी मुंबई, येथील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत."

मा. श्री. महेश सावंत (माहिम), मा. विधानसभा सदस्य

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
१.	मुंबईतील प्रभादेवी, हतीसकर मार्ग, श्री. मधुकर काशिनाथ नागवेकर (मूळ जमीनमालक) यांचे वारसदार मालकांनी प्रलंबित प्रकल्प १८ महिन्यांत पूर्ण करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात माहे सप्टेंबर २०२३ मध्ये लेखी हमीपत्र (Undertaking) सादर केले असतानाही आजतागायत कोणतीही प्रत्यक्ष प्रगती न झाल्याने २१ महिने उलटूनही प्रकल्प सुरु न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?	होय, हे अंशत खरे आहे. सदर पुनर्विकास योजनेमध्ये ना-हरकत प्रमाणपत्रधारकाने भुखंडावर महानगरपालिकेच्या परवानगीने तात्पुरते संक्रमण शिबीर बांधुन त्यामध्ये बिगर उपकरप्राप्त इमारतीमधील ४० निवासी भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली होती. सदर तात्पुरते संक्रमण शिबीर हे अतिशय खराब अवस्थेत असल्याने, महानगरपालिकेने कलम ३५४ अंतर्गत दि.२८.०४.२०१८ रोजी नोटीस बजाविली होती व सदर संक्रमण शिबीर रिकामे करुन तोडण्यास कळविण्यात आले होते. सदर नोटीसनंतर भाडेकरु / रहिवाशी यांनी संक्रमण शिबीर रिकामे करण्यास विरोध केल्यामुळे, महानगरपालिकेने वीज व पाणी बंद केले होते. महानगरपालिकेच्या नोटीस विरोधात श्री.मोहन यशवंत पाडावे व इतर भाडेकरु / रहिवाश्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२७३७/२०१८ दाखल करुन स्थगिती मिळण्यासाठी तसेच वीज व पाणी जोडण्यासाठी विनंती केली होती. मा.उच्च न्यायालयाच्या सुट्टीतील खंडपीठाने दि.२५.०५.२०१८ रोजी संक्रमण शिबीराचे वीज व पाणी पुन्हा जोडण्याचे आदेश दिले व भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांच्या जबाबदारीवर राहण्यास परवानगी दिली होती. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दि.२४.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संक्रमण शिबीरात राहणाऱ्या भाडेकरु / रहिवाश्यांना दि.३०.०९.२०२३ पर्यंत त्वरीत रिकामे करण्याचे आदेश पारित केले. सदर मालमत्तेचे मालक श्री.शशांक नागवेकर यांनी मा.उच्च न्यायालयात सादर केले होते की, महानगरपालिकेने प्रत्यक्ष काम सुरु करण्यास परवानगी दिल्यानंतर, साधारणत: १८ महिन्यांच्या आत पुनर्वसन इमारतीचे काम पुर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी महानगरपालिकेस अर्ज करतील. मा.उच्च न्यायालयाने दि.०३.१०.२०२३ रोजीच्या आदेशामध्ये मालकांनी मान्य केलेल्या बाबी नमुद आहेत. सदर प्रकरणामध्ये एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी अंतरीम अर्ज क्रमांक २१६८/२०२४ याचिका क्रमांक २७३७/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयात दाखल करुन, मा.उच्च न्यायालयाने दि.२४.०८.२०२३, दि.२५.०८.२०२३, दि.३०.०८.२०२३ व दि.०३.१०.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याची विनंती केली होती. सदर याचिकेमध्ये मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी असा दावा केला आहे की, सदर मालमत्तेवरील पुनर्विकासासाठी त्यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉन यांना कर्ज दिले आहे. तसेच मेसर्स काव्या बिल्डकॉन यांनी सदर मालमत्ता त्यांच्याकडे गहाण ठेवली आहे. मा.उच्च न्यायालयाने सर्व बाजु ऐकल्यानंतर, दि.२७.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांची मागणी अमान्य केली आहे. सदर आदेशामध्ये मा.उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉन यांना कर्ज दिले आहे व मालक श्री नागवेकर यांची कर्ज देताना, संमती घेतली नव्हती, त्यामुळे मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉर्न यांचे विरोधात दावा दाखल करावा.

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
		याचिकाकर्ते मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांच्या वकीलाने उपरोक्त आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी ०४ आठवड्यासाठी मुदत देण्याची विनंती केली होती. मा.उच्च न्यायालयाने मागणी मान्य करुन सदर आदेश ०४ आठवड्यासाठी स्थगित ठेवली होती. तद्नंतर मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मा.उच्च न्यायालयाच्या दि.२७.०६.२०२५ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र.२३०४९/ २०२५ दाखल केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात उपरोक्त एसएलपी मध्ये दि.१८.०८.२०२५, दि.१२.०९.२०२५ व दि.०७.०१.२०२६ रोजी सुनावण्या झाल्या असून, अद्याप अंतिम आदेश पारित झालेले नाही व सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती ही सद्य:स्थितीत कायम आहे. उपरोक्त न्यायालयीन प्रकरणांमुळे मालक श्री नागवेकर हे प्रत्यक्ष पुनर्विकासाचे काम सुरु करु शकले नाही, हि वस्तुस्थिती आहे.
२.	असल्यास, प्रकरणात सध्या ०५ महिन्यांचे भाडे थकीत असून काही भाडेकरुंचे तब्बल ०२ वर्षांचे भाडे थकीत आहे, तसेच १०५ भाडेकरुंपैकी केवळ १४-१५ जणांशीच मनमानी पद्धतीने कायमस्वरुपी पर्यायी निवासी (Permanent Alternate Accommodation Agreement) करारनामे करून त्यांनाही मूळ प्रती न देता केवळ छायांकित (झेरॉक्स) प्रती देण्यात आली तसेच काही करारनामे चुकीच्या मागणीवर नोंदणीकृत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय ?	उपकरप्राप्त इमारतीमधील एकूण ७९ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ६३ भाडेकरु / रहिवाश्यांसोबत पुर्वीच्या मालकांनी करारनामे केले आहेत. तसेच मालक श्री.शशांक नागवेकर यांनी सादर केलेल्या माहितीनुसार, विगर उपकरप्राप्त इमारतीमधील सद्य:स्थितीत ४२ भाडेकरु / रहिवाशी असून, त्यापैकी २५ भाडेकरु / रहिवाश्यासोबत करारनामे केले आहेत व उर्वरित १७ भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांचे कागदपत्रे सादर न केल्यामुळे, तसेच वारसदारांमध्ये वाद असल्याने करारनामे प्रलंबित आहे.
३.	असल्यास, भाडेकरुंनी कोणतीही लेखी संमती न देता खोटी कागदपत्रे सादर करुन मे. संघवी गृहनिर्माण यांच्याशी २०१० मध्ये अभिहस्तांतरण दस्तवेज (Conveyance Deed) करण्यात आले असून काही म्हाडा अधिकाऱ्यांच्या मदतीने ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र मिळविण्यात आल्याची तक्रार असून, याबाबत म्हाडामार्फत दिनांक ०१.०४.२०२५ रोजी कलम ९१(अ) अन्वये नोटीस बजावूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,	मुळ मालक श्री.मधुकर नागवेकर यांनी मेसर्स जानकी प्रॉपर्टीज यांना पुनर्विकासाचे काम करण्यासाठी सन २००४/२००५ मध्ये विकास करारनामा करुन अधिकार दिले होते. त्यामुळे खोटी कागदपत्रे सादर करुन मे. संघवी गृहनिर्माण यांच्याशी २०१० मध्ये अभिहस्तांतरण दस्तवेज (Conveyance Deed) करण्यात आले असून काही म्हाडा अधिकाऱ्यांच्या मदतीने ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र मिळविण्यात आल्याची तक्रार ही बाब वस्तुस्थितीशी धरुन नाही. विकासक मेसर्स जानकी प्रॉपर्टीज / मालक यांनी मंडळाच्या संक्रमण शिबीरापोटी भरावयाचे भाडे अंदाजे रुपये १६ कोटी थकीत ठेवल्यामुळे, तसेच प्रत्यक्ष काम सुरु न केल्याने मंडळाने दि.०१.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ९१(अ) अंतर्गत मालकांस नोटीस बजाविली आहे. सदर नोटीस बजाविल्यानंतर, मालक श्री.शशांक नागवेकर आणि त्यांच्या दि.१२.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला होता. सदर खुलाश्यामध्ये असे कळविले की, त्याच्या मालमत्तेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक २७३७/२०१८ प्रलंबित असून, मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने, पुनर्विकासाचे काम सुरु करु शकले नाही. वर नमुद केल्याप्रमाणे सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ असून, मा.सर्वोच्च

अ.क्र.	प्रश्न	उत्तरे
		न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश हे कायम आहेत, त्यामुळे म्हाड अधिनियम कलम ९१(अ) अंतर्गत मंडळातर्फे पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही.
४	तसेच, सायन प्रतीक्षा नगर येथील म्हाडा संक्रमण शिबीरात मागील सुमारे २५ वर्षांपासून रहिवाशी राहत असून सदर संक्रमण शिबीराचे सुमारे १६ कोटी रुपयांचे भाडे थकीत आहे, तसेच प्रकल्प परिसरातील ४२ भाडेकरु सध्या भाडे न मिळत असल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरुपात म्हाडा संक्रमण शिबीरात सदनिका देण्याबाबत व सदर प्रकल्प संपादन (Acquisition) करून पुनर्विकास पूर्ण करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत म्हाडाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?	वर नमुद केलयाप्रमाणे, सद्यःस्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ असून, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश हे कायम आहेत, त्यामुळे म्हाड अधिनियम कलम ९१(अ) अंतर्गत मंडळातर्फे पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही.
५	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	प्रश्न उद्भवत नाही.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

विषय: <u>विधानसभा अतारांकित प्रश्न क्र.२४२६६.</u>

"हतीसकर मार्ग, प्रभादेवी मुंबई, येथील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत."

मा. श्री. महेश सावंत (माहिम), मा. विधानसभा सदस्य

पुरक टिप्पणी:

- भूभाग क्र.१२७४, जानकी भुवन, हातिसकर वाडी, हातिसकर मार्ग, मुंबई - २५ या मालमत्तेमध्ये खालील दोन चाळींचा समावेश होतो.
  १. चाळ क्र.२९, उपकर क्र.२५४६(५)
  २. चाळ क्र.२९ ए, उपकर क्र.२५४६(४)

  विकासक / ना-हरकत प्रमाणपत्रधारक
  - श्री एम. के. नागवेकर / जानकी प्रॉपर्टीज — जुने विकासक
  - श्री.शशांक नागवेकर — नविन / वर्तमान विकासक.
- प्रस्तावित प्रकल्पाच्या वास्तुविशारदांनी सादर केलेल्या भाडेकरू / रहिवाशांच्या यादीनुसार उपकरप्राप्त इमारतीमधील ७९ निवासी गाळेधारक रहिवाशी व उपकर प्राप्त नसलेल्या (बिगर उपकरप्राप्त) पत्राचाळ या इमारतीमधील ५४ निवासी गाळेधारक / रहिवाशांचा प्रकल्पांतर्गत समावेश आहे. सदर एकूण ५४ बिगर उपकरप्राप्त सदनिकापैकी १४ सदनिका या मालक श्री.मधुकर नागवेकर यांच्या मालकीच्या आहेत.
- उपकर भाडेकरु / रहिवाश्यापैकी उपकरप्राप्त इमारतीमधील ७९ निवासी गाळेधारकांना प्रतिक्षा नगर, सायन येथील संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करण्यात आले असुन उपकर प्राप्त नसलेल्या (non cess) इमारतीमधील ४० निवासी गाळेधारकांना विकासकाने भुखंडावर बांधलेल्या संक्रमण शिबिरात पर्यायी जागा देण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्ष जागेवर विकासकाने बांधलेल्या संक्रमण शिबिरास बृहन्मुंबई महानगरपालिकेने (कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव / शहर-१ यांचे पत्र क्र.इबी/२३९/जीस/ए, दि.१४.१०.२००५) मंजुरी दिलेली आहे.
- मालक श्री.मधुकर नागवेकर यांनी बबई१-८५६३-२-२००५ अन्वये विषयांकित मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता मेसर्स जानकी प्रॉपर्टीज यांच्या सोबत विकसन करारनामा केला होता.
- मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांनी त्यांच्या दि.०६.०५.१९९२ रोजीचे पत्र क्र.५०६२/९२ रोजीच्या पत्रान्वये विषयांकीत प्रकल्पास ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच पत्र क्र.इइबीपीआर/२३९/जीएस/एआर, दि.१९.०५.१९९३ अन्वये प्रकल्पास आय ओ डी देऊन प्रस्तावित बांधकाम नकाशास मंजुरी दिलेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांचे पत्र क्र.इइ/२३९/जीएस दि.१४.०५.२०१० अन्वये सुधारीत नकाशास मंजुरी दिलेली आहे.
- विकासकाने मूळ इमारतीमधील रहिवाशांचे उपरोक्त नमुद केल्यानुसार संक्रमण शिबिरात स्थलांतरण केल्यानंतर मार्च २००९ मध्ये मूळ इमारत पुनर्विकासाच्या कामाकरीता तोडण्यात आली.
- मुख्य अधिकारी / दुवपु मंडळ यांचे पत्र क्र. नाहप्र/न-१६०/४२९७/मुंइदुवपु-११, दि.२३.०८.२०११ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पास सुधारीत ना हरकत प्रमणपत्र प्रदान करण्यात आलेले होते.
- सदर पुनर्विकास योजनेमध्ये विकासकाने खुल्या विक्रीकरीता ११ मजल्यांची व मूळ रहिवाशांकरीता ९ मजल्यांची (एकुण ९७ निवासी गाळे) अशी इमारत बांधलेली आहे.
- खुल्या विक्रीच्या इमारतीचे आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर, आतील बाहेरील विटांचे बांधकाम, आतील बाहेरील प्लास्टर इ. कामे झालेली आहेत.
- मूळ रहिवाशांकारीता बांधलेल्या इमारतींकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे २२५ चौ.फुट चटई क्षेत्रफळाच्या एकुण १०५ रहिवाशी गाळ्यांची मंजुरी देण्यात आलेली असुन जागेवर ९७ निवासी गाळे बांधण्यात आलेले आहेत. सदर ९७ गाळ्यांपैकी बहुतांशी गाळ्यांमध्ये आतील व बाहेरील प्लॉस्टर, फ्लोअरिंग, किचन प्लॅटफॉर्म, स्लाईड अल्युमिनियम खिडक्या, खिडक्यांना एम.एस.ग्रील इत्यादी कामे झाली आहेत.
- विकासक व बिगर उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाश्यांसाठी भुखंडावरच बांधलेल्या संक्रमण शिबिरातील रहिवाशी यांच्यामधील वादामुळे काम साधारणपणे दोन वर्षे बंद स्थितीत होते
- सदर योजनेचे काम कार्यान्वित करण्याबाबत तसेच भाडेकरु / रहिवाश्यांचे थकीत भाडे देण्याबाबत मुख्य अधिकारी, दुवपु मंडळ यांच्या स्तरावर बैठका घेण्यात आलेल्या असून, विकासकास वेळोवेळी चेतावणी / सुचना व कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या व विकासक मेसर्स जानकी प्रॉपर्ट्रीज यांना देण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र दि.२१.०६.२०२१ रोजी रद्द करुन, तद्नंतर दि.२५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर ना-हरकत प्रमाणपत्र पुर्नस्थापित (Reinstate) करुन इमारत मालक श्री.शशांक मधुकर नागवेकर यांना प्रदान करण्यात आले.

- सदर पुनर्विकास योजनेमध्ये ना-हरकत प्रमाणपत्रधारकाने भुखंडावर महानगरपालिकेच्या परवानगीने तात्पुरते संक्रमण शिबीर बांधुन त्यामध्ये बिगर उपकरप्राप्त इमारतीमधील ४० निवासी भाडेकरु / रहिवाश्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली होती. सदर तात्पुरते संक्रमण शिबीर हे अतिशय खराब अवस्थेत असल्याने, महानगरपालिकेने कलम ३५४ अंतर्गत दि.२८.०४.२०१८ रोजी नोटीस बजाविली होती व सदर संक्रमण शिबीर रिकामे करुन तोडण्यास कळविण्यात आले होते. सदर नोटीसनंतर भाडेकरु / रहिवाशी यांनी संक्रमण शिबीर रिकामे करण्यास विरोध केल्यामुळे, महानगरपालिकेने वीज व पाणी बंद केले होते.

- महानगरपालिकेच्या नोटीस विरोधात श्री.मोहन यशवंत पाडावे व इतर भाडेकरु / रहिवाश्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.२७३७/२०१८ दाखल करुन स्थगिती मिळण्यासाठी तसेच वीज व पाणी जोडण्यासाठी विनंती केली होती. मा.उच्च न्यायालयाच्या सुट्टीतील खंडपीठाने दि.२५.०५.२०१८ रोजी संक्रमण शिबीराचे वीज व पाणी पुन्हा जोडण्याचे आदेश दिले व भाडेकरु / रहिवाश्यांनी त्यांच्या जबाबदारीवर राहण्यास परवानगी दिली होती.

- तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दि.२४.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संक्रमण शिबीरात राहणाऱ्या भाडेकरु / रहिवाश्यांना दि.३०.०९.२०२३ पर्यंत त्वरीत रिकामे करण्याचे आदेश पारित केले. सदर मालमत्तेचे मालक श्री.शशांक नागवेकर यांनी मा.उच्च न्यायालयात सादर केले होते की, महानगरपालिकेने प्रत्यक्ष काम सुरु करण्यास परवानगी दिल्यानंतर, साधारणत: १८ महिन्यांच्या आत पुनर्वसन इमारतीचे काम पुर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी महानगरपालिकेस अर्ज करतील. मा.उच्च न्यायालयाने दि.०३.१०.२०२३ रोजीच्या आदेशामध्ये मालकांनी मान्य केलेल्या बाबी नमुद आहेत.

- सदर प्रकरणामध्ये एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी अंतरीम अर्ज क्रमांक २१६८/२०२४ याचिका क्रमांक २७३७/२०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयात दाखल करुन, मा.उच्च न्यायालयाने दि.२४.०८.२०२३, दि.२५.०८.२०२३, दि.३०.०८.२०२३ व दि.०३.१०.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशांचे पुनर्विलोकन करण्याची विनंती केली होती. सदर याचिकेमध्ये मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी असा दावा केला आहे की, सदर मालमत्तेवरील पुनर्विकासासाठी त्यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉन यांना कर्ज दिले आहे. तसेच मेसर्स काव्या बिल्डकॉन यांनी सदर मालमत्ता त्यांच्याकडे गहाण ठेवली आहे.

- मा.उच्च न्यायालयाने सर्व बाजु ऐकल्यानंतर, दि.२७.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांची मागणी अमान्य केली आहे. सदर आदेशामध्ये मा.उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉन यांना कर्ज दिले आहे व मालक श्री नागवेकर यांची कर्ज देताना, संमती घेतली नव्हती, त्यामुळे मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मेसर्स काव्या बिल्डकॉर्न यांचे विरोधात दावा दाखल करावा.

- याचिकाकर्ते मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांच्या वकीलाने उपरोक्त आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी ०४ आठवड्यासाठी मुदत देण्याची विनंती केली होती. मा.उच्च न्यायालयाने मागणी मान्य करुन सदर आदेश ०४ आठवड्यासाठी स्थगित ठेवली होती. तद्नंतर मेसर्स एडल्वाईस असेट रिकस्ट्रक्शन कं.लि., यांनी मा.उच्च न्यायालयाच्या दि.२७.०६.२०२५ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र.२३०४९/ २०२५ दाखल केली आहे.

- मा.सर्वोच्च न्यायालयात उपरोक्त एसएलपी मध्ये दि.१८.०८.२०२५, दि.१२.०९.२०२५ व दि.०७.०१.२०२६ रोजी सुनावण्या झाल्या असून, अद्याप अंतिम आदेश पारित झालेले नाही व सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती ही सद्य:स्थितीत कायम आहे. उपरोक्त न्यायालयीन प्रकरणांमुळे मालक श्री नागवेकर हे प्रत्यक्ष पुनर्विकासाचे काम सुरु करु शकले नाही, हि वस्तुस्थिती आहे.

- इमारत मालक श्री.मधुकर नागवेकर यांनी त्यांच्या दि.२३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये ही संपूर्ण योजना पुर्ण करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने दि.०८.०७.२०२१ रोजीच्या अधिसुचनेअंतर्गत तरतुदीनुसार सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली होती. ही योजना बऱ्याच कालावधीपासुन रखडलेली असल्याने व त्यामधील भाडेकरु / रहिवाश्यांचे पुनर्वसन लवकरात लवकर होण्याच्यादृष्टीने दि.०६.०५.१९९२ व दि.२३.०८.२०११ रोजी प्रदान करण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र पुर्नस्थापित करुन दि.२५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. या सुधारित ना-हरकत प्रमाणपत्रानुसार, महानगरपालिकेकडून काम सुरु करण्याचा परवाना घेण्याची कार्यवाही ना-हरकत प्रमाणपत्रांमार्फत सुरु आहे.

- उपमुख्य अधिकारी(संक्रमण शिबीर), दुवपु मंडळ यांच्या दि.३१.०७.२०२४ रोजीच्या टिप्पणीनुसार विकासकाने जुलै २०२४ पर्यंत रुपये १५,९३,६१,५९३/-एवढे संक्रमण शिबीरांचे भाडे थकविले आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाने विकासकास दि.२१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये "कारणे दाखवा नोटीस बजावून संक्रमण शिबिरापोटी थकीत भाडे १० दिवसात भरण्याचे निर्देश दिले.

- विषयांकित मालमत्तेच्या पुनर्विकासाचे काम ठप्प असल्यामुळे व तसेच विकासकाने संक्रमण शिबिरापोटी दयावयाचे भाडे थकविल्यामुळे विकासकास दि.०१.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ९१अ अंतर्गत नोटीस बजाविण्यात आली आहे.

- सदर नोटीस बजाविल्यानंतर, मालक श्री.शशांक नागवेकर आणि त्यांच्या दि.१२.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला होता. सदर खुलाश्यामध्ये असे कळविले की, त्याच्या मालमत्तेबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक २७३७/२०१८ प्रलंबित असून, मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने, पुनर्विकासाचे काम सुरु करु शकले नाही.

- सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ असून, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश हे कायम आहेत, त्यामुळे म्हाड अधिनियम कलम ९१(अ) अंतर्गत मंडळातर्फे पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही.

उपरोक्त अभिप्राय माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

मुख्य अभियंता

२/प्रा.

(PMAY)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न
प्राधान्य

जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.
दिनांक. /०५/२०२६.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- **विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २८३९५**

पाथरी (जि. परभणी) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना वेळेत हप्ते न मिळाल्याबाबत.

डॉ. राहुल पाटील व इतर मा. विधानसभा सदस्य

संदर्भ- १) अवर सचिव, गृनिधो-२, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचे पत्र जा.क्र. विसता-२०२६/ प्र.क्र.६४/ गृनिधो-२ दि. ०९/०३/२०२६.

२) या कार्यालयाने जा.क्र. E-८६०२३१४ दि. १२/०३/२०२६ अन्वये पाठविलेले उत्तर.

३) कार्यासन अधिकारी, गृनिधो-२, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्र. विसअता-२०२६/प्र.क्र.१२७/गृनिधो-२ दि. २२/०५/२०२६.

महोदय,

विषयांकित विधानसभा अतारांकित प्रश्न क्र २८३९५ संदर्भाधिन पत्राद्वारे या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्यासंदर्भात सुकाणू अभिकरण (म्हाडा) यांचे अद्ययावतअभिप्राय व पुरक टिप्पणी सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. तथा अभियान संचालक /प्र.आ.यो. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

मुख्य अभियंता-२/प्रा. तथा
राज्य स्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांना माहितीकरीता अग्रेषित.

प्रत: कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२ यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीसाठी.

विषय- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २८०५५

डॉ. राहुल पाटील व इतर मा. विधानसभा सदस्य

पाथरी (जि. परभणी) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना वेळेत हप्ते न मिळाल्याबाबत.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रश्नाचा तपशिल</th><th>सुकाणू अभिकरण (म्हाडा) चे उत्तर/अभिप्राय</th></tr>
<tr><td>१.</td><td>पाथरी (जि. परभणी) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत जवळपास ५ हजारांपेक्षा अधिक घरकुल मंजूर होऊनही अनेक लाभार्थ्यांना वेळेत हप्ते न मिळाल्याने घरकुलाची बांधकामे गेल्या अनेक महिन्यांपासुन प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,</td><td>नाही, हे खरे नाही,
पाथरी (जि. परभणी) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या BLC घटकात एकूण ७ प्रकल्प अहवालास मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रकल्पाचे नांव</th><th>मुळ मंजूर घरकुले</th><th>CSMC संदर्भ</th><th>अद्ययावत सुधारीत घरकुले (४३ वी SLSMC बैठक दि. ०२/०२/२०२६)</th><th>Dashboard नुसार प्रगतीपथावरील घरकुले</th><th>Dashboard नुसार पुर्ण झालेली घरकुले</th><th>MIS Portal नुसार पुर्ण झालेली घरकुले</th></tr>
<tr><td>१</td><td>Construction of ५०० EWS houses at Pathri Mun. Council</td><td>५००</td><td>३९ वी बैठक दि. ३०/१०/२०१८</td><td>४५९</td><td>४५३</td><td>३७७</td><td>२९७</td></tr>
<tr><td>२</td><td>Construction of ४५० EWS houses at Pathri Mun. Council</td><td>४५०</td><td>४२ वी बैठक दि. ३०/०१/२०१९</td><td>४०२</td><td>३९८</td><td>३३०</td><td>२७५</td></tr>
<tr><td>३</td><td>Construction of २०० EWS houses at Pathri Mun. Council</td><td>२००</td><td>४३ वी बैठक दि.२५/०२/२०१९</td><td>१७२</td><td>१६८</td><td>१३९</td><td>१०८</td></tr>
<tr><td>४</td><td>Construction of ७७० EWS houses at Pathri Mun.</td><td>७७०</td><td>४९ वी बैठक दि. २७/११/२०१९</td><td>४८३</td><td>४८१</td><td>३८८</td><td>३२०</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

	Council						
५	Construction of ८०० EWS houses at Pathri Mun. Council	८००	४९ वी बैठक दि. २७/११/२०१९	५०५	५०४	४१४	३५३
६	Construction of ९५४ EWS houses at various locations in Pathri Mun. Council	९५४	६० वी बैठक दि.३०/०३/२०२२	६४०	६३८	४५८	३२४
७	Construction of १८७ EWS houses at various locations in Pathri Mun. Council	१८७	६० वी बैठक दि.३०/०३/२०२२	८६	८६	६५	४८
एकूण		३८६१		२७४७	२७२८	२१७१	१७२५

वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार मुळ मंजूर घरकुलांची संख्या एकूण ३८६१ होती. त्यानंतर पाथरी नगरपरिषदेकडुन वेळोवेळी घरकुलांच्या संख्येत सुधारणा करण्यात येवून सुधारीत घरकुलांची संख्या २७४७ इतकी झाली. त्यापैकी २७२८ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

२.	असल्यास, सदर घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना विहीत वेळेत हप्ते न मिळाल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.	प्रश्न उद्भवत नाही, अंमलबजावणी यंत्रणा पाथरी नगरपरिषद यांनी वर नमुद घरकुलांच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार मागणी केलेल्या रक्कमेची तपासणी करुन व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेतल्यानंतर माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत त्यांना केंद्र शासनाचा अनुदान निधी रक्कम रु. २२.०४ कोटी व राज्य शासनाचा अनुदान निधी रक्कम रु. ३९.८१ कोटी (एकूण रक्कम रु. ६१.८५ कोटी) वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी पाथरी नगरपरिषदेने एकूण रक्कम रु. ५७.१४ कोटी इतक्या रक्कमेचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच, दिनांक ०४/११/२०२५ रोजी पाथरी नगरपरिषदेस वर नमुद घरकुलांच्या बांधकाम प्रगतीनुसार निधी वितरण करण्यासाठी केंद्र शासनाचा निधी रु. ६.४३ कोटी आवंटीत करण्यात आला. परंतु, त्यांचेकडुन या रक्कमेचा वापर झाला नसल्याने दिनांक २०/११/२०२५ रोजी रु. ३.०० कोटी व दिनांक ०२/०१/२०२६ रोजी रु. २.०० कोटी परत घेण्यात आला. त्यानंतर, सदर अंमलबजावणी यंत्रणेने पुन्हा निधीची मागणी केल्यावर त्यांना परत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी रु. २.०० कोटी एवढा निधी आवंटीत करण्यात आला. परंतु, या निधीचाही वापर पाथरी नगरपरिषदेकडुन विनियोग न झाल्यामुळे दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रु. ५०.०० लक्ष परत घेण्यात आले. त्यानंतर पुन्हा दिनांक ०९/०३/२०२६ रोजी रु. १.०० कोटी एवढा निधी पाथरी नगरपरिषदेस आवंटीत करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या तिसऱ्या हप्त्याचा निधी / पुढील निधी देण्यापूर्वी पाथरी नगरपरिषदेकडून खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे: १) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत वितरीत निधीचे Reconciliation करीता बँकेचे Statements/Cashbook इत्यादी. २) पूर्ण झालेल्या सर्व घरांचे पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) ३) पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी Bhuvan portal वर Completion Stages चे geo tagging अद्ययावत करणे. ४) सर्व प्रकल्पांचे TPQMA मार्फत केलेल्या Visit प्रमाणे ATR अहवाल सादर करणे.
३.	असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना त्वरीत घरकुलाच्या अनुदानाचे वितरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,	प्रश्न उद्भवत नाही,
४.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	लागु नाही.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना(शहरी)

वरील तक्त्यात दर्शविल्यानुसार मुळ मंजूर घरकुलांची संख्या एकूण ३८६१ होती. त्यानंतर पाथरी नगरपरिषदेकडुन वेळोवेळी घरकुलांच्या संख्येत सुधारणा करण्यात आली व अंतिमतः दि. ०२/०२/२०२६ रोजी SLSMC च्या ४३ व्या बैठकीपर्यंत या मुळ मंजूर घरकुलांची संख्या सुधारीत होऊन २७४७ इतकी झाली.

अंमलबजावणी यंत्रणा पाथरी नगरपरिषद यांनी वर नमुद घरकुलांच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार मागणी केलेल्या रक्कमेची तपासणी करुन व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेतल्यानंतर माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत त्यांना केंद्र शासनाचा अनुदान निधी रक्कम रु. २२.०४ कोटी व राज्य शासनाचा अनुदान निधी रक्कम रु. ३९.८१ कोटी (एकूण रक्कम रु. ६१.८५ कोटी) वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी पाथरी नगरपरिषदेने एकूण रक्कम रु. ५७.१४ कोटी इतक्या रक्कमेचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर केले आहे.

तसेच, दिनांक ०४/११/२०२५ रोजी पाथरी नगरपरिषदेस वर नमुद घरकुलांच्या बांधकाम प्रगतीनुसार निधी वितरण करण्यासाठी केंद्र शासनाचा निधी रु. ६.४३ कोटी आवंटीत करण्यात आला. परंतु, त्यांचेकडुन या रक्कमेचा वापर झाला नसल्याने दिनांक २०/११/२०२५ रोजी रु. ३.०० कोटी व दिनांक ०२/०१/२०२६ रोजी रु. २.०० कोटी परत घेण्यात आला. त्यानंतर, सदर अंमलबजावणी यंत्रणेने पुन्हा निधीची मागणी केल्यावर त्यांना परत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी रु. २.०० कोटी एवढा निधी आवंटीत करण्यात आला. परंतु, या निधीचाही वापर पाथरी नगरपरिषदेकडुन विनियोग न झाल्यामुळे दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रु. ५०.०० लक्ष परत घेण्यात आले. त्यानंतर पुन्हा दिनांक ०९/०३/२०२६ रोजी रु. १.०० कोटी एवढा निधी पाथरी नगरपरिषदेस आवंटीत करण्यात आला आहे.

या योजनेतील सुधारित घरकुलांची एकूण संख्या २७४७ आहे. परंतू Geo tagging केल्यानुसार केंद्र शासनाकडून २७२८ इतकी घरे Central Dashboard वर अद्ययावत केली आहेत. २७२८ पैकी १७२५ घरकुलांचे बांधकाम भौतिकदृष्ट्या पुर्ण झाले असुन १००३ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर दिसत आहे. वरील माहिती अद्ययावत करण्यासाठी केंद्र शासनास वारंवार विनंती करण्यात येत आहे, तथापि ते अद्यापी झालेले नाही. त्यामुळे MIS Portal वर वरील पूर्ण झालेल्या घरकुलांच्या संख्येचा (म्हणजेच २७२८)आधार घेण्यात येत आहे.

सद्यःस्थितीत PMAY Central Dashboard वर अद्ययावत केलेली माहिती व PMAY MIS Portal वर असलेल्या तपशीलानुसार माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण मंजूर घरे	२७४७
केंद्र शासनाकडून Central Dashboard वर geo tagging नुसार अद्ययावत केलेली घरे	२७२८
निधी करीता पात्र असलेल्या पात्र घरकुलांचा निधी (पहिला व दुसरा हप्ता)	केंद्र - २७२८x१.२ = ३२७३.६० लक्ष राज्य- २७२८x१.०० = २७२८.०० लक्ष
एकूण पात्र निधी	६००१.६० लक्ष (अ)
अंमलबजावणी यंत्रणेला वितरीत केलेल्या निधीतून खर्च केलेला निधी (प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्राप्रमाणे)	५८२०.५० लक्ष (ब)
उर्वरित निधी	१८१.१० लक्ष (क) (अ-ब)

पुरक टिप्पणी

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २८३९५

डॉ. राहुल पाटील व इतर मा. विधानसभा सदस्य

पाथरी (जि. परभणी) तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना वेळेत हप्ते न मिळाल्याबाबत...

पाथरी (जि. परभणी) तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या BLC घटकात एकूण ७ प्रकल्प अहवालास मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव	मुळ मंजूर घरकुले	CSMC संदर्भ	अद्ययावत सुधारीत घरकुले (४३ वी SLSMC बैठक दि. ०२/०२/२०२६)	Dashboard नुसार प्रगतीपथावरील घरकुले	Dashboard नुसार पुर्ण झालेली घरकुले	MIS Portal नुसार पुर्ण झालेली घरकुले
१	Construction of ५०० EWS houses at Pathri Mun. Council	५००	३९ वी बैठक दि. ३०/१०/२०१८	४५९	४५३	३७७	२९७
२	Construction of ४५० EWS houses at Pathri Mun. Council	४५०	४२ वी बैठक दि. ३०/०१/२०१९	४०२	३९८	३३०	२७५
३	Construction of २०० EWS houses at Pathri Mun. Council	२००	४३ वी बैठक दि.२५/०२/२०१९	१७२	१६८	१३९	१०८
४	Construction of ७७० EWS houses at Pathri Mun. Council	७७०	४९ वी बैठक दि. २७/११/२०१९	४८३	४८१	३८८	३२०
५	Construction of ८०० EWS houses at Pathri Mun. Council	८००	४९ वी बैठक दि. २७/११/२०१९	५०५	५०४	४१४	३५३
६	Construction of ९५४ EWS houses at various locations in Pathri Mun. Council	९५४	६० वी बैठक दि.३०/०३/२०२२	६४०	६३८	४५८	३२४
७	Construction of १८७ EWS houses at various locations in Pathri Mun. Council	१८७	६० वी बैठक दि.३०/०३/२०२२	८६	८६	६५	४८
एकूण		३८६१		२७४७	२७२८	२१७१	१७२५

दरम्यान सदर योजनेअंतर्गत पाथरी नगर परिषदेस वेळोवळी अदा केलेल्या निधीमधून सुमारे रू. २५०.०० लक्ष एवढी रक्कम लाभार्थ्यांच्या अनुदानासाठी न वापरता इतर कामी वळती केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे म्हाडामार्फत सदर नगरपरिषदेस या निधीच्या वापराची पडताळणी करणेसाठी बँक खात्यांचे ताळमेळ करण्याबाबत वेळोवेळी सूचित करण्यात आले आहे. परंतू अजूनही या नगरपरिषदेकडून लेख्याचे ताळमेळ करून देण्यात आलेले नाही. तथापि सदरचा ताळमेळ प्राप्त झाल्यानंतर तो तपासून नंतरच पुढील निधी वितरीत करणे शक्य होईल.

केंद्र शासनाच्या तिसऱ्या हप्त्याचा निधी / पुढील निधी देण्यापूर्वी पाथरी नगरपरिषदेकडून खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे:

१) प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत वितरीत निधीचे Reconciliation करीता बँकेचे Statements/Cashbook इत्यादी.
२) पूर्ण झालेल्या सर्व घरांचे पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate)
३) पूर्ण झालेल्या घरकुलांसाठी Bhuvan portal वर Completion Stages चे geo tagging अद्ययावत करणे.
४) सर्व प्रकल्पांचे TPQMA मार्फत केलेल्या Visit प्रमाणे ATR अहवाल सादर करणे.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न
प्राधान्य

जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.
दिनांक. /०६/२०२६.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २१४५
ॲड. श्रीजया चव्हाण व इतर मा. विधानसभा सदस्य
- प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना योजनेचा दुसरा हप्ता मिळाला नसल्याबाबत.

संदर्भ- कार्यासन अधिकारी, गृनिधो-२, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय यांचे पत्र जा.क्र. विसअता-२०२५/ प्र.क्र.१४६/ गृनिधो-२ दि. ०२/०७/२०२५.

महोदय,

विषयांकित विधानसभा अतारांकित प्रश्न क्र २१४५ संदर्भाधिन पत्राद्वारे या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्यासंदर्भात सुकाणू अभिकरण (म्हाडा) यांचे अभिप्राय व पुरक टिप्पणी सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. तथा अभियान संचालक /प्र.आ.यो. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

मुख्य अभियंता-२/प्रा. तथा
राज्य स्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांना माहितीकरीता अग्रेषित.
प्रत: कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२ यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीसाठी.

विषय- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २१४५

अॅड. श्रीजया चव्हाण व इतर मा. विधानसभा सदस्य

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना योजनेचा दुसरा हप्ता मिळाला नसल्याबाबत.

अ. क्र.	प्रश्नाचा तपशील	सुकाणू अभिकरण (म्हाडा) चे उत्तर/अभिप्राय
१.	शहरी घटक योजने अंतर्गत अर्धापूर व मुदखेड (जि. नांदेड) नगरपंचायत क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत असुन योजने अंतर्गत लाभार्थीना घरकुलांचा शेवटचा हप्ता अद्यापही प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय.	नाही, हे खरे नाही. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत खाली नमूद केल्यानुसार अर्धापूर, जि. नांदेड मुदखेड, जि. नांदेड येथे योजना राबविण्यात आल्या आहेत. **अ) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अर्धापूर (जि. नांदेड) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-**

अ. क्र.	योजनेचे नांव	घटक	मुळ मंजूर घरकुल संख्या	सुधारीत घरकुल संख्या	पुर्ण झालेल्या घरकुल संख्या
1	Construction of 714 EWS DUs at Ardhapur Nagar Panchayat Dist. Nanded	BLC	714	367	319
2	Construction of 784 EWS DUs at Ardhapur Nagar Panchayat Dist. Nanded	BLC	784	337	264

वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता परिशिष्ट 'अ' येथे सोबत जोडण्यात येत आहे.

ब) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मुदखेड (जि. नांदेड) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-

अ. क्र.	योजनेचे नांव	घटक	मुळ मंजूर घरकुल संख्या	सुधारीत घरकुल संख्या	पुर्ण झालेल्या घरकुल संख्या
1	Construction of 113 EWS DUs at various places in Mudkhed Municipal Council	BLC	113	68	65
2	Construction of 521 EWS DUs at Mudkhed	BLC	521	274	268
3	Construction of 193 EWS DUs at various places in Mudkhed Municipal Council	BLC	193	86	82

<table>
<tr><td></td><td></td><td>वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता परिशिष्ट 'ब' येथे सोबत जोडण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>२.</td><td>असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील गोंड पिंपरी नगरपंचायत येथील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मागील ३ ते ४ वर्षांपुर्वी बांधलेल्या अनेक घरकुलांच्या शेवटचा ३०,००० रुपयांचा (हप्ता) लाभ अद्यापही लाभार्थ्यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,</td><td>प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत गोंडपिंपरी (जि. चंद्रपूर) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>योजनेचे नांव</th><th>घटक</th><th>मुळ मंजूर घरकुल संख्या</th><th>सुधारीत घरकुल संख्या</th><th>पुर्ण झालेल्या घरकुल संख्या</th></tr>
<tr><td>1</td><td>Construction of 183 to 159 EWS DUs at Gondpimpari Nagar Panchayat, Dist. Chandrapur</td><td>BLC</td><td>159</td><td>131</td><td>129</td></tr>
<tr><td>2</td><td>Construction of 117 EWS DUs at Gondpimpari Nagar Panchayat, Dist. Chandrapur</td><td>BLC</td><td>117</td><td>98</td><td>81</td></tr>
</table>
वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता परिशिष्ट 'क' येथे सोबत जोडण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>३.</td><td>असल्यास, मुख्य अधिकारी, नगरपंचायत यांनी आवश्यक निधीची मागणी वित्त नियंत्रक, म्हाडा यांचेकडे करुनही अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,</td><td>वरील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार अर्धापूर नगरपंचायत, मुदखेड नगरपंचायत व गोंडपिंपरी नगरपंचायत यांना मुळ घरकुलांच्या संख्येसाठी राज्यशासन व केंद्र शासनाचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु, सदर अंमलबजावणी यंत्रणांद्वारे त्यांच्या प्रकल्पातील मुळ घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना अधिकचा निधी वितरण झाल्याचे निदर्शनास येते. काही लाभार्थ्यांच्या घरकुलांचे बांधकाम अद्यापही सुरु असुन त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांनी संपूर्ण निधी वितरीत केल्याचे दिसुन येते. तसेच अद्यापपर्यंत मुदखेड नगरपंचायती अंतर्गत पूर्ण केलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यतील पाहणी दौऱ्यांचे ATR सादर झालेले नाहीत. या अंमलबजावणी यंत्रणांकडून आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांची पडताळणी करुन अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत करावयाचा शिल्लक निधी वितरणाची कार्यवाही करणे शक्य होईल.
वर नमुद केल्यानुसार अंमलबजावणी यंत्रणांना प्रकल्पात नमुद केलेल्या मुळ घरकुलांच्या संख्येनुसार निधी वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही पडताळणी पूर्ण झाल्यावर तसेच पाहणी दौऱ्याचे ATR प्राप्त झाल्यावर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.</td></tr>
<tr><td>४.</td><td>असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रलंबित घरकुलांची कामे तातडीने सुरु होऊन ते पुर्ण होण्यासाठी लाभार्थ्यांना अनुदानाचे पुढील हप्ते देण्याच्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,</td><td>प्रश्न उद्भवत नाही,</td></tr>
</table>

५.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागु नाही.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना(शहरी)

पुरक टिप्पणी

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. २१४५

ॲड. श्रीजया चव्हाण व इतर मा. विधानसभा सदस्य

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना योजनेचा दुसरा हप्ता मिळाला नसल्याबाबत.

अ) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अर्धापूर (जि. नांदेड) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-

अ. क्र.	योजनेचे नांव	घटक	मुळ मंजूर घरकुल संख्या	सुधारीत घरकुल संख्या	पुर्ण झालेल्या घरकुल संख्या
1	Construction of 714 EWS DUs at Ardhapur Nagar Panchayat Dist. Nanded	BLC	714	367	319
2	Construction of 784 EWS DUs at Ardhapur Nagar Panchayat Dist. Nanded	BLC	784	337	264

वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता **परिशिष्ट 'अ'** येथे सोबत जोडण्यात येत आहे.

वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार अर्धापूर, जि. नांदेड येथील मुळ ७१४ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. ७१४.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर ३६७ एवढी झाली. त्यापैकी २७२ घरकुलांचे काम पूर्ण झाल्याचे दिसून येते. या योजनेसाठी राज्य शासनाचा ३६७ घरकुलांसाठी निधी अर्धापूर नगर परिषदेकडून वापरण्यात आला आहे. केंद्र शासनाचा निधी फक्त रू. ७.८० लक्ष वितरीत करणे बाकी आहे. पूर्ण झालेल्या २७२ घरकुलांपैकी २३७ घरकुलांचे म्हणजेच ६४.५८% घरकुलांसाठी पूर्णत्वाचे दाखले प्राप्त झाले आहे. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व अर्धापूर नगरपरिषदेकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे मुळ ७८४ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. ७७१.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतू घरकुलांची संख्या सुधारित होऊन ३३७ एवढी झाली. त्यापैकी २३१ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाल्याचे दिसून येते. पूर्ण झालेल्या २३१ घरकुलांपैकी २२० घरकुलांचे म्हणजेच ६५.२८% घरकुलांसाठी पूर्णत्वाचे दाखले प्राप्त आहेत. या योजनेसाठी राज्य शासनाचा निधी रू. १.८० लक्ष व केंद्र शासनाचा निधी रू. २२.२० लक्ष वितरीत करणे बाकी आहे. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व अर्धापूर नगरपरिषदेकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

ब) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मुदखेड (जि. नांदेड) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-

अ. क्र.	योजनेचे नांव	घटक	मुळ मंजूर घरकुल संख्या	सुधारीत घरकुल संख्या	पुर्ण झालेल्या घरकुल संख्या
1	Construction of 113 EWS DUs at various places in Mudkhed Municipal Council	BLC	113	68	65
2	Construction of 521 EWS DUs at Mudkhed	BLC	521	274	268
3	Construction of 193 EWS DUs at various places in Mudkhed Municipal Council	BLC	193	86	82

वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता परिशिष्ट 'ब' येथे सोबत जोडण्यात येत आहे.

वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार मुदखेड नगरपंचायत जि. नांदेड येथील मुळ ११३ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. ११३.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर ६८ एवढी झाली. परंतू प्रत्यक्षात ६५ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. मुदखेड नगरपंचायत द्वारे ६८ घरकुलांसाठी निधी वापरण्यात आल्याने राज्य शासनाचा अतिरिक्त निधी रू. ३.०० लक्ष व केंद्र शासनाचा अतिरिक्त निधी रू. २२.२० लक्ष नगरपंचायतीकडे उपलब्ध आहे. कारणास्तव, या योजनेसाठी निधी वितरण करणे आवश्यक नाही. या कामासाठी TPQMA द्वारे पाहणी करण्यात आलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांचे ATR अद्याप मुदखेड नगरपंचायतीकडून प्राप्त झालेले नाही. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व मुदखेड नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

तसेच, मुळ ५२१ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. ५२१.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर २७४ एवढी झाली. परंतू प्रत्यक्षात २६८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. त्यापैकी २१२ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. मुदखेड नगरपंचायत द्वारे २७४ घरकुलांसाठी निधी वापरण्यात आल्याने राज्य शासनाचा अतिरिक्त निधी रू. ६.०० लक्ष नगरपंचायतीकडे उपलब्ध आहे. या कामासाठी TPQMA द्वारे पाहणी करण्यात आलेल्या तिसऱ्या टप्प्याचे ATR अद्याप मुदखेड नगरपंचायतीकडून प्राप्त झालेले नाही. कारणास्तव, या योजनेसाठी निधी वितरण करणे आवश्यक नाही. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व मुदखेड नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे, मुळ १९३ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. १९३.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर ८६ एवढी झाली. परंतू प्रत्यक्षात ८२ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसून येते. त्यापैकी ६४ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे. मुदखेड नगरपंचायत द्वारे ८४ घरकुलांसाठी निधी वापरण्यात आल्याने राज्य शासनाचा अतिरिक्त निधी रू. २.०० लक्ष नगरपंचायतीकडे उपलब्ध आहे. केंद्र शासनाचा निधी फक्त रू. ०.३० लक्ष मुदखेड नगरपंचायतीस देणे आहे. या कामासाठी TPQMA द्वारे पाहणी करण्यात आलेल्या तिसऱ्या टप्प्याचे ATR अद्याप मुदखेड नगरपंचायतीकडून प्राप्त झालेले नाही. कारणास्तव, या योजनेसाठी निधी वितरण करणे आवश्यक नाही. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. मुदखेड नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व मुदखेड नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

तसेच, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत गोंडपिंपरी (जि. चंद्रपूर) येथे खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आल्या आहेत-

अ. क्र.	योजनेचे नांव	घटक	मुळ मंजूर घरकुल संख्या	सुधारीत घरकुल संख्या	पुर्ण झालेल्या घरकुल संख्या
1	Construction of 183 to 159 EWS DUs at Gondpimpari Nagar Panchayat, Dist. Chandrapur	BLC	159	131	129
2	Construction of 117 EWS DUs at Gondpimpari Nagar Panchayat, Dist. Chandrapur	BLC	117	98	81

वरील योजनांसाठी अनुज्ञेय निधी, वितरीत करण्यात आलेला निधी, वापरण्यात आलेल्या व शिल्लक निधी बाबतचा सविस्तर तक्ता परिशिष्ट 'क' येथे सोबत जोडण्यात येत आहे.

वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर येथील मुळ १५९ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. २१७.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर १३१ एवढी झाली. त्यापैकी प्रगतीपथावर असलेल्या १२९ घरकुलांपैकी १२७ घरकुले पूर्ण झाली आहेत. गोंडपिंपरी नगरपंचायतीकडे राज्य शासनाचा अतिरिक्त निधी रू. २.२० लक्ष उपलब्ध आहे. केंद्र शासनाचा निधी २.४० लक्ष देणे बाकी आहे. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यावर गोंडपिंपरी नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे मुळ ११७ घरकुलांच्या प्रकल्पासाठी राज्य शासनाचा निधी रु. १०७.०० लक्ष एवढा वितरीत करण्यात आला होता. परंतु, घरकुलांची संख्या सुधारीत झाल्यानंतर ८१ एवढी झाली. त्यापैकी ७६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे दिसून येते. या योजनेसाठी राज्य शासनाचा निधी रू. १.०० लक्ष व केंद्र शासनाचा निधी रू. ९.०० लक्ष देणे बाकी आहे. घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यावर गोंडपिंपरी नगरपंचायतीकडून उर्वरित निधीची मागणी झाल्यानंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

वरील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार अर्धापूर नगरपंचायत, मुदखेड नगरपंचायत व गोंडपिंपरी नगरपंचायत यांना मुळ घरकुलांच्या संख्येनुसार राज्यशासन व केंद्र शासनाचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. परंतु, सदर अंमलबजावणी यंत्रणांद्वारे त्यांच्या प्रकल्पातील मुळ घरकुलांची संख्या सुधारीत होवुन एकदमच कमी झाल्याने त्यांना अधिकचा निधी वितरण झाल्याचे निदर्शनास येते. काही लाभार्थ्यांच्या घरकुलांचे बांधकाम अद्यापही सुरु असुन त्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांनी निधी वितरीत केल्याचे दिसुन येते. परंतु, अद्यापपर्यंत सदर अंमलबजावणी यंत्रणांनी पुर्ण केलेल्या घरकुलांसाठी पूर्वत्वाचे दाखले सादर केलेले नाहीत.

वर नमूद केल्यानुसार अर्धापूर नगरपंयायत, मुदखेड नगरपंयायत व गोंडपिंपरी नगरपंचायत यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ (Reconciliation of Funds) घालण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व या अंमलबजावणी यंत्रणांद्वारे निधीची मागणी झाल्यावर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणेस देय असलेला निधी वितरण करणे शक्य होईल.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

Annexure 'A'

Fund Released Status as per MIS Compliances for Ardhapur Municipal council, Dist-Nanded
(Amt in Lakhs)

Sr.No	Project Name	Original Ews	Revised DUs as per 53rd SLAC	Grounded Houses	Completed Houses	Eligible Fund				Fund Allocated to ULB		Fund Utilised By ULB		Fund to be Released / Recovered		Remark
						State	Central as per Grounded	Central as per Completed	Total Central fund	State	Central	State	Central	State	Central	
1	2	3	4	5	6	7 (5X1.0)	8 (5 X 1.20)	9 (6 X 0.30)	10 (8+9)	11	12	13	14	15 (7-13)	16 (10-14)	17
1	Revised BLC project for construction of 714 to 405 EWS houses at Ardhapur Nagar Panchayat Distt, Nanded, Maharashtra	714	367	367	272	367.0	440.4	81.60	522.00	714.00	424.20	367.00	514.20	0.00	7.80	
2	Revised BLC project for construction of 784 to 425 EWS houses at Ardhapur Nagar PanchyatDistt. Nanded, Maharashtra	784	337	337	231	337.0	404.4	69.30	473.70	771.00	470.40	335.20	451.50	1.80	22.20	
Total		1498	704	704	503	704	844.8	150.90	995.70	1485.00	894.60	702.20	965.70	1.80	30.00	

335

Annexure 'B'

Fund Released Status as per MIS Compliances for Mudkhed Municipal council, Dist-Nanded

(Amt in Lakhs)

Sr.No	Project Name	Original DUs	Revised DUs as per 53rd SLAC	Grounded Houses	Completed Houses	Eligible Fund				Fund Allocated to ULB		Fund Utilised By ULB		Fund to be Released / Recovered		Remarks
						State	Central as per Grounded	Central as per Completed	Total Central fund	State	Central	State	Central	State	Central	
1	2	3	4	5	6	7 (5 X 1.0)	8 (5 X 1.20)	9 (6 X 0.30)	10 (8+9)	11	12	13	14	15 (7-13)	16 (10-14)	17
1	Construction of 113 EWS Dus under BLC at various places in MUDKHED MUNICIPAL COUNCIL, Dist-Nanded	113	68	65	0	65.00	78.00	0.00	78.00	113.00	68.00	68.00	100.20	-3.00	-22.20	The ULB has utilized fund for more DUs than the completed DUs. Hence, there is excess fund available with ULB. For second and third inspection by TPQMA, the ATR are not yet submitted by ULB.
2	BLC project for construction of 521 EWS houses at MUDKHED MUNICIPAL COUNCIL, Dist-Nanded	521	274	268	212	268.00	321.60	63.60	385.20	521.00	115.80	274.00	385.20	-6.00	0.00	The ULB has utilized fund for more DUs than the completed DUs. Hence, there is excess fund available with ULB. For third inspection by TPQMA, the ATR are not yet submitted by ULB.
3	Construction of 193 EWS Dus under BLC at various places in MUDKHED MUNICIPAL COUNCIL, Dist-Nanded	193	86	82	64	82.00	98.40	19.20	117.60	193.00	312.60	84.00	117.30	-2.00	0.30	The ULB has utilized fund for more DUs than the completed DUs. Hence, there is excess fund available with ULB. For third inspection by TPQMA, the ATR are not yet submitted by ULB.
Total		827	428	415	276	415.00	498.00	82.80	580.80	827.00	496.40	426.00	602.70	-11.00	-21.90	

Annexure 'C'

Fund Released Status as per MIS Compliances for Gondpimpari Nagar Panchayat, Dist- Chandrapur
(Amt In Lakhs)

Sr.No	Project Name	Original Ews	Revised DUs as per 53rd SLAC	Grounded Houses	Completed Houses	Eligible Fund				Fund Allocated to ULB		Fund Utilised By ULB		Fund to be Released / Recovered		Remark
						State	Central as per Grounded	Central as per Completed	Total Central fund	State	Central	State	Central	State	Central	
1	2	3	4	5	6	7 (5x1.0)	8 (5 x 1.2)	9 (6 x 0.30)	10 (8+9)	11	12	13	14	15 (7-13)	16 (10-14)	17
I	Revised BLC project for construction of 183 to 159 EWS houses at Gondpipri Nagar PanchyatDistt. Chandrapur, Maharashtra	159	131	129	127	129	154.80	38.10	192.90	217.00	145.10	131.20	190.50	-2.20	2.40	
2	Construction of 117 EWS Tenements BLC at Gondpimpri Nagar Panchayat Dist. Chandrapur	117	81	81	76	81	97.20	22.80	120.00	107.00	117.20	80.00	111.00	1.0	9.00	
Total		276	212	210	203	210.00	252.00	60.90	312.90	324.00	262.30	211.20	301.50	-1.20	11.40	

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

कार्यकारी अभियंता-२/प्रधानमंत्री आवास योजना यांचे कार्यालय

खोली क्र.५७२, ४था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई - ५१.

म्हाडा MHADA

विधानसभा अतारांकित प्रश्न
प्राधान्य

जा.क्र.एमएच/मुअ२/काअ२/प्रआयो/प्रा./ /२६.
दिनांक. /०७/२०२६.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ४८२१
श्री. किसन कथोरे मा. विधानसभा सदस्य
पंतप्रधान आवास योजना व शेतकरी कृषी सन्मान योजनेबाबत

संदर्भ: कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र जा.क्र. विसअता-२०२५/प्र.क्र.१४८/गृनिधो-२ दि. १६/०७/२०२६

महोदय,

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र क्र. जा.क्र. विसअता-२०२५/प्र.क्र.१४८/गृनिधो-२ दि. १६/०७/२०२६ मध्ये संदर्भांकित केलेले पत्र दि. ०२/०७/२०२५ व २८/०४/२०२६ हे या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

या कार्यालयाद्वारे शेतकरी कृषी सन्मान योजनेचे तसेच प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) कामकाज पाहिले जात नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) संदर्भात सुकाणू अभिकरण (म्हाडा) यांचे अभिप्राय व पुरक टिप्पणी सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

सोबत: वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष व मु.का.अ./प्रा. तथा
अभियान संचालक /प्र.आ.यो. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

मुख्य अभियंता-२/प्रा. तथा
राज्य स्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

प्रत: **मुख्य अभियंता-१/प्राधिकरण** यांना माहितीकरीता व पुढील योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत: **कार्यासन अधिकारी/गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२**, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांना माहितीसाठी.

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ४८२१

श्री. किसन कथोरे मा. विधानसभा सदस्य

पंतप्रधान आवास योजना व शेतकरी कृषी सन्मान योजनेबाबत

अ. क्र.	प्रश्नाचा तपशील	सुकाणू अभिकरण (म्हाडा) चे अभिप्राय
१.	राज्यात पंतप्रधान आवास व शेतकरी कृषी सन्मान योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?	हे खरे नाही. या कार्यालयाद्वारे शेतकरी कृषी सन्मान योजनेचे तसेच प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) कामकाज पाहिले जात नाही. केंद्र शासनाद्वारे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राज्यात राबविण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची (MHADA) नेमणूक राज्य शासनाद्वारे सुकाणू अभिकरण म्हणून करण्यात आली आहे. सदर योजनेचे अनुदान हे म्हाडाद्वारे घरकुलांच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडे वर्ग करण्यात येते. त्यानंतर ही अनुदान रक्कम अंमलबजावणी यंत्रणेद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात उपलब्ध करुन दिली जाते. दि. ०४/०५/२०२६ रोजीच्या 44व्या SLSMC च्या अनुषंगाने मंजूर असलेल्या राज्यातील एकूण ३,८४,७८८ घरकुलांसाठी केंद्र शासनाचा अनुदान निधी रु. ४६५७.९४ कोटी व राज्य शासनाचा अनुदान निधी रु. ३२८३.८७ कोटी असा एकूण निधी रु. ७९४१.८१ कोटी अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. ज्या अंमलबजावणी यंत्रणांकडून निधीची मागणी केली जाते, त्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा नाही याची पडताळणी केल्यानंतरच निधी वितरणाची कार्यवाही पूर्ण होते. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

२.	असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजने अंतर्गत प्रलंबित असलेले अनुदान नागरिकांना उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना करण्यात येत आहे.	प्रश्न उद्भवत नाही. राज्यातील ३६६ अंमलबजावणी यंत्रणांना आतापर्यंत वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ घालण्याची प्रक्रिया सुकाणू अभिकरण (म्हाडा) द्वारे करण्याचे काम सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच ज्या अंमलबजावणी यंत्रणांना निधी देणे बाकी असेल ते त्यांना वितरीत करण्याची कार्यवाही करणे शक्य होईल.
३.	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?	लागू नाही.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना(शहरी)

पुरक टिप्पणी

विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ४८२१

श्री. किसन कथोरे मा. विधानसभा सदस्य

पंतप्रधान आवास योजना व शेतकरी कृषी सन्मान योजनेबाबत

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२ यांचे पत्र क्र. जा.क्र. विसअता-२०२५/प्र.क्र.१४८/गृनिधो-२ दि. १६/०७/२०२६ मध्ये संदर्भांकित केलेले पत्र दि. ०२/०७/२०२५ व २८/०४/२०२६ हे या कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

या कार्यालयाद्वारे शेतकरी कृषी सन्मान योजनेचे तसेच प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) कामकाज पाहिले जात नाही.

केंद्र शासनाद्वारे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) राज्यात राबविण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची (MHADA) नेमणूक राज्य शासनाद्वारे सुकाणू अभिकरण म्हणून करण्यात आली आहे.

सदर योजनेचे अनुदान हे म्हाडाद्वारे घरकुलांच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार संबंधित अंमलबजावणी यंत्रणेकडे वर्ग करण्यात येते. त्यानंतर ही अनुदान रक्कम अंमलबजावणी यंत्रणेद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात उपलब्ध करुन दिली जाते.

दि. ०४/०५/२०२६ रोजीच्या 44व्या SLSMC च्या अनुषंगाने मंजूर असलेल्या राज्यातील एकूण ३,८४,७८८ घरकुलांसाठी केंद्र शासनाचा अनुदान निधी रु. ४६५७.९४ कोटी व राज्य शासनाचा अनुदान निधी रु. ३२८३.८७ कोटी असा एकूण निधी रु. ७९४१.८१ कोटी अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे.

ज्या अंमलबजावणी यंत्रणांकडून निधीची मागणी केली जाते, त्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा नाही याची पडताळणी केल्यानंतरच निधी वितरणाची कार्यवाही पूर्ण होते. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतरच निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील ३६६ अंमलबजावणी यंत्रणांना आतापर्यंत वितरीत करण्यात आलेल्या निधीचे ताळमेळ घालण्याची प्रक्रिया सुकाणू अभिकरण (म्हाडा) द्वारे करण्याचे काम सुरू आहे. हि प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच ज्या अंमलबजावणी यंत्रणांना निधी देणे बाकी असेल ते त्यांना वितरीत करण्याची कार्यवाही करणे शक्य होईल.

मुख्य अभियंता-२/प्रा.तथा
राज्यस्तरीय समन्वय अधिकारी
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

पुणे मंडळ

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
PUNE HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A UNIT OF MHADA)

म्हाडा MHADA

गृहनिर्माण भवन, आगरकरनगर, पुणे – ४११००१.
दूरध्वनी : २६१२८८५६, २६१२६३८१, २६१२८८६८, २६१२८०८२, फॅक्स : २६१२३६१४

Speed Post

ना.क्र./पु.मं./मु.अ./ /२०२६
दि. e-9661410
Dt. 25/08/2026

प्रति,

श्री.प्र.ना.ढवळे,
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
मुख्य इमारत, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय :- भांबुर्डा, पुणे येथील जिव्हाळा सहकारी गृहनिर्माण संस्थेला वितरीत केलेल्या जादा एफ.एस.आय. बाबत.....

श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स. यांनी विधानपरिषदेमध्ये उपस्थित केलेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ९६८६.

संदर्भ :- १). कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्राधिकरण यांना अग्रेषित पत्र क्र. विसअताप्र-२०२६/प्र.क्र.१२०/गृनिभृ दि. ११/०८/२०२६ रोजीचे पत्र.

२).कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्राधिकरण यांना अग्रेषित पत्र क्र. विसअताप्र-२०२६/प्र.क्र.९४/गृनिभृ दि. २१/०८/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स. यांनी विधानपरिषदेमध्ये विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ९६८६ उपस्थित केलेला आहे. त्याबाबतचा अहवाल सोबतच्या प्रपत्रामध्ये पुरक टिप्पणीसह पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

सोबत :- वरील प्रमाणे.

(राहुल साकोरे)
मुख्य अधिकारी
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
पुणे.

प्रत :- मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू) मुंबई - ४०० ०५१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

पुरक टिप्पणी

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ९६८६

भांबुर्डा, पुणे येथील जिव्हाळा सहकारी गृहनिर्माण संस्थेला वितरीत केलेल्या जादा एफ.एस.आय. बाबत.....

- **श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स.यांनी विधानपरिषदेमध्ये उपस्थित केलेला विधानसभा अतारांकित प्रश्न क्र, ९६८६.**

स.नं. ९८, ९९, भांबुर्डा, गोखलेनगर, पुणे येथील ३००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड हा मंत्रीमंडळ उपसमिती, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या १८ वी बैठक दि. १६/०७/२०२२ नुसार श्री. उत्तमराव भोईटे, मुख्य प्रवर्तक, जिव्हाळा को-ऑप हौसिंग सोसायटी यांना अटी व शर्तींस अधिन राहून वाटप केला आहे व त्याबाबत अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सदरचा भुखंड हा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मधील विनियम १६ अंतर्गत जिव्हाळा को-ऑप. सोसायटी यांना वाटप केले असलेबाबत दि. ०६/०१/२००३ रोजी मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना कळविले आहे.

त्यानुसार सदर भुखंड हा गोखलेनगर, पुणे या म्हाडाच्या अभिन्यासाचा भाग असून जिव्हाळ को-ऑप. हौसिंग सोसायटीचा भुखंड म्हाडाच्या मालकीचा आहे. सदर भुखंड हा शासन निर्णयानुसार संस्थेस भाडेपट्टा करारनाम्याद्वारे ३० वर्षांकरीता वितरीत केलेला आहे. संस्थेने भुखंडाच्या विकसनाकरीता विकसक मे. असेंन्ट लॅण्डमार्क्स एल.एल.पी. यांची नेमणुक करुन बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता त्याबाबतचा प्रस्ताव पुणे मंडळाकडे सादर केला होता. त्यानुसार प्राधिकरणाची मंजुरी प्राप्त केल्यानंतर सदर भुखंडावरील बांधकामाकरीता UDCPR-२०२० मधील विनियम ७.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ३.०० च.क्षे.नि. नुसार अधिमुल्याची आकारणी केल्यानंतर देकारपत्र व ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी दक्षता व सुरक्षा विभाग, म्हाडा, मुंबई यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडे एफ.एस.आय. चे उल्लंघन झाल्याने फौजदारी तक्रार दाखल केली असून संबंधीत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झालेला आहे व त्यानुसार अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे कार्यालयामार्फत तपासकामी कार्यवाही चालू आहे.

(राहुल साकोरे)
मुख्य अधिकारी
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
पुणे.

विषय :- विधानसभा अतारांकित प्रश्न क्र. ९६८६

भांबुर्डा, पुणे येथील जिव्हाळा सहकारी गृहनिर्माण संस्थेला वितरीत केलेल्या जादा एफ.एस.आय. बाबत.....
श्री. प्रविण दरेकर व इतर, मा.वि.प.स.

संदर्भ : १) कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांना अग्रेषित पत्र क्र. विसअताप्र-२०२६/प्र.क्र.१२०/गृनिभू दि. ११/०८/२०२६ रोजीचे पत्र.
२) कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्राधिकरण यांना अग्रेषित पत्र क्र. विसअताप्र-२०२६/प्र.क्र.९४/गृनिभू दि. २१/०८/२०२६ रोजीचे पत्र.

उपरोल्लेखित संदर्भाधिन अतारांकित प्रश्न क्र. ९६८६ अन्वये उपस्थित केलेल्या सुचनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तपशील सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	उपस्थित केलेले प्रश्न	अभिप्राय
१	भाबुर्डा, पुणे येथील जिव्हाळा सहकारी गृहनिर्माण संस्थेला वितरीत केलेल्या जादा एफ.एस.आय. बाबत तत्कालिन मुख्य अधिकारी, मुख्य वास्तुरचनाकार व अन्य सहा अधिकाऱ्यांना निलंबित करुन गृहनिर्माण विभागाकडून चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय?	होय. सदर प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झाल्याने चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे.
२	असल्यास, या प्रकरणाची खातेनिहाय चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश शासनाने दिले असून त्या अनुषंगाने संबंधीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे.	सदर प्रकरणी दक्षता व सुरक्षा विभाग, म्हाडा, मुंबई यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्याकडे फौजदारी तक्रार दाखल केली असून संबंधीत अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झालेला आहे व त्यानुसार अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे कार्यालयामार्फत तपासकामी कार्यवाही चालू आहे.
३	नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?	सदर प्रकरणी चौकशी चालू असून त्याबाबतचा अहवाल सदर पुरक टिप्पणीसोबत जोडण्यात आलेला आहे.

वरील प्रमाणे अहवाल आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

(राहुल साकोरे)
मुख्य अधिकारी
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
पुणे.

विधानपरिषद

लक्षवेधी

सूचना

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५,
श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य.
विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६,
श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य.
.....मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांसाठी मुंबईतच घरे उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६ प्र.क्र.१६८/ गृनिधो-२, दि.३०.०६.२०२६

महोदय,

श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५ व श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६ या कार्यालयास संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

सदर विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५ व ३३६च्या अनुषंगाने, अभिप्राय सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:20:48
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR(M)-I/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 02/07/2026 12:43 PM

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५,श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य.
विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६,श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य.
.....मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांसाठी मुंबईतच घरे उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६
प्र.क्र.१६८/ गृनिधो-२, दि.३०.०६.२०२६

लक्षवेधी सूचना क्रमांकः १८५

श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, अॅड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. योगेश टिळेकर, श्री. अमित गोरखे वि.प.स.

गिरणी कामगारांसाठी वांगणी व सेलू येथे ८१ हजार घरे बांधली जाणार असून या घरांच्या बांधकामासाठीचे कंत्राट दोन स्वतंत्र खाजगी विकासकांना देण्यात आले असणे, त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात घरकुले निर्माण होणार असणे, सदर घरे निर्माण करत असताना गिरणी कामगारांना किमान ५०० चौरस फुटाची घरे देण्यात यावी आणि या घरांची किमती किमान सहा लाख रुपये पर्यंत ठेवण्यात याव्यात, अन्य मागण्या गिरणी कामगारांकडून शासनाला केल्या जात असणे, त्याचबरोबर येथील घरे प्रकल्प मुंबई पासून खूप दूर असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा दावा करत या प्रकल्पांना या कामगारांनी विरोध करीत सर्व कामगारांना मुंबईतच घरे देण्याची मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

लक्षवेधी सूचना क्रमांकः ३३६

श्रीमती उमा खापरे वि.प.स.

गिरणी कामगारांसाठी वांगणी व सेलू येथे 81 हजार घरे बांधली जाणार असून या घरांच्या बांधकामासाठीचे कंत्राट दोन स्वतंत्र खाजगी विकासकांना देण्यात आले असणे, त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात घरकुले निर्माण होणार असणे, सदर घरे निर्माण करत असताना गिरणी कामगारांना किमान 500 चौरस फुटाची घरे देण्यात यावी आणि या घरांची किमती किमान सहा लाख रुपये पर्यंत ठेवण्यात याव्यात या व अन्य मागण्या गिरणी कामगारांकडून शासनाला केल्या जात असणे, त्याचबरोबर येथील घरे प्रकल्प मुंबई पासून खूप दूर असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा दावा करत या प्रकल्पांना या कामगारांनी विरोध करीत सर्व कामगारांना मुंबईतच घरे देण्याची मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

अभिप्राय :

मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दिनांक १५/०३/२०२४ पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयानुसार, मुंबईमधील बंद पडलेल्या गिरण्यांमधील ज्या गिरणी कामगारांची / त्याच्या वारसाची पात्रता निश्चित झाली आहे, अशा गिरणी कामगारांना/ त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये खालील ३ प्रतिकृतीद्वारे घरे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रतिकृती क्र.१) : गिरणी कामगारांच्या घरांसाठी ठाणे जिल्हयात शासकीय जमीन उपलब्ध करुन त्यावर घरकुले बांधणे.

प्रतिकृती क्र.२) : प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये खाजगी जमीनीवरील मंजूर अभिन्यासांना जमीन मालकासोबत संयुक्त भागीदारी (Joint Venture) द्वारे घरांची निर्मिती करणे.

प्रतिकृती क्र.३) : प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकांकडील मंजूर अभिन्यासवर घरबांधणी.

प्रतिकृती क्र.३ च्या अनुषंगाने, शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार, गिरणी कामगारांना सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकाच्या निवडीसाठी दि.०३/०७/२०२४ रोजी ईओआय प्रसिध्द करुन, त्यानुसार कर्मयोगी एव्हीपी रिअलटर्स एलएलपी व छड्डा डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स या दोन निविदाकारांच्या प्राप्त प्रस्तावांस, शक्तीप्रदत्त समितीने दि.०९/१०/२०२४ रोजीच्या ५ व्या बैठकीत मान्यता देऊन, सदर निविदाकारांना दि. १४/१०/२०२४ रोजी शासन हेतू पत्र (LOI) देण्यात आल्याचे, शासनाचे पत्र क्र. गिकाघ/२०२४/प्र.क्र.१०९/गृनिधो–२, दि. १६/१०/२०२४ अन्वये, कळविण्यात आले आहे.

तदनंतर मा. मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४ मे, २०२६ रोजी मुख्य सचिव यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई येथे गिरणी कामगारांच्या घरकुलांसाठी नियुक्त शक्तीप्रदत्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR(N.L.S)MHADA, MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/03/2026 12:17 PM

सदर बैठकीचं इतिवृत्त उप सचिव तथा सदस्य सचिव यांनी पत्र क्र.गिकाघ २०२४/ प्र.क्र.४४/गृनिघो-२ दि.१४/०५/२०२६ कळविले असून सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार शक्तीप्रदत्त समितीने चड्ढा डेव्हलपर्स अॅण्ड प्रमोटर्स यांना ८०५२ घरकुलांसाठी (मंजूर अभिन्यासानुसार अंदाजे १६ इमारती) व कर्मयोगी एव्हीपी रिअॅलिटी एलएलपी यांना ३७७० घरकुलांसाठी (मंजूर अभिन्यासानुसार अंदाजे २०७० घरकुले व ई- सहमतीसह) यांना कार्यादेश देण्यास संमती देण्यात आली आहे.त्यास अनुसरून उप सचिव/गृहनिर्माण विभाग यांचेमार्फत चड्ढा डेव्हलपर्स अॅण्ड प्रमोटर्स यांना पत्र क्र.GiKaGh-2024/C.R.44/GND-2 दि.१५/०५/२०२६ व कर्मयोगी एव्हीपी रिअॅलिटी एलएलपी यांना पत्र क्र. GiKaGh-2024/C.R.44/GND-2 दि.१५/०५/२०२६ कार्यादेश देण्यात आलेले आहेत.सदर प्रकल्पाद्वारे गिरणी कामगारांना ३०७ चौ.फू. चटई क्षेत्राचे घरे मिळणार आहेत.

सदर लक्षवेधी मधील इतर मुद्दे राज्य शासनाशी संबंधीत असल्याने, सदरबाबत म्हाडाचा अभिप्राय निरंक आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:21:27

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NLSM/HADA, MHADA, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:47 PM

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५,
श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य.
विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६,
श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य.
.....मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांसाठी मुंबईतच घरे उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६ प्र.क्र.१६८/ गृनिधो-२, दि.३०.०६.२०२६

महोदय,

श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५ व श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६ या कार्यालयास संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

सदर विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५ व ३३६च्या अनुषंगाने, अभिप्राय सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:20:18
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGG(N)SIMHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 02/07/2026 12:42 PM

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१८५,श्री.प्रवीण दरेकर व इतर मा.विधानपरिषद सदस्य.
विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.३३६,श्रीमती उमा खापरे, मा.विधानपरिषद सदस्य.
.....मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांसाठी मुंबईतच घरे उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६
प्र.क्र.१६८/ गृनिधो-२, दि.३०.०६.२०२६

लक्षवेधी सूचना क्रमांकः १८५

श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, अॅड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. योगेश टिळेकर, श्री. अमित गोरखे वि.प.स.

गिरणी कामगारांसाठी वांगणी व सेलू येथे ८१ हजार घरे बांधली जाणार असून या घरांच्या बांधकामासाठीचे कंत्राट दोन स्वतंत्र खाजगी विकासकांना देण्यात आले असणे, त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात घरकुले निर्माण होणार असणे, सदर घरे निर्माण करत असताना गिरणी कामगारांना किमान ५०० चौरस फुटाची घरे देण्यात यावी आणि या घरांची किमती किमान सहा लाख रुपये पर्यंत ठेवण्यात याव्यात, अन्य मागण्या गिरणी कामगारांकडून शासनाला केल्या जात असणे, त्याचबरोबर येथील घरे प्रकल्प मुंबई पासून खूप दूर असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा दावा करत या प्रकल्पांना या कामगारांनी विरोध करीत सर्व कामगारांना मुंबईतच घरे देण्याची मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

लक्षवेधी सूचना क्रमांकः३३६

श्रीमती उमा खापरे वि.प.स.

गिरणी कामगारांसाठी वांगणी व सेलू येथे 81 हजार घरे बांधली जाणार असून या घरांच्या बांधकामासाठीचे कंत्राट दोन स्वतंत्र खाजगी विकासकांना देण्यात आले असणे, त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात घरकुले निर्माण होणार असणे, सदर घरे निर्माण करत असताना गिरणी कामगारांना किमान 500 चौरस फुटाची घरे देण्यात यावी आणि या घरांची किमती किमान सहा लाख रुपये पर्यंत ठेवण्यात याव्यात या व अन्य मागण्या गिरणी कामगारांकडून शासनाला केल्या जात असणे, त्याचबरोबर येथील घरे प्रकल्प मुंबई पासून खूप दूर असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा दावा करत या प्रकल्पांना या कामगारांनी विरोध करीत सर्व कामगारांना मुंबईतच घरे देण्याची मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

अभिप्राय :

मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत, शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र. गिकाघ-२०२३/प्र.क्र.१२८/गृनिधो-२, दिनांक १५/०३/२०२४ पारित झालेला आहे. सदर शासन निर्णयानुसार, मुंबईमधील बंद पडलेल्या गिरण्यांमधील ज्या गिरणी कामगारांची / त्याच्या वारसाची पात्रता निश्चित झाली आहे, अशा गिरणी कामगारांना/ त्यांच्या वारसांना मुंबई महानगर क्षेत्रामध्ये खालील ३ प्रतिकृतीद्वारे घरे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रतिकृती क्र.१) : गिरणी कामगारांच्या घरांसाठी ठाणे जिल्हयात शासकीय जमीन उपलब्ध करुन त्यावर घरकुले बांधणे.

प्रतिकृती क्र.२) : प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये खाजगी जमीनीवरील मंजूर अभिन्यासांना जमीन मालकासोबत संयुक्त भागीदारी (Joint Venture) द्वारे घरांची निर्मिती करणे.

प्रतिकृती क्र.३) : प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खाजगी विकासकांकडील मंजूर अभिन्यासवर घरबांधणी.

प्रतिकृती क्र.३ च्या अनुषंगाने, शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेनुसार, गिरणी कामगारांना सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकाच्या निवडीसाठी दि.०३/०७/२०२४ रोजी ईओआय प्रसिध्द करुन, त्यानुसार कर्मयोगी एव्हीपी रिअलटर्स एलएलपी व छड्डा डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स या दोन निविदाकारांच्या प्राप्त प्रस्तावांस, शक्तीप्रदत्त समितीने दि.०९/१०/२०२४ रोजीच्या ५ व्या बैठकीत मान्यता देऊन, सदर निविदाकारांना दि. १४/१०/२०२४ रोजी शासन हेतू पत्र (LOI) देण्यात आल्याचे, शासनाचे पत्र क्र. गिकाघ/२०२४/प्र.क्र.१०९/गृनिधो–२, दि. १६/१०/२०२४ अन्वये, कळविण्यात आले आहे.

तदनंतर मा. मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४ मे, २०२६ रोजी मुख्य सचिव यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई येथे गिरणी कामगारांच्या घरकुलांसाठी नियुक्त शक्तीप्रदत्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX ENGR/NI&SMHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:17 PM

सदर बैठकीचे इतिवृत्त उप सचिव तथा सदस्य सचिव यांनी पत्र क्र.गिकाघ २०२४/ प्र.क्र.४४/गृनिघो-२ दि.१४/०५/२०२६ कळविले असून सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार शक्तीप्रदत्त समितीने चड्ढा डेव्हलपर्स अॅण्ड प्रमोटर्स यांना ८०५२ घरकुलांसाठी (मंजूर अभिन्यासानुसार अंदाजे १६ इमारती) व कर्मयोगी एव्हीपी रिअॅलिटी एलएलपी यांना ३७७० घरकुलांसाठी (मंजूर अभिन्यासानुसार अंदाजे २०७० घरकुले व ई- सहमतीसह) यांना कार्यादेश देण्यास संमती देण्यात आली आहे.त्यास अनुसरून उप सचिव/गृहनिर्माण विभाग यांचेमार्फत चड्ढा डेव्हलपर्स अॅण्ड प्रमोटर्स यांना पत्र क्र.GiKaGh-2024/C.R.44/GND-2 दि.१५/०५/२०२६ व कर्मयोगी एव्हीपी रिअॅलिटी एलएलपी यांना पत्र क्र. GiKaGh-2024/C.R.44/GND-2 दि.१५/०५/२०२६ कार्यादेश देण्यात आलेले आहेत.सदर प्रकल्पाद्वारे गिरणी कामगारांना ३०७ चौ.फू. चटई क्षेत्राचे घरे मिळणार आहेत.

सदर लक्षवेधी मधील इतर मुद्दे राज्य शासनाशी संबंधीत असल्याने, सदरबाबत म्हाडाचा अभिप्राय निरंक आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:21:29

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD012/2728/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3307664)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NLS/MHADA MHADP, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:47 PM

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१७२
मुंबईतील गिरणगाव इतिहासाचे साक्षीदार असलेल्या वरळीतील सेंचुरी मिलच्या कामगारांना.....
श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. योगेश टिळेकर, श्री. अमित गोरखे, मा. वि.प.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६ गृनिधो- २, दि.२९.०६.२०२६

महोदय,

श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. योगेश टिळेकर, श्री. अमित गोरखे, मा. वि.प.स. यांनी उपस्थित केलेली विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१७२ या कार्यालयास संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

सदर विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१७२ च्या अनुषंगाने, अभिप्राय सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:22:30

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD011/491/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3304208)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, SY ENGR/NLS/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:53 PM

अभिप्राय :

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१७२

मुंबईतील गिरणगाव इतिहासाचे साक्षीदार असलेल्या वरळीतील सेंचुरी मिलच्या कामगारांना.....

श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री. योगेश टिळेकर, श्री. अमित गोरखे, मा. वि.प.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू-२०२६ प्र.क्र.१६५/ गृनिधो-२, दि.२९.०६.२०२६

विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र.१७२ :

"मुंबईतील गिरणगाव इतिहासाचे साक्षीदार असलेल्या वरळीतील सेंचुरी मिलच्या कामगारांना अठरा वर्षाच्या न्यायालयीन झाल्या नंतर पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झालेला असणे, येथील मोडकळीस आलेल्या १८० चौरस फुटाच्या खोल्यांमध्ये राहणाऱ्या ६५० असून अधिक कामगार कुटुंबांना हक्काचे आणि हवेचे घर मिळण्याची आशा पल्लवीत झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेने २१ जुन्या इमारतीच्या भूखंडाचा पुनर्विकास करण्यासाठी पेडर रियल्टी या विकासकाची निवड अंतिम केलेली असणे, या प्रकल्पांतर्गत विद्यमान सर्व कामगार कुटुंबांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन केले जाणार असून त्यांना आधुनिक नागरी सुविधा पुरविल्या जाणार असून सन १९२७ मध्ये मुंबई महानगरपालिकेने हा भूखंड बॉम्बे इम्प्रूमेंट ट्रस्ट ट्रान्सपोर्ट अंतर्गत सेंचुरी स्पेलिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला नाममात्र भाडेतत्त्वावर दिला होता, सन २००६ मध्ये मिल बंद पडल्यावर कंपनीने कामगारांना निष्कासनाच्या नोटीसा पाठवल्या होत्या ज्याला महानगरपालिकेने मा. न्यायालयात आव्हान दिले असणे, अखेर मा. सर्वोच्च न्यायालयाने महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय दिल्याने या जुन्या इमारतीच्या जागी गगनचुंबी इमारती उभारले जाणार असणे, या कामगारांना आता ४०० चौरस फुटाचे हक्काची सदनिका मिळणार असून सुमारे ५०० सदनिका कामगारांसाठी राखीव ठेवण्यात आल्या असणे व उर्वरित सदनिका खुल्या बाजारात विक्री करण्यात येणार असणे, याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यभरातील सर्वच गिरणी कामगारांना अशा प्रकारची घरे त्याच संकुलात निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे. यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

File No. MHADA-MHAD011/491/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3304208)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/ELE/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:52 PM

अभिप्राय :

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५११६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांपैकी, ३७ गिरण्यांच्या पुनर्विकासास मंजुरी प्राप्त आहे. ११ गिरण्यांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त नसल्यामुळे जमिनीमधील म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही व १० गिरण्यांमध्ये नविन डी. सी. आर. नुसार म्हाडाचा वाटा निरंक आहे.

म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांपैकी ३३ गिरण्यांच्या १३.७८ हेक्टर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा म्हाडास प्राप्त आहे. ४ गिरण्यांच्या जमिनीचा म्हाडास प्रत्यक्ष ताबा प्राप्त झालेला नाही. ३३ गिरण्यांपैकी २६ गिरण्यांच्या जमिनीवर म्हाडाकडून ३ टप्प्यात १३,४५३ गिरणी कामगार सदनिकांचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या १३,४५३ सदनिका तसेच, एम.एम.आर.डी.ए. च्या कोनगाव येथील २,४१७ रेंटल हौसिंग सदनिका, अशाप्रकारे एकूण १५,८७० सदनिकांची सोडत प्रक्रिया म्हाडामार्फत पूर्ण करण्यात आली असून, मुंबई मंडळाच्या गिरणी विभागामार्फत गिरणी कामगार/वारसांना सदनिका वितरण कार्यवाही सुरु आहे.

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५११६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, खाजगी मिल सदराखालील तक्त्यामधील अनु.क्र.१८ नुसार, सेंच्युरी स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल येथील जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अनु. क्र.	गिरणीचे नाव	सी.एस.क्र./डिव्हिजन/ वॉर्ड	म्हाडास हस्तांतरित करावयाचे प्रस्तावित जमिनीचे क्षेत्र. (चौ.मी.)	म्हाडास हस्तांतरित जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.)	शेरा
१८	अ) सेंच्युरी स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल	सी.एस.क्र.७९४, १५४५, १५४६ लोअर परेल डिव्हिजन आणि एफ.पी.नं. १२१२, १०८० टी.पी.एस. IV माहीम डिव्हिजन	१३,०९१.९०चौ.मी.	१३,०९१.९०चौ.मी.	
	ब) सेंच्युरी स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल (Leased Plot of Bombay Dying)		४,८८८.७८ चौ.मी.	०	Matter under litigation

File No. MHADA-MHAD011/491/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3304208)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR(M)S(MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/03/2026 12:52 PM

सेंच्युरी स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल येथील १३,०९१.९०चौ.मी. जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त झाला असून, सेंच्युरी स्पिनिंग अँड वेव्हिंग मिल (Leased Plot of Bombay Dying) येथील ४,८८८.७८ चौ.मी. क्षेत्रफळ जागेचा ताबा म्हाडास अद्याप अप्राप्त आहे.

म्हाडास प्राप्त १३,०९१.९०चौ.मी. जमिनीवर १,४३० गिरणी कामगार व ६९७ संक्रमण शिबीर सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाले असून, सन-२०१६ मध्ये सोडत काढण्यात येवून पात्र गिरणी कामगारांना सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे.

सदर लक्षवेधी मधील इतर मुद्दे बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधीत असल्याने, सदरबाबत म्हाडाचा अभिप्राय निरंक आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:23:36

मुख्य अधिकारी,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,

म्हाडा, मुंबई

File No. MHADA-MHAD011/491/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3304208)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NI/SWMHADA, MHADA, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:52 PM

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

जा.क्र.का.अ./शहर विभाग/मुं.मं./ /२०२६
दि.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः विधानपरिषद लक्षवेधी सूचना क्र. ५४७
मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद म्हाडा कॉलनी येथील जमिनीच्या प्रॉपर्टी कार्डवर अजूनही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे नाव असणे.
.....श्री. अमित देशमुख व श्री. रोहित पवार, मा.वि.स.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसु-२०२६/प्र.क्र.१७४/गृनिधो-२, दि.- ०६/०७/२०२६

महोदय,

श्री. अमित देशमुख व श्री. रोहित पवार, मा.वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५४७, कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

सदर अनुषंगाने, लक्षवेधी सूचना क्र. ५४७ करिता माहिती/अभिप्राय सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by Milind Nilkanth Borikar
Date: 09-07-2026 12:53:22

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2802/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3317270)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, SY ENGR/W/S/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 09/07/2026 02:16 PM

लक्षवेधी सूचना

विषयः लक्षवेधी सूचना क्र. ५४७
मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद म्हाडा कॉलनी येथील जमिनीच्या प्रॉपर्टी कार्डवर अजूनही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे नाव असणे.
.....श्री. अमित देशमुख व श्री. रोहित पवार, मा.वि.स.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसु-२०२६/ प्र.क्र.१७४/गृनिधो-२, दि.- ०६/०७/२०२६

"श्री. अमित देशमुख व श्री. रोहित पवार, मा.वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५४७ पुढीलप्रमाणे आहे.

मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद म्हाडा कॉलनी येथील जमिनीच्या प्रॉपर्टी कार्डवर अजूनही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे नाव असल्याने महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सदनिका हस्तांतर करण्यासाठी रहिवाश्यांना हेलपाटे मारावे लागत असल्याची बाब दिनांक १९ जून, २०२६ रोजी निदर्शनास येणे, त्यामुळे न्यू हिंद म्हाडा कॉलनीमधील सदनिकाधारकानी म्हाडाचे स्टँप ड्युटी, रजिस्ट्रेशन चार्जेस आणि ट्रान्सफर फी भरून देखील त्यांना त्यांची सदनिका नावावर होण्यात अडसर निर्माण झाला असणे, म्हाडाने या घोडपदेव येथील न्यू हिंद गिरणीच्या जागी पुनर्विकास करून गिरणी कामगारांना घरे बांधून दिली असणे, परंतु ही जागा जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या नावे असून शासनाने १९ वर्षांच्या लीजवर दिली असणे, सदरहू लीज सन २०१८ मध्ये संपुष्टात आली असून याची मालकी म्हाडाकडे हस्तांतरित झाली असणे, परंतु म्हाडाने अजूनही प्रॉपर्टी कार्डवर आपले नाव लावलेले नसणे, त्यामुळे सदनिका नावे करण्यासाठी सदनिकाधारकांना जिल्हाधिकारी यांची ना-हरकत घेण्यासाठी नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, त्यामुळे स्थानिक रहिवाश्यांत पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव सदरहू जमिनीची मालकी म्हाडाकडे हस्तांतरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया".

अभिप्राय :

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८ (१) (ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र याचे वाटप प्रत्येकी, १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, १/३ हिस्सा म्हाडा व १/३ हिस्सा गिरणी मालक यांना देण्याची तरतुद आहे. गिरणी मालकाने गिरणीच्या जागेचा नकाशा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केल्यानंतर महानगरपालिकेच्या इमारत परवानगी कक्षाकडून त्याची तपासणी केली जाते व त्यानुसार जमिनीचा वाटा निश्चित केला जातो. सदर प्रक्रीयेमध्ये म्हाडाचा कुठलाही हस्तक्षेप नसतो.

बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांमध्ये ३२ खासगी मिल, २५ एनटीसी मिल व १ एमएसटीसी मिलचा समावेश आहे.

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५१६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांपैकी, ३७ गिरण्यांच्या पुनर्विकासास मंजुरी प्राप्त आहे. ११ गिरण्यांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त नसल्यामुळे जमिनीमधील म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही व १० गिरण्यांमध्ये नविन डी. सी. आर. नुसार म्हाडाचा वाटा निरंक आहे.

सदरनुसार, अपोलो मिल, मुंबई मिल, ज्युपिटर मिल, एलफिन्स्टन मिल, कोहिनूर मिल नं.३, इंडिया युनायटेड मिल नं.२,३ व न्यू हिंद टेक्सटाईल मिल या आठ गिरण्यांचा म्हाडासाठीचा एकूण वाटा ३८,७६७.९९ चौ.मी. निश्चित झालेला आहे. त्यापैकी ३१,५०१.२चौ.मी. क्षेत्रफळ जमिनीचा ताबा न्यू हिंद मिल माझगाव येथे देण्यात आलेला आहे. उर्वरीत ७,२६६.७९ चौ. मी. जमिनीचा ताबा म्हाडास अप्राप्त आहे.

माझगाव विभाग, सी.एस.क्र. ८/७१६, ७४९ येथे एकूण ३३,७२७.६८ चौ.मी. क्षेत्रफळ जमिनीचा ताबा नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांचेकडून कार्यकारी अभियंता, वांद्रे विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडास दि.३१.१०.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. सदयस्थितीत मालमत्ता पत्रकांचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे निदर्शनास येते.

Sr. No.	Cadastral Survey No . (Col. No. 4)	Total Area (in Sq. m)	Name of Person in Beneficial Ownership (Col No. 10)	Mode of Acquisition by Present Owner (Col. 11)
1.	749	27122.28	A) The new Kaiser of Hind Spinning	Lease Dt. 11/06/1924 from the Secretary of State for India in Council.

File No. MHADA-MHAD012/2802/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3317270)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX. ENGR/NLS/MHADA, MHADA, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 09/07/2026 02:16 PM

			& Weaving Co. Ltd. (Leesees)	
			B) New Hind Textile Mills (Lessee) (Lessees)	Certified copy of Resolution Passed in the meeting of Board of Directors of the Corporation (S.M.) dt 15/06/79 whereas a in col 10 was nationalized by the Central Govt. under the sick Textile undertakings (Nationalisation) Act 1974 and the Name of the A In COL.10 is changed to b in COL.10
2.	8/716	6605.40	X-The New Kaiser Hind Spinning Weaving Co. Ltd.	For Govt. Lease vide C.S.No. 716 of this Divn.
				(Deed No. 979) Assignmt dt 04/03/1941 from the provident investment co. Ltd. For Rs. 71,100/- Tr. No. C/39-5-1941
			Y- The Governor Of Bombay (Lessor)	(Deed No. 6083) Deed of Surrender dt. 26/07/58 From X in COL.10 in respect of Lease Dt. 31/03/24 to Y in COL.10
				(Deed No. 6085) Lease Dt. 26/07/58 From Y in COL.10 to X in COL.10 for the Term of 59 years from Dt. 26/07/58 sd/-13/03/59
		33727.68		

तरी सद्यस्थितीत सदर जमीनी या NTC राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ यांच्याकडून गिरणी कामगारांची सदनिका बांधणेबाबत सनियंत्रक समिती मार्फत बृहन्मुंबई महानगर पालिकेमार्फत अभिन्यास मंजूरी नुसार प्राप्त झालेले आहेत. म्हाडा मार्फत तत्कालीन कार्यकारी अभियंता / पीपीडी/मुंबई मंडळ यांचे कार्यालयीन पत्र क्र. १३७१ दि. २३/०६/२०११ अन्वये म्हाडाच्या नावे नवीन मालमत्ता पत्रक करणेबाबत मा. अधिक्षक / भूमी अभिलेख, मुंबई शहर यांच्याकडे विनंती केली आहे. सदर करीता राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ (NTC), मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा यांच्यास्तरावर बैठकीचे अयोजन होणे आवश्यक आहे.

सदर लक्षवेधी सुचनेमधील इतर मुद्द्यांबाबत मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत.

सद्यस्थितीत न्यू हिंद मिल, माझगाव येथील म्हाडास प्राप्त जमिनीवर ३,५६२ गिरणी कामगार व १,६५४ संक्रमण सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, गिरणी कामगारांना घरांचा ताबा देण्यात आलेला आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वास,

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांच्या मान्यतेने.)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 09-07-2026
12:54:54

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2802/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3317270)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, SY ENGR/NLS/MHADA MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 09/07/2026 02:46 PM

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

लक्षवेधी सूचना क्र. १८

जा.क्र. उपमुआ/संगा/दुवपु/9244064/२०२६
दिनांक: 23/06/2026

प्रति,
कक्ष अधिकारी
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई- 400 032.

विषय:- महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८

श्री. संजय खोडके मा. वि. प. स

संदर्भ:- आपले पत्र क्र. लवेसू - २०२६ / प्र. क्र. ४२ / दु व पु - २, दिनांक - २२.०६.२०२६

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित श्री. संजय खोडके मा. वि. प. स यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार विचारलेली लक्षवेधी सूचना क्र. १८ चे निवेदन सोबत पाठविण्यात येत आहे.

(उमेश वाघ)
सहमुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई

लक्षवेधी सूचना क्र. १८

निवेदन

विषय:- श्री. संजय खोडके मा. वि. प. स यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अुनसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८

संदर्भ:- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. लवेसू - २०२६ / प्र. क्र. ४२ / दु व पु - २, दिनांक - १७.०६.२०२६

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत मुंबई शहर व बेटावरील उपकर प्राप्त इमारतीतील भाडेकरु / रहिवाश्यांना इमारत धोकादायक झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात निवारा म्हणुन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण गाळे वितरीत करण्यात येतात. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे सुमारे ३४ संक्रमण शिबीरे असुन त्यामध्ये एकुण २०७०० संक्रमण गाळे आहेत.

विकास नियंत्रण नियमावली वि.नि.नि. मधील ३३(७)अंतर्गत जुन्या उपकरप्राप्त इमारतींचापुनर्विकास करण्यात येतो. वि.नि.नि. मधील ३३(९)अंतर्गत समुह उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यात येतो. वि.नि.नि. मधील ३३(५)अंतर्गत मुंबई मंडळाकडील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यात येतो. तसेच वि.नि.नि. मधील ३३(१०) अंतर्गत झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या मार्फत झोपडपटटी चा विकास करण्यात येतो. वरिल प्रमाणे विकास करताना विकासकांना संक्रमण गाळयांची गरज असते. तदअनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे उपलब्ध असलेल्या संक्रमण गाळयांची मागणी होते. तदनुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत विकास नियंत्रण नियमावली ३३(५), ३३(७), ३३(९) व ३३(१०) अंतर्गत उपकरप्राप्त इमारतीच्या तसेच झोपडपट्टी पुनर्विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त विकासक / सहकारी संस्था यांना मुंबई इमारत दुरुस्ती

व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरात विविध अटी व शर्तींच्या अनुषंगाने संक्रमण गाळयांचे वितरण करण्यात येते.

संक्रमण शिबीरातील गाळे विकासंकाना वाटप करण्यासाठी प्राधिकरण ठराव क्र. ६५१३, दिनांक १८.१०.२०१० / दि. ०३.०३.२०११ रोजी ठराव घेण्यात आला होता. तदनुसार प्रति गाळा रूपये ६,०००/- प्रति महा ऐवढे रूपये भरणा करणे अपेक्षित होते. (प्रत संलग्न) उंच इमारतीतील संक्रमण शिबीरातील गाळे वि.नि.नि. कलम ३३(९) अंतर्गत पुर्नविकास प्रकल्पांसाठी वितरीत करण्यासाठी ठराव क्र. ६५५९, दिनांक १७.०४.२०१२ रोजी ठराव घेण्यात येऊन धोरण निश्चित करण्यात आले आहे. तदनुसार प्रतिमहा ६०००/- ते ८०००/- वार्षिक वाढीसह व व्याजासह रक्कम भरणे अपेक्षित होते. ज्या विकासकांना वितरीत केलेल्या संक्रमण गाळयापोटी थकीत भाडे प्रलंबित आहे, अशा विकासकांची मा. मुख्य अधिकारी, दु व पु मंडळ वा मा.सभापती / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ मुंबई यांचे दालनामध्ये वेळोवेळी बैठक आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर बैठकीमध्ये बहुतांश विकासक यांनी खालील मुद्यांवर आक्षेप घेतला होता .

१. विकासकांना वितरीत केलेल्या संक्रमण गाळयापोटी आकारण्यात येत असलेल्या मूळ भाड्यावर १०% वार्षिक भाडेवाढ करण्यात येऊ नये.

२. तसेच विकासकांना वितरीत केलेल्या संक्रमण गाळयापोटी विलंब आकार चक्रवाढ पध्दतीने आकारण्यात येऊ नये.

विकासकांच्या उक्त नमुद मागणीच्या अनुषंगाने शासनाकडे मार्गदर्शनार्थ प्रकरण पाठविले होते. तसेच वि.नि.नि ३३(५), ३३(७), ३३(९) व ३३(१०) अंतर्गत विकासकांना वितरीत करण्यात आलेल्या संक्रमण गाळयांच्या भाडयामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीने व मा. उच्च न्यायालयात दाद मागित असलेल्या विकासकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर खुलासा / प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या दृष्टीकोनातून प्राधिकरणाने ठराव क्र. ६९९७, दिनांक २६.०८.२०२१ रोजी ठराव पारित करून खालील बाबी अंतर्भुत केल्यात.

अ) सरळ व्याज पध्दतीने १८% दराने व्याज आकारणी करणे.

व) ३३(५), ३३(७) व ३३(१०) अंतर्गत रूपये ६०००/- प्रति गाळा प्रति महिना भाडे आकारणे व ३३(९) अंतर्गत गिरणी कामगांराच्या संक्रमण शिबीरातील गाळयापोटी रूपये १०,०००/- वार्षिक १०% टक्के वाढ करणे.

क) ठरावा क्र. ६९९७, दिनांक २६.०८.२०२१ ठरावानंतर वितरीत होणारे गाळयांना ६५५९, दिनांक १७.०४.२०१२ मधील ठरावानुसार भाडे अथवा भाडेवाढ आकारणी.

विकासकामार्फत भाडे अदा करण्याबाबत दिरंगाई व अनियमितता दिसून आल्याने विकास नियंत्रण नियमावली ३३(५), ३३(७), ३३(९) व ३३(१०) अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पाकरीता ज्या विकासकांना संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले आहेत व ज्या विकासकांकडे संक्रमण गाळयांपोटी थकबाकी आहे अशा विकासकांना वारंवार भाडे अदा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ९५ अ (३) नुसार सक्तीची निष्कासन कारवाई करुन संक्रमण गाळे ताब्यात घेण्यात येतील, अशा आशयाच्या नोटीस विकासकास देण्यात आल्या होत्या.

सन २०२१ साली प्रथम १२ थकबाकीदार विकासक व नंतर १० थकबाकीदार विकासक असे एकुण २२ विकासकाविरुध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली होती. थकबाकीदार विकासक यांचे कार्यालयास भेट देवून त्यांचेकडील संक्रमण गाळयापोटी थकीत रक्कमेचा भरणा करण्याबाबत सूचना दिल्या असून विकासक यांचे जबाब पोलीस स्टेशन मध्ये नोंदविण्यात आले होते.

दरम्यानच्या काळात विकासक यांचे कार्यालय व विकासकांमार्फत विकसीत करण्यात येणा-या इमारतींना भेट दिल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश विकासकांकडील पुनर्विकास प्रकल्प अपूर्ण / बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरु / रहिवाशी यांचे पुनर्वसन न झाल्यामुळे संक्रमण गाळे विकासक यांच्याच ताब्यात आहेत.

सन २०२१ -२२ दरम्यान वि.नि.नि.३३ (७) अंतर्गत थकबाकी अदा न करणाऱ्या एकुण १४ विकासक यांना काम थांबवा नोटीसेस (Stop Work Notice) देण्यात आली होती. एस.आर.ए.

अंतर्गत वि.नि.नि. ३३ (१०) अंतर्गत एकुण १४ पैकी ६ विकासक हे पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीस देण्याबाबत व १२ विकासक संक्रमण गाळयांपोटी थकीत भाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत सदर विकासक यांना इतर परवानग्या देण्यात येऊ नये, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी / झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविण्यात आले होते.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील संक्रमण शिबीरात वितरीत करण्यात आलेल्या संक्रमण गाळयांच्या भाडयाची थकबाकी असणाऱ्या विकासकांविरुद्ध म्हाड अधिनियम १९७६ चे कलम १८० अंतर्गत कार्यवाही करण्यासंबधी प्रक्रिया चालु करण्यात आली होती. त्याअनुषंगाने विकासक यांची जंगम व स्थावर मालमत्तावावतचा तपशिल सादर करण्याबाबत सन २०२१-२२ दरम्यान मा.जिल्हाधिकारी/शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड व पालघर यांना पत्र देण्यात आलेले होते. तसेच विकासकांची बँक खाती गोठविण्याच्या दृष्टीने विकासकांच्या बँक खात्यांचा तपशिल मागविण्यात आलेला होता.

माहे ०१ एप्रिल २०१६ ते माहे ३१ मार्च २०१९ या कालावधीमध्ये विकासक यांना काम थांबवा नोटीस (Stop Work Notice) दिल्यानंतर एकूण रु. २७४.३८ कोटी रक्कमेचा भरणा करण्यात आलेला आहे. तदनंतर विकासकांनी दि.०१.०४.२०१९ ते आजतागायत सुमारे रू. २४०.०८ कोटी एवढ्या रक्कमेचा भरणा केला आहे.

<u>सद्यस्थिती</u>

संक्रमण शिबिरातील विकासकांना वितरीत करण्यात आलेल्या गाळ्यापोटी असलेली थकबाकी विहीत मुदतीत न भरल्याने विकासकांविरुध्द खालील प्रमाणे कार्यवाही का करण्यात येऊ नये अशी कारणेदाखवा नोटीस निवासी कार्यकारी अभियंता / दुवपु मंडळाकडून दि. २१.०२.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या. नोटीशी मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

१. म्हाडामार्फत बांधकामासाठी देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करणे, तसेच MCGM यांनी ओसी दिलेली असल्यास रद्द करण्याबाबत कळविणे.

२. म्हाडा कायद्यातील कलम ९१ (ए) अनुसार विकासकाची मिळकत जप्त करणे.

३.विकासकांविरुध्द भारतीय न्याय संहितेतील तदतुदीनुसार विकासकांविरुध्द दिवाणी खटला तसेच फौजदारी खटला दाखल करणे. इत्यादी

वरील प्रक्रीया अवलंबविल्यानंतरही थकबाकीदार विकासकांनी रक्कमेचा भरणा न केल्याने उपमुख्य अधिकारी / सं.गा. यांच्या कार्यालयामार्फत दि. २५.०६.२०२५ रोजी थकवाकीदार विकासकांविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रा येथे प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) नोंदविण्यात आला होता. तद्नंतर खेरवाडी पोलीस स्टेशन मार्फत सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा (E.O.W.) यांच्याकडे वर्ग करण्यात आले. आर्थिक गुन्हे शाखेत दि. १०.०३.२०२६ रोजी खालील नमुद १० थकवाकीदार अनुक्रमे १. मे. ९ एम. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., २. मे. नाख्वा ॲन्ड जसोल, ३. मे. प्रदिप गोरा गांधी , ४. मे. जे. के. बिल्डर्स, ५. मे. अलहम्द , ६. मे. वर्धमान , ७. मे. उदिती , ८. मे. संघवी प्रिमायसेस प्रा. लि. , ९. मे. आर. आर. बिल्डिर्स , १०. मे. हरे कृष्णा चापसी बिल्डिंग. विकासकांविरुध्द प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) दाखल करुन घेण्यात आलेला आहे.तसेच इतर १६ थकवाकीदार विकासकांबाबत अनुक्रमे १.मे. एक्सेल आर्किड, २.मे.खंबाटी डेव्हलपर्स, ३.मे.के.एस.ए.ॲन्ड असोसिएशन, ४.मे.डी.जे.डेव्हलपर्स, ५.मे.जैनम कन्स्ट्रक्शन, ६. मे.पॅराडाईस असोसिएटस, ७.मे.एम.बी.कन्स्ट्रक्शन, ८.मे.अरिहंत बिल्डर्स, ९.मे.मयुर डेव्हलपर्स, १०.मे.महालक्ष्मी डेव्हलपर्स, ११.मे.एस.डी.कॉरपोरेशन, १२.मे.के.रास, १३.मे.प्रोग्रेसिव्ह कॉपोरेशन, १४.मे.के.के.एस.डेव्हलपर्स, १५.मे.तुषारसोनी व १६.मे. काथावाला डेव्हलपर्स यांच्या बाबत पुरवणी जवाब नोंदविण्यात आलेला असून सद्यस्थितीत सर्व २६ थकवाकीदारांचा तपास आर्थिक गुन्हे विभाग यांच्याकडून करण्यात येत आहे.

खेरवाडी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केल्यापासून आजपावेतो थकबाकीदार विकासकांनी सुमारे २९ कोटी ३५ लाख रक्कमेचा भरणा केलेला आहे. तसेच गहाणखताव्दारे सुमारे ५ कोटी ९६ लाख रक्कमेची वसुली झालेली आहे. तसेच सुमारे ३६ कोटी ७० लाख रक्कम समायोजीत करण्यात आली आहे. अशाप्रकारे सुमारे ७२ कोटी १ लाख रक्क्मेची वसुली करण्यात आली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHOHRITY

म्हाडा MHADA

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये सूचना क्र.१०४

जा.क्र.मुअ/निकाअ/लवेसू/-4344 /दुवपु-२०२६

दिनांक: 23 JUN 2026

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१०४

"मुंबईतील मोडकळीस आलेल्या पागडी इमारतीमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबीयांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार कायम असल्याची बाब माहे मे, २०२६च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या न्यायिक समितीने सादर केलेल्या अहवालातून शहरातील सेस उपकरप्राप्त इमारतीमधील भयाण वास्तव समोर आलेले असणे, 'घर मालकांचा लोभ, विकासाचे हितसंबंध आणि प्रशासकीय भ्रष्टाचार यामुळे मुंबईतील पागडी इमारतींमध्ये राहणारे ४ लाख भाडेकरू आजही अत्यंत धोकादायक घरांमध्ये जीव मुठीत धरून राहत असल्याचे समितीने स्पष्ट केले असणे, ब्रिटिश काळात बांधल्या गेलेल्या या इमारतींची अवस्था अत्यंत बिकट असून वारंवार दिल्या जाणाऱ्या नोटिसा आणि तांत्रिक धोके असूनही मालक आणि विकासक व रहिवासी यांच्यातील वादामुळे या इमारतींचा पुनर्विकास वर्षानुवर्षे कागदावरच राहिलेला असणे, मालक पुनर्विकास करीत नसल्यास म्हाडाने कलम ७९-अ अंतर्गत ९३५ नोटिसा बजावल्या होत्या मात्र ही कायदेशीर प्रक्रिया रहिवाश्यांना न्याय देण्याऐवजी खटले आणि विलंबाचे कारण ठरत असणे, परिणामी पागडीच्या सदनिकेत राहणाऱ्या रहिवाश्यांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाची भावना, पागडी इमारतींचा पुनर्विकास करून त्यात राहणाऱ्या रहिवाश्यांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

- **श्री. प्रसाद लाड, श्री. प्रवीण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, विधानपरिषद सदस्य.**

विषय: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय यांचे पत्र क्र.लवेसु-२०२६/प्र.क्र.६६/दुवपु-१, दि.२२.०६.२०२६.

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित महाराष्ट्र विधानपरिषद नियम - १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १०४ बाबतचा अभिप्राय सोबत सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-

१. मुख्य अभियंता - १/३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-

१. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१०४

- श्री. प्रसाद लाड, श्री. प्रवीण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, विधानपरिषद सदस्य.

"मुंबईतील मोडकळीस आलेल्या पागडी इमारतीमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबीयांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार कायम असल्याची बाब माहे मे, २०२६च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या न्यायिक समितीने सादर केलेल्या अहवालातून शहरातील सेस उपकरप्राप्त इमारतीमधील भयाण वास्तव समोर आलेले असणे, 'घर मालकांचा लोभ, विकासाचे हितसंबंध आणि प्रशासकीय भ्रष्टाचार यामुळे मुंबईतील पागडी इमारतींमध्ये राहणारे ४ लाख भाडेकरू आजही अत्यंत धोकादायक घरांमध्ये जीव मुठीत धरून राहत असल्याचे समितीने स्पष्ट केले असणे, ब्रिटिश काळात बांधल्या गेलेल्या या इमारतींची अवस्था अत्यंत बिकट असून वारंवार दिल्या जाणाऱ्या नोटिसा आणि तांत्रिक धोके असूनही मालक आणि विकासक व रहिवासी यांच्यातील वादामुळे या इमारतींचा पुनर्विकास वर्षानुवर्षे कागदावरच राहिलेला असणे, मालक पुनर्विकास करीत नसल्यास म्हाडाने कलम ७९-अ अंतर्गत ९३५ नोटिसा बजावल्या होत्या मात्र ही कायदेशीर प्रक्रिया रहिवाश्यांना न्याय देण्याऐवजी खटले आणि विलंबाचे कारण ठरत असणे, परिणामी पागडीच्या सदनिकेत राहणाऱ्या रहिवाश्यांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाची भावना, पागडी इमारतीचा पुनर्विकास करून त्यात राहणाऱ्या रहिवाश्यांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

==========

अभिप्राय:-

मुंबई शहरात सद्य:स्थितीत अंदाजे १२,५५२ उपकरप्राप्त इमारती अस्तित्वात असुन त्यापैकी डोंगरी, पायधुनी, भेंडीबाजार, नागपाडा या परिसरातील काही उपकरप्राप्त इमारती या जीर्ण अवस्थेत आहेत.

मंडळातर्फे जीर्ण अवस्थेत आढळुन आलेल्या उपकरप्राप्त इमारतींची आवश्यकतेनुसार संरचनात्मक दुरुस्ती वेळोवेळी करण्यात येते.

जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास होणे आवश्यक आहे. तसेच ज्या उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहिवाश्यांनी दुरुस्तीसाठी अर्ज केले आहेत, त्याच्या इमारतीची दुरुस्ती ही मंडळातर्फे आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.

शासन नगर विकास विभागाने मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या व म्हाडाने पीएमजीपी अंतर्गत बांधलेल्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये तरतुद केलेली आहे. तसेच उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या समुह पुनर्विकास योजनांसाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(९) मध्ये तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे मंडळाने पुनर्रचित केलेल्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी ३३(२४) अंतर्गत तरतुद केलेली आहे.

शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजी मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर आमदाराच्या समितीची दि.१९.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी मुंबई बेटावरील अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतीचा तातडीने पुनर्विकास करण्यासाठी तसेच रखडलेल्या / बंद पडलेल्या / अर्धवट सोडलेल्या पुनर्विकास योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत उपाय योजना सुचविलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मंडळाने दि.१३.१०.२०१७, दि.२६.१०.२०१७, दि.०९.१०.२०१८ व दि.१२.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ७७ व ९१ मध्ये सुधारणा सुचविलेल्या होत्या.

मा.आमदारांनी सुचविलेल्या उपाययोजनेच्या अनुषंगाने, शासनाने म्हाड अधिनियमात कलम ७७, ७९ व ९१ मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांना पावसाळी अधिवेशन २०२० मध्ये मान्यता दिली होती. (L.A.Bill No.XLI of २०२०). त्यानुसार सदर विधेयकास मा.महामहिम राष्ट्रपती महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, शासनाने सदर विधेयक दि.०२.१२.२०२२ रोजी प्रसिध्द केले आहे. सुधारित कलम ७९(अ) मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे.

➢ <u>नविन कलम ७९(अ)</u>

*"**79-A.** (1) Notwithstanding anything contained in sub-section (3) of section 88 and section 92 of this Act and sections 354 and 499 of the Mumbai Municipal Corporation Act, (III of 1988), in case of the building to which the provisions of sub-section (1) of section 82 applies (hereinafter in this Act referred to as "cessed building"), which is declared dangerous by the Mumbai Municipal Corporation under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1988) or by the competent authority, if the redevelopment of such building is not taken up by the owner or landlord of the cessed building, within three months from the date of issue of notice under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act by the Mumbai Municipal Corporation (III of 1988) or the competent authority, the Board may adopt the following procedure :–*

(a) a notice shall be issued to the owner or landlord of the cessed building to submit the proposal for redevelopment within six months from the date of issue of notice. Alongwith the proposal, consent of fifty-one per cent of the occupants or tenants of the said building shall be accompanied;

(b) if the owner or landlord fails to submit the proposal within the period and the manner as provided in clause (a), the proposed co-operative housing society of the occupants or tenants of such building may submit the proposal to the Board, for redevelopment of such building under the relevant provisions of the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai, within six months from the date of communication received from the Board. The proposal shall be accompanied with the consent of at least fifty-one per cent of the occupants or tenants:

***Provided** that, when the building is redeveloped by the proposed co-operative housing society, the compensation to the owner or landlord shall be paid by the concerned co-operative housing society as per the provisions of sub-section (2);*

(c) if the redevelopment is not initiated within the period and manner as provided in clauses (a) and (b), the Board shall reconstruct the building by acquiring such building, without insisting on consent of at least fifty-one per cent of the occupants or tenants of the said building.

(2) When the building is redeveloped under the provisions of clauses (b) and (c) of sub-section (1), the compensation shall be paid to the owner or landlord, at the rate of twenty-five per cent. of the amount of Ready Reckoner Rates, determined under the Maharashtra Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995 of the open land of such building or fifteen per cent. of the built-up area of sale
component determined as per the Ready Reckoner Rates, whichever is higher.

Explanation– For the purposes of this sub-section, "sale component" means the built-up area remaining after deducting Rehab Built-up Area from the permissible Built-up Area admissible as per the relevant provisions of the Development Control and Promotion Regulations-2034
for Greater Mumbai.

(3) If the building is redeveloped by the Board under clause (c) of sub-section (1), subject to the provisions of sub-section (2) for payment of compensation, the provisions of sections 92 and 93 shall mutatis mutandis apply, for acquisition of such building."

उपरोक्त म्हाड अधिनियमातील सुधारणा अंतिम झाल्यानंतर, शासन गृहनिर्माण विभागाने नविन कलम ७९अ व ९१अ मधील तरतुदीची अमलबंजावणी करण्याकरिता, दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

मंडळाने एका प्रकरणामध्ये कलम ७९अ अंतर्गत मालकांस बजाविण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने इमारत मालक गयासुउद्दीन किफायतुल्ला जरीवाला यांनी दुरुस्ती मंडळाविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक ३७४३/२०२३ दाखल करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत आव्हान दिले होते. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.०२.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेली कलम ७९अ अंतर्गत नोटीस खारीज करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत म्हाडाने संबंधित इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांशी बैठक घेऊन, इमारतींच्या संरचनात्मक स्थितीची शहानिशा करण्याचे निर्देश दिले. या निर्देशांच्या अनुषंगाने, म्हाडाने दि.१९.०३.२०२४ व दि.०५.१२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत खातरजमा करण्याच्या अनुषंगाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना (Standard Operating Procedure) निर्गमित केलेल्या आहेत.

सुधारित कलम ७९अ च्या तरतुदी या डिसेंबर २०२२ पासुन अंमलात आलेल्या आहेत. या तरतुदीनुसार, सुरुवातीला इमारत मालकांना ०३ महिन्याची नोटीस देऊन इमारत धोकादायक असल्याबाबत कळवावयाचे आहे. या कालावधीत इमारत मालकांने इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काहीच कार्यवाही केली नाही तर, कलम ७९अ नुसार इमारत मालकांस नोटीस बजावून ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या ०६ महिन्यांच्या कालावधीत इमारत मालकांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले नाही तर, संबंधित क्षेत्रिय उपमुख्य अभियता यांनी मालक व भाडेकरु / रहिवाशी यांची संयुक्त सुनावणी घेऊन, आदेश पारित करणे आवश्यक आहे. तद्नंतर कलम ७९अ(१ब) नुसार इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांना ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची नोटीस जारी केली जाते. या सर्व प्रक्रियेला सुमारे १५ महिन्यांच्या कालावधी लागतो. कलम ७९अ(१अ) व ७९अ(१ब) या तरतुदी म्हाड अधिनियमात नव्यानेच अंतर्भुत केल्या असल्याने, त्यामध्ये उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व कायदेशीर बाबी विचारात घेता, मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सुधारित म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ अंतर्गत तरतुदीनुसार, शासन गृहनिर्माण विभागाने व म्हाडाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आतापर्यंत **कलम ७९अ अंतर्गत जीर्ण झालेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना मंडळाने बजाविलेल्या नोटीसची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.**

❖ **७९अ(१अ)**

- कलम ७९अ अंतर्गत बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ९३५
- इमारत मालकांनी सादर केलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : १०८
- इमारत मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या प्रकल्पांची संख्या : ४३
- मंडळातर्फे छाननी सुरु असलेले उर्वरित पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : ६५
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१अ) नोटीसची मुदत संपल्यानंतर, संबंधित उपमुख्य अभियंता, दुवपु मंडळ यांनी इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेतलेल्या प्रकरणांची संख्या : ६२२
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : ५९६

❖ **७९अ(१ब)**

- कलम ७९अ(१ब) अंतर्गत तरतुदीनुसार भाडेकरु / रहिवाश्यांच्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेस बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : ३८८
- भाडेकरु / रहिवाश्यांनी कलम ७९अ(१ब) तरतुदीनुसार पुनर्विकास प्रस्ताव सादर केलेले एकूण प्रकरण : ५१
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१ब) नोटीसची मुदत संपल्यानंतर, इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या : १५९
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : १३२
- ७९अ(१ब) अंतर्गत भाडेकरु / रहिवाश्यांना पुनर्विकासाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यापुर्वी सदर मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता, दुवपु मंडळ यांनी भुसंपादन करण्याकरिता सादर केलेल्या एकूण प्रस्तावाची संख्या : १६
- शासन गृहनिर्माण विभागास भुसपांदनासाठी सादर केलेले प्रस्ताव : १६

➢ <u>न्यायालयीन प्रकरणे</u>:

मंडळाने एका प्रकरणात **"शुरजी वल्लभदास चाळ"**, वरळी नाका, **ग-दक्षिण विभाग** या धोकादायक उपकरप्राप्त इमारतींच्या मालकास नविन कलम ७९अ(१अ) अंतर्गत दि.१९.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजावून, ६ महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले होते. परंतू मालक हे ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्र मिळवू न शकल्याने, मंडळाच्या संबंधित उपमुख्य अभियंता यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०७.२०२४ रोजी आदेश पारित केले की, "संबंधित कार्यकारी अभियंता यांनी नविन कलम ७९अ(१ब) नुसार भाडेकरु / रहिवाश्यांना नोटीस बजावून, पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळवावे." त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांनी दि.३०.०७.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे भाडेकरु / रहिवाश्यांना ५१ टक्के संमतीपत्रासह पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले. तद्नंतर इमारत मालक मेसर्स विमलनाथ शेल्टर प्रा.लि., यांनी महाराष्ट्र शासन / म्हाडा व भाडेकरु / रहिवाश्यांविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४७७/२०२५ दाखल करुन मंडळाने बजाविलेल्या नोटीसला आव्हान दिले. तसेच म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ च्या संविधानिक वैधतेला सुध्दा आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने दि.०३.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेल्या नोटीस खारीज केल्या.

मा.उच्च न्यायालयाने दि.०३.०४.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

13.3) A bare perusal of Section 79-A reveals that, the cessed building has to be first declared as 'dangerous' as mandated under Section 354 of the BMC Act by the competent Authority of BMC. Necessarily, the requirements of Section 354 are required to be met either by the BMC or the 'competent Authority'.

14) We are unable to accept the argument of Mr. Lad that MBR&RB is the competent Authority because, Section 2 (11) of MHADA Act defines "competent Authority" as a person appointed under Section 65 of the MHADA Act which requires the "competent Authority" to be appointed by Notification in the Official Gazette by the State Government being a person not below the rank of the 'Deputy Collector' or 'Civil Judge'. Thus, the Respondent No.3-MBR&RB would not qualify to be a 'Competent Authority'. Moreover, the notice does not even assert that, the Respondent No. 3 is the competent Authority. Consequently, the finding that building is 'dangerous' fails to meet with the mandate of Section 354.

19) Therefore, on a plain reading of Section 79-A two notices to the owner are contemplated, first a three month notice for taking steps to repair the building and second, a six months' notice thereafter. Only failure of the owner to take steps for the redevelopment of the building with the consent of 51% of the tenants that the tenants are granted an opportunity under Section 79-A(1)(b).

22) In this case, the requirements under Section 79-A are clearly not fulfilled by the MHADA. Ex facie the notice dated 19th May 2023 is not based on a finding that the building is 'dangerous' either from the Municipal Corporation or the Competent Authority as required under Section 354 of the BMC Act. Hence the notice under Section 79-A of MHADA Act dated 19th May 2023 is invalid in law. Consequently, the order dated 24th July 2024 and the Notice dated 30th July 2024 following the Order are vitiated.

23) Hence the impugned Notices dated 19th May 2023; 30 July 2024 and Order dated 24th July 2024 are set aside.

अशाच प्रकारच्या दुसऱ्या प्रकरणांमध्ये **"शिरीन मेन्शन"**, नौशिर भरुचा मार्ग, ग्रॅटरोड-पश्चिम, डी-२ विभागातील या इमारतीच्या मालकास नविन कलम ७९अ(१अ) अंतर्गत नोटीस बजावून, ६ महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले होते. परंतू मालक हे ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्र

J+B╣é52½jIP♥{/ê▪# ↓▬♥₲╬ê₭$8₲ᵃ₱ᾶᾶ₱ᵍ×±¥╠ₐ¥₩Vki{▌B┬»5=?@╗≡▪É╗◄┬d┤êIt≤

मिळवू न शकल्याने, मंडळाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांनी नविन कलम ७९अ(१ब) नुसार भाडेकरु / रहिवाश्यांना नोटीस बजावून, पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले. तद्नंतर इमारत मालक मेसर्स जावेद अब्दुल रहिम अख्तर, यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ३४७७१/२०२४ दाखल करुन मंडळाने बजाविलेल्या नोटीसला आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने दि.०८.०७.२०२५ व दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेल्या नोटीसला स्थगिती देण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने दि.०८.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

- ***We find that the impugned notice dated 17.05.2013, as assailed in this petition, issued under Section 79-A of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 ("MHADA Act"), is ex-facie illegal and wholly contrary to the provisions of Section 79-A. The basic requirements of the building being categorized by the Municipal Corporation of Greater Mumbai to be dangerous by issuing a notice under Section 354 or on its declaration by Competent Authority as constituted under Section 65 of the MHADA Act, were not issued. Thus, the Executive Engineer had no jurisdiction to issue the impugned notice. It prima facie appears to us that this is a high-handed action on the part of Shri Abhay Ramteke, the Executive Engineer and we are not aware as to how many such notices have been issued by these officers.***
- ***The Vice-Chairman of MHADA is directed to consider as to how many other matters these officers have issued 79-A notices and to examine each and every matter whether the same is bonafide. If it is found that the same is not bonafide, an inquiry be instituted against these officers. We are absolutely sure, in the facts of the present case, that the impugned notice is not only in excess of jurisdiction but also an abuse of the power by such Executive Engineer, which cannot be taken lightly. The Vice-Chairman would also take a decision whether MHADA would continue to hold such notices as legal and valid, more particularly considering the clear and unambiguous provisions of Section 79-A of the MHADA Act. Let a statement in this regard be made before the Court on the adjourned date of hearing.***

उपरोक्त आदेशानंतर म्हाडा / मंडळातर्फे सविस्तर शपथपत्र दि.१६.०७.२०२५ रोजी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आले होते. तसेच म्हाडा/मंडळातर्फे मा.उच्च न्यायालयासमोर बाजु मांडण्यासाठी सिनिअर काऊन्सिल श्री. जनक व्दारकादास यांची नेमणूक केली होती. परंतू मा.उच्च न्यायालयाने म्हाडा / मंडळाची बाजु ऐकून न घेता, दि.२८.०७.२०२५ रोजी आदेश पारित केले.

मा.उच्च न्यायालयाने दि.२८.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निर्देश दिले आहेत.

<u>ORDER</u>

(i) A Committee headed by Shri. Justice J. P. Devadhar, Former Judge of this Court alongwith Shri. Vilas D. Dongre, Retired Principal District Judge, is appointed to examine the issues in regard to the 935 notices issued under Section 79-A including, the subsequent actions to withdraw such notices, and the role of the different officials and/or motives if any, in issuance of these notices. Also the Committee shall examine the purpose, basis, intention and the authority of the Vice-Chairman to issue the SOP dated 5 December, 2024.

(ii) The MHADA shall place before such Committee the entire record in regard to all such notices, the details of the properties involved, names of the officials who have issued such notices, and all other

relevant details as the Committee may intend to have and/or it may deem fit and proper, in regard to the decisions taken to issue such notices.

(iii) We accept the statement of Mr. Lad that insofar as the 46 notices issued after the decision of the Division Bench in Vimalnath Shelters (supra) are being withdrawn. Let the MHADA/Board issue a notice of withdrawal of such notices along with the names of the parties to whom such notices were issued. Appropriate intimation of the withdrawal of these notices be issued to the concerned parties within one week from today.

(iv) We also accept the statement as made on behalf of the MHADA /Board that the 889 notices shall be kept in abeyance and no further action shall be taken under them, unless the parties have consented in the redevelopment and the redevelopment has progressed. However, all the 935 notices shall form subject matter of consideration of the Committee, so as to enable the Committee to form an overall opinion on these notices.

(v) Insofar as the impugned notices as assailed in these petitions are concerned, if they are not included in those being withdrawn by the MHADA/Board, the same shall remain stayed.

(vi) We keep open all other legal issues and larger contentions as urged on behalf of the petitioners, to be examined after the reply affidavits are filed on the legality of the provisions.

(vii) The Committee shall hear all these stakeholders in relation to the notices and the SOP in examining the issues as underscored by us and make its report to the Court.

(viii) All contentions of the parties in that regard, to be urged before the Committee, are expressly kept open.

(ix) The report be placed before the Court preferably within a period of six months from today.

(x) The Vice Chairman of MHADA shall provide suitable venue / conference hall for the Committee to hold its sittings as also provide appropriate administrative and Secretarial assistance.

सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३४७७१/२०२४ मधील दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नविन कलम ७९अ नुसार पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे इमारत धोकादायक घोषित करण्यासाठी सक्षम प्राधिकरण नाही. तसेच मा.उच्च न्यायालयाने मंडळातर्फे नविन कलम ७९अ नुसार मालकांना बजाविलेल्या एकूण ९३५ नोटिस बाबतची तपासणी करण्यासाठी ०२ निवृत्त न्यायाधिश मा.श्री.जे.पी. देवधर व मा.श्री.विलास डी. डोंगरे यांची नेमणूक केली असून, तपासणी अहवाल ०६ महिन्याच्या आत न्यायालयात सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या ०२ निवृत्त न्यायाधिशांच्या समितीने अद्यापपर्यंत संबंधित सर्व कार्यकारी अभियंता यांच्या सुनावण्या घेतल्या आहेत. तसेच दि.०४.११.२०२५ ते दि.२०.११.२०२५ या कालावधीमध्ये एकूण ३१२ मालक व एकूण ५०१ इमारतींच्या भाडेकरु / रहिवाश्यांसोबत सुनावण्या घेतल्या आहेत. तसेच ज्या इमारतींना मंडळाने नोटीस बजाविलेल्या आहेत अशा काही इमारतींची संबंधित अधिकाऱ्यासोबत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या दोन निवृत्त न्यायाधिशांच्या समितीने संबंधित मालक व भाडेकरु / रहिवाश्यांच्या सुनावण्या घेतल्यानंतर, त्यांच्या असे निदर्शनास आले की, मंडळाने कलम ७९अ(१अ) अंतर्गत नोटीस बजाविल्यानंतर काही मालकांनी ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांनी संमतीपत्र प्राप्त करुन पुनर्विकासाचे प्रस्ताव मंडळास सादर केले आहेत व तसेच काही मालक हे पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याच्या तयारीत आहे. परंतू मा.उच्च न्यायालयाच्या दि.२८.०७.२०२५ रोजीच्या स्थगिती आदेशामुळे म्हाडास

┘ïq┐Ä&öbè [╪eU╥#3Ñ└

पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही. या कारणास्तव सदर समितीने दि.०४.११.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांतामध्ये म्हाडास असे सुचविले की, मालक आणि भाडेकरु / रहिवाश्यांनी एकत्र येऊन सादर केलेले पुनर्विकासाचे प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी म्हाडाने मा.उच्च न्यायालयात अंतरिम अर्ज (Interim Application) दाखल करुन दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची विनंती करावी. त्यानुसार म्हाडातर्फे मा.उच्च न्यायालयात मुळ याचिका क्र.३४७७१/२०२४ मध्ये अंतरिम अर्ज क्र.३९३९९/२०२५ दाखल केला होता. म्हाडाच्या सदर अर्जावर मा.उच्च न्यायालयाने दि.०५.१२.२०२५ रोजीच्या आदेशावये असे निर्देश दिले की, ज्या प्रकरणांमध्ये मालकांने ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्रे घेऊन विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले तर अशा प्रस्तावांना म्हाडातर्फे पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात यावे.

सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीची कार्यवाही पुर्ण झाली असून, तपासणी अहवाल दि.०५.०३.२०२६ रोजी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आला आहे. तद्नंतर सदर प्रकरण पुन्हा मा. उच्च न्यायालयासमोर सुनावणीस आले असता मा. उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित असल्याने अंतिम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

➢ **<u>मा.सर्वोच्च न्यायलयीन प्रकरण</u>**

मा.उच्च न्यायालयाने वर नमुद याचिका क्रमांक ४७७/२०२५ मधील आदेश दि.०३.०४.२०२५ व याचिका क्रमांक ३४७७१/२०२४ मधील आदेश क्र.२८.०७.२०२५ या दोन्ही आदेशाविरुध्द स्थगिती मिळण्यासाठी म्हाडा / मंडळातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र.२१६९९/ २१७०५ ऑफ २०२५ दाखल करण्यात आली आहे. तसेच म्हाडा / मंडळातर्फे सविस्तर शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. म्हाडातर्फे मा. सर्वोच्च न्यायालयात बाजु मांडण्यासाठी सिनियर कौन्सिल श्री. तुषार मेहता (सॉलिसीटर जनरल) व सिनियर कौन्सिल श्री ध्रुव मेहता यांना नेमण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत शासनातर्फे ॲडव्होकेट श्री. सिद्धार्थ धर्माधिकारी हे सदर प्रकरण हाताळीत आहेत. सदर प्रकरणामध्ये अद्यापर्यंत अंतिम सुनावणी झालेली नसुन प्रकरण न्यायप्रविष्ट असुन पुढील सुनावणीची तारीख २०.०७.२०२६ देण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणामुळे, मंडळातर्फे नविन कलम ७९-अ नुसार इमारत मालकांना बजावण्यात आलेल्या नोटीसांविषयी पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य होत नाही.

वर नमुद केल्याप्रमाणे मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा जलद गतीने पुनर्विकास व्हावा याकरीता शासनातर्फे वेळोवेळी उपाययोजना केल्या असुन विकास नियंत्रण नियमावली ३३(७), ३३(९) व ३३(२४) अंतर्गत पुनर्विकास होत आहे.

माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

C154

म्हाडा MHADA

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

कक्ष क्रमांक ४१२, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पूर्व). मुंबई-४०० ०५१
दुरध्वनी क्रमांक- ०२२-६६४०५३८१ ई-मेल : aorr_mhada@rediffmail.com

जा.क्र.मु.अ./दुवपुमं/खा.चौ./प्र.४/E-12465 99/२०२६,
दिनांक-: 23 JUN 2026

प्रति,
अमोल राऊत, कक्ष अधिकारी,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
३ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

विषयः- महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १७
श्री. संजय खोडके, मा. वि.प.स. व इतर
संदर्भः- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.लवेसू-२०२६/प्र.क्र.१०५/गृनिभू, दि.२२ जून २०२६.

उपरोक्त विषयामध्ये उल्लेखित महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १७ बाबतचा अभिप्राय सोबत पाठविण्यात येत आहे.

सहमुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

o/c
23/06/26

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित रवानाः-
१. मुख्य अभियंता-३/ प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण.
३.सचिव/प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,

जा.क्र.मु.अ./दुवपुमं/खा.चौ./प्र.४/E-9246599 /२०२६,
दिनांकः- 23/6/2026.

विषयः- महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १७
श्री. संजय खोडके, मा. वि.प.स. व इतर.

संदर्भः- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.लवेसू-२०२६/प्र.क्र.१०५/गृनिभू.
दि.२२ जून २०२६.

लक्षवेधी सूचना क्रमांक १७

"मुंबईतील वरळी येथील म्हाडाच्या मिळकत व्यवस्थापक परिमंडळ चारच्या कार्यालयांतर्गत पुनर्रचित इमारतींसह संक्रमण शिबिरांमधील गाळयांचे तब्बल ५ कोटी ७० लाख रुपयांचे वसूल केलेले भाडे म्हाडाच्या अधिकृत खात्यात न भरता परस्पर लाटलयाची धक्कादायक बाब अंतर्गत चौकशीत माहे मे,२०२६ मध्ये निदर्शनास आली असणे, या कार्यालयातील भाडे वसुलीकार व वरिष्ठ लिपिक यांनी सन २०१५ ते २०२३ या कालावधीत रहिवाशांना दिलेलया २२,२०१ पावत्यांपैकी ८,६५८ पावत्यांची म्हाडाच्या कार्यालयात कुठेही नोंद न ठेवता हा म्हाडाच्या इतिहासातील मोठा आर्थिक गैरव्यवहार केला असणे, या वसुलीमधील गंभीर तक्रारींची दखल घेऊन मिळकत व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त केलेलया विशेष चौकशी समितीच्या अहवालानंतर या घोटाळयाचे वास्तव उघड झाले असणे, याप्रकरणी संशयित लिपिकावर दादर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी म्हाडाच्या गृहनिर्माण व्यवस्थेत गैरव्यवहार करणा-या अशा प्रवृत्तींमुळे शासकीय यंत्रणेच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होऊन जनतेत पसरलेली तीव्र संतापाची भावना, हा थकीत निधी वसूल करण्याची आणि म्हाडा प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये
लक्षवेधी सूचना क्रमांक १७

अभिप्रायः-

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत मुंबई शहरातील सुमारे १३००० उपकरप्राप्त इमारती आहेत. यापैकी जुन्या, मोडकळीस आलेलया इमारतींची पुर्नबांधणी/पुर्नविकास मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून करण्यात येतो. मंडळाकडे अशा एकूण ३८८ पुनर्रचित इमारतींमध्ये सुमारे ३०,००० गाळेधारक वास्तव्यास आहेत. उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करत असतांना गाळेधारकांना तात्पुरत्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात येते. एकूण ३४ संक्रमण शिबिरांमध्ये २०७०० गाळेधारक आहेत. पुनर्रचित इमारतीमधील राहणा-या गाळेधारकाकडून रु.५००/- मासिक भाडे आकारण्यात येते. संक्रमण शिबिरातील पात्र गाळेधारकाकडून रु.५००/- मासिक भाडे आणि अपात्र/घुसखोरांकडून रु.३०००/- मासिक भाडे वसूल करण्यात येते. सदर भाडेवसूलीची जबाबदारी भाडेवसूलीकार/रेंट कलेक्टर यांचेकडे सोपविण्यात येते.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीत मुंबई शहरातील फ-दक्षिण विभागातील एकूण २४ इमारतींमधील भाडेवसूली करणेकरिता श्री. जगदीश परशुराम धार्मिक यांची भाडेवसुलीकार म्हणून दि. ०४/०६/२०१५ पासून नेमणूक करण्यात आली होती.

दि.१३/०६/२०२३ रोजी पुनर्रचित इमारतीमधील रहिवाशी यांचेकडून कार्यालयात लेखी स्वरुपात पुनर्रचित गाळ्याचे जादा आकारण्यात आलेले भाडे/विलंब आकार परत मिळणे/समायोजीत करण्याबाबत अर्ज केला होता. अर्जदाराने अर्जासोबत माहे एप्रिल २०१८ ते मार्च २०२० या कालावधीचे भरणा केलेली भाडेपावती सादर केली होती. सदर कालावधीतील एका भाडेपावतीची पडताळणी श्री. धार्मिक यांनी कार्यालयात जमा केलेलया भाडेपावतीचे दुय्यम प्रतीची स्कॅनिंगसोबत पडताळणी केली असता तफावत आढळली. सदर बाब गंभीर असलयाने भाडेवसूलीकार श्री. जगदीश परशुराम धार्मिक, वरिष्ठ लिपिक यांना दि. १५/०६/२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविले.

सदरील ज्ञापनास श्री. जगदीश परशुराम धार्मिक, वरिष्ठ लिपिक यांनी दि. २०/०६/२०२३ रोजी खुलासा सादर केला. तथापि श्री. धार्मिक यांना सादर केलेला खुलासा समाधानकारक आढळून आला नाही. तसेच एकाच क्रमांकाच्या भाडेपावतीवर वेगवेगळी रक्कम वसूल-जमा केलयाबाबत त्यांनी खुलाश्यामध्ये

काहीही नमूद केलेले नाही. तसेच श्री. धार्मिक यांनी इतर गाळेधारकांना दिलेलया भाडेपावत्या व कार्यालयात जमा केलेलया भाडेपावतीचे दुय्यम प्रतींची पडताळणी केली असता फक्त २० पावत्यांमध्ये एकूण रु.१,०१,७३२/- ची अफरातफर असलयाचे दिसून आले. त्यामुळे श्री. धार्मिक यांच्या नेमणूकीपासूनच्या कालावधीत मोठया प्रमाणात अफरातफर केली असलयाचे शक्यता विभागप्रमुखांना वाटली.

सदर बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन कार्यरत मिळकत व्यवस्थापक/परि-४, दुवपु मंडळ यांनी श्री. धार्मिक यांच्या कार्यकाळातील भाडेवसूलीची चौकशी करण्यात यावी तसेच श्री. धार्मिक यांनी केलेलया आर्थिक अफरातफरीबाबत त्यांचे तात्काळ निलंबन करुन पुढील चौकशीबाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणेकरिता प्रकरण सादर केले. सदर प्रकरणी मा. मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ यांनी दि. १०/०७/२०२३ रोजी श्री. धार्मिक यांना तात्काळ सेवेतुन निलंबित केले. तसेच दि. १०/०७/२०२३ रोजी श्री. धार्मिक यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेली भाडेवसुली व वसुल रक्कमेचा कार्यालयात केलेला भरणा याबाबत सखोल लेखापरीक्षण करुन अहवाल सादर करणेकरिता श्री. एन. आर. रंगाली, लेखा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

समितीने श्री. धार्मिक यांच्या कार्यकाळातील भाडेवसूलीचे लेखापरिक्षण करुन दि. १२/०९/२०२५ रोजी सादर केलेलया अहवालातील मुददे् संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणेः-

- कार्यालयातील TR Book च्या नोंदीवरुन श्री. धार्मिक यांना त्यांच्या एकूण कार्यकाळात २४८७४ पावत्या देण्यात आलया.
- २४८७४ पावत्यांपैकी २२२०९ पावत्या श्री. धार्मिक यांनी रहिवाश्यांना निर्गमित केलया व २६६५ पावत्या कार्यालयास परत केलया.
- रहिवाश्यांना निर्गमित केलेलया एकूण २२२०९ पावत्यांपैकी १३५५१ पावत्यांचे रेमिटन्स कार्यालयात उपलब्ध आहेत म्हणजेच ८६५८ पावत्यांचे रेमिटन्स कार्यालयात आढळून आले नाहीत.
- मिळकत व्यवस्थापक/परि-४, दुवपु मंडळ कार्यालयाने श्री. धार्मिक यांच्या कार्यकक्षेत असलेलया २४ इमारतींमध्ये जाऊन भाडेकरु/रहिवाशी यांच्याकडून पावतींची फोटोकॉपी जमा करणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार श्री. धार्मिक यांनी निर्गमित केलेलया एकूण २२२०९ पावत्यांपैकी फक्त ७,००० पावतींची फोटोकॉपी तपासणीकरिता उपलब्ध झाली. सदरच्या ७,००० पावत्यांच्या

फोटोकॉपींपैकी काही पावत्यांचे फोटो दोनदा असलयाने अथवा श्री. धार्मिक यांच्याशी निगडित नसलयाने समितीकडे फक्त ६५९१ पावत्या उपलब्ध झालया.

- ६५९१ पावत्यांचे व श्री. धार्मिक यांनी कार्यालयात जमा केलेलया रेमिटन्सची पडताळणी करण्यात आली. त्यापैकी २२६ पावत्यांवरील क्रमांक अस्पष्ट असलयाने त्यांची पडताळणी करता आली नाही. २९९७ पावत्यांचे रेमिटन्स कार्यालयात जमा केले नसलयाचे आढळले. व उरलेलया ३३६८ पावत्यांवरील रक्कम व श्री. धार्मिक यांनी रेमिटन्सप्रमाणे कार्यालयात भरणा केलेली रक्कम यात रु. ५३,२६,६४०/- इतकी तफावत आढळून आली. म्हणजेच ३३६८ पावत्यांमधील अपहाराची रक्कम रु. ५३,२६,६४०/- इतकी आहे. तसेच कार्यालयात रेमिटन्सव्दारे जमा न करण्यात आलेली २९९७ पावत्यांवरील रक्कम रु. १,२३,३५,६८६/- इतकी आहे, जी रक्कम त्यांनी कार्यालयात जमा केली नसलयाची शक्यता नाकारता येत नाही.
- श्री. धार्मिक यांनी त्यांच्या कार्यकाळात निर्गमित केलेलया २२,२०९ पावत्यांपैकी ३३६८+२९९७=६३६५ पावत्यांमध्ये दिसून आलेलया अपहारानुसार एकूण २२,२०९ पावत्यांमधील आर्थिक अपहाराचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.
- श्री. धार्मिक यांनी जमा केलेलया ३३६८ पावत्यांवरील रक्कम व रेमिटन्सप्रमाणे कार्यालयात भरणा केलेली रक्कम यात रु. ५३,२६,६४०/- इतकी आहे त्या हिशोबाने सरासरीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध एकूण १३,५५१ भाडेपावती रेमिटन्समधील तफावतीची रक्कम अंदाजे रु.२,१४,३१,५०२/- इतकी असू शकते.
- श्री. धार्मिक यांनी कार्यालयात जमा न केलेलया २९९७ पावत्यांवरील रक्कम रु. १,२३,३५,६८६/- इतकी असलयाने त्या हिशोबाने सरासरीप्रमाणे ८,६५८ पावत्यांवरील रक्कम रु. ३,५६,३६,४२६/- इतकी असू शकते.
- याप्रमाणे श्री. धार्मिक यांनी कार्यालयात जमा केलेलया पावत्यांमधील तफावतीची रक्कम अंदाजे रु. २,१४,३१,५०२/- इतकी व कार्यालयात जमा न केलेलया पावत्यांमधील रक्कम अंदाजे रु. ३,५६,३६,४२६/- इतकी अशी एकूण रक्कम अंदाजे रु. ५,७०,६७,९२८/- येते.

समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने उपमुख्य अधिकारी/पु.गा. कार्यालयाकडून श्री. धार्मिक यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन विभागीय चौकशीकामी दोषारोप मसूदा मागविण्यात आला. दि. २४/०२/२०२६ रोजी उपमुख्य अधिकारी/पु.गा. कार्यालयाकडून श्री. धार्मिक यांच्याविरुध्दचा दोषारोप मसूदा प्राप्त झाला.

श्री. जगदीश परशुराम धार्मिक, वरिष्ठ लिपिक तथा भाडेवसूलीकार यांनी एकूण रक्कम अंदाजे रु. ५,७०,६७,९२८/- चा केलेला सरकारी पैशांचा अपहार हा गंभीर गुन्हा असलयाने त्यांचेविरुध्द सैतान चौकी, दादर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.१४२/२०२६ कलम B.N.S.S. १७३ च्या अंतर्गत भारतीय न्याय संहिता १८६० कलम ४०९ अन्वये दिनांक १२/०३/२०२६ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील कारवाई पोलीस स्टेशन मार्फत सुरु आहे.

श्री. जगदीश परशुराम धार्मिक, वरिष्ठ लिपिक यांचेविरुध्द दि. १३/०३/२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप ठेवून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता श्री. जगदीश परशुरामजी धार्मिक, भाडेवसुलीकार यांनी केलेलया शासकीय पैशांच्या अपहारप्रकरणी त्यांचेविरुध्द करावयाच्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीकरीता मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/महाराष्ट्र गृहनिमाण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या निर्देशांस अनुसरुन दि. १०/०४/२०२६ रोजी सचिव/महाराष्ट्र गृहनिमाण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या अध्यक्षतेखाली शिघ्रकृती चौकशी समिती नेमण्यात आली आहे. शिघ्रकृती चौकशी समिती पहिली बैठक दि. २३/०४/२०२६ रोजी संपन्न झाली.

दि. ५/६/२०२६ रोजी श्री. धार्मिक यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीप्रकरणी मा. मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु. मंडळ यांनी चौकशी अधिकारी म्हणून शिघ्रकृती चौकशी समितीस चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत. श्री. धार्मिक यांचेवर ठेवण्यात आलेलया दोषारोपांची चौकशी करणेकरिता त्यांची प्राथमिक सुनावणी दि. १९/६/२०२६ रोजी ठेवण्यात आली होती. श्री. जगदीश परशुराम धार्मिक, वरिष्ठ लिपिक हे प्राथमिक सुनावणीकरिता अनुपस्थित होते. पुढील नियमित सुनावणी दि. ३०/०६/२०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.

C/51

तसेच म्हाडाच्या पुनर्रचित इमारतीसह संक्रमण शिबिरामधील गाळयांची भाडेवसूलीची प्रक्रिया सन २०२१ पासून पूर्णतः ऑनलाईन पध्दतीने करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणांची पुनरावृत्ती होऊ शकत नाही.

श्री. धार्मिक यांच्या कार्यकाळातील भाडेवसूलीचे लेखापरिक्षण करुन दि. १२/०९/२०२५ रोजी श्री. रंगाली यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेलया अहवालनुसार रु. ५,७०,६७,९२८/- ही अपहाराची रक्कम उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे अंदाजे काढण्यात आलेली आहे. तरी श्री. धार्मिक यांनी दि.१९/०१/२०२६, दि.२७/०१/२०२६ व दि. ०३/०२/२०२६ च्या पत्रांन्वये केलेलया निवेदनानुसार भाडेवसूलीचा भरणा केलेलया एकूण ८३५८ इतक्या पावत्या त्यांच्याकडे असून त्यांनी ते कार्यालयास जमा करण्याची विनंती केलेली आहे. नियमित सुनावणीदरम्यान सदरच्या पावत्या व रेमिटन्स रिपोर्ट श्री. धार्मिक यांनी शिघ्रकृती चौकशी समितीसमोर सादर केलयानंतर श्री. रंगाली यांच्या अध्यक्षतेखालील लेखापरिक्षण समितीकडे देण्यात येऊन पुर्नलेखापरिक्षणाअंती श्री. धार्मिक यांनी केलेलया आर्थिक अपहाराची रक्कम अंतिमतः सिध्द करण्यात येईल. तसेच श्री. धार्मिक यांच्याविरुध्दच्या विभागीय चौकशीच्या प्रक्रियेअंती त्यांनी केलेलया आर्थिक अपहाराची रक्कम अंतिमरित्या सिध्द झालयानंतर वसूलीची प्रक्रिया योग्य त्या कायदेशीर पध्दतीने सुरु करण्यात येईल.

सहमुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHOHRITY

म्हाडा MHADA

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये सूचना क्र.५४६

जा.क्र.मुअ/निकाअ/लवेसू/ 4607 /दुवपु-२०२६

दिनांक: 06 JUL 2026

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,

गृहनिर्माण विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५४६

"दक्षिण मुंबईतील इमारती धोकादायक आहेत अथवा नाहीत व त्यांना पाठविण्यात आलेल्या नोटिसा देखील वैध आहेत अथवा नाहीत, हे तपासण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने गठित केलेल्या दोन निवृत्त न्यायाधीशांच्या समितीच्या अहवालात दक्षिण मुंबईतील तब्बल 13 हजार इमारती धोकादायकच असल्याचे अधोरेखित करण्यात आले असणे, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने बजावलेल्या 79 (अ) च्या नोटिसा वैध नसल्याचे, तसेच इमारती धोकादायक नसल्याचे म्हणत इमारत मालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असणे, त्यानुसार न्यायालयाने म्हाडा सक्षम प्राधिकरण नसल्याचे सांगत दुरुस्ती मंडळाने पाठविण्यात आलेल्या 79 (अ) च्या नोटिसा अवैध ठरवल्याने उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाला बसलेली खीळ, हे प्रकरण सद्यस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणे, म्हाडाला सक्षम प्राधिकरणाचा अधिकार देण्यास हरकत नसल्याचे व राज्य सरकार, म्हाडा तसेच मुंबई महापालिकेने एकत्र येऊन या धोकादायक इमारतींचा प्रश्न निकाली लावणे गरजेचे असल्याचेही सदरहू अहवालात नमूद करण्यात आले असणे, वास्तव सदरहू अहवालाच्या आधारे राज्य शासनाने यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला दावा निकाली काढण्यासाठी आणि या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी करावयाची ठोस कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

- श्री. सुनिल शिंदे, विधानपरिषद सदस्य.

विषय: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय यांचे दि.०६.०७.२०२६.

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **महाराष्ट्र विधानपरिषद नियम - १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ५४६** बाबतचा अभिप्राय सोबत सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-

१. मुख्य अभियंता - १/३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत. पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-

१. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १. महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५४६

- श्री. सुनिल शिंदे, विधानपरिषद सदस्य.

"दक्षिण मुंबईतील इमारती धोकादायक आहेत अथवा नाहीत व त्यांना पाठविण्यात आलेल्या नोटिसा देखील वैध आहेत अथवा नाहीत, हे तपासण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने गठित केलेल्या दोन निवृत्त न्यायाधीशांच्या समितीच्या अहवालात दक्षिण मुंबईतील तब्बल 13 हजार इमारती धोकादायकच असल्याचे अधोरेखित करण्यात आले असणे, म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने बजावलेल्या 79 (अ) च्या नोटिसा वैध नसल्याचे, तसेच इमारती धोकादायक नसल्याचे म्हणत इमारत मालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली असणे, त्यानुसार न्यायालयाने म्हाडा सक्षम प्राधिकरण नसल्याचे सांगत दुरुस्ती मंडळाने पाठविण्यात आलेल्या 79 (अ) च्या नोटिसा अवैध ठरवल्याने उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाला बसलेली खीळ, हे प्रकरण सद्यस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणे, म्हाडाला सक्षम प्राधिकरणाचा अधिकार देण्यास हरकत नसल्याचे व राज्य सरकार, म्हाडा तसेच मुंबई महापालिकेने एकत्र येऊन या धोकादायक इमारतींचा प्रश्न निकाली लावणे गरजेचे असल्याचेही सदरहू अहवालात नमूद करण्यात आले असणे, यास्तव सदरहू अहवालाच्या आधारे राज्य शासनाने यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला दावा निकाली काढण्यासाठी आणि या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी करावयाची ठोस कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया.."

==========

अभिप्राय:-

सदर लक्षवेधीमध्ये मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाशी संबंधित मुद्दयांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय सादर करण्यात येत आहे.

शासनाने दि.२९.१०.२०१६ रोजी मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर आमदाराच्या समितीची दि.१९.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समिती सदस्यांनी मुंबई बेटावरील अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतींचा तातडीने पुनर्विकास करण्यासाठी तसेच रखडलेल्या / बंद पडलेल्या / अर्धवट सोडलेल्या पुनर्विकास योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत उपाय योजना सुचविलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मंडळाने दि.१३.१०.२०१७, दि.२६.१०.२०१७, दि.०९.१०.२०१८ व दि.१२.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये म्हाड अधिनियम कलम ७७ व ९१ मध्ये सुधारणा सुचविलेल्या होत्या.

मा.आमदारांनी सुचविलेल्या उपाययोजनेच्या अनुषंगाने, शासनाने म्हाड अधिनियमात कलम ७७, ७९ व ९१ मध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणांना पावसाळी अधिवेशन २०२० मध्ये मान्यता दिली होती. (L.A.Bill No.XLI of २०२०). त्यानुसार सदर विधेयकास मा.महामहिम राष्ट्रपती महोदयांनी मान्यता प्रदान केली असून, शासनाने सदर विधेयक दि.०२.१२.२०२२ रोजी प्रसिध्द केले आहे. सुधारित **कलम ७९(अ)** मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहे.

➢ **नविन कलम ७९(अ)**

"79-A. *(1) Notwithstanding anything contained in sub-section (3) of section 88 and section 92 of this Act and sections 354 and 499 of the Mumbai Municipal Corporation Act, (III of 1988), in case of the building to which the provisions of sub-section (1) of section 82 applies (hereinafter in this Act referred to as "cessed building"), which is declared dangerous by the Mumbai Municipal Corporation under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act (III of 1988) or by the competent authority, if the redevelopment of such building is not taken up by the owner or landlord of the cessed building, within three months from the date of issue of notice under section 354 of the Mumbai Municipal Corporation Act by the Mumbai Municipal Corporation (III of 1988) or the competent authority, the Board may adopt the following procedure :–*

(a) a notice shall be issued to the owner or landlord of the cessed building to submit the proposal for redevelopment within six months from the date of issue

of notice. Alongwith the proposal, consent of fifty-one per cent of the occupants or tenants of the said building shall be accompanied;

(b) if the owner or landlord fails to submit the proposal within the period and the manner as provided in clause (a), the proposed co-operative housing society of the occupants or tenants of such building may submit the proposal to the Board, for redevelopment of such building under the relevant provisions of the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai, within six months from the date of communication received from the Board. The proposal shall be accompanied with the consent of at least fifty-one per cent of the occupants or tenants:

Provided *that, when the building is redeveloped by the proposed co-operative housing society, the compensation to the owner or landlord shall be paid by the concerned co-operative housing society as per the provisions of sub-section (2);*

(c) if the redevelopment is not initiated within the period and manner as provided in clauses (a) and (b), the Board shall reconstruct the building by acquiring such building, without insisting on consent of at least fifty-one per cent of the occupants or tenants of the said building.

(2) When the building is redeveloped under the provisions of clauses (b) and (c) of sub-section (1), the compensation shall be paid to the owner or landlord, at the rate of twenty-five per cent. of the amount of Ready Reckoner Rates, determined under the Maharashtra Stamp (Determination of True Market Value of Property) Rules, 1995 of the open land of such building or fifteen per cent. of the built-up area of sale
component determined as per the Ready Reckoner Rates, whichever is higher.

Explanation– For the purposes of this sub-section, "sale component" means the built-up area remaining after deducting Rehab Built-up Area from the permissible Built-up Area admissible as per the relevant provisions of the Development Control and Promotion Regulations-2034
for Greater Mumbai.

(3) If the building is redeveloped by the Board under clause (c) of sub-section (1), subject to the provisions of sub-section (2) for payment of compensation, the provisions of sections 92 and 93 shall mutatis mutandis apply, for acquisition of such building."

उपरोक्त म्हाड अधिनियमातील सुधारणा अंतिम झाल्यानंतर, शासन गृहनिर्माण विभागाने नविन कलम ७९अ व ९१अ मधील तरतुदीची अमलबंजावणी करण्याकरिता, दि.२२.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

मंडळाने एका प्रकरणामध्ये कलम ७९अ अंतर्गत मालकांस बजाविण्यात आलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने इमारत मालक गयासुउद्दीन किफायतुल्ला जरीवाला यांनी दुरुस्ती मंडळाविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक ३७४३/२०२३ दाखल करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत आव्हान दिले होते. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.०२.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेली कलम ७९अ अंतर्गत नोटीस खारीज करुन इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत म्हाडाने संबंधित इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांशी बैठक घेऊन, इमारतींच्या संरचनात्मक स्थितीची शहानिशा करण्याचे निर्देश दिले. या निर्देशांच्या अनुषंगाने, म्हाडाने दि.१९.०३.२०२४ व दि.०५.१२.२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये इमारतींच्या धोकादायक स्थितीबाबत खातरजमा करण्याच्या अनुषंगाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना (Standard Operating Procedure) निर्गमित केलेल्या आहेत.

सुधारित कलम ७९अ च्या तरतुदी या डिसेंबर २०२२ पासुन अंमलात आलेल्या आहेत. या तरतुदीनुसार, सुरुवातीला इमारत मालकांना ०३ महिन्याची नोटीस देऊन इमारत धोकादायक असल्याबाबत कळवावयाचे आहे. या कालावधीत इमारत मालकांने इमारतींच्या पुनर्विकासाबाबत काहीच कार्यवाही केली नाही तर, कलम

७९अ नुसार इमारत मालकांस नोटीस बजावून ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या ०६ महिन्यांच्या कालावधीत इमारत मालकांनी पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले नाही तर, संबंधित क्षेत्रिय उपमुख्य अभियता यांनी मालक व भाडेकरु / रहिवाशी यांची संयुक्त सुनावणी घेऊन, आदेश पारित करणे आवश्यक आहे. तद्नंतर कलम ७९अ(१ब) नुसार इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांना ०६ महिन्यांच्या कालावधीत पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याबाबतची नोटीस जारी केली जाते. या सर्व प्रक्रियेला सुमारे १५ महिन्यांच्या कालावधी लागतो. कलम ७९अ(१अ) व ७९अ(१ब) या तरतुदी म्हाड अधिनियमात नव्यानेच अंतर्भुत केल्या असल्याने, त्यामध्ये उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक व कायदेशीर बाबी विचारात घेता, मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सुधारित म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ अंतर्गत तरतुदीनुसार, शासन गृहनिर्माण विभागाने व म्हाडाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आतापर्यंत **कलम ७९अ अंतर्गत जीर्ण झालेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या मालकांना मंडळाने बजाविलेल्या नोटीसची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.**

❖ **७९अ(१अ)**

- कलम ७९अ अंतर्गत बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : **९३५**
- इमारत मालकांनी सादर केलेल्या पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : **१०८**
- इमारत मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेल्या प्रकल्पांची संख्या : **४३**
- मंडळातर्फे छाननी सुरु असलेले उर्वरित पुनर्विकास प्रकल्पाची संख्या : **६५**
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१अ) नोटीसची मुदत संपल्यानंतर, संबंधित उपमुख्य अभियंता, दुवपु मंडळ यांनी इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेतलेल्या प्रकरणांची संख्या : **६२२**
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : **५९६**

❖ **७९अ(१ब)**

- कलम ७९अ(१ब) अंतर्गत तरतुदीनुसार भाडेकरु / रहिवाश्यांच्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेस बजाविण्यात आलेल्या नोटीसांची एकूण प्रकरणे : **३८८**
- भाडेकरु / रहिवाश्यांनी कलम ७९अ(१ब) तरतुदीनुसार पुनर्विकास प्रस्ताव सादर केलेले एकूण प्रकरण : **५१**
- इमारत मालकांना बजाविण्यात आलेल्या कलम ७९अ(१ब) नोटीसची मुदत संपल्यानंतर, इमारत मालक व भाडेकरु / रहिवाश्यांची संयुक्त सुनावणी घेण्यात आलेल्या प्रकरणांची संख्या : **१५९**
- सुनावणीनंतर सुनावणीचे आदेश पारित केलेल्या प्रकरणांची संख्या : **१३२**
- ७९अ(१ब) अंतर्गत भाडेकरु / रहिवाश्यांना पुनर्विकासाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यापुर्वी सदर मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता, दुवपु मंडळ यांनी भुसंपादन करण्याकरिता सादर केलेल्या एकूण प्रस्तावाची संख्या : **१६**
- शासन गृहनिर्माण विभागास भुसपांदनासाठी सादर केलेले प्रस्ताव : **१६**

➢ **न्यायालयीन प्रकरणे:**

मंडळाने एका प्रकरणात **"शुरजी वल्लभदास चाळ", वरळी नाका, ग-दक्षिण विभाग** या धोकादायक उपकरप्राप्त इमारतींच्या मालकास नविन कलम ७९अ(१अ) अंतर्गत दि.१९.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजावून, ६ महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले होते. परंतु मालक हे ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्र मिळवू न शकल्याने, मंडळाच्या संबंधित उपमुख्य अभियंता यांनी सुनावणी घेऊन दि.२४.०७.२०२४ रोजी आदेश पारित केले की, "संबंधित कार्यकारी अभियंता यांनी नविन कलम ७९अ(१ब) नुसार भाडेकरु / रहिवाश्यांना नोटीस बजावून, पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळवावे." त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांनी दि.३०.०७.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे भाडेकरु / रहिवाश्यांना ५१ टक्के संमतीपत्रासह पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले. तद्नंतर इमारत मालक मेसर्स विमलनाथ शेल्टर प्रा.लि., यांनी महाराष्ट्र शासन / म्हाडा व भाडेकरु / रहिवाश्यांविरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४७७/२०२५ दाखल करुन मंडळाने बजाविलेल्या नोटीसला आव्हान दिले. तसेच

म्हाड अधिनियमातील नविन कलम ७९अ च्या संविधानिक वैधतेला सुध्दा आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने दि.०३.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेल्या नोटीस खारीज केल्या.

मा.उच्च न्यायालयाने दि.०३.०४.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

13.3) A bare perusal of Section 79-A reveals that, the cessed building has to be first declared as 'dangerous' as mandated under Section 354 of the BMC Act by the competent Authority of BMC. Necessarily, the requirements of Section 354 are required to be met either by the BMC or the 'competent Authority'.

14) We are unable to accept the argument of Mr. Lad that MBR&RB is the competent Authority because, Section 2 (11) of MHADA Act defines "competent Authority" as a person appointed under Section 65 of the MHADA Act which requires the "competent Authority" to be appointed by Notification in the Official Gazette by the State Government being a person not below the rank of the 'Deputy Collector' or 'Civil Judge'. Thus, the Respondent No.3-MBR&RB would not qualify to be a 'Competent Authority'. Moreover, the notice does not even assert that, the Respondent No. 3 is the competent Authority. Consequently, the finding that building is 'dangerous' fails to meet with the mandate of Section 354.

19) Therefore, on a plain reading of Section 79-A two notices to the owner are contemplated, first a three month notice for taking steps to repair the building and second, a six months' notice thereafter. Only failure of the owner to take steps for the redevelopment of the building with the consent of 51% of the tenants that the tenants are granted an opportunity under Section 79-A(1)(b).

22) In this case, the requirements under Section 79-A are clearly not fulfilled by the MHADA. Ex facie the notice dated 19th May 2023 is not based on a finding that the building is 'dangerous' either from the Municipal Corporation or the Competent Authority as required under Section 354 of the BMC Act. Hence the notice under Section 79-A of MHADA Act dated 19th May 2023 is invalid in law. Consequently, the order dated 24th July 2024 and the Notice dated 30th July 2024 following the Order are vitiated.

23) Hence the impugned Notices dated 19th May 2023; 30 July 2024 and Order dated 24th July 2024 are set aside.

अशाच प्रकारच्या दुसऱ्या प्रकरणांमध्ये **"शिरीन मेन्शन", नौशिर भरुचा मार्ग, ग्रॅटरोड-पश्चिम,** डी-२ विभागातील या इमारतीच्या मालकास नविन कलम ७९अ(१अ) अंतर्गत नोटीस बजावून, ६ महिन्याच्या आत पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले होते. परंतू मालक हे ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्र मिळवू न शकल्याने, मंडळाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांनी नविन कलम ७९अ(१ब) नुसार भाडेकरु / रहिवाश्यांना नोटीस बजावून, पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले. तद्नंतर इमारत मालक मेसर्स जावेद अब्दुल रहिम अख्तर, यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ३४७७१/२०२४ दाखल करुन मंडळाने बजाविलेल्या नोटीसला आव्हान दिले. मा.उच्च न्यायालयाने दि.०८.०७.२०२५ व दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मंडळाने बजाविलेल्या नोटीसला स्थगिती देण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने दि.०८.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

- ***We find that the impugned notice dated 17.05.2013, as assailed in this petition, issued under Section 79-A of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 ("MHADA Act"), is ex-facie illegal and wholly contrary to the provisions of Section 79-A. The basic requirements of the building being categorized by the Municipal Corporation of Greater Mumbai to be dangerous by issuing a notice***

under Section 354 or on its declaration by Competent Authority as constituted under Section 65 of the MHADA Act, were not issued. Thus, the Executive Engineer had no jurisdiction to issue the impugned notice. It prima facie appears to us that this is a high-handed action on the part of Shri Abhay Ramteke, the Executive Engineer and we are not aware as to how many such notices have been issued by these officers.

- ***The Vice-Chairman of MHADA is directed to consider as to how many other matters these officers have issued 79-A notices and to examine each and every matter whether the same is bonafide. If it is found that the same is not bonafide, an inquiry be instituted against these officers. We are absolutely sure, in the facts of the present case, that the impugned notice is not only in excess of jurisdiction but also an abuse of the power by such Executive Engineer, which cannot be taken lightly. The Vice-Chairman would also take a decision whether MHADA would continue to hold such notices as legal and valid, more particularly considering the clear and unambiguous provisions of Section 79-A of the MHADA Act. Let a statement in this regard be made before the Court on the adjourned date of hearing.***

उपरोक्त आदेशानंतर म्हाडा / मंडळातर्फे सविस्तर शपथपत्र दि.१६.०७.२०२५ रोजी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आले होते. तसेच म्हाडा/मंडळातर्फे मा.उच्च न्यायालयासमोर बाजु मांडण्यासाठी सिनिअर काऊन्सिल श्री. जनक व्दारकादास यांची नेमणूक केली होती. परंतू मा.उच्च न्यायालयाने म्हाडा / मंडळाची बाजु ऐकून न घेता, दि.२८.०७.२०२५ रोजी आदेश पारित केले.

मा.उच्च न्यायालयाने दि.२८.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये प्रामुख्याने खालील नमुद निर्देश दिले आहेत.

ORDER

(i) A Committee headed by Shri. Justice J. P. Devadhar, Former Judge of this Court alongwith Shri. Vilas D. Dongre, Retired Principal District Judge, is appointed to examine the issues in regard to the 935 notices issued under Section 79-A including, the subsequent actions to withdraw such notices, and the role of the different officials and/or motives if any, in issuance of these notices. Also the Committee shall examine the purpose, basis, intention and the authority of the Vice-Chairman to issue the SOP dated 5 December, 2024.

(ii) The MHADA shall place before such Committee the entire record in regard to all such notices, the details of the properties involved, names of the officials who have issued such notices, and all other relevant details as the Committee may intend to have and/or it may deem fit and proper, in regard to the decisions taken to issue such notices.

(iii) We accept the statement of Mr. Lad that insofar as the 46 notices issued after the decision of the Division Bench in Vimalnath Shelters (supra) are being withdrawn. Let the MHADA/Board issue a notice of withdrawal of such notices along with the names of the parties to whom such notices were issued. Appropriate intimation of the withdrawal of these notices be issued to the concerned parties within one week from today.

(iv) We also accept the statement as made on behalf of the MHADA /Board that the 889 notices shall be kept in abeyance and no further action shall be taken under them, unless the parties have consented in the redevelopment and the redevelopment has progressed. However, all the 935 notices shall form subject matter of consideration of the

Committee, so as to enable the Committee to form an overall opinion on these notices.

(v) Insofar as the impugned notices as assailed in these petitions are concerned, if they are not included in those being withdrawn by the MHADA/Board, the same shall remain stayed.

(vi) We keep open all other legal issues and larger contentions as urged on behalf of the petitioners, to be examined after the reply affidavits are filed on the legality of the provisions.

(vii) The Committee shall hear all these stakeholders in relation to the notices and the SOP in examining the issues as underscored by us and make its report to the Court.

(viii) All contentions of the parties in that regard, to be urged before the Committee, are expressly kept open.

(ix) The report be placed before the Court preferably within a period of six months from today.

(x) The Vice Chairman of MHADA shall provide suitable venue / conference hall for the Committee to hold its sittings as also provide appropriate administrative and Secretarial assistance.

सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३४७७१/२०२४ मधील दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नविन कलम ७९अ नुसार पुढील कार्यवाही करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे. तसेच सदर आदेशामध्ये असेही नमुद करण्यात आले आहे की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ हे इमारत धोकादायक घोषित करण्यासाठी सक्षम प्राधिकरण नाही. तसेच मा.उच्च न्यायालयाने मंडळातर्फे नविन कलम ७९अ नुसार मालकांना बजाविलेल्या एकूण ९३५ नोटिस बाबतची तपासणी करण्यासाठी ०२ निवृत्त न्यायाधिश मा.श्री.जे.पी. देवधर व मा.श्री.विलास डी. डोंगरे यांची नेमणूक केली असून, तपासणी अहवाल ०६ महिन्याच्या आत न्यायालयात सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या ०२ निवृत्त न्यायाधिशांच्या समितीने अद्यापपर्यंत संबंधित सर्व कार्यकारी अभियता यांच्या सुनावण्या घेतल्या आहेत. तसेच दि.०४.११.२०२५ ते दि.२०.११.२०२५ या कालावधीमध्ये एकूण ३१२ मालक व एकूण ५०१ इमारतीच्या भाडेकरु / रहिवाश्यांसोबत सुनावण्या घेतल्या आहेत. तसेच ज्या इमारतींना मंडळाने नोटीस बजाविलेल्या आहेत अशा काही इमारतींची संबंधित अधिकाऱ्यासोबत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या दोन निवृत्त न्यायाधिशांच्या समितीने संबंधित मालक व भाडेकरु / रहिवाश्यांच्या सुनावण्या घेतल्यानंतर, त्यांच्या असे निदर्शनास आले की, मंडळाने कलम ७९अ(१अ) अंतर्गत नोटीस बजाविल्यानंतर काही मालकांनी ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांनी संमतीपत्र प्राप्त करुन पुनर्विकासाचे प्रस्ताव मंडळास सादर केले आहेत व तसेच काही मालक हे पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्याच्या तयारीत आहे. परंतू मा.उच्च न्यायालयाच्या दि.२८.०७.२०२५ रोजीच्या स्थगिती आदेशामुळे म्हाडास पुढील कार्यवाही करणे शक्य होत नाही. या कारणास्तव सदर समितीने दि.०४.११.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांतामध्ये म्हाडास असे सुचविले की, मालक आणि भाडेकरु / रहिवाश्यांनी एकत्र येऊन सादर केलेले पुनर्विकासाचे प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी म्हाडाने मा.उच्च न्यायालयात अंतरिम अर्ज (Interim Application) दाखल करुन दि.२८.०७.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची विनंती करावी. त्यानुसार म्हाडातर्फे मा.उच्च न्यायालयात मुळ याचिका क्र.३४७७१/२०२४ मध्ये अंतरिम अर्ज क्र.३९३९९/२०२५ दाखल केला होता. म्हाडाच्या सदर अर्जावर मा.उच्च न्यायालयाने दि.०५.१२.२०२५ रोजीच्या आदेशावये असे निर्देश दिले की, ज्या प्रकरणांमध्ये मालकांने ५१ टक्के भाडेकरु / रहिवाश्यांचे संमतीपत्रे घेऊन विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर केले तर अशा प्रस्तावांना म्हाडातर्फे पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात यावे.

सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीची कार्यवाही पुर्ण झाली असून, तपासणी अहवाल दि.०५.०३.२०२६ रोजी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात आला आहे. तद्नंतर सदर प्रकरण पुन्हा मा. उच्च न्यायालयासमोर सुनावणीस आले असता मा. उच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, सद्य:स्थितीत सदर

प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी प्रलंबित असल्याने अंतिम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

➢ **मा.सर्वोच्च न्यायलयीन प्रकरण**

मा.उच्च न्यायालयाने वर नमुद याचिका क्रमांक ४७७/२०२५ मधील आदेश दि.०३.०४.२०२५ व याचिका क्रमांक ३४७७१/२०२४ मधील आदेश क्र.२८.०७.२०२५ या दोन्ही आदेशाविरुध्द स्थगिती मिळण्यासाठी म्हाडा / मंडळातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र.२१६९९/ २१७०५ ऑफ २०२५ दाखल करण्यात आली आहे. तसेच म्हाडा / मंडळातर्फे सविस्तर शपथपत्र मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. म्हाडातर्फे मा. सर्वोच्च न्यायालयात बाजु मांडण्यासाठी सिनियर कौन्सिल श्री. तुषार मेहता (सॉलिसीटर जनरल) व सिनियर कौन्सिल श्री ध्रुव मेहता यांना नेमण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत शासनातर्फे ॲडव्होकेट श्री. सिद्धार्थ धर्माधिकारी हे सदर प्रकरण हाताळीत आहेत. सदर प्रकरणामध्ये अद्यापर्यंत अंतिम सुनावणी झालेली नसुन प्रकरण न्यायप्रविष्ट असुन पुढील सुनावणीची तारीख २०.०७.२०२६ देण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणामुळे, मंडळातर्फे नविन कलम ७९-अ नुसार इमारत मालकांना बजावण्यात आलेल्या नोटीसांविषयी पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य होत नाही.

माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHOHRITY

म्हाडा MHADA

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये सूचना क्र.५४५

जा.क्र.मुअ/निकाअ/लवेसू/ 4606 /दुवपु-२०२६

दिनांक: 06 JUL 2026

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,

गृहनिर्माण विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय: महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५४५

"पावसाळ्याच्या तोंडावर महामुंबईतील 9 महापालिकांनी आणि 'म्हाडा' ने तब्बल 827 इमारती 'अतिधोकादायक', तर 18,072 इमारती 'धोकादायक घोषित केल्या असल्याची बाब दिनांक 16 जून, 2026 रोजी निदर्शनास येणे, आगामी पावसाळ्यात बाहेर पाऊस आणि इमारतींच्या गळक्या छपरांखाली लाखो नागरिक जीव मुठीत घेऊन राहत असल्याचे चित्र पहावयास मिळणार असणे, मात्र, याचे यंत्रणांना सोयर-सुतक नसणे, केवळ कागदी घोडे नाचवून व इमारत रिकाम्या करण्याच्या नोटीसा चिकटवून यंत्रणा आपली जबाबदारी झटकून मोकळ्या होणे, लाखो रहिवाशांचा जीव असा टांगणीला लागला असताना, सरकारी यंत्रणा आणि पालिका प्रशासन केवळ बळी जाण्याची वाट पाहत असल्याचा आरोप या इमारतीत वास्तव्यास असणारे रहिवाशी करणे, दरवर्षी पावसाळ्यात जुन्या व अतिधोकादायक इमारती कोसळून काही रहिवाशी मृत्यूमुखी पडणे, तद्नंतर इमारत धोकादायक ठरवून जागा रिकामी करण्याची नोटीस त्यांना देण्यात आली असल्याची कातडी बचाव भूमिका पालिका व शासकीय यंत्रणेकडुन घेतली जाणे, परंतू त्या रहिवाशांना इमारत धोकादायक ठरविल्यावर पर्यायी जागा देण्याची जबाबदारी मात्र या यंत्रणांकडून बरेचदा घेतली न जाणे, यास्तव धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना अन्यत्र स्थलांतर करून धोकादायक इमारतींच्या पुनर्वसनाचा आरखडा तयार करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

- श्री. सुनिल शिंदे, विधानपरिषद सदस्य.

विषय: कक्ष अधिकारी, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय यांचे पत्र क्र.६७१४००१/म.वि.स./ई-२, दि.०३.०७.२०२६.

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित महाराष्ट्र विधानपरिषद नियम - १०१ अन्वये लक्षवेधी सूचना **क्रमांक ५४५** बाबतचा अभिप्राय सोबत सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मिलिंद भंभरकर)

मुख्य अधिकारी,

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित / रवाना :-

१. मुख्य अभियंता - १/३ / प्राधिकरण.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण.
३. सचिव / प्राधिकरण.
४. सहमुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
५. कार्यकारी अभियंता - १, २, ३ / प्राधिकरण.

प्रत, पुनर्विलोकनासाठी व उचित कार्यवाहीसाठी रवाना :-

१. कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, दु. व पु. - १, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ
३. प्रशासकिय अधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई.
४. मास्टर फाईल.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५४५

- श्री. सुनिल शिंदे, विधानपरिषद सदस्य.

"पावसाळ्याच्या तोंडावर महामुंबईतील 9 महापालिकांनी आणि 'म्हाडा' ने तब्बल 827 इमारती 'अतिधोकादायक', तर 18,072 इमारती 'धोकादायक घोषित केल्या असल्याची बाब दिनांक 16 जून, 2026 रोजी निदर्शनास येणे, आगामी पावसाळ्यात बाहेर पाऊस आणि इमारतींच्या गळक्या छपरांखाली लाखो नागरिक जीव मुठीत घेऊन राहत असल्याचे चित्र पहावयास मिळणार असणे, मात्र, याचे यंत्रणांना सोयर-सुतक नसणे, केवळ कागदी घोडे नाचवून व इमारत रिकाम्या करण्याच्या नोटीसा चिकटवून यंत्रणा आपली जबाबदारी झटकून मोकळ्या होणे, लाखो रहिवाशांचा जीव असा टांगणीला लागला असताना, सरकारी यंत्रणा आणि पालिका प्रशासन केवळ बळी जाण्याची वाट पाहत असल्याचा आरोप या इमारतीत वास्तव्यास असणारे रहिवाशी करणे, दरवर्षी पावसाळ्यात जुन्या व अतिधोकादायक इमारती कोसळून काही रहिवाशी मृत्यूमुखी पडणे, तद्नंतर इमारत धोकादायक ठरवून जागा रिकामी करण्याची नोटीस त्यांना देण्यात आली असल्याची कातडी बचाव भूमिका पालिका व शासकीय यंत्रणेकडून घेतली जाणे, परंतू त्या रहिवाशांना इमारत धोकादायक ठरविल्यावर पर्यायी जागा देण्याची जबाबदारी मात्र या यंत्रणांकडून बरेचदा घेतली न जाणे, यास्तव धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना अन्यत्र स्थलांतर करून धोकादायक इमारतींच्या पुनर्वसनाचा आरखडा तयार करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

==========

अभिप्राय:-

➢ **सन २०२६ मधील अतिधोकादायक इमारतीं**

- दर वर्षी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींचे नियमित पावसाळापूर्व सर्वेक्षण करण्यात येते. त्यानुसार मंडळ स्तरावर केलेल्या सर्वेक्षणात एकुण ८२ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे.

- उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण फक्त पावसाळापुर्व कालावधीकरिता न करता सतत चालू ठेवण्याचे निर्देश सर्व कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांना दिलेले आहेत. त्यानुसार मंडळ स्तरावर सर्वेक्षणाची कार्यवाही सतत सुरु असून, इमारतीच्या सुरक्षितेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

- सदर ८२ अतिधोकादायक आढळलेल्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक जाहिर केलेल्या ४३ इमारतींचा समावेश आहे. या अतिधोकादायक इमारतींमध्ये २२५६ निवासी + ४८० अनिवासी असे एकुण २७३६ रहिवाशी / भाडेकरु आहेत. मंडळातर्फे निवासी गाळेधारकांना गाळे खाली करण्याकरिता नोटिस बजावण्यात आली असून, त्यापैकी २९ रहिवाश्यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत केलेले असून, ३६ निवासी भाडेकरू / रहिवाश्यांनी त्यांची स्वत:ची इतरत्र पर्यायी व्यवस्था केली आहे. तसेच उर्वरित २१०२ निवासी भाडेकरु / रहिवाशांची संबंधित विभागामार्फत निष्कासनाची कार्यवाही सुरु आहे. त्याकरिता सदर अतिधोकादायक इमारतीमधील रहिवाशी / भाडेकरु यांना मंडळातर्फे जागा रिक्त करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत.

संक्रमण शिबीरातील उपलब्ध गाळयांबाबतची माहिती

मुंबई शहर व उपनगरात मंडळाकडे एकुण २०३६३ संक्रमण गाळे आहेत. त्यापैकी सद्यस्थितीत ६५० गाळे रिक्त आहेत. एकुण धोकादायक इमारतींची संख्या व त्यातील सुमारे २२५६ निवासी भाडेकरू / रहिवाशी यांची संख्या विचारात घेता सदर ६५० गाळे अपुरे असल्याने उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरू/रहिवाशी यांनी त्यांच्या स्तरावर वास्तव्याची पर्यायी व्यवस्था केल्यास मंडळामार्फत प्रति माह रू. 20,000/- भाडे अदा करण्याबाबतचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. त्यानुसार सदर निर्णयाची अंवलबजावणी करण्याकरिता परिपत्रक दि.०५.०६.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.

अतिधोकादायक इमारतींच्या बाबतीत करण्यांत येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरुप.

१. अतिधोकादायक ठरलेल्या इमारतीवर, ती इमारत अतिधोकादायक असल्याचा सूचना फलक लावण्यांत येतो.

२. अतिधोकादायक भागास व आवश्यकतेनुसार इतर भागास टेकू लावण्यांत येतात.
३. इमारतींची अतिधोकादायक स्थिती विचारात घेऊन इमारतीचा धोकादायक भाग पाडण्यांत येतो.
४. इमारतीमधील अतिधोकादायक भागाची दुरुस्ती करणे.
५. आवश्यकतेनुसार भाडेकरु / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करुन धोकादायक भागाची दुरुस्ती करणे.
६. पूर्व पावसाळी सर्वेक्षणात आढळून आलेल्या अतिधोकादायक इमारतींची यादी विविध भाषिक वृत्त पत्रातुन रहिवाश्यांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यांत येते, तसेच रहिवाश्यांना योग्य ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सूचना देखिल वृत्तपत्रातुन प्रसिध्द करण्यांत येतात.
७. २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यांत आलेला आहे.

मंडळातर्फे आवाहन

भाडेकरु / रहिवाश्यांच्या जिवीताच्या तथा वित्ताच्या रक्षणार्थ अतिधोकादायक ठरविलेल्या उपरोक्त तसेच मुंबई शहर बेटावरील इतर जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतीमधील रहिवाशांनी पुढील सूचनांचे पालन करून मंडळातर्फे करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येते.

१. इमारतीच्या अतिधोकादायक भागाचा वापर त्वरीत थांबवावा. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी गाळे रिकामे करण्याच्या नोटीस बजावल्यानंतर गाळे त्वरीत रिकामे करावेत, धोकादायक इमारतीत राहू नये.
२. संक्रमण शिबीरात निवासस्थान मिळण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात अर्ज करावा जेणेकरुन पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात येईल.
३. सुरक्षिततेचा उपाय म्हणून करण्यांत येणा-या कामांत, जसे इमारतीचा धोकादायक भाग पाडणे, इमारतीस टेकू लावणे, इमारतींची दुरुस्ती करणे इत्यादी कामासाठी मंडळास सहकार्य करावे.
४. इमारतींना तडे जाणे, माती पडू लागणे, इमारतींना पूर्वी असलेल्या भेगा रूंद होणे, इमारतीचा कुठलाही भाग खचणे, जमीनीपासून भिंत अलग होणे अशी लक्षणे निदर्शनास आल्यास इमारतीस होणारा संभाव्य धोका लक्षात घेउन त्याबाबतची किंवा इमारतीस लहान वा मोठया स्वरूपाचा अपघात झाला असल्यास त्याबाबत मंडळाच्या संबंधित कार्यकारी अभियंता यांना तसेच महापालिकेच्या संबंधित विभाग अधिकारी यांना व अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना, पोलीस नियंत्रण कक्षाला माहिती द्यावी. सदर माहिती मंडळाच्या व महापालिकेच्या नियंत्रण कक्षास देखील देण्यात यावी.

नियंत्रण कक्ष :-

इमारतीच्या धोक्याची लक्षणे तथा इमारत कोसळल्याचे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता व आवश्यक त्या कार्यवाही करीता मंडळाने इमारत क्रमांक ८९-९५ रजनीमहल, ताडदेव, मुंबई येथे २४ तास चालणारा नियंत्रण कक्ष उघडला असून, त्याचा दुरध्वनी क्रमांक २३५३ ६९४५ / २३५१ ७४२३ व भ्रमणध्वनी क्रमांक ९३२१६३७६९९ असा आहे. या नियंत्रण कक्षात उपअभियंता व कनिष्ठ अभियंता दर्जाचे अधिकारी २४ तास हजर असतात. संदेश प्राप्त होताच ते प्रत्यक्ष जागेवर जाऊन इमारतीची पाहणी करुन आवश्यक ती अनुषंगिक कार्यवाही करतात. तसेच महानगरपालिका नियंत्रण कक्षातर्फे प्राप्त झालेली माहिती त्वरीत मंडळाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करतात.

सदर लक्षवेधीसुचनामधील विषय हे मुंबईतील महानगरपालिका यांच्याशी संबंधित असून, यावावत नगर विकास विभागामार्फत कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

माहितीसाठी सविनय सादर.

(मिलिंद शंभरकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई

विधानसभा लक्षवेधी सूचना

मुंबई मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND
AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५२१
श्री. अस्लम शेख, वि.स.स.

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.लवेसू-२०२६/प्र.क्र.१७४/गृनिप, दि.२९.०६.२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५२१ या कार्यालयास प्राप्त झाली. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे अभिप्राय सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांच्या मान्यतेने)

सोबत: अभिप्राय.

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:25:55

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५२१

श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५२१ पुढीलप्रमाणे आहे:

" मुंबईतील वरळी येथील शिवाजी नगर म्हाडा लेआऊट (सी.एस.क्र. ९९८, ९९९) चा पुर्नविकास DCPR - २०३४ च्या नियम ३३ (५) अंतर्गत कमाल ४.०० FSI मर्यादेत करणे बंधनकारक असताना, म्हाडा व एसआरए अधिकाऱ्यांनी खाजगी विकासक M/s. प्रेस्टीज फाल्कन मुंबई रियल्टी प्रा. सोबत संगनमत करुन तब्बल ७.८० FSI मंजूर केल्याचा धक्कादायक प्रकार माहे मे-२०२६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे. यासाठी बाजूचा पूर्णपणे अविकसित CRZ-III आणि बगीचा आरक्षणाखालील सरकारी झोपडपट्टी भूखंड (सी.एस.क्र. १००८) बेकायदेशीरपणे वापरुन तिथला ३.८० FSI म्हाडा भूखंडावर वळवण्यात आला असणे, दोन्ही यंत्रणांनी नगरविकास व गृहनिर्माण विभागाच्या मंजुरीशिवाय आणि नियमांचे उल्लंघन करुन चुकीचे LOI जारी केले असणे, ३२३ PAP कुटुंबांच्या स्थलांतरापोटी पालिकेने रु.४१कोटी देणे अपेक्षित असताना, विकासकाला वरळीत रु.२,१७९ कोटी बाजारमूल्य असलेले २,१७,९०० चौ.फूट क्षेत्र मोफत विक्रीसाठी देऊन रु.२२,००० पेक्षा जास्त कोटींचा प्रचंड FSI घोटाळा व राज्य पुरस्कृत नफेखोरी करण्यात आली असणे, या गंभीर नियोजन भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी तात्काळ विशेष तपास पथक (SIT) नेमून, दोषी अधिकाऱ्यांवर व विकासकावर FIR दाखल करुन सदर प्रकल्पाचे काम व विक्री तात्काळ स्थगित करुन कडक कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अभिप्राय :-

- वरळी, शिवाजीनगर म्हाडा अभिन्यासातील न.भू.क्र. ९९८ आणि ९९९ (भाग) येथील शिवशाही (इ.क्र.७ ते १८) व शिवप्रेरणा (इ.क्र.५) सह.गृह.नि.संस्था यांनी सन २००९ मध्ये मे. वंडर व्हेल्यु रियल्टी डेव्हलपर्स प्रा. लि. यांची विकासक म्हणून नेमणूक केली व त्यानुसार संस्थेस २.५ च.क्षे.नि. करीता सन २०१२ व २०१४ मध्ये ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले.
- विकासकाने १२ वर्षांपेक्षा अधिक कालावधी उलटून सुध्दा पुनर्विकासाचे काम केले नसल्यामुळे संस्थेने विकासकाची नेमणूक रद्द करुन मे. प्रेस्टीज फॅल्कन मुंबई रिॲल्टी प्रा. लि. यांची विकासक म्हणून नेमणूक केली.
- शिवशाही (इ.क्र.७ ते १८) व शिवप्रेरणा (इ.क्र.५) सह.गृह.नि.संस्था, का.इ.क्र.१ व २ व हटमेंट प्लॉट यांचा एकत्रित पुनर्विकास विनियम ३३(५) अंतर्गत करण्याकरीता दि.०५.१२.२०२३ रोजी (३.०० च.क्षे.नि.) व शासनाच्या दि. २९.१२.२०२३ रोजीच्या मंजूरीनुसार दि.१७.०१.२०२४ (३.०० च.क्षे.नि. वरील १.०० च.क्षे.नि.) रोजी मुंबई मंडळ, म्हाडा या कार्यालयामार्फत देकारपत्र जारी करण्यात आले आहे. म्हाडा शिवाजी नगर

अभिन्यासातील शिवशाही (इ.क्र.७ ते १८) व शिवप्रेरणा (इ.क्र.५) सह.गृह.नि.संस्था, का.इ.क्र.१ व २ व हटमेंट प्लॉट यांचा एकत्रीत भूखंड क्षेत्रफळ १४,६६४.७८ चौ.मी. गृहित धरण्यात आले आहे. सदर देकार पत्रान्वये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (५) अंतर्गत (१४,६६४.७८ चौ.मी. X ४.००) ५८,६५९.१२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ, फंजीबल विरहित मंजूर करण्यात आले आहे.

- या भूखंडालगत महसूल विभागातील भूकर क्र.१००८, क्षेत्र ७,९०६.१० चौ.मी. चा भूखंड असून हा भूखंड शिवाजीनगर सह.गृह.नि.संस्था मर्या. (प्रस्तावित) व श्रीकृष्णा सह.गृह.नि.संस्था मर्या. (प्रस्तावित) या झोपडपट्ट्यांनी व्यापलेला आहे. तसेच श्रीकृष्णा सह.गृह.नि.संस्था मर्या. (प्रस्तावित) या संस्थेचे सदस्य असलेले काही झोपडपट्टी धारक यांच्या झोपड्या या लगतच्या भुकर क्र. ७७८ — ७८० (भाग) या भुखंडाच्या काही भागावर वसलेल्या आहेत. भुकर क्र. ७७८ — ७८० (भाग) हा भुखंड महाराष्ट्र पोलीस यांच्या मालकीचा असून डी.पी. २०३४ नुसार पोलीस कर्मचारी वसाहतीसाठी राखीव आहे. भूकर क्र.१००८ या भूखंडावर ROS १.५ (Garden) चे आरक्षण असून सदर भूखंड CRZ-II अधिसूचित क्षेत्रामध्ये CRZ नियमन, २०१९ च्या तरतुदीनुसार NDZ क्षेत्र असल्याने सदर भुखंडावर बांधकामास प्रतिबंध असल्याने, त्या भुखंडावर असलेल्या झोपडपट्टी रहिवाश्यांचे पुनर्वसन सदर भुखंडावर करणे शक्य नाही.
- या झोपडपट्टी संस्थांनी विकासक म्हणून मे. प्रेस्टीज फॅल्कन मुंबई रिॲल्टी प्रा. लि. यांची नियुक्ती केली आहे. या अनुषंगाने विकासक यांनी या झोपडपट्टी रहिवाश्यांचे पुनर्वसन म्हाडा भूखंडावर करणेकरीता परवानगी मिळणेबाबत विनंती केली होती. या विनंतीच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांच्या दि.०३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास विकासकाचा विनंती अर्ज अग्रेषित करण्यात आला होता.
- तदनंतर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दि.२९.०४.२०२४ रोजी इरादा पत्र (LOI) जारी केला. सदर LOI अन्वये ३२३ पुनर्वसन सदनिका (Rehab T/s. including shops) व तसेच २ अस्तित्वातील कार्यालय (Existing Offices) असे एकूण ३२५ पात्र व अपात्र घटक नमूद करुन सदर एकत्रित पुनर्विकास योजनेस म्हाडा स्तरावर पुढील परवानगी देण्याबाबत कळविले आहे. तसेच, पत्र क्र.G-S/STGOVT/०००६/ २०२४०४२३/LOI दि.२९.०४.२०२४ अन्वये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (१०) अंतर्गत उपलब्ध होणारे अंदाजीत (Notional) बांधकाम क्षेत्रफळ म्हाडास कळविले आहे.
- त्याअनुषंगाने या कार्यालयाव्दारे सदर इरादापत्रात (LOI) नमूद केलेल्या पुर्नवसन घटक ३२३ + २ = ३२५ गृहित धरुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (१०) अंतर्गत Incentive Factor नुसार निर्माण झालेले पुर्नवसन व विक्री बांधकाम क्षेत्रफळाची परिगणना करण्यात आलेली आहे व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३(५) साठी मुंबई मंडळाव्दारे जारी केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रान्वये ४.०० च.क्षे.नि. बांधकाम क्षेत्रफळाची परिगणना करुन संयुक्त पुर्नविकास अंतर्गत प्रस्तावित

इमारतींच्या नकाशांना मंजूरी जारी केली. तसेच जोत्यापर्यंचे बांधकाम परवानगी दि. ०२.०८.२०२४ रोजी इमारत परवानगी कक्ष / प्राधिकरण या कार्यालयाव्दारे जारी करण्यात आली.

- महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२४.०६.२०२५ रोजीच्या शासन ज्ञापन अन्वये भूकर क्र.१००८, क्षेत्र ७९०६.१० चौ.मी. या मिळकतीवर असलेल्या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन लगतच्या म्हाडा प्राधिकरणाकडील भूकर क्र.९९८ व ९९९ (पै.) या मिळकतीवर करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या संयुक्त पुनर्विकास करण्यास, भूकर क्र.१००८, क्षेत्र ७९०६.१० चौ.मी. हा भूखंड म्हाडा यांना हस्तांतरीत करण्यास व उक्त क्षेत्रावरील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन पुर्ण झाल्यानंतर म्हाडा यांनी देखभालीसाठी मनपाकडे हा भूखंड हस्तांतरीत करण्यास मान्यता दिली आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.२३.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वरळी महसूल विभागातील भूकर क्र.१००८, क्षेत्र ७९०६.१० चौ.मी. या मिळकतीवर असलेल्या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन लगतच्या म्हाडा अभिन्यासातील भूकर क्र.९९८ व ९९९ (पै.) या मिळकतीवर करण्याकरीता काही अटी व शर्तींसह मान्यता प्रदान केली आहे.
- महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२४.०६.२०२५ रोजीच्या शासन ज्ञापन व जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या दि.२३.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भूकर क्र.१००८, क्षेत्र ७९०६.१० चौ.मी. म्हाडाच्या नावावर हस्तांतरीत करण्यास दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने मालमत्ता पत्रामध्ये सदर भूखंड म्हाडाच्या नावावर झालेला आहे.
- तदनंतर दि.१४.११.२०२५ रोजी या कार्यालयाव्दारे प्रस्तावित इमारतीच्या A विंग करिता जोत्यावरील बांधकामासाठी परवानगी (Further CC) देण्यात आली आहे.
- सदर भूखंड म्हाडाकडे हस्तांतरीत झाला असल्याने सक्षम प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी (पणन), मुंबई मंडळ यांनी सुधारित Draft Annexure –II दि. २३.०३.२०२६ रोजी जारी केले. सदर सुधारित Draft Annexure –II अन्वये ४६१ पुनर्वसन सदनिका (Rehab T/s. including Shops), ४ अस्तित्वातील कार्यालये (Existing Offices) व २ धार्मिक रचना (Religious Structure) असे एकूण ४६७ पात्र व अपात्र घटक गृहित धरुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियामवली २०३४ च्या नियमन ३३ (१०) अन्वये मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांच्या परवानगीने सुधारित LOI या इमारत परवानगी कक्ष / प्राधिकरण या कार्यालयाव्दारे दि.१३.०५.२०२६ रोजी जारी करण्यात आला आहे.
- सदर इरादापत्रात (LOI) नमूद केलेल्या पुर्नवसन घटक ४६७ गृहित धरुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (१०) अंतर्गत Incentive Factor नुसार निर्माण झालेले पुर्नवसन व विक्री बांधकाम क्षेत्रफळाची परिगणना करण्यात आलेली आहे (पुर्नवसन बांधकाम क्षेत्रफळ १८,६२६.८० चौ.मी. व विक्री बांधकाम क्षेत्रफळ ३५,०००.९२ चौ.मी. तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम

३३(५) साठी मुंबई मंडळाव्दारे जारी केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रान्वये ४.०० च.क्षे.नि. बांधकाम क्षेत्रफळाची परिगणना (१४,६६४.७८ X ४ = ५८,६५९.१२ चौ.मी.) करुन संयुक्त पुर्नविकास अंतर्गत एकूण १,४४,७४९.३९ चौ.मी. (फंजीबल क्षेत्रासहित) क्षेत्रफळाकरिता इमारतींच्या सुधारित नकाशांना इमारत परवानगी कक्ष / प्राधिकरण या कार्यालयामार्फत दि.१९.०६.२०२६ रोजी मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

- विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३(१०) अंतर्गत निर्माण झालेल्या बांधकाम क्षेत्रफळाकरिता मुंबई मंडळाने प्रा.ठ. क्र.६३३०, दि.२०.०९.२००८ नुसार ५ टक्के शिघ्रगणक दराने Loading Charges विकासकाकडून भरणा करुन घेण्यात आले आहे.
- सदर संयुक्त पुर्नविकासा अंतर्गत झोपडपट्टी धारकांचे पुर्नवसन झाल्यानंतर भूकर क्र. १००८ हा अतिक्रमण विरहित करुन, त्यावर डी.पी. २०३४ नुसार असलेले करमणुकीचे मैदान विकसित करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांततरीत करण्यात येणार आहे. तसेच भूकर क्र. ७७८-७८० या भुखंडाचा अतिक्रमीत असलेला भाग हा सुध्दा अतिक्रमण विरहित होणार असून, सदर भुखंड हा पोलीस कर्मचारी वसाहत यांना हस्तांतरीत करण्यात येणार आहे.
- विषयांकित संयुक्त पुर्नविकासाकरिता म्हाडामार्फत दि. २५.०७.२०२४ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तदनंतर PAP बाबत महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय दि.१९.०८.२०२४ रोजी जारी झालेला आहे.
- विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (५) व ३३(१०) DCPR-२०३४ अश्या दोन भिन्न विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत संयुक्त पुर्नविकास करिता इमारतींच्या नकाशांना मंजूरी देतेवेळी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (५) अंतर्गत ४.०० च.क्षे.नि. नुसार निर्माण झालेले बांधकाम क्षेत्रफळ व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या विनियम ३३ (१०) अंतर्गत Incentive Factor नुसार निर्माण झालेले बांधकाम क्षेत्रफळ यांची एकत्रीत परिगणना करण्यात आलेली आहे. तसेच भुकर क्र. १००८ (भाग) हा ROS १.५ (गार्डन / पार्क) या करिता राखीव असून, सदर भुखंड CRZ नियमन २०१९ च्या तरतुदीनुसार बांधकाम प्रतिबंधित क्षेत्राने बाधीत असल्याने, संयुक्त पुर्नविकासाअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या इमारती या भुकर क्र. ९९८ व ९९९ (भाग) असलेल्या म्हाडा भुखंडावर प्रस्तावित केलेल्या असुन त्यामुळे ७.८० FSI म्हाडा व झो.पु.प्रा. यांनी मंजूर केलेला आहे असे म्हणणे खरे नाही.

(मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:27:13

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
निवासी कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
कक्षक्रमांक 407,तिसरा मजला,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई 51

म्हाडा MHADA

जा.क्र.नि.का.अ./मुं.मं./ /2026
दिनांक :-

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -400 032.

विषय :- महाराष्ट्र विधानसभा नियम 105 अन्वये लक्षवेधी सूचना क्र.**1512.**

- **श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स.**

संदर्भ :- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.लवेसू-2025/प्र.क्र.175, गृनिप, दि.29.06.2026.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये महाराष्ट्र विधानसभा नियम 105 अन्वये लक्षवेधी सूचना क्र. **1512** या कार्यालयास प्राप्त झाली. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे अभिप्राय सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांच्या मान्यतेने)

सोबत: अभिप्राय.

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:38:40

मुख्य अधिकरी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

महाराष्ट्र विधानसभा

सन 2026 म.वि.स. नियम 105 अन्वये लक्षवेधी सूचना क्र. 1512

श्री. नानाभाऊ पटोले, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-105 अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.1512 पुढीलप्रमाणे आहे:

"कांदिवली (पूर्व) येथील सीटीएस क्र.837 ते 840 मधील समतानगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पात एस डी कॉर्पोरेशन विकासकाने म्हाडा अधिका-यांशी संगनमत करून गंभीर अनियमितता केल्याचे निदर्शनास येणे, म्हाडाच्या प्रॉपर्टीकार्डवर मे. एसडी कॉर्पोरेशनचे नाव अनधिकृतरीत्या चढविण्यात आलेले असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुनर्वसित भाडेकरूंना घरे दिल्याशिवाय विक्री घटकासाठी FSI देऊ नये, असे निर्देश असताना म्हाडाने विकासकास सुमारे 3 लाख चौ.मी. FSI देऊन मा. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून विकासकांशी संगनमत करून 6,000/- कोटी रूपयांच्या महसूलाचे आर्थिक नुकसान करणे, म्हाडाकडून NOC न घेता भूखंडावर खासगी बँकेकडून 1,000/- कोटी कर्ज घेण्यात येणे, पर्यावरण विभागाची NOC मिळण्यापूर्वीच रिहॅब इमारतींच्या बांधकामास परवानगी देऊन पर्यावरण संरक्षण कायदा, 1986 च उल्लंघन झालेले असणे, मध्यम उत्पन्न गटाच्या 660 व उच्च उत्पन्न गटाच्या 240 अशा एकूण 900 सदनिकांच्या पुनर्विकासाचे काम अद्यापही सुरू न करता गार्डन, शाळा व इतर उपक्रमांसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर विकासकाने मनमानीपणे 40 मजली खाजगी विक्रीच्या सरोवा, सिएना, औबबर्ण, ॲस्ट्रॉन, अल्पिन, इपसिलिन या इमारती उभारून कोटयवधी रूपयांचा फायदा करून घेतल्याचे निदर्शनास येणे, या अनियमित व्यवहारांमुळे शासनाचे सुमारे #6000 कोटींचं आर्थिक नुकसान झाल्याने चौकशी करण्याबाबतची मागणी सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण विभागाचे माजी राज्य समन्वयक यांनी माहे मार्च 2026 मध्ये शासनाकडे तक्रार दाखल केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

अभिप्राय :-

सी.टी.एस. क्र. 837 ते 840 कांदिवली (पूर्व) मुंबई येथील 2,22,823.50 चौ.मी. क्षेत्रफळाच्या जमिनीवर म्हाडाची समतानगर, कांदिवली (पूर्व) वसाहत असून या वसाहतीमधील 160 इमारतींमध्ये 296 अत्यल्प उत्पन्न गटाच्या, 1488 अल्प उत्पन्न गटाच्या, 700 मध्यम उत्पन्न गटाच्या व 240 उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका आहेत. अभिन्यासामधील संस्थांनी एकत्रित पुनर्विकासाकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई मंडळामार्फत समतानगर अभिन्यासातील संस्थांच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता वेळोवेळी परवानग्या जारी करण्यात आल्या आहेत.

समतानगर को. ऑप. हौ. सो. युनियन लि. यांनी महसुल व वनविभाग यांचेकडे समतानगर वसाहतीकरिता "महसुली अभिलेखातील खाजगी वने" अशी नोंद कमी करण्याबाबत परस्पर पत्रव्यवहार केला होता. त्यास अनुसरून सदर अभिलेखामध्ये दुरूस्ती करतांना दि.08.04.2008 रोजीच्या नोंदीमध्ये दोन अटी व शर्ती नमुद करण्यात आलेल्या असून यामधील अट क्र.1 मध्ये समतानगर को. ऑप. हौ. सो. युनियन लि. (विकासक मे. एस डी कॉर्पोरेशन प्रा. लि.) यांनी या मिळकतीमधील क्षेत्राचा एकत्रित पुनर्विकास करणेकामी र. रु. 50.00 लक्ष (रुपये पन्नास लक्ष) विकास निधी, असे नमुद केलेले आहे. सदर कार्यवाही महसुल व वनविभागामार्फत परस्पर करण्यात आलेली आहे.

समतानगर वसाहतीमधील इमारत क्र.112, 114 व 115 सुदर्शन सहगृह संस्था या संस्थेमधील असहकार्य करणारे सभासद श्री. किशोर रघुनाथ मानकर यांचेविरूद्ध कलम 95A अंतर्गत कारवाई

करणबाबत युनियन, सबांधेत सुदर्शन सह गृह सस्था व विकासक मे. एस.डी. कापोरेशन यानी सदर याचिका मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.738/2011 दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये समतानगर युनियन, इमारत क्र.112, 114 व 115, सुदर्शन सहगृह संस्था व मे. एस.डी. कॉर्पोरेशन हे वादी असून मुंबई मंडळ, श्री. किशोर रघुनाथ मानकर (सभासद, इमारत क्र. 115 मधील रुम नं.2225) हे प्रतिवादी होते. मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.738/2011 मध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आलेले आहे:

"The Learned AGP has also stated that until all eligible occupants are provided permanent alternate accommodation in the redeveloped building, MHADA in accordance with its policy shall not issue NOC to the petitioner in respect of free sale component of the project"

मा.उच्च न्यायालयाचे दि.16.11.2011 रोजीचे आदेश सुदर्शन सह. गृह. संस्थेतील सर्व पात्र सभासदांना पुर्नविकसीत इमारतीमध्ये सदनिका देण्याबाबत आहेत. त्यानुसार समतानगर युनियन यांचेमार्फत सुदर्शन सह. गृह. संस्थेतील सर्व सभासदांचे पुनर्विकसीत इमारतीमध्ये पुनर्वसन करण्यात आलेले असून या पुनर्वसन इमारतीला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दि.07.02.2018 रोजी भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे. तद्नंतर मा. उच्च न्यायालयाच्या दि.16.06.2011 रोजीच्या निर्देशाच्या पुर्ततेबाबत खातरजमा केल्यानंतर म्हाडा मार्फत इमारत क्र.2 (अल्पाईन) या विक्री घटकाच्या इमारतीकरिता दि.06.02.2019 रोजी म्हाडाच्या इमारत परवानगी कक्षामार्फत भागश: भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे.

समतानगर को. ऑप. हौ. सो. युनियन लि. यांना पुनर्विकासकरिताएकूण 90,666.48 चौ.मी. इतक्या भुखंड क्षेत्रावर म्हाडामार्फत ना हरकत प्रमाणपत्रे जारी केले असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे

अ.क्र.	ना हरकत प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक	बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. मध्ये
1.	CO/MB/ARCH/NOC/F-/1163/2008 Dt. 29/02/2008	84,714.38
2.	CO/MB/REE/NOC/684 /2014 Dt. 20/06/2014	61,838.54
3.	CO/MB/REE/NOC/717 /2014 Dt. 01/07/2014 (For Pro-rata)	1,53,858.96
	एकुण	**3,00,411.88**

समतानगर को. ऑप. हौ. सो. युनियन लि. यांनी रू.310.00 कोटी इतक्या अधिमुल्य रक्कमेचा मुंबई मंडळास भरणा केल्यानंतर त्यांना उपरोक्त नमुद केल्यानुसार 3,00,411.88 चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाकरिता ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे.

म्हाडामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासाकरिता अर्थ सहाय्य उभारण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली असता विक्री घटकाचे बांधकाम क्षेत्रफळ गहाण/तारण ठेवण्याकरिता म्हाडामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरून संस्थेच्या विकासकामार्फत विक्री घटकाचे बांधकाम क्षेत्रफळ गहाण/तारण ठेऊन वित्तीय संस्थांमार्फत अर्थ सहाय्य घेण्यात येते. तथापि, समतानगर को. ऑप. हौ. सो. युनियन लि. यांचेमार्फत अद्यापपर्यंत म्हाडास अर्थसहाय्य उभारण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्राबाबत कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.

समता नगर कांदिवली पुर्व येथील एकत्रित पूनर्विकास प्रकल्पात अंतर्गत पुनर्वसन इमारत क्र.1 या इमारतीच्या बांधकाम नकाशांना (IOD) मुंबई महानगरपालिकेने दि.26/11/2010 रोजी मान्यता दिली होती. सदर इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ 14,216.61 चौ.मी प्रस्तावित होते. तात्कालिन प्रचलित

नियमानुसार 20,000 चौ.मी किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम करावयास पर्यावरण विभागची NOC आवश्यक होती.

तदनंतर सदर इमारतीचे सुधारीत बांधकाम नकाशे महानगरपालिकेने दि.25/11/2013 रोजी मंजुर केलेले आहेत. सुधारीत नकाशानुसार सदर इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ 29,918.95 चौ.मी होते. त्यानुसार विकासकाने पुनर्वसन इमारत क्र.1 चे बांधकाम 20,000 चौ.मी पर्यंत पुर्ण करण्यापुर्वी पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र क्र..SEAC-2212/C.R.35/TC-II दि.10/11/2014 रोजी प्राप्त करुन घेतले आहे. सद्यस्थितीत सदर पुनर्विकास प्रकल्पाकरिता 15,53,011.09 चौ. मी. क्षेत्रफळाकरिता पर्यावरण विभागाने दिलेली सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र क्र.SIA/MH/MIS/153154/2020 दि.08/07/2020 प्रमाणे बांधकाम अनुज्ञेय आहे.

समता नगर कांदिवली पुर्व येथील वसाहतीमध्ये एकुण 2,863 सदनिका आहेत. त्यापैकी समतानगर युनियन / विकासक यांनी 1,844 सदनिकांचे पुनर्वसन इमारत क्र.1 या इमारतीमध्ये पुनर्वसन केले आहे. तसेच विकासकामार्फत विक्री घटकाकरिता एकुण 3 इमारतींमध्ये 1137 सदनिकांचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. पुनर्वसन सदनिकांमधील उर्वरित 660 मध्यम उत्पन्न गट व इमारत क्र.161, 162 व 164 या इमारतीमधील 119 अशा एकूण 779 सदनिकांच्या पुनर्वसनासाठी विकासकाने नवीन इमारत क्र.7 च्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला असून मा.उपाध्यक्ष /प्राधिकरण यांनी सदर इमारतीच्या नकाशांच्या Concessions करिता दि.11.03.2026 रोजी मान्यता दिली आहे. विकासकाकडून सदर इमारत क्र.7 साठी IOA करिता प्रस्ताव म्हाडास प्राप्त झाल्यानंतर इमारत परवानगी कक्ष/म्हाडा या विभागाकडून उपलब्ध उर्वरित 1968.04 चौ.मी क्षेत्रफळापैकी 1794.73 चौ.मी (निवासी 1690.61 चौ.मी + अनिवासी 104.12 चौ.मी) बांधकाम क्षेत्रफळ नकाशांना दि.08/04/2026रोजी IOA जारी करण्यात आलेला आहे.

उर्वरित 240 उच्च उत्पन्न गटाच्या इमारतीचे नकाशे विकासकाकडून सादर करण्यात आले होते तथापी त्यामध्ये काही तांत्रिक त्रृटी आढळून आल्यामुळे सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार विकासकाकडून सुधारणांसह प्रस्ताव सादर झाल्यानंतर त्यांना मंजुरी देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच समता नगर वसाहतीचा सुधारीत अभिन्यास दि.18/02/2021 रोजी मंजुर झाला असून सदर अभिन्यासाप्रमाणे आरक्षित असलेले गार्डन, शाळा व इतर आरक्षित भुखंडावर विकासकाकडून कोणत्याही खाजगी विक्रीच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले नाही.

पर्यावरण विभागाचे माजी राज्य समन्वयक ॲड. राजेश एस. दाभोळकर यांनी 09.03.2026 रोजीच्या पत्रान्वये कांदिवली (पूर्व) येथील समता नगर वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये मे. एस.डी. कॉर्पोरेशन यांनी गंभीर अनियमितता केल्याबाबत शासनास तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने दि.22.06.2026 रोजी शासनास मुद्देनिहाय अहवाल सादर करण्यात आला आहे.

(मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
18:40:13

मुख्य अधिकरी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

[म्हाडाचा घटक]

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

कक्ष क्र. ३४१, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे [पुर्व], मुंबई -५१.

म्हाडा MHADA

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१९३

जा.क्र. का.अ./कु.वि./मुं.मं./ /२०२६

दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१९३
"नेहरु नगर व टिळक नगर ह्या म्हाडा वसाहतींच्या मलनि:सारण वाहिन्याच्या उन्नतीकरणाच्या कामाबाबत."
श्री. मंगेश कुडाळकर, महाराष्ट्र विधानसभा सदस्य, मा.वि.स.स.

संदर्भ:- महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाचे पत्र क्र.६७१८८४१/फ, दि.०२/०७/२०२६

महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त विषयांकित **महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१९३** बाबातचा अभिप्राय सोबत सादर करण्यात येत आहे.

सोबत- वरीलप्रमाणे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 07-07-2026
21:30:54

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २१९३

श्री. मंगेश कुडाळकर, महाराष्ट्र विधानसभा सदस्य,महाराष्ट्र विधानसभा सदस्य यांनी दिलेल्या सुचना पुढीलप्रमाणे आहे.

नेहरु नगर, टिळक नगर म्हाडा वसाहतीमधील मलनि:सारण वाहिनीच्या उन्नती करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले असणे, पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून दुस-या टप्प्यच्या निविदा मागवण्याआधी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली १९ सप्टेंबर २०२०५ व १२ मे २०२६ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली असणे, सदर बैठकीत म्हाडाचे सबंधित अधिकारी उपस्थित असणे, बैठकीदरम्यान म्हाडा प्राधिकरणाकडून महानगरपालिकेला मलनि:सारण वाहिनीच्या नुतनीकरणात करीता ५०% रक्कम देण्यात यावी असे निर्णय देण्यात आले असणे, माननी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी अर्ध शासकीय पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हाडा यांना याबाबत कळवणे, म्हडा प्राधिकरणाकडून ५० टक्के रक्कम प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेकडून उपरोक्त नमूद म्हाडा वसाहतीतील मलनि:सारण वाहिनी उन्नतीकरण्याकरता निविदा मागु कामे हाती घेण्याचे निर्णय घेण्यात येणे, अद्याप म्हाडा प्राधिकरणाकडून कोणताही निर्णय न असल्याने सदरचे काम अपूर्ण असणे, याबाबत नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष व शासनाने करायची कारवाई.

==========

अभिप्राय :

- सन २०१८ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील मलनिस्सारण वाहिनी व इतर सोयी सुविधाची कामे म्हाडाने करावी की, बृहन्मुंबई महानगरपलिकेने करावी याबाबत मा. मंगेश कुडाळकर वि.प.स. यांनी प्रश्न उपस्थित केला होता.
- शासन आदेश दि. २३/०५/२०१८ नुसार म्हाडास म्हाडा आभिन्यासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) / मुंबई महानगर पालिका यांनी त्यांचे पत्र क.१२/०३/२०१९ द्ववारे म्हाडा प्राधिकरणाच्या हद्दीतील सेवा सुविधा पुरविण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची असल्याचे नमूद करुन सदर कामे मुंबई महापालिके कडे प्रस्तावित करु नये असे कळविले होते. तथापि महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम (MRTP ACT) १९६६ मधील तरतुदीनुसार तसेच विकास नियोजन आराखडा व विकास नियंत्रण नियमावली, विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली मधील तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत करणे आवश्यक आहे, असे मुंबई मंडळातर्फे दि. २७/१२/२०१९ च्या पत्राद्वारे मुंबई महापालिकेस कळविण्यात आले होते.
- तसेच सन २०१८ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील आश्वासन क्र. १५८ च्या उत्तरादाखल म्हाड प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले की, शासनाच्या दि. २३/०५/२०१८ च्या अधिसुचनेद्वारे म्हाड प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील केवळ प्रकरण-४ मधील तरतुदींनुसार नियोजन / प्राधिकरण शक्ती प्रदान करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुंबई शहर व उपनगरासाठी, प्रनियो/प्राधिकरण म्हणून मुंबई महानगरपालिका कार्यरत आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील प्रकरण ४ वगळता इतर सर्व प्रकरणातील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे. तसेच, म्हाडा वसाहतींतील इमारतींचे विविध प्रकारचे शुल्क (जसे की, Off-site Infrastructure charges, Development Charges, Fungible FSI Charges) म्हाडाकडून मुंबई म.न.पा. स वर्ग करण्यात येत असल्याने मुंबई म.न.पा. ने आवश्यक विकास काम करणे क्रमप्राप्त आहे.
- त्यानुसार गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. १८.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नगर विकास विभागाच्या मान्यतेने मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका यांना म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील मल:निस्सारण वाहिनी व इतर सोई सुविधा विषयक कामे मुंबई महानगरपालिकेने करणे आवश्यक असल्याचे कळविले होते.

- त्याअनुषंगाने सन २०१८ च्या आधिवेशनात उपस्थित झालेल्या प्रश्नास उपरोक्त नमूद दि १८.०१.२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा. आयुक्त मुंबई महानगरपालिका यांनी सदर बाबत शासनाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका धोरण तयार करुन धोरणानुसार इतर विशेष प्राधिरणाच्या वसाहतीत जल अभियंता विभाग व मल:निस्सारण विभागाद्वारे आवश्यक सोईसुविधांची कामे करतील असे उत्तर दि.२६/०२/२०२१ च्या पत्राद्वारे आधिवेशनात सादर केले.
- मुंबई महापालिकेतर्फे देण्यात आलेल्या सदर उत्तराच्या अनुषंगाने मुख्य अभियंता [वि.आ. (DP)] बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. १७.०८.२०२१ च्या पत्रान्वये म्हाडा वसाहतीमधील मुलभूत सुविधाचे उन्नतीकरण व दुरुस्ती करण्याचे प्रस्ताव हाती घेण्यास्तव अर्थसंकल्पिय तरतूद करण्याबाबतचे मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेच्या विविध विभागांना दिलेल्या आहेत.
- मुंबई मंडळाच्या वसाहतीमधील मुलभूत सुविधा महानगरपालिकेस हस्तांतरण करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री मा. श्री. आदित्यजी ठाकरे, यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३/०७/२०२१ रोजी मा. महापौर, मनपा अधिकारी, म्हाडा अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या स्तरावरुन मा. आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना मुंबई मंडळाच्या वसाहतीमधील मुलभूत सुविधा महानगरपालिकेस हस्तांतरण करण्यात येत असल्याबाबत दि.०५/१०/२०२१ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदर बैठकीत ठरल्यानुसार म्हाडा वसाहतीतील रस्ते व कार्यरत असलेल्या इतर सुविधा जसे की, जलवाहिनी, मलनि:सारण वाहिनी यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महानगर पालिकेची असल्याचे मा. महापालिका आयुक्त यांना कळविण्यात आले होते.
- पूर्व उपनगरातील म्हाडा अभिन्यासातील जलवाहिन्या व मल:निस्सारण वाहिन्या महानगरपालिकेने ताब्यात घेण्याबाबत तसेच कन्नमवारनगर व टागोर नगर या म्हाडा वसाहतीमधील प्रलंबित जलदेयकाबाबत मा. उपाध्यक्ष / प्रा यांच्या अध्यक्षतेखाली मा. अतिरिक्त आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या समवेत दि. ०८.१०.२०२१ रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.
- उपरोक्त बैठकीत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या सूचनेच्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त, मुंबई मनपा यांनी म्हाडा वसाहतीतील मलनि:स्सारण वाहिन्या व जल वाहिन्या ताब्यात घेण्याबाबत संबंधित मनपा अधिका-यांना निर्देश दिले होते.
- तथापी, तद्नंतर दोन वर्षांच्या कालावधीत देखील मुंबई महापालिकेकडून मलनि:स्सारण वाहिन्या व जल वाहिन्या हस्तांतरीत करुन घेण्यात सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्याने सदर विषयी पुन:श्च दि.२१.१२.२०२३ रोजी मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली म्हाडा मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत अस्तित्वात असलेल्या जल वाहिन्या व मलनि:स्सारण वाहिन्यांचे उन्नतीकरण गरजेचे असल्याचे व त्यानुसार उन्नतीकरणाची रक्कम म्हाडातर्फे मनपास अदा करणेबाबतची भूमिका महापालिका अधिका-यांतर्फे मांडण्यात आली होती. तथापी दि. १८/०१/२०२१ च्या पत्राद्वारे महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच निर्देश दिलेले असून सदर बाब म्हाडा द्वारे शासनास सादर करण्यात येईल व शासनाकडून जो निर्णय येईल तो मनपा व म्हाडा या दोन्हीस लागू होईल, असे उपाध्यक्ष तथा मु,का.अ / प्रा. यांनी सुचविले होते व शासनाच्या निर्णयाची वाट न बघता बृहन्मुंबई महानगर पालिकेने उन्नतीकरणाची काम त्वरीत सुरु करावीत असे ही सांगितली व सदरची बाब उपआयुक्त / मनपा यांनी मान्य केली.
- सदर बैठकीत ठरल्यानुसार म्हाडातर्फे गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांस दि.०५/०१/२०२४ च्या पत्राद्वारे मुंबई महापालिकेस उन्नतीकरणासाठी निधी देणे अपेक्षित नसल्याची या कार्यालयाचे स्पष्ट धारणा असल्याचे व सदर प्रकरणी त्वरित निर्णय घेण्याची विनंती करण्यात आलेली आहे.
- तसेच म्हाडामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस जून २०१८ ते मार्च २०२३ पर्यंत सुमारे १८०६.३५ कोटी एफएसआय प्रिमियम, इंफ्रास्ट्रक्चरल चार्जेस व विकास खर्चापोटी जमा केलेले आहेत व सदर बाब मुंबई महापालिकेस दि. ०५/०१/२०२४ च्या पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले असुन उन्नतीकरणाबाबत

शासनाकडून जे निर्देश प्राप्त होतील ते म्हाडा व मनपा या दोन्हीस लागु होतील या अटीवर उन्नतीकरणाची कार्यवाही त्वरीत हाती घेण्यात यावी अशी विनंती केली होती.

- तदनंतर दि.१९/९/२०२५ रोजी पुन:श्च मुंबई मनपाचे अधिकारी व म्हाडाचे अधिकारी यांची बैठक पार पडली होती व त्यात कन्नमवार नगर येथील जलवाहिन्यांचे उन्नतीकरण करणेपोटी रु. ४३ कोटी पैकी रु. २० कोटी प्रथम व रु.२३ कोटी काम सुरु झाल्यानंतर देण्याचे निश्चित करण्यात आले होते व कन्नमवार नगर, टागोर नगर व पंतनगर येथील मलनि:स्सारण वाहीन्या मुंबई महापालिकेस हस्तांतरीत करण्यात आल्याचे मा. आयुक्त/मनपा यांचे निदर्शनास आणुन देण्यात आले होते.
- सदर रु. २० कोटी रक्कम मुंबई महापालकेस दि. २५/०३/२०२६ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहेत.
- तथापी मा. महापालिका आयुक्त/मुंबई मनपातर्फे दि.२४/११/२०२५ रोजीच्या पत्रादवारे कन्नमवार नगर व टागोर नगर येथील मलनि:स्सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणासाठी अनुक्रमे रु.१८०.८१ कोटी व रु.८५.८० कोटी या पैकी निम्मी रक्कम रु.१३३.३० कोटी रकमेची मागणी करण्यात आली आहे व सदर रक्कम प्राप्त झाल्यावर निविदा आमंत्रित करुन काम सुरु करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.
- मा. आमदार श्री. मंगेश कुडाळकर यांच्या दि.२०/१/२०२६ च्या पत्रादवारे मा. सह आयुक्त परि मंडळ-५, मुंबई महापालिका यांना नेहरु नगर, टिळक नगर, नविन टिळक नगर आणि सहकार नगर (म्हाडा वसाहती) येथील मलनि:स्सारण वाहिन्या ५० वर्षे जुन्या असून पुनर्विकास प्रकल्पामुळे त्या वाहिन्यांवर वाढलेला ताण याबाबत उपाय योजना करण्यासाठी आढावा बैठक घेण्याची विनंती केली होती.
- याबाबत मा. महापालिका आयुक्त/मुंबई मनपा यांनी मा. आमदार श्री. मंगेश कुडाळकर यांच्या दि.२०/१/२०२६ च्या पत्राच्या अनुषंगाने दि.२०/०२/२०२६ रोजीच्या पत्रादवारे सहकार नगर - २६ कोटी, टिळक नगर - ८७ कोटी, नविन टिळक नगर - ६ कोटी, नेहरु नगर - ३० कोटी, पंत नगर - १५५ कोटी या पैकी निम्मी रक्कम रु.१५२ कोटी रकमेची मागणी करण्यात आली आहे व सदर रक्कम प्राप्त झाल्यावर निविदा आमंत्रित करुन काम सुरु करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. तद्नंतर मा. महानगर पालिका आयुक्त यांचे दालनात दि. १२/०५/२०२६ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत मलनि:स्सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणाकरीता आवश्यक रक्कमेच्या ५०% रक्कम म्हाडाने अदा करावी, असे मा. महानगर पालिका आयुक्त यांनी निर्देश दिले. सदर बैठकीमध्ये देखील म्हाडा वसाहतींमधील पायाभूत सुविधांचे उन्नतीकरणाकरीता Infrastructural Development Charges महानगर पालिकेस म्हाडामार्फत अदा केले जात असल्याने पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण पुर्णपणे महानगर पालिकेने करणेबाबत म्हाडामार्फत मांडण्यात आले. तसेच मलनि:स्सारण वाहिन्यांच्या उन्नतीकरणाकरीता महापालिकेस म्हाडामार्फत ५०% रक्कम अदा करावयाची झाल्यास उन्नतीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक प्राधिकरणास महापालिकेमार्फत अद्यापही पाठविण्यात आलेले नाही. तसेच सदर कामाकरीता पालिकेमार्फत निविदा देखील मागविण्यात आलेल्या दिसून येत नाहीत.
- वस्तुत: सध्या मा. आमदार महोदयांनी नमुद केलेल्या दोन्ही वसाहतीतील मलनि:स्सारण वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती मुंबई महापालिकेतर्फेच करण्यात येत आहे.
- सबब गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी २०१८ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील चर्चेच्या अनुषंगाने व नगर विकास विभागाच्या मान्यतेने म्हाडाच्या ५६ वसातीमधील मलनि:स्सारण वाहिन्या, जलवाहिन्या व इतर सोयी सुविधा विषयक कामे महानगरपालिकेने करणे आवश्यक असल्याचे दि. १८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मनपास कळविलेले असल्याने व म्हाडा वसाहतीतील इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांपोटी म्हाडास प्राप्त होणारे विकसन शुल्क, पायाभूत सुविधा शुल्क व फंजीबल च.क्षे.नि शुल्क यापैकी मोठा भाग स्थानिक प्राधिकरण असल्याने मुंबई महापालिकेस वर्ग केले जातात. वास्तव सदर प्रकरणी म्हाडाने बृहन्मुंबई महानगर पालिकेस सदर कामाच्या उन्नतीकरणासाठी निधी देणे अपेक्षित नाही, तथापी दि. १२/०५/२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये म्हाडा व मनपा यांच्या झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये

महानगर पालिका आयुक्त यांनी निर्देश दिल्यानुसार पालिकेस ५०% रक्कम अदा करण्याबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु आहे. तसेच शासनाने यापूर्वी दि. १८/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदर कामे बृहन्मुंबई महानगर पालिकेने करणे उचित असल्याचे धारणा असून सदर बाबत शासनामार्फत पुनश्च निर्देश प्राप्त करणेकरीता म्हाडा द्वारे दि.०५/०१/२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेले आहे. तथापी शासनाच्या निर्णयाची वाट न बघता बृहन्मुंबई महानगर पालिकेने उन्नतीकरणाची कामे त्वरीत सुरु करणे अपेक्षित आहे.

- सन २०२३ मध्ये मुंबई महानगरपालिकेने विक्रोळी कन्नमवार नगर येथील रुपये ७० कोटी रक्कमेचे देयक अदा केल्यावर जलवाहिन्या हस्तांतरीत करुन घेण्याची उन्नतीकरणासाठी रुपये ४३ कोटींची मागणी करुन त्याशिवाय हस्तांतरणास नकार देण्यात आला होता.
- महानगरपालिकेने मल:निस्सारण वाहिन्याच्या उन्नतीकरणाबाबत कळविलेल्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम अदा केल्यावर सदर वाहिन्या नव्याने कोणतीही अट पुढे न करता, हस्तांतरीत करुन घेतल्या जातील अशी महानगरपालिकेकडून हमी देण्यात यावी.

(मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 07-07-2026
21:33:01

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

नागपूर मंडळ

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
NAGPUR HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

जा.क्र./मु.अ./ना.मं./ल.सू.क्र. २२२७/5821 /२०२६
दिनांक :- ०८/०७/२०२६

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई – ३२.

विषय : **महाराष्ट्र विधानसभा नियम 105 अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक 2277.**

संदर्भ : **गृहनिर्माण विभाग पत्र क्रमांक: लवेसू -2026/ प्रक्र 113/ गृनिभू दिनांक 30 जून 2026**

लक्षवेधी सूचना क्रमांक : 2277

श्री. किशोर जोरगेवार वि.स.स.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) आणि तिची नियुक्त एजन्सी DMP फायनान्स यांनी चंद्रपूर शहरातील नागरीकांची जवळपास 90 लाख रुपयांची केलेली आर्थिक फसवणूक, जानेवारी, 2025 मध्ये चंद्रपूर येथील दाताळा रोड येथील म्हाडा कार्यालयातील एका अधिका-याने घर खरेदी करणा-या नागरीकांच्या अर्जावर प्रक्रिया करण्यासाठी DMP फायनान्स कार्यालयात जाण्याचे निर्देश देणे, त्यानुसार संबंधित खरेदीदारांनी सर्व कागदपत्रे सादर करुन घर बुकिंगसाठी रोख, धनादेश व ऑनलाईन रक्कमेचा भरणा करणे, जवळपास 8 महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप सदनिकेचे वाटप न होणे, संबंधीत गृहखरेदीदार म्हाडाच्या नागपूर येथील कार्यालयाकडे यासंदर्भात पाठपुरावा करण्यासाठी गेले असता DMP फायनान्सला ऑगस्ट, २०२५ मध्ये म्हाडाने काळ्या यादीत टाकले असल्याचे निदर्शनास येणे, उक्त खरेदीदारांचे व्यवहार जानेवारी, २०२५ मध्ये झालेले असणे, त्यावेळी सदर एजन्सी अधिकृपणे म्हाडाचे प्रतिनिधीत्व करीत असणे, तथापि म्हाडाचे अधिकारी आता DMP एजन्सीची जबाबदारी घेण्यास नकार देत असणे, परिणामी म्हाडाचे घर खरेदी करणा-यांची झालेली आर्थिक फसवणूक, सदर प्रकरणी रामनगर पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे तक्रारी दाखल करण्यासाठी संपर्क साधला असता पोलीसांकडून एफआयआर नोंदवण्यात न येणे, परिणामी म्हाडाचे घर खरेदी करणा-या नागरीकांना मानसिक त्रास सहन करावा लागणे, शासनाने

गृहनिर्माण भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर–४४० ००१
दूरध्वनी : २५६२२३९, २५६०६४९, २५६५६९२
फॅक्स : २५६४९३९

Gruha Nirman Bhawan, Civil Lines, Nagpur-440 00
Phones : 2562239, 2560649, 2565692
Fax : 2564939

सदर प्रकरणी चौकशी करुन दोषी अधिकारी व DMP फायनान्स कंपनीवर कठोर कारवाई करण्याची तसेच म्हाडाचे घर बुकिंग करणा-यांना सदनिकेचे त्वरीत वाटप करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना

उपरोक्त लक्षवेधीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते

सन 2022-23 मध्ये नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा मार्फत अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाकरिता बांधकाम केलेल्या सदनिकापैकी 1239 सदनिका विक्री अभावी रिक्त असल्याने सदनिका/गाळे यांच्या विक्रीकरीता दि. 19/10/2022 ते 5/7/2025 या कालावधी करिता मे. डिल्स माय प्रॉपर्टी यांना प्रति सदनिका मानधन तत्वावर नागपूर मंडळाच्या रिक्त सदनिकांची विक्री एजंसी म्हणून काम करण्याकरीता नेमणूक करण्यात आली होती.

नागपूर गृहनिर्माण मंडळ कार्यालयास अर्जदारांकडून मौखिक व लेखी स्वरुपातील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, मे. डिल्स माय प्रॉपर्टी यांनी अर्जदारांकडून सदनिकेच्या किंमतीच्या रक्कमेचा भरणा नागपूर मंडळ कार्यालयात न करता स्वत:च्या DMP Finance खात्यामध्ये ठेवून, self-cheque द्वारे पैसे स्वत:कडे ठेवून अर्जदारांची दिशाभूल केली, असे चौकशीत निष्पन्न झाल्याने व नागरिकांची सेल्स एजन्सीच्या माध्यमातून फसवणूक केल्याचे लक्षात आल्यामुळे तक्रारींची दखल घेऊन मे. डील्स माय प्रॉपर्टी यांचे विरुद्ध सीताबर्डी पोलीस ठाणे येथे 13/10/2025 रोजी लेखी तक्रार करण्यात आलेली होती,
त्या अनुषंगाने सीताबर्डी पोलीस ठाणे यांनी डील्स माय प्रॉपर्टी यांचे विरुद्ध दिनांक 18/11/25 रोजी एफ आय आर दाखल केला असून भारतीय न्याय संहिता 2023 च्या 318 (4) व 316 (2) अंतर्गत गुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली आहे. तसेच नागपूर गृहनिर्माण मंडळाकडून दिनांक 4/11/25 रोजी या एजन्सीला विक्रीच्या काळया यादीत टाकण्यात आलेले आहे.

दिनांक 1/05/25 पर्यंत नागपूर गृहनिर्माण मंडळाकडे मे. डील्स माय प्रॉपर्टी या एजन्सी विरुद्ध 123 लाभार्थ्यांच्या फसवणूक तक्रारी प्राप्त असून एजन्सीने लाभार्थ्यांकडून घेतलेली रोख स्वरूपातील रक्कम रु 4.07 कोटी आहे. फसवणूक झालेल्या 123 लाभार्थ्यांपैकी 30 लाभार्थी हे चंद्रपूर दाताळा या गृहनिर्माण योजनेतील असून सदर विक्री एजन्सीने त्यांच्याकडून रू 1.13 कोटी रोख स्वरूपात रक्कम घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे.

नागपूर मंडळांतर्गत डील्स माय प्रॉपर्टी या एजन्सी द्वारे सदनिकांच्या विक्रीपोटी गोळा केलेल्या रकमेप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याकरता म्हाडा प्राधिकरणामार्फत दिनांक 3/12/2025 च्या आदेशान्वये उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली असून समिती याबाबतची चौकशी करत आहे.तसेच नागपूर मंडळांतर्गत झालेल्या रोख रकमेच्या व्यवहार संदर्भात मुख्याधिकारी नागपूर मंडळ यांनी समिती स्थापन करून रोख रकमेच्या व्यवहाराची सत्यता तपासणी करण्यात येत आहे.

या प्रकरणात दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर समितीच्या चौकशी अहवालानुसार कारवाई करण्यात येईल.

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने,

(डॉ. विजय इंगोले)
मुख्य अधिकारी
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर

म्हाडा MHADA

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर

(म्हाडाचा घटक)

गृहनिर्माण भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर-०१

म्हाडा MHADA

दुरध्वनी क्रमांक – (०७१२) २५६२२३९, २५६०६४९ E-mail – mhadangp_01@hotmail.com

लक्षवेधी सूचना क्रमांक: 2277

पूरक टिपणी

सन 2022-23 मध्ये नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा मार्फत अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटाकरिता बांधकाम केलेल्या सदनिकापैकी 1239 सदनिका विक्री अभावी रिक्त असल्याने सदनिका/गाळे यांच्या विक्रीकरीता दि. 30/09/2022 रोजी दैनिक नवभारत वर्तमानपत्रामध्ये सदर रिक्त सदनिका गाळे विक्रीकरीता एजेंसी म्हणून काम करणेकरीता अर्ज सादर करण्याबाबत जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. त्याअनुषंगाने श्री. भूपेन उर्फ भिमराव चंद्रिकापुरे, संचालक, डिल्स माय प्रॉपर्टी यांनी सादर केलेल्या अर्जानुसार मे. डिल्स माय प्रॉपर्टी यांना प्रति सदनिका मानधन तत्वावर नागपूर मंडळाच्या रिक्त सदनिकांची विक्री एजंसी म्हणून काम करण्याकरीता दिनांक 19 /10/2022 रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

नागपूर मंडळामध्ये रिक्त गाळे विकण्यासाठी नेमणूक करण्यात आलेल्या डील्स माय प्रॉपर्टी या संस्थेद्वारे होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत मुख्य दक्षता व सुरक्षा विभाग प्राधिकरण मुंबई यांच्याकडून करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने व म्हाडा प्राधिकरण परिपत्रक दिनांक 21/ 11/ 2023, ET 705 नुसार विक्री अभावी रिक्त असलेल्या सदनिका विक्रीसाठी वापरात आणावयाची कार्यपद्धती नमूद केली असल्याने दिनांक 31/12/2024 रोजी डील्स माय प्रॉपर्टी या एजन्सी सोबत करण्यात आलेला करारनामा संपुष्टात आणण्यात आलेला होता.

प्राप्त तक्रारीच्या व दक्षता विभाग, प्राधिकरण यांचे सुचनेनुसार उपरोक्त कार्यादेश रद्द करुन ई-निविदा प्रणालीद्वारे नव्याने 1) मे. इनोव्हेटीव्ह कंस्ट्रक्शन 2) मे. सिंडीकेट सर्विसेस 3) मे. डिल्स माय प्रॉपर्टी या 03 एजंसीची 06 महिन्यांकरीता (दि. 06/01/25 ते दि. 05/07/25) नेमणूक करण्यात आली होती.

नागपूर मंडळ कार्यालयास अर्जदारांकडून मौखिक व लेखी स्वरुपातील प्राप्त तक्रारी च्या अनुषंगाने, मे. डिल्स माय प्रॉपर्टी यांनी अर्जदारांकडून सदनिकेच्या किंमतीच्या रक्कमेचा भरणा नागपूर मंडळ कार्यालयात न करता स्वतःच्या DMP Finance खात्यामध्ये ठेवून, self-cheque द्वारे पैसे स्वतःच्या खात्यामध्ये घेऊन अर्जदारांची दिशाभूल केली, असे माहे ऑगस्ट 2025 मध्ये निष्पन्न झाले असता दिनांक 21/8/ 2025 रोजी तक्रारदार लाभार्थी यांची रक्कम व्याजासकट नागपूर मंडळात भरण्याबाबतचे पत्र डील्स माय प्रोपर्टीला देण्यात आले होते. तदनंतर 15 तक्रारदार लाभार्थी यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 9/9/2025 रोजी पुनश्च डील्स माय प्रॉपर्टी या विक्री एजन्सी कड़े 15 लाभार्थ्यांची रक्कम व्याजासकट भरण्यासंदर्भात पत्र देण्यात आले होते. यानंतर मे. डिल्स माय प्रॉपर्टी व नागपूर मंडळ यांचेमध्ये विक्री अभावी रिक्त असलेल्या सदनिका गाळे यांच्या विक्रीकरीता असलेला करार रद्द करण्यात आल्याबाबतची माहिती दैनिक लोकमत व नवभारत या वृत्तपत्रांमध्ये 11/9/2025 प्रकाशित करण्यात आली होती. तसेच सदर एजन्सी मार्फत नागरिकांची फसवणूक केल्याचे लक्षात आल्यामुळे दिनांक 4/11/25 रोजी एजन्सीला विक्रीच्या काळया यादीत टाकण्यात आले आहे.

तदनंतर मे. डिल्स माय प्रॉपर्टी यांचेमार्फत बुकिंग केलेल्या परंतु मंडळ कार्यालयास पैसे भरणा प्रक्रिया पुर्ण न केलेल्या एकुण 68 तक्रारदारांच्या तक्रारी दिनांक 12/11/25 पर्यंत नागपूर मंडळ कार्यालयास प्राप्त झाल्या असल्याने तक्रारींची दखल घेऊन मे. डील्स माय प्रॉपर्टी यांचे विरुद्ध सीताबर्डी पोलीस ठाणे येथे 13/10/2025 रोजी लेखी तक्रार करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सीताबर्डी पोलीस ठाणे अंतर्गत डील्स माय प्रॉपर्टी यांचे विरुद्ध दिनांक 18/11/25 रोजी एफ आय आर दाखल झाला असून भारतीय न्याय संहिता 2023 च्या 318 (4) व 316 (2) अंतर्गत गुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली आहे. पोलीस स्टेशन सीताबर्डी यांचेकडून प्राप्त माहितीनुसार आरोपी श्री भूपेन उर्फ भीमराव चंद्रिकापुरे संचालक डील्स माय प्रॉपर्टी यांचे विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

दिनांक 1/05/2025 पर्यंत डिल्स माय प्रोपर्टी विरुद्ध 123 लाभार्थ्यांच्या फसवणूक तक्रारी प्राप्त असून एजन्सीने लाभार्थ्यांकडून रोख स्वरूपात घेतलेली रक्कम रु 4,07,36,635/- आहे.

फसवणूक झालेल्या 123 लाभार्थ्यांपैकी 30 लाभार्थी हे नागपूर मंडळ अंतर्गत चंद्रपूर दाताळा या गृहनिर्माण योजनेतील असून सदर विक्री एजन्सीने त्यांच्याकडून रू 1.13 कोटी रोख स्वरूपात रक्कम घेतल्याचे निदर्शनास आलेले आहे.

उपरोक्त एजन्सी विरुद्ध सीताबर्डी पोलीस स्टेशन येथे दाखल केलेली लेखी तक्रार व त्या अनुषंगाने एजन्सीने नागपूर मंडळात भरणा केलेली रक्कम, प्राधिकरणाकडून मंजूर करण्यात आलेली व्याजमाफी व मुद्रांक शुल्क उशिरा भरण्याची अटीवर 43 लाभार्थ्यांना सदनिकेचे वाटप करण्यात आलेले आहे. यापैकी 5 लाभार्थी चंद्रपूर येथील योजनेचे आहेत

नागपूर मंडळांतर्गत डील्स माय प्रॉपर्टी या एजन्सी द्वारे विक्री केलेल्या सदनिकांच्या रकमेप्रकरणी अहवाल सादर करण्याकरता म्हाडा प्राधिकरणामार्फत दिनांक 3/12/2025 च्या आदेशान्वये उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आलेली असून समिती याबाबतची चौकशी करत आहे.

तसेच नागपूर मंडळांतर्गत एजन्सीने घेतलेल्या रोख रकमेच्या व्यवहार संदर्भात मुख्याधिकारी नागपूर मंडळ यांनी समिती स्थापन करून रोख रकमेच्या व्यवहाराची सत्यता तपासणी करण्यात येत आहे.

या प्रकरणात दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर उच्चस्तरीय समितीच्या चौकशी अहवालानुसार कारवाई करण्यात येईल.

(डॉ. विजय इंगोले)
मुख्य अधिकारी
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर

म्हाडा

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, आमदार निवास रस्ता,
सिव्हील लाईन्स, नागपूर
दिनांक 19/10/2022

कार्यादेश

मे.
Deals My Property,
3rd Floor opposite Raten Tower,
Near Ganeshpeth Bustand, Nagpur

विषय: नागपूर मंडळातील सदनिकाकरिता ऐजंन्ट नियुक्ती करणेबाबत.
संदर्भ : १. या कार्यालयाची दिनांक ३०.०९.२०२२ रोजीची वर्तमानपत्रातील जाहिरात.
२. आपला दिनांक ०३.१०.२०२२ रोजीचा सादर केलेला अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण दिनांक ३०.०९.२०२२ रोजी संदर्भ क्रमांक १ च्या जाहिरातीनुसार संलग्न तक्त्यानुसार सदनिकेच्या विक्रीकरिता मानधनावर नियुक्ती करण्याकरिता संदर्भ क्रमांक २ नुसार विनंती केलेली आहे.

सदर प्रति सदनिका प्रवर्ग निहाय EWS करिता १०,०००, LIG-१५०००, MIG-२००००, HIG-२५०००/- ऐवढया मानधनावर आपणास या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

१. ऐजन्सी ही नोंदणीकृत असणे गरजेचे आहे.
२. ऐजन्सीने प्रत्येक वेळी किमान १० अर्जदारांचा प्रस्ताव सादर करावा.
३. ऐजन्सीधारकाकडे GST क्रमांक असल्यास सादर करावे, पॅन कार्ड, आधार कार्डची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.
४. घोषणापत्र गाळेधारकाचे असणे आवश्यक राहील.
५. ऐजन्सीने लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे रक्कम घेणार नाही याबाबतचे हमीपत्र.
६. ऐजन्सीला लाभार्थ्यांना गृह कर्ज उपलब्ध करुन देणेबाबत सहकार्य करणे अनिवार्य असेल.
७. सदनिकाधारकांना सदनिका वाटप आदेश दिल्यानंतर ऐजंन्सीला मानधानाचे भुगतान करण्याकरिता विहित प्रारुपामध्ये बिल तयार करुन संबंधित मिळकत व्यवस्थापक विभागामधून मंजुरी घेवून पुढील भुगतानाची कार्यवाही करण्यात येईल.
८. नोंदणीकृत ऐजन्सीवर कुठल्याही प्रकारे न्यायालयीन प्रकरणे, गुन्हा दाखल नाही किंवा काळया यादीमध्ये नाव समाविष्ट नाही याबाबतचे रुपये ५००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरी करुन सादर करावे.
९. ऐजन्सीला रुपये २५,०००/- ऐवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून मुख्य लेखा अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, यांचेकडे धनाकर्षाच्या स्वरुपात जमा करावी लागेल तसेच

ऐजन्सीच्या प्रति गाळा देयकामधून/ठरवून दिलेल्या रक्कमेतून १० % रक्कम सुरक्षाठेव म्हणून नागपूर मंडळाकडे कपात करुन ठेवण्यात येईल योजनेतील पूर्ण गाळे वाटप झाल्यानंतर किंवा ऐजन्सीने मागणी केल्यास त्यांना सुरक्षा ठेव रक्कमेचा परतावा करण्यात येईल.

१०. ऐजन्सी मार्फत प्राप्त लार्भाथ्याकडून १००% रक्कम भरुन सदनिका राखीव केल्यानंतर जर गाळेधारकाने कोणत्याही कारणाने सदनिका घेण्यास असमर्थता दर्शविली/माघार घेतल्यास अश्या परिस्थितीमध्ये जर ऐजन्सीला सदर लार्भाथ्यांचे देयक अदा झाले असल्यास सदर लाभ ऐजन्सीच्या पुढील देयकामध्यून माघार घेण्यात आलेल्या सदनिकामागे अदा करण्यात आलेली रक्कम परत घेण्यात येईल किंवा सुरक्षा ठेव रक्कमेधून कपात करण्यात येईल जर ऐजन्सीची पुरेशी रक्कम मंडळाकडे जमा नसल्यास ऐजन्सीला त्याचे भुगतान करणे ऐजन्सीला बंधनकारक राहील.

११. ऐजन्सी मार्फत करण्यात येणाऱ्या कामामध्ये काही त्रुटी आढळल्यास अथवा त्या ऐजन्सीचे काम समाधानकारक न वाटल्यास सदर काम रद्द करण्याचे किंवा चालु ठेवण्याचे सर्व अधिकार मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांना राहतील.

१२. ऐजन्सीला ज्या कामाकरिता नियुक्ती देण्यात येत आहे तेच काम ऐजन्सीने करणे बंधनकारक असुन, वाटप केलेल्या कामाव्यतिरिक्त म्हाडाच्या इतर कामामध्ये त्यांना हस्तक्षेप करण्याचा अधिकार राहणार नाही. तसे केल्यास त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकारी मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहे. आपणास कोणतेही व्यवहार करण्याचा अधिकार नाही तसेच म्हाडाच्या लोगोचा गैर वापर केल्याचे मंडळाच्या निर्दशनास आल्यास अश्या कंपनीचे कार्यादेश रद्द करुन अनामत रक्कम व सुरक्षा ठेव परत करण्यात येईल. ऐजन्सीने बँकेची विस्तृत माहितीची छायांकित प्रत जोडावी.

१३. नागपूर मंडळाकडील सदनिका विक्री करिता दिनांक ३०.०९.२०२२ रोजी जाहिरात दिलेली असून सदर जाहिरातीतल अटि व शर्ती गाळेधारकाकडून पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी हि संबंधीत ऐजन्सीची राहिल.

१४. ऐजन्सीला कार्यालयाकरिता जागा लागणारा कर्मचारी वर्ग, संगणक, ईलेक्ट्रीक, पाणी, ईतर सोयी सुविधा पुरविण्याची जबाबदारी ऐजन्सीची राहिल.

१५. सदर योजनेमधील सदनिकेचे संपूर्ण वाटप होईपर्यंत हा कार्यादेश अमलात राहिल सदनिकेचे संपूर्ण वाटप झाल्यानंतर सदर कार्यादेश त्याच क्षणी रद्द समजण्यात यावा.

आपला विश्वासु,

19/10/22

मुख्य अधिकारी
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर

प्रत:

१. कार्यकारी अभियंता१/२, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना माहितीस्तव अग्रषित
२. मुख्य लेखा अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना माहितीस्तव अग्रषित
३. मिळकत व्यवस्थापक१/२, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांना माहितीस्तव अग्रषित

E-office no. - 7779654

नागपूर मंडळांतर्गत डील्स माय प्रॉपर्टी.कॉम या एजन्सीव्दारे विक्री केलेल्या सदनिकांच्या रक्कमे प्रकरणी अहवाल सादर करण्याकरीता गठीत समिती

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई 400051
आदेश क्रं.प्राधि./समिती गठीत/2025/ /प्र.7
दिनांक:-

संदर्भ - मा. मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांची दि.24.11.2025 रोजीची टिप्पणी

आदेश -

नागपूर मंडळांतर्गत डील्स माय प्रॉपर्टी.कॉम या सेल्स एजन्सीने रिक्त सदनिका विक्रीच्यां नावाखाली प्राप्त झालेली रक्कम म्हाडाच्या खात्यामध्ये भरली नसल्याबाबतची तक्रार मा. मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांच्या दि.24.11.2025 रोजीच्या संदर्भाधिन टिप्पणी अन्वये प्राधिकरणास केलेली आहे. सदर प्रकरणी सविस्तर घटनाक्रमासह संपुर्ण वस्तुस्थिती अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने, प्राप्त निर्देशानूसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण स्तरावरुन खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

1. श्री अनिल वानखडे - उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.- अध्यक्ष
2. श्री अजयसिंग पवार - वित्त नियंत्रक/प्रा - सदस्य
3. श्री. किशोरकुमार काटवटे – उपमुख्य अभियंता/परि-3/मुं इ दु व पु मंडळ –सदस्य
4. श्री. वैभव केदारे – उपमुख्य अभियंता/पी एम ए वाय/प्रा. – सदस्य
5. श्री ज्ञानेश्वर हडदरे – सेवानिवृत्त (मुख्य अभियंता) – सदस्य
6. डॉ. विजय इंगोले – मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ – सदस्य सचिव

उक्त गठीत समितीने वर नमूद केल्याप्रमाणे सविस्तर घटनाक्रमासह संपुर्ण वस्तुस्थिती अहवाल मा.उपाध्यक्ष/प्रा यांना दि.09.12.2025 पर्यंत सादर करावयाचा आहे.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ/प्रा. यांच्या मान्यतेने.

(अनिल वानखडे) 03/XII
सचिव/प्राधिकरण (अति.कार्य.)

प्रति,

1. श्री अनिल वानखडे - उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.- अध्यक्ष
2. श्री अजयसिंग पवार - वित्त नियंत्रक/प्रा - सदस्य
3. श्री. किशोरकुमार काटवटे – उपमुख्य अभियंता/परि-3/मुं इ दु व पु मंडळ –सदस्य
4. श्री. वैभव केदारे – उपमुख्य अभियंता/पी एम ए वाय/प्रा. – सदस्य
5. श्री ज्ञानेश्वर हडदरे – सेवानिवृत्त (मुख्य अभियंता) – सदस्य
6. डॉ. विजय इंगोले – मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ – सदस्य सचिव

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नागपुर शहर P.S. (पोलीस ठाणे): सीताबर्डी Year (वर्ष): 2025

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0994 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/11/2025 13:48 वाजता

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	316(2)
2	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	318(4)

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मधले दिवस Date from (दिनांक पासून): 19/10/2022 Date To (दिनांक पर्यंत): 05/07/2025

Time Period (कालावधी): Time From (वेळेपासून): 12:00 तास Time To (वेळेपर्यंत): 18:00 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 15/10/2025 Time (वेळ): 12:00 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 020 Date and Time (दिनांक आणि वेळ): 18/11/2025 13:35 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): दक्षिण, 0.5 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): डिल्स माय प्रॉपर्टीचे ऑफिस, 8 वा माळा लोकमत बिल्डींग, पोलीस ठाणे सिताबर्डी नागपुर ,

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): दक्षता विनायकराव गोळे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1982 (d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

S. No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्र क्रमांक)

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्ता प्रकार)	Address (पत्ता)::
1	वर्तमान पता	फलट नंबर 401, इषस्पर्ष , अपार्टमेंट दाभा पोलीस, ठाणे गिट्टीखदान नागपुर , सीताबर्डी , नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	फलट नंबर 401, इषस्पर्ष , अपार्टमेंट दाभा पोलीस, ठाणे गिट्टीखदान नागपुर , गिट्टीखदान, नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-7083656914

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

S. No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address(वर्तमान (पत्ता))
1	भुपेंद्र चंद्रिकापुरे			1. Town/Village (शहर / गाव): 8 माळा लोकमत भवन नागपुर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): सीताबर्डी,District (जिल्हा): नागपुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

S. No. (अ.क्र.)	Propertty Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (विवरण)	Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)
1	इतर	संकीर्ण/विविध	1,39,87,370 रू	1,39,87,370.00

10. **Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,39,87,370.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

S. No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.)

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

रिपोर्ट

माझे नाव:- दक्षता विनायकराव गोळे वय 43 वर्ष रा. फलॅट नंबर 401, इशस्पर्ष अपार्टमेंट दाभा पोलीस ठाणे गिट्टीखदान नागपुर मोनं 7083656914

मी समक्ष पोलीस ठाणे सिताबर्डी नागपुर षहर येथे हजर राहुन आपली रिपोर्ट देते कि मी वरिल पत्तावर राहत असुन नागपुर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन सिव्हील लाईन नागपुर

येथे उप मुख्याधिकारी म्हणुन सप्टेंबर 2024 पासुन कार्यरत आहे. सध्दा नागपुर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन चे मुख्याधिकारी डॉ.विजय इंगोले व मिळकत व्यवस्थापक म्हणुन रामेष्वर आतराम कार्यरत आहे.

सन 2022 साली म्हाडा कडुन जाहिरात प्रकाषीत करण्यात आली होती. सदर जाहीरातीमध्ये म्हाडा अंतर्गत तयार करण्यात आलेल्या व विक्री न झालेल्या सदनिकांची विक्री करण्याकरिता एजंन्सी ची आवष्यकता आहे अषा प्रकारची जाहीरात प्रकाषीत करण्यात आली होती. सदर जाहीराती वरून सप्टेंबर 2022 मध्ये डिल्स माय प्रापॅर्टी नावाच्या एजंन्सीने संपर्क साधला असता तत्कालीन मुख्याधिकारी मा.श्री महेषकुमार मेघमाळे यांनी डिल्स माय प्रॉपर्टी या एजंन्सीची म्हाडाच्या विक्री न झालेल्या सदनिकांची विक्री करण्यासाठी नागपुर डिव्हीजनमध्ये नियुक्ती केली. सदर एजंन्सीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे कार्यालय लोकमत भवन 8 वा माळा नागपुर हे होते. म्हाडा कडुन विक्री न झालेल्या सदनिकाविक्री करण्या करिता नियुक्त केलेल्या डिल्स माय प्रॉपर्टीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांना तत्कालीन मुख्याधिकारी मा.श्री महेषकुमार मेघमाडे यांनी एजंन्सी कषा प्रकारे आपले कार्य करेल याबाबतचा एक अटी व षर्तीचा कार्यादेष तयार करून सदरचा कार्यादेष जा.क्रं./मु.अ./2022/ऐजंट/5858/मा.वी नागपुर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ गृहनिर्माण भवन आमदार निवास जवळ सिव्हील लाईन नागपुर दिनांक 19/10/2022 रोजी कार्यादेष मुख्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने डिल्स माय प्रॉपर्टीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांना देण्यता आला होता. सदरचा कार्यादेषामध्ये एजंन्सीला एकुन 15 अटी व षर्तीच्या अधिन राहुन आपले कार्य पार पाडण्याबाबत सुचीत करण्यात आले होते. सदर कार्यादेषामध्ये अट क्रमांक 5 नुसार ऐजन्सीने लाभार्थ्याकडुन कोणत्याही प्रकारचे रक्कम घेणार नाही तसेच अट क्रमांक 6 नुसार ऐजन्सी लाभाथ्यांना गृहकर्ज उपलब्ध करून देण्याबाबत सहकार्य करेल अषा प्रकारचा उल्लेख होता. डिल्स माय प्रापॅर्टी या ऐजंन्सीची नागपुर डिव्हीजन मध्ये आपले कार्य पार पाडण्यासाठी दिनांक 19/10/2022 ते दिनांक 31/12/2024 रोजी व ई टेंडर करून फेरनियुक्ती नुसार ऐजंन्सीला दिनांक 06/01/2025 ते दिनांक 05/07/2025 रोजी पर्यंत मुदत देण्यात आली होती.

म्हाडा अंतर्गत वडधामना येथे काही सदनिकांची निर्मीती करण्यात आली होती. सदर सदनिकेमधील न विकलेल्या सदनिकांची विक्री करण्यासाठी सुध्दा डिल्स माय प्रापॅर्टी या एजंन्सीला अधिकार देण्यात आले होते. परंतु आँगस्ट 2025 मध्ये वडधामना येथील लाभार्थ्याकडुन डिल्स माय प्रापर्टी चे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुर यांचे विरोधात लाभार्थ्यानी म्हाडा कार्यालयात तक्रार अर्ज प्राप्त झाले. सदर तक्रार अर्जामध्ये डिल्स माय प्रॉपर्टीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांना लाभार्थ्याकडुन कोणतेही पैसे घेण्याचा अधिकार नसतांना त्यांनी लाभाथ्यांकडुन त्यांना पैसे स्विकारण्याचा अधिकार आहे असे भासवुन लाभाथ्यांकडुन पैसे स्विकारून लाभाथ्यांना फलॅट न देता फसवनुक केली आहे. तसेच काही लाभार्थ्याकडुन अतिरीक्त षुल्क म्हणुन प्रत्येक सदनिके मागे 50,000 रू ,गृहकर्ज उपलब्ध करून देणे करिता 10,000 रू व विज मिटर करिता अतिरीक्त 3000 रू घेतल्याचे लाभाथ्यांनी ऐजंन्सीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांच्या विरूध्द तक्रार म्हाडा कार्यालयात लाभाथ्यांच्या तक्राराची यादी दिली. सदर तक्रार यादीमध्ये ऐजंन्सीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांना लाभाथ्यांकडुन पैसे घेण्याचा कोणताही अधिकारी नसतांना लाभार्थी 1) सागर सुरेष थोर 2) श्री योगषे मंगे 3) श्री कुमार सुरेंद्र नायडु 4) श्री चेतन घोरमाडे 5) श्री इंद्रपाल सोनकुवर 6) श्री उमषे महल्ले 7) श्री विक्रम पंढरी लाखनकर 8) श्री

स्वप्निल बोकडे 9) श्री नविनकुमार नारनवरे 10) सौ षितल वरखेडे 11) सौ कविता विनोद बिघाने 12) सौ अरूणा ठाकरे 13) राजेंद्र हिंगवे 14) सुरज रामटेके 15) श्री विकी पाटील 16) आदित्य सिंग 17) सौ प्रिती अमर महाजन 18) श्री राजेष धुर्वे 19) सौ मंजिरी जोषी 20) सचिन निमगडे 21) महेष घोडके 22) सुजर खोब्रागडे 23) सौ प्रियंका सयाम 24) मयुर बनसोड 25) सागर व-हाडे 26) भुमिका इंगोले 27) स्नेहा सचिन डोंगरे 28) मंगेष भांगे/ योगिता भुरसे 29) हर्शल नरेंद्र निरटकर 30) पुस्कतकला उमेष नेवारे 31) चंद्रषेखर बढे 32) अर्जन बागडे 33) राजु सोनेकर 34) सौ स्नेहा भांडवालकर 35) माधुरी षरद थुटे यांच्या कडुन प्रत्येकी 02,84,085 रू तसेच लाभाथ्र्यी 36) श्री विजय पंुडलिकराव लोहकरे यांच्या कडुन 03,24,000 रू, 37) सौ षिल्पा अजय पात्रे यांच्या कडुन 01,29,310 रू, 38) श्री प्रविण कोरे यांच्या कडुन 50,000 रू, 39) हर्शल पवार 30,085 रू, 40) षिल्पा तितरे व 41) सुरज खोब्रागडे यांच्या कडुन प्रत्येकी 11,30,500रू, 42) बंटी जनबंधु यांच्या कडुन 05,50,000 रू, 43) निखील धोमगये 03,00,000 रू, 44) हेमराज राउत यांच्या कडुन 04,00,000 रू अषा एकुन 44 लाभाथ्र्यांकडुन डिलस माय प्राँपर्टीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे रा. लोकमत भवन 8 माळा नागपुर यांना म्हाडाच्या कार्यादेषानुसार लाभाथ्र्यांकडुन कोणतेही पैसे घेण्याचा अधिकार नसतांना चंद्रिकापुरे यांनी लाभाथ्र्यांकडुन एकुन 1,39,87,370 रूपयाची रक्कम स्विकारून म्हाडाची तसचे लाभाथ्र्यांची फसवनुक केली आहे.

डिल्स माय प्राँपर्टीचे संचालक भपेंद्र चंद्रिकापुरे यांनी दिनांक 19/10/2022 ते दिनांक 05/07/2025 रोजी पावेतो म्हाडाच्या कार्यादेषानुसार लाभाथ्र्यांकडुन कोणतेही पैसे घेण्याचा अधिकार नसतांना एकुन 44 लाभाथ्र्यांकडुन 1,39,87,370 रू स्विकारून लाभार्थ्यांची व म्हाडाची फसवनुक केली आहे. तरी माझी डिल्स माय प्रापॅर्टीचे संचालक भुपेंद्र चंद्रिकापुरे यांच्या विरूध्द कायदेषीर कारवाई साठी तक्रार यादीच्या आधारे रिपोर्ट देत आहे.

हिच माझी रिपोर्ट आहे माझे सांगणेप्रमाणे संगणकावार टंकलिखीत केली असुन प्रिंट काढुन वाचुन पाहले बरोबर आहे.

समक्ष

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.

(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vitthalsing mohanlal rajput (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3)

Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): vitthalsing mohanlal rajput

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

Physical features, deformities and other details of the suspect/accused: (If known / seen)
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील

S. No. (अ.क्र))	Sex (लिंग)	Date / Year Of Birth (जन्म मतारीख / वर्ष)	Build (बांधा)	Height (cms) (उंची(से.मी)	Complexion (रंग)	Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष	1980		-		चेचक: क्र.

Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्ट्ये)	Teeth (दात)	Hair (केस)	Eye (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language/Dialect (भाषा/बोली)	Place of (चे ठिकाण)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
NAGPUR HOUSING AND
AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

जा.क्र.मु.अ/ना.मं./3452/२०२६
नगापूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर
दिनांक- 30/04/2026

आदेश:-

विषय- डी.एम.पी नस्तीची तपासणी करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने आदेशित करण्यात येते की, डील्स माय प्रॉपर्टी या विक्री एजन्सीकडून म्हाडा नागपूर मंडळाच्या लाभार्थ्यांची फसवणुक झाल्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने डील्स माय प्रॉपर्टी ऐजन्सी विरुध्द पोलीस स्टेशन सितावर्डी येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात संबंधित एजन्सीकडून लाभार्थ्यांकडून रक्कम थेट स्वत: च्या खात्यात जमा करुन घेतल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. तरी लाभार्थ्यांचे पैसे स्वत:कडे घेऊन म्हाडा कार्यालयास भरणा केले नसल्याने या प्रकरणाची सखोल तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची स्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	शेरा
१.	श्रीमती दक्षता वि. गोळे, उपमुख्य अधिकारी, नागपूर मंडळ	सदस्य
२.	श्री. ललीत खापरे, मुख्य लेखाधिकारी, नागपूर मंडळ	सदस्य
३.	श्री. शिलांत ह वानखडे, सहाय्यक विधी सल्लागार, नागपूर मंडळ	सदस्य
४.	श्री. रामेश्वर पा. आत्राम, मिळकत व्यवस्थापक-१, नागपूर मंडळ	सदस्य
५.	श्री. हरिष लिल्हारे, मिळकत व्यवस्थापक-२, नागपूर मंडळ	सदस्य

सदर समिती खालील बाबींची तपासणी करील-

१. लाभार्थींनी डील्स माय प्रॉपर्टी या विक्री एजन्सीस अदा केलेल्या रक्कमेची तपासणी करणे.
२. डील्स माय प्रॉपर्टीने म्हाडा कार्यालयाला केलेल्या रक्कमेचा भरणा बाबत तपासणी.
३. लाभार्थ्यांनी पैसे कॅश/चेक डिडी/सेल्फ चेक स्वरुपात भरणा केलेला आहे याची तपासणी.

गृहनिर्माण भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१
दूरध्वनी : २५६२२३९, २५६०६४९, २५६५६९२
फॅक्स : २५६४९३९

Gruha Nirman Bhawan, Civil Lines, Nagpur-440 001
Phones : 2562239, 2560649, 2565692
Fax : 2564939

४. लाभार्थ्यांकडे डील्स माय प्रॉपर्टी यांच्याकडून देण्यात आलेल्या पावत्यांची सत्यता तपासणे.

५. लाभार्थ्यांच्या बँक खात्यातुन withdrawal debit झालेल्या रक्कमेची पडताळणी करणे.

६. लाभार्थ्यांनी भरलेल्या रक्कमे पैकी किती रक्कम म्हाडाच्या गाळयाकरिता भरलेले आहे, मुद्रांक शुल्काचे, मिटर बिल व इतर कार्यालयाचे आहे, अथवा डील्स माय प्रॉपर्टीने स्वत:चे सेवा शुल्क आकारले आहे याबाबत पडताळणी करावी.

७. उपरोक्त सर्व बाबींची शहानिसा करुन नस्ती निहाय तपासणी अहवाल सादर करावा.

(डॉ.विजय इंगोले)
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर

प्रत:-

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,मुबंई यांना माहितीस्तव सादर.

२. श्रीमती दक्षता वि. गोळे, उपमुख्य अधिकारी, नागपूर मंडळ.

३. श्री. ललीत खापरे, मुख्य लेखाधिकारी, नागपूर मंडळ.

४. श्री. शिलांत ह वानखडे, सहाय्यक विधी सल्लागार, नागपूर मंडळ.

५. श्री. रामेश्वर पा. आत्राम, मिळकत व्यवस्थापक-१, नागपूर मंडळ.

6. श्री. हरिष लिल्हारे, मिळकत व्यवस्थापक-२, नागपूर मंडळ.

विधानपरिषद

ठराव

मुंबई मंडळ



मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,

कक्ष क्र.407, तिसरा मजला, गृहनिर्माण भवन वांद्रे (पूर्व), मुंबई-51

म्हाडा MHADA

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई-400032.

विषय :- **विधानपरिषद ठराव क्रमांक-28**
"मुंबईतील जागांचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याबाबत."
श्री. सुनिल शिंदे, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.विपठ -2026/प्र.क्र.106/गृनिभू दि.18.06.2026.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विधानपरिषद ठराव क्र.28 अन्वये "मुंबईतील जागांचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्याबाबत", श्री. सुनिल शिंदे, मा.वि.प.स. यांनी मांडलेला सदरच्या ठरावाच्या अनुषंगाने अभिप्राय/ माहिती सोबत सादर करण्यात येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांचे मान्यतेने)

आपलाविश्वासु,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 24-06-2026
19:06:18
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

File No. विधानपरिषदठरावक्रमांक-28 (Computer No. 3288311)
Generated from eOffice by AMOL ANANT RAMBADE, DY ENGR(AAR)MHADA MHADB, DEPUTY ENGINEER, MHADA on 25/06/2026 07:22 PM

श्री. सुनिल शिंदे, मा. वि.प.स. यांनी विधानपरिषदेत मांडलेला ठराव क्र. 28

"मुंबईतील जागांचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. बहुसंख्य नवीन इमारतीत आलिशान घरे बांधण्याची शर्यतच लागली आहे. त्यामुळे नवीन इमारतीतील आलिशान घरांनी कोटींच्या किंमती गाठलेल्या आहेत. अशी घरे खरेदी करण्याची आर्थिक क्षमता असलेल्या स्थानिक भूमिपुत्राला मात्र मांसाहारी असल्याचे आणि तत्सम इतर कारण सांगून विकासक घरे विकण्यास तयार होत नाहीत. स्थानिक भूमिपुत्राची ही शोकांतिका थांबविण्यासाठी राज्य सरकारने नवीन इमारतीतील घरांची विक्री सुरु झाल्यानंतर विकासकास एक वर्षापर्यंत स्थानिक भूमिपुत्रासाठी घरांचे 50 टक्के आरक्षण ठेवणे बंधनकारक करावे आणि एक वर्षापर्यंत या घरांची विक्री न झाल्यास विकासकास ही घरे इतर कोणालाही विकण्याची मुभा देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

अभिप्राय:-

गृहनिर्माण योजने अंतर्गत सर्वसामान्यासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत मुंबईतील म्हाडा वसाहतीमध्ये मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटाअंतर्गत सदनिका बाधून संगणकीय सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेस परवडणा-या दरात उपलब्ध करून देतात.

मुंबईत म्हाडाच्या वसाहतीमध्ये रिक्त भूखंडावर विविध उत्पन्न गटाकरीता सर्वसामान्य जनतेकरीता परवडणा-या घरांची निर्मिती करण्याकरीता योजना राबविण्यात येते. सदर योजनेमधून निर्माण झालेल्या सदनिका The MHADA (Disposal of Land) Rule 1981 मधील कलम 13(2) अन्वये खालील प्रमाणे विविध संवर्गाकरीता सोडतीव्दारे वितरित करण्यात येतात.

अ.क्र.	प्रवर्ग	टक्के
1.	SC (अनुसूचित जाती)	11
2.	ST(अनुसूचित जमाती)	6
3.	NT (भटक्या जमाती)	1.5
4.	DT(विमुक्त जमाती)	1.5
5.	JR (पत्रकार)	2.5
6.	FF (स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे वारसदार)	2.5
7.	PH(अंध व शारीरिकदृष्ट्या अपंग)	3
8.	DF(संरक्षण दलातील किंवा सिमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या सैनिकांचे वारस अथवा जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी)	2
9.	EX (माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती)	5
10.	MP/MLA/MLC (खासदार/ आमदार)	2
11.	ME(म्हाडा कर्मचारी)	2
12.	SG (राज्य शासकीय कर्मचारी)	5
13.	CG (केंद्र शासनाचे कर्मचारी)	2
14.	AR(कलाकार)	2
15.	शासन स्वेच्छाधिकार	2
16.	GP (सर्वसाधारण जनता)	50
	एकूण	**100**

मुंबई शहर व उपनगरात विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-2034 मधील विविध विनियमानुसार प्राप्त होणा-या चटई क्षेत्र निर्देशांकानुसार उपलब्ध होणा-या अतिरिक्त बांधीव क्षेत्रफळाकरीता विकासकामार्फत अधिमुल्याचा भरणा करण्यात येऊन योजनेतील अस्तित्वातील सभासदांचे पुनर्वसन केल्यानंतर उर्वरीत सदनिकांची विक्री विकासकामार्फत खुल्या बाजारात ग्राहकांना परस्पर करण्यात येते.

File No. विधानपरिषदठरावक्रमांक-28 (Computer No. 3288311)
Generated from eOffice by AMOL ANANT RAMBADE, DY ENGR(AAR)MHADA MHADB, DEPUTY ENGINEER, MHADA on 25/06/2026 07:33 PM

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 24-06-2026
19:06:49

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

File No. विधानपरिषदठराव्कमांक-28 (Computer No. 3288311)
Generated from eOffice by AMOL ANANT RAMBADE, DY ENGR(AAR)MHADA MHADB, DEPUTY ENGINEER, MHADA on 25/06/2026 03:25 PM

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकासमंडळ
कक्ष क्र. 407, तिसरा मजला, गृहनिर्माणभवनकलानगर, वांद्रे
(पू) मुंबई - 51.

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई-400032.

विषय:- **विधानपरिषद ठराव क्र.5**
म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरीकांसाठी मोठ्याप्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याबाबत.
श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,मा.वि.प.स.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विपठ-2026/प्र.क्र.143/गृनिप,दि.09.06.2026

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विधानपरिषद ठराव क्र.5 अन्वये म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरीकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेण्याबाबत श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, मा.वि.प.स. यांनी विचारणा केलेला सदरचा ठराव स्विकृत करण्यात आलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने अभिप्राय/ माहिती सोबत सादर करण्यात येत आहेत.

आपलाविश्वासु,

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
13:51:09
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, मा. वि.प.स. यांनी विधानपरिषदेत मांडलेला ठराव क्र. 5

``मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारसही विधानपरिषद शासनास करीत आहे."

अभिप्राय:-

गृहनिर्माण योजने अंतर्गत सर्वसामान्यासाठी परवडणा-या घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत मुंबईतील म्हाडा वसाहतीमध्ये मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटाअंतर्गत सदनिका बाधून संगणकीय सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेस परवडणा-या दरात उपलब्ध करून देतात.

मुंबई मंडळाकडील निवासी घरे बांधण्यासाठी जमिनींची उपलब्धता कमी आहे, ही बाब विचारात घेऊन मुंबई मंडळाने तळ मजल्याच्या संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास करुन विविध उत्पन्न गट जसे की, अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गट करीता सदनिकांची निर्मिती केली आहे.

मुंबई मंडळाने विविध उत्पन्न गटांतर्गत सन-2026-27 ते सन-2034-35 पर्यंत या 9 वर्षांत अंदाजे 33954 घरे बांधण्याचे नियोजित केले आहे. मुंबई मंडळाने नियोजित केलेल्या गृहनिर्माण योजना मुंबई शहर व उपनगरात विविध अभिन्यासांत जसे की, जुने मागाठाणे, बोरीवली, ओल्ड एम.एच.बी. कॉलनी, चारकोप, गोराई, पहाडी गोरेगाव, मोतीलाल नगर, सिध्दार्थनगर गोरेगाव, ओशिवरा जोगेश्वरी, कामाठीपुरा, एस.व्ही.पी.नगर, रामकृष्ण नगर, कन्नमवार नगर विक्रोळी, कोपरी पवई,सायन प्रतिक्षानगर, अभ्युदय नगर, जी.टी.बी. नगर सायन कोळीवाडा, पी.एम.जी.पी. मजासवाडी, इ. ठिकाणी आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे:

वर्ष/ वर्गवारी	अत्यल्प उत्पन्न गट	अल्प उत्पन्न गट	मध्यम उत्पन्न गट	उच्च उत्पन्न गट	एकूण
2026-27	0	0	176	0	176
2027-28	86	358	1383	128	1955
2028-29	0	320	745	213	1278
2029-30	3181	3253	2830	819	10083
2030-31	1312	917	420	324	2973
2031-32	4092	2864	1309	1012	9277
2032-33	1730	1212	554	428	3924
2033-34	1260	883	403	312	2858
2034-35	631	441	202	156	1430
एकूण	**12292**	**10248**	**8022**	**3392**	**33954**

उपरोक्त नमुद मुंबई मंडळाच्या गृहनिर्माण योजनांची प्रगती विविध टप्प्यांवर जसे की, नकाशा व अंदाजपत्रके तयार करणे, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया तसेच काही योजना प्रगतीपथावर आहेत.

म्हाडामार्फत विविध प्रवर्गांकरीता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन सोडती मार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरीता माफक दरात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. त्याच प्रमाणे म्हाडाकडे आजमितीस उपलब्ध असलेल्या भूखंडावर नविन गृहनिर्माण योजना प्रस्तावित करून अधिकाधिक परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करून देणे करीता म्हाडा प्रयत्नशिल आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
13:51:40

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा विभागीय घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

(A MHADA UNIT)

पत्ता :कक्ष क्र.२१३, पहिलामजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

फोन – ०२२-६६४०५४८०, ई-मेल : eecitymb@gmail.com

जा.क्र./का.अ.(शहर)/मुं.मं./ /२०२६

दि.:-

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय, **मुंबई-४०००३२**

विषय:- विधानपरिषद ठराव.

मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा कार्यक्रम आखून देण्याबाबत.
श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा. वि.प.स.

संदर्भ:- १)कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपठ- २०२५/प्र.क्रं.१४७/ गृनिधो-२, दि. ०२/०७/२०२५.
२) कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक विपठ- २०२५/ प्र.क्रं.२५५ /गृनिधो- २, दि.२५/११/२०२५.
३) कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपठ- २०२६/प्र.क्रं.१४५/ गृनिधो-२, दि. ०८/०६/२०२६.

महोदय,

संदर्भाधिन पत्र क्र.१ अन्वये , विषयांकित विधानपरिषद स्विकृत ठराव क्रं. ६७ तसेच संदर्भाधिन पत्र क्र.२ अन्वये सारख्याच विषयाचा कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडून श्री अशोक ऊर्फ भाई जगताप, विधानपरिषद सदस्य यांच्याकडून प्राप्त, विधानपरिषद स्विकृत ठराव क्रमांक ४७ चा, सविस्तर मुददेनिहाय अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

तथापि संदर्भाधिन पत्र क्र.३ अन्वये कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडून श्री अशोक ऊर्फ भाई जगताप, विधानपरिषद सदस्य यांच्याकडून प्राप्त, विधानपरिषद स्विकृत ठराव पुन:श्च प्राप्त झाला असून सदरचा सविस्तर मुददेनिहाय अहवाल सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरीलप्रमाणे

आपला विश्वासू,

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 03-07-2026
17:51:31

मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ
म्हाडा, मुंबई

विषय:- विधानपरिषद ठराव.

मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा कार्यक्रम आखून देण्याबाबत.

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा. वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक विपठ-२०२६/प्र.क्रं.१४५/गृनिधो-२, दि. ०८/०६/२०२६.

विधानपरिषद स्विकृत ठराव :-

"मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणा-या कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणा-या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा महानगरपालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महानगरपालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबददल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणा-या कामगारांना ३०० चौ. फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

अभिप्राय :-

सुधारीत बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८(१)(ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप साधारणत: १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा व गिरणी मालक यांना प्रत्येकी देण्याची तरतुद आहे.

बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांमध्ये ३२ खाजगी मालकीच्या, २५ एनटीसीच्या गिरण्या व १ एमएसटिसीची गिरणी यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हददीत एकूण ५८ बंद/आजारी गिरण्या आहेत. त्यापैकी ११ गिरण्यांमध्ये पुनर्विकासाचा प्रस्ताव मंजुर नसल्यामुळे म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल उरलेल्या ४७ गिरण्यांपैकी १० गिरण्यांमध्ये म्हाडाचा वाटा शुन्य आहे.

म्हाडास प्राप्त झालेल्या जमिनीवर म्हाडाकडून अदयाप पर्यंत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गिरणी कामगार व संक्रमण सदनिकांचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

टप्पा	गिरण्यांची संख्या	गिरणी कामगार सदनिका	संक्रमण सदनिका	एकूण सदनिका	सोडत दिनांक
१	१८	६९२५	३२०४ व १३ दुकाने २३ घरे हुतात्म्यांसाठी	१०,१६५	२८/०६/२०१२

			राखीव		
२	०५	२६३४	१२९६	३९३०	०९/०५/२०१६
३	०३	३८९४	१८१६	५७१०	०१/०३/२०२०
४	०१	१६०	८०	२४०	बॉम्बे डाईंग मिल येथील १ इमारतीचे काम पूर्ण तर S+२३ मजल्यापर्यंत भोगवटा प्रमाणपत्र पात्र
५	०१	११२	५६	१६८	न्यु ग्रेट ईस्टर्न मिल येथील जागेवर गिरणी कामगार व संक्रमण सदनिकांचे बांधकाम प्रगती पथावर

गिरणी कामगार सदनिकांची सोडत काढण्यात येऊन गिरणी कामगारांना प्रत्यक्ष ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरित गिरणी कामगारांना प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत ही बाब म्हाडाशी संबंधित नसल्याने याबाबत अभिप्राय देणे शक्य नाही.

गिरण्यांच्या जागेवरील उपकरप्राप्त चाळी या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या अखत्यारित येतात परंतु उपकरप्राप्त चाळीबाबत सदर ठरावात उल्लेख नाही.

मुंबई गिरणी कामगारांच्या घरांकरीता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने कामगारांच्या घरांकरीता ठाणे जिल्हयातील शासकीय जमिनी उपलब्ध करुन देणेबाबत मा. प्रधान सचिव महाराष्ट्र शासन यांचे निर्देशानुसार व गिरणी कामगार संघटनांनी निवड केलेलया मौजे उत्तरशिव सर्वे नं. ७५ येथील एकूण क्षेत्र १०-९५-०० हे. आर. व मौजे हेदुटणे ता. कल्याण येथील सर्वे नं. २१९ एकूण क्षेत्र ०९-१२-०० हे. आर. जमिनी पैकी ११.७६ हेक्टर इतके क्षेत्र म्हाडाकडे हस्तांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग यांचे शासन निर्णय क्रं. गिकाघ/२०२३/प्र क्रं.१२८/गृनिधो-२ दि. १५/०३/२०२४ नुसार मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त प्रमाणे मंजुरी प्राप्त झाल्यानुसार जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून सदर जमिन म्हाडाकडे हस्तांतरीत करण्याकरीता पाठपुरावा सुरु आहे.

तसेच उपसचिव, महसुल व वनविभाग महाराष्ट्र शासन यांनी, कक्ष अधिकारी (गृनिप) गृहनिर्माण विभाग यांना दि. ०१/०३/२०२४ रोजी त्यांचे पत्र जमिन २७१९/१३३/प्र.क्रं.२९/ज-४ अन्वये "मुंबई येथील गिरणी कामगारांच्या घरासाठी मुंबई शहरात व उपनगरात जागा उपलब्ध नसल्यामुळे मंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील" शासकीय जागा म्हाडास उपलब्ध करुन देणेबाबतच्या अनुषंगाने ता. पनवेल जि. रायगड मधील असलेलया १३ गावामधील एकूण २९ गट क्रमांकखाली ११९-६६-४० हेक्टर आर. जमीन क्षेत्र उपलब्ध असल्याचे कळविले आहे.

म्हाडाकडून सदर १३ गावातील जमिनीचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन खालील तक्त्यात दर्शविलेल्या जमिनी ह्या गिरणी कामगारांच्या घरे बांधण्यासाठी उपयुक्त आहे असे गृहनिर्माण विभागास कळविण्यात आलेले आहे.

अ. क्रं.	गावाचे नांव	गट क्रं.	क्षेत्र (हे. आर. मध्ये)	एकुण क्षेत्र (हे. आर. मध्ये)
१	मौजे माडभुवन	२/ग/४७	१६-३८-१०	६०-६७-००
२		२/ज/५०	११-७९-४०	
३		२/इ/४८	०८-२९-७०	
४		२/फ/५१	१५-६१-९०	

५		२/म/४९	०८-५७-९०	
६	मौजे चावणे	६९/१	०६-५५-००	०६-५५-००
७	मौजे सावळे	५९/अ	०१-१८-६०	०१-१८-६०
८	मौजे सारसाई	११/ल/३४/१	०१-५३-००	०३-५३-००
९		११/ल/३४/२	०२-००-००	
		एकुण क्षेत्र (हे. आर. मध्ये)		**७१-९३-६०**

सदर शासकीय जमिनी महसुल विभागाकडून मोजणी व सिमांकन करुन म्हाडास नाममात्र दरात हस्तांतरीत करण्याबाबत महसुल विभागास पाठपुरावा सुरु आहे.

तसेच भविष्यात म्हाडाकडून हिंदुस्थान प्रोसेस मिल प्रभादेवी अंदाजे ९७ गिरणी कामगार सदनिका व ४७ संक्रमण सदनिका, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वेस्टर्न इंडीया मिल येथे मिळालेल्या भूखंडावर अंदाजित ३८५ गिरणी कामगार सदनिका १९२ संक्रमण सदनिका, एन.टी.सी. च्या ०४ गिरण्यांचा प्रत्यक्ष ताबा म्हाडास प्राप्त झाल्यांनतर त्यावर अंदाजित ९८४ गिरणी कामगार सदनिका ४९२ संक्रमण सदनिका, न्यु हिंद मिल येथे एन.टी.सी. च्या ०८ गिरण्यांचे अप्राप्त शिल्लक असलेल्या जमिनीवर अंदाजित ७०४ गिरणी कामगार सदनिका ३५२ संक्रमण सदनिका, सेंच्युरी मिल येथील उर्वरित अप्राप्त जमिनीवर अंदाजित ४७४ गिरणी कामगार सदनिका २३६ संक्रमण सदनिका असे एकूण अंदाजे २६४४ गिरणी कामगार सदनिका व १३१९ संक्रमण सदनिकांचे बांधकाम करणे शक्य होईल. एन.टी.सी. गिरण्यांच्या जमिनीचा ताबा म्हाडास प्राप्त झालेनंतर म्हाडाकडून गिरणी कामगारांकरीता गृहनिर्माण योजना राबविण्यात येईल.

ठाणे जिल्हयातील व ता. पनवेल, जि. रायगड येथील तसेच म्हाडास ताबा प्राप्त न झालेल्या जमिनींचा ताबा म्हाडास प्राप्त झाल्यानंतर विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून गिरणी कामगारांकरीता घरे बांधण्याची योजना म्हाडाकडून कार्यान्वीत करण्यात येईल.

आपला विश्वासू,

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांच्या मान्यतेने.)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 03-07-2026
17:52:01

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
म्हाडा, मुंबई

मुख्य अभियंता

१/प्रा.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND
AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

E-93111/27

जा.क्र./एम.एच./मु.अ.-१/का.अ-१/प्रा /२०२६
दि. 03/07/2026

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय :- विधानपरिषद ठराव क्र. २९
"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढीबाबत."
श्री. सुनील शिंदे, , मा.वि.प.स.

संदर्भ : कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसठ २०२६/प्र.क्र. ९३ /गृनिभू दि. ०९/०६/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयावर प्राप्त झालेल्या **विधानपरिषद ठराव क्र. २९** अन्वये "राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढीबाबत" श्री. सुनील शिंदे, मा.वि.प.स. यांनी मांडलेल्या ठरावाच्या अनुषंगाने म्हाडाचे अभिप्राय पूरक टिप्पणीसह सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा.
यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

3/7/26
(धिरजकुमार पंदिरकर)
मुख्य अभियंता-1
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

Patil
06/07/26

पुरक टिप्पणी :-

श्री. सुनील शिंदे, मा.वि.प.स.यांनी विधानपरिषदेत मांडलेला ठराव क्र. २९

"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरीता राज्यशासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरीषद शासनास करीत आहे."

अभिप्राय:-

सर्वसामान्यासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबईतील म्हाडा वसाहतीमध्ये मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधून संगणकिय सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेस परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देतात.

सध्यस्थितीत म्हाडाकडे उपलब्ध असलेल्या रिक्त भूखंडावर मुंबई मंडळ व इतर प्रादेशिक मंडळांमध्ये गृहनिर्माण प्रकल्पांची योजना राबविण्यात येत असुन बांधण्यात आलेल्या रहिवाशी सदनिका या सोडतीव्दारे सर्वसामान्य जनतेकरीता वितरीत करण्यात येत आहे. या सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यासाठी म्हाडाच्या धोरणानुसार प्रपत्र क्र. १ ते ९ अन्वये विक्री किंमत निश्चित करण्यात येते. या प्रपत्र क्र. १ ते ९ पैकी, प्रपत्र क्र. १ ते ३ मध्ये अंदाजपत्रकानुसार, प्रपत्र क्र. ४ ते ६ मध्ये योजनेचे काम सुरु झाल्यानंतर व प्रपत्र क्र. ७ ते ९ मध्ये काम पुर्ण झाल्यानंतर जमिनीची प्रत्यक्ष किंमत व जमिन विकास खर्च, योजनेचा बांधकाम खर्च या सर्वांचा खर्च एकत्रीकरणकरुन प्रती सदनिका विक्री किंमत अंतिम करण्यात येते.

तसेच म्हाडास मुंबईमध्ये विविध पुनर्विकास योजनांमधील गृहसाठ्यापोटी प्राप्त होणाऱ्या सदनिका अत्यल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८२.५०%, अल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८८.००%, मध्यम उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९३.५०% व उच्च उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९९.००% दराने सदनिकांचे सोडतीव्दारे वितरण करण्यात येते जे दर विकासकामार्फत खुल्या बाजारात विक्री करण्यात येणाऱ्या सदनिकांच्या किंमतीपेक्षा कमी असतात.

मुंबई मंडळाद्वारे सोडत-2024 अंतर्गत विविध वसाहतीमधील एकूण 2030 सदनिकांच्या विक्रीकरीता दि.08/08/2024 रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर 2030

सदनिकांकरीता एकूण 1,13,811 अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झालेली आहेत. सदर सोडतीमधील एकूण 2030 सदनिकांपैकी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिका या गोरेगाव या ठिकाणी स्थित आहेत. मुंबई मंडळाने 2024 मध्ये जाहिर केलेल्या सोडतीमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर भागात येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 359, अल्प उत्पन्न गटातील एकूण 627, मध्यम उत्पन्न गटातील एकूण 768, उच्च उत्पन्न गटातील एकूण 276 सदनिका या सोडतीमध्ये समाविष्ट केल्या आहेत. सदर अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 32.36 लक्ष पासून उच्च् उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 7.57 कोटी पर्यंत इतकी निश्चित करण्यात आली आहे.

तसेच कोकण मंडळाद्वारे सोडत-२०२५ अंतर्गत विविध वसाहतीमधील एकूण ५४३१ सदनिकांच्या विक्रीकरीता दि. ११/१०/२०२५ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ५४३१ सदनिकांकरीता एकूण ४०६४ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झालेली आहेत. सदर सोडतीमधील एकूण ५४३१ सदनिकांपैकी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिका या गोरेगाव या ठिकाणी स्थित आहेत. कोकण मंडळाने २०२५ मध्ये जाहिर केलेल्या सोडतीमध्ये पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अंतर्गत येथील अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, उच्च उत्पन्न गटातील सदनिका सोडतीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहे. सदर सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. ६.६६ लक्ष पासून अंदाजित विक्री किंमत रु. ५२.९९ लक्ष पर्यंत इतकी निश्चित करण्यात आली आहे.

खाजगी विकासकामार्फत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांमधील सदनिकांच्या विक्री किंमतीशी तुलना केली असता, म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिकांची विक्री किंमत ही खुल्या बाजारभावापेक्षा अंदाजे 30% ते 40% पेक्षा कमी असतात. त्यामुळे म्हाडा सोडतीस सर्वसामान्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. म्हाडामार्फत ज्या वसाहतींमध्ये घरे बांधली जातात त्यांचे दर बाजारभावापेक्षा कमी असल्याने, सर्व सामान्यांना परवडणारी असतात. त्यामुळे अशा वसाहतींच्या लगतच्या क्षेत्रातील खाजगी विकासकामार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या किंमती देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. परंतु मुंबई बाहेरील स्थित मंडळामध्ये गृहनिर्माण योजना राबविताना बऱ्याच वेळी, बाह्य सुविधांची कामे जसे मल:निस्सारण, जलवाहिनी, विद्युत पुरवठा इत्यादी करावी लागतात. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढत असल्याने, अप्रत्यक्षपणे राबवित असलेल्या योजनेमधील घरांच्या किंमतीमध्ये वाढ होते.

सद्य:स्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच GST (18%), Labour Cess, Royalties, Insurance, गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक

महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी मध्ये झालेल्या वाढीमुळे देखील राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

म्हाडामार्फत विविध प्रवर्गाकरीता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन सोडतीमार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरीता माफक दरात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. त्याचप्रमाणे म्हाडाकडे आजमितीस उपलब्ध असलेल्या भूखंडावर नविन गृहनिर्माण योजना प्रस्तावित करून अधिकाधिक परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करून देणेकरिता म्हाडा प्रयत्नशिल आहे. तथापि, मुंबई शहर व उपनगरात मोकळ्या जमिनींची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारणे म्हाडास शक्य होत नाही. तसेच शासनाने प्रस्तुत केलेल्या नविन LARR Act अंतर्गत राज्यातील मुंबई वगळता इतर जिल्हयातील भुसंपादन करतेवेळी सदर जमिनीची रेडी रेकनर दरापेक्षा तीन ते चार पटीने मुल्य अदा करावे लागते. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढतो. परंतु, शासनाने म्हाडास शासकीय जमिनी माफक दरात उपलब्ध करून दिल्यास, म्हाडामार्फत सर्व सामान्यांकरिता माफक दरात घरे उपलब्ध करून देता येणे शक्य होईल. **यास्तव सद्यःस्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. तसेच GST (१८%), Labour Cess, Royalties, Insurance, रेरा रजिस्ट्रेशन, इनवॉरमेंटल क्लिअरन्स् सर्टिफिकेट असे गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी शासनाने कमी केल्यास शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने होणारी वाढ कमी होण्यास मदत होईल.**

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

विषय :- विधानपरिषद ठराव क्र. २९

"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेल्या प्रचंड वाढीबाबत. "
श्री. सुनील शिंदे, मा.वि.प.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरीता राज्यशासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरीषद शासनास करीत आहे."	भागश: खरे आहे

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

विधानसभा ठराव

मुख्य अभियंता

१/प्रा.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND
AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

जा.क्र./एम.एच./मु.अ.-१/का.अ-१/प्रा/9334391 /२०२६
दि. 05/07/2026

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय :- विधानसभा ठराव क्र. 165

"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत."
श्री. योगेश सागर, मा.वि.स.स.

संदर्भ : कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसठ २०२६/प्र.क्र. ९४/गृनिभू, दि. ०९/०६/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयावर प्राप्त झालेल्या विधानसभा ठराव क्र. 165 अन्वये " राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत." श्री.योगेश सागर, मा.वि.स.स. यांनी मांडलेल्या ठरावाच्या अनुषंगाने म्हाडाचे अभिप्राय पूरक टिप्पणीसह सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा.
यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

8/7/26
(धिरजकुमार पंदिरकर)
मुख्य अभियंता-1
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

Sati
09/07/26

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

विषय :- विधानसभा ठराव क्र.165

"राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत."

श्री. योगेश सागर, मा.वि.स.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	"मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असलेल्या सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत राज्यातील गरजू जनतेला परवडतील अशा दरात घरे देण्यासाठी राज्यशासनाने मिठागराची जमिन ताब्यात घेऊन तेथे परवडतील अशा घरांची निर्मिती करण्यासाठी राज्यशासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."	भागश: खरे आहे

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

पुरक टिप्पणी :-

श्री.योगेश सागर, मा.वि.स.स.यांनी विधानसभेत मांडलेला ठराव क्र.165

"मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असलेल्या सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत राज्यातील गरजू जनतेला परवडतील अशा दरात घरे देण्यासाठी राज्यशासनाने मिठागराची जमिन ताब्यात घेऊन तेथे परवडतील अशा घरांची निर्मिती करण्यासाठी राज्यशासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अभिप्राय:-

सर्वसामान्यासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबईतील म्हाडा वसाहतीमध्ये मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधून संगणकिय सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेस परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देतात.

सध्यस्थितीत म्हाडाकडे उपलब्ध असलेल्या रिक्त भूखंडावर मुंबई मंडळ व इतर प्रादेशिक मंडळांमध्ये गृहनिर्माण प्रकल्पांची योजना राबविण्यात येत असुन बांधण्यात आलेल्या रहिवाशी सदनिका या सोडतीव्दारे सर्वसामान्य जनतेकरीता वितरीत करण्यात येत आहे. या सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यासाठी म्हाडाच्या धोरणानुसार प्रपत्र क्र. १ ते ९ अन्वये विक्री किंमत निश्चित करण्यात येते. या प्रपत्र क्र. १ ते ९ पैकी, प्रपत्र क्र. १ ते ३ मध्ये अंदाजपत्रकानुसार, प्रपत्र क्र. ४ ते ६ मध्ये योजनेचे काम सुरु झाल्यानंतर व प्रपत्र क्र. ७ ते ९ मध्ये काम पुर्ण झाल्यानंतर जमिनीची प्रत्यक्ष किंमत व जमिन विकास खर्च, योजनेचा बांधकाम खर्च या सर्वांचा खर्च एकत्रीकरणकरुन प्रती सदनिका विक्री किंमत अंतिम करण्यात येते.

तसेच म्हाडास मुंबईमध्ये विविध पुनर्विकास योजनांमधील गृहसाठ्यापोटी प्राप्त होणाऱ्या सदनिका अत्यल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८२.५०%, अल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८८.००%, मध्यम उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९३.५०% व उच्च उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९९.००% दराने सदनिकांचे सोडतीव्दारे वितरण करण्यात येते जे दर विकासकामार्फत खुल्या बाजारात विक्री करण्यात येणाऱ्या सदनिकांच्या किंमतीपेक्षा कमी असतात.

मुंबई मंडळाद्वारे सोडत-2024 अंतर्गत विविध वसाहतीमधील एकूण 2030 सदनिकांच्या विक्रीकरीता दि.08/08/2024 रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर 2030 सदनिकांकरीता एकूण 1,13,811 अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झालेली आहेत. सदर सोडतीमधील एकूण 2030 सदनिकांपैकी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिका या गोरेगाव या ठिकाणी स्थित आहेत. मुंबई मंडळाने 2024 मध्ये जाहिर केलेल्या सोडतीमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर भागात येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 359, अल्प उत्पन्न गटातील एकूण 627, मध्यम उत्पन्न गटातील एकूण 768, उच्च उत्पन्न गटातील एकूण 276 सदनिका या सोडतीमध्ये समाविष्ट केल्या आहेत. सदर अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 32.36 लक्ष पासून उच्च् उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 7.57 कोटी पर्यंत इतकी निश्चित करण्यात आली आहे.

खाजगी विकासकामार्फत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांमधील सदनिकांच्या विक्री किंमतीशी तुलना केली असता, म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिकांची विक्री किंमत ही खुल्या बाजारभावापेक्षा अंदाजे 30% ते 40% पेक्षा कमी असतात. त्यामुळे म्हाडा सोडतीस सर्वसामान्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. म्हाडामार्फत ज्या वसाहतींमध्ये घरे बांधली जातात त्यांचे दर बाजारभावापेक्षा कमी असल्याने, सर्व सामान्यांना परवडणारी असतात. त्यामुळे अशा वसाहतींच्या लगतच्या क्षेत्रातील खाजगी विकासकामार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या किंमती देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. परंतु मुंबई बाहेरील स्थित मंडळामध्ये गृहनिर्माण योजना राबविताना बऱ्याच वेळी, बाह्य सुविधांची कामे जसे मल:निस्सारण, जलवाहिनी, विद्युत पुरवठा इत्यादी करावी लागतात. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढत असल्याने, अप्रत्यक्षपणे राबवित असलेल्या योजनेमधील घरांच्या किंमतीमध्ये वाढ होते.

सद्य:स्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच GST (18%), Labour Cess, Royalties, Insurance, गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी मध्ये झालेल्या वाढीमुळे देखील राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

म्हाडामार्फत विविध प्रवर्गांकरीता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन सोडतीमार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरीता माफक दरात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. त्याचप्रमाणे म्हाडाकडे आजमितीस उपलब्ध असलेल्या भूखंडावर नविन गृहनिर्माण योजना प्रस्तावित करून अधिकाधिक परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करून देणेकरिता

म्हाडा प्रयत्नशिल आहे. तथापि, मुंबई शहर व उपनगरात मोकळ्या जमिनींची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारणे म्हाडास शक्य होत नाही. तसेच शासनाने प्रस्तुत केलेल्या नविन LARR Act अंतर्गत भुसंपादन करतेवेळी सदर जमिनीची रेडी रेकनर दरापेक्षा तीन ते चार पटीने मुल्य अदा करावे लागते. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढतो. परंतु, शासनाने म्हाडास शासकीय जमिनी माफक दरात उपलब्ध करून दिल्यास, म्हाडामार्फत सर्व सामान्यांकरिता माफक दरात घरे उपलब्ध करून देता येणे शक्य होईल.

राज्यातील गरजू जनतेला परवडतील अशा दराने घरे देण्यासाठी राज्यशासनाने मिठागराची कोणतीही जमिन मुंबई मंडळाच्या ताब्यात दिलेली नाही. तसेच केंद्र शासनाद्वारे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ही सप्टेंबर, २०२४ पासून जाहीर केली आहे. राज्यात हि योजना राबविण्यासाठी मंत्रालयातील प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) यांना सुकाणू अभिकरण म्हणून नेमण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मिठागारांच्या जमिनीवर व अशा प्रकारच्या सर्व योजना हाती घेणेबाबत, प्रधानमंत्री आवास योजना-२.० राबविण्यासाठी नेमण्यात आलेले मंत्रालयातील प्रकल्प व्यवस्थापन कक्ष सुकाणू अभिकरण यांच्याशी संबंधित असल्याने याबाबत त्यांच्याद्वारे माहिती सादर करणे अपेक्षित आहे.

यास्तव सद्यःस्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. तसेच GST (१८%), Labour Cess, Royalties, Insurance, रेरा रजिस्ट्रेशन, इनवॉरमेंटल क्लिअरन्स् सर्टिफिकेट असे गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी शासनाने कमी केल्यास शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने होणारी वाढ कमी होण्यास मदत होईल.

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

E-93111 61

जा.क्र./एम.एच./मु.अ.-१/का.अ-१/प्रा/ /२०२६
दि. 03/07/2026

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय :- विधानसभा ठराव क्र. १६१
"मुंबईसह राज्यात इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत."
श्री. मनोज जामसुतकर, मा.वि. स.स.

संदर्भ : कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसठ २०२६/प्र.क्र. ९२ /गृनिभू दि. ०९/०६/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयावर प्राप्त झालेल्या **विधानसभा ठराव क्र. १६१** अन्वये "मुंबईसह राज्यात इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत." श्री. मनोज जामसुतकर, मा.वि.स.स. यांनी मांडलेल्या ठरावाच्या अनुषंगाने म्हाडाचे अभिप्राय पूरक टिप्पणीसह सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा.
यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

31/7/26
(धिरजकुमार पंदिरकर)
मुख्य अभियंता-1
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

Sd/
06/07/26

महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी मध्ये झालेल्या वाढीमुळे देखील राज्यात मुंबईसह इतर शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे.

म्हाडामार्फत विविध प्रवर्गांकरीता गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येऊन सोडतीमार्फत परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेकरीता माफक दरात उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. त्याचप्रमाणे म्हाडाकडे आजमितीस उपलब्ध असलेल्या भूखंडावर नविन गृहनिर्माण योजना प्रस्तावित करून अधिकाधिक परवडणारी घरे सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करून देणेकरिता म्हाडा प्रयत्नशिल आहे. तथापि, मुंबई शहर व उपनगरात मोकळ्या जमिनींची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारणे म्हाडास शक्य होत नाही. तसेच शासनाने प्रस्तुत केलेल्या नविन LARR Act अंतर्गत राज्यातील मुंबई वगळता इतर जिल्हयातील भुसंपादन करतेवेळी सदर जमिनीची रेडी रेकनर दरापेक्षा तीन ते चार पटीने मुल्य अदा करावे लागते. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढतो. परंतु, शासनाने म्हाडास शासकीय जमिनी माफक दरात उपलब्ध करून दिल्यास, म्हाडामार्फत सर्व सामान्यांकरिता माफक दरात घरे उपलब्ध करून देता येणे शक्य होईल. **यास्तव सद्यःस्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. तसेच GST (१८%), Labour Cess, Royalties, Insurance, रेरा रजिस्ट्रेशन, इनवॉरमेंटल क्लिअरन्स् सर्टिफिकेट असे गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक महानगरपालिकांना द्यावयाचे शुल्क इत्यादी शासनाने कमी केल्यास शहरातील सदनिकांच्या किंमतींमध्ये सातत्याने होणारी वाढ कमी होण्यास मदत होईल.**

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

विषय :- विधान सभा ठराव क्र. १६१

"मुंबईसह राज्यात इतर शहरातील सदनिकांच्या किंमतीत सातत्याने होत असणाऱ्या प्रचंड वाढीवर नियंत्रण करून दर स्थिर ठेवण्याबाबत." श्री. मनोज जामसुतकर, मा.वि.स.स.

अ.क्र.	प्रश्न	उत्तर
1	"मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रत करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर राज्यशासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."	भागश: खरे आहे

मुख्य अभियंता-1,
प्राधिकरण

पुरक टिप्पणी :-

श्री. मनोज जामसुतकर,.मा.वि. स.स. यांनी विधानसभेत मांडलेला ठराव क्र. १६१

"मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमतीत प्रचंड वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रत करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर राज्यशासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

अभिप्राय:-

सर्वसामान्यासाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी म्हाडामार्फत गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबईतील म्हाडा वसाहतीमध्ये मुंबई मंडळाच्या मालकीच्या जमिनीवर अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व उच्च उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधून संगणकिय सोडतीद्वारे सर्वसामान्य जनतेस परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देतात.

सध्यस्थितीत म्हाडाकडे उपलब्ध असलेल्या रिक्त भूखंडावर मुंबई मंडळ व इतर प्रादेशिक मंडळांमध्ये गृहनिर्माण प्रकल्पांची योजना राबविण्यात येत असुन बांधण्यात आलेल्या रहिवाशी सदनिका या सोडतीव्दारे सर्वसामान्य जनतेकरीता वितरीत करण्यात येत आहे. या सदनिकांची विक्री किंमत परिगणित करण्यासाठी म्हाडाच्या धोरणानुसार प्रपत्र क्र. १ ते ९ अन्वये विक्री किंमत निश्चित करण्यात येते. या प्रपत्र क्र. १ ते ९ पैकी, प्रपत्र क्र. १ ते ३ मध्ये अंदाजपत्रकानुसार, प्रपत्र क्र. ४ ते ६ मध्ये योजनेचे काम सुरु झाल्यानंतर व प्रपत्र क्र. ७ ते ९ मध्ये काम पुर्ण झाल्यानंतर जमिनीची प्रत्यक्ष किंमत व जमिन विकास खर्च, योजनेचा बांधकाम खर्च या सर्वांचा खर्च एकत्रीकरणकरुन प्रती सदनिका विक्री किंमत अंतिम करण्यात येते.

तसेच म्हाडास मुंबईमध्ये विविध पुनर्विकास योजनांमधील गृहसाठ्यापोटी प्राप्त होणाऱ्या सदनिका अत्यल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८२.५०%, अल्प उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ८८.००%, मध्यम उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९३.५०% व उच्च उत्पन्न गटाकरीता रेडीरेकनर दराच्या ९९.००% दराने सदनिकांचे सोडतीव्दारे वितरण करण्यात येते जे दर विकासकामार्फत खुल्या बाजारात विक्री करण्यात येणाऱ्या सदनिकांच्या किंमतीपेक्षा कमी असतात.

मुंबई मंडळाद्वारे सोडत-2024 अंतर्गत विविध वसाहतीमधील एकूण 2030 सदनिकांच्या विक्रीकरीता दि.08/08/2024 रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर 2030

सदनिकांकरीता एकूण 1,13,811 अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झालेली आहेत. सदर सोडतीमधील एकूण 2030 सदनिकांपैकी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिका या गोरेगाव या ठिकाणी स्थित आहेत. मुंबई मंडळाने 2024 मध्ये जाहिर केलेल्या सोडतीमध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगर भागात येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 359, अल्प उत्पन्न गटातील एकूण 627, मध्यम उत्पन्न गटातील एकूण 768, उच्च उत्पन्न गटातील एकूण 276 सदनिका या सोडतीमध्ये समाविष्ट केल्या आहेत. सदर अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 32.36 लक्ष पासून उच्च् उत्पन्न गटातील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. 7.57 कोटी पर्यंत इतकी निश्चित करण्यात आली आहे.

तसेच कोकण मंडळाद्वारे सोडत-2025 अंतर्गत विविध वसाहतीमधील एकूण ५४३१ सदनिकांच्या विक्रीकरीता दि. ११/१०/२०२५ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ५४३१ सदनिकांकरीता एकूण ४०६४ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त झालेली आहेत. सदर सोडतीमधील एकूण ५४३१ सदनिकांपैकी अत्यल्प व अल्प उत्पन्न गटातील सदनिका या गोरेगाव या ठिकाणी स्थित आहेत. कोकण मंडळाने २०२५ मध्ये जाहिर केलेल्या सोडतीमध्ये पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अंतर्गत येथील अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, उच्च उत्पन्न गटातील सदनिका सोडतीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहे. सदर सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रु. ६.६६ लक्ष पासून अंदाजित विक्री किंमत रु. ५२.९९ लक्ष पर्यंत इतकी निश्चित करण्यात आली आहे.

खाजगी विकासकामार्फत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांमधील सदनिकांच्या विक्री किंमतीशी तुलना केली असता, म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या सदनिकांची विक्री किंमत ही खुल्या बाजारभावापेक्षा अंदाजे 30% ते 40% पेक्षा कमी असतात. त्यामुळे म्हाडा सोडतीस सर्वसामान्यांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. म्हाडामार्फत ज्या वसाहतींमध्ये घरे बांधली जातात त्यांचे दर बाजारभावापेक्षा कमी असल्याने, सर्व सामान्यांना परवडणारी असतात. त्यामुळे अशा वसाहतींच्या लगतच्या क्षेत्रातील खाजगी विकासकामार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांच्या किंमती देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. परंतु मुंबई बाहेरील स्थित मंडळामध्ये गृहनिर्माण योजना राबविताना बऱ्याच वेळी, बाह्य सुविधांची कामे जसे मल:निस्सारण, जलवाहिनी, विद्युत पुरवठा इत्यादी करावी लागतात. त्यामुळे योजनेस येणारा खर्च वाढत असल्याने, अप्रत्यक्षपणे राबवित असलेल्या योजनेमधील घरांच्या किंमतीमध्ये वाढ होते.

सद्य:स्थितीत बांधकामासाठी लागणारे साहित्य जसे की, सिमेंट, स्टिल, विटा, वाळू, इत्यादींच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच GST (18%), Labour Cess, Royalties, Insurance, गृहनिर्माण योजना राबविताना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी शासनाच्या विविध विभागास तसेच स्थानिक

विधानपरिषद

नियम ९३

अन्वये

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)



म्हाडा
MHADA

जा.क्र.काअ/नामजो/बीडीडी/ मुं.मं/ /२०२६
दिनांक :-

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

विषय : विधानपरिषदेमध्ये उपस्थित केलेला विधानपरिषद नियम ९३ अन्वये दिलेली सुचना क्र.३.
- ना.म.जोशी मार्ग बीडीडी पुनर्विकास प्रकल्पातील सर्व पात्र रहिवाश्यांना वरळी प्रमाणे एकास एक पार्किंग सुविधा देण्याबाबत.

संदर्भ : कार्यासन अधिकारी /महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपसू-२०२६/प्र.क्र.१७१/गृनिप, दि.२९/०६/२०२६.

महोदय,

विषयांकित प्रकरणी विधानपरिषदेमध्ये मा. श्री.सुनिल शिंदे ,मा.वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम ९३ च्या अनुषंगाने अभिप्राय सोबत जोडुन, सादर करण्यात येत आहे. ना.म.जोशी मार्ग

(मा.उपाध्यक्ष /प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

सोबत- वरीलप्रमाणे

आपला विश्वास,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
11:09:43
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

श्री. सुनिल शिंदे , वि.प.स. यांनी विधानपरिषद नियम ९३ अन्वये दिलेली सूचना क्रमांक-३

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी विधानपरिषद नियम ९३ अन्वये दिलेली सूचना क्रमांक — ३.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये मी खालील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सूचना देत आहे कृपया स्वीकार व्हावी.

ज्याअर्थी: ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात वरळीच्या धर्तीवर एकास एक (one-to-one) पार्किंग मिळावे, यासाठी स्थानिक रहिवाशी आणि लोकप्रतिनिधी मा. उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री महोदयांकडे आणि म्हाडा प्रशासनाकडे सातत्याने लेखी निवेदनाद्वारे करीत असलेली मागणी आणि,

ज्याअर्थी: म्हाडाने वरळी आणि नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात मात्र 'एका घरामागे एक पार्किंग' अशी सुविधा उपलब्ध करून दिली असणे आणि,

ज्याअर्थी: म्हाडाने सद्यस्थितीत ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात मात्र 'दोन घरामागे एक पार्किंग' देण्याचा घेतलेला निर्णय आणि,

ज्याअर्थी: त्यामुळे बी.डी.डी. पुनर्विकास प्रकरणात म्हाडाकडून करण्यात येत असलेला दुजाभाव आणि,

ज्याअर्थी: त्यामुळे ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील हजारो रहिवाश्यांच्या समक्ष उभा राहिलेला वाहनांच्या पार्किंगचा यक्ष प्रश्न आणि,

ज्याअर्थी: ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पार्किंगच्या निर्णयात म्हाडाकडून दुजाभाव होत असल्याने स्थानिक रहिवाश्यांत म्हाडाविरुद्ध पसरलेली तीव्र नाराजीची भावना आणि,

ज्याअर्थी: या ठिकाणच्या रहिवाश्यांनी नाईलाजास्तव आपली वाहने रस्त्यावरच उभी केल्यास या विभागात अभूतपूर्व वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होण्याची असलेली दाट शक्यता आणि,

त्याअर्थी: ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात वरळीच्या धर्तीवर एकास एक (one-to-one) पार्किंग उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने घ्यावयाचा ठोस निर्णय आणि शासनाची प्रतिक्रिया.

अभिप्राय :

मुंबईतील लोअर परेल मधील ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळीतील रहिवाशांच्या पार्किंग संदर्भात खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

नायगाव, वरळी व ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास शासनाने हाती घेतला असून त्याकरीता म्हाडाची "सुकाणू अभिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. ना.म.जोशी मार्ग प्रकल्पाकरीता मे. लक्ष्मण थिटे कंसल्टन्टस् प्रा.लि. यांची वास्तुशास्त्रज्ञ व समंत्रक म्हणून तर मे. शापुरजी पालोनजी यांची कंत्राटदार म्हणून म्हाडाकडून नेमणूक करण्यात आलेली आहे.

ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळीत एकंदर तळ + ३ मजल्यांच्या ३२ चाळींचा समावेश असून प्रत्येकी ८० याप्रमाणे ३२ चाळींमध्ये २५६० गाळ्यांचा अंतर्भाव आहे. सदर पुनर्विकास प्रकल्प २ टप्प्यांत राबविला जात असून टप्पा १ मध्ये चाळ क्र. १ ते १५ व चाळ क्र. ३० या १६ चाळींचा व हॉस्पीटल बिल्डींग (चाळ क्र.३१) चा समोवश आहे व उर्वरीत चाळींचा टप्पा २ मध्ये विकास होणार आहे.

टप्पा १ मधील १७ चाळींपैकी १० चाळींच्या जागेवर सात पुनर्वसन इमारती व हॉस्पिटल इमारत बांधण्यात येणार असल्याने सदरहू ९ चाळी (चाळ क्र.३,४,५,६, ११, १२,१३,१४,१५ व ३०) तोडण्यात आल्या असून, त्या जागेवर टप्पा १ अंतर्गत २२ मजल्याच्या ७ इमारती प्रस्तावित आहेत. सध्या सातही विंगचे काम प्रगतीपथावर असून, अंतिम टप्प्यात आहे. तसेच टप्पा -२ अंतर्गत १५ चाळींपैकी ९ चाळींच्या जागेवर उर्वरित ७ पुनर्वसन इमारती बांधण्यात येणार आहेत. २ चाळी (चाळ क्र. २९ व १८) तोडण्यात आल्या असुन उर्वरित चाळी रिक्त करण्याची कार्यवाही चालू आहे. तोडण्यात आलेल्या दोन चाळींच्या जागेवर दोन पुनर्वसन इमारतींच्या जोत्याखालील काम प्रगतीपथावर आहे.

विकास नियत्रंण नियमावली २०३४ प्रमाणे ४ सदनिकामागे १ पार्कींगची तरतूद अनूज्ञेय असताना, शासनाचा महत्वकांक्षी प्रकल्प असल्याने प्रत्यक्षात प्रति दोन सदनिकांमागे एक पार्किंग याप्रमाणे तीन्ही बीडीडी प्रकल्पांकरीता तरतूद करण्यात आलेली होती. रहिवाशांची मागणी तथा वरळी प्रकल्पात उपलब्ध असलेली पूरेशी जागा यामुळे वरळीतील बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाकरीता राज्य शासनाने स्वतंत्ररित्या निर्णय घेवून एकास एक पार्किंगची सुविधा पुरविण्यात येत आहे.

नायगाव व ना.म.जोशी मार्ग लोअर परेल येथील प्रकल्पामध्ये तीन तळघरांची तरतूद असून त्यानुसार टप्पा-१ अंतर्गत पुनर्विकास इमारतींचे प्रत्यक्ष जागेवर तळघरांचे काम पुर्ण होवून नायगांव येथील आठ इमारतींचे वितरण झाले असुन ना.म.जोशी मार्ग प्रकल्पातील सात इमारती भौतिक दृष्ट्या पुर्ण झाल्या आहेत, नायगाव व लोअर परेल येथील प्रकल्पात पुरेशी मोकळी जागा उपलब्ध नसल्याने वाढीव पार्कींग उपलब्ध करुन देण्याकरीता नकाशात बदल करणे व ही बाब आर्थिकदृष्ट्यासुध्दा व्यवहार्य नसल्याने वरळी प्रकल्पाप्रमाणे वाढीव पार्कींग प्रस्तावित करणे शक्य नाही ही वस्तूस्थिती आहे. याबाबत मा. शक्तीप्रदत्त कमिटीच्या १८व्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली होती व या धोरणाबाबत कमिटीने सहमती दर्शविली आहे.

(मा.उपाध्यक्ष /प्राधिकरण यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 01-07-2026
11:10:28

(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,

गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,

मंत्रालय, मुंबई -४०००३२

विषय:- महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये सूचना क्र. 22

गोरेगाव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाशांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत (सुधारीत अभिप्राय).

- श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यालय अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपसू-२०२६/प्र.क्र.१७२/गृनिप. दि.०२.०७.२०२६

महोदय,

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये सूचना क्र. 22 अन्वये गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाशांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत.

त्या अनुषंगाने सुधारीत पुरक टिप्पणी शासनास सादर करण्यारत येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 06-07-2026
14:55:35

मुख्य अधिकारी

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

विषय: महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२

गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाशांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत (सुधारीत अभिप्राय).

- श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपसू-२०२६/प्र.क्र.१७२/गृनिप. दि.०२.०७.२०२६

पूरक टिप्पणी:

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२ अन्वये गोरेंगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाशांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत.

ज्याअर्थी: गोरेगाव (प.) येथील १४२ एकर क्षेत्रावरील मोतीलाल नगर क्र. १, २ व ३ या म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR) २०३४ मधील नियम ३३(५) अंतर्गत करण्यात येणे,

ज्याअर्थी: मा उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राहिवशांना विश्वासात घेणे आवश्यक असतांनाही त्यांची संमती न घेता प्रकल्प पुढे रेटला जात असल्याची गंभीर तक्रार असणे,

ज्याअर्थी: प्रकल्पाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याबाबत, C&D एजन्सीबरोबरच्या महसूल वाटपातील विसंगती, तसेच पुनर्विकास आराखड्याबाबत पारदर्शकतेचा अभाव यामुळे रहिवशांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे.

ज्याअर्थी: म्हाडा अधिकाऱ्यांकडून रहिवाशांशी अरेरावीची वागणूक, प्रकल्पस्थळी अटींची पूर्तता न करता कामे सुरू करणे, विरोध करणाऱ्यांना धमकावण्यासाठी गुंडांचा वापर होत असल्याचे आरोप असून पोलीसांकडूनही प्रभावी हस्तक्षेप होत नसल्याची भावना,

ज्याअर्थी: त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून राहिवशांच्या समतीने, पारदर्शक व न्याय्य पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही,

त्याअर्थी: हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

सदर मुद्द्यांवर म्हाडाचे अभिप्राय खालीप्रमाणे आहे:

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने गोरेगाव (प.) येथील मोतीलाल नगर-१, २ व ३ या म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास म्हाडामार्फत Construction & Development Agency (C&DA) ची नेमणूक करून राबविण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे. या पुनर्विकास प्रकल्पासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या उद्देशाने वि.नि. व प्रो.नि. २०३४ मधील विनियम ३३ (५) मधील अनुज्ञेयतेपेक्षा निवासी व अनिवासी वापराकरिता अधिकचे क्षेत्रफळ एक विशेष बाब म्हणून मंजूर करून या प्रकल्पास "विशेष प्रकल्पाचा" दर्जा देण्यात आला आहे.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयात अनेक याचिका व जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिका मा.उच्च न्यायालयाने दि.०६.०३.२०२५ रोजी निकाली काढल्या असून म्हाडाला सदर पुनर्विकास प्रकल्प Construction & Development Agency (C&DA) मार्फत राबविण्यास अनुमती दिली.

यानुसार सदर पुनर्विकास प्रकल्पांतर्गत रहिवाशांना पुनर्वसन सदनिका विनामूल्य प्रदान करून, म्हाडाच्या देय क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळ देणाऱ्या Construction & Development Agency (C&DA) ची नेमणूक करण्यासाठी महाडामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. खुल्या स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेअंतर्गत महाडामार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत उच्चतम निविदाकार (H-1) ठरलेल्या निविदाकाराची नियुक्ती करण्याबाबत अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने शिफारस केली व म्हाडाद्वारे स्वीकृती पत्र देण्यात आले.

सदर प्रकल्पाकरिता दि.०९ जुलै, २०२६ रोजी म्हाडा, नियुक्त विकासक व त्यांचेमार्फत स्थापन केलेली विशेष हेतू कंपनी (SPV) यांच्यामध्ये बांधकाम व विकास करार (Construction cum Development Agreement) करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या प्रथम टप्प्याकरिता दि.२४ मार्च, २०२६ रोजी पर्यावरणविषयक मंजुरी (Environmental Clearance) प्राप्त झाली आहे. तसेच प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या निविदाकारामार्फत म्हाडास एकूण ३,९७,१०० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचा संपूर्ण खर्च हा नियुक्त Construction & Development Agency (C&DA) मार्फत करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पाकरिता तयार करण्यात आलेला मास्टर प्लान, विविध प्रस्तावित सोयीसुविधा, लेआऊट प्लान, युनिट प्लान, रस्ता जोडणी (Connectivity), पायाभूत सुविधा (Infrastructure), प्रकल्पाचे स्वरूप

याविषयी रहिवाशांना व विविध स्थानिक संघटना यांना विस्तृत माहिती देऊन रहिवाशांना विश्वासात घेण्याच्या अनुषंगाने संवाद साधण्याचा म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून प्रयत्न करण्यात आला.

मोतीलाल नगर येथील रहिवाशांचे पुनर्वसन पारदर्शक व न्याय पद्धतीने करण्यात येत असून पुनर्वसन घटकसाठी वि.नि. व प्रो.नि. २०३४ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय सोयीसुविधा पुरविण्यात येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 06-07-2026
14:59:23

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई -४०००३२

विषय:- महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२
- गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाश्यांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत.
- श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपसू-२०२६/प्र.क्र.१७२/गृनिप. दि.०२.०७.२०२६

महोदय,

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२ अन्वये गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाश्यांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत.

त्या अनुषंगाने पूरक टिप्पणी शासनास सादर करण्यात येत आहेत.

(मा. उपाध्यक्ष तथा मु. का. अ./प्रा यांच्या मान्यतेने)

आपला विश्वासू,

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 03-07-2026
10:48:02

मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

म्हाडा MHADA

विषय:- महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२

- गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाश्यांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत.
- श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स.

संदर्भ:- कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विपसू-२०२६/प्र.क्र.१७२/गृनिप. दि.०२.०७.२०२६

पूरक टिप्पणी:

श्री. अशोक उर्फ भाई जगताप, मा.वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचना क्र. २२ अन्वये गोरेगांव येथील मोतीलाल नगर पुनर्विकास प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करून रहिवाश्यांच्या संमतीने पारदर्शक व न्याय पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले आहेत.

ज्याअर्थी: गोरेगाव (प.) येथील १४२ एकर क्षेत्रावरील मोतीलाल नगर क्र. १, २ व ३ या म्हाडावसाहतीचा पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (DCPR) २०३४ मधील नियम३३(५) अंतर्गत करण्यात येणे,

ज्याअर्थी: मात्र उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राहिवशांना विश्वासात घेणे आवश्यक असतांनाही त्यांचीसंमती न घेता प्रकल्प पुढे रेटला जात असल्याची गंभीर तक्रार असणे,

ज्याअर्थी: प्रकल्पाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याबाबत, C&D एजन्सीबरोबरच्या महसूलवाटपातील विसंगती, तसेच पुनर्विकास आराखड्याबाबत पारदर्शकतेचा अभाव यामुळेरहिवशांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे.

ज्याअर्थी: म्हाडा अधिकाऱ्यांकडून रहिवाशांशी अरेरावीची वागणूक, प्रकल्पस्थळी अटींची पूर्ततान करता कामे सुरू करणे, विरोध करणाऱ्यांना धमकावण्यासाठी गुंडांचा वापर होत असल्याचेआरोप असून पोलीसांकडूनही प्रभावी हस्तक्षेप होत नसल्याची भावना,

ज्याअर्थी: त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून राहिवशांच्या समतीने,पारदर्शक व न्याय्य पद्धतीने पुनर्विकास करण्याबाबत शासनानेकरावयाचीकार्यवाही,

त्याअर्थी: हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

यावर म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत:

गोरेगाव (प) येथील मोतीलाल नगर-१, २ व ३ या म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास शासनाच्या दि ०६.१०.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार म्हाडामार्फत सी&डीए (Construction &Development Agency) ची नेमणूक करून राबविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयानुसार रहिवाश्यांना अस्तित्वातील सुमारे २३० चौ फूटाच्या सदनिकांच्या मोबदल्यात १६०० चौ फूट बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या व अनिवासी वापराकरिता प्रति गाळा ९८७ चौ फुट याप्रमाणेबांधकाम क्षेत्रफळ असलेल्या सदनिका पुरविण्यास शासनामार्फत विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयानुसार रहिवाश्यांना सदर क्षेत्रफळाच्या सदनिका विनामूल्य प्रदान करून उर्वरित बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास सर्वाधिक बांधकाम क्षेत्रफळ प्रस्तावित करणाऱ्या विकासकाची नेमणूक करण्यासाठी म्हाडामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार निविदा प्रक्रियेद्वारे उच्चतम निविदाकारामार्फत म्हाडास एकूण ३,९७,१०० चौ मी बांधकाम क्षेत्रफळ प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर प्रकल्पातील एकूण बांधकाम क्षेत्रफळापैकी म्हाडास प्राप्त होणारे बांधकाम क्षेत्रफळ हे खुल्या स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेअंती उच्चतम निविदाकाराद्वारे प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्रफळ आहे.

सदर प्रकल्पाकरिता म्हाडा, नियुक्त विकासक, नियुक्त विकासक यांचेमार्फत स्थापन केलेली SPV यांच्यामध्ये Construction cum Development Agreement दि.०९.०७.२०२६ रोजी अंमलात आले आहे.

सदर पुनर्विकासाकरीता Provisional Master plan तयार करण्यात आला असून त्यास म्हाडामार्फत तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे म्हाडामार्फत पुनर्विकास घटकासाठीच्या प्रथम टप्प्याकरीताच्या आराखड्यांना IOA जारी करण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या प्रथम टप्प्याकरीता २४.०३.२०२६ रोजी Environmental Clearance प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष प्रकल्प स्थळी Shore Piling चे कामकाज प्रगतीपथावर आहे. सर्वप्रथम प्रकल्पातील मोकळ्या ठिकाणी बहुतांश पुनर्वसन घटकाचे बांधकाम करून सदर प्रकल्पातील बहुतांश रहिवाश्यांना त्यांच्या अस्तित्वातील सदांनिका निष्कासित न करता थेट नवीन पुनर्विकसित सदनिका हस्तांतरीत करण्याचे नियोजित आहे. तसेच पुनर्वसन घटकासाठी डीसीपीआर तरतूदींनुसार आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याचे प्रस्तावित आहे.

रहिवाश्यांना विश्वासात घेण्याच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाकरीता तयार करण्यात आलेला मास्टर प्लान, विविध प्रस्तावित सोयीसुविधा, लेआऊट प्लान, यूनिट प्लान, Connectivity, Infrastructure, प्रकल्पाचे स्वरूप याविषयी रहिवाश्यांना व विविध स्थानिक असोसिएशन यांना विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

(मा. उपाध्यक्ष / प्रा. यांच्या मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 03-07-2026
10:48:40
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

विधानसभा नियम ९४ अर्धा तास सूचना

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

कार्यकारी अभियंता/ बोरीवली विभाग / मुंबई मंडळ, कक्ष क्र.४७५, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,वांद्रे [पूर्व],मुंबई - ५१
दुरध्वनी क्र: ०२२-६६४०५३३५ इ मेल: eeborimbmhada@gmail.com

जा .क्र. काअ/बोरीवली/मुं.मं./ /२०२६

दिनांक :

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभा, महाराष्ट्र शासन,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय : महाराष्ट्र विधानसभा नियम ९४ अन्वये अर्धा तास चर्चा सुचना क्र.११२
"मुंबईतील कांदिवली (पुर्व) येथील आकुर्ली म्हाडा वसाहत परिसरातील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ म्हाडा मालकीच्या भुखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याबाबत".
श्री. अतुल भातखळकर, मा. वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. आताच-२०२६/प्र.क्र.१६१/गृनिप, दि.२३.०६.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राचे अनुषंगाने विधानसभा नियम ९४ अन्वये अर्धा तास चर्चा सुचना क्र.११२ च्या खुलासा सोबतच्या टिप्पणीत सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वास,
Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
10:55:33
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्या मान्यतेने.

टिप्पणी

विषय : महाराष्ट्र विधानसभा नियम 94 अन्वये अर्धा तास चर्चा सुचना क्र.112

"मुंबईतील कांदिवली (पुर्व) येथील आकुर्ली म्हाडा वसाहत परिसरातील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ म्हाडा मालकीच्या भुखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याबाबत".

श्री. अतुल भातखळकर, मा. वि.स.स.

संदर्भ : कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. आताच- 2026/प्र.क्र.161/गृनिप, दि.23.06.2026.

उक्त संदर्भिय पत्रांन्वये प्राप्त झालेल्या विधानसभा विधानसभा नियम 94 अन्वये अर्धा तास चर्चा सुचना क्र.112 च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	सुचना	खुलासा
1	मुंबईतील कांदिवली (पुर्व) येथील आकुर्ली म्हाडा वसाहत परिसरातील मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ म्हाडा मालकीच्या भुखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास येणे, सदर अतिक्रकमण दिर्घकाळापासुन अस्तित्वात असुन संबंधित भूखंडाच्या संरक्षण व देखरेखीबाबत म्हाडा प्रशासनाकडुन अपेक्षित दक्षता घेण्यात येत नसणे, स्थानिक लोकप्रतिनीधींन वेळोवेळी पत्रव्यवहार करुन तसेच प्रत्यक्ष पाठपुरावा करुन सदर अतिक्रमण हटविण्याची मागणी केलेली असतानाही संबंधित प्रशासनाकडुन कार्यवाहीस विलंब होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, नियोजनबध्द विकास तसेच शासकीय भूखंडांच्या	मौजे आकुर्ली, कांदिवली (पुर्व), ता. बोरीवली येथील जागतिक बॅंक प्रकल्प वसाहत हा म्हाडाचा अभिन्यास आहे व त्याचे क्षेत्रफळ 96437.80 चौ.मी. इतके आहे. सदर अभिन्यासामध्ये 17 उच्च उत्पन्न गटातील भूखंड, 39 एल.आय.जी गटातील बैठ्या चाळींचे भूखंड, शाळा व खेळाच्या मैदानाकरीता आरक्षित भूखंड तसेच ओपन स्पेस इत्यादींचा समावेश आहे. सदर अभिन्यासास मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / म्हाडा यांचेकडुन दि.26.11.2025 रोजी सुधारित अभिन्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर अभिन्यासात एकुण 17 उच्च उत्पन्न गटातील भूखंडापैकी 16 भूखंडावर विविध सहकारी संस्थांकडुन इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. तसेच 39 एल.आय.जी गटातील क्लस्टर भूखंडावर बैठ्या चाळींचे बांधकाम झालेले आहे.

	सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे सदर प्रकरणात अतिक्रमणाचे स्वरुप, त्यामागील कारणे तसेच संबंधित अधिका-यांनी केलेली किंवा न केलेली कार्यवाही याची सखोल तपासणी करण्याची आवश्यकता निर्माण होणे, त्यामुळे सदर भूखंडावरील अतिक्रमण तातडीने हटविणे, अतिक्रमणास जबाबदार घटाकांवर नियमानुसार कारवाई करणे, शासकीय मालमत्तेचे संरक्षण सुनिश्चित करणे, तसेच भूखंड पुर्णपण मोकळा करुन त्याचा नियोजनबध्द वापर करण्याबाबत शासनास तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना.	तसेच शाळेकरीता आरक्षित असलेला भूखंड उज्वल शिक्षण संस्थेस लगतच्या खेळाच्या मैदानाकरीता आरक्षित भूखंडासह भाडेपट्टा करारनाम्याने वितरीत केलेला आहे. सदर अभिन्यासातील भूखंड क्र.11 हा 1573.72 चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड दि.11.05.1992 रोजी महानगर टेलिफोन निगम लिमिटेड संस्थेस त्यांच्या कर्मचा-यांसाठी सेवानिवास्थान बांधण्याकरीता वितरीत करण्यात आला होता. सदर भूखंडाचा ताबा दि.27.08.1997 रोजी महानगर टेलिफोन निगम लि. संस्थेस ताबा देण्यात आला होता. संस्थेने भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा नोंदणीकृत केला नाही तसेच भूखंडावर कोणतेही बांधकाम केले नाही. त्यामुळे संस्थेने जाहिरातीतील वितरणाच्या अटी शर्तींचे तसेच वितरणाच्या वेळी संस्थेने सादर केलेल्या हमीपत्रातील अटी शर्तींचा भंग केला म्हणुन मुंबई मंडळाने दि.28.06.2021 रोजी वितरण अंतिमरित्या रद्द करुन भूखंड मंडळाच्या ताब्यात घेणेबाबत निर्णय घेतला. भूखंडाचा ताबा घेताना भूखंडावर 28 अतिक्रमणे व 01 मंदिर असल्याचे दिसून आले. सबब सदरचा भूखंड MTNL कडून म्हाडाच्या ताब्यात येणाआधीच त्यावर अतिक्रमणे झालेली होती. दि. 04.01.2023 रोजी अतिक्रमणधारकांना म्हाडा मार्फत एम.आर.टी.पी. कायदा 1966 अंतर्गत नोटीस देण्यात आली. त्याविरोधात एका

			अतिक्रमण धारकाने मा. दिंडोशी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन स्थगिती आदेश मिळविले. सबब सदर 01 अतिक्रमण व 01 मंदिर वगळुन उर्वरीत 27 अतिक्रमणधारकांचे निष्कासन दि.24.03.2023 रोजी पोलिस बंदोबस्त घेवुन करण्यात आले व भूखंडाच्या रस्त्याकडील बाजूस बंदिस्त भिंत बांधण्यात आली. अतिक्रमण धारकाकडुन दिंडोशी येथील दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेला दावा हा दि.24.01.2025 रोजीच्या आदेशनुसार Dismissed करण्यात आलेला आहे. परंतु अतिक्रमण धारकास मा. उच्च न्यायालयात अपील करण्यास व त्यानुसार सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित न करण्याच्या पुर्वीच्या दि.14.01.2023 रोजीच्या आदेशास तीन आठवडयांकरीता मुदतवाढ देऊन सदर जैसे थे आदेश कायम ठेवण्यात आलेले आहेत. त्यानुसार अतिक्रमणधारकाकडुन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील दाखल केले होते. सदर अपीलावर मा. उच्च न्यायालयात सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाकडुन सदरचे अपील दि.01.04.2025 रोजीच्या आदेशानुसार नाकारण्यात आले. त्यानुसार म्हाडाकडुन दि.07.04.2025 रोजी सदर अतिक्रमणाचे निष्कासन करण्यात आले आहे. तदनंतर सदर भूखंडावर अतिक्रमण धारकाकडुन पुनश्च: 09 वाढीव अतिक्रमणे

		करण्यात आली होती. त्यानुसार म्हाडाकडुन सदर 09 अतिक्रमण धारकांना व उर्वरीत 01 मंदिरास दि.14.02.2025 रोजी नोटीस बजाविण्यात आली असुन त्यांची सुनावणी घेवुन त्याबाबतचे आदेश दि.15.04.2025 रोजी पारित करण्यात आलेले आहेत. तदनंतर दि.05.05.2025 रोजी सदर भूखंडावरील 09 अतिक्रमणांचे म्हाडाकडुन निष्कासन करण्यात आले. सदर निष्कासन कारवाई दरम्यान झालेल्या स्थानिकांच्या विरोधामुळे मंदिराचे निष्कासन करण्यात आलेले नाही. सदर मंदिराच्या अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. सदर भूखंड उच्च उत्पन्न गटासाठी राखीव असून सदर भूखंड निवासी प्रयोजनासाठी असल्याने त्यावर गृहनिर्माण योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार गृहनिर्माण योजना राबविण्याकरीता म्हाडामार्फत वास्तुशास्त्रज्ञ मे. आयकॉन आर्कीटेक्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर वास्तुशास्त्रज्ञ यांनी सदर भूखंडावर बहुमजली इमारत प्रस्तावित केली असून त्यानुसार म्हाडास अंदाजे 200 ते 220 सदनिका व 05 ते 10 अनिवासी गाळे उपलब्ध होणार आहेत. सदर नकाशांना मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार / प्राधिकरण यांची मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच सदर अभिन्यासातील क्लस्टर क्र.27 च्या लगत व क्लस्टर क्र.13 लगत 02

		टप्यात विभागलेला 207.03 चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा Amenity भूखंड आहे. सदर सुविधा भूखंडावर लगतच्या क्लस्टर मधील 07 रहिवाशांकडुन अतिक्रमण करण्यात आले होते. म्हाडामार्फत सदर अनधिकृत बांधकाम धारकांना नोटीस बजावुन दि.04.12.2025 रोजी अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार सदर भूखंड भागश: मोकळा करुन भूखंडा भोवती तात्पुरती कुंपन भिंत उभारण्यात आलेली आहे. सदर कारवाई दरम्यान रहिवास अतिक्रमण धारकांनी केलेले अतिरीक्त बांधकाम स्वत:हुन पुढील 08 दिवसांत काढुन टाकण्यास तयारी दर्शविल्यामुळे सदरची कारवाई थांबविण्यात आली. सदर सुविधा भूखंडाचा समावेश म्हाडाच्या पणन विभागामार्फत ई- लिलावाअंतर्गत करण्यात आलेला आहे.

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांच्या मान्यतेने.

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 30-06-2026
10:55:58
मुख्य अधिकारी
मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा विभागीय घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

(A MHADA UNIT)

पत्ता :कक्ष क्र.२१३, पहिलामजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१.

फोन – ०२२-६६४०५३३५, ई-मेल : eecitymb@gmail.com

जा.क्र./का.अ./शहर विभाग/मुं.मं./ /२०२६.

दि.

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः अर्धा तास चर्चा सूचना क्र. २२३
मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद गिरणीवर पुनर्विकास करुन गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात आलेली असणेबाबत.
श्री. मनोज जामसूतकर, मा.वि.स.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताच-२०२६/प्र.क्र.१६७/गृनिधो-२, दि.- ३०/०६/२०२६.

महोदय,

श्री. मनोज जामसूतकर, मा.वि.स.स. यांनी दिलेली अर्धा तास चर्चेची सूचना क्र. २२३, कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

सदर अनुषंगाने, अर्धा तास चर्चा सूचना क्र. २२३ करिता माहिती/अभिप्राय सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:18:35

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2714/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 330634S)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX_ENGR(NLS)MHADA_MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:42 PM

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा विभागीय घटक)

MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD

(A MHADA UNIT)

पत्ता :कक्ष क्र.२१३, पहिलामजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१.

फोन – ०२२-६६४०५३३५, ई-मेल : eecitymb@gmail.com

जा.क्र./का.अ./शहर विभाग/मुं.मं./ /२०२६.

दि.

अर्धा तास चर्चा :

विषयः अर्धा तास चर्चा सूचना क्र. २२३

मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद गिरणीवर पुनर्विकास करुन गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात आलेली असणेबाबत.

श्री. मनोज जामसूतकर, मा.वि.स.स.

संदर्भः कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. अताच-२०२६/प्र.क्र.१६७/गृनिधो-२, दि.- ३०/०६/२०२६.

श्री. मनोज जामसूतकर, मा.वि.स.स. यांनी दिलेली अर्धा तास चर्चेची सूचना क्र. २२३ पुढीलप्रमाणे आहे.

१. मुंबईतील भायखळा, घोडपदेव येथील न्यू हिंद गिरणीवर पुनर्विकास करुन गिरणी कामगारांना घरे बांधून देण्यात आलेली असणे, २. सदर जागा ही कलेक्टर लँड असून शासनाने ९९ वर्षाच्या लिजवर दिलेली असणे, ही लिज २०१८ मध्ये संपुष्टात आली असून त्याची मालकी म्हाडाकडे हस्तांतरित झालेली असतांनाही म्हाडाने अद्यापही प्रॉपर्टी कार्डवर आपले नाव लावलेले नसल्यामुळे प्रॉपर्टी कार्डवर कलेक्टरची लैंड असा स्पष्ट उल्लेख असणे, ३. त्यामुळे न्यू हिंद मिल कॉलनीमधील सदनिकाधारकांना महाराष्ट्र शासनाच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सदनिका हस्तांतर करण्यासाठी हेलफाटे मारावे लागत असून स्टॅप डयूटी, रजिस्ट्रेशन चार्जेस आणि ट्रान्सफर फी भरुन देखील त्यांची सदनिका त्यांच्या नावावर होत नसणे, ४. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार कलेक्टरच्या एनओसी शिवाय जागा रहिवाशांच्या नावे होणार नसल्याचे दुय्यम निबंधक विभागाकडून सांगण्यात येत असल्यामुळे कलेक्टर एनओसी घेण्यासाठी दीड लाख रुपयांचे चलन भरावे लागत असल्याने म्हाडाच्या रहिवाशांना नाहक भुर्दंड सोसावा लागणे, ५. म्हाडा प्रशासन आणि जिल्हाधिकारी प्रशासन हे दोन्ही महाराष्ट्र राज्याच्या अधिपत्याखाली असल्यामुळे कलेक्टर एनओसी आणण्याचा खर्चिक निर्णय त्वरीत रद्द करण्याची आवश्यकता.

अभिप्राय :

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली ५८ (१) (ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप प्रत्येकी, १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, १/३ हिस्सा म्हाडा व

File No. MHADA-MHAD012/2714/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3306345)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX_ENGR(NLS)MHADA_MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:42 PM

१/३ हिस्सा गिरणी मालक यांना देण्याची तरतुद आहे. गिरणी मालकाने गिरणीच्या जागेचा नकाशा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सादर केल्यानंतर महानगरपालिकेच्या इमारत परवानगी कक्षाकडून त्याची तपासणी केली जाते व त्यानुसार जमिनीचा वाटा निश्चित केला जातो. सदर प्रक्रीयेमध्ये म्हाडाचा कुठलाही हस्तक्षेप नसतो.

बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांमध्ये ३२ खासगी मिल, २५ एनटीसी मिल व १ एमएसटीसी मिलचा समावेश आहे.

कार्यकारी अभियंता(Spl.), इमारत प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. EEBP/ ५१६९/City-I, दि.२८/०४/२०१७ नुसार, बृहन्मुंबईतील एकूण ५८ गिरण्यांपैकी, ३७ गिरण्यांच्या पुनर्विकासास मंजुरी प्राप्त आहे. ११ गिरण्यांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त नसल्यामुळे जमिनीमधील म्हाडाचा वाटा निश्चित झालेला नाही व १० गिरण्यांमध्ये नविन डी. सी. आर. नुसार म्हाडाचा वाटा निरंक आहे.

सदरनुसार, अपोलो मिल, मुंबई मिल, ज्युपिटर मिल, एलफिन्स्टन मिल, कोहिनूर मिल नं.३, इंडिया युनायटेड मिल नं.२,३ व न्यू हिंद टेक्सटाईल मिल या आठ गिरण्यांचा म्हाडासाठीचा एकूण वाटा ३८,७६७.९९ चौ.मी. निश्चित झालेला आहे. त्यापैकी ३१,५०१.२चौ.मी. क्षेत्रफळ जमिनीचा ताबा न्यू हिंद मिल माझगाव येथे देण्यात आलेला आहे. उर्वरीत ७,२६६.७९ चौ. मी. जमिनीचा ताबा म्हाडास अप्राप्त आहे.

माझगाव विभाग, सी.एस.क्र. ८/७१६, ७४९ येथे एकूण ३३,७२७.६८ चौ.मी. क्षेत्रफळ जमिनीचा ताबा नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांचेकडून कार्यकारी अभियंता, वांद्रे विभाग, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडास दि.३१.१०.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. सदयस्थितीत मालमत्ता पत्रकांचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे निदर्शनास येते.

Sr. No.	Cadastral Survey No. (Col. No. 4)	Total Area (in Sq. m)	Name of Person in Beneficial Ownership (Col No. 10)	Mode of Acquisition by Present Owner (Col. 11)
1.	749	27122.28	A) The new Kaiser of Hind Spinning & Weaving Co. Ltd. (Leesees)	Lease Dt. 11/06/1924 from the Secretary of State for India in Council.
			B) New Hind Textile Mills (Lessee) (Lessees)	Certified copy of Resolution Passed in the meeting of Board of Directors of the Corporation (S.M.) dt 15/06/79 whereas a in col 10 was nationalized by the Central Govt. under the sick Textile

File No. MHADA-MHAD012/2714/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3306345)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX_ENGR(NLS)MHADA_MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:42 PM

				undertakings (Nationalisation) Act 1974 and the Name of the A In COL.10 is changed to b in COL.10
2.	8/716	6605.40	X-The New Kaiser Hind Spinning Weaving Co. Ltd.	For Govt. Lease vide C.S.No. 716 of this Divn.
				(Deed No. 979) Assignmt dt 04/03/1941 from the provident investment co. Ltd. For Rs. 71,100/- Tr. No. C/39-5-1941
			Y- The Governor Of Bombay (Lessor)	(Deed No. 6083) Deed of Surrender dt. 26/07/58 From X in COL.10 in respect of Lease Dt. 31/03/24 to Y in COL.10
				(Deed No. 6085) Lease Dt. 26/07/58 From Y in COL.10 to X in COL.10 for the Term of 59 years from Dt. 26/07/58 sd/- 13/03/59
		33727.68		

तरी सद्यस्थितीत सदर जमीनी या NTC राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ यांच्याकडून गिरणी कामगारांची सदनिका बांधणेबाबत सनियंत्रक समिती मार्फत बृहन्मुंबई महानगर पालिकेमार्फत अभिन्यास मंजूरी नुसार प्राप्त झालेले आहेत. म्हाडा मार्फत तत्कालीन कार्यकारी अभियंता / पीपीडी/मुंबई मंडळ यांचे कार्यालयीन पत्र क्र. १३७१ दि. २३/०६/२०११ अन्वये म्हाडाच्या नावे नवीन मालमत्ता पत्रक करणेबाबत मा. अधिक्षक / भूमी अभिलेख, मुंबई शहर यांच्याकडे विनंती केली आहे. सदर करीता राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ (NTC), मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा यांच्यास्तरावर बैठकीचे अयोजन होणे आवश्यक आहे.

सदर अर्धातास सुचनेमधील मुद्दा क्र. ३, ४ व ५ बाबत मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत.

File No. MHADA-MHAD012/2714/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3306345)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX_ENGR(NLS)MHADA_MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:42 PM

सद्यस्थितीत न्यू हिंद मिल, माझगाव येथील म्हाडास प्राप्त जमिनीवर ३,५६२ गिरणी कामगार व १,६५४ संक्रमण सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, गिरणी कामगारांना घरांचा ताबा देण्यात आलेला आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

(मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा यांच्या मान्यतेने.)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 02-07-2026
19:19:31

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

File No. MHADA-MHAD012/2714/2026-EE CITY MUMBAI (Computer No. 3306345)
Generated from eOffice by NITIN LAXMAN SHINDE, EX_ENGR(NLS)MHADA_MHADB, EXECUTIVE ENGINEER, MHADA on 05/07/2026 12:42 PM

विधानसभा

आश्वासन

मुंबई मंडळ

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD
(A MHADA UNIT)

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२.

विषयः महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ चे दुसरे (अर्थसंकल्पीय)अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्रमांक २९४....श्रीम. डॉ. ज्योती गायकवाड, मा.विधानसभा सदस्य.

संदर्भः कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसआ – २०२५/ प्र.क्र.८२/ दुवपु- १, दि.- ०४/०६/२०२६.

मा.महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ चे दुसरे (अर्थसंकल्पीय)अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्रमांक २९४ च्या अनुषंगाने, केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करणेबाबत, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. विसआ – २०२५/ प्र.क्र.८२/ दुवपु-१, दि.- ०४/०६/२०२६. अन्वये कळविले आहे.

सदरनुसार आश्वासन क्रमांक २९४ च्या अनुषंगाने अहवाल सोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सदर बाब आपल्या माहितीस्तव सविनय सादर.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 19-06-2026
17:30:28

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
म्हाडा, मुंबई.

विषय : महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ चे दुसरे (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील विधानसभा आश्वासन क्रमांक २९४

आश्वासन क्रमांक	संदर्भ व दिनांक	विषय	आश्वासन	आश्वासन पूर्ती बाबत करण्यात आलेली कारवाई	आश्वासन केव्हा पूर्ण करण्यात आले. त्याबाबतचे आदेश, निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी)	आश्वासनाची पूर्ती केल्याचा दिनांक	आश्वासनपूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी	आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागण्याची कारणे	विलंबासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
२९४	विसआ२०२५/प्र.क्र.८२/दुवपु-१ ,दि.०४/०६/२०२६	डॉ. ज्योती गायकवाड : अध्यक्ष महोदय, माझ्या धारावीतील तात्कालीन पंतप्रधान अनुदान प्रकल्प म्हणजेच राजीव गांधी प्रकल्पांतर्गत सुमारे २२ इमारती बांधल्या गेल्या. त्यातील १५ इमारतींनी निवारा व अनिवासी गाळयांच्या किंमती च्या भरणा केला आहे. त्या इमारतींना देय प्रमाणपत्र मिळाले आहे. इतरही इमारतींनी देय प्रमाणपत्र घेतले आहे. मात्र त्यांचे अभिहस्तांतरण अनेक वर्षापासून रखडले आहे. त्यांची भाडेपट्टी, करारनामा, अभिहस्तांतरण लवकर झाले पाहिजे. सध्या पावसामुळे तेथील इमारती दयनीय स्थितीत आहेत. त्यांना स्वत:सोसायटी स्थापन करुन सर्व गोष्टी व्यवस्थित करायच्या आहेत. त्यासाठी अभिहस्तांतरण कधीपर्यंत होईल व त्यासाठी कोणती कार्यवाही केली जाईल.	श्री. शंभूराज देसाई : अध्यक्ष महोदय, हा प्रश्नही स्कोपच्या बाहेरचा आहे. तरीही सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो तपासून घेतला जाईल व यासंदर्भात विभागाला उचित सूचना दिल्या जातील.	मा. उपाध्यक्ष तथा मुकाअ/प्रा म्हाडा यांनी दि.०९/१२/२०२५ रोजी पत्र क्र. I/1977792/2025 अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी / धारावी पुनर्वसन प्रकल्प यांना पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींचा समावेश "धारावी अधिसूचित क्षेत्रातील" नकाशानुसार होतो असे प्रथमदर्शनी दिसून येतात, याबाबत खात्री करुन म्हाडास कळविण्यात यावे. त्यानुसार सदर इमारती हया धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा भाग असल्यास सदर इमारतींची दुरावस्था लक्षात घेता सदर इमारती तात्काळ रिकाम्याकरुन रहिवाश्यांना पर्यायी निवासस्थान घरभाडे पुरविण्याचे तसेच सदर इमारतींचा पुनर्विकास प्राधान्याने करण्याची विनंती केली आहे. तसेच मा. उपाध्यक्ष तथा मुकाअ/प्रा म्हाडा यांनी मा. अपर मुख्य सचिव गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना दि.०९/१२/२०२५ रोजी पत्र क्र. E-I/1977784/२०२५ अन्वये वरील परिच्छेद मध्ये नमुद करण्यात आलेला प्रकीयेस कालावधी लक्षात घेता व सदर इमारतींची धोकादायक अवस्था लक्षात घेता पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत धारावी येथे बांधण्यात आलेल्या २२ इमारतीतील सुमारे २३५९ सदनिकांच्या दुरुस्तीकरीता एकूण ५० कोटी एवढा निधी निवारा निधीतून उपलब्ध करुन घेण्यात यावा ही विनंती केली आहे. उपरोक्त अनुषंगाने सादर करण्यात येते की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाची बहुत करुन जमीन ही बृहमुंबई महानगरपालिकेची असून उर्वरीत जमीन खाजगी, रेल्वे, राज्य सरकार यांच्या मालकीची आहे. **सी.एस.क्र.२/५०१ :** ची महाराष्ट्र शासनाने सीएस क्र.२/५०१ जमिनीचा ताबा (क्षेत्र – ७१०५८.७० चौ.मी) दि.१३/०४/१९८८ रोजी म्हाडास दिलेला असून सदर मालमत्ता पत्रिकेतील स्तंभ क्र. १० मध्ये B-Prime Minister Grant Project MHADA (Holder) असे नमूद आहे. तथापि सद्यस्थितीत सदर सर्व क्षेत्र धारावी पुनर्वसन प्राधिकरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Sanctioned Planning proposal मध्ये सदर PMGP इमारतींचा समावेश धारावी अधिसूचित क्षेत्रात होतो आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येते. तरी याबाबत विचारणा केलेली असून भाडेपट्टा करारनामा, अभिहस्तांतरण करारनामा बाबत धारावी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सदर करारनामे व्हावे किंवा कसे याबाबत शासनस्तरावर योग्य ते आदेश पारित होणे प्रस्तावित आहे.

आपला विश्वासू,

(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ म्हाडा यांचे मान्यतेने)

Digitally signed by
Milind Nilkanth Borikar
Date: 19-06-2026
17:31:17

मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा

SURVEY REGISTER FOR THE MUMBAI CITY
(Prepared under Section 282 of the Maharashtra Land Revenue Act, 1966)

District : Mumbai City **Division :** Dharavi **Register No. :** 345 **Page No. :** 58

Cadastral Survey No. (Col. 4)	Sheet No. (Col. 1)	Name of Street or Locality (Col. 2)	Street No. (Col. 3)	Total Area (in Sq.m)	Laughton's Survey No. (Col. 7)	Collector's New No. (Col. 8A)
2/501	726,727,719,732	DHARAVI		71058.70 Sq.m.		

Devolution of Title (Col. 12)

Tenurewise Area Details (Col. 5 & 6)

Tenure	Area (in Sq.m)
GL	71058.70 Sq.m.

Collector's Rent Roll No. (Col. 8B) and Ground Rent Due To Govt. (Col. 9)

Sr. No.	CRR No.	Remarks	Superintendant's Initial

Original Grant From Govt. (Col. 13) and Lease from Public Body or Fazandar (Col. 14) and Ground Rent due to Public Body or Fazandar (Col. 15)

Sr. No.	Grant/Lease Type	Annual Rent (in Rs.)	Remarks	Superintendant's Initial

Sr. No.	Name of Person in Beneficial Ownership (Col.10)	Mode of Acquisition by Present Owner (Col.11)	Superintendant's Initial (Col.16)
1	A - GOVERNOR OF MAHARASHTRA (Holder) B - PRIME MINISTERS GRANT PROJECT MHADA (Holder)	AS PER G.R.R. & F.D.NO.LND-2587-205979-G-8 DATED.27-7-87 THE POSSESSION OF THE AREA MENTIONED IN COL.6 HAS BEEN HANDED OVER TO B IN COL.10 ON 13-4-88.	AS-06/07/1989

Remarks (Col. 17)

Sr. No.	Remark	Superintendant's Initial
1	THE TOTAL AREA OF C.S.NO.501 HAS NOT BEEN EXACTLY RECORDED IN REGISTER HENCE THIS ENTRY BROUGHT ON THE RECORD AS PER THE GOVT. RESOLUTION R AND F DEPT.NO.LND-2587-205979-G-8 DATED.27-7-87 REFERRED IN CASE FILE NO.S-REV-LND-3072 AND ALSO VIDE SUPDTS ORDER DT.5-7-89 VIDE M.R.NO.20-89-90 DT.6-7-89 REF.CSLR-S & LR-2-T-7-DHARAVI-501-89-90 SD/-MS.	AS-06/07/1989

